च ४०५४०

इतिहासाचार्य राजवाडे

रविंद्रनाथ टागोर

पं. ईश्वरचंद्र विद्यासागर

शिशिरकुमार घोष

जीवनाचे शिल्पकार

व इतर चरित्रे

साने गुरुजी

जीवनाचे शिल्पकार व इतर चरित्रे

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
115466

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

जीवनाचे शिल्पकार व इतर चरित्रे : साने गुरुजी

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती

१५ ऑगस्ट, २०११

किंमत

रुपये २८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अनुक्रमणिका

- जीवनाचे शिल्पकार /५
- इतिहासाचार्य राजवाडे /२९
- रवींद्रनाथ टागोर /१११
- पं. ईश्वरचंद्र विद्यासागर /१३७
- शिशिरकुमार घोष /२४९

++

जीवनाचे शिल्पकार

गुलामगिरी नष्ट करणारा लिंकन

''मला जेव्हा जे शक्य होईल तेव्हा या दुष्ट चालीवर मी घाव घातल्याशिवाय राहणार नाही. नक्कीच घाव घालीन.'' असे निर्धाराचे उद्‌गार लिंकनच्या तोंडून बाहेर पडले. एका स्टेशनावर निग्रो गुलाम उभे केलेले होते. त्यातील एका स्त्रीला चालवून बघत होते. जणू एखादे ढोर विकत घ्यायचे होते. आफ्रिकेतील निग्रोंना गुलाम करून अमेरिकेत आणून विकण्यात येई. त्या हालांची कल्पनाही करता येणार नाही.

जगातून ती प्रथा जात चालली होती; परंतु अमेरिकेत ती अजून होती. लिंकनच्या हातून तिला मूठमाती मिळायची होती. मानवजातीच्या या थोर उद्धारकर्त्याचा १२ फेब्रुवारी १८०९ मध्ये जन्म झाला. त्याचे आईबाप गरीब होते. वडिलांना शिक्षण कधीच मिळाले नव्हते. कारण लिंकनचे वडील सहा वर्षांचे असतानाच पितृहीन झाले होते. लिंकनची आई तो १० वर्षांचा असतानाच वारली. बापाने पुन्हा लग्न केले; परंतु सावत्र आईने लिंकनला छळले नाही. लिंकनचे नाव अब्राहम. प्रेमाने त्याला 'अबे' म्हणण्यात येई. अबे शेतात काम करी; परंतु वेळ मिळताच पुस्तके वाची. त्याला ज्ञानाचे वेड होते. तो म्हणे : ''वडिलांनी काम करणे शिकविले; परंतु कामावर प्रेम करायला नाही शिकविले.'' दिवसभर तो काम करी. कामानंतर बरोबरच्या मित्रांना किंवा मुलांना गोष्टी सांगे. एकदा एक शेजारीण म्हणाली,

''गप्पा मारतोस ! तुझे व्हायचे काय पुढे?''

''अमेरिकेचा अध्यक्ष होईन.'' तो म्हणाला.

लिंकन महत्त्वाकांक्षी होता. आरंभी लेखक व्हायची त्याची इच्छा होती. तो सृष्टीचा बाळ होता. नद्या, जंगले, हिरवे गवत, शेते-भाते यांत वाढलेला तो कविता

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

लिही; परंतु ते काव्य दूर राहिले आणि राजकारणातील कृतिमय काव्य लिहिणारा तो महाकवी झाला.

राजकारणात शिरला

तो निवडणुकीस उभा राहिला. एकदा पडला; परंतु पुन्हा कधी पडला नाही. तो लोकांना आवडे. तो त्यांच्यातील होता. त्याच्या इतका जीवनाचा विविध अनुभव कोणाला होता? तो शेतमजूर, होडीवाला, लाकूडफोड्या, खाटीक, स्टोअरकीपर इ.अनेक कामांतून गेला होता. अनेक निरक्षर लोकांची तो पत्रे लिहून द्यायचा. त्यांची सुख–दुःखे तो आपल्या सोप्या भाषेत लिही. असा हा लिंकन गरिबांचा कैवारी होता. पुढे त्याने वकिलीची परीक्षा दिली.

प्रामाणिक वकील

खोटा खटला तो कधी घेत नसे. एकदा एक पक्षकार आला व म्हणाला, ''माझा खटला कायदेशीर आहे. तुम्ही चालवा. हे पैसे मिळालेच पाहिजेत.'' लिंकन म्हणाला, ''तुमची बाजू कायदेशीर असली तरी नैतिक नाही आणि तुम्ही धट्टेकट्टे आहात. एवढे पैसे प्रामाणिक श्रमानेही तुम्ही मिळवू शकाल!''

महत्त्वाकांक्षी पत्नी

लिंकनची आई लहानपणी वारली. एकुलती बहीण वारली. ज्या मुलीवर त्याचे प्रेम होते, तिच्याशी तो लग्न करणार होता, ती मेली. एके दिवशी वादळी पाऊस वर्षत होता. तो दुःखाने वेडा होऊन म्हणाला, ''ती या वादळात तिथे, मातीत एकटी आहे. ती एकटी कशी राहील तिथे?'' परंतु हेही दिवस गेले आणि मेरी टॉड नावाच्या एका उथळ पण महत्त्वाकांक्षी स्त्रीचे त्याने पाणिग्रहण केले. लिंकन सर्वांना आवडे. फक्त ही नखरेबाज, प्रतिष्ठित पत्नी त्याच्यावर नाराज असे. त्याचा वेडावाकडा पोषाख, ओबडधोबड वागणे तिला रुचत नसे. तो वाटेल त्याच्याजवळ बसे, बोले. कोंबड्या, डुकरे यांच्यावर चर्चा करी. ती म्हणायची, ''हमाल आणि पाणक्ये यांच्यातच वागायची तुमची लायकी !'' तो हसून म्हणे, ''मला हे सारे आवडतात; त्याला मी काय करू?''

मुलांवर फार प्रेम

लिंकन कोमल मनाचा, प्रेमळ वृत्तीचा. त्याची मुले त्याच्या बैठकीत धुडगूस घालीत. कागद फाडीत, टाक बोथट करीत, पिकदाणी उपडी करीत. एकदा एक मित्र

म्हणाला, ''थोबाडीत द्या.'' लिंकन म्हणाला, ''खेळू द्या त्यांना. मोठेपणी त्यांनाही चिंता आहेतच.''

एकदा त्याची पत्नी चार वर्षांच्या मुलाला आंघोळ घालीत होती. तो बंबू तसाच निसटला आणि उघडानागडा रस्त्यात दूर जाऊन उभा राहिला. लिंकन पोट धरून हसू लागला. चिडलेली माता म्हणाली; ''हसता काय? जा. त्याला आधी आणा.'' लिंकनने तो ओलाचिंब बाळ उचलून आणला. त्याचे पटापट मुके घेतले.

विचारमग्न लिंकन

परंतु लिंकन विचारात असे. कशाचे विचार? महत्त्वाकांक्षा का डोकावे? अमेरिकेचे अध्यक्ष होणे? पत्नी त्याला प्रेरणा देई. एकदा लहान मुलाला हातगाडीत घालून तो नेत होता. मूल मागे पडून रडत होते. तरी रिकामी गाडी विचारमग्न लिंकन ओढीतच होता. ते विचार मानवजातीच्या उद्धाराचे होते, गुलामगिरी दूर करण्याचे होते की, इतिहासात अजरामर होण्याचे होते? हळूहळू तो राजकारणात अधिकाधिक शिरला. १८५४ मध्ये जेफरसनने लोकशाही समतेचा पुरस्कार करणारा रिपब्लिकन पक्ष काढला. लिंकन त्या पक्षाचा महान संघटक बनला आणि १८६० मधील ती ऐतिहासिक निवडणूक आली. अध्यक्षपदासाठी चार उमेदवार होते; परंतु खरी झुंज डग्लस व लिंकन यांच्यामध्येच होती. अमेरिकाभर त्यांचे दौरे घुमले. त्या दोघांच्या दोन तिखट जिभा सारे वातावरण विद्युन्मय करीत होत्या; परंतु लिंकनच्या शब्दांत सारे हृदय होते. तो म्हणाला, ''माझे भरलेले हृदय मी ओतीत आहे.'' लिंकन निवडून आला तर आम्ही फुटू, असे दक्षिणेकडील संस्थाने म्हणू लागली. कारण 'मी गुलामगिरी रद्द करीन' असे तो म्हणे. लिंकन निवडून आला. अध्यक्षपदावर बसायला अजून अवधी होता. अजून बुचॅननच अध्यक्ष होते, तोच दक्षिण कॅरोलिनाने फुटल्याचे जाहीर केले. १८३३ मध्ये जॅक्सनने याच फुटीर वृत्तीच्या संस्थानाला ताबडतोब लष्कर पाठवून ऐक्य शिकविले होते. बुचॅनन यांनी तसे केले असते, तर फुटीर वृत्ती वाढती ना, यादवी युद्ध होते ना. परंतु बुचॅनन म्हणाला, ''संयुक्त अमेरिकेचा मी शेवटचा अध्यक्ष.'' त्याने या मध्यंतरीच्या दोन-अडीच महिन्यांत उत्तरेकडचा दारूगोळा दक्षिणेकडे जाऊ दिला. लिंकनने अध्यक्षपद हाती घेतले, तोवर सहा संस्थाने फुटली. माजी अध्यक्षाने नवीन अध्यक्षाला यादवी युद्धाची भेट दिली.

यादवी युद्ध

उत्तरेकडच्या व दक्षिणेकडच्या संस्थानांचे यादवी युद्ध सुरू झाले. लिंकन म्हणाला, ''गुलामगिरीचा प्रश्न दूर राहो वाटलं तर; परंतु फुटून तर नाहीच निघता येणार. मी साऱ्या अमेरिकेला एकत्र ठेवू इच्छितो. गुलामगिरीचा रोग नष्ट केल्यानेच अमेरिकेचे कल्याण होईल; म्हणून मी तो दूर करू पाहात आहे.'' उत्तरेकडील नागरिकांनीही बंडाळी सुरू केली. लिंकनच्या मंत्रिमंडळातील मंत्रीही त्याला वाटेल ते बोलत. एकदा लिंकन सेनापतीला भेटायला गेला. सेनापती बाहेर गेला होता. लिंकन बसून राहिला. सेनापती आल्यावर आपल्या खोलीत गेला. लिंकनने निरोप धाडला. ''आता मी झोपतो'' उत्तर आले. लिंकन म्हणाला, ''त्याच्या घोड्यांचा लगामही मी धरीन; फक्त त्याने जय मिळवून द्यावा.''

एका मंत्र्याने त्याला 'गोरिला' म्हटले. तरीही लिंकन सारे सहन करीत होता. यादवी युद्ध फुटू पाहाणाऱ्या संस्थानांना एकत्र ठेवण्यासाठी होते; परंतु युद्ध सुरू झाल्यावर दोन वर्षांनी १८६३ च्या वर्षारंभाला गुलामगिरी नष्ट करण्याची लिंकनने घोषणा केली. यादवी युद्ध नैतिक भूमीवर गेले. जगाची सद्सद्विवेकबुद्धी जागी झाली. महत्त्वाकांक्षी लिंकन मानवजातीचा कैवारी म्हणून तळपू लागला. त्याच्याभोवती तेजोवलय पसरले. पुढे युद्ध संपले. बंडखोर संस्थाने शरण आली. लिंकनचे ते ऐतिहासिक भाषण झाले, ''झाले गेले विसरू या. सर्वांबद्दल मनात प्रेम ठेवून, कोणाचा हेवादावा न करता आपण नवा कारभार सुरू करू या.''

परंतु देवाची इच्छा निराळी

नवा कारभार सुरू होणार तो लिंकनला देवाघरचा निरोप आला. एका तरुणाने त्याच्यावर गोळ्या झाडल्या. कवी व्हिटमन म्हणाला, ''माझा सरदार, कोठे गेला माझा सरदार ?'' परंतु युद्धामुळे लिंकनबद्दल जे गैरसमज पसरले होते ते या मरणाने दूर झाले. लिंकन राष्ट्राचा पिता बनला. आपण चुकणारी मुले, असे साऱ्यांना वाटले. गांधीजी हिंदू-मुसलमानांना प्रेमाने नांदा सांगता सांगता मारले गेले. मानवजातीचे उद्धारक का अशाच मार्गाने जायचे ? सॉक्रेटिसाला विष देण्यात आले. ख्रिस्ताला क्रॉसवर चढण्यात आले. लिंकनवर गोळ्या झाडण्यात आल्या, महात्माजींनाही असेच वीरमरण! लिंकन आणि गांधीजी या दोघांची नेहमी तुलना करण्यात येते. दोघे वीरपुरुष, दोघे मानवाबद्दल प्रेम बाळगणारे ! लिंकनला शस्त्र घेऊन लढावे लागले.

१० लाख माणसे यादवीत मेली. कोणी म्हणतात, लिंकन अध्यक्षपदासाठी उभा न राहता तर युद्ध टळले असते कोणाला माहीत?

जनतेचे प्रेम

सर्वसामान्य जनतेचे त्याच्यावर प्रेम होते. तो अध्यक्ष झाला. तेव्हा एक लहानपणची ओळखीची म्हातारी आजीबाई हातमोजे आणून म्हणाली, ''अबे, हे घे. तुझ्या अध्यक्षस्थानी हे घेऊन जा. माझ्या हाताने कातलेल्या सुताचे मी हे विणले आहेत !'' आणि लिंकनने ते प्रेमाने घेतले. सहा फूट चार इंच उंच असलेला हा वीरपुरुष विचाराने, भावनेनेही सर्वांहून उंच होता. महत्त्वाकांक्षा व उदात्तता यांचे तो मिश्रण होता. माती व प्रकाश, मर्त्यता व अमृतत्व यांचे मिश्रण म्हणजे त्याचे जीवन ! परंतु त्या जीवनात अपूर्णता, दोष, अंधार आज दिसून न येता त्या जीवनातील धीरोदात्तता व मानवजातीबद्दलचे व्यापक प्रेम याच गोष्टी सर्वांच्या डोळ्यांसमोर येतात!

+++

जर्मन महाकवी गटे

महाकवी हे जगाचे असतात आणि विशेषतः गटे हा खरोखरच राष्ट्रातीत होता. त्याने जर्मन लोकगीतांना जी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे, तीत तो म्हणतो : "लोकांचे, विशेषतः मुलांचे इतर राष्ट्रांच्या गुणांकडे लक्ष वेधून घेण्याची वेळ आली आहे." गटेची वृत्ती विश्वात्मक होती. तो लहानशा वस्तूंतही विश्व पाही. 'पिंडी ते ब्रह्मांडी, ब्रह्मांडी ते पिंडी' ही भारतीय भावना गटेच्या जीवनात दिसून येते.

२८ऑगस्ट १७४९ ला दुपारी त्याचा जन्म झाला. त्याचे पणजोबा लोहार होते. आजोबा शिंपी होते; परंतु वडील पंडित होते. राज्याचे सल्लागार होते. आजोबा-पणजोबांचा धंदा त्यांनी मुलाला कधी सांगितला नाही. गटेची आई साधी, सरळ होती. पतीत्न आणि तिच्यात वयाचे बरेच अंतर. गटे जन्मला तेव्हा पित्याची चाळिशी उलटलेली; परंतु आई अठरा वर्षांची होती. ती लहान गटेला गोष्टी सांगे. गटे म्हणतो: "पित्यापासून जीवनाची गंभीर दृष्टी मी घेतली. आईपासून गोष्टी सांगण्याची आवड मिळविली."

वैचारिक बंडखोर

अठरावे शतक क्रांतिकारक. अमेरिका स्वतंत्र झाली. फ्रेंच राज्यक्रांती झाली; परंतु जर्मनीत राजकीय क्रांती झाली नाही. तेथे वैचारिक बंड झाले. ल्यूथरने पूर्वी पोपविरुद्ध बंड जर्मनीतच केले. गटे वयाच्या सहाव्या वर्षी म्हणाला, "कोठला देव नि काय !" पित्याने त्याला लॅटिन, ग्रीक या भाषा लहानपणीच शिकविल्या. जगाचा इतिहास शिकविला. गटेने आठव्या वर्षी लॅटिन भाषेत निबंध लिहिला. अकराव्या वर्षी सात भाषांत एक कादंबरी लिहिली. चौदाव्या वर्षी प्रेमात सापडला. असा हा उच्छृंखल मुलगा वाढत होता. लिप्झिग येथील विद्यापीठात शिकत होता; परंतु आजारी पडला. मरायचाच, पण वाचला. पुढे स्ट्रासबर्ग येथे कायदेपंडित व्हायला गेला; परंतु

अभ्यासाकडे त्याचे लक्ष नसे. लहरीप्रमाणे वाची. वैद्यक, संगीत यांचाही अभ्यास करी. नवीन खेळ खेळायला शिकला. तो दिसे भव्य. नाक सरळ, मोठे. भुवया आणि डोळे आकर्षक, रुंद कपाळ. त्याला पाहताच सारे दिपून जात. तो हॉटेलात गेला तर खाणे-पिणे विसरून सारे त्याच्याकडे बघत राहात. तो स्वतः म्हणतो, ''मी यौवनाने जणू मस्त होतो.''

अनुभवाचे सोने करी

कितीतरी मुलींवर त्याने प्रेम केले. काहींनी त्याला सोडले. त्याने काहींना सोडले. त्या त्या वेळेस ती प्रेमोत्कटता खरी असे; परंतु त्याच्या सर्व जीवनाला ती व्यापू शकत नसे. मनावरचे भार काव्यात ओतून तो पुढे जाई. मिळणाऱ्या अनुभवाचे काव्यमय सोने करी. नाटक लिहिण्यासाठी जर्मन इतिहास त्याने धुंडाळला आणि गॉट्झ् या वीरावर त्याने नाटक लिहिले. गॉट्झ् हा गरिबांची बाजू घेणारा, श्रीमंतांना नाडणारा. हे नाटक तरुणांना जणू बायबल वाटले. उच्छृंखल जीवन जगणे म्हणजे धर्म असे त्यांना वाटू लागले.

तरुण वर्टरची दुःखे

लॉटचेन नावाच्या तरुणीवर त्याचे प्रेम बसले; परंतु तिचे दुसऱ्याशी लग्न ठरले होते. एक दिवस गटे दोघांचा निरोप घेऊन जातो; परंतु तो अति दुःखी झाला. आत्महत्या करावी असे त्याला वाटते; परंतु गटेचा फौस्ट ज्याप्रमाणे विषारी कुपी फेकून पुन्हा झगडायला उभा राहतो, त्याप्रमाणे गटे 'तरुण वर्टरची दुःखे' ही कादंबरी लिहून तो दुःखभार दूर करतो. पुढे जीवनयात्रेला निघतो. वर्टर हा प्रेमभंगामुळे आत्महत्या करतो. हे पुस्तक म्हणजे भावनांचा कल्लोळ आहे. जर्मनीत त्याच्या १६ आवृत्त्या निघाल्या. नेपोलियनने इजिप्तवर स्वारी केली तेव्हा ही कादंबरी त्याच्या खिशात होती. त्याने ती सात वेळा वाचली होती. जर्मनीतील तरुण-तरुणींना तर वेड लागले. कादंबरीतील वर्टरप्रमाणे तरुण पोषाख करू लागले. मुली कादंबरीतील नायिकेप्रमाणे नटू लागल्या. प्रेमभंग झालेले तरुण आत्महत्या करू लागले. गटेचा का हा संदेश होता ? तो तर पुढे जात होता. स्वतःचे मरण वर्टरवर सोपवून तो विजयी वीराप्रमाणे पुढे चालला.

वायमार येथे वास्तव्य

वायमार येथील छोट्या राजाच्या दरबारात तो राहिला. वायमार त्याने साहित्याचे केंद्र बनविले. हळूहळू त्याची उन्मादक वृत्ती शांत होत होती. तो सुखी, विलासी दिसला तरी गरिबांविषयी त्याला प्रेम वाटे. तो राजाला नमस्कार करी आणि गरीब माणसांनाही करी. खाणीतील लोकांना भेटून आल्यावर तो म्हणाला : ''ज्यांना आपण खालच्या

वर्गाचे समजतो, तेच देवाच्या दृष्टीने परमोच्च असतात. त्यांची साधी राहणी, सरलता, निष्ठा, सहनशीलता, थोडे काही मिळाले तरी आनंदी होणे ! किती दैवी गुण त्यांच्या ठायी असतात. माझे प्रेम त्यांच्याकडे धावते.'' एकदा त्याने घरी एका बुकबाइंडरला बोलाविले होते. तो काम करीत होता. गटे त्याच्याजवळ बोलत बसला होता. तो गेल्यावर गटे म्हणाला, ''त्याचा प्रत्येक शब्द सोन्याच्या मोलाचा होता. त्याच्याबद्दल मला किती आदर वाटला !''

तो अनेकांना मदत करी. कोणाला नोकरी लावून देई, कोणाला शिकण्यासाठी मदत करी. दुसऱ्याचे दुःख पाहून दुःखी होई. त्याचा आत्मा विशाल होता. व्यापक होता.

गटेला सारे ज्ञान हवे असे वाटे. अनेक शास्त्रांचा तो अभ्यास करू लागला. शरीरशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रंग प्रक्रिया, नाना अभ्यास. 'वनस्पतींची स्थित्यंतरे' या ग्रंथात तो म्हणतो : ''पानांचा परिपूर्ण विकास म्हणजेच फूल. फूल म्हणजे पानांचे काव्य!''

मनोविकासासाठी शास्त्राभ्यास

गटे सर्व शास्त्रांचा अभ्यास करी; परंतु तो शास्त्रज्ञ नव्हता. तो कवी होता. मग इतर शास्त्रांत ही लुडबूड का ? गटे एके ठिकाणी म्हणतो, ''कोणतेही एक काम नीट करायला हवे असेल तर अनेकांचे ज्ञान हवे. मग ते परिपूर्ण व निर्दोष असे काम संपूर्णतेचे प्रतीक होऊ शकते.'' मनाला सुसंस्कृत, विशाल करण्यासाठी गटे विज्ञानाचा अभ्यास करी.

शिलरशी मैत्री

त्या वेळेस जर्मनीत लहानमोठे अनेक लेखक होते. महान तत्त्वज्ञ होते; परंतु गटेची कोणाजवळ विशेष मैत्री नव्हती. शिलर या थोर नाटककाराची व गटेची गट्टी जमली. ११ वर्षे ही मैत्री टिकली. शिलरच्या मरणाने तुटली. या काळातच शिलरने एकाहून एक सरस नाटके लिहिली.

परिपूर्णता हे ध्येय

गटे घाईघाईने काही करीत नसे. त्याची नाटके, कादंबऱ्या कित्येक वर्षे चालत. तो पुनःपुन्हा लिही. 'फौस्ट' नाटकाचा आरंभ तारुण्याच्या ऐनभरात तर शेवट मरणाच्या थोडे दिवस आधी. ५० वर्षे ते नाटक तो लिहीत होता. त्याने जवळजवळ ६० पुस्तके लिहिली. भावगीते, शोकगीते, उपहासगीते, महाकाव्ये, निबंध, कादंबऱ्या, नाटके, भुताखेतांच्या, पऱ्यांच्या अद्भुत गोष्टी, शास्त्रीय ग्रंथ – सारे प्रकार त्याच्या वाङ्मयात आहेत. त्याचा सर्वांत महान ग्रंथ म्हणजे 'फौस्ट'. त्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत.

फौस्ट

फौस्ट हा फार जुना विषय. फौस्टवर यात्रांतून नाटके होत. इंग्लंडमधील नाटककार मार्लो याने फौस्टवर शोकान्त नाटक लिहिले आहे. मूळ गोष्ट अशी की, फौस्ट सैतानाजवळ करार करतो. सैतानाने १२ वर्षे त्याला सुखे पुरवावीत. १२ वर्षानंतर फौस्टने त्याचे गुलाम व्हावयाचे. जुन्या दंतकथेप्रमाणे फौस्ट कायमचा नरकात पडतो. मार्लोच्या नाटकातील त्याचे ते त्या वेळचे आत्मगत भाषण हृदयाला भिडते. गटेने या कथानकात महत्त्वाचा फरक केला. फौस्ट सैतानाला म्हणतो, ''तू सुखे दे. जर हे क्षणा, तू किती सुंदर!'' असे मी म्हटले तर मी तुझा गुलाम.'' असा करार करून गटेने फौस्टला मुक्त केले आहे. मानवी आत्म्याला वैषयिक सुखे गोड वाटली तरी ती चिरशांती देऊ शकणार नाहीत. सैतानाजवळचा करार पुरा होणे शक्य नाही. मानव कायमचा नरकाग्नीत पडणे ही कल्पनाच गटेच्या उदार बुद्धीला सहन होत नाही. मनुष्याचा उद्धार होईल, आज ना उद्या, अशी अमर आशा गटेचा फौस्ट देतो. जगातील सर्व सुखांची चव घेणारा, सर्व ज्ञानविज्ञान पालथे घालणारा, शेवटी आंधळा झालेला फौस्ट, ''दलदल हटवावी, लोकांची सेवा करावी, आरोग्य होईल, मुलांचे गाल गुबगुबीत होतील'' यात कृतार्थता मानतो. गटेच्या जीवनाचे हे सार आहे. ''विश्वाचे कोडे सुटणे कठीण. समजेल तेवढे समजून घ्या आणि हे जग सुखी करा.'' हा गटेचा संदेश. मरणाआधी दोन-चार दिवस एक तरुण आला. 'संदेश द्या' म्हणाला. त्या आसन्नमरण कवीने लिहिले :

''जो तो आपले काम करील
तर सारा गाव स्वच्छ राहील,
बोलल्याप्रमाणे वागतील
तर सारे तरून जातील.''

कर्माचा उपासक

गटे कवी होता; परंतु काव्याच्या समाधीत राहणे, कर्मशून्य राहणे त्याला आवडत नसे. एकदा एका जर्मन गृहस्थाने अधिकाऱ्याला न्यायासनासमोर खेचले. गटेला आनंद झाला. ''छान काम केलेत. शेकडो पुस्तके लिहिण्यापेक्षा असे एक काम महत्त्वाचे आहे.'' केवळ तत्त्वज्ञानात, अमूर्त विचारांत, त्याला गोडी नव्हती. तो व्यक्ताचा उपासक होता. व्यक्तातून अव्यक्त तो अनुभवी. तो म्हणतो, ''जे प्रत्यक्ष आहे, त्यातूनच विचार

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

नाही का मिळत ? निराळी तत्त्वज्ञाने कशाला ? या प्रत्यक्षाच्या पाठीमागे काय आहे, ते शोधण्याची काय जरूर ? या अनंत घडामोडी, हे विश्व म्हणजेच महान वस्तुपाठ आहे.''

दुःखातून पुढे जाणारा

तो अनेकदा प्रेमपाशात सापडला. अनेकांशी मैत्रीचे, स्नेहाचे संबंध आले. प्रेमे भंगली. मैत्री तुटल्या; परंतु दुःख गिळून तो पुढे गेला. तरुणपणात एकदा तो घोड्यावरून भटकायला गेला. तो लिहितो : ''हिंडता हिंडता रात्र झाली, तरीही मी घोड्यावर होतो. मी उभा राहिलो. समोर दरीतून रुपेरी नदी वाहात होती. पाठीशी डोंगरावरील जंगल होते. माझे हृदय शांतीने भरून आले होते. मोकळे हृदय म्हणजे महान आनंद. आपल्यातील पाणीदार प्रेरणा आपणास अशक्य अशा गोष्टींकडे, साहसांकडे जायला लावते. महान प्रयत्नांशिवाय महान आनंद नाही. प्रेमाच्या बाबतीत हेच तर माझे भांडण. प्रेम धैर्य देते यावर माझा विश्वास नाही. हृदय मृदू झाले म्हणजे दुबळे होते. प्रेमाने हृदय भावनोत्कटपणे उडू लागते. कंठ भरून येतो. अवर्णनीय स्थिती ! तो का दुबळेपणा असतो ? फुलांचे साधे हारही आपणास बांधू शकतात !''

फ्रेंच क्रांती : नेपोलियनशी भेट

फ्रेंच क्रांती झाली होती. फ्रेंचांच्याविरुद्ध युरोपातील राजे – महाराजे एकवटले. परंतु १७९४ मध्ये फ्रेंचांनी त्यांचा पराजय केला. गटेला युद्ध बघायला जर्मन सेनापतीने नेले होते. पराजय झाल्यावर गटे म्हणाला : ''एक नवे युग आता सुरू होत आहे. जुना जमाना संपला.'' त्याची ती भविष्यवाणी होती. नेपोलियन सर्वसत्ताधीश होण्यापूर्वी जर्मनांनी फ्रेंचांना पुन्हा एकदा पिटाळले होते. फ्रेंचांनी शांतपणे मागे जायचे ठरविले. परंतु एक फ्रेंच शिपाई चुकून मागे राहिला. लोक त्याला पकडून ठार करणार होते. गटे एकदम पुढे होऊन म्हणाला : ''व्यक्तीवर सूड उगविणे चांगले नाही !'' त्यांनी त्या फ्रेंच सैनिकास जाऊ दिले. पुढे नेपोलियन सर्वसत्ताधीश झाला. सम्राट झाला. १४ ऑक्टोबर १८०६ रोजी जेनाच्या लढाईत जर्मनांचा बीमोड झाला. वायमारमधील लोक पळू लागले. विजयी फ्रेंच शिपाई लुटालूट करीत येणारच; परंतु गटे निर्भयपणे तेथेच राहिला आणि फ्रेंच शिपाई शहरात घुसले. गटेच्या घरातही घुसले. गटेच्या नोकरांनी त्यांना दारू, जेवण, जे पाहिजे ते दिले. चाळीस जणांना जेवण देऊन झोपायची व्यवस्था केली. गटे वर आपल्या खोलीत गेला. रात्री पुन्हा दारू पिऊन दोन-चार सैनिक आले. दार ठोठावू लागले. हातात मेणबत्ती घेऊन गटे खाली आला. त्याने त्यांचीही व्यवस्था केली. ''सारे मिळाले ना?'' विचारून वर गेला; परंतु ते दारूडे त्याच्या खोलीकडे आले. गटेजवळ भांडू लागले. इतक्यात

गटेची प्रेयसी आली. तिने नोकरांच्या मदतीने दारूड्यांना जिन्याखाली लोटले. दार लावून घेतले. गटे वाचला. गटेने आपल्या प्रेयसीजवळ धार्मिक पद्धतीने विवाह लावला नव्हता. त्याचा असल्या विधींवर विश्वास नव्हता; परंतु या प्रसंगानंतर दोनच दिवसांनी त्याने तिच्याशी विधिपुरस्सर विवाह केला ! "जर्मनीचा पराजय होत आहे, आणि याला लग्नाचे सुचत आहे." लोक म्हणाले. गटे म्हणाला, "लोकांना गंभीर भावना कळत नाहीत !" १८०८ मध्ये जर्मनीतील एका गावी नेपोलियनची युरोपातील राजेमहाराजे यांच्याशी भेट होती. रशियाचा सम्राट लांबून मुद्दाम आला होता. चार मोठे राजे, चौतीस मांडलिक राजे जमलेले. गटे गेला नाही; परंतु त्याच्या राजाने त्याला बोलाविले. नेपोलियनने गटेला भेटायला बोलाविले. एक सत्तासम्राट तर एक विचारसम्राट. नेपोलियनने अगदी जवळ बोलाविले. तासभर मुलाखत झाली.

"तुम्ही जर्मनीचे सर्वश्रेष्ठ नाटककार, कवी !"

"शिलर, लेसिंग हेही मोठे आहेत."

"तुम्ही रशियन सम्राटाला एखादी कृती अर्पण करा ना."

"मी असे करीत नसतो."

"आमच्या देशात, चौदाव्या लुईच्या काळात तर अनेक लेखक असे करीत."

"त्या लेखकांना मागून पश्चात्तापच झाला असेल !"

"तुम्ही ज्युलियस सीझरवर एक नाटक लिहा. व्हॉल्टेअरने लिहिले आहे. पण तुम्ही सरस लिहा. दुःखान्त नाटक म्हणजे राजेमहाराजे व जनता यांना शिकवणारी शाळा. सीझर जगता तर मानवजातीला सुख देता. मनातील विचार, कल्पना प्रत्यक्षात आणता. तुम्ही लिहाच त्याच्यावर आणि पॅरिसला या ना." असे बोलणे चालले. इतक्यात पोलंडहून लष्करी अधिकारी आल्याचा निरोप आला. नेपोलियन एकदम उठला. गटेजवळ जाऊन म्हणाला :

"तुमचे वय किती ?"

"साठ."

"प्रकृती छान आहे तुमची ! मुलेबाळे आहेत?"

गटे आता जायला अधीर होता. नेपोलियनने जायला परवानगी दिली. तो गेल्यावर नेपोलियन म्हणाला : "खरा मनुष्य आहे !"

गटेला थोडा अभिमान वाटला. फ्रेडरिक दि ग्रेट हा जर्मन राजा पूर्वी व्हॉल्टेअरला जर्मनीत बोलवी. आज जर्मनीच्या कवीला नेपोलियनसारखा सम्राट पॅरिसला आग्रहाने

बोलावीत होता. तिकडे रणांगणातील पराजयाने जर्मनीची मान खाली झाली होती; परंतु साहित्यिक विजयाने गटेने ती उंच ठेवली होती.

नेपोलियन व बायरनबद्दल आदर

गटेला जेथे जेथे प्रभावी व्यक्तिमत्त्व, साहस, अपूर्वता दिसे, तेथे तो मान लववी. नेपोलियन त्याला प्रखर झंझावाताप्रमाणे वाटला आणि इंग्लंडमधला बायरन! त्याची उच्छृंखल वृत्ती, त्याचे भावनोत्कट काव्य, इंग्लंडमधील त्याचा छळ, त्याचे युरोपात येणे, ग्रीकांच्या स्वातंत्र्ययुद्धात सामील होणे आणि अकाली मरण या सर्व घटकांचा गटेवर परिणाम झाला. अकस्मात उदयाला आलेला हा तेजोगोल पाहून गटे दिपला. इंग्रज लेखक कार्लाईल म्हणायचा : "बायरन मिटा, गटे उघडा." परंतु हा गटे म्हणायचा: "बायरन युरोपातील सर्वांत मोठी व्यक्ती आहे. एकाने विचारले : "बायरन मानवजातीला काय शिकवणार ? काय आहे त्याच्या जीवनात?" गटेने उत्तर दिले : "तो जोर, ते साहस, याचा का मानवावर परिणाम नाही होणार? सत्य शिव सुंदराच्या ठोकळेबाज कल्पना नका घेऊन बसू. जे जे भव्य, दिव्य आहे, अपूर्व आहे, महान आहे, त्याचा परिणाम होत असतो. आपण ते समजून घेतले पाहिजे." बायरन मरण पावल्यावर गटे दुःखी झाला.

उत्क्रांतीचा भक्त

गटे उत्क्रांतीचा भक्त होता. अव्यवस्था, अराजक, त्याच्या प्रकृतीस मानवत नसे. स्पर्धा, बंडाळीत अर्थ नाही. तो म्हणे, "उत्क्रांतीत ईश्वरता आहे; कर्मशून्यतेत किंवा उत्पातात नाही."

मृत्यू जवळ आला

मधून मधून त्याला स्फूर्ती येई किंवा अर्धवट राहिलेले भाग पुरे करी. पर्शियन आणि अरेबिकही तो अभ्यासू लागला. फिर्दोसी, हाफीज त्याला आवडायचे. अरबस्तान, इराण इकडे तो हिंडून आला. तो चिरयुवा होता. वाढत्या वयाबरोबर वाढती कर्मक्षितिजे! वेदांचा काव्यात्मक अनुवाद करायची त्याला इच्छा होती. चिनी काव्यही वाचू लागला. परंतु ८० वर्षे होत आली. त्याची प्रिय माणसे मरण पावली. एकुलता मुलगाही गेला; परंतु तो लिहितो : "अशा प्रसंगी कर्तव्याच्या कठोर जाणिवेनेच आपण पुन्हा शांत होतो व काम सुरू करतो. अनेकांच्या मरणांवरून पुढेच जायचे असते." (Forward over the graves) मरणाच्या थोडे दिवस आधी कधी उसळली नव्हती अशी सर्जनशक्ती संचारली. 'फौस्ट'चा शेवटचा भाग लिहिला. तिकडे नाटकात फौस्ट आंधळा होतो,

दिवाणखान्यात फेऱ्या घालतो आणि इकडे गटेही वृद्ध; परंतु विचाराने चिरयुबा शेवटच्या ओळी लिहीत आहे आणि इलमेनो या रम्य स्थळी तो जाऊन येतो. पुष्कळ वर्षांपूर्वी तो तेथे गेला होता. डोंगरावर एक झोपडी होती. तेथे त्याने कित्येक वर्षांपूर्वी लिहिलेल्या ओळी तशाच होत्या : 'डोंगरावर सर्वत्र शांतीचे राज्य आहे. वारा शांत आहे. पाखरांनीही सारे आवाज बंद केले आहेत. अधीर नको होऊ. तूही शांत हो. लवकरच तुलाही चिरशांती लाभेल !'' अशा त्या ओळी. त्याचे डोळे भरून आले. अनंत स्मृती; परंतु डोळे पुसून, ''तुलाही चिरशांती लवकरच लाभेल!'' हे शब्द उच्चारीत तो घरी आला. अति सुंदर गीते या अखेरच्या दिवसांत त्याने लिहिली. थोर जर्मन कवी हायना म्हणतो, ''या गीतांतील शब्द आपणास जणू मिठी मारतात आणि त्यांतील अर्थ चुंबन घ्यायला येतो.'' त्याचा इतर अभ्यास चालूच होता. ते बघा टेबल. त्याच्यावर नुकतेच सापडलेले प्राण्यांचे प्राचीन अवशेष आहेत. हत्तीचे दात आहेत. काही वनस्पतींचे प्रकार आहेत. त्याची सर्वगामी जिज्ञासा जागृत आहे. तो आपल्या रोजनिशीत लिहितो : ''जेनाच्या वेधशाळेतील ज्योतिर्वेत्ते दोन वर्षांनी दिसणाऱ्या धुमकेतूच्या स्वागताची तयारी करीत असतील... पृथ्वी सूर्याभोवती फिरत आहे, हा केवढा भव्य शोध मानवाने लावला. सारी बायबले एकत्र केली, तरी त्यांच्याहून हा शोध महत्त्वाचा आहे !''

अनेक भेटायला येत, गटे चर्चा करी. राष्ट्रीय कवितांची टिंगल करी. मागे १७९४ च्या सुमारास त्याला 'फ्रेंचांच्या द्वेषासंबंधी कविता करा' म्हणून सांगण्यात आले. त्याने केल्या नाहीत. तो म्हणाला, ''मला द्वेष वाटत नाही. मी कशी करू ? जे मी अनुभवले नाही ते मी कधी लिहिले नाही.'' मरणाआधी थोडे दिवस तो म्हणाला, ''आकाशात उंच उडणारा गरुड खाली सशाकडे बघतो. तो ससा कोणत्या देशातला आहे, हे नाही पाहात.'' आणि एका प्रेयसीची प्रेमपत्रे त्याच्याजवळ होती. ती तिच्याकडे तो परत करतो आणि लिहितो, ''ही पत्रे वाचायला पूर्वी हृदय किती अधीर असे ! कितीदा वाचली तरी तृप्ती होत नसे. पत्रांनो, माहेरी जा. त्या हृदयाकडे जा. ते हृदयही भरलेले असेल. त्या डोळ्यांतील प्रकाश तुमच्यावर पडून तुम्ही प्रकाशमय व्हाल. ज्या हाताने लिहिले तो हात तुम्हांला पुन्हा स्पर्श करील आणि तुम्ही पूर्वीची सुवर्णकथा सांगाल.'' १७ मार्च १८३२ रोजी प्रसिद्ध शास्त्रज्ञ हंबोल्ट याला त्याने मोठे पत्र लिहिले. हेच त्याचे शेवटचे महत्त्वाचे पत्र. बाल्झाक, प्लुटार्क वाचीत होता. एका तरुणाने अल्बम पुढे केले. त्यावर कवितात्मक संदेश लिहिला. मरणाआधी ४८ तास एका तरुण जर्मन स्त्री-कलावंताला मदत करण्यासाठी काढलेल्या पत्रकावर त्याने सही केली. २० मार्च रोजी त्याच्या छातीत

कळा येऊ लागल्या. तो अस्वस्थ झाला. क्षणात बिछान्यावर पडे, क्षणात आरामखुर्चीत. विव्हळत होता. पहाटे जरा झोप लागली. २१ मार्च हा दिवस उजाडला. फ्रेंच क्रांतीवरचे एक पुस्तक त्याने मागितले. जरा पाने चाळली. नंतर थोडे खाणे घेतले. २१ तारीख गेली.

"आजची तारीख ?" त्याने विचारले.

"बावीस."

"वसंत आला तर ! आता बरे वाटेल."

नऊ वाजले सकाळचे. जरा झोप लागली. झोपेत स्वप्ने. म्हणायचा, "ते पाहा त्या स्त्रीचे सुंदर डोळे ! कुरळे, काळे केस ! काळ्या पार्श्वभूमीवर... असे स्वप्नात बोले. एकदम डोळे उघडून म्हणाला, "त्या खिडक्या साफ उघडा. प्रकाश भरपूर येऊ दे आत. अधिक प्रकाश. अधिक प्रकाश." खिडक्या उघडण्यात आल्या.

"फ्रेडरिक, तो चित्रसंग्रह दे रे. अरे तो नव्हे, काय नाही? मला का स्वप्नात दिसते आहे सारे ?"

दहा वाजले. लहान ऑनिनीला म्हणाला, " ये बाळ जवळ. तुझा लहान हात माझ्या हातात दे." पुन्हा शांत पडला. हात हवेत वर करून मधल्या बोटाने काही लिहीत होता. 'डब्ल्यू' अक्षर लिहिले, जवळचे म्हणाले, तो हात हळूच खाली आला. बाराची वेळ आली आणि हा महान सूर्य मध्यान्हीला मावळला. जन्मला त्याच वेळेस मरण पावला.

महान जीवन

८३ वर्षांचे ते महान जीवन. त्या जीवनातील किती प्रसंग सांगणार ? त्याच्या ग्रंथातले उतारे तरी किती देणार ? कै. प्रा. गुणे यांनी 'तरुण वर्टरची दुःखे' ही कादंबरी मराठीत आणली. बाकी गटे तसाच आहे. त्याची भावगीते अपूर्व आहेत. नादमधुरता विलक्षण आहे. अर्थ आणि शब्द यांची अशी मिळणी दुर्मीळ. जे लिही ते घासून पुसून हिऱ्याप्रमाणे करून जगाला देई. 'लाट्झ' नाटक याने तीनदा लिहून काढले. घाईने नीट होत नाही म्हणायचा. वर्षानुवर्षे त्याच्या मनात कल्पना वाढत असत. 'एग्मॉंट' या नाटकातील काही भाग लिहून झाल्यावर उरलेला भाग त्याने बारा वर्षांनी पुढे लिहिला.

आदर नि कृतज्ञता

तो महान असूनही विनम्र होता. बायरनला त्याने डोक्यावर घेतले. हर्डरला लिहिले : "माझ्यावर जहरी टीका केलीत तरी चालेल; परंतु माझ्या पुस्तकावरचे मत कळवा. मला त्यातून शिकायला मिळेल." शेक्सपिअरवर तरुणपणात लेख लिहिला. त्यात म्हणतो :

''मित्रांनो, आपल्या आत्म्याच्या उड्या महान असतात. त्यांना हे आयुष्य अपुरे पडते. कितीही जगलो तरी शेवटी सारे शून्य व्हायचे. मला मीच सर्वस्व आहे. माझ्याद्वारेच मला सारे समजायचे. ज्यांना अनुभव आहे ते असेच म्हणतील. मला मोठमोठी पावले टाकीत जायला हवे. शेक्सपिअर ! मित्रा, अजून तू आमच्याबरोबर आहेस. तुझ्याशिवाय कोणाजवळही मी राहू इच्छित नाही. तुझा पाईक म्हणून तरी तुजजवळ राहू दे.'' लहानसहान चिठ्ठीही मित्रांची, मोठ्यांची जपून ठेवी. हर्डरची चिठ्ठीही त्याने जपून ठेवली होती. या जगात प्रत्येकापासून आपणास शिकता येईल, असे म्हणे.

निसर्गाचा प्रेमी

निसर्गावर त्याचे अपार प्रेम. वादळात, पावसातही हिंडायला जायचा. रात्र असो, गारा पडत असोत. एकदा प्रचंड वादळात जाऊन आल्यावर केलेल्या कवितेत तो म्हणतो, ''हे देवी शक्ती, ज्याच्याबरोबर तू आहेस, तो पावसाला, वाऱ्याला भिणार नाही. हे देवी शक्ती, गारा पडोत, मेघ गडगडोत, हा त्यांना आदराने तोंड देईल, तो वर चंडोल उडत आहे त्याप्रमाणे !'' त्याची निसर्गगीते मनोहर आहेत.

''किती सुंदर, दिव्य भव्य जग
हा तेजस्वी सूर्य
आणि ही पृथ्वी किती आनंदी
उंच फांद्यातून कळ्या तोंडे
खुपसत आहेत.
झाडाझुडपांतून पाखरांचे
आनंद आवाज येत आहेत
अनंत ! परमानंद !!
सर्वांच्या हृदयांत आनंद
हे पृथ्वी, हे सूर्यप्रकाशा,
किती हा आनंद, केवढी उत्कटता !''

आपण पृथ्वीवर आनंद आणू असे त्याला वाटे. तो लिहितो : ''विजय, सर्वांचा विजय ! मुला, सर्व वस्तुजात पाहण्याची तुला उपजतच दृष्टी आहे. जीवनातील आनंदाची तुला जाणीव होईल. मानवी कृतीतील उदात्तता बघशील. मानवाच्या आशा आकांक्षा तुला समजतील. देव व मानव यांच्यामध्ये जा-ये करणाऱ्या देवता तुला वर नेतील आणि त्या साहित्य-सोनियाच्या पर्वतांवरील सुखगंगा तू पृथ्वीवर आणशील !''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

प्रेमाच्या उत्कटतेचे गटेनेच वर्णन करावे ! तो लिहितो, "तुझ्या वक्षस्थलावर डोके ठेवून असताना हजारो वर्षे क्षणासारखी भासतील. दिवसाचा मला तिटकारा वाटतो. तुझ्या वक्षस्थलावर विसावा ! दुसरे काही नको. प्रेममग्न होऊन मला पडून राहू दे. त्या एका क्षणात अनंत युगे, अनंत जगे मी अनुभवतो. विश्वाला जणू स्पष्ट करतो."

तो एक सत्‌चा पुजारी

उपनिषदांतील सर्वव्यापी चैतन्याचा तो पुजारी होता. तो म्हणतो, "त्याला आनंद म्हणा, हृदय म्हणा, ईश्वर म्हणा, मी त्याला नाव नाही देऊ इच्छित." अन्यत्र म्हणतो, "ते एक अजर अमर तत्त्व या अनंत वस्तुजातातून प्रकट होत आहे. लहान् वस्तू महान आहे, महान लहान आहे. प्रत्येक वस्तूला वैशिष्ट्य आहे. ती बदलत आहे. जवळ आणि दूर, दूर आणि जवळ बनत आहे. उत्क्रांत होत आहे. या सर्व विराट उत्क्रांतीकडे मी गंभीर, पूज्य भावाने बघत आहे." सृष्टीतील भव्यता पाहून आपण मूक होतो. हिमालय, सागर, घनदाट वने, इरावतीसारखा धबधबा, अनंत तारे, हे सारे पाहून आपण अवाक होतो. हृदयात पूज्यभाव वाढतो. गटे म्हणायचा, "सृष्टीतील, जीवनातील उदात्त दर्शनाने जर तुमचे हृदय भक्तिभावाने विनम्र झाले तर तुम्हाला सारे काही मिळाले !"

सदसतापलीकडे

कधी कधी सत्‌-असत्‌ या कल्पना त्याला अपुऱ्या वाटत. एकदा कोणी त्याला विचारले, "सद्सद्विवेकबुद्धीचे काय?" तेव्हा तो म्हणाला. "ती का महत्त्वाची वस्तू आहे? कोण तिची मागणी करतो आहे तुमच्याजवळ? निसर्गात चांगले आहे, वाईट आहे; परंतु निवडानिवड न करता निसर्ग आपण सामग्र्याने घेतो." सत्‌-असताच्या पलीकडे जायला हवे असे का गटेचे म्हणणे? 'भद्रं तद् विश्व यद्वदन्ति देवाः' – चांगले आहे जग, उगीच सारखी कुरबूर नको. हे वाईट, ते वाईट. जगात भरपूर चांगले आहे, अपार आनंदही आहे. जे समजून घेऊन निकोप वृत्तीचे बनणे हे का ध्येय गटे शिकवू बघतो?

अमरतेवर विश्वास

अमरतेवर त्याची श्रद्धा होती. म्हणून मृत्यूचे त्याला भय नसे. मृत्यू त्याला मित्र वाटे. तो म्हणतो, "मरण येणे किती सुंदर गोष्ट ! मर्त्यपणाचा शिक्का पुसून टाकण्यासाठी, न्हाऊन- माखून पुन्हा परत येणे किती छान !"

नियतीवादी

गटे काहीसा नियतीवादी होता. आपण कितीही धडपडलो तरी काही गोष्टी जणू अपरिहार्यच होतात. तेथे आपला विवेक, आपले सद्गुण, आपली कर्तव्यबुद्धी यांचा टिकाव लागत नाही. नियतीला जे योग्य वाटते ते ती करायला लावते. आपल्याला तो मार्ग चूक वाटतो; परंतु नियती तिच्या मार्गाने खेचून नेते. तिची इच्छाच बलवान ठरते! याचा अर्थ प्रयत्नच करू नये असा नाही; परंतु जेथे चालणारच नाही तेथे आदळआपट करून काय होणार ! या दृष्टीने गटेच्या जीवनात अखेर शांती आली. त्याचे सारे जीवन म्हणजे दैवी आणि असुरी वृत्तींचा लढा आहे. गटे म्हणजेच फौस्ट. फौस्टला सैतान खेचू पाहतो; परंतु शेवटी तो सुटतो. गटेच्या हृदयात वासना, विकार, विचार, ध्येये सर्वांचे द्वंद्व ! तो लिहितो : "लोकांना वाटते, मी सुखात आहे; परंतु गेल्या ७५ वर्षांत २४ तासही खरी मानसिक शांती मला मिळाली नाही !"

तुकारामाप्रमाणे तोही म्हणाला असेल, "याचसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस गोड व्हावा !"

फौस्ट शेवटच्या क्षणी मुक्त होतो. दैवी वृत्तीचा विजय होतो. गटेही मनात झुंजत शेवटच्या क्षणी 'प्रकाश, अधिक प्रकाश' करीत त्या तेजोमय अनंतात विलीन होतो.

जर्मनीच्या, नव्हे मानवजातीच्या महान कवींद्रा, तुला नवभारताचा प्रणाम ! जे जे क्षुद्र आहे त्याला दूर सारून पुढे जाण्याची तुझी दिव्य वृत्ती, ती तुझी मानवता, रोज नवीन नवीन मिळविण्यासाठी धडपडणारी तुझी जिज्ञासा, साऱ्या विश्वालाच महाकाव्य मानणारी तुझी प्रतिभाशाली प्रज्ञा, त्या सर्वांची आज आम्हाला अत्यंत आवश्यकता आहे. साऱ्या विरोधांतून आम्हाला सुसंवाद निर्मायचा आहे. अंधारातून प्रकाशाकडे जायचे आहे. तुझे महान जीवन ती प्रेरणा देवो.

+++

चीनचे जनक सन्यत्सेन

"आई, नको तिला रडवू. तिचे पाय मोकळे कर. पाय वाढू न देणारे ते लोखंडी जोडे काढ तिच्या पायांतून." लहान सन्यत्सेन बहिणीचे दुःख बघवेना, म्हणून आईची मनधरणी करीत होता. पाय वाढू न देणे हे चिनी स्त्रियांच्या सौंदर्याचे लक्षण मानीत ! लहान मुलींचे वाढते पाय अशा घट्ट लोखंडी बंधनात घालून ठेवीत. ती अपार वेदना असे. चीनमध्ये सर्वांगीण क्रांती करणारा सन्यत्सेन आधी घरी क्रांती करायला उभा राहिला. १८६६ मध्ये तो जन्मला. कन्तान शहराजवळ त्याचे गाव. बालपणापासून तो स्वतंत्र वृत्तीचा. मंदिरातील मूर्तींची लोक पूजा करीत. तो म्हणे, "ही मूर्ती स्वतःचेही रक्षण करू शकत नाही !" एके दिवशी मूर्तीच्या पायाचे एक बोट त्याने तोडले. गावात प्रक्षोभ पेटला. आईबाप मुलाला म्हणाले, "गाव सोडून जा. त्यात सर्वांचे भले !" सन्यत्सेन कन्तानला आला व तेथून एका ब्रिटिश आगबोटीतून मकाव येथे गेला. "केवढाल्या आगबोटी हे लोक बांधतात ! चीन नाही का बांधू शकणार ? पाश्चात्यांहून का आम्ही कमी आहोत?" असा विचार त्याच्या मनात आला. तेथील ब्रिटिश मेडिकल कॉलेजात तो विद्यार्थी झाला. त्या कॉलेजातील तो पहिला चिनी पदवीधर !

देशाची चिंता

सन्यत्सेनने दवाखाना घातला; परंतु रोग्यांना औषधे देत असताना चीनचा रोग कसा बरा होईल याचा विचार सारखा त्याच्या डोक्यात चाले. १८९४ मध्ये चीन – जपानचे युद्ध होऊन चीनचा पराजय झाला. चीनभर असंतोष पेटला. सन्यत्सेनने चीन पुनरुद्धार मंडळ स्थापिले व चीनभर त्याच्या शाखा पसरविल्या. कन्तान शहरात लष्करातील सैनिकांनी लुटालूट सुरू केली. तीनशे लोकांचे शिष्टमंडळ कन्तानच्या

मुख्य अधिकाऱ्यास भेटायला निघाले; परंतु त्या लोकांना पकडण्याचा हुकूम सुटला. त्या तीनशे लोकांत सन्यत्सेनही होता. तोही पकडला जायचा; परंतु निसटला.

फाशीच जायचा

सन्यत्सेन आता मोठा कट रचू लागला. कन्तान शहर ताब्यात घेऊन तेथे स्वतंत्र सरकार स्थापावे असे त्याने मनात आणले. शस्त्रे जमू लागली. सन्यत्सेन व त्याचे सहकारी गुप्तपणे कन्तान शहरात शिरले; परंतु कटाचा सुगावा लागला. सन्यत्सेनचे सहकारी पकडले गेले. तोही पकडला जायचा; परंतु भिंतीवरून उडी मारून निसटला. त्याच्या १९ सहकाऱ्यांना फाशी देण्यात आले.

जगभर १५ वर्षे वणवण

या वेळेपासून जवळजवळ १५ वर्षे तो जगभर भटकत होता. जेथे जेथे म्हणून चिनी लोक होते तेथे जो जाई, क्रांतीचा संदेश देई, मदत गोळा करी. चिनी सरकारचे हेर व मारेकरी जगभर त्याच्या पाठोपाठ होते. त्याला पकडून देणाऱ्यास मोठे बक्षीस जाहीर झाले. एकदा लंडनमध्ये अचानक तो पकडला गेला. तेथील चिनी वकिलातीत त्याला ठेवण्यात आले. लंडनच्या गोदीत त्याला चीनमध्ये नेण्यासाठी एक बोट उभी होती; परंतु एका नोकराकरवी आपले पूर्वीचे शिक्षक डॉ. कान्ट ली यांच्याकडे त्याने चिठ्ठी पाठवली. डॉ. कान्ट ली यांनी शिष्याच्या सुटकेसाठी जाहीर चळवळ केली. अखेर ब्रिटिशांच्या दडपणामुळे चिनी वकिलातीतून सन्यत्सेन मुक्त झाला.

परदेशात राहून सन्यत्सेन सर्व प्रकारच्या जागृतीस चालना देत होता. चिनी लांब शेंड्या दिसेनाशा झाल्या. स्त्रियांचे पाय मोकळे झाले. अफूविरोधी प्रचंड चळवळ सुरू झाली. परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार होऊ लागला. सन्यत्सेनच्या 'तुंग मेंग हुई' संस्थेचे जाळे चीनभर होते. तालुक्या-तालुक्याला शाखा होत्या. वेळ येताच ठायी ठायी हजार-पाचशे तरुण सत्ता हाती घ्यायला उभे राहतील अशी तयारी होती.

बंड पेटले

चिनी सम्राट सुधारणांना अनुकूल होता; परंतु राजमाता व दरबारी विरुद्ध होते. सुधारणेच्या फुसक्या घोषणा होत; परंतु प्रत्यक्षात शून्य. हा दुर्दैवी सम्राट मरण पावला. त्याची आईही मेली. नवीन राजकुमार गादीवर आला. १४ ऑक्टोबर १९०९ रोजी प्रांताप्रांतांनी सुधारणांची मागणी केली. पुढे नॅशनल काँग्रेस भरून, तिनेही सुधारणांचा

मसुदा पाठवला. परंतु सरकार काही करेना. अखेर चेंगटू भागात बंड सुरू झाले व त्याचा वणवा भडकला. विद्यार्थी खेड्यांतून जाऊन शेतकऱ्यांना उठवते झाले. जवळ शस्त्रे नव्हती; परंतु अपार उत्साह होता. नवीन स्वातंत्र्यगीत जन्माला आले व ते चीनभर गेले : ''ये, स्वातंत्र्यदेवते, ये. स्वर्गातील तू परमश्रेष्ठ वस्तू. तू पृथ्वीवर ये. स्वर्गातून पृथ्वीवर येशील तर चमत्कार करशील, अपार कार्य करशील. मेघांच्या रथाला वाऱ्यांचे घोडे जुंपून ये. आम्ही अंधारात आहोत, तू प्रकाश आण. अहोरात्र आमच्या मनात मातृभूमीची दुःखे आहेत; तिच्या मुक्तीची स्वप्ने आहेत. स्वतंत्रते, तू का येत नाहीस? तू का मेलीस? सारा आशिया उद्‌ध्वस्त व उजाड झाला आहे, अरेरे!!''

नवसम्राटाचा युआन शिकाई सल्लागार होता. ४ नोव्हेंबर १९१० रोजी त्याने सम्राटाकडून घोषणा करविली की, तीन वर्षांच्या आत तुमच्या मागणीप्रमाणे पार्लमेंट बोलावू; परंतु सरकारी शब्दांवर कोणाचा विश्वास नव्हता. प्रांत स्वतंत्र होऊ लागले. सरकारी सेनापतीही क्रांतिकारकांना मिळू लागले. सन्यत्सेनचा कर्मवीर मित्र हुआंग सिंग विजयामागून विजय मिळवीत होता. चँग कै शेकही सहकारी सेनापती होता. जपानमध्ये तो विद्यार्थी होता. सन्यत्सेनने त्याला चळवळीत ओढले. १९११ च्या २१ डिसेंबरला १९ प्रांतांचे ३० प्रतिनिधी नानकिंग येथे जमले व अमेरिकन पद्धतीचे रिपब्लिक स्थापण्याची त्यांनी घोषणा केली. पहिला अध्यक्ष कोण होणार? सन्यत्सेनना तार करण्यात आली. ते निघाले. वाटेत जागोजाग त्यांचा सत्कार करण्यात आला. सिंगापूर, हाँगकाँग, शांघाय सर्वत्र प्रेमाचे स्वागत. नानकिंग येथे येताच तोफांची सलामी देण्यात आली. त्यांनी राष्ट्रपतीचे स्थान घेतले व ''मी जुनी राजवट नष्ट करून प्रजातंत्र दृढ करण्यासाठी झटेन'', अशी शपथ घेतली. त्यांनी सम्राटाला तार केली, ''गादी सोडा. तुम्ही राजीनामा द्या. सर्व कुटुंबियांची काळजी घेतली जाईल.'' ''चिनी लोकसत्ताकाला मान्यता द्या.'' अशा तारा जगातील राष्ट्रांनाही त्यांनी केल्या. युआन शिकाईने राज्याचा त्याग केला व लोकसत्तेचा प्रेमी बनला. राजाने १२ फेब्रुवारी १९१२ रोजी राज्यत्यागाची घोषणा केली. घोषणेत सम्राट म्हणतो, ''कोट्यवधी लोकांच्या इच्छेला मी विरोध कसा करू? युआन शिकाईने लोकसत्ताक नेत्यांच्या सहकाराने नवीन शासनपद्धती निर्मावी. मांचू, चिनी, मोगल, मुसलमान व तिब्ती सारे नवीन प्रजासत्ताकात गुण्यागोविंदाने नांदोत.'' नानकिंग येथे प्राचीन मिंग राजाची समाधी आहे. सन्यत्सेन तेथे गेले. त्यांनी प्रार्थना

केली व हृदयस्पर्शी भाषण केले. चिनी स्वातंत्र्याचा इतिहास सांगून म्हणाले, ''पूर्व आशियातील रिपब्लिकच्या अध्यक्षपदाची मी दीक्षा घेत आहे.'' सर्व चीनभर हा दिवस पाळला गेला. आशियातील हे पहिले रिपब्लिक !

सन्यत्सेनचा महान त्याग

युआन शिकाई महत्त्वाकांक्षी होता. काही सरदार म्हणू लागले, ''युआन शिकाईस राष्ट्राध्यक्ष करा.'' सन्यत्सेन मानाचे भुकेले नव्हते. ते म्हणाले, ''युआन शिकाई प्रजासत्ताकाचे पालन करण्याचे वचन देईल तर मी राजीनामा देतो''. १४ जानेवारी १९१३ रोजी त्यांनी राजीनामा दिला. राष्ट्रपुरुषाने संताची वृत्ती दाखवली.

युआन शिकाई सम्राट बनतो

परंतु युआन शिकाईचे निराळे हेतू. त्याने पार्लमेंट बरखास्त केले व शेवटी स्वतःला सम्राट म्हणून त्याने घोषविले. सन्यत्सेनला त्याने हाकलले. सन्यत्सेन जपानमध्ये गेले. या सुमारास पहिले महायुद्ध सुरू झाले. युआन शिकाई मेला. सन्यत्सेनने परत येऊन त्यांनी पुन्हा दक्षिणेकडे लोकसत्ताक सरकार स्थापिले. उत्तरेकडचे सरदार व हे दक्षिणेकडचे लोकसत्ताक सरकार यांचे पटेना. जपानने चीनजवळ २१ मागण्या मागितल्या. इंग्लंडने जपानबरोबर गुप्त तह केला व चीनचा प्रदेश पुढे तहाच्या वेळेस द्यायचे कबूल केले. चीननेही दोस्तांच्या बाजूने युद्धात पडल्याचे घोषित केले. पुढे युद्ध संपले, तेव्हा इंग्लंड व जपान यांचा गुप्त करार प्रकट झाला. चीनमध्ये असंतोष भडकला. चिनी शिष्टमंडळ व्हर्सायच्या तहाच्या वेळेस चीनची बाजू मांडायला गेले; परंतु अपमानित होऊन ते परतले. सन्यत्सेन रशियाकडे वळले. रशियन क्रांती झाली होती. रशियाच्यावतीने जाफे बोलणी करत होते. रशियाने चीनपासून घेतलेल्या सवलतींचा त्याग केला. सन्यत्सेन व जाफे दोघांच्या सह्यांचे पत्रक निघाले. सन्यत्सेनने चँग-शेकला रशियात लष्करी शिक्षणासाठी पाठविले आणि मॉस्कोहून बोरोडिन हा रशियन सल्लागार आला.

कोमिंटांगमध्ये नवीन प्राण

सर्व पक्षांचा समन्वय करून सन्यत्सेनने कोमिंटांग पक्ष स्थापला होता. त्यात आता कम्युनिस्टही सभासद म्हणून गेले. सन्यत्सेनच्या पत्नीने विचारले, ''त्यांना का घेता?'' तो म्हणाला, ''संस्थेत नवीन तेज यावे म्हणून!''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

पेकिंगशी बोलणी

सन्यत्सेन १९२४ मध्ये पेकिंगच्या उत्तर सरकारशी बोलणी करायला गेले; परंतु ते आजारी पडले. ते बरे झाले नाहीत. १९२५ च्या १३ मार्चला हा चीनचा राष्ट्रपिता पेकिंग येथे मरण पावला. तेथील मंदिरात त्यांचे अवशेष ठेवण्यात आले होते. १९२८ मध्ये ते नानकिंग येथे आणण्यात आले व भव्य समाधी बांधण्यात आली.

एक थोर विभूती

सन्यत्सेन एक महनीय विभूती होते. त्यांच्या त्यागाला सीमा नव्हती. त्यांच्या मुखावर असे काही तेज होते की, सारे ओढले जात. जगभर त्यांच्यामागे मारेकरी होते, परंतु चिनी जनतेने त्यांना सांभाळले. साऱ्या जगातून लोक मदत पाठवीत. चीनमध्ये राष्ट्रीयतेची ज्वाला त्यांनी पेटविली. पुष्कळ वेळा ते निराश होत. काय करावे ते त्यांना सुचत नसे. तरीपण एक व्यापक राष्ट्रीय जागृती त्यांनी या विशाल देशात केली. ते असतानाच कोमिंटांगमध्ये मतभेद होऊ लागले. त्यांच्या मरणानंतर ते विकोपास गेले व त्यातून चाललेली यादवी अजूनही चीनला रडवीत आहे. सन्यत्सेन यांची पत्नी कम्युनिस्टांच्याच बाजूची राहिली. ती एक जणू पवित्र ज्वाला होती.

'सॅन मिन् चुई- जनतेची तीन तत्त्वे' या नावाचा सन्यत्सेनने एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांचे विचार आहेत. मरणाआधी त्यांनी देशासाठी जे मृत्यूपत्र लिहिले, त्यात ते लिहितात, ''गेली चाळीस वर्षे मी क्रांतीचा उद्योग केला. आपला देश इतर राष्ट्रांप्रमाणे स्वतंत्र व समृद्ध व्हावा याच एका इच्छेने मी धडपडलो. चाळीस वर्षांच्या धडपडीचे सार म्हणून मी सांगतो की, माझी इच्छा तेव्हाच पूर्ण होईल की, जेव्हा सारे राष्ट्र जागे होईल. जेव्हा शोषितांच्या बाजूने तुम्ही सारे उभे राहाल. परदेशी राष्ट्रांनी चीनची वंचना करणारे तह केले आहेत. ते नष्ट करा. पूर्वीच्या सरकारने केलेले करार बंधनकारक मानू नका. परकीय राष्ट्रांनी जबरदस्तीने आमचे रक्तशोषण करावे, हे आम्ही सहन करता कामा नये. माझी ही हार्दिक प्रेरणा आहे !''

+++

इतिहासाचार्य राजवाडे

प्रस्तावना

माझे प्रिय शिष्य रा. साने यांनी थोर पुरुषांची चरित्रे लिहून प्रसिद्ध करण्याचे मोठे स्तुत्य कार्य चालविले आहे. त्यांच्या गोखले चरित्राचा पुरस्कार करण्याचा मान त्यांनी मला दिला. त्यानंतर ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे चरित्र त्यांनी प्रसिद्ध केले आणि आज राजवाडे यांचे चरित्र ते प्रसिद्ध करीत आहेत. चरित्रलेखनाचे कार्य राष्ट्रशिक्षणास अत्यंत उपयुक्त आहे आणि रा. साने यांनी या शाखेत सालोसाल भर टाकण्याचे ठरविले आहे. याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडे होईल !

रानडे, लोकहितवादी अशांसारख्या थोर महाराष्ट्रीयांची जरा विस्तृत चरित्रे त्यांच्या मृत्यूनंतर कैक वर्षांनी प्रसिद्ध झाली. गोखले यांचे साने यांनी लिहिलेलेच चरित्र सर्वांत मोठे आहे. टिळकांचे चरित्र त्यांच्या मृत्यूनंतर काळ न दवडता ताबडतोब लिहिण्याचे हाती घेऊन रा. केळकर यांनी उत्तर भाग ओढून काढून का होईना, पुरे करून टाकले आहे. याचा अर्थ स्पष्ट असा होतो की राष्ट्र जागे झाले आहे, थोर पुरुषांची योग्यता त्यास समजू लागली आहे, त्यांची आठवण बुजू नये आणि पुढील पिढीस त्यांची कामगिरी सविस्तर समजावी म्हणून त्यांची चरित्रे प्रसिद्ध होऊ लागली आहेत. खुद्द थोर पुरुषांचे शिष्य वा सांप्रदायिक यांनी वास्तविक हे चरित्रलेखनाचे कार्य करायला हवे; परंतु त्यांनी ते वेळेवर केले नाही, तरी रा. साने यांचेसारखे उत्साही तरुण ती उणीव भरून काढण्यास पुढे येत आहेत, ही फार समाधानाची गोष्ट आहे.

राजवाडे यांना मी प्रथम शके १८१७-१८१८ (इ.स. १८९५-९६) मध्ये पाहिले. त्यावेळी मी लहान होतो आणि राजवाडे यांचे पहिल्या खंडाचे काम चालू होते. त्यांचा पहिला खंड हा मी वाचलेला पहिला मराठी ग्रंथ होय. यातील विषय कळण्याजोगे माझे वय नव्हते; तथापि त्यांनी आमच्या इतिहासाची माहिती कोठे-कोठे मिळेल त्या स्थळांची जी यादी (पहिला खंड, प्रस्तावना) दिली आहे, ती पाहून माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला आणि त्या वेळेपासून या कामाची गोडी मला लागली. हा अंकुर वाढीस लागून इ. स. १९०८ साली विजयानंद नाटकगृहात जे ग्रंथकारांचे संमेलन भरले होते, त्यावेळी मी राजवाडे यांस घरी आमचे वडील राजवाडे यांचे सहाध्यायी होते - आग्रहाने बोलावून नेले. त्यानंतर १९१० त भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना राजवाडे यांनी मेहेंदळे यांच्या साह्याने केली; किंबहुना त्या स्थापनेच्या दिवशी - आषाढ शुद्ध १, शके १८३२ रोजी राजवाडे आमच्या घरूनच सभेस गेले ! असो.

अशा या गोष्टी आता आठवणी झाल्या. त्याप्रमाणेच त्यांचे सहाध्यायी, सहकारी, विरोधक, शिष्य, मित्र, ग्रंथाभ्यासिका या सर्वांच्या आठवणीही पुष्कळ अजून प्रसिद्ध

व्हायला पाहिजेत. तसेच त्यांचा इतरांशी व इतरांचा त्यांच्याशी झालेला पत्रव्यवहार, त्यांचे अप्रसिद्ध लेख व संग्रह या सर्वांचे अवलोकन त्यांच्या चरित्र-लेखकास अवश्य आहे. असा योग येईल, तेव्हा राजवाडे यांचे सांगोपांग चरित्र हाती घेता येईल.

रा. साने यांचा प्रयत्न त्या दृष्टीचा नाही. साधारण बहुश्रुत वाचकांस राजवाडे यांच्या योग्यतेची ओळख व्हावी म्हणून हा प्रयत्न त्यांनी केला आहे. अशी या सानेकृत चरित्रसिद्धीची मर्यादा आहे. हे लक्षात ठेवूनच त्यांच्या ग्रंथाकडे पाहिले पाहिजे.

या ग्रंथावरून राजवाडे यांची काहीशी ओळख जरी वाचकांना होईल, तरी त्यांची खरी आणि पक्की ओळख त्यांच्या लेखांच्या व कार्याच्या परिशीलनानेच होणार आहे. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याविषयी ज्या आख्यायिका व आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यातही चुकीची माहिती व भ्रामक अनुमाने आलेली आहेत. उदाहरणार्थ, राजवाडे यांच्या बंधूंकडून राजवाडे यांस चुलतीकडून आलेली किंवा अन्य मदत मिळत असे त्यामुळे त्यांनी उपासतापास काढून मोठा स्वार्थत्याग केला व हाल काढले हा प्रवाद खोटा दिसतो असा एक निष्कर्ष राजवाडे यांस न पाहिलेल्या एका गृहस्थाने कोणाकडून आलेल्या ऐकीव माहितीच्या आधारे एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्याचे मी वाचले ! चुलतीच्या मालमत्तेचा वाटा चुलती मेल्यावर राजवाडे यांच्याकडे यायचा होता व तो त्यांचे सुशील व प्रेमळ बंधू यांनी त्यांना मिळाला तसा त्यांच्या इच्छेप्रमाणे पोचता केला; परंतु ही मदत फार थोडे दिवसच मिळाली. राजवाडे यांनी विशेष हाल काढले ते विठ्ठल छापखाना जळून भाषांतर मासिकाचे वाटोळे झाल्यावर आणि पहिला खंड प्रसिद्ध केल्यावरच सुमारे १२ वर्षे काढले. पुढे पुढे हे हाल बंद झाले नाहीत तरी कमी झाले. असो. त्यांच्या जीवनाविषयी असे पुष्कळ लिहिता येईल आणि लिहायलाही पाहिजे. त्यांची खरी योग्यता कशात होती त्याचीही चर्चा व्हायला पाहिजे. नुसते इतिहास संशोधक नव्हते तर ते इतिहास तत्त्वविवेचकही जबरे असून दिव्यदृष्टी आणि प्रज्ञावंत असे विचारस्रष्टेही होते. ही त्यांची उच्च कोटी पटण्यासाठी त्यांच्या चरित्राचे व लिखाणाचे सप्रमाण, सांगोपांग असे पुष्कळ विवेचन व्हायला पाहिजे; पण तो प्रसंग अर्थातच हा प्रस्तावनेचा नव्हे. राजवाडे इतिहासक संशोधन मंडळाने हे कार्य हाती घेण्यास हवे आहे. असो. एवढे सांगून जो स्वराष्ट्राची भव्य स्मृती उजळण्यासाठी स्वतः सर्वस्वे झिजला त्या महापुरुषाचा एक नम्र पाईक म्हणून कर्तव्यबुद्धीने लिहिलेले हे चार शब्द त्यांच्या चरित्राचे व कार्याचे सखोल बुद्धीने मनन करण्याची प्रेरणा उत्पन्न करोत, अशी प्रभूस प्रार्थना आहे.

दत्तो वामन पोतदार

पुणे, ज्येष्ठ व ३ शके १८५०, सन १९२८

चरित्र लेखकाचे दोन शब्द

हे चरित्र अत्यंत त्रोटक आहे व त्याचेही श्रेय खरोखर मला नाही. राजवाडे यांच्या मृत्युप्रसंगानंतर केसरीत आलेले लेख, मृत्यूनंतर झालेली भाषणे, विद्यासेवकातील लेख व मुख्य म्हणजे राजवाडे तिलांजली अंक यातील माहितीचा मी उपयोग करून हे अल्प चरित्र लिहिले आहे. तिलांजली अंकांतील कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी एम. ए. सातारा, यांच्या लेखातील मी अवतरणे दिली आहेत. राजवाडे यांच्या प्रस्तावना व लेख बरेचसे स्वतः वाचून त्यातील माहितीचा मी उपयोग केलेला आहे. चरित्रातील बराचसा भाग राजवाडे यांच्या शब्दांतच मी दिला आहे. या अति संक्षिप्त चरित्रात गुणलवबिंदू असलाच तर तोही माझा नसून ज्यांची माहिती मी उपयोगिली त्यांचा आहे. हा चरित्रात्मक निबंध माझ्यासारख्या मतिमंदाचा असूनही तो प्रकाशित करण्याचे काम अभिनव ग्रंथमालेचे उत्साही व ध्येयप्रवण संपादक हुद्दार यांनी स्वीकारले व माझ्याकडे निरंतर कृपादृष्टीने पाहणारे गुरुवर्य पोतदार यांनी मी प्रार्थिताच हजार कामे असतानाही, या पुस्तकास प्रस्तावना लिहून गौरविले, याबद्दल उभयतांचा मी ऋणी आहे.

राजवाडे यांच्या छायाचित्रावर जन्म शक १७८६ घातला गेला, तो केसरीत पाहून घातला गेला; परंतु राजवाडे तिलांजली अंकात १७८५ हा शक त्यांच्या कुंडलीत आहे – तोच खरा समजला पाहिजे.

पांडुरंग सदाशिव साने

संपादकीय

मालेचे सहावे पुष्प 'आदर्श शिक्षण' या पुस्तकातील निवेदनात प्रारंभिक निधी ५००० रु. मिळाल्यास स्वतंत्र पुस्तके प्रसिद्ध करण्याचेही कार्य माला अंगिकारेल असा उल्लेख मी केला होता; पण प्रारंभिक निधी जरी मिळाला नसला तरी माला आज सर्वस्वी स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करण्याचे धाडस करीत आहे. प्रस्तुतचे पुष्प अमळनेरच्या खानदेश शिक्षण मंडळाच्या हायस्कुलातील विद्वान शिक्षक व गोखले चरित्र व ईश्वरचंद्र विद्यासागर या पुस्तकांचे कर्ते श्री. पांडुरंग सदाशिव साने यांनी लिहिले आहे. गेल्या जानेवारी महिन्यात अमळनेरला गेल्यावेळी श्री. साने यांच्याशी प्रथमच परिचय झाला व पहिल्या भेटीतच केलेल्या विनंतीचा स्वीकार करून त्यांनी मालेसाठी राजवाडे चरित्राचे लिखाण पूर्ण केले याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी आहे. पुण्याचे इतिहास संशोधन मंडळ हे कै. राजवाड्यांचे एक जिवंत स्मारकच आहे, असे म्हणायला हरकत नाही. या मंडळाचे काम सुरुवातीपासूनच गुरुवर्य दत्तोपंत पोतदार हे एकनिष्ठपणे व निरलसपणे करीत आले आहेत. अर्थातच गुरुवर्य पोतदार यांना कित्येक वर्षे कै. राजवाड्यांच्या सहवासात राहण्याचे भाग्य मिळाले आहे. अशा अधिकारी व्यक्तीची या पुस्तकास प्रस्तावना मिळाल्यास विशेष उचित होईल असे वाटल्यावरून मी व श्री. साने यांनी त्यांना प्रस्तावना लिहिण्याबद्दल विनंती केली. विनंतीप्रमाणे आपला अमूल्य वेळ खर्च करून त्यांनी सुंदर प्रस्तावना लिहून दिली, यात त्यांची राजवाडे-भक्तीच विशेषत्वाने प्रकट होते. आमची विनंती स्वीकारून त्यांनी मालेवरही जो अनुग्रह केला, त्याबद्दल माला त्यांची सदैव ऋणी आहे. या पुस्तकाचे मुद्रणाचे काम माझे मित्र श्री. न. ह. देशपांडे संपादक 'बालवसंत' यांनी आपल्या बालवसंत छापखान्यात केले असून मुद्रिते तपासण्याचे काम श्री. पुराणिक व श्री. मोहरीर शिक्षक, खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर यांनी अत्यंत काळजीपूर्वक केले आहे. याबद्दल या तिघांचाही मी फार आभारी आहे.

माझे निवेदन संपविण्यापूर्वी मालेसंबंधी दोन शब्द लिहिण्याची वाचकांची परवानगी घेतो. येत्या जूनमध्ये मालेस सुरुवात होऊन अडीच वर्षे होतील. संकल्पनेप्रमाणे तोवर १० पुष्पे प्रसिद्ध व्हायला पाहिजेत व तसा प्रयत्न मालेकडून

कसोशीने करण्यात येईलही; पण या बाबतीत पुढील अडचण आर्थिक आहे. अमेरिका पथदर्शक व राजर्षी भीष्म या पुस्तकांचे पुनर्मुद्रणाचें काम याच वर्षात करावे लागल्यानेही नवीन पुष्पाच्या मुद्रणाचे काम थोडे मागे पडले. मालेजवळ थोडाफार निधी असल्यास मालेची कामे वक्तशीरपणे होऊ शकतील. यासाठी ५० रु.चा एक असे ५००० रु.चे १०० डिबेंचर्स (कर्जरोखे) पाच वर्षे मुदतीचे विक्रीस काढण्याचे मालेने ठरवले. मालेच्या सधन ग्राहकांनी मालेचे डिबेंचर्स घेऊन मालेच्या साहित्य प्रकाशनाच्या कार्यास आपलेपणाने मदत करावी अशी त्यांना नम्र विनंती आहे. डिबेंचर घेऊ इच्छिणाऱ्यांनी आपला मनोदय कळविल्यास त्यांच्याकडे यासंबंधीची 'सविस्तर योजना' पाठविण्यात येईल.

आणखी एका नवीन बाबीसंबंधी येथे खुलासा करणे प्राप्त आहे. वर्गणीदारांची अडचण दूर करणे हीच ती बाब होय. ६ व्या पुष्पातील निवेदनात वार्षिक वर्गणीसंबंधी उल्लेख केला होता. वार्षिक वर्गणी ठरवणे हे मालेच्या व ग्राहकांच्या दृष्टीने सोईचे व हिताचे आहे असे दिसून आल्यावरून येत्या जूनपासून वार्षिक वर्गणी दोन रुपये निश्चित केली आहे. ज्या वर्गणीदारास वार्षिक वर्गणीची योजना पसंत नसेल त्यांना पूर्ववतच पुस्तके मिळू शकतील. वार्षिक वर्गणी ठरविण्यात आल्यामुळे आता ५ रु.च्या साहाय्यकांचा वर्ग ठेवण्याची आवश्यकता नाही. वार्षिक वर्गणीत ५०० पृष्ठांचे वाङ्मय ग्राहकांस देण्याचे योजिले आहे. वर्गणी मनीऑर्डरने पाठविणाऱ्यांनी सव्वा दोन रुपये पाठवावी. व्ही. पी. २ रु. ६ आ.ची जूनमध्ये करण्यात येईल. एजन्सीच्या ठिकाणी वर्गणी दोन रुपयेच फक्त पडेल.

ग्रंथमालेस उत्तरोत्तर वाढती साहित्यसेवा करण्याचे सामर्थ्य प्राप्त होवो, अशी इच्छा व्यक्त करून हे निवेदन संपवितो.

नागपूर शहर
७-६-१९२८
श्रीधर नारायण हुद्दार

कै. राजवाडे यांच्या चरणी प्रणति

वृत्त–भुजंगप्रयात

नमो विश्वनाथा नमो बुद्धिमंता । नमो तेजवंता नमो मानवंता ।
स्वभू तोषविली, स्वभू भूषविली । तिची कीर्ती, धीरा, दिगंतात नेली ।।
धनाला, सुखाला विलासादिकाला । स्तुतीला जनांच्या, नृपांच्या कृपेला ।
तृवां हाणिली लाथ निःस्वार्थ होसी । परी कार्य केले प्रचंड प्रकाशी ।।
स्मृती पूर्वजांची किती स्तव्य दिव्या । किती शौर्य धैर्य प्रभा बुद्धि भव्या ।
परी तत्स्मृती टाकिली मालवोनी । जनांनी जितात्मे गतश्री बनोनी ।।
स्मृती जागविली, तुवा कष्ट केले । निराशादिकांते लयालागि नेले ।
तुवां ओतिलां दुर्बलांती हुरूप । असे कार्य केले, महंता, अमूप ।।
मलीना मनाला तुवा निर्मळोनी । मृतात्म्यांस तेजे तुवां चेतवोनी ।
वरी राख जी संचली, फुंकरोनी । तुवां प्रज्वळीला पुन्हा ज्ञान वन्ही ।।
तुझा धीर गाढा, निराशा शिवेना । तुझा निश्चयो थोर केव्हा ढळेना ।
अहो निःस्पृहा, निस्तुला, निष्प्रपंचा । किती साधिले कार्य नेसून पंचा ।।
तुझे तेज वैराग्य विज्ञान सिंधू । तयाच्या पुढे शोभती अन्य बिंदु ।
तुझा आयसी वज्रवत् दिव्य देह । प्रतापी सदा मूर्त उत्साह गेह ।।
तुझ्या बुद्धिला काही नाही अगम्य । सदा डुंबसी ज्ञानगंगेत रम्य ।
किती पंकजे आणिली त्वां खुडोनी । मती आमुची गुंग होते बघोनी ।।
कुणी पाणिनी मानिती मूर्तिमंत । गणावे गिबन् बोलती ज्ञानवंत ।
कळावी कशी योग्यता वास्तविक । अम्हां, जे सदा मागतो रोज भीक ।।
स्वतंत्रा, तुवां दाविला नीट पंथ । तुला पाहुनी होत संस्फूर्त संथ ।
जिथे जात भास्वान्, नुरे अंधकार । तुझ्या दर्शने भाषणे तो प्रकार ।।
पहाडापरी धीरधिंग प्रचंड । प्रतापप्रभा उज्ज्वलन्ती उदंड ।
हरावा रिपू थोर अज्ञान, बंड । पुकारोनिया, थोपटीले स्वदंड ।।
करोनी रिपू चीत, तो ज्ञान राजा । तुवां सद्भटे आणिला देशकाजा ।
किती मांडला उत्सवो त्या प्रभूचा । अहा वाढला थोर लौकिक भूचा ।।

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

अलंकार राष्ट्रास होसी अमोल । सुधेचा तुझा सिंधु होईल बोल ।
तुझे स्तव्य चारित्र्य आदर्श लोकां । जया पाहुनि संहरावे स्वशोका ।।
किती सद्गुणवृंद वर्णू वरेण्या । मला, बुद्धि राजा, न हे शक्य, धन्या ।
तुझ्या पूज्य संस्तव्य पादांबुजाला । करोनी नती नम्र हा पूत झाला ।।
तुझा देह तो पाच भौतिक गेला । त्वदात्मा महाराष्ट्र लोकांत ठेला ।
तुझी संस्मृती नित्य राही जिवंत । सदा राहसी अंतरी मूर्तिमंत ।।

पां. स. साने.

कै. इतिहासाचार्य राजवाडे

विषय प्रवेश

कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे नाव सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या निकट परिचयाचे आहे. राजवाड्यांसारख्या गाढ्या पंडित प्रवराचे चरित्र मी लिहिण्यास घेणे म्हणजे टिटवीने सागराचे गांभीर्य जणू पाहण्याप्रमाणे आहे. मी अप्रबुद्ध आहे; स्वतंत्र प्रज्ञेचा अल्पांशही माझ्यात नाही; ज्या अनेक शास्त्रांत या विराट पुरुषाची विशाल बुद्धी स्वैर संचारती झाली, त्या शास्त्रांची मला नावेसुद्धा ऐकूनच माहीत. माझी ही यथार्थ स्थिती आहे; यात फाजील विनय वगैरे काही नाही. माझे मन मला पुन्हा पुन्हा सांगे की, राजवाड्यांसंबंधी तू काय लिहिणार ? प्रश्न खरा; परंतु भक्तीला स्वस्थ बसवेना. राजवाड्यांच्याबद्दल माझ्या हृदयात जी असीम भक्ती वसत आहे, तिला हे वरील तर्कट समजेना. राजवाडे यांच्यासंबंधी जे जे उद्‌गार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वाचले वा ऐकले, त्या सर्वांचा उपयोग करून तू लहानसे चरित्र त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी प्रसिद्ध कर, असे माझी भक्ती बोलू लागली व म्हणून मी या कार्यास हात घातला. मला हे चरित्र त्या दिवशी प्रसिद्ध करता आले नाही; परंतु आज ते लोकांसमोर येत आहे. 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मती' असेच राजवाडे यांच्या बाबतीत मला म्हटले पाहिजे. त्यांच्या निकट सान्निध्यात ज्यांनी वर्षे घालविली असतील, त्यांच्या प्रतिभेची प्रभा ज्यांस सतत पाहायला मिळाली असेल व त्यामुळे ज्यांच्या हृदयातील भ्रांतितिमिराचा निरास झाला असेल, राजवाड्यांच्या सर्वगामी बुद्धीचे

वैभव ज्यांना आकलन करता येईल, त्यांचा गूढ स्वभाव ज्यांना उकलता आला असेल अशा पुरुषांनी त्यांची चरित्रे लिहिली तर ती पूज्य व आदरणीय होतील. ती अशी लिहिली जातीलही; परंतु भक्तीला कमी-जास्त समजत नसते. म्हणून माझी भक्ती मला सांगे, 'जा, तूही आपली वाक्सुमनांजली त्या थोर पुरुषाच्या पदारविंदी अर्पण कर.' भक्तीचा एकच घास विश्वमोलाचा असतो; तो परमेश्वरास प्रिय होतो; तद्वत् माझ्या या भक्तीने कै. राजवाडे यांना संतोष होवो; त्यांना संतोष होईल की नाही हे मला कळायला मार्ग नाही; परंतु आपले कर्तव्य केल्याने मला मात्र संतोष होत आहे खरा.

जन्म, बाळपण व शिक्षण

कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्म शके आषाढ शु।। अष्टमीस झाला. त्यांच्या आईचे नाव यमुना. बालपणी त्यांची वृत्ती कशी होती, ते काय खेळत, कसे वागत वगैरे माहिती आम्हास नाही. त्यांचे प्राथमिक शिक्षण वडगाव येथे झाले. राजवाडे यांच्या पितामहाने स्वराज्याच्या पडत्या काळात लोहगडची किल्लेदारी केली होती. तेव्हा याच बाजूस त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यांचे वडील बालपणीच निवर्तले. यामुळे त्यांचे लहानपणी संगोपन, शिक्षण वगैरे त्यांच्या चुलत्यांनी केले. राजवाडे यांनी स्वतः 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील अनुभव' म्हणून ग्रंथमालेमध्ये एक लेख पुष्कळ वर्षांपूर्वी लिहिला आहे. त्यावरून त्यांच्या सर्व शिक्षणाची माहिती मिळते. आठ वर्षे वयाचे असताना त्यांनी धुळाक्षरे शिकण्यास प्रारंभ केला. त्यांनी हे मराठी शिक्षण ३ वर्षे घेतले. एवढ्या काळात त्यांनी कधी शाळेत जाऊन तर कधी घरी राहून सामान्य मराठी पुस्तक वाचण्याइतके भाषाज्ञान व केरोपंती अंकगणितातील वाटेल तो प्रश्न सोडविण्याची तयारी हे संपादन केले. या तीन वर्षांत भूगोल, इतिहास, व्याकरण, व्युत्पत्ती, भूमिती, काव्य यांची बिलकुल कल्पना त्यांना नव्हती; या गोष्टींचा त्यांच्या बालमनावर ठसा काहीच उमटलेला नव्हता. या तीन वर्षांत ते शाळेत सरासरीने दीड वर्षे गेले असतील; बाकीचे सर्व दिवस धांगडधिंगा, मस्ती, कुस्ती करण्यात त्यांनी दवडले. मारामाऱ्या करण्यात त्यांचा पहिला नंबर असे; विटीदांडूचा खेळ खेळण्यात तर ते तरबेज. पोहण्यातही चांगलेच प्रवीण झाले. या बालवयात नीट शिक्षण देणारा एकही शिक्षक त्यांना मिळाला नाही.

ते या आत्मचरित्रात सांगतात, ''पंतोजी आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे नेऊन टाकणाऱ्यांपैकी होते.'' यामुळे आठवड्यात फक्त दोन-तीन दिवस घटका अर्धघटका अभ्यास करूनही पंतोजींची कृपा राजवाडे यांना संपादता येई. ते म्हणतात, ''जर चांगला शिक्षक मला मिळता तर तीन वर्षांत मी बी.ए. इतकी तयारी केली असती.'' या गोष्टीत कोणास अतिशयोक्ती वाटेल; परंतु मला तसे काही एक वाटत नाही. मिलसारखे पंडित किती बालवयात लॅटिन ग्रीक भाषांचे पंडित झाले, ज्ञानेश्वरांसारखे किती बालवयात भाष्यकारांस मागोवा पुसणारे झाले, ईश्वरचंद्र विद्यासागरांसारखे विशालधी १५/१६ वर्षे वयाचे असताना कसे सर्वशास्त्र पारंगत झाले, हे पाहिले म्हणजे राजवाडे यांच्या म्हणण्यात मला अत्युक्तीचा अंश दिसत नाहीसा होतो.

मराठी चौथी इयत्ता शिकल्यावर राजवाडे पुण्यास आले व इंग्रजी शिकू लागले. १८७६ मध्ये ते पुण्यास बाबा गोखले यांच्या इंग्रजी शाळेत दाखल झाले. या शाळेत तीन-चारशे मुले होती. शाळा सकाळी सहा वाजल्यापासून दुपारी १० वाजेपर्यंत असे. कारण शिक्षकांना दुपारी इतर व्यवसाय करण्यास मोकळीक असावी म्हणून ही योजना असे. शाळा अगदी गलिच्छ ठिकाणी असे. दमट व कोंडलेली अशी हवा असायची. मोकळी, खेळती हवा तेथे मिळायची नाही. पडक्या भिंती, गटारे, डास यांमुळे प्रसन्नता मुळीच नसे; पायखानेही तेथे लागूनच; यामुळे दुर्गंधीचे माहेरघरच तेथे होते. एकाच वर्गात अनेक मुले असत. त्या मुलांची तयारी सर्वांची सारखीच नसे. कोणी जास्त शिकलेला, कोणी कमी; कोणी हॉवर्डचे पहिले पुस्तक पढलेला, तर कोणी दुसरे वाचायला शिकलेला. तरी सर्व एकाच वर्गात. एकच मास्तर या निरनिराळ्या मुलांना नवीन धडे देई. राजवाडे म्हणतात, ''माझ्या बरोबरीच्या मुलांच्या तुकडीच्या वाट्यास तासातील ४-५ मिनिटे यायची व त्या ४-५ मिनिटांतील अर्धे मिनिट माझ्या वाट्यास यायचे!''

अशा प्रकारचे शिक्षण या शाळेत काही दिवस चालले. पुढे बाबा गोखले यांचे लक्ष वकिलीच्या धंद्याकडे गेले व ही शाळा संपली. राजवाडे मग सरकारी शाळा, मिशन स्कूल यामध्येही काही दिवस होते. प्रथम ते काशिनाथपंत नातू यांनी काढलेल्या शाळेत गेले. हे नातू मोठे विनोदी गृहस्थ होते; प्रसिद्ध वकिलांत त्यांचे नाव घेतले जाई. या शाळेत राजवाडे दुसऱ्या वर्गात बसले. यानंतर वासुदेव बळवंत मुडके (बंडवाले), वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर यांच्या शाळेत राजवाडे जाऊ लागले. येथे ते ३

च्या इयत्तेत शिकू लागले. १८७७ मध्ये ते चौथी इयत्ता शिकू लागले. या सुमारास १०००/१५०० शब्द, काहीसे व्याकरण अर्धेमुर्धे हे त्यांनी पैदा केले. १८७७, ७८, ७९ ही तीन वर्षे ते या भावे यांच्या शाळेत राहिले. या शाळेतील वामनराव भावे यांच्याबद्दल राजवाडे यांनी आदराने लिहिले आहे. पुढे ही शाळा पण त्यांनी सोडली व १८८० मध्ये बोमंट यांच्या मिशन शाळेमध्ये ते दाखल झाले. ती पण शाळा काही दिवसांनी त्यांनी वर्ज्य केली व घरीच बसले. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाल्यावर त्या शाळेत ते काही दिवस फक्त पंधरा दिवसच होते. शेवटी घरीच अभ्यास करून १८८२ च्या जानेवारी महिन्यात खाजगी रीतीने मॅट्रिकच्या परीक्षेस ते बसले व त्यात उत्तीर्ण झाले. पाच-सहा शाळा पाहिल्यामुळे त्या वेळच्या एकंदर शिक्षणप्रकाराचा, शिक्षकवर्गाचा त्यांना नीट अनुभव आला. अपेयपान, अभक्ष्यभक्षण, टारगटपणा, बाहेरख्यालीपणा वगैरे दुर्गुणांनी भरलेले शिक्षक या खासगी शाळांमध्ये असत.

अर्थात् व्यसनांचे बंदे गुलाम, सुरादेवीचे कट्टे उपासक असे शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनावर काय परिणाम करणार ? नीती ही उपदेशाने अंगी मुरत नसते तर उपदेशकर्त्याच्या कृतीने मनावर ठसते हा सिद्धांत आहे. विद्यार्थी उत्तम तयार होण्यास शिक्षकवर्ग स्वाभिमानी व देशप्रेमी, विद्वान व कार्यकर, विचारवंत आचारवंत, धर्मशील व उद्योगशील असे असले पाहिजेत; परंतु त्या वेळेस तसे शिक्षक कुठेच नव्हते. नाही म्हणायला नवीन चिपळूणकरी शाळेत हे थोडे-फार प्रथम दिसून येई. राजवाडे लिहितात, ''या सुमारास विद्वत्तेने व मनोरचनेने राष्ट्रहित साधण्यास बराच लायक असा एक पुरुष सरकारी नोकरीस लाथ मारून पुण्यास आला.'' हा थोर पुरुष म्हणजे विष्णुशास्त्री हा होय. विष्णुशास्त्रींबद्दल राजवाडे यांना फार आदर व पूज्यभाव वाटे. शास्त्रीबोवांची प्रौढ व भारदस्त मूर्ती पुण्यात त्यांनी अनेकदा पाहिली होती. शास्त्रीबोवा हे परम देशभक्त आहेत, असे अनेकांच्या तोंडून त्यांनी ऐकले होते. त्यांचे निबंधही त्यांनी अवलोकिले होते व वाचलेले त्यांच्या कानांवरून गेले होते.

मॅट्रिक झाल्यावर मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये राजवाडे दाखल झाले. पहिली सहामाही त्यांनी या कॉलेजमध्ये घालवली. त्या वेळेस कॉलेजमध्ये शिकवणाऱ्या प्रोफेसरांची त्यांनी आपल्या लेखात खूप टर उडवली आहे. ऑलिव्हर म्हणून एक गृहस्थ इंग्रजी शिकवी. 'Not' हा शब्द नकारार्थी आहे हे अपूर्व ज्ञानसुद्धा हे गृहस्थ कधी कधी समजून देत असत. राजवाडे त्या वेळेस नेमलेल्या इंग्रजी पुस्तकांबद्दल लिहितात, ''प्रवेश परीक्षेच्या वेळेस मी जे ग्रंथ वाचले होते, त्या मानाने

हे पुस्तक केवळ पोरखेळ वाटला; आठ-दहा वर्षांच्या इंग्रजी मुलास हे वाचायला ठीक आहे. घोडमुलांस अशा पुस्तकांचा उपयोग होतो असे नाही.'' हे पुस्तक म्हणजे सौदेकृत 'नेल्सनचे चरित्र' हे होय.

हा गमतीचा अभ्यासक्रम मुंबईस चालू होता. या वेळेस म्हणजे १८८८ मध्ये विष्णुशास्त्री यांच्या शोकप्रधान मृत्यूची वार्ता सर्वत्र पसरली व राजवाडे यांना फार वाईट वाटले. विष्णुशास्त्री यांना ते 'महात्मा' म्हणून संबोधित. त्या वेळी जे जे म्हणून स्वतःचे, त्याची त्याची टर उडविण्याची जी परंपरा पडली होती, त्या परंपरेस, त्या प्रघातास ज्याने आपल्या प्रभावशाली लेखणीने परागंदा केले, त्या त्या पुरुषांस ते 'महात्मा' म्हणून संबोधित. स्वदेशस्थिती समजावून सांगणारा, स्व-भाषेचे वैभव वृद्धिंगत करणारा थोर पुरुष निघून गेल्यामुळे त्यांच्या तरुण व उदार मनास फार दुःख झाले. ते लिहितात, ''त्या वेळी महतदुःख झाले. मरण ही मनुष्याची प्रकृती आहे, ही गोष्ट तोपर्यंत माझ्या अनुभवास आली नव्हती. तारुण्याच्या मुशीत जगताच्या या तीरावर स्वैर व निभ्रांत हिंडत असता जेथून काही कोणी परत आला नाही, त्या तीराची मला कल्पनाच नव्हती. मनुष्य व सर्व प्राणी अमर आहेत अशी माझी अस्पष्ट भावना होती. या भावनेला शास्त्रीबुवांच्या मृत्यूने जबर धक्का बसला. शाळेतून जाताना व येताना आणि शहराच्या पश्चिम भागात हिंडताना शास्त्रीबुवांच्या मूर्तीस अनेकवार पाहिले होते. त्या पुरुषसंबंधाने अनेक गोष्टींचा माझ्या मनावर संस्कार झाला असल्यामुळे त्यांच्या मरणाने मला दुःख झाले.''

पहिली सहामाही संपल्यावर दुसरी सहामाही राजवाडे कॉलेजमध्ये गेलेच नाहीत. पैशांची अडचण व इतरही काही अडचणी यामुळे हे शक्य झाले नाही. ते पुण्यास आले व खासगी शिकवणी जुजबी धंदा ते करू लागले. राजवाडे यांनी एक वर्ग काढला व त्यात पंधरा-वीस मुले येत. तीस-पस्तीस रुपये या दोन तासांच्या वटवटीने मिळून जात. दीड-दोन वर्षे त्यांनी हा धंदा चालवला. इतर काही वाचन वगैरे चाललेच होते. १८८४ साली राजवाडे यांचे वडील बंधू यांना दक्षिणा फेलो ही डेक्कन कॉलेजमध्ये जागा मिळाली. राजवाडे यांनी दुसरी टर्म डेक्कन कॉलेजमध्ये भरली व एक महिनाभर अभ्यास करून दुसऱ्या वर्षात ते पास झाले. १८८५ साली त्यांनी कॉलेजमध्ये दोन्ही टर्म्स भरल्या; परंतु ते परीक्षेस बसले नाहीत. सहामाही, तिमाही, नऊमाही वगैरे परीक्षांना राजवाडे बसत नसत. तेच तेच पुनः पुन्हा घोकून काय करायचे? वार्षिक परीक्षेत पास झाले म्हणजे झाले, असे ते म्हणत. भावाकडून पैशांची मदत होऊ लागल्यावर ते १८८६-८७ मध्ये डेक्कन कॉलेजच्या

वसतिगृहातच जाऊन राहिले. येथे राहिल्यावर त्यांनी आपला स्वच्छंद कार्यक्रम सुरू केला. लो. टिळकांप्रमाणे त्यांनी येथे प्रकृतीची फार उत्तम काळजी घेतली. भावी आयुष्यात अत्यंत कष्टप्रद काम तीन तपे त्यांनी जे केले, त्यासाठी वज्रप्राय कणखर शरीर असणे जरूर होते. त्यांचा या वेळचा कार्यक्रम त्यांच्याच शब्दांत सांगितला तर फार योग्य होईल. ''नियमाने पाच वाजता पहाटेस मी उठत असे व तालमीत जाऊन दोन तास उत्तम मेहनत करीत असे. बैठका, जोर, जोडी, मलखांब व कुस्ती अशी सुमारे दीड-दोन हजार मेहनत रोजची होई. तो सात वाजत. नंतर शेर दीडशेर दूध पिऊन अर्धा तास कॉलेजभोवताली मैदानात व झाडाखाली सहल व विश्रांती घेई. आठपासून नऊपर्यंतचा वेळ वर्तमानपत्रे वाचण्यात जाई. पुढे एक तास नदीवर पोहणे होत असे. परत येऊन भोजन आटोपून खोलीकडे जो यावे तो नेमके साडेअकरा वाजत. नंतर अर्धा तास समानशील अशा दोन-चार सद्गृहस्थांच्या समागमात धूम्रपान आटोपून कॉलेजातील पुस्तकालयातून आणलेले एखादे पुस्तक हिंडून, फिरून, निजून व बसून मी चांगले वाचून मनन करीत असे. वर्गातील शिक्षकांच्या व्याख्यानास मी प्राय: कधी जात नसे. इतर परीक्षार्थी विद्यार्थी जे चार तास वर्गात घालवीत ते मी स्वतंत्र पुस्तके वाचण्यात घालवी. वाचण्याचे काम चार-साडेचार पर्यंत चाले व नंतर बंद होई. मग शादिलबोवाजवळील होडीखान्यात एखाद्या होडग्यात सात वाजेतो नदीवर पाच-सात मैलांचे वल्हवणे करी. तेथून परत येऊन संध्या, भोजन आटोपावे तो साडेआठ वाजत. नंतर दहा-साडेदहा वाजेपर्यंत अनेक स्वभावांच्या विद्यार्थ्यांशी सामाजिक, राजकीय, धार्मिक व पाठशालीक विषयांवर पाच-पन्नास विड्या खलास होईपर्यंत नाना प्रकारच्या गप्पा चालत. साडेदहापासून पहाटेच्या पाच वाजेपर्यंत खोलीतील दोन टेबलांवर घोंगडी पसरून त्यावर उताणे निजले म्हणजे मला गाढ झोप येई. मेहनतीने अंग इतके कठीण होऊन जाई की, मऊ बिछान्यावर मला कधी झोपच येत नसे. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत मी एकही दिवस कधी आजारी पडलो नाही.''

अशा प्रकारचा 'स्पृहणीय' दिनक्रम या महापुरुषाचा चालला होता. ते दुपारी पुष्कळ वेळा सर्वांच्या मागून जेवायला जात. एकतर त्यांचा आहार दांडगा असे व दुसरे शांतपणे जेवण होई. ते शेळीचे दूध पीत असत. क्रिकेट व टेनिस यांना त्यांनी कधी स्पर्श केला नाही. आपले शरीर मोकळ्या हवेत जितके अधिक ठेवता येईल तेवढे ठेवण्याची ते खबरदारी घेत. सूर्यप्रकाश व मोकळी शुद्ध मुबलक हवा ही शरीरास जितकी मिळेल तितकी थोडीच. अशा व्यायाम पद्धतीने राजवाडे यांनी आपली प्रकृती निकोप व सुदृढ

करून घेतली व मरेपर्यंत कधी म्हणून ते आजारी पडले नाहीत. ही शरीराची जोपासना चालू असता त्यांनी बुद्धी व मन यांची जोपासनाही एकनिष्ठपणे चालविली. १८८४-९० साली आलटून-पालटून अनेक विषय त्यांनी चाळले. कोणता विषय घ्यावा, हे ठरेना. गणितशास्त्र, वनस्पतिशास्त्र, मानसशास्त्र वगैरे निरनिराळ्या शास्त्रांत त्यांनी हात घातला व सर्वांची चाचणी करून ते सोडले. शेवटी इतिहास हा विषय घ्यायचे त्यांनी ठरविले व त्या दृष्टीने ते वाचू लागले. जरी इतिहास हा विषय घेण्याचे ठरले, तरी अवांतर वाचनाचा नाद जो लागला तो कमी झाला नव्हता. ते कॉलेजमध्ये इतिहास हा विषय घेतलेले एकमेव विद्यार्थी होते. त्यांना कॉलेजमध्ये प्रोफेसरांच्या तासास गेले नाही तरी चालेल अशी परवानगी देण्यात आली होती. बी.ए.च्या परीक्षेत पास होण्यासाठी हिंदुस्थानचा व महाराष्ट्राचा इतिहास मॅट्रिकच्या वेळी जेवढा मी शिकलो होतो तेवढा बास होता, असे राजवाडे यांनी लिहिले आहे. यामुळे त्यांना इतर वाचन भरपूर करायला फिकीर वाटली नाही. ''इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तर्कज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र यांवरील प्राचीन व अर्वाचीन, अस्सल व भाषांतरित बरेच ग्रंथ मी मन:पूर्वक वाचले. शिवाय वनस्पतिशास्त्र व फारसी भाषा कामापुरती मी शिकलो. कोशाच्या व व्याकरणांच्या साहाय्याने एखादा फ्रेंच ग्रंथही मी वाचीत असे. प्लेटोचे सुराज्य (रिपब्लिक) याच वेळी मी सबंध मराठीत उतरले'' असे आपले अध्ययनवृत्त त्यांनी लिहून ठेवले आहे.

त्यांच्या दांडग्या व्यासंगास, प्रखर प्रज्ञेस शांतवणारे महाविद्यालय हिंदुस्थानात नव्हते. ते मोठ्या खेदाने लिहितात, ''खरे म्हटले असता, ज्ञानार्जनामध्ये ज्यांचे सर्व आयुष्य गेले, विद्येची मर्यादा वाढविण्यात ज्यांनी तपेच्या तपे घालविली व सर्व शास्त्रांत अपूर्व शोध करून मानवजातीला ज्यांनी अक्षय ऋणी करून ठेवले अशा गुरुवर्यांनी चालवलेली एखादी पाठशाळा त्या वेळी असायला पाहिजे होती. म्हणजे तेथे दहा-वीस वर्षे राहून वरील सिद्धांताच्या अनुरोधाने म्हणजे विद्या केवळ ज्ञानार्जनाकरता शिकायची या सिद्धांताच्या अनुरोधाने-विद्यार्जनाची माझी हौस, अधिकारी गुरूंच्या देखरेखीखाली मी पुरवून घेतली असती; परंतु दुर्दैव की अशी पाठशाळा व असे गुरू मला त्या वेळी मिळाले नाहीत.''

४५ वर्षांपूर्वी जी रडकथा राजवाडे यांनी गायली, तीच आजही प्रत्यक्ष आहे. एम.ए. झाला की झाला आचार्य. प्रोफेसर ही पदवी इतकी सोपी आहे का ? कॉलेजमध्ये शिकवणारे काही प्रोफेसर जे पुस्तक शिकवायचे, त्याची पानेही वर्गात

फाडतात. इतकी शिकविण्याबद्दल त्यांची आस्था. मग त्या त्या ज्ञानप्रांतातील ज्ञान आत्मसात करून, त्याच्या मर्यादा वाढवू पाहणारे व वाढवणारे किती असतील हे मनाशीच ठरवावे. सर्व एकंदरीने खेळखंडोबा झालेला आहे. ज्ञानाची टर चालली आहे. तपेच्या तपे तीव्रतेने अध्ययन केल्याविना गाढे पांडित्य कसे संपादन करता येणार ? परंतु आमच्याकडे ज्ञान म्हणजे परसातील भाजी झाली आहे.

असो. राजवाड्यांचा खाक्या तर त्यांच्या छंदाप्रमाणे चालू राहिला. रात्री ते निरनिराळ्या विषयांवर इतर मुलांबरोबर अनेक विषयांवर चर्चाही करीत. त्यांना विड्या ओढण्याचे व्यसन मात्र लागले. पाच-पन्नास विड्या ते व इतर मंडळी सहज फस्त करीत. दुसरी गोष्ट म्हणजे सर्व व्यवहार वगैरे इंग्रजीतून चाले. राजवाडे लिहितात, ''एका दुष्ट खोडीने मात्र मला अतोनात ग्रासले. ती खोड म्हणजे दुसरी तिसरी काही नाही. इंग्रजी बोलण्याची व इंग्रजीत विचार करण्याची. बाराव्या वर्षापासून सव्विसाव्या वर्षापर्यंतच्या पंधरा वर्षांत वाचणे, लिहिणे, विचार करणे वगैरे सर्व मानसिक क्रिया मी इंग्रजीत करू लागलो. शाळेत व कॉलेजात प्राचीन व अर्वाचीन मराठी ग्रंथांशी शिक्षकांनी व परीक्षकांनी माझी क्षणभरही ओळख करू दिली नाही. त्यामुळे स्व-भाषेत काही प्रासादिक व नामांकित ग्रंथच नाहीत, असे इतर परीक्षार्थ्यांप्रमाणे माझेही मत व्हायला कोणतीच हरकत नव्हती. तशात कुंटे, रानडे, विद्वान लोकही मोठमोठी व्याख्याने इंग्रजीत झोडीत. कॉलेजात तर बहुतेक सर्व व्यवहार इंग्रजीतच करू लागलो. बंधूंना व मित्रांना पत्रे लिहायची ती इंग्रजीत; डिबेटिंग सोसायटीत मोठी-मोठी अद्वातद्वा व्याख्याने द्यायची ती इंग्रजीत; व्यायामाचे सर्व प्रकार करायचे ते इंग्रजीत; सारांश, सतत पंधरा वर्षे बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामे मी इंग्रजीत करू लागलो. या एवढ्या अवधीत मी मराठी बहुतेक विसरून जायचा; परंतु दोघा तिघा गृहस्थांनी मला या विपत्तीतून वाचवले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहास संग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे, हे मला कळले व परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटू लागला. हे तीन ग्रंथ जर माझ्या दृष्टीस न पडते, तर आज मी कुंट्यांच्यासारखी इंग्रजीत व्याख्याने देण्यास, सुरेंद्रनाथांप्रमाणे बूट-पाटलोण घालून देशाभिमानाची पत्रे काढण्यास किंवा सुधारकांप्रमाणे बायकांना झगे नेसवण्याच्या ईर्ष्येस खचित लागलो असतो. सुदैवाने या देशाभिमान्यांच्या प्रयत्नाने

माझी अशी विपत्ती झाली नाही. नाहीतर असले काही चमत्कार माझ्या हातून नि:संशय घडते ! दारू पिणारे, मांस खाणारे, बूट-पाटलोण घालणारे, स्व-देशाला, स्व-भाषेला व स्व-धर्माला तुच्छ मानणारे गावठी साहेब त्या वेळी कॉलेजातल्या परीक्षार्थ्यांत अगदीच नव्हते असे नाही; परंतु त्यांचा संसर्ग उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांच्या ग्रंथांतील मतलबाने मला घडला नाही. विद्यार्थी धर्मलंड होतो की दुराचारी होतो, इकडे कॉलेजातील शिक्षकांचे मुळीच लक्ष नसे. कॉलेजातील युरोपीय शिक्षकांच्या मते, माफक दारू पिणे, बूट-पाटलोण घालणे, स्व-धर्माप्रमाणे न चालणे, स्व-भाषा विसरणे ही काही पापे गणली जात नसत. तेव्हा ते या गोष्टीत लक्ष घालत नसत हे स्वाभाविकच होते. गुरूंचा धाक नाही, पुढाऱ्यांचा कित्ता नाही, धर्माचा प्रतिबंध नाही, अशा स्थितीत मी पंधरा वर्षे काढली. त्यातून मी सुरक्षित पार पडलो त्याचे सर्व श्रेय वरील तीन ग्रंथकारांकडे आहे.''

राजवाडे यांच्यावरील लिहिण्यात कोणाला अतिशयोक्ती, विपर्यास कदाचित दिसेल; पोषाख वगैरे काही का असेना; पोषाखावर स्व-देशप्रेम व स्व-धर्मप्रेम थोडेच अवलंबून आहे असे काही म्हणतील; परंतु बाहेरच्या गोष्टी या आतील भावाचे दिग्दर्शन पुष्कळ वेळा करतात. बारीक-सारीक गोष्टींत परकीय येऊन हळूहळू नकळत आपण पूर्णपणे परके व स्व-परंपरेस पारखे बनत चाललो आहोत. 'Ill habits gather by unseen degrees' असे म्हणतात. अशा गोष्टींत कडवेपणा पाहिजे. साळसूदपणा उपयोगी नाही. भगिनी निवेदिता यांची अशी गोष्ट सांगतात की, एकदा शाळेत शिकवत असताना Time याला देशी शब्द त्यांना पाहिजे होता. ती शाळा बंगाली भाषा बोलणाऱ्या मुलींची होती. त्यांनी मुलीस विचारले; परंतु मुलीस उत्तर देता येईना. शेवटी 'रेखा' असे एकीने सांगितले. त्याबरोबर निवेदिता बाई 'रेखा, रेखा' घोकीत आनंदाने निघून गेल्या. हिंदुस्थान हा देश त्यांनी आपला मानला होता व म्हणून त्यांना भारतीय भाषेची ही आस्था व गोडी. आमचा तर जन्मप्राप्त, हा देश आहे. मानीव नाही. असे असून स्व-भाषेची हेळसांड मोठमोठ्या लोकांनी का करावी ! मोठमोठ्या पुस्तकांवर अभिप्रायही इंग्रजीत; ते ग्रंथलेखकांना कळले नाही तरी चालतील ! अशी उपेक्षा का ? आपण पूर्ण स्वदेशी राहावे व परकीयांचे सर्व उत्तम आपल्या संस्कृतीत मिळवून घ्यावे.

मराठी भाषेबद्दल त्या काळात ज्यांनी लोकोत्तर अभिमान दाखविला, त्यात शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे नाव प्रथम उच्चारले पाहिजे. अहर्निश दहा-बारा वर्षे

खपून त्यांनी ज्योतिषशास्त्राचा प्रचंड इतिहास मराठीत लिहिला. न्या रानडे वगैरे त्यांना हा ग्रंथ इंग्रजीत लिहून प्रसिद्ध करण्यास सांगत होते; परंतु या थोर पुरुषाने उत्तर दिले, ''ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा शिकतील. पाश्चात्त्य लोक माझ्या ग्रंथाची पूजा करतील; मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीचा हपापलेला नाही.'' चिपळूणकर, दीक्षित, राजवाडे यांसारखी भाषाभिमानी माणसे ज्या वेळेस अनेक उत्पन्न होतील, भाषाभिमानीची कडवी रजपूती कृती जेव्हा आमच्यात उद्‌भूत होईल, त्या वेळेसच आमची भाषा सजेल व सुंदर होईल. कीर्ती व पैसा यांची अपेक्षा ठेवून मराठी संपन्न होणार नाही. मराठीत जे अमोल प्राचीन काव्य आहे, ते अर्थाभिलाषी कविवरांनी विनिर्मिले नाही. ज्ञानेश्वरांसारख्या वागीधरांनी आपल्या अमृतासमान ओव्या कोळशाने खांबावर लिहिल्या; दासोपंताने निंबाचा पाला खाऊन 'लक्षावधी' ग्रंथ लिहून ठेवला. या प्राचीन वाग्वीरांप्रमाणे निःस्वार्थ होऊन ज्यावेळी आम्ही लिहायला लागू, त्या वेळी मराठी समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही; परंतु हे करायला जो तयार होईल त्याला खरी मायभाषेची माया पाहिजे, प्रेम पाहिजे, आस्था व अभिमान पाहिजे. आचार, विचार, भाषा यांत परकीयत्व स्वीकारल्यामुळे स्वजनांपासून आपण कसे दूर जात चाललो व सुशिक्षित ही एक नवीनच जात कशी निर्माण झाली आहे हे दिसून येते. असहकारितेपासून पुन्हा लंबकास विरुद्ध दिशा मिळू लागली आहे. सारांश राजवाडे यांनी वरील अवतरणात जे लिहिले आहे ते अगदी निर्विकार दृष्टीने पाहिले व दूरवर विचार करून पाहिले तर पटेल, असे वाटते.

निबंधमाला, नवनीत व काव्येतिहाससंग्रह या त्रयीने आपणांस राजवाडे दिले. निबंधमालेने एक राजवाडे दिला एवढ्यानेच निबंधमाला कृतकार्य झाली. तत्कालीन व तत्पूर्वकालीन नवसुशिक्षितांना प्राचीन इतिहास, काव्य सर्व अज्ञातच होते. ज्या वेळेस रा. ब. माने यांनी बखरीसारखे सुंदर हृद्य व जोरदार वाङ्मय छापायला घेतले, त्या वेळेस मराठीचे पाणिनी 'दादोबा' आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''आं, असे सुंदर वाङ्मय मराठीत आहे ? स्व-देश व स्व-भाषा यांबद्दल अभिमान ज्यांनी या भावी महापुरुषांच्या हृदयात उद्दीप्त केला, ते खरोखरच कृतार्थ होत.''

ज्या कॉलेजमध्ये राजवाडे शिकत होते, त्याची आजूबाजूची स्थिती चित्तवृत्ती विषण्ण करणारी होती. ज्या लढाईने पुण्याचे पेशव्यांचे राज्य गेले, ती लढाई येथेच झाली. तेथे हिंडत असताना पुढील आयुष्यात पूर्वजांची स्मृती जागृत करणाऱ्या या

थोर पुरुषाला फार उद्विग्नता प्राप्त होई. याच पुंणे शहरात इंग्रजांचे वकील हातरुमाल बांधून पेशव्यांसमोर सविनय जाऊन उभे राहात; याच पुण्यातील प्रतापी वीरांनी अटकेपर्यंत अंमल बसविला; याच पुण्यातून हिंदुस्थानची सूत्रे खेळविली जात; परंतु काळाचा महिमा अतर्क्य ! सात हजार मैलांवरचे गोरे लोक येथे येऊन आम्हाला गुलाम करून राहिले आहेत; त्यांनी स्थापन केलेल्या शाळा-कॉलेजांमधून त्यांनी लिहिलेली पुस्तके पढत आहोत ! आमचे लोक त्या रणरंगधीर पूर्वजांची पूज्य दिव्य स्मृतीही विसरून गेले व त्यांना लुटारू, दरोडेखोर, खुनी, लबाड असली शेलकी विशेषणे पाश्चात्यांनी दिलेली खरी मानू लागले ! हरहर ! काय आमची दुर्दशा ! समरचमत्कार जरी सद्य:कालात शक्य नसले, घोड्यावर अढळ मांड ठोकून समशेर लटकावून व भाले सरसावून पुन्हा दिगंत झेंडा मिरवता येणे सद्य:स्थितीत शक्य नसले, तरी ज्यांनी ती महनीय कामगिरी केली त्यांना आम्ही दूषणे दिलेली ऐकावी व त्यांचीच स्वत: री ओढावी इतका आमचा अध:पात कशाने झाला ? अशा प्रकारचे शेकडो कल्लोळ उडविणारे विचार राजवाडे यांच्या हृदयसमुद्रात उसळत असत. याच क्षेत्री हिंडता-फिरता त्यांना शहाजी, शिवाजी, रामदास, बाजी यांची स्मृती जळजळीत स्फुरली असेल. येथेच बसता-उठता आपले वैभव त्यांच्या कल्पना दृष्टीस दिसले असेल व ते दिव्य वैभव, ते यशोगान पुनरपि गावयाचे, असे त्यांनी ठरवले असेल !

राजवाडे कॉलेजात राहिले त्यामुळे शरीर कणखर बनले; बुद्धी प्रगल्भ, कुशाग्र व अनेक विषयावगाहिनी बनली. १८८४ सालाच्या शेवटी कोणत्याच परीक्षेस न बसता ते कॉलेज सोडून गेले. पुढे १८८८ सालात 'बाहेरचा विद्यार्थी' म्हणून पहिल्या बी.ए.च्या परीक्षेस ते गेले व पास झाले. या परीक्षेचा सर्व अभ्यास वीस-पंचवीस दिवसांतच त्यांनी केला. पुढे १८८९ साली भावे यांच्या शाळेत ते वनस्पतिशास्त्र शिकवीत होते. एक वर्षभर हे काम करून पुनरपि ते १८९० साली डेक्कन कॉलेजमध्ये राहायला गेले. इतिहास हा विषय ऐच्छिक घेऊन ते परीक्षेस बसणार होते. हा विषय शिकवणारा कोणी शिक्षकच तेथे नसल्यामुळे वर्गात जाण्याची अजिबात जरूर राहिली नव्हती. राजवाडे लिहितात, ''निव्वळ कॉलेजातील खोलीचा, हवेचा व जवळील नदीचा उपयोग करून घेण्याकरता मी ८० रु. फी भरली. कॉलेजात राहून तनु दुरुस्ती करावी हा माझा तेथे राहण्यात उद्देश होता.'' १८८९ साली डिसेंबर महिन्यापासून ते १८९० साली ऑक्टोबरपर्यंत तेथेच यथेच्छ राहिले. नंतर एक महिनाभर परीक्षेचा अभ्यास नीट कसोशीने करण्याकरता ते पुण्यापासून बारा कोसांवर

वडगाव म्हणून एक खेडे आहे तेथे जाऊन राहिले. १८९० साली जानेवारी महिन्यात ते बी.ए.ची परीक्षा पास झाले. राजवाडे लिहितात, ''मॅट्रिकपासून बी.ए. पर्यंत मी कधी नापास झालो नाही. १८८४ साली प्रथम मी डेक्कन कॉलेजात गेलो, त्यावेळी दर दोन महिन्यांनी एक एक परीक्षा जर घेतली असती, तर या तिन्ही परीक्षा पहिल्या सहामाहीतच मी पास झालो असतो; परंतु सहा टर्म्स, सहामाही व उपांत्य परीक्षा व मुंबईच्या फेऱ्या, अशा नाना प्रकारच्या खुळात सापडल्यामुळे सन १८८४ पासून १८९० पर्यंत मला व्यर्थ रखडत राहावे लागले. या रखडण्यात इतके मात्र झाले की, माझ्या मनाला जे योग्य वाटेल तेच मी केले आणि कॉलेजातील खुळसट शिस्तीला बळी न पडता मन व मेंदू यांना शैथिल्य व शीण येऊ न देता, जगात जास्त उत्साहाने काम करण्यास मी सिद्ध झालो.''

१८९० साली बी.ए.ची परीक्षा झाली. मनाने व शरीराने कर्तबगारी करण्यास तयार झालेला हा वीर आता हळूहळू आपल्या उद्दिष्ट-ध्येयाकडे कसा गेला हे आता पाहू.

✦✦✦

इतिहास संशोधन मंडळ व इतिहास मंडळ

राजवाडे १८९० साली बी.ए.ची परीक्षा पास झाले. ते प्रथम काही दिवस भावे स्कूलमध्ये शिक्षक झाले. नंतर न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते शिक्षक म्हणून काही दिवस होते. सहावी इयत्तेत Lamba Tales हे पुस्तक राजवाडे १८९१ साली शिकवीत असत. ब्राह्मण मासिक पत्रिकेच्या राजवाडे तिलांजली अंकांत श्री. काकाराव पंडित हे लिहितात, ''कै. राजवाडे यांची शिकवण्याची पद्धत काही विशेष होती. कोणत्याही विद्यार्थ्याने धड्यातील आपणास न येणारे शब्द वेब्स्टरचे कोशातूनच काढले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असे. शिकवताना प्रत्येक वाक्य प्रथमत: इंग्रजीत बोलून नंतर त्याचे बरोबर मराठी भाषांतर उच्चारायचे असा त्यांचा नियम असे. त्यांची ती करडी नजर, रोडकी पण कणखर शरीरयष्टी, पांढरा व स्वच्छ पोषाख आणि नेहमीच असलेली सस्मीट, पण करारी मुद्रा पाहून विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी प्रेमापेक्षा भयाचाच जास्त पगडा बसलेला असे.''

राजवाडे यांचे आयुष्य हे शाळेतील मास्तरकी करण्यात जायचे नव्हते. त्यांचे मन तेथे नीट लागेना. स्वतंत्र कार्य करण्याकरता त्यांचा जन्म झालेला होता. १८९५ साली शेवटी त्यांनी भाषांतर हे मासिक सुरू केले. भाषासंवर्धन करायचे हा त्यांचा हेतू ठरलेलाच होता. मराठी मातृभाषा मी वृद्धिंगत करीन हे त्यांचे ध्येय होतेच. जे काही लिहायचे ते मराठीत आणण्यासाठी त्यांनी हे 'भाषांतर' मासिक सुरू केले. त्यांच्याबरोबर डेक्कन कॉलेजमध्ये शिवरामपंत परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर वगैरे होते. शिवरामपंत, दिनकर त्रिंबक चांदोरकर वगैरे मंडळींनी त्यांना साहाय्य करण्याचे

ठरविले. प्लेटो याच्या 'रिपब्लिक' या जगन्मान्य ग्रंथाचे त्यांनी कॉलेजमध्ये असतानाच भाषांतर करून ठेवले होते. ते या 'भाषांतर' मासिकात राजवाडे प्रसिद्ध करू लागले. दुसऱ्याही काही सुंदर ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध झाली. मॉन्स्क यांचे 'एस्प्रिट दि लाज' या ग्रंथाचा तर्जुमा प्रसिद्ध झाला; परंतु या भाषांतरार्थ त्यांची स्वतंत्र प्रतिभा जन्मलेली नव्हती. भाषांतराच्या, एक प्रकारे दुय्यम प्रकारच्या कामात, त्यांच्या अनंत बुद्धिबलाचा व्यय व्हायचा नव्हता. यासाठी परमेश्वर निराळीच योजना घडवून आणत होता.

सन १८९५-९६ च्या सुमारास रावबहाद्दूर काशिनाथपंत साने यांचे पुणे येथे 'महाराष्ट्र इतिहासाचे महत्त्व' या विषयावर एक सुंदर व्याख्यान झाले व त्याचा सारांश केसरीत प्रसिद्ध झाला. या व्याख्यानाचा त्या वेळच्या पुण्यातील विद्यार्थ्यांच्या मनावर फार परिणाम झाला. वाई येथील रहिवासी श्री. काकासाहेब पंडित हे त्या वेळी पुण्यास वकिलीचा अभ्यास करण्यासाठी आले होते. त्यांच्या मनावर वरील व्याख्यानाचा फार परिणाम झाला व मराठ्यांच्या इतिहासाची साधने शक्य असल्यास जमवावीत, असे त्यांना वाटू लागले.

ज्या घरात हे काकासाहेब राहात असत, त्या घराच्या मालकाने तिसऱ्या मजल्यावरील एका भिंतीत असलेल्या अंबारीत एक जुन्या कागदांचे मोठे पेटार टाकून दिले होते. त्यातील जुने कागदपत्र एकदा वाचून पाहावे असे वाटून हे काकासाहेब व त्यांचे मित्र कै. रंगा वासुदेव बोपर्डीकर यांनी ते दप्तर चाळून पाहण्यास सुरुवात केली. पहिलेच पत्र हाती घेतात तो, ते पत्र पानिपतच्या लढाईच्या आधी गोविंदपंत बुंदेले यांनी लिहिलेले सापडले. ते पत्र पाहून या उभयता वाचकांत किती आनंद झाला असेल हे वाचकच कल्पनेने जाणोत. पानिपतच्या लढाईतील एका प्रमुख योध्द्याचे हस्तलिखित पत्र पाहून किती आश्चर्य व धन्यता त्यांना वाटली असेल ! सर्व दप्तर चाळून महत्त्वाचे कागद त्यांनी बाजूला काढले. याच सुमारास प्रो. आबासाहेब काथवटे वाईस गेले होते. त्यांना ही वार्ता या उभयतांनी हर्षभराने निवेदन केली. ते सर्व कागद समक्ष पाहून ते महत्त्वाचे कागद रा. ब. साने किंवा विसुभाऊ राजवाडे यांच्याकडे पाठवण्याची त्यांनी शिफारस केली. आबासाहेब पुण्याला गेले व त्यांनी ती वार्ता राजवाडे यांना सांगितली. मग काय ! त्या निरलस व साक्षेपी पुरुषाने एक क्षणही वाया दवडला नाही. पानिपतच्या लढाईसंबंधीची पत्रे म्हणजे केवढा मोठा लाभ असे त्यांना झाले. त्याच रात्री राजवाडे पुण्याहून वाईला जायला निघाले व जाऊन ते दप्तर

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

पाहायला त्यांनी सुरुवात केली. काहीएक विश्रांती न घेता एकसारखे सर्व कागद अथपासून इतिपर्यंत वाचायचे, याप्रमाणे त्यांनी काम केले. श्रमाची त्यांना पर्वा नसे. श्रमासाठीच तर त्यांनी शरीर तयार केले होते. दोन महिन्यांत सर्व दप्तर तपासून इतिहासासंबंधी सर्व कागद घेऊन ते पुण्याला रवाना झाले. तेथे श्रीविठ्ठल छापखान्यात ते कागदपत्र छापण्यास सुरुवात झाली; परंतु दुर्दैवाने श्रीविठ्ठल छापखाना जळून गेला. हा विठ्ठल छापखाना फडके वाड्यात होता. 'भाषांतर' मासिकाचे सर्व संपादित कार्य खाक झाले. याच सुमारास त्यांची भार्या मरण पावली. संसाराचा पाश तुटला व राष्ट्रप्रपंच सुधारायला हा महापुरुष तयार झाला.

पानिपतच्या लढाईसंबंधाचे सर्व कागद घेऊन ते वाईला आले. पुन्हा सर्व बालबोधीत लिहून त्यांचा ते अभ्यास करू लागले. त्या पत्रांशी त्यांची तन्मयता पूर्णपणे झालेली होती. त्यांना खाण्या-पिण्याचीसुद्धा आठवण नसे. पानिपतच्या प्रचंड रणसंग्रहाची साग सुसंगत हकिकत जमविण्यात ते दंग झाले. सर्व कार्यकारणभाव त्यांनी जमविले. रात्री, दिवसा, पहाटे, सायंकाळी ज्या-ज्या वेळी पाहावे, त्या-त्या वेळी राजवाडे त्या दप्तराचा अभ्यास करीत आहेत, असेच दिसे. झोपबीप सर्व चट पळून गेले. काम करता-करता जरा दमले असे वाटले म्हणजे तेथेच डोके टेकून दहा-पंधरा मिनिटे झोपायचे; परंतु फिरून जागे होऊन कागदपत्र वाचू लागायचे. विठ्ठलाच्या ध्यानाने तुकोबादिकांची तहानभूक जशी हरपे तसेच या महापुरुषाचे झाले. केवळ जगण्याकरता म्हणूनच पोटात ते चार घास कोंबीत व अगदी डोळे उघडत नाहीसे झाले म्हणजे डोके टेकीत. या वेळचीच आम्ही एक आख्यायिका आमच्या लहानपणी ऐकली होती. त्यांना कोणीतरी म्हणाले, ''अहो, असे अश्रांत काम करून लवकर मरून जाल.'' त्यावर ते संतापून म्हणाले, ''काम करून मनुष्य मरत नाही; आळसाने लवकर मरतो. माझ्या आधी तुम्हाला मीच पोचवीन !'' राजवाडे यांनी असा हा नीट अभ्यास करून आपला हा पहिला खंड प्रसिद्ध केला. त्यांची या खंडास १२७ पानांची द्वादश प्रकरणात्मक अद्वितीय प्रस्तावना आहे. १८८८ सालापासूनच त्यांनी या मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासास पद्धतशीर आरंभ केला होता. या दहा वर्षांच्या श्रमाचे फळ म्हणजे ही प्रस्तावना होय.

मोदवृत्त छापखान्यात हा प्रथम खंड प्रसिद्ध झाला. या खंडाने थोर इतिहास तत्त्वविवेचक म्हणून राजवाड्यांची सर्वत्र कीर्ती झाली. सर्वजण ही प्रस्तावना पाहून

दिपून गेले. जोरदार भाषा, समर्पक सिद्धांत, इतिहासतत्त्व विवेचनाचे गाढे ज्ञान हे सर्व पाहून महाराष्ट्रीय विद्वान लोक चकित झाले. ज्ञानकोशकार विद्यासेवकात लिहितात, ''खरोखर पाहता साहित्यशोधन, बारीक शोध आणि इतिहास–विकासविषयक विचार या दृष्टीने पाहता अर्वाचीन इतिहासाच्या क्षेत्रात राजवाडे यांच्या पहिल्या खंडाच्या योग्यतेचा दुसरा ग्रंथ गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानात झालाच नाही. या ग्रंथामुळे त्यांना इतिहास संशोधक हे नाव मिळाले ते कायमचे टिकले.'' या ग्रंथाची प्रस्तावना इतकी गहन व गंभीर आहे की, ती प्रथम वाचताना वाचक गोंधळून जातो. प्रसिद्ध रियासतकार सरदेसाई म्हणाले, ''ही प्रस्तावना मी सात वेळा वाचली, तेव्हा कोठे मला त्यातील म्हणणे सर्व यथार्थपणे समजले.'' याच प्रस्तावनेत इतिहासाचे आत्मिक व भौतिक विवेचन म्हणजे काय हे त्यांनी विशद केले आहे. महाराष्ट्र धर्म म्हणजे काय याची फोड याच प्रस्तावनेत त्यांनी प्रथम केली व मागून तत्संबंधी अनेक ठिकाणी ऊहापोह केला. इतिहासाचे क्षेत्र किती विस्तृत आहे, इतिहास सर्वांगीण होणे म्हणजे त्याचा अभ्यास कसा करावा, किती गोष्टींचा त्यात अंतर्भाव होतो हे या प्रस्तावनेत त्यांनी सांगितले आहे. हे सर्व सांगून मग या खंडात प्रसिद्ध केलेल्या पत्रांच्या अनुरोधाने त्यांनी पानिपतच्या लढाईसंबंधी सुंदर सखोल विवेचन केले आहे. पानिपतच्या लढाईत पराभव होण्यासंबंधी अठरा कारणे जी आजपर्यंत इतरांनी कल्पिली, ती मांडून मग कागदपत्रांच्या आधारे त्या मुद्यांचे त्यांनी सप्रमाण व बिनतोड खंडन केले आहे. लढाईच्या खऱ्या यशापयशाची कारणे म्हणजे मल्हारराव होळकर यांची कुचराई व द्रोह तसेच गोविंदपंत बुंदेला यांची कार्यासंबंधीची उदासीनता ही मुख्य होत असे त्यांनी दाखविले आहे. या तत्कालीन कारणांशिवाय मराठ्यांच्या राज्यप्रसाराबरोबर उदार विचार प्रसाराचे रामदासी कार्य कोणी केले नाही. यामुळे नवीन मिळविलेल्या साम्राज्यातील जनतेची मनोगते हाती घेता आली नाहीत; हे महत्त्वाचे अपजयाचे कारण आहे. मराठ्यांनी साधी राहणी सोडली नाही; परंतु उच्च विचारसरणी व तिचा प्रसार हे सोडले. मराठे अर्बुज व धिप्पाड अफगाणांसमोर लढाईस टिकत नव्हते वगैरे कारणांचा राजवाडे यांनी नुसता धुव्वा उडविला आहे.

रशियाबरोबर जपानी लोकांची जी लढाई झाली, तीत प्रचंडकाय रशियनांचा लहान जपानी वीरांनीच नक्षा उतरवला व जगास चकित केले. देह केवढा का असेना, देहातील देशभक्तीची ज्योत दिव्य असली म्हणजे झाले. पानिपतच्या लढाईसंबंधी त्या वेळच्या उपलब्ध तुटक साधनांच्या जोरावर राजवाडे यांनी जे सिद्धांत प्रस्थापित

केले, ते आजही बहुतेक अबाधित आहेत. याप्रमाणे हा 'अलौकिक' पहिला खंड प्रसिद्ध झाला व राजवाडे यांची कीर्ती अक्षय्य उभारली गेली.

यानंतर आणखी दप्तरे शोधण्याच्या नादास ते लागले. आता ते त्यांचे पवित्र कार्यच झाले. प्रयत्न केला तर सर्व मराठ्यांचा व पर्यायाने हिंदुस्थानचा इतिहास तयार करता येईल, असे त्यांना वाटू लागले. मेणवली येथील दप्तराचा शोध लागला. एके दिवशी राजवाडे एकटेच मेणवलीला जाऊन आले; परंतु त्यांना दप्तर दाखवण्यास हरकत घेण्यात आल्यामुळे ते संतप्त झाले. शेवटी एकदाचे दप्तर पाहण्याची त्यांना परवानगी मिळाली व त्यांचे काम सुरू झाले. या ठिकाणी राजवाडे यांच्या श्रमसातत्याची व उद्योगाची पराकाष्ठा झाली. पहाटे पाच वाजता ते उठत. प्रातर्विधी आटोपून जे कामास लागत ते मध्यंतरीचा वाड्यात जेवणात लागेल तेवढाच वेळ खर्च करून, कोणाशीही न बोलता रात्री दहा-अकरा वाजेपावेतो दप्तर पाहणीचे काम करीत. मेणवली दप्तराचे काम चालू असता 'मी शंभर वर्षे जगलो व हे मेणवली दप्तर प्रकाशनाचे काम सुरू केले, तर माझे सर्व आयुष्य खर्च झाले तरी हे काम तडीस जाणार नाही' असे उद्‌गार काढीत.

त्या दप्तरातील आनंदीबाई, राघोबादादा, सखारामबापू, निजामअली वगैरे इतिहासप्रसिद्ध व्यक्तींसंबंधी दप्तरात उपलब्ध असलेले कागद निरनिराळे बांधण्यास त्यांनी ८० रुपये खर्च करून कापड विकत घेतले व सर्व रुमालावर निरनिराळ्या व्यक्तींची नावे घालून व्यवस्थित दप्तर लावून ठेवले. यात नाना नेहमी उपयोगात आणीत असत, ते नकाशे त्यांनी एका निराळ्याच दप्तरात बांधून ठेवले होते. त्यातील एक-दोन नकाशे गळवठले असल्याचे आढळल्याने राजवाड्यांनी चौकशीस सुरुवात केली; परंतु राजवाडे यांनीच ते चोरले असा मालकाने आरोप केला. स्वाभिमानी व नि:स्पृह राजवाड्यांना ही गोष्ट कशी सहन होणार ! अनंत श्रम करून यांची दप्तरे तपासा व परत ही दक्षिणा ! राष्ट्राचा इतिहास तयार करू पाहणाऱ्या पुरुषाची अशी ही पूजा ! त्यांनी मेणवली दप्तराचा नाद सोडून दिला. ज्या-ज्या वेळेस त्यांना त्या दप्तराची आठवण येई, त्या-त्या वेळी त्यांचे मन उद्वेगाने भरून येई. पुढे नाना फडणिसांचे महत्त्वाचे प्रचंड दप्तर श्रीमंत शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी व पारसनीस यांच्या हाती गेले.

याच सुमारास पारसनीस यांनी ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्र व पत्रव्यवहार प्रसिद्ध केला. या खंडात पारसनीस यांनी प्रथम १०० पानांत ब्रह्मेंद्राचे जे चरित्र देण्याचा प्रयत्न

केला आहे, त्यात ब्रह्मेंद्रांना त्यांनी रामदासांच्या पायरीस नेऊन बसविले आहे. फार थोर जनपदहितकर्ता व सल्लागार म्हणून त्याची महती त्यांनी त्यात गायली आहे; परंतु ज्या पत्रांवरून हे चरित्र रचले, त्यात ब्रह्मेंद्रांचे चरित्र निर्विकार दृष्टीने पाहिले तर खरोखर निराळे दिसते. राजवाडे यांनी ब्रह्मेंद्रांसंबंधी अल्पच पत्रे मिळवून प्रसिद्ध केली व या तिसऱ्या भागात प्रस्तावनेत त्यांनी ब्रह्मेंद्रांचे त्यांच्या दृष्टीने खरे स्वरूप दाखवून दिले. या भागाची ही प्रस्तावना अशीच फार धार्मिक आहे. ब्रह्मेंद्र स्वामीला हा कलागती लावणारा, भांडणे लावणारा, सावकारी वृत्तीचा एक सामान्य माणूस होता व राष्ट्राचे नुकसान करण्यास मात्र कारणीभूत झाला, असे राजवाडे यांनी आपले मत स्थापले. या प्रस्तावनेत ते एके ठिकाणी लिहितात, ''राष्ट्रातील पुढारी व नेत्या पुरुषांची दानत धुतल्या तांदळासारखी असेल तरच कल्याण होते.'' उघडच आहे. ''महाजनो येन गत:स पंथा:'' समाजातील नेते, त्यांचे गुरू जर ब्रह्मेरूद्रासारखे चुगलखोर निघाले तर इतरांनी त्यांचेच अनुकरण केले, तर त्यात नवल काय ?

राजवाडे यांची ही प्रस्तावना प्रसिद्ध झाल्यावर विविध ज्ञानविस्तारात कित्येक महिने खडाजंगी चालली होती. राजवाडे यांचे लिहिणे जरी जरा जास्त दिसले, तरी ते यथार्थ वाटते. ब्रह्मेंद्रांस सिद्धी वगैरे असेल; परंतु विवेकानंदांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे सिद्धीच्या मार्गाने मनुष्य एखादे वेळेस अवनतीस जातो, चमत्कार करून मोठेपणा मिरवावा असे त्यांना वाटू लागते. त्याच मासल्याचा ब्रह्मेंद्र असावा असे वाटते. त्याच्या पत्रात काही ना काहीतरी पैसे, खाद्यपेये यांच्याशिवाय शब्द दिसत नाही. असला घृतमधु सेवन करणारा व याचे पैसे घेऊन त्यास देणारा संन्यासी राष्ट्रकार्यधुरंधर रामदासांच्या पंक्तीस कोण बसवील ? सावरकरांच्या दारात कपाळ छिनत चालले असले उद्गार निराश होऊन तो रणपंडित अचाट कर्तृत्त्वशाली बाजीराव काढतो व ब्रह्मेंद्र त्यास स्वत:च्या कर्जाचा तगादा लावतो. वाहवा रे गुरू! असो. हे मतभेदांचे प्रश्न आहेत; परंतु ब्रह्मेंद्रांच्या पत्रांवरून तरी ते रामदासांच्या पासंगासही पुरणार नाहीत, अशी विचारशील मनाची खात्री होते.

अशी पत्रे जमा होत होती. त्यात ओझर्डेकर पिसाळ देशमुख यांचे दप्तर मिळण्याचा संभव दिसू लागला. काही अस्सल कागद मिळालेही. हे दप्तर औरंगजेब याने दक्षिणेकडे स्वारी केली, त्या वेळचे असून त्या काळच्या इतिहासावर बराच प्रकाश पाडणारे आहे. हे घराणे सुप्रसिद्ध सूर्याजी पिसाळ देशमुख यांचे असून त्यांच्याशी झालेला बादशहाचा पत्रव्यवहार या दप्तरात आहे. सूर्याजी हा बादशहाला

मिळाल्यावर त्याने स्वत:चे जातभाई जे मराठे यांना गनीम असे पत्रात लिहिलेले राजवाडे यांना दिसून आले, तेव्हा राजवाडे यांना संताप आला. स्व-जनद्रोहाचे भयंकर पातक करून पुन्हा त्यांना शिव्या देणे म्हणजे काय, असे त्यांना वाटले. राजवाडे यांनी ही पत्रे ग्रंथमालेत प्रसिद्ध करताना एक टीप लिहून 'सूर्याजी' हा राजद्रोही होता असे प्रसिद्ध केले. ही गोष्ट या घराण्यातील मंडळींना कळल्यावर त्यांनी राजवाडे यांना दप्तर देण्याचे साफ नाकारले. ते म्हणत 'हल्लीचे गायकवाड, शिंदे, होळकर हे इंग्रजांशी सलोख्याने वागून त्यांच्या हितात समरस होतात, तरी ते राष्ट्रद्रोही ठरत नाहीत, मग त्यावेळच्या असलेल्या सार्वभौम सत्तेशी सूर्याजी पिसाळ समरस झाला तर तो राष्ट्रद्रोही कसा ?' परंतु राजवाडे यांनी आपले म्हणणे सोडले नाही व हे दप्तर हाती येण्याचा मार्ग खुंटला

वाई प्रांतात इतिहासासंबंधी कागदपत्रे शोधीत असता त्यांना जुनी काव्ये वगैरेही सापडत. जुनी ज्ञानेश्वरी त्यांना सापडली. दासोपंतांचे एक बाड सापडले. दासोपंतांचे काव्य छापण्यासाठी 'महाराष्ट्र सारस्वत' म्हणून एक मासिक सुरू झाले. ते काही दिवस चालू होते.

एकदा हे संशोधनाचे काम महत्त्वाचे म्हणून पटल्यावर राजवाडे यांनी सर्व जीवित त्याला वाहायचे ठरवले. ठिकठिकाणी ते वणवण हिंडले. काशीपासून रामेश्वरपर्यंत जिथे जिथे म्हणून कागदांचा चिटोरा मिळण्याचा संभव, तेथे तेथे ते हिंडले. ते बलुचिस्तान व अफगाणिस्तान इकडेही गेले होते. कोठे जाण्याचे त्यांनी बाकी ठेवले नाही. त्याप्रमाणे सर्व ऐतिहासिक स्थळे, किल्लेकोट, गुहा, दऱ्या, राजवाडे, शिलालेख, दर्गे, लेणी सर्व त्यांनी नीट पाहिले. सर्व महाराष्ट्र त्यांच्या डोळ्यांसमोर उभा असे. कधी-कधी या स्थाननिरीक्षणाच्या नादाने त्यांच्यावर भयंकर संकटेही ओढवत; परंतु दैवसाहाय्याने ते यातून सुरक्षित बाहेर पडले. एकदा खांदेरी-उंदेरी हे मुंबईजवळील समुद्रातील ठिकाण नीट पाहण्यासाठी म्हणून मुंबईस ते कुलाबादांडीजवळ ओहोटी होती, तेव्हा गेले व सर्व प्रदेश नीट न्याहाळून पाहात होते. रात्र होत आली व भरती लागण्याची वेळ आहे, याकडे त्यांचे लक्षच नव्हते. पहारेकरी म्हणाला, 'येथे रात्रीचे राहायचे नाही.' शेवटी पाण्यातून पोहत जायचे त्यांनी ठरवले. त्यांच्याबरोबर एक मुसलमान खलाशी येण्यास तयार झाला; परंतु मार्गात त्या भरतीत त्या मुसलमानाने चकवले. मुंबईला त्या वेळी हिंदू-मुसलमानांचे दंगे चालू होते. त्या मुसलमानाने तर हातावर तुरी दिली. समुद्रात लाटांशी दोन हात खेळत हा पठ्ठ्या

सारखा पुढे येत होता; परंतु कुठे जातो हे कळेना. इतक्यात त्यांना एक अंधुक दिवा दिसला. त्या दिव्याच्या आधाराने ते चालले. एक कोळी जाळे पसरून मासे पकडत होता. राजवाडे खूप मोठ्याने ओरडले. कोणीतरी पाण्यात पोहून येण्याची धडपड करत आहे हे कोळ्याने ताडले व त्याने आपले जाळे खूप दूरवर फेकले. त्या जाळ्याच्या आधाराने राजवाडे किनाऱ्यावर आले. त्या कोळ्याने त्यांना घरी नेऊन पोहोचवले. राजवाडे यांनी त्याला चांगले बक्षीस दिले हे सांगण्याची जरूरी नाही. सुदैव महाराष्ट्राचे व भारतवर्षाचे की, त्या काळाच्या जबड्यातून हा थोर पुरुष बचावला.

अशा प्रकारे सर्व जागा त्यांनी डोळ्यांखालून घातल्या. पुण्याची माहिती तर त्यांच्याइतकी कोणालाच नव्हती. कोणत्या ठिकाणी कोण होते सर्व ते सांगत. ते कोकण प्रांतीही गेले होते व तिकडेही त्यांनी संशोधन केले. कोकण प्रांतातील लोकांसंबंधी ते लिहितात, ''कोकणातील ब्राह्मण, मराठे, भंडारी वगैरे लोक मोठे चलाख, उद्योगी, शीघ्रबुद्धी, धाडसी व श्रमसाहस करणारे असलेले मला दिसले. यांच्यात मध्यम व उच्च शिक्षणाचा प्रसार झाल्यास एकंदर महाराष्ट्रातील समाजाची प्रगती जास्त वेगाने होईल, असा माझा ग्रह झाला. या लोकांत Naval Architecture चे एखादे स्कूल व उच्च शिक्षणार्थ एखादे तरी सर्वसाधनसंपन्न कॉलेज स्थापल्यास, येथून धाडसी व सुशिक्षित नावाडी व कुशाग्र विद्वान निपजण्याचा संभव आहे.'' अशा प्रकारे जेथे जातील तेथे सूक्ष्म बुद्धीने सर्व पाहात. पत्रे वगैरे मिळवण्यास त्यांना कशी मारामार पडे याचे त्यांनीच आपल्या एका खंडाच्या प्रस्तावनेत वर्णन केले आहे. कनक व कांता यांना जिंकून मानापमानाचे गाठोडे बांधून ठेवून, आशेस फार सैल न सोडता, सतराशे खेटे घालायला लागले तरी तयार असणे वगैरे गोष्टी संशोधकास पाहिजेत. एखादे वेळी उन्हातान्हातून जावे व पत्रे दाखवू नये, असेही होई, असे ते सांगत. कारण स्वत: त्यांना कऱ्हाड मुक्कामी असता असे कटू अनुभव आले होते. दप्तरे झाडून साफ करायची, धुळीने नाकपुड्या भरून जात, कोळिष्टकांनी डोके भरून जाई; या सर्व धुळवडीस तयार असले पाहिजे, तर पत्रलाभ होईल, असे ते म्हणत. पुन्हा कधी-कधी पत्रे मिळत त्यांचे गठ्ठे वाळवीने खाल्लेले अगर पावसाने एकत्र झालेले असे असायचे. सातव्या खंडाचे संपादक आपल्या प्रस्तावनेत लिहितात, ''ही इतिहासातील साधने अश्रांत परिश्रमाने कधी उकिरड्यातून तर कधी उकिरडेवजा झालेल्या जुन्या वाड्यातील तळघरातून अथवा कधीही वापरात नसलेल्या तिसऱ्या,

चवथ्या मजल्याच्या माळ्यावरून उन्हाळ्यातील कडक ऊन-पावसाळ्यातील पाऊस व हिवाळ्यातील थंडीचे कडके खाऊन, कडकन भिजून आणि फिरून आकर्षून - केर कचंरा व वाळवी यांच्या अखंड मैत्रीत ''कालोह्यहं निरवधिर्विपुलाच पृथ्वी' या भवभूतीच्या उक्तीवर विश्वास टाकून बसलेली अशी रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे बी.ए. यांसारखे पदवीधर उजेडात आणत आहेत. त्यांना अभ्यंगस्नाने घालत आहेत; त्यांचे रोगग्रस्त भाग प्रसंगी कळकळीच्या मवाळीने सुसह्य होणाऱ्या शस्त्रकारांनी कापून काढून निराळे करत आहेत. कित्येक ठिकाणी मलमे लावत आहेत, तर कित्येक ठिकाणी नवे अवयवही कृत्रिम तऱ्हेने बनवून चिकटवत आहेत व जुन्यांस रजा देत आहेत. या सर्व गोष्टी केवळ कविकल्पना वाटण्याचा पुष्कळ संभव आहे; परंतु ज्यांनी हे पत्रांचे गठ्ठे स्वत: पाहिले आहेत, त्यांना तसे वाटण्याचे कारण नाही. तीन-चार पुस्तके वाळवीने इतकी खाल्ली आहेत की, त्या वाळवीच्या किड्यांच्या मृत शरीराची माती त्या पुस्तकात भिनून एकंदर पुस्तकाची माती - का ? दगडी पाटीच बनली आहे. अशा स्थितीत असलेली ही पुस्तके फिरून बोलकी करायला प्रथम त्यांनर युक्तीने वाफारा-द्यावा लागतो. हा वाफारा देताच त्या प्रस्ताराचे पापुद्रे काहीसे सुटे होतात. ते तसे सुटे झाल्यावर लगेच गर्भाशयातील शस्त्रक्रियेच्या प्रसंगी जितक्या हलक्या हाताने आणि काळजीपूर्वक काम करावे लागते, त्यापेक्षाही अधिक हलक्या हाताने आणि कळकळीने त्या प्रस्तरमय पुस्तकाचे एक-एक पृष्ठ सोडवावे लागते. अशी ही सोडवलेली पृष्ठे फिरून चिकटू नयेत म्हणून त्यांच्यामध्ये एक-एक टिपकागदाचे किंवा साध्याही कागदाचे पृष्ठ घालून ठेवावे लागते. इतके करूनही ही पृष्ठे आपले सर्व हृद्‌गत बोलून दाखविण्यास समर्थ होत नाहीत. इतकेच नव्हे, तर कित्येक अगदी निरक्षर म्हणजे मुकी झालेलीच जेव्हा आढळतात, तेव्हा मनाला किती उदासवाणे वाटत असेल, याची कल्पनाच करणे बरे''.

याच प्रस्तावनेत द्रव्यसाहाय्य करण्याबद्दल सर्व जनतेस मोठी कळवळ्याची विनंती केली आहे. या विनंतीप्रमाणे काही साहाय्य मिळाले. चिपळूण येथील एका गृहस्थाने मुद्दाम चार आणे या कार्यास पाठविले होते; परंतु पत्रे ज्या मानाने मिळत गेली, त्या मानाने प्रकाशन झाले नाही. मराठ्यांच्या इतिहासाची साधने या नावाने त्यांनी बावीस खंड प्रसिद्ध केले. तरीसुद्धा ५० हजार पत्रे त्यांच्याजवळ राहिलीच. हे सर्व काम राजे महाराजे, सरदार दरकदार यांच्या मदतीशिवाय कसे व्हावे ? राजवाडे

संतापून आपल्या प्रस्तावनेत एके ठिकाणी लिहितात, ''साधने प्रकाशण्यासंबंधाने एक चमत्कार आज कित्येक वर्षे मी निमूटपणे पाहात आहे; तो असा की, शिंदे, होळकर, गायकवाड, आंग्रे, पटवर्धन, विंचूरकर, पवार, राजेबहाद्दर, कोल्हापूरकर, तंजावरकर, फडणीस, प्रतिनिधी, फलटणकर, भोरकर, जतकर, हैद्राबादकर, जयपूरकर, जोधपूरकर, सागरकर व इतर लहान मोठे संस्थानिक, जहागीरदार, इनामदार, देवस्थानवाले व पृथ्वीचे मुत्सद्दी हे अद्यापपर्यंत काय करीत आहेत ? त्यांची दप्तरे किंवा त्याच्यासंबंधीचे कागदपत्र आमच्यासारख्या भिकारड्यांनी शोधण्याचा व छापण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांच्यासारख्या श्रीमंतांनी अगदीच उदासीन व निद्रिस्त असावे, हा कुठला न्याय ? काय, त्यांचे पूर्वज त्यांचे कोणी नव्हते ? पूर्वजांनी संपादिलेल्या जहागिरी व राज्ये भोगण्यास राजी आणि त्यांचे पराक्रम व इतिहास जाणण्यास गैरराजी, हा न्याय पृथ्वीवर इतर कोठेही पाहायला मिळायचा नाही. वासुदेवशास्त्री खऱ्यांनी आपले घरदार विकून पटवर्धनी दप्तर छापावे आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर यांनी खुशाल झोपा काढाव्या, शिवाजी महाराज, दमाजी गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हा संशोधकांचे आजे-पणजे आहेत आणि संस्थानिकांचे कोणी नाहीत, असेच म्हणण्याची पाळी आली. संस्थानिकांची व इमारनदारांची आपल्या प्रत्यक्ष पूर्वजांसंबंधाने केवढी ही विस्मृती ! केवढा हा अपराध! ही भारतभूमी पितृपूजेविषयी प्रख्यात आहे. तीत प्रस्तुत काळी पितरांची अशी बोळवण व्हावी ना ? असो. राजे निजले आहेत, जहागीरदार डुलक्या घेत आहेत आणि इनामदार झोपा काढत आहेत. ते जागे होईपर्यंत, जागे झालेले मध्यम स्थितीतील जे आपण, त्यांनी राष्ट्राच्या या पितरांचे स्मरण कायम ठेवले पाहिजे. आपले सामर्थ्य अद्याप जुजबी आहे, तथापि या पुण्यकर्माप्रित्यर्थ ते खर्चले पाहिजे.''

राजवाडे यांचे पत्रे वगैरे प्रसिद्ध करण्याचे काम कै. विजापूरकर यांची ग्रंथमाला करीत होती. त्यांच्या मार्मिक व मुद्देसूद प्रस्तावना याच ग्रंथमालेतून प्रसिद्ध झाल्या व त्यांच्यावर वाचकांच्या उड्या पडत. विजापूरकर व राजवाडे दोघे एकमेकांना साहाय्य करते झाले. विजापूरकरांना राजवाड्यांचे कर्तृत्व कळले होते व त्यांच्या स्वभावाशी ते नीट जमवून घेत. परंतु पुढे विजापूरकर कैदेत गेले. त्यांची मासिके बुडाली; सरस्वतीमंदिर हे द्रव्याअभावी बंद पडले. पारसनीस यांचे इतिहास संग्रह चालले होते; परंतु राजवाडे व पारसनीस यांचे फारसे सख्य नसे. तेव्हा आपली टाचणे, टिपणे प्रसिद्ध करण्यास एखादे मंडळ काढावे, असे ठरले. संघटित प्रयत्न व्हावे असे त्यांच्या मनाने

घेतले. शके १८९७ मध्ये सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत आरंभी ही इतिहास संशोधक मंडळाची आवश्यकता प्रथम त्यांनी पुढे मांडली. नंतर राष्ट्रोदयात त्यांनी पुनरपि ही कल्पना जाहीर केली.

आपल्या कल्पनेचा नीट पुरस्कार केला जात नाही याचे त्यांना वाईट वाटले. एक दिवस रात्री पांढरी घोंगडी पांघरून व ढोपरापर्यंत लहानशी धाबळी नेसलेले असे राजवाडे सरदार तात्यासाहेब मेहेंदळे यांचेकडे आले व म्हणाले, "हे इतिहासाचे काम आता मरते; तेव्हा तुम्ही त्यांना काही द्रव्य खर्चता का व काही मेहनत करता का?" त्या दिवशी काही चर्चा झाली. खरे, पारसनीस, भावे, देव वगैरे संशोधन चालवीत होते. त्या वेळेस पुण्यास राजकारण व सामाजिक सुधारणा यांमुळे पक्षोपपक्षांची बजबजपुरी माजली होती. यामुळे या पंथहीन कामात कोणी लक्ष देईना. शेवटी या सर्व दिरंगाईस राजवाडे कंटाळले व ते मेहेंदळे यांना म्हणाले, "आता आपण दोघे मिळून सभा स्थापन झाल्याचे जाहीर करूया.' आपल्या दोघांचा एक विचार होण्यास इतके दिवस लागले तर सर्वांचा एकसूत्री विचार होण्यास किती काळ लागावा?'

गणेश व्यंकटेश जोशी, गणपतराव जोशी, मेहेंदळे, राजवाडे व नातू अशी पहिल्या वेळची, दिवशीची सभासद मंडळी. गुरुपुष्य नक्षत्र योग असा पवित्र दिवस पाहून मंडळ स्थापन झाले. त्या दिवशी 'कर्तरित्रय' हा निबंध राजवाडे यांनी वाचला. मंडळ स्थापन झाले. सभासदही वाढू लागले व मंडळाचे काम जोराने सुरू झाले. शके १८३५ मध्ये प्रथम संमेलन झाले व त्यात महत्त्वाचे ठराव पास करण्यात आले. या वेळचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध इतिहास संशोधक व प्रकाशक रा. ब. काशिनाथ नारायण साने यांना देण्यात आले होते. त्यांनी त्या काळपर्यंत झालेल्या सर्व संशोधनाचा आढावा घेतला व 'झालेले काम विस्कळित झाले; आता सुसंघटित काम करणे त्या मंडळातर्फे होईल ते स्पृहणीय आहे' म्हणून सांगितले.

या सभेत रा. देव यांनी वर्गणी जमवण्यासंबंधीचा ठराव मांडला. संशोधकांस द्रव्यसाहाय्य करण्यासाठी हे द्रव्य विनियोगात आणायचे होते. या ठरावावर राजवाडे यांनी पुढील भाषण केले. "रा. कीर्तने यांची बखरीवरील टीका प्रसिद्ध झाल्यावर विविधज्ञानविस्तारातून दोन बखरी प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर आपले सन्माननीय अध्यक्ष यांनी कोणापासूनही कसल्याही मदतीची अपेक्षा न करता ४०/४२ बखरी छापल्या. त्यानंतर मिरजेचे रा. खरे आले. त्यांनी आपले घरदार विकून पटवर्धनी दप्तर छापण्याचा स्तुत्य उद्योग सुरू केला. रा. ब. पारसनीस हे आपला संसार करून हे कार्य

करीत आहेत. मीही माझ्या मित्रांच्या मदतीने वर्षा-दोन वर्षांनी एखादा खंड काढतो. परंतु हे सर्व प्रयत्न सर्वांशी तुटक झाले व या कार्यात आम्हाला त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या अशा कोणाही मोठ्या मनुष्याचे अगर संस्थानिकाचे अगर इतर कोणाचे साहाय्य झाले नाही. आम्हा प्रत्येकास कागदपत्र हुडकून काढण्यापासून तो पुस्तके विकून वसूल करीपर्यंत सर्व विवंचना कराव्या लागल्या आहेत. यामुळे वेळेचा कितीतरी अपव्यय होतो व प्रगती तर अषत मंदगतिने होते. तेव्हा आपला झाला परंतु आपल्या पाठीमागून जे गृहस्थ हे कार्य करायला प्रवृत्त होतील, त्यांच्या कालाचा अपव्यय होऊन आयुष्य फुकट जाऊ नये व कार्य तर त्वरित व्हावे अशासाठी काय योजना निर्माण करावी या विवंचनेत मी असताना माझी व मेहेंदळे यांची गाठ पडली व चमत्कार असा की, त्यांनीच होऊन मला विचारले की, संघटित स्वरूपाचे काम करण्यासारखी एखादी संस्था निर्माण करता येईल का ? वस्तुत: हे इतिहासाचे काम पूर्वीच्या इतिहासप्रसिद्ध लोकांच्या वंशजांचे आहे. हे एक प्रकारचे पितृकार्य आहे; व ते करायला त्यांच्यातीलच एक मनुष्य तयार झाल्याचे पाहून मला आनंद झाला. अशा रीतीने आम्हा उभयतांच्या विचाराने व आपले पहिले अध्यक्ष रा. ब. गणपतराव जोशी व आपले सध्याचे सन्माननीय अध्यक्ष यांच्या प्रोत्साहनाने सदरहू संस्था स्थापन झाली. रा. ब. रानडे यांनी अनेक संस्था निर्माण केल्या. परंतु त्यांनी आपल्या मंडळासारखी संस्था निर्माण केली नाही हे खरोखरीच आपले, आपल्या देशाचे दुर्दैव होय. अशी जर एखादी संस्था त्यावेळी निर्माण झाली असती व जर अशा संस्थेच्या कृपेच्या छत्राखाली माझ्यासारख्याला काम करायला मिळून जितके जरूर तितके स्वास्थ्य असते, तर आपल्याला अतिशयोक्ती वाटेल म्हणून सहस्रपट म्हणत नाहीत, पण शतपट काम मी सहज उरकले असते. यद्यपि आपण आजवर केलेले काम अति अल्प आहे, तरी संशोधकांनी आपली जबाबदारी ओळखून सुव्यवस्थितपणे काम केले, तर आपण खचित हे कार्य लवकरच चांगल्या नावारूपास आणू. यद्यपि माझी प्राप्ती अति अल्प आहे, वस्तुत: काही नाही म्हटले तरी चालेल; परंतु माझ्या बंधूंच्या कृपेने मला जो अल्पस्वल्प पैसा मिळतो, त्यातून माझ्या पाठीमागून होणाऱ्या संशोधकांचा मार्ग सुलभ व्हावा म्हणून मी सालीना २५ रुपये या कार्यास देतो.' याच संमेलनासमोर राजवाडे यांनी आणखी एक ठराव मांडला. ''भारतेतिहास, भारतीय अर्थशास्त्र, भारतीय राजधर्मशास्त्र, भारतीय भाषाशास्त्र वगैरेंच्या अध्ययन-अध्यापनाची व्यवस्था भरतखंडात, तेथील विश्वविद्यालयादी संस्थांच्याद्वारा होणे अत्यावश्यक

आहे असे या मंडळाचे मत आहे व या आशयाची सूचनापत्रे, विनंतीपत्रे वगैरे निरनिराळ्या विद्यमान नामांकित शिक्षणसंस्थांकडे पाठवावी.''

रा. मेहेंदळे यांनी या प्रसंगी राजवाडे यांच्या हातून मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण व्हावे असे सुचविले व म्हणाले, ''ते छापून काढण्याची जबाबदारी मी आपल्या एकट्याच्या शिरावर घेतो.' या गोष्टीला राजवाडे यांनी जवळजवळ संमती दिली होती. मराठ्यांचा इतिहासही राजवाडे यांनी लिहावा, मी तो छापण्याची जबाबदारी घेतो असे पुनरपि त्यांनी सुचवले. तेव्हा राजवाडे म्हणाले, ''पेशवाईचा इतिहास लिहिण्याजोगी सामग्री आता खरोखरीच झाली आहे. तरी माझ्यापेक्षा दुसऱ्या कोणीतरी हे काम करावे. विद्यापीठातून शिकवणाऱ्या विद्वान लोकांनी आता आळस झाडून सर्व इतर अडचणींना न जुमानता हे काम अवश्य करावे; असले प्रयत्न दहा-बारा निरनिराळे झाले, तरी दृष्टिभेदामुळे इष्टच असल्याचे सांगून या बाबतीत सक्ती न करता खुशीवरच सोपविणे बरे.''

अशा प्रकारे हे पहिले संमेलन पार पडले. भारत इतिहास संशोधक मंडळाची इतिवृत्ते प्रसिद्ध होऊ लागली. सभासद वाढू लागले. १८३९ सालापर्यंत मंडळाचे काम जोराने चालले. राजवाडे कोठेही असले तरी पदरचे पैसे खर्चून मंडळाच्या सभांना होता होईतो हजर राहात. कित्येक दिवस मंडळाच्या अपत्याप्रमाणे त्यांनी संगोपन केले; परंतु शके १८३९ नंतर त्यांचे मन या संस्थेवरून उठले व त्यांनी आपला तिऱ्हाईतपणा पुन्हा पत्करला. पुढे धुळे येथे जी सत्कार्योत्तेजक सभा स्थापन झाली होती, त्या बाजूस ते जास्त रमू लागले. तेथील 'प्रभात' मासिकात त्यांनी लेख लिहिले. नंतर अमळनेर येथेही एक इतिहास संशोधक मंडळ स्थापन करण्यात आले. अमळनेर येथे त्या वेळेस प्रो. भानू हे होते. अमळनेरचे सुप्रसिध्द वकील विष्णू काशिनाथ भागवत यांचा उत्साह या बाबतीत फार! राजवाडे येथील सभांना नेहमी येत व काही उद्‌बोधक निबंध, टाचणे वगैरे वाचीत. पुढे हे अंमळनेरचे मंडळ बंद पडले. पुण्याचे मंडळ मात्र आता मोडण्याच्या भीतीच्या पलीकडे गेले आहे. स्वतःची सुंदर इमारतही मंडळाने आता बांधली आहे व राजवाडे यांनी ती आपल्या हयातीत पाहिलीही होती.

पुण्याला जी ही इतिहाससंशोधक संस्था स्थापन झाली, तिच्या कार्याची रूपरेखा ठ रविण्यात आली होती. १) सर्व पक्षांच्या लोकांना मंडळ खुले असावे. २) मंडळात जे बोलणे अगदी लिहिणे ते लेखी असावे. ३) Fact finding वर भर

असावा. मतप्रकाशन त्या वेळेस बाजूला ठेवून दिले होते. मंडळात मनमिळाऊ माणसे सामील झाल्यामुळे जहाल, मवाळ उभय पक्षांतील मंडळीही या संस्थेच्या वाढीस हातभार लावत.

इतिहाससाधने प्रसिद्ध करण्यासाठी अशी आटाआटी या महापुरुषाने केली. सतत श्रम करून बावीस पत्रखंड त्यांनी छापले व काही भागास सागराप्रमाणे गंभीर व भारदस्त प्रस्तावना लिहिल्या. या पत्रखंडांशिवाय महिकावतीची बखर, राधामाधवविलासचंपू या दोहोंचा या इतिहास शोधनातच समावेश करणे इष्ट आहे. महिकावतीची बखर यास त्यांची फारच गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश पाडणारी प्रस्तावना आहे. गुजरात, कोकण वगैरेंचा इतिहास, रामदेवराव जाधव यांच्या पूर्वीच्या व तदुत्तर इतिहास यासंबंधी राजकीय सामाजिक विवेचन या प्रस्तावनेत आले आहे. राधामाधवविलासचंपूची प्रस्तावना म्हणजे फारच मोठे काम आहे. महाराष्ट्रभूषण शहाजीच्या कर्तबगारीचे सुंदर व भव्य चित्र येथे राजवाडे यांनी रेखाटले आहे. शहाजीच्या पराक्रमाचे पवाडे वाचताना मनास आनंद होतो. लढायांची वर्णने वाचताना तन्मयता होते. 'पाखरांच्या पाखांवर पावसाळ्यात जेथे शेवाळ उगवते' असे सुंदर वर्णन वाचून सार्थकता वाटते. मराठ्यांच्या गुणदोषांची चर्चा येथेही आहे. पहिल्या १२५ पानांत शहाजीसंबंधी, रामदासांसंबंधी वगैरे सूक्ष्म व गंभीर चर्चा आहे. पुढे पाणिनीय कालापासून शहाजी कालापर्यंतच्या भारतीय क्षात्रांचा परंपस्ती इतिहास देण्याची प्रतिज्ञा करून तत्सिध्यर्थ उरलेली ७० पाने खर्ची घातली आहेत. याचे परीक्षण करणे म्हणजे प्रतिराजवाडे – दुसरे गाढे पंडित पाहिजेत. आम्ही नुसता उल्लेख करणे हेच योग्य.

राजवाडे यांच्या या इतिहासविषयक कामगिरीचा हा इतिहास. याशिवाय इतिहासासंबंधी शेकडों टाचणे, टिपणे मंडळाच्या इतिवृत्तांतून प्रसिद्ध झालेली जमेस धरली, म्हणजे केवढे प्रचंड कार्य या थोर पुरुषाने केले हे दिसून येईल. या प्रस्तावनेतून जे मननीय विचार त्यांनी प्रगट केले आहेत ते स्वतः वाचावे. आम्ही पुढे त्यांची मते वगैरे सांगताना थोडाफार त्यांचा उल्लेख करू. ऐतिहासिक काम पाहिल्यानंतर आपण त्यांच्या भाषाविषयक कामगिरीकडे वळू.

✦✦✦

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

भाषाविषयक कामगिरी

साहित्यशोधक या नात्याने राजवाडे यांनी जे केले, ते फार लोकोत्तर आहे यात वाद नाही. परंतु ज्ञानकोशकार म्हणतात, 'राजवाड्यांची भाषाशास्त्रविषयक कामगिरी लक्षात घेतली, तर त्याच्यापुढे अनेक मोठमोठ्या अभ्यासकांचे प्रयत्न फिके पडतील. राजवाड्यांच्या अनेक कामगिऱ्यांपैकी सर्वात अधिक मोठी कोणती ते ठरवून राजवाड्यांचे वर्णन करायचे झाले तर त्यांस भाषाशास्त्रज्ञ म्हणावे लागेल आणि त्यांची गणना अत्यंत मोठ्या वैय्याकरणांत करावी लागेल. हेमचंद्र आणि वररुचि यांचे प्रयत्न राजवाड्यांच्या प्रयत्नांच्या दृष्टीने काहीच नाहीत. इतिहासाचार्य किंवा इतिहासंशोधक हे नाव राजवाड्यांना देण्यात आपण त्यांच्या कार्याचे अज्ञान दाखवू. त्यांच्या बौध्दिक कार्याने गुरु-लघुत्व माझ्या मते १ भाषाशास्त्र हा, २ वैय्याकरण, ३ शब्दसंग्राहक व ४ इतिहास संशोधक या अनुक्रमाने आहे.''

ज्ञानकोशकारांनी केलेले हे गुरु-लघुत्व कोणाही विचारवंत माणसास पटण्यासारखेच आहे. राजवाडे यांची बुद्धी स्वभावत:च संशोधनप्रवण. इतिहासाच्या संशोधनाने त्यांची ही बुद्धी कमावली जाऊन विशाल व प्रगल्भ झाली. इतिहास-संशोधन संकुचित काम संपवून शब्दांची परंपरा व इतिहास हे शोधण्याकडे वळले. अफाट अशा वाणीच्या क्षेत्रात त्यांची बुद्धी संचार करू लागली.

आपल्याकडे मराठीकडे प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ म्हणून प्रथम भांडारकर डोळ्यांसमोर येतात. त्यांची १८७७ साली व्याख्याने झाली. निरनिराळे विभक्ती-प्रत्यय यांच्या उत्पत्तीसंबंधी यांत पुष्कळ संशोधन आहे. भाषाशास्त्राचा मराठीत हा पहिला

भरभक्कम पाया राजारामशास्त्री या पुरुषाने घातला. या विद्वान व नवमत पुरस्कारक पुरुषाने भाषेसंबंधी अनेक लेख लिहिले. विशेषत: वेदांतील निरनिराळ्या शब्दांचे अर्थ करण्यासंबंधीचे यांचे इंग्रजी व मराठी लेख आहेत. महादेव मोरेश्वर कुंटे हेही प्रसिद्ध व्युत्पन्न. राजवाडे यांनी भांडारकरांपासून शिलालेख-शोधन आणि भाषाशास्त्र ही घेतली. कुंट्यांपासून पुराण वस्तुनिरीक्षण, तुलनात्मक अभ्यास, संस्कृतबद्दलची आवड वगैरे गोष्टी उचलल्या. जुन्याकडे नव्या दृष्टीने पाहणे, पुराणातील भाकडकथांचे अवगुंठन काढून आतील ऐतिहासिक सत्य संशोधणे व आपली मते स्पष्टपणे व निर्भीडपणे मांडणे हे राजारामशास्त्री भागवतांचे काम राजवाडे यांनी उचलले. भाषेसंबंधीचे सर्व विचार व प्रमेये, आठव्या खंडाची प्रस्तावना, ज्ञानेश्वरी, तिचा नववा अध्याय व व्याकरण, सुवंत विचार व निगंत विचार, गुणवृद्धी, कारप्रत्यय, संस्कृत भाषेचा उलगडा, राधामाधवविलासचंपू या ग्रंथात प्रसिद्ध झालेली आहेत.

भाषाशास्त्रात अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव होतो; ध्वनिप्रक्रिया, वर्णनप्रक्रिया, प्रत्यय चिकित्सा, अर्थप्रक्रियांचे काही विवेचन, संस्कृत भाषेचा उलगडा व वृद्धीचा निबंध यात त्यांनी केले आहे. यासंबंधी जास्त विवेचन व विवरण ते जो नवीन धातुपाठ तयार करीत होते, त्यात येणार होते. ‘आचार्य पाणिनीने वृद्धिरादैव असे सूत्र बांधून वृद्धीचा चमत्कार फक्त नमूद केला; पण त्याची उपपत्ती राहिली. अ, इ, उ, ऋ यांचे आ, ऐ, औ, आ इत्यादी उच्चार होण्याची कारणपरंपरा उच्चार करताना मुखातील स्नायूंच्या होणाऱ्या हालचाली, स्वरोच्चाराच्या ऐतिहासिक स्वरूपासंबंधीची अनुमाने इत्यादी मुद्द्यांचा विचार ‘वृद्धी’ या निबंधात करून त्यांनी प्रक्रिया विशद केली आहे. नाम-सर्वनामांच्या विभक्ती साधनिकेत विकल्पाने सापडणाऱ्या रूपांचा ऐतिहासिक अर्थ काय असे हे पाश्चात्त्यांतही गूढ होते. पाश्चात्त्यांना शब्दांच्या मूळ रूपाशी जाता आले नाही. अहम्, त्वम् इत्यादी. सर्वनामे भाषेची आद्य प्रतीके असावीत असा तर्क मोक्षमुलरने केला; पण त्यांची उपपत्ती व पूर्व स्वरूपे त्यांना देता आली नाहीत. राजवाडे यांना ‘संस्कृत भाषेचा उलगडा’ हा निबंध खरे पाहिले, तर फारच गहन आहे. राजवाडे भाषेसंबंधी हे सिद्धांत मनात रचत होते. त्याच सुमारास दामले यांचे मराठी भाषेचे शास्त्रीय व्याकरण हा बडा ९०० पानांचा ग्रंथ बाहेर पडला. त्या ग्रंथांचे परीक्षण म्हणून राजवाड्यांनी हे आपले भाषेसंबंधीचे काही सिद्धांत प्रसिद्ध केले. त्यांचे परीक्षण करून त्यांची शहानिशा करणे हे काम महाराष्ट्रात चिंतामणराव वैद्यांशिवाय कोणालाही झाले नाही.

जुनी ज्ञानेश्वरीची प्रत सापडल्यानंतर राजवाडे यांना अभूतपूर्व आनंद वाटला. या ज्ञानेश्वरीस १०० पानांची त्यांनी प्रस्तावना जोडली आहे. पुढे ज्ञानेश्वरीचे व्याकरण हा महत्त्वाचा ग्रंथ त्यांनी केला. मराठीतील पहिले ऐतिहासिक असे व्याकरण हेच होय. ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाने विद्वानांत फार खळबळ उडाली. लोकमान्यांनी केसरीत अग्रलेख लिहून व वैद्यांची परीक्षणात्मक लेखमाला प्रसिध्द करून या ग्रंथाचा गौरव केला. चिंतामणराव वैद्य यांनी या ग्रंथाचे नीट परीक्षण केले. पाणिनी, पतंजली, भर्तृहरी, वामन यांची परंपरा राजवाडे यांनी बुडू दिली नाही. ग्रंथ शुद्ध व शास्त्रीय स्वरूपाचा आहे. ज्ञानेश्वरीचे व्याकरण रचल्यानंतर ते दुसऱ्या महत्त्वाच्या कामास लागले. ते म्हणजे मराठी भाषेचा धातुपाठ हे होय. जवळजवळ तीस हजार धातू त्यांनी गोळा केले व त्यांची प्रक्रिया, व्युत्पत्ती वगैरे उलगडण्याचा त्यांनी जंगी खटाटोप केला. या धातुकोशाची हजार पाने होऊन त्याला पाचशे पानांची भलीमोठी विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनाही जोडण्यात येणार होती. या धातूंचा पहिला कच्चा खर्डा १९२० साली त्यांनी तयार केला होता. परंतु आता या सर्व गोष्टी तशाच राहिल्या. त्यांच्या हातून हे काम झाले असते तर मराठीस केवढा अपूर्व लाभ झाला असता ! इतर सर्व भाषांकडे या एकाच अभिनव गोष्टीने, तुच्छतेने पाहण्यास मराठीस सामर्थ्य आले असते. परंतु दैवदुर्विलास महाराष्ट्राचा दुसरे काय ?

भाषेचा व भाषेतील शब्दांचा अभ्यास त्यांना फार आवडे. अलीकडे पाच-दहा वर्षे कागदी साधनांचा त्यांनी नाद सोडून दिला होता व नैसक्तिक साधनांचाच, या भाषाविषयक साधनसामग्रीचाच इतिहासाच्या कामी ते उपयोग करून घेऊ लागले होते. वेदपूर्व कालापासून तो तहत सदय: कालापर्यंतची सर्व संस्कृत-प्राकृत भाषांची स्वरूपे ते पाहात चालले व शब्दांची कुळकथा, इतिहास ते जमवीत चालले. प्राचीन शब्दसाधनांची फोड करून त्यातील अनेक सुप्तज्ञान संग्रह ते बाहेर काढीत होते. शेकडो हजारो शब्दांच्या व्युत्पत्त्या ते बनवीत चालले व हे शब्दांतील इतिहास बाहेर काढण्याचे काम त्यांना मनापासून आवडू लागले. या कामात त्यांना जुन्या ज्ञानेश्वरीचे फार महत्त्व वाटे. ज्ञानेश्वरीत अनेक रूपे-शब्दांची परंपरा कशी आलेली आहेत, क्रियापदांची संपत्ती व शब्दसंपत्ती ज्ञानेश्वरीत कशी विपुल आहे हे दाखविण्यास त्यांना विशेष आवेश चढे. सांगू लागले म्हणजे भराभरा ज्ञानेश्वरीतील ओव्या व शब्द त्यांच्या जिव्हाग्री नाचू लागत. व्युत्पत्तिशास्त्र त्यांच्या हातचा मळ होऊन बसले. हजार हजार शब्दांच्या व्युत्पत्त्या त्यांनी निरनिराळ्या भा. इ. सं. मंडळाच्या इतिवृत्तातून व

अन्यत्र प्रसिद्ध केल्या आहेत. हे सर्व एकत्र छापणे अगत्याचे आहे. मग त्या सर्व व्युत्पत्त्यांचा परामर्ष घेणारा कोणी प्रतिमल्ल कधी निर्माण होईल तो होवो.

या भाषाशास्त्र विषयासंबंधी त्यांचे जे अनेक निबंधप्रबंध आहेत, त्यात 'विचार व विकार प्रदर्शनाच्या साधनाची इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांती' हा निबंध केवळ लोकोत्तर आहे. मानव-वाणीचा विकास कसकसा होत गेला व तिची उत्क्रांती कशा क्रमाने व कोणत्या स्वरूपात झाली' हे गहन भाषा-तत्त्वज्ञान त्यांनी येथे दाखवले आहे. या अति गहन विषयाचे पापुद्रे आपल्या कुशल व कुशाग्र बुद्धीच्या योगे त्यांनी सोडवून दाखविले आहेत. हा निबंध मला वाचायला मिळाला आहे. त्यांच्यासंबंधी जे इतरांनी लिहिले, ते मी वर दिले आहे.

भाषाशास्त्रविषयक या गोष्टी सांगण्याचे वेळीच मानभावी किंवा महानुभावी पंथाच्या गुप्त भाषेचा जो उलगडा त्यांनी केला याचाही उल्लेख अवश्यमेव केला पाहिजे. राजवाडे यांची बुद्धी संशोधनात सुख मानणारी होती. निरनिराळ्या ठिकाणचे शिलालेख, ताम्रपट यातील उलगडे त्यांनी केले आहेत व त्यांनी ज्ञानात भर घातली आहे. परंतु ही महानुभाव पंथाची गुप्त भाषा उलगडून त्यांनी मोठी कामगिरी केली. महानुभावी पंथाचे वाङ्मय ज्ञानेश्वरांच्याही पूर्वीपासूनचे आहे. परंतु हे सर्व ग्रंथ गुप्त संकेतात लिहिलेले असत. 'क' बद्दल दुसरेच एक अक्षर लिहायचे; आकड्यांचेही असेच. यामुळे यांचे ग्रंथ सर्वसाधारण मराठी भाषाज्ञांना अज्ञात राहिले. प्रख्यात कादंबरीकार हरी नारायण आपटे यांच्या आनंदाश्रम छापखान्यात महानुभावी पंथाचा 'लीलासंवाद' म्हणून एक ग्रंथ होता. त्याचा काही एक अर्थ या गुप्त सांकेतिक भाषेमुळे लागत नसे. म्हणून तो ग्रंथ शास्त्रीपंडितांनी तसाच बाजूस ठेवून दिला होता. शेवटी तो ग्रंथ हरिभाऊंनी राजवाडे यांच्या स्वाधीन केला. हा ग्रंथ ज्या संकेतांनी लिहिला, तो संकेत तेरा दिवस सतत एकाग्रतेने खटपट करून राजवाडे यांनी उलगडून दाखवला व सर्व परिभाषा बसवली. कोणत्या अक्षराबद्दल कोणते अक्षर हे सर्व नीट स्पष्ट केले. महानुभावी महंत या वार्तेने चकित झाले. डॉ. भांडारकर यांनी राजवाडे यांचे फार कौतुक केले. महानुभावीपंथाची अशी किल्ली सापडल्यामुळे ते वाङ्मय आता मराठीत येण्यास मोकळीक झाली. हे वाङ्मय श्रीमंत आहे. अनेक गद्यपद्य ग्रंथ, कोश, व्याकरणे वगैरे यात आहेत. ही ग्रंथसंपत्ती जवळजवळ सहा हजार आहे. 'मराठी भाषेतील एक अज्ञान दालन' हा कै. भावे महाराष्ट्र सारस्वतकार यांचा निबंध व महानुभावी वाङ्मयांचा इतिहास हे वऱ्हाडातील देशपांडे यांचे पुस्तक ही दोन वाचली

म्हणजे मराठीस या महानुभावी वाङ्मयामुळे केवढा लाभ झाला आहे, याची कल्पना येईल.

राजवाडे यांनी कितीतरी काव्ये, कितीतरी बायकांच्या वगैरे प्रचारात म्हणण्यात येणारी गाणी प्रसिद्ध केली व त्यातून सामाजिक इतिहासाचा जो कण सापडला, तो पुढे ठेवला. भारत इ. सं. मंडळाची इतिवृत्ते चाळीत बसले म्हणजे ही मौजेची गाणी व इतर गोष्टी वाचून मनास करमणूक होते व ज्ञानही मिळते. बारीकसारीक गोष्टींकडेही त्यांचे लक्ष असे. दासोपंतांचे काव्य जेव्हा छापून निघू लागले, तेव्हा जुन्या पोथ्यांत अनुनासिक पोकळ टिंबाने व अनुस्वार भरीव टिंबाने दाखवित ही गोष्ट त्यांनीच दिग्दर्शित केली.

एकंदरीत राजवाडे महान वैय्याकरणी, प्रचंड शब्दसंग्राहक होते. या कामास त्यांच्यासारखा प्रतिभावान प्रज्ञावंत व अनंत श्रमांचा पुरुष पुनरपि केव्हा लाभेल कोणास माहीत ? भाषाविषयक त्यांच्या या कामगिरीस तोड नाही.

✦✦✦

समाजशास्त्रविषयक व इतर निबंध

इतिहास-शास्त्रविवेचक व इतिहास-संशोधक, महान व्याकरणशास्त्रज्ञ आणि शब्दसंग्राहक, त्याप्रमाणेच राजवाडे हे समाजशास्त्रज्ञही होते. महाराष्ट्रात समाजशास्त्रात अभ्यास करणारे जवळजवळ फारसे कोणी पंडित झाले नाहीत. राजवाडे यांच्यापूर्वी या शास्त्रास महाराष्ट्रात प्रथम हात घालणारा विद्वान पुरुष म्हणजे राजारामशास्त्री हे होत. हे स्पष्टवक्ते अतएव विक्षिप्त म्हणून गाजले. स्वतंत्र विचारांचे व स्वतंत्र प्रतिभेचे असे हे पुरुष होते. राजारामशास्त्र्यांचे काम राजवाडे यांनी पुढे चालवले.

समाजशास्त्र हे मानवशास्त्रात अंतर्भूत होणाऱ्या अनेक शास्त्रांपैकी एक शास्त्र आहे. भाषाशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीरशास्त्र, समाजशास्त्र वगैरे गोष्टींचा अंतर्भाव मानवशास्त्रात होतो. अशा या अनेक शास्त्रांत वाहिलेले लोक आपल्याकडे नाहीत. राजवाडे यांनी या शास्त्रांचा अभ्यास केला होता; व भाषाशास्त्र आणि मस्तिष्कशास्त्र यांच्या साहाय्याने ते यात सिद्धांत मांडू पाहात असत.

हिंदू समाजात हिद्वितरांचा प्रवेश, भारतीय विवाहपद्धती, चातुर्वर्ण्य, चित्पावनांचा इतिहास वगैरे त्यांचे लेख समाजशास्त्रविषयक विवेचनाने भरलेले आहेत. चातुर्वर्ण्यांच्या उत्कर्षा-अपकर्षासंबंधीचे त्यांचे विवेचन मार्मिक व अभ्यासनीय आहे. असिरिया व असुर लोक यासंबंधी पण अलीकडे ते जास्त विवेचन करण्याच्या विचारात होते. ग्राम नावाचा अभ्यास करून त्यावरून महाराष्ट्रीय वसाहतकालाची निश्चिती करायची, असे त्यांचे मनात होते. त्याप्रमाणेच सर्व

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आडनावांची यादी करून त्यांच्या विभागणीने महाराष्ट्राच्या वसाहतीच्या स्वरूपावर काही प्रकाश पडतो की काय हे त्यांना पाहायचे होते. यासाठी ते प्रयत्न करू लागले होते व निरनिराळ्या क्षेत्री जाऊन तेथील बडवे, पंड्ये यांच्या वह्या तपासण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला होता. मध्ये मध्ये त्यांना हे तर वेडच लागले होते. अमळनेरची त्यांची गोष्ट सांगतात की बाहेर ओट्यावर बसून येणाऱ्या जाणाऱ्यांस आडनाव, गोत्र वगैरे विचारून ते टिपून घेत. या मिळालेल्या माहितीवरून त्यांनी महाराष्ट्र वसाहतीचा इतिहासकाल हा निबंध प्रसिद्ध केला आहे; व त्यापेक्षा व्यापक ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा उद्देश होता.

समाजशास्त्राचा अभ्यास करताना अनेक गोष्टी जनमनास न आवडणाऱ्या लिहाव्या लागतात. प्राचीन विवाहपद्धत हा चित्रमय जगतमध्ये प्रसिद्ध झालेला त्यांचा लेख पाहून पुष्कळ जुन्या लोकांना वाईट वाटले. प्राचीन संस्कृतीचा अभ्यास करून भाऊ–बहिणीजवळ विवाह करीत असलीच तत्त्वरत्ने बाहेर काढायची असतील तर तो अभ्यास न करणे बरे असे उद्‌गार मी पुष्कळांच्या तोंडून त्या वेळी ऐकले होते. महाराष्ट्रीय समाजात नाग समाजाचे बरेच मिश्रण आहे वगैरेही त्यांची मते असेच वरवर पाहणाऱ्यास कशीशीच वाटतात आणि समाजशास्त्र मानवशास्त्र इत्यादिकांचा काही अभ्यास न केलेले बेजबाबदार लोकही बारीक सारीक लेखांत राजवाडे यांच्या मतावर हल्ले करतात. राजवाडे यांचे सिद्धांत चुकले असतील; पाली हा शब्द ‘प्रकट’ पासून आला असावा हा त्यांचा सिद्धांत किंवा नागसंस्कृती महाराष्ट्रात आली वगैरे सिद्धांत चुकीचेही ठरतील. परंतु अभ्यासू लोकांनी त्यांच्यावर टीका लिहिली तर शोभेल तरी वाटेल त्याने एकट्या मताच्या अभिनिवेशाने त्यांच्यावर तुटून पडणे हे चांगले नाही. राधामाधवविलासचंपू, महिकवितीच्या बखरीची प्रस्तावना वगैरे मध्येही त्यांनी समाजविषयक निरनिराळ्या अंगांची चर्चा थोडीबहुत केली आहे.

राजवाडे यांचे इतर विविध विषयांवरही फार सुंदर निबंध आहेत. वाङ्मयविषयक, तात्त्विक विवेचनात्मक, टीका–प्रतिटीकात्मक, राजकारणविषयक व इतर असे त्यांचे पाच भाग पाडावे. वाङ्मयविषयक निबंधात, कादंबरी वगैरे साहित्यसंमेलन, पुण्यातील शारदोपासक मंडळाच्या अध्यक्षपदावरून केलेले संभाषण हे महत्त्वाचे निबंध आहेत. कादंबरी या निबंधात त्यांनी कादंबरीचा आजपर्यंतचा इतिहास सांगितला. जगातील उत्कृष्ट कादंबरीकाराकडे वळले आहेत. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे व शेवटी

(faint show-through library stamp)

कादंबरीग्रंथ निर्माण व्हायला कोणत्या साहित्याची आवश्यकता आहे हे त्यांनी सांगितले आहे. ते लिहितात, ''आता ह्युंगो, झालो, टॉलस्टॉय यांच्यासारखी ग्रंथरचना व्हावी अशी इच्छा असेल तर त्याला एकच उपाय आहे. यांच्यासारखी मने ह्या देशातील कादंबरीकारांची बनली पाहिजेत. विधवांची दुःखे पाहून जीव तिळतिळ तुटला पाहिजे. गरिबांची उपासमार पाहून स्वतःच्या घशाखाली घास उतरता कामा नये. स्वदेशाचे दैन्य पाहून रात्रीची झोप डोळ्यांवरून उडून जावी. स्त्रियांची बेअब्रू झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणे त्वेष यावा. ही मनोवृत्ती ज्यांची झाली, त्या ब्रह्मानंदी ज्यांची टाळी लागली त्यांनीच कप्तान ट्रेफूसची बाजू घेऊन सर्व राष्ट्राविरुध्द भांडावे व रशियातील पातशहांनाही चळचळ कापायला लावावे. इतरांची माय ही कामे करणाऱ्या कादंबरीकारांना व्याली नाही ! तेव्हा उत्तमोत्तम कादंबरीकार व्हायचे म्हणजे मनोवृत्ती अशी अत्यंत जाज्ज्वल पाहिजे. श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहानुभूती व नाटकी लेखणी हे गुण तर नाव घेण्यासारख्या कादंबरीकारात हवेतच. परंतु सर्वात मुख्य गुण म्हटला म्हणजे जाज्ज्वल्य मनोवृत्ती हवी. तिच्या अभावी वरील सर्व गुण व्यर्थ होत. ही मनोवृत्ती कृत्रिम तऱ्हेने येत नाही. ही ईश्वराची देणगी आहे. उत्तेजक मंडळांच्या बक्षिसांनी किंवा प्रोत्साहक सोसायट्यांच्या देणग्यांनी रद्दड कविता, रद्दड कादंबऱ्या, रद्दड नाटके, रद्दड चरित्रे, अशी सर्व रद्दड ग्रंथप्रजा उत्पन्न होईल. तेजस्वी ग्रंथसंपत्ती निर्माण व्हायला जाज्ज्वल्य अशा प्रखर मनोवृत्तीचा-जातीचा अंकुर पाहिजे.'' अशा उद्बोधक शब्दांनी या विस्तृत निबंधाचा शेवट केला होता.

कादंबरी हा निबंध जर वाङ्मयसंबंधीच्या लेखात उत्कृष्ट आहे, तर तात्त्विक, विवेचनात्मक लेखात 'रामदास' हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. 'रामदास' या निबंधाने महाराष्ट्रात रामदासांसंबंधीच्या विचारात क्रांती घडून आली. समर्थ व इतर संत यातील फरक दाखवून राजकारण व धर्म यांचे परस्परसंबंध कशा स्वरूपाचे पाहिजेत, हे समर्थांच्या ग्रंथातील उताऱ्यांनी सिद्ध करून, पाश्चात्त्य राजकारणविषयक तत्त्वज्ञानापेक्षा समर्थांची दृष्टी किती खोल होती, हे राजवाडे यांनी दाखवून दिले आहे. 'रामदास' या निबंधाने समर्थांचे विचारसामर्थ्य महाराष्ट्रास कळू लागले. देवप्रभृती धुळे येथील लोकांना समर्थकालीन वाङ्मय संशोधण्यास स्फूर्ती आली व सत्कार्योत्तेजक मंडळ स्थापन झाले. राजवाडे यांची बुद्धी किती खोल असते, ते या निबंधात उत्कृष्टपणे दिसून येते.

टीका-प्रतिटीकात्मक लेखात किंकेडच्या ग्रंथावरील लेख केसरीतील बाजीराव व मद्यपान यासंबंधी वाद, ज्ञानेश्वरीवाद वगैरे लेख आहेत. राजकारणविषयक लेखांत सुरतेची राष्ट्रीय सभा, गोखल्यांची इंग्लंडमधील कामगिरी, स्वदेशी, वेदोक्ते, बडोदे राज्यातील सुधारणा, संबंधट्वालन मीमांसा, महाराष्ट्रातील गेल्या ७५ वर्षांतील कर्त्या पुरुषांची मोजदाद हे लेख महत्त्वाचे आहेत. हा शेवटचा निबंध फार महत्त्वाचा आहे. त्यावरून आपल्या समाजाची नीट कल्पना येते. याच निबंधात तात्या टोपे, नानासाहेब बंडवाले यांना पहिल्या दर्जाचे देशभक्त असे राजवाड्यांनी गौरवले आहे. 'लोकशिक्षण' या मासिकात हा लेख प्रसिद्ध झाला होता. 'गोखल्यांची इंग्लंडमधील कामगिरी,' हा लेख विश्ववृत्त यात प्रसिध्द झाला व तोही मला फार आवडला. राष्ट्रींय पुढाऱ्यांना सर्व जनतेचा पाठिंबा असल्याशिवाय त्यांच्या म्हणण्यास जोर येत नाही. आपल्या देशांतील लोक पुढाऱ्यांना फसविणारे व कृतघ्न कसे आहेत, त्यांच्यात निष्ठा नसून ते लोचट कसे आहेत वगैरे मुद्देसूद विवेचन राजवाडे यांनी यात केले आहे.

इतर संकीर्ण लेखांत अत्यंत प्रामुख्याने ज्याचा निर्देश केला पाहिजे असा लेख म्हणजे 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील स्वानुभव' हा त्यांचा आत्मचरित्रपर लेख होय.

राजवाडे यांची मनोरचना कशी तयार झाली, त्यांच्या मनावर व बुद्धीवर कोणत्या गोष्टींचे संस्कार झाले, हे समजण्यास हा लेख फार महत्त्वाचा आहे. तत्कालीन शाळा, कॉलेजे, अध्यापक वर्ग वगैरेंची पण कल्पना आपल्याला येते. या संकीर्ण निबंधात तत्कालीन म्हणजे गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस-तीस वर्षांची थोडीफार स्थिती समजून येते. शिवकालीन समाजरचना हा केसरीमधील निबंध असाच सुरेख आहे. इतिहास व ऐतिहासिक यामधील इतिहास संशोधनाचा आढावा घेणारा त्यांचा लेख-त्यातील दप्तरे व संशोधनाच्या कार्यातील कष्ट व हाल यांचे विवेचन वाचण्यासारखे आहे.

भारत इतिहास-संशोधक मंडळाच्या अहवालांतून बारीकसारीक गोष्टींवर लहान-मोठे शेकडो निबंध, टाचणे, टिपणे त्यांनी प्रसिद्ध केली आहेत. त्यांचे हे लेख ग्रंथमाला, विश्ववृत्त, लोकशिक्षण, सरस्वतीमंदिर, राष्ट्रोदय, इतिहास व ऐतिहासिक, रामदास व रामदासी, विद्यासेवक, चित्रमय जगत्, प्रभात, प्राचीप्रभा, भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल - शिवाय ज्ञानप्रकाश, केसरी, समर्थ वगैरे वृत्तपत्रे यातून

प्रसिद्ध झालेले आहेत. ग्रंथमालेतील त्यांचे काही लेख 'संकीर्ण लेख' या नावाने स्वतंत्र खंडांत प्रसिद्ध झाले आहेत.

राजवाड्यांच्या या अवाढव्य लेखनसामग्रीचा समग्रपणे विचार केला म्हणजे मन चकित होते व एकच पुरुष श्रमसातत्याच्या जोरावर श्रद्धापूर्वक व आस्थेने कार्य करायला लागला तर कसे चमत्कार घडवून आणतो, हे आपल्याला दिसून येते.

✦✦✦

राजवाडे यांचे लिहिणे – त्याचे स्वरूप – गुणदोष

केवळ वाङ्मय हा राजवाडे यांच्या लिहिण्याचा हेतू नाही. लेखणीचा विलास दाखवणे हे त्यांचे जीवित ध्येय नव्हते. त्यांनी सर्व लिहिले ते मराठीत लिहिले. मराठीचा त्यांना फार अभिमान होता. इंग्रजीत एकही ओळ लिहिणार नाही ही त्यांची प्रतिज्ञा होती. मराठी भाषेसंबंधी ते ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत लिहितात, ''शिष्ट मराठीत सात–आठशे वर्षांपासूनची ग्रंथरचना असून, ती महाराष्ट्रातील सर्व प्रांतांतल्या व बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, बुंदेलखंड, तंजावर, गुत्ती, बल्लारी वगैरे संस्थानांतल्या मराठी लोकांना आदरणीय झालेली आहे. ज्या भाषेत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, सूर्य ज्योतिषी, एकनाथ, तुकाराम, रामदास, चिपळूणकर वगैरे ग्रंथकारांनी ग्रंथरचना केली ती शिष्ट भाषा महाराष्ट्रातील सर्व प्रांतांतील व जातींतील लोकांना सारखीच मान्य व्हावी यात आश्चर्य नाही. प्रांतिक बोलणे प्रांतापुरते व जातिक बोलणे जातीपुरते. परंतु ग्रंथिक बोलणे व लिहिणे सर्व महाराष्ट्राकरता आहे. प्रांतिक पोटभाषांच्या लहानसहान लकबा आणि जातिक भाषणातले बालिश अपभ्रंश ग्रंथिक राजभाषेच्या शिष्ट दरबारात लुप्त होतात व एकच एक निर्भेळ अशी मराठ्यांची मायभाषा देशातील सर्व लोकांच्या अभिमानाचा, कौतुकाचा व सहज प्रेमाचा विषय होते. मराठ्यांना स्वभाषेचा इतका अभिमान जो वाटतो तो फुकाचा नाही. मराठी भाषेतल्या, शब्दचातुर्याची बरोबरी पृथ्वीवरील कोणत्याही भाषेला करता यायची नाही, तसेच कोणताही गूढ किंवा सूक्ष्म अर्थ नाना तऱ्हांनी यथेष्ट व्यक्त करण्याची तिची शक्ती अप्रतिम आहे. शिवाय अनेक थोर प्रासादिक ग्रंथकारांनी तिला आपल्या उदात्त, गंभीर, ललित व रम्य विचारांचे

निवेदन केले असल्यामुळे तिच्यावरील महाराष्ट्रीयांची भक्ती शुक्लेंदुवत् उत्तरोत्तर वर्धमान स्थितीत आहे.'

मराठीचा हा राजवाडे यांचा अभिमान दासोपंतांनी संस्कृतपेक्षा मराठी कशी श्रेष्ठ आहे, हे दाखविले त्याप्रमाणे जाज्वल्य आहे. मराठीसंबंधी अशी अलौकिक भक्ती असली तरी मराठीतील नामांकित ग्रंथकार या नात्याने त्यांना प्रसिद्ध व्हायचे नव्हते. राजवाडे हे वाङ्मयसेवक, महान सारस्वत सेवक असले, तरी प्रथमदर्शनी ते सिद्धांत संस्थापक आहेत. समर्थांचे काव्य महत्त्वाचे नसून त्या काव्यातील तत्त्वे महत्त्वाची आहेत. He is first a philosopher and then a poet. हे असे रामदासांसंबंधी म्हणता येईल, त्याप्रमाणेच राजवाडे यांचे आहे. मुक्तेश्वरादी कवी किंवा चिपळूणकर हे वाङ्मयाचे सेवक आहेत. वाणीस सजवावे कसे, उपमा-दृष्टांन्तादी अलंकार ठिकठिकाणी योजून सर्वांना कसे मोहून टाकावे, हे ते जाणतात. मुक्तेश्वराची वाग्देवी अनेकालंकारांनी नटलेली आहे. चिपळूणकर आपल्या वाक्गंगेत आम्हाला स्वैर विहार करायला लावतात. राजवाडे यांचे तसे नाही. येथे गंगाकाठी विहार करणारे निरनिराळे पक्षी; चक्रवाक, मयूर, कोकिळादिकांचे कलरव, भृंगांचे गुंजगान, पद्मांचे फुलणे, सुगंधाची लयलूट हे काही आढळणार नाही. येथे विलास, लालित्य नाही, येथे काय आहे ? राजवाडे यांची भाषा सडेतोड व जोरदार आहे. मृदुत्व तिला खपत नाही. येथे कौमुदीचे सुकुमारत्व, सुभगत्व, शीतलता हे काहीएक नसून सूर्यप्रभेची प्रखरता व प्रज्वलता आहे. जोरकस रीतीने सिद्धांत कसा मांडावा हेच ते पाहात असत. भाषेकडे त्यांचे लक्ष असे. तथापि अर्थाकडे, सिद्धांताकडे जास्त असे. सिद्धांतस्वरूपी त्यांचे लिहिणे आहे. येथे गुळमुळीतपणा नाही. गुरू शिष्याला बनवतो आहे, सेनापती सैन्यास हुकूम करतो आहे, असे त्यांचे लेख वाचताना वाटते. आपला सिद्धांत बरोबर आहे आणि आपल्या विचारसरणीचे अधिकारी पुरुष आपणच आहोत अशा आत्मविश्वासाने त्यांचे लेख भरलेले आहेत. बुद्धीचा स्वच्छपणा व भाषेचा जिवंतपणा त्यांच्या लेखात स्पष्टपणे पाहावयास मिळते. लेचेपेचे व गबाळ लिहिणे त्यांचे नसायचे. खंबीर, अर्थगंभीर असे त्यांचे लिहिणे आहे.

विचारांच्या प्रखर जोरामुळे, भावनांच्या उद्रेकामुळे त्यात समायोचित भाषा आपोआप स्फुरत असे. अर्थानुरूप त्यांची भाषा आहे. 'वाचमर्थोनुधावति' अशा ऋषिकोटीतील हा लेखक आहे, असे दिसून येते. सागराचे गांभीर्य व गगनाचे गौरव आपल्याला त्यांच्या लेखांत प्रतीत होते. भाषेतच ते गुंगत राहात नाहीत. भाषा हे गहन अर्थ स्पष्ट करायचे एक साधन, असे ते समजत म्हणून भाषा सजवणीला त्यांनी

अवकाश दिला नाही. ते वाङ्मय राष्ट्रातील संन्यासी आहेत. संन्याशांस ज्याप्रमाणे विलास सुचत नाहीत, त्याप्रमाणे भाषेचे विलास राजवाडे यांना सुचत नसत. त्यांच्या लिहिण्यातील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे, प्रत्येक शब्द मोलाचा आहे. त्यांची लेखणी तीक्ष्ण होती. तिच्यात स्पष्टपणा व कडवेपणा असे. त्यामुळे ती पुष्कळांना झोंबे. त्यांचे सडेतोड सिद्धांत वाचून दुसरा थक्क होई. राजवाडे यांच्या सिद्धांतावर टीकाही त्यामुळे पुष्कळ झाल्या. राजवाड्यांच्या गागाभट्टावरील ठाकरे यांची 'कोदंडाचा टणत्कार' ही टीका नमुन्यादाखल म्हणून नमूद करतो. त्यांचे इतरही सिद्धांत व मते यांच्यावर पुष्कळांनी टीका केल्या आहेत. राजवाडे हे दुसऱ्यावर कसून टीका करत व दुसऱ्यापासूनही ते मुळमुळीत टीकेची अपेक्षा करत नसत. या बाबतीत राजवाडे व टिळक यांचे साम्य आहे. प्रतिपक्षी यांची रेवडी कशी उडवावी, हे उभयतांना फार चांगले साधे.

राजवाडे यांची भाषा संस्कृत शब्दप्रचुर आहे ; तरीपण ती जातिवंत व शुद्ध मराठी वळणाची वाटते. त्यांचे लिहिणे फार परिणामकारक असे. त्यांच्या प्रस्तावना वाचायला वाचकांच्या कशा उड्या पडत हे पुष्कळांना माहीतच असेल. त्यांची भाषा दुसऱ्यांना अनुकरण करता येत नसे. त्यांच्या प्रत्येक शब्दावर त्यांचा ठसा आहे. राजवाडे यांची भाषा ताबडतोब समजून येते. एखादे वाक्य, एखादा उतारा वाचला म्हणजे हा राजवाडी असला पाहिजे असे ताबडतोब सांगता येते. इंग्रजीमध्ये कार्लाईलची भाषाशैली जशी अगदी निराळी व स्पष्टपणे उमटून पडणारी दिसते, तसेच राजवाडी भाषेचे आहे. थोडक्यात, बव्हर्थ आणण्याची राजवाडी हातोटी क्वचित इतरांना साधते. त्यांच्या लिहिण्यात निरर्थक व उगीच विस्तार आढळणार नाही. त्यांच्या लेखात त्यांच्या प्रतिभेचे व त्यांच्या बुद्धीचे स्वच्छ प्रतिबिंब पडले आहे.. Style is the man. भाषाशैली म्हणजे ग्रंथकारांचे पूर्ण स्वरूप – असे जे म्हणतात ते राजवाडे यांच्या बाबतीत खरे आहे. त्यांच्या स्वभावाचे गुणदोष त्यांच्या लिखाणात आहेत. निर्भीडता, कळकळ, स्वतंत्र प्रज्ञा, जोरदारपणा, विलास व नटवेगिरीचा तिटकारा या त्यांच्या स्वभावाचे आविष्कारण त्यांच्या सर्व लेखनसाहित्यात झाले आहे.

'राजवाडे यांच्या लेखणीसारखी तीक्ष्ण, कार्यकर्ती, प्रभावशाली लेखणी महाराष्ट्रात कोणी धरली नाही. त्यांच्या लेखणीतील तल्लखपणा, सडेतोडपणा ही त्यांच्या सिद्धांताच्या सत्यत्वापासून उत्पन्न झालेली असत; आत्मविश्वासाचा तो परिणाम होता.

✦✦✦

राजवाड्यांची विशिष्ट मनोवृत्ती

तीन तपे निरलसपणे राजवाडे यांनी निरनिराळ्या प्रकारे राष्ट्राची सेवा केली. प्रदीप्त प्रतिभा, अवर्णनीय नि:स्पृहता, अत्युदात्त निरपेक्षता, अतुल कष्टशीलता इत्यादी सद्‌गुणांच्या साहाय्याने आपल्या राष्ट्राची सेवा केली. कोणत्या हेतूने राजवाडे या सेवेस प्रवृत्त झाले ? राष्ट्राचा अध:पात झालेला आहे. हा का झाला, असे अध:पात का होतात, कसे होतात याची कारणमीमांसा करण्याच्या उद्देशाने ते आपल्या जीवित कार्यास लागले. आपल्या महाराष्ट्रास निकृष्ट स्थिती हीन-दीन स्थिती का आली हे नीट सम्यक् रीतीने समजून घेतल्याशिवाय, राष्ट्राच्या उद्धारार्थ योग्य दिशेने प्रयत्न करणे शक्य होणार नाही, हे त्यांच्या बुद्धीने जाणले. आपले चुकते आहे कोठे हे समजल्याशिवाय, आपल्याला चुका सुधारता येणार नाहीत. यासाठी ते आपला इतिहास यथार्थ स्वरूपाने पाहू लागले. परकीय इतिहासकार आपल्या देशाचा इतिहास जिव्हाळ्याने कसा लिहिणार ? इंग्लिश लोक नेपोलियन यास अधम म्हणतात, तर फ्रेंच लोक वेलिंग्टन यास तुच्छ लेखतात. तेव्हा ते परके लोक आपल्या भारताचा इतिहास असा विकृत स्वरूपात लिहिणार यात शंका नाही. म्हणून प्रथम ही राष्ट्रीय स्मृती तयार करण्यासाठी राजवाडे तयार झाले. परंतु राजवाडे यांची दृष्टी एकांगी नव्हती. अनेक तऱ्हांनी व अनेक दिशांनी आपल्याला खटाटोप करावे लागणार, हे त्यांना स्पष्ट दिसून येत होते. परकीय लोकांशी टक्कर द्यायची म्हणजे आपण त्यांच्या तोलाचे झाल्याशिवाय काहीएक हातून होणार नाही असे ते म्हणत. प्रत्येक शास्त्रात पाश्चात्त्य लोक पुढे-पुढे जात आहेत व आपल्यातला शास्त्राभ्यास व शास्त्रसंवर्धन

करणारा कोणीच पुढे येत नाही याचे त्यांना आश्चर्य वाटे. समाजशास्त्र, भाषाशास्त्र, इतिहासशास्त्र, रसायनशास्त्र अशा प्रकारच्या सर्व शास्त्रांच्या अध्ययनात गती करून घेतल्याशिवाय आपला तरणोपाय नाही, असे ते म्हणत. ही कामे एकेकट्याने होणार नाहीत. म्हणून त्यांनी संघटना करण्याचेही प्रयत्न केले. त्यांनी अनेक मंडळे स्थापन केली. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नमुन्यावर धुळे, अमळनेर वगैरे ठिकाणी त्यांनी संस्था स्थापल्या. पुण्यात आरोग्यमंडळ ही सभा त्यांनी स्थापन केली. लोकांचे आरोग्य वाढविल्याविना ते सशक्त व कार्यकर कसे होणार ? सावकारांच्या तावडीतून कुळास सोडवणारे – हलक्या दराने कर्ज देणारे मंडळ त्यांनी काढले होते. रेल्वेसंबंधी उतारूंच्या तक्रारी दूर करणारे मंडळ त्यांनी काढले होते. समाजशास्त्र मंडळ हे समाजाच्या सर्व अंगांचा विकासैक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी त्यांनी काढले होते. शिक्षाविचारमंडळ हे शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या चर्चा करण्यासाठी त्यांनी काढले होते. भौतिकशास्त्र संशोधन मंडळही त्यांनी काढले व स्वत: त्यास शंभर रुपये दिले. ज्ञानेश्वरी मंडळ ज्ञानेश्वरीसंबंधी चर्चा करण्यास होते.

अशा प्रकारे निरनिराळ्या कामांत लोकांनी भाग घ्यावा म्हणून त्यांनी अनेक मंडळे स्थापन केली. परंतु या मंडळांपैकी किती कार्यकर्ती झाली ? किती मंडळांवर राजवाडे यांचा संबंध राहिला ? या अनेक मंडळांपैकी पुण्याचे भारत-इतिहास-संशोधक मंडळ, आरोग्य मंडळ व शिक्षा विचार मंडळ ही तीन मंडळेच जिवंत आहेत. भा. इ. संशोधक मंडळ आता मरणार नाही. त्याला प्रो.पोतदार यांच्यासारखे उत्साही कार्यकर्ते लाभले आहेत. शिक्षा विचार मंडळाच्या पुण्यास मधून मधून सभा होत असतात. तसेच आरोग्यमं ळ वझे व नंतर नुकतेच कैलासवासी झालेले भट यांनी नावारूपास आणले होते. बाकीची मंडळे राजवाडे यांच्या हयातीतच आटोपली व जी शिल्लक आहेत, त्या मंडळांजवळही त्यांचा संबंध उरला नव्हता. मंडळे स्थापन करणे हे एक काम व मंडळे चालविणे हे दुसरे काम. राजवाडे यांच्याजवळ तडजोड नसे. त्यांना आगमोड व पदरमोड करणारी माणसे आवडत. कार्यार्थ ज्यांना तळमळ लागली आहे असे लोक त्यांना पाहिजेत. कार्य करण्याची त्यांची तडफ, त्यांचा उरक इतरांना नसे. इतरांच्या फावल्या वेळात देशकार्य करण्याच्या प्रवृत्तीचा त्यांस संताप येई व मग आपणच एकटे दुसऱ्यांवर न विसंबता आपल्याच सान्निपातिक तडफेने व जोराने काम करू लागत. रें रें करत काम करणे हे त्यांना सहन होत नसे. त्यांना डॉ. जॉन्सन यांच्याप्रमाणे जगाचे, जगातील लोकांच्या मनोवृत्तीचे ज्ञान नीट झाले नाही. डॉ.

जॉन्सन लोकांवर प्रथम असाच संतापे. परंतु पुढे कमी संतापू लागला. कारण तो म्हणतो, ''जगापासून मी अपेक्षाच थोडी करतो त्यामुळे जग मला चांगले दिसू लागले आहे.'' जॉन्सनला मनुष्यस्वभाव कळला. मनुष्य हा जात्याच आळशी, सुखलोलुप आहे. राजवाडे यांना हा लोकांचा स्वभाव कळला असेल, परंतु तो कळून जॉन्सनप्रमाणे ते संतुष्ट न होता उलट जळफळत. लोकांचा त्यांना तिरस्कार वाटे. गुलामगिरीमध्येच गौरव मानू पाहणारे आपले भाईबंद पाहिले म्हणजे त्यांच्या स्वाभिमानी मनाचा भडका होई यामुळे ही सर्व मंडळे स्थापूनही कार्य करायला लोक तयार नाहीत हे पाहून ते पुनरपि एकाकीच काम करू लागले.

मंडळे जमवूनच सर्व काम होईल असे त्यांना वाटत नव्हते. मंडळे निर्माण करून काही मंडळी कार्यार्थ तयार होणे म्हणजे निम्मे काम झाले असे ते म्हणत. ते लिहितात, ''संशोधनार्थ विद्वान निर्माण करणे आणि त्यांची सहानुभाविकांची मंडळे स्थापण्याचे कार्य थोडे-फार झाले आहे; परंतु एवढ्याने संपत नाही. देशात संशोधक मंडळे व संशोधक यांची संख्या वाढली म्हणजे पन्नास हिस्से फत्ते झाले. बाकी राहिलेले पन्नास हिस्से फत्ते एका बाबींवर अवलंबून आहे. ती बाब म्हणजे द्रव्यबल. द्रव्यबलासाठी देशात मायेचे व जिव्हाळ्याचे होमरूल स्वराज्य होण्याची आवश्यकता नितांत भासमान होते.'' स्वतंत्र देशात निरनिराळ्या संशोधकांना व संशोधक मंडळास केवढा सरकारी पाठिंबा असतो हे पाहून राजवाडे यांचा जीव तुटे. आपल्या देशातील सरकार तर बोलून चालून परकीय. विद्येच्या अभिवृद्ध्यर्थ, शास्त्र प्रसारार्थ ते जनतेस कसे साहाय्य करणार ? परंतु सरकारने कानावर हात ठेवले. देशातील लोकांनी या शास्त्रसंवर्धनाच्या कार्यास हातभार नको का लावायला ? राजवाडे संतापून लिहितात, ''विद्या वृद्ध्यर्थ द्रव्य का, कसे व कोठे खर्चावे हे समजण्याची अक्कल अद्याप लोकांना, राजांना, परिषदांना व सभांना फुटायची आहे. कबुतरे, वारवनिता, पेहेलवान, तमाशेवाले यांची पारख धनिकांना होऊ शकते. विद्वान्, संशोधक व विचारद्रष्टे यांना ओळखण्याची इंद्रिये अद्याप राजांना व परिषदांना आलेली नाहीत. ती आली म्हणजे वागीश्वरांची ओळख धनेश्वरांना पटून शास्त्रे, कला, ज्ञानप्रसार व विदग्ध वाङ्मय यांनी भूमी फुलून जाईल.'' आपल्याकडील धनिक वर्ग देशकार्यास व शास्त्रकार्यास मदत करीत नाहीत याचे त्यांना आश्चर्य वाटे. लोक नाटके, तमाशे व सिनेमा यांना पैसे खर्चतात, परंतु या देशकार्यार्थच त्यांना उदासीनता का येते ? राजवाडे म्हणतात, ''दुष्काळाने व महर्गतेने पोटभर अन्न न मिळाले तरी चालेल; परंतु भांडी

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

विकून व बायको गहाण ठेवून नाटके पाहणारे कारागीर ज्या देशात फार झाले तो देश पक्का वेडा बनला असला पाहिजे, यात बिलकुल संशय नाही. दहा वर्षांच्या खटपटीने पैसा फंडाचे महाराष्ट्रात आठ हजार मिनतवारीने जमतात; एकट्या मुंबईतील सर्व नाटक कंपन्यांचे आठवड्याचे उत्पन्न वीस हजारांवर आहे ! (विश्ववृत्त सप्टेंबर १९०७)'' राजवाडे यांना लोकांच्या या कर्तव्याच्या विस्मृतीची चीड येई. त्यांचा स्वत:चा जीव भारतवर्ष प्राचीन वैभवाने पुनरपि विलसू लागेल याच्यासाठी तळमळत होता. इंग्रज सरकारला घालवून देऊन देश देहाने, मनाने, बुद्धीने स्वतंत्र कसा होईल याचीच तळमळ त्यांना लागून राहिली होती. 'हिंदुस्थानातून इंग्रजांना घालवून देणे हेच सुशिक्षित हिंदवासीयांचे आद्य कर्तव्य होय.' असे त्यांनी स्पष्टपणे एके ठिकाणी लिहिले आहे. 'इंग्रजांना लाथा मारून घालवून देण्याची शक्ती आमच्यात आल्याशिवाय आमचा तरणोपाय नाही.' असे ते म्हणत. त्यांचे ध्येय हे अशा प्रकारचे आहे. या ध्येयार्थ त्यांनी सर्व आयुष्य खर्च केले. रसायनशास्त्रासारख्या शास्त्रांचा आपण अभ्यास केल्याविना इंग्रजांना देशाबाहेर घालवण्यास आपण समर्थ होणार नाही हे ते तरुणांना पुन:पुन्हा सांगत. रसायनशास्त्र, इतर भौतिकशास्त्रे यांत पारंगत व्हा. सर्व कला आपल्याशा करा, असे ते विद्यार्थ्यांना वारंवार बजावीत. याच कार्यासाठी त्यांनी रासायनिक मंडळही पुण्यात काढले होते. परंतु लोकांना हौस व उत्कंठा लागली आहे कुठे? एका प्रचंड प्रयोगशाळेत अनेक विद्यार्थी निरनिराळे शोध लावीत आहेत व त्यांच्यावर आपण देखरेख करीत आहोत; जगाच्या ज्ञानात भर पाडत आहेत अशा सुखस्वप्नात त्यांचा आत्मा तरंगत असे; परंतु वस्तुस्थिती कशी होती ? रसायनशास्त्रातील नैपुण्य मिळवण्याऐवजी त्यांना जुनी इतिहासाची दप्तरे झाडण्याचे काम करावे लागले. राजवाडे म्हणत, ''मी जर श्रीमंत व लखपती असतो तर मोठा रसायनशास्त्रवेत्ता झालो असतो; परंतु भिकारी असल्यामुळे इतिहास संशोधनाचा व भाषासंशोधनाचा बिनभांडवली धंदा मला पत्करावा लागला.'' मरायच्या आधी काही दिवस ते सृष्टिशास्त्र, रसायनशास्त्र यावरील ग्रंथ वाचू लागले होते व आपण आता मोठे रसायनशास्त्रवेत्ते होऊ, असे ते म्हणत.

त्यांची बुद्धी सर्वंकष असल्यामुळे ती कोणत्याही शास्त्रात अकुंठित रीतीने चाले. लोक निजले आहेत, घोरत आहेत असे पाहून तेच निरनिराळ्या शास्त्रांना चालना देत. इतिहास संशोधन, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, रसायनशास्त्र सर्वत्र त्यांची दृष्टी होती. हेतू हा की निरनिराळ्या लोकांपुढे निरनिराळी कार्यक्षेत्रे मांडावी. त्यांची

प्रतिभा दिव्य व ज्ञानचक्षू निर्मळ यामुळे एकाच विषयाची निरनिराळी अंगे आपल्या ओजस्वी निबंधांतून ते लोकांना सांगत. सर्व शास्त्रांना त्यांनी गती दिली, चालना दिली. असा चतुरस्र महाधी पुरुष महाराष्ट्रात झाला नाही.

त्यांनी स्वत: प्रचंड काम केले; परंतु अद्याप कितीतरी काम झाले पाहिजे असे ते म्हणत. पूर्ववैभव, प्राचीन पूर्वजांची थोर स्मृती लोकांच्या अंतरंगी जागृत करून त्यांना कार्यप्रवण करायचे होते. आलस्य व किंकर्तव्यमूढता त्यांना घालवून द्यायची होती. राजवाडे लिहितात, ‘‘तात्त्विक हवेच्या संन्यासप्रवण व मांद्योत्पादक दाबाखाली चिरडून गेल्यामुळे प्रपंचाची म्हणजे इतिहासाची हेळसांड करण्याकडे लोकांचा जो आत्मघातकी कल आहे, तो घालविण्यासाठी इतिहासज्ञानप्रसाराची व तत्साधन प्रसिद्धीची आवश्यकता सध्या विशेषच आहे, असे माझे ठाम मत आहे. काल, देश, कूळ या त्रिविध दृष्टीने भारतवर्षाच्या व महाराष्ट्राच्या नानाविध चरित्रांचा अफाट विस्तार पाहता, आजपर्यंत प्रसिद्ध झालेली साधने जलाशयातून एखाद्या बेडकाने मोठ्या प्रयासाने आपल्या शूद्र ओंजळीत वाहून आणलेल्या बिंदूप्रमाणे आहेत. त्या बिंदुमात्राने संन्यासप्रवणतेची मलीन पटले धुऊन जाणार कशी ? हे मालिन्य साफ नाहीसे करायला जलाशयातून शेकडो मोठमोठे पाट फोडून संन्यासप्रवणतेवर सतत सोडून दिले पाहिजेत.’’ राजवाड्यांचा सर्वव्यापी अनिरुद्ध खटाटोप लोकांना कार्यप्रवण करण्यासाठी होता. महाराष्ट्रात जी एक कार्यनिरीच्छता उत्पन्न झालेली आहे तिचा निरास करण्यासाठी राजवाडे खपले व ती नाहीशी करण्यासाठीच टिळकांनी गीतारहस्य लिहिले. ‘‘साधुसंतांच्या उपदेशाने महाराष्ट्र संन्यासप्रवण झाला; स्वाभिमान त्याने सोडला’’ असे कधी-कधी राजवाडे म्हणत. तथापि संतांची खरी कामगिरी त्यांच्या डोळ्यांआड नव्हती. ‘शिवकालीन समाजरचना’ या निबंधात राजवाडे लिहितात,

‘‘अठरापगड जातींचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्वधर्मभ्रष्ट झाले असता ते बहुतेक मुसलमान बनल्यासारखेच झाले. इतकेच की, त्यांनी सुंतेची दीक्षा मात्र घेतली नाही. तीही त्यांनी घेतली असती; परंतु त्यांच्या आड एक मोठी धोंड आली. ती धोंड महाराष्ट्रातील साधू व संत हे होत. भांडणे, तंटे, अपेयपान, अभक्ष्य भक्षण यांचे साम्राज्य सर्वत्र मातलेले पाहून ही बजबजपुरी काहीतरी ताळ्यावर यावी या सद्‌हेतूने साधुसंतांनी सर्वांना सहजगम्य व सुलभ असा भक्तिमार्ग सुरू केला. धर्मज्ञान लोपले होते; विधिनिषेधांची प्रतिष्ठा राहिली नव्हती; प्रायश्चित्तास कोणी पुसत नव्हते. अशी

सर्व प्रजा वृषलवत् अथवा बहुतेक म्लेंच्छवत् बनली होती. ही प्रजा सनातन धर्मास व आर्य संस्कृतीस सोडून जायच्या पंथाला लागली होती. बरेच सोडून गेलेही होते. बाकी राहिलेल्या लोकांचा मगदूर पाहून साधुसंतांनी परम कारुणिक बुद्धीने भक्तिमार्ग सुरू केला. सद्हेतूने की, कसेही करून हे लोक पुन्हा कर्मनिष्ठ बनण्याचा संभव राहावा. संतांनी वर्णाश्रमधर्मलोपप्रधान अशी ही महाराष्ट्रातील दुर्दैवी प्रजा दोन-अडीचशे वर्षे आर्य समाजात मोठ्या शिताफीने थोपवून धरली व आर्य संस्कृतीचे रक्षण केले. तेव्हा संतांनी आपल्या या देशावर उपकार बिनमोल केले यात काडीचाही संशय नाही.''

संतांनी प्रजेची बुद्धी धर्मात ठेवली; परंतु ती प्रपंचप्रवण केली नाही. पुढे ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा म्हणजे प्रपंच व परमार्थ यांच्या एकवाक्यतेचा उदय रामदासांच्या हस्ते झाला. एकनाथ तुकारामादी संतांचे कार्य व रामदासांचे कार्य हे परस्पर सापेक्ष आहे. संतांनी मुसलमानी धर्मापासून जनतेचे रक्षण केले नसते, स्वधर्मनिष्ठ त्यांना ठेवले नसते तर रामदासांनी तरी 'विद्या, व्याप, वैभव' यांचा उपदेश कोणाला केला असता ? असो. तर राजवाडे यांना संतांच्या कामगिरीची किंमत कळत होती; परंतु लोक जेव्हा खरे कार्य विसरून संतांच्या पाठीमागे लपण्याचा मार्ग स्वीकारतात त्याचा त्यांना तिरस्कार वाटे. ही संन्यासप्रवणता आहे. त्यातच खितपत पडून राहण्याची प्रवृत्ती राजवाडे यांना नाहीशी करायची होती व यासाठीच त्यांना प्राचीन इतिहासाची स्मृती जागी करायची होती.

प्राचीन इतिहासाची स्मृती जागी करून पूर्ववैभवाचे यशोगान करून, त्याप्रमाणे पूर्वीच्या चुका स्पष्टपणे दाखवून स्वाभिमानपुरस्सर नवीन कार्याचा पाया घालणे हे त्यांचे जीवित होते. सर्व जन्मभर देशहितकारक कामगिरी व्हावी म्हणून या थोर पुरुषास कोण कळकळ असे. ते आपल्या एका उद्बोधक टिपणात लिहितात, ''आषाढ शुद्ध अष्टमीस या विशाला नवे सेहेचाळीसावे वर्ष लागले. चौपन्न वर्षे राहिली. त्यात सर्व जगताला हितकारक व राष्ट्राला पोषक अशी कृती होवो. आजपर्यंत फक्त राष्ट्रीय स्मृती तयार करण्यात काळ गेला. यापुढे कृती, कृती, कृती झाली पाहिजे. आरोग्य, उत्तम हवा, उत्तम पाणी, उत्तम जागा, उत्तम शुद्ध अन्न ही मिळाली तर हेही होईल. ईश्वराची कृपा अपरंपार पाहिजे.'' याच टिपणाच्या दुसऱ्या बाजूस १८९४ पासून १९०९ पर्यंत केलेल्या कामगिरीचा तपशील दिला आहे व ७२०० पृष्ठे आतापर्यंत मजकूर लिहून झाला - छापला असे सांगितले आहे. या थोर पुरुषाची राष्ट्रकार्याबद्दल ही तळमळ पाहून काहीतरी करण्याची स्फूर्ती कोणास होणार

नाही ? हा उदार भाव, हा आशावाद मेलेल्यासही चैतन्य देईल; परंतु आम्ही मेलेल्याहून मेलेले आहोत; त्याला कोण काय करणार ? राजवाडे औंध येथे वैदिक श्री. पंडित सातवळेकर यांच्याजवळ राहणार होते. सातवळेकर त्यांना एक आश्रम बांधून देणार होते. तेथे राहून राजवाडे यांना मनातून एक मासिक चालवायचे होते. वैदिक, पूर्ववैदिक, उत्तरवैदिक इतिहास यात येणार होता. ऐतिहासिक व समाजविषयक शास्त्रपूत वृत्तांत या मासिकात यायचा होता. या मासिकात दरमहा शंभर पानांचा मजकूर ते स्वतःच देणार होते. महाभारत, ब्राह्मणे या कालातील अनेक गोष्टींवर शेकडो निबंधांची रूपरेखा त्यांच्या मनात होती. तसेच वेदमंत्रांचे वर्गीकरण करून, संगती लावून आपण स्वतः बसवलेल्या उपपत्तीप्रमाणे वेदांचा खरा अर्थ करून दाखववावा व या विषयावर हजार दोन हजार पानांचा ग्रंथ लिहावा असा त्यांचा मनोदय त्यांनी सातवळेकरांजवळ अनेकदा व्यक्त केला होता. त्याप्रमाणेच आर्य लोकांच्या विजयाचा एक मोठा ग्रंथ ते लिहिणार होते. या ग्रंथाची त्यांनी खालीलप्रमाणे रूपरेखा आखली होती.

१) क्षेत्रातील पंड्यांच्या वह्यांवरून अखिल हिंदुस्थानातील आर्यांची आडनावे संगतवार लिहून काढणे व त्यांचे सामाजिक वर्गीकरण फार काळजीपूर्वक करणे.

२) नंतर हिंदुस्थानातील बाहेरच्या देशातील गावांची नावे पाहून त्या आडनावांचा व त्या स्थानांचा संबंध ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने निश्चित करणे.

३) शक्य तितक्या अधिक गावांचे अति प्राचीन नाव शोधून काढून आर्यांच्या हालचालीच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व निश्चित करणे.

४) या व अशा अनेक महत्त्वाच्या मुद्यांचे संगतीकरण करून आर्यांच्या एकंदर क्रांतीचे व विजयाचे स्वरूप दाखविणे. अशा प्रकारच्या अलौकिक ग्रंथाला त्यांनी आरंभ केला होता हे मागे सांगितलेच आहे; परंतु त्यांचे हे काम आता कोण करणार ?

मरेपर्यंत अशी सांस्कृतिक व उद्‌बोधक कामगिरी ते करणार होते. ८५ वर्षांपर्यंत ही कामगिरी करून मग ते एकांतवासात राहणार होते. केवढा हा आत्मविश्वास व आयुष्याच्या सार्थकतेसंबंधी कोण ही महनीय खटपट !

या सर्व श्रमांची गुरुकिल्ली आपल्या समाजास जागे करणे यात आहे. या बांबतीत ते कधी कधी उद्विग्न होत व हताश होत; परंतु पुनरपि प्रयत्नास लागत. शारदामंदिराच्या अध्यक्षस्थानी असता त्यांनी मराठी भाषेचे व एकंदर भारतवर्षाचे एक

दुर्दैवी चित्र काढले होते. मराठी भाषा मरत जाणार व हिंदुस्थान म्हणजे गुलाम व मजुरांचे राष्ट्र होणार असा भयसूचक बिगुल त्यांनी वाजवला; परंतु अशी निराशा दिसत असूनही ते प्रयत्न अखंड करीत होते. निराशेची आशा त्यांच्याजवळ होती. दामले यांच्या व्याकरणाचे परीक्षण करून ते शेवटी म्हणतात, ''प्रत्येकाने आपापले काम स्वतःच करावे हे श्रेयस्कर, का की, प्रस्तुत काली आपल्या देशातली परिस्थितीच तशी आहे. कोणतेही शास्त्रीय काम करण्याला या देशात प्रायः अनेक तर सोडून द्या; पण अर्धाही माणूस तयार झाला नाही. तेव्हा श्रमविभाग होण्याची आशा करणे आणि पन्नास-शंभर वर्षे या देशात अयुक्त होय. कधी काळी चुकून-माकून एखाद्याच्या मनात काही शास्त्रीय कृत्य उठवण्याचे सुदैवाने मनात आले व मनात येऊन त्या कृत्याचा अंत पाहण्याचा उत्साह त्याच्या ठायी वर्षानुवर्षे कायम राहिला, तर त्याने या देशात इतर कोणाच्याही साहाय्याची अपेक्षा करू नये, हे उत्तम. कारण साहाय्य होण्यासारखी परिस्थिती नाही. एका काळच्या या शास्त्रीय भूमीत सध्या शास्त्राचा अत्यंत लोप झालेला आहे. प्रायः या देशातील यच्चयावत लोकांची स्थिती आफ्रिकेतील निग्रोंच्या स्थितीत जवळजवळ आलेली आहे. ज्यांना ग्रॅज्युएट म्हणून म्हणतात, त्यांच्याजवळही शास्त्र नाही व ज्यांना 'शास्त्री' म्हणतात त्यांच्याजवळही शास्त्र नाही. एक पाश्चात्त्य सटर-फटर पुस्तके वाचून-घोकून खर्डेघाश्या गुलाम बनलेला आहे व दुसरा पौर्वात्त्य ग्रंथ घोकून मद्दड झालेला आहे. अशा या दुहेरी कंगाल समाजाला सुधारण्याचे म्हणजे शास्त्रीय स्थितीत नेण्याचे बिकट कृत्य, कोणाचेही साहाय्य मिळण्याची आशा न करता पार पाडायचे आहे. राजकीय, सामाजिक वाङ्मय वगैरे कोणतेही कृत्य या देशात ज्या कोणाला करण्याची उमेद आली असेल, त्याने अंगिकारलेल्या कृत्याच्या विस्ताराचा अंदाज घ्यावा, त्यात व्यंगे व दोष कुठे आहेत त्याची विचक्षणा करावी व ते दोष, व्यंगे काढण्यास स्वतःच लागावे, इतर कोणाची वाट पाहू नये. कारण ममतेने धावून येण्यास कोणीच नाही. स्वजनही नाहीत व परजन तर नाहीतच नाहीत. अशी एकंदर फार हलाखीची स्थिती आहे आणि ही स्थिती काही उत्साह विघातक नाही. संकट यावे तर असेच यावे. या संकटातच आपल्या कर्तबगारीची खरी परीक्षा आहे.''

राजवाडे यांस सर्व शास्त्रांची कशी जरूर भासे हेही त्यांनी वरील लेखातच पुढे लिहिले आहे. ते लिहितात, ''व्याकरणशास्त्रावाचून सध्या काय अडले आहे, असा बालिश प्रश्न कोणी कोणी करतात. त्यांना उत्तर एवढेच की हरएक शास्त्रावाचून नडत

आहे, तितकेच व्याकरणशास्त्रावाचूनही नडत आहे.'' राष्ट्राच्या प्रगतीला व व्यवहाराला सर्व शास्त्रांची जरूरी आहे हे लक्षात आणूनच राजवाडे अकुंठित गतीने वनराजाप्रमाणे सर्व ज्ञानक्षेत्रांत अनिरुद्ध विहार करते झाले. भारतीयांच्या शब्दालाही मान ज्ञानक्षेत्रात मिळावा हीच त्यांची महत्त्वाकांक्षा होती. भारतीयांचा देह पारतंत्र्यात असो; पण मानसहंस तरी स्वतंत्र होवो हे त्यांचे दिवारात्रीचे स्वप्न होते. भारतीयांच्या विचार विहंगमास ज्ञानाच्या गुलामगिरीतून त्यांनी मुक्त करायचे कठीणतम कर्तव्य स्वीकारले होते. बंगालमध्ये आशुतोष मुकर्जी यांनी जे कार्य केले, तेच कार्य एकाकी राजवाडे यांनी महाराष्ट्रात दृढमूल करण्याचा प्रयत्न केला. राजवाडे यांचा स्वभावलंबाचा मार्ग मात्र आशुतोषजींच्या मार्गापेक्षा निराळा होता. आशुतोष यांनी बंगाली भाषेस उत्तेजन दिले; परंतु इंग्रजी लिखाणावर त्यांचा कटाक्ष नसे. या कठोर कर्तव्यास्तव ते आमरण कष्टत असता सुसंपन्न ग्रॅज्युएटही सरकारच्या कच्छबी कसे लागतात याचे त्यांना राहून-राहून नवल वाटे. आपला भिकारडा चारित्र्यक्रम तिरस्कृत मानावा असे ते या ग्रॅज्युएटांना सांगतात. ''जोपर्यंत शास्त्रात तुम्ही गती करून घेणार नाही तोपर्यंत तुमच्या तरणोपायाची आशा नाही'' असे त्यांचे शब्द आहेत. स्वराज्याच्या गप्पा मारणारे व गुलामगिरीचे दिवसभर काम करून रात्री देशभक्तांच्या कामाची उठाठेव करणारे लोक त्यांना तिरस्करणीय वाटत. ते म्हणत, ''दिवसभर राज्ययंत्र चालविण्यासाठी त्यास तेल घालीत असता व रात्री मात्र त्या राज्ययंत्राचा वाचिक निषेध करता - यात काय अर्थ आहे ?'' कधी-कधी संतापून ते या लोकांना Biped द्विपाद पशू अशी संज्ञा देत. काय, शाळेत मास्तर आहात - गाढव आहात झाले. असे ते स्पष्टपणे म्हणत. कारण शाळेत शिकून सरकारचे राज्ययंत्र सुरळीत चालवणारे गुलामच बाहेर पडणार ना असे ते म्हणत व जोपर्यंत हा गुलामाच्या उत्पत्तीचा धंदा तुम्ही सोडला नाही तोपर्यंत तुम्ही पशूच नाही तर काय असे राजवाडे बेमुर्वतपणे म्हणत- यातील इंगित वाचकांच्या लक्षात येईलच.

स्वाभिमानशून्य जिण्याची त्यांना लात वाटे. जदुनाथ सरकारसारखे गाजलेले इतिहासलेखक शिवाजीस 'शिवा', संभाजीस 'संभा' असे मुसलमानांच्या पद्धतीचे अवलंबन करून लिहितात याचा राजवाडे यांना मनस्वी संताप येई. मुसलमानांना शिवाजी हा काफर वाटे; परंतु सरकार तरी हिंदू रक्ताचे व हिंदू संस्कृती संरक्षण करणाऱ्याचा अभिमान बाळगणारे आहेत ना ? मग या महाराष्ट्राला स्वातंत्र्यमंदिरात नेऊन बसविणाऱ्या श्रेष्ठतम पुरुषांना सरकार असे हीन तऱ्हेने कसे संबोधतात ?

आपल्यामधीलच पुढारी व विद्वान समजले जाणारे लोक जर असें वर्तन करत असतील तर मग कसली आशा राहिली ? परकीय लोक तर हिंदुस्थानातील सर्वच गोष्टींना नावे ठेवणार. राजवाडे एके ठिकाणी लिहितात, ''कार्ल्याची व वेरुळाची लेणी केवळ हिंदुस्थानातील म्हणून ती साहेबांना त्याज्य व पै किमतीची. काश्मीर किंवा महाबळेश्वरासारख्या ठिकाणची शोभा केंवळ हिंदुस्थानातील म्हणून रद्दड. शंकराचार्य, भास्कराचार्य हिंदुस्थानात जन्मले म्हणून तुच्छ असे साहेबास हिंदुस्थानातील वस्तूंचे वावडे असते; परंतु स्व-जनच जेव्हा आपल्या थोर पूर्वजांबद्दल अभिमान व पूज्यबुद्धी दाखवेनासे होतात तेव्हा काय रडायचे ?'' ही स्थिती पाहून, नैराश्यतिमिर पसरलेले पाहून कोणी कार्यकर्ता पुढे येत नाही असे पाहून राजवाडे का संतापणार नाहीत ? त्यांना सर्व स्वजन तुच्छ का वाटणार नाहीत ?

असो. तर राजवाड्यांची मनोवृत्ती देशाभिमानाने प्रेरित झालेली होती. त्यांना पूर्वजांचे दुर्गुण स्पष्टपणे दिसत होते. शास्त्रसंवर्धन केले नाही, कार्यप्रवणता ठेवली नाही, उद्योगधंदे, कारखाने, जगाकडे पाहून विनिर्मिले नाहीत, या सर्व चुका ते कबूल करतात. संघशक्ती, थोर उदार विचारांचा पुरस्कार एक रामदास सोडले तर झाला नाही वगैरे चुका ते मानतात; परंतु पूर्वजांच्या चुका असल्या तरी त्यांची कर्तबगारी पण नाव घेण्यासारखी आहे. प्राचीन काळ तर सोडूनच द्या. पाणिनी, पतंजली, राम, कृष्ण, शंकर, रामानुज यांचा काळ आपण सोडून देऊ. या महाविभूतींचा जन्म या थोर देशात झाला म्हणून अभिमान पाहिजेच; परंतु अर्वाचीन काळातही पराक्रमी व कार्यधीर पुरुष झाले. त्यांची विस्मृती करून कसे चालेल ? विशेषतः राजवाडे यांना मराठेशाहीतील तीन व्यक्तींबद्दल फार आदर वाटे. श्री छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदासस्वामी व श्रीमंत थोरले माधवरावसाहेब पेशवे या तीन विभूती म्हणजे तीन परमेश्वरच त्यांना वाटत. महाराष्ट्राने आपल्या हृदयमंदिरात या तीन देवतांची सदैव पूजा करावी; त्यांच्या कार्याचे मनन करावे व त्यापासून आपली चुकती पावले मार्गावर आणावी. राजवाडे हे आपल्या संध्येनंतर यातील विभूतींचे तर्पण करीत. प्राचीन ऋषींच्या नावाने व आपल्या पूर्वजांच्या नावाने आपण तर्पण करतो. या त्रिमूर्ती म्हणजे महाराष्ट्राचे ऋषी होत. राजवाडे यांचे अंतःकरण या दिव्य मूर्तींच्या पराक्रमाने भरून येई यात नवल नाही. कारण त्यांचे हृदय स्वदेशप्रीतीच्या शुद्ध मंदाकिनीने भरलेले होते. स्व-धर्म, स्व-भाषा, स्व-देश यांच्याबद्दलची जिवंत कळकळ, अकृत्रिम प्रेम होते. याच प्रेमाच्या जोरावर, याच कळकळीच्या कैवाराने त्यांनी अफाट कामगिरी एकाकी राहून केली.

त्यांना अंतःकरणात स्फूर्ती देणारी, चालना देणारी, प्रेरणा देणारी प्रेरक शक्ती-स्व-धर्म, स्वदेश व स्व-भाषा यांशिवाय अन्य कोणती असणार ?

देशाभिमानपूर्ण, जाज्वल्य व प्रखर अशा देशसेवेस वाहिलेला हा थोर पुरुष कशा मनोवृत्तीचा होता, त्यांच्या सर्व व्यवहारातही कोणते सूत्र अनुत्स्युत होते हे वाचकांच्या ध्यानात आले असेल. ही स्वदेशाची भावना, हा बाणेदारपणा, हा करारीपणा, निःस्पृहपणा त्यांच्या इतर बारीकसारीक गोष्टींतही कसा दिसून येई हे पुढील प्रकरणी पाहू.

+++

स्वभावाशी परिचय

राजवाडे यांची राहणी साधी व स्वच्छ असे. त्यांचा आहार शुद्ध व सात्त्विक असे. ते बहुतेक हाताने स्वयंपाक करीत. कधी-कधी ते भात दुधातच शिजवीत. मग त्या भातावर पुष्कळसा मध व तूप ओतून ते जेवीत. त्यांना भातावर मध फार आवडे. जेवणात दूध, तूप वगैरेंचा ते फार उपयोग करीत; परंतु नेहमीच असा आहार घेता येत नसे. वाईला प्रथम ते दप्तर शोधावयास गेले, त्या वेळेस एक चिपटे तांदूळ घेऊन त्याचा भात करून नुसता खात आणि ते म्हणत, ''रोजच्या खर्चास मला तीन दिडक्यांचे तांदूळ असले म्हणजे झाले. तीन पैशांत मला जगात धडधाकट राहता येईल.' नेहमीच अशा दारिद्र्यावस्थेत त्यांना राहावे लागले असे नाही; परंतु सर्व प्रकारच्या परिस्थितीत राहावयास ते तयार असत. महिन्याचा त्यांचा खर्च कधी-कधी कमीत कमी दहा रुपये तर जास्तीत जास्त तीस रुपये एवढा असे. त्यांचा सर्व खर्च त्यांच्या पुस्तक प्रकाशनातून बाहेर पडत नसे; त्यांना इतर मदत घ्यावी लागे. त्यांच्या वडीलभावाची-वैजनाथपंत राजवाडे यांची त्यांना मदत होत असे. इतरांजवळून होता होईतो त्यांनी कधी पै घेतली नाही. कारण दुसऱ्याचे मिंधे राहणे हे त्यांना कधी खपत नसे. मिंधेपणा म्हणजे मरण, असे ते म्हणायचे.

त्यांची प्रकृती दणकट असल्यामुळे त्यांचा आहार चांगला असे. अपचनासारख्या रोगांनी ते कधी आजारी पडले नाहीत. कधी-कधी अटीतटीस पडून ते वाटेल तेवढ्या अन्नसामग्रीचा फन्ना उडवीत. एकदा अशीच पैज लागली व राजवाड्यांनी दीडशे केळ्यांचा घड व पाच-सहा रुपयांची द्राक्षे यांचा फडशा

पाडला. त्यांना फळे फार आवडत. विशेषतः संत्री व केळी यांची त्यांना मोठी आवड होती. भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगांवर त्यांची भक्ती फार होती. या शेंगा त्याचप्रमाणे संत्री व केळी ते किती खातील, त्याचा नेम नसे.

ते स्वच्छतेचे फार भोक्ते होते. गलिच्छपणा व गबाळेपणा त्यांना तिळभरही खपायचा नाही. त्यांचा पोषाख साधा व नीटनेटका असे. एक पंचा ते नेसत. अंगात सदरा व कोट असे. डोक्याला फेटा असे. बरोबर कांबळे अंथरायला घ्यावयाचे. त्यांच्याजवळ कोट एकच असायचा. एखादे वेळी कोट धुऊन वाळलेला नसायचा. मग ते बाहेर जात नसत. ते स्वतः आपले कपडे पुष्कळ वेळा धुवीत. कऱ्हाडला ज्या ज्या वेळेस असत, तेव्हा कृष्णेवर जाऊन ते आपले कपडे धुऊन आणीत. ते हाताने स्वयंपाक करण्याचे पत्करीत. यात स्वच्छता हाच त्यांचा मुख्य हेतू असे. खानावळीचे अन्न त्यांना पसंत नसे. खानावळी म्हणजे कितपत स्वच्छ असतात हे त्यांत जाणाऱ्यांना तरी सांगण्याची जरूरी नाही. पुण्याला असताना अलीकडे अगदी फार थोडे दिवस त्यांनी एक स्वयंपाक्या ठेवला होता. त्याचे हात वगैरे ते आधी पाहात. खरूज वगैरे दिसली तर त्याला ते दूर करीत. त्यांची स्वयंपाकाची भांडी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ठेवलेली असत. ठिकठिकाणी त्यांच्या उतरण्याच्या जागा ठरल्यासारख्याच होत्या. ते फिरावयास जातानासुद्धा शेताभातातून जाणे पसंत करीत. कारण रस्त्यातून भयंकर धूळ असते. ते म्हणत, "जोपर्यंत आपल्याकडील म्युनिसिपालट्यांना रस्ते शिंपण्याची अक्कल नाही व आवश्यकता वाटत नाही, तोपर्यंत अशा धुळीच्या लोटाने भरलेल्या रस्त्यातून चालणे व नासिकारंध्रे भरून घेणे म्हणजे क्षय रोगाने मरण ओढवून घेण्याप्रमाणे आहे." पुण्यातील एका व्याख्यानात ते म्हणाले, "मला या सभास्थानी येईपर्यंत वाटेत घाणीत पाय भरल्यामुळे दहा दहा-बारा वेळा पाय नळावर धुवावे लागले. त्यांना आंघोळ वगैरे करण्यासही पुष्कळ पाणी लागे. बादलीभर पाण्यात काकस्नान करणे त्यांना आवडत नसे. पाच-सहा घंगाळे पाणी असल्याशिवाय त्यांची आंघोळ व्हायचीच नाही. त्यांची शरीरप्रकृती निकोप होती. कॉलेजमध्ये भरपूर व्यायाम घेतलेला असल्यामुळे त्यांची शरीरयष्टीही कणखर लोखंडाच्या कांबीसारखी झाली होती. मोठेपणी कधी-कधी ते नमस्कारांचा व्यायाम घेत; परंतु पुढे-पुढे ते फिरावयास जाण्याचाच व्यायाम घेत. चहा वगैरे अग्निमांद्य आणणाऱ्या पदार्थांचा ते तिरस्कार करीत." ते खेदाने म्हणत, "अलीकडील लोकांच्या खिशात चहा घेण्यास दोन आणे खुळखुळतात; परंतु तेवढ्याच पैशांत अर्धा मूठ बदामगर, दोन-चार

खडीसाखरेचे खडे, दहा-बारा काळी द्राक्षे असा माधवरावी' मेवा घेता येईल. (माधवरावी म्हणजे न्या. माधव गोविंद रानडे-यांचा मेवा. रानडे यांच्या खिशात बदाम, पिस्ते वगैरे असायचे.) मी हा मेवा घेतो म्हणून तर माझे दंड पिळदार व डोळे पाणीदार आहेत.''

राजवाडे यांचे मुखमंडल पाहून आपल्याला इटालियन देशभक्त मॅझिनी यांची आठवण होत असे, असे नरसोपंत केळकर यांनी लिहिले आहे. राजवाडे हे मॅझिनीप्रमाणेच विचारक्रांती घडवून आणणारे देशभक्त होते. राजवाडे यांची हनुवटी लांब व निश्चय दर्शविणारी होती. डोळे कोठेतरी दूर गेले आहेत असे दिसत. डोळ्यांत एक प्रकारची निःस्पृहता होती. नाक स्वतंत्र वृत्तीचे व तीक्ष्ण बुद्धीचे दर्शक होते. त्यांचे कपाळ भव्य होते. ते मध्यम उंचीचे होते. एकंदरीत त्यांचे शरीर भक्कम व जोरदार, स्फूर्तीचे घर होते. या जोरदारपणातच त्यांच्या आशावृत्तीचे बीज आहे. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. आपण म्हणू ते करू असे त्यांना वाटे. अजरामरवत् संकल्प करून ते कार्यास प्रवृत्त झाले होते. आपण पूर्ण शतायुषी होऊन मगच मरू असे ते म्हणायचे. ८०/८५ वर्षांपर्यंत काम करून मग दहा-पंधरा वर्षे एकांतात विश्रांती घ्यायची असे त्यांनी ठरविले होते. केवढा हा आत्मविश्वास ! निरुत्साही व रडक्या लोकांची त्यांना चीड येत असे. मी आजारी आहे, कपाळ दुखत आहे, कसे काम करावे - असे रडगाणे गाणाऱ्या लोकांना उद्देशून ते म्हणत, ''मरा लेको आजच मरा; तुम्ही जितके लवकर मराल तितके चांगलेच आहे कारण आपल्या रडगाण्यांनी तुम्ही दुसऱ्यालाही नाउमेद करता. आत्महत्या व परहत्या अशी दोन्ही पातके तुम्ही त्यामुळे करीत आहात.'' राजवाडे म्हणजे मूर्तिमंत उत्साह व आशा होय.

ध्येयशून्य व परप्रत्ययेनयबुद्धी अशा लोकांचाही त्यांना संताप येई. एकदा वऱ्हाडात एका विद्वान गृहस्थाने त्यांना विचारले, ''मी काय करावे असे तुमचे मत आहे? मी कोणत्या कार्यास लायक आहे असे आपणास वाटते ?'' राजवाडे रागाने म्हणाले, ''तुम्ही मरावयास मात्र लायक आहात.'' ज्या गृहस्थास इतके दिवस जगात राहून आपण कोणत्या कार्यास लायक आहोत हे समजले नाही, तो दुसऱ्याने सांगितलेल्या गोष्टीवर श्रद्धा ठेवून काय कार्याचे दिवे लावणार, हे त्यास दिसतच होते. आपली बुद्धी, आपली कुवत, आपली हिंमत ओळखून ज्याने-त्याने आपले कार्यक्षेत्र ठरविले पाहिजे. दुसऱ्याने सांगून काय होणार ? आपल्यातील पुष्कळ तरुण लोक असेच असतात. कॉलेजमध्ये ऐच्छिक विषय कोणता घ्यावा हे ते प्रोफेसरांना

जाऊन विचारतात ! निरनिराळी कार्यक्षेत्रे त्यांच्या डोळ्यांसमोर उभी नसतात व उभी राहिली तरी आपण कोणत्या कार्यक्षेत्रात काम करण्यास लायक आहोत हे त्यांचे त्यांना समजत नाही. एक नोकरीचे क्षेत्र वगळले म्हणजे अन्य क्षेत्रे पांढरपेशांना दिसत नाहीत. ज्ञानार्जनातील निरनिराळ्या क्षेत्रांत धडाडीने उडी मारावी व तेथे चमकून देशाचे व स्वतःचे नाव चिरस्मरणीय करावे असे कोणाच्याही ध्यानी-मनी येत नाही. निरनिराळ्या ललित कलांमध्ये प्राविण्य मिळवावे हे पण त्यांना पसंत नसते. व्यापारवृद्धी करून संपत्ती घरात आणण्याचा विचारही अंतःकरणात उदय पावत नाही. ही सर्वस्वी निरुत्साही वृत्ती पाहून राजवाडे संतापत, यात नवल नाही. महाराष्ट्रात धडाडीने काम करणारे पुष्कळ लोक नाहीत म्हणून ते निराश होत; परंतु स्वतःच एकटे एकांतिक निष्ठेने ते पुढे पाऊल टाकीत होते.

ज्वलज्जहाल वृत्तीने कार्यास आजन्म वाहून घेणारे कामसू लोक आढळत नाहीत म्हणून ते चिडखोर व रागीट बनले. 'पुरते कोणाकडे पाहेना, पुरते कोणाशी बोलेना' अशा बेदरकार वृत्तीचे ते बनले. कार्य करावयास नको. फुकट मोठाल्या गप्पा मात्र मारावयास पाहिजेत असे लोकांचे खरे स्वरूप पाहिल्यामुळे ते त्यांच्याजवळ तिरस्काराने व तुच्छतेने वागत; कधी कधी केवळ लहरीपणाही असे. त्यास कोणी काही विचारावयास गेले तर प्रथम त्याला उडवाउडवीची, तुसडेपणाची उत्तरे देत; परंतु जर त्यांना असे दिसून आले की आलेला इसम खरोखर विचारग्रहण करण्याच्या हेतूने आला आहे, तो तुच्छ व हीन वृत्तीचा नसून उत्कटता त्याच्या ठिकाणी आहे तर मग ते त्या गृहस्थाजवळ नीट दोन-दोन तासही मनमोकळेपणाने व हास्ययुक्त मुद्रेने बोलत. मग त्यांच्या कपाळावरच्या आठ्या मावळत व भालप्रदेश प्रशांत दिसे. विद्येचे व विद्वत्तेचे मंगल गांभीर्य व तेज त्यांच्या मुखावर दृग्गोचर होई. गाईचा खरा वत्स पाहिजे; नाहीतर ती लाथच मारावयाची तसे खरा ज्ञानोत्सुक गृहस्थ पाहिला म्हणजे राजवाडे यांचे होई. एकदा आपल्या तिरसट वागणुकीचे रहस्य सांगताना ते म्हणाले, ''अहो, मी लोकांजवळ आधीच शिव्या-शाप देऊन बोलतो; म्हणजे मागून त्यांची भीड पडायला नको. आधी जर गोडी-गुलाबीने, मृदू स्वभावाने लोकांजवळ आपण वागलो तर त्याच लोकांजवळ प्रसंगविशेषी निःस्पृहपणे बोलता येत नाही. मनात येते, काल आपण यांच्याजवळ साळसूदपणे बोललो, चाललो, मग आता याचे मन कसे दुखवायचे. अशी भीड जी भिकेची बहीण म्हणतात ती पडू नये व निर्भीडपणे व सडेतोडपणे सर्वांजवळ बोलता चालता यावे म्हणून मी कोणास जवळ करीत नाही.

निःस्पृहस्य तृणं जगत् – या न्यायाने मी वागतो.'' राज़वाडे स्वतंत्र वृत्तीचे होते. कधी कोणाची पै मी देणे लागत नाही या अभिमानाने ते वागले व राहिले. राजा असो रंक असो सर्वांशी त्यांचा खाक्या सारखाच असे.

राजवाडे यांच्यामध्ये मनाची एकाग्रता हा गुण फार उत्कृष्टपणे होता. कनक व कांता या मनास व्यग्र व लोल करणाऱ्या दोन वस्तूंपासून तर ते दूर होते. या वस्तूंचा त्यांनी संपूर्णतः त्याग केला होता. त्यामुळे त्यांच्या मनाची एकाग्रता सहजतेने होई. दहा–दहा, बारा–बारा तास ते मांडी घालून झपाझप बोरूने कधी–कधी टाकानेही बंदावर बंद लिहून काढीत. ते मोडीत लिहीत व त्यांचे छापण्यासाठी बालबोध कोणाकडून करून घेत. त्यांचे मोडी अक्षर गोलबंद मोत्यांसारखे होते. त्यांच्या अक्षरास सुंदर वळण होते व ते सहज भासे. असे लिहीत असता आजूबाजूचा सावळा गोंधळ त्यांना संत्रस्त करू शकत नसे.

एकदा ते इंदूरला गेले होते. ते ज्या खोलीत लिहावयास बसत, त्या खोलीच्या शेजारच्या खोलीत एक शॉर्टहँड टाइपरायटिंगचा क्लास असे. तेथे पुष्कळ मोठ्याने बोलणे, चालणे होई. आपणास फार त्रास होत असेल, आपल्या लिहिण्या–वाचण्यात व्यत्यय येत असेल; परंतु माफ करा, असे त्यांना म्हटल्याबरोबर राजवाडे म्हणाले, ''त्यात त्रास कसला. मला बिलकुल त्रास वगैरे होत नाही. मुले काय व माकडे काय सारखीच. त्यांच्या गोंगाटाने आपली डोकी नाहीशी होता कामा नयेत. तुम्ही आम्ही डोक्याने मजबूत असले पाहिजे म्हणजे झाले.'' ते बहुधा सकाळच्या वेळी महत्त्वाचे वाचन करीत; दुपारी बारा ते तीनपर्यंत किरकोळ, सटर–फटर व ीत सकाळी जे वाचले असेल त्यावर ते दोनप्रहरी मनन करायचे. कधी–कधी डोक्यात एखादा विचार येऊन ते सारखे मननच करीत बसलेले दिसायचे. एकदा कऱ्हाडला असताना ते असेच काही गंभीर विचारात नेहमी मग्न व गाढलेले असत. ते ज्या स्नेह्यांकडे उतरले होते, त्या स्नेह्याने विचारले, ''अलीकडे सर्व वेळ आळशासारखाच आपण दवडता एकूण; तुमचे वाचन वगैरे काहीच हल्ली नाही.'' त्यावर राजवाडे म्हणाले, ''अरे, आता पाहशील एकदा लिहावयास लागलो म्हणजे कसे लिहीन ते.'' त्यांची ती शांती समुद्राच्या शांतीप्रमाणे असे. समुद्राची शांती हे भावी वादळाचे जसे चिन्ह समजतात, तसे राजवाड्यांची शांती म्हणजे नवीन क्रांतिकारक विचारांनी वादळ उठविण्याची ती खूण होती. पोटात, मेंदूत त्यांच्या विचारांचे थैमान, धुडगूस चालूच असे व या

आंतरिक मंथनापासून काहीतरी सिद्धांतरूपी नवनीत ते जनता जनार्दनाला अर्पण करीत असत.

राजवाडे यांना चातुर्वर्ण्याची उपयुक्तता पटत असावी. समर्थ रामदास स्वामींनी सबगोलंकार दूर करून चातुर्वर्ण्याची घडी पुन्हा बसविण्याचा प्रयत्न केला. समर्थांना 'एकंकार गजावरि पंचानन' असे म्हटले आहे. सर्व गोलंकाररूपी गजाचा संहार करणारे समर्थ हे पंचानन होते. संत मंडळींनी समत्वाचा प्रसार केला; परंतु चातुर्वर्ण्याविरुद्ध त्यांची शिकवणूक नव्हती; त्यांना एवढेच शिकवायचे होते की प्रत्येक वर्णाने वर्णाश्रमानुरूप कर्मे करावीत; परंतु आपण वरिष्ठ, इतर कनिष्ठ ही वृत्ती सोडून द्यावी. वर्णांनी एकमेकांचा तिरस्कार करू नये. समाजाच्या हितासाठी एकमेकांनी त्यागवृत्ती स्वीकारून आपापली कर्मे करावीत. राजवाडे याच मताचे होते. ते म्हणत, ''मी ब्राह्मण आहे म्हणून मी निःस्पृह वृत्तीने व निर्धनतेने राहून ज्ञानार्जनात आयुष्य दवडीत आहे. माझे हे प्राप्त कर्तव्यच आहे. पैशाचा संचय करणे हे माझे काम नाही. हांजी-हांजी करणे हा ब्राह्मण-धर्म नाही. मी वाणी झालो असतो तर वाण्याचे दुकान चालविले असते; मी व्यापार-उदीम केला असता.'' या उक्तीत राजवाड्यांच्या आयुष्याचे सार आहे. राजवाडे राहात होते, त्याप्रमाणे निःस्पृह, निर्धन परंतु ज्ञानवन, मानधन असे वैराग्यवृत्तीचे ब्राह्मण आपणात किती आहेत ? सर्व ब्राह्मण जवळजवळ शूद्रच झाले आहेत असे म्हटले तर वास्तविक कोणास राग न येता लाज वाटली पाहिजे.

स्वार्थत्यागाच्या वायफळ गप्पा राजवाडे यांस खपत नसत. स्वार्थत्याग कार्यकर प्रभावशाली पाहिजे. ज्या स्वार्थत्यागाचा उपयोग नाही, त्या स्वार्थत्यागाची काही अदृष्ट किंमत असली तरी प्रत्यक्षाच्या दृष्टीने तो स्वार्थत्याग अनाठायी आहे. निरनिराळ्या शिक्षणसंस्थांतील लोक कमी पगारावर कामे करतात व आपण स्वार्थत्यागी आहोत असे त्यांना वाटते; पण राजवाडे म्हणत, ''कमी पगार घेता; परंतु करता काय ? नोकरशाहीचा गाडा सुरळीतपणे चालविणारे गुलामच निर्माण करता ना? असे हमाल तयार करण्यासाठी केलेला स्वार्थत्याग म्हणजे राष्ट्रद्रोह आहे. कारण राष्ट्राची कुचंबणा करणारे जे परकी सरकार, त्याला एक प्रकारे साहाय्यच तुम्ही असे लोक निर्माण करून करता. असला स्वार्थत्याग अनाठायी आहे. चांगला लठ्ठ पगार घेत जा. ज्ञानक्षेत्रात काम करून ज्ञानाच्या सीमा वाढवा; परंतु हे कार्य आमचे हे स्वार्थत्यागी विद्वान कितीसे करतात ? निरनिराळ्या कॉलेजांमधून असणाऱ्या

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आचार्यांनी ज्ञानाच्या कोणत्या शाखांमध्ये स्वतंत्र व स्पृहणीय भर घातली आहे ? कोणते अभिनव व उदात्त ग्रंथ निर्माण केले आहेत ? या सर्व गोष्टींच्या नावाने जर शून्याकार असेल, त्याचप्रमाणे शाळा-कॉलेजांतून बाहेर पडणारे विद्यार्थी सेवावृत्तीस आलिंगन देण्यास उत्सुक, मानहानी मुकाट्याने सोसणारे, गतप्राण, नेभळट असेच निर्माण होत असतील, तर या स्वार्थत्यागाचा उपयोग काय ? तेजस्वी व तडफदार अशी तरुण पिढी तरी निर्माण करा, की जी पिढी इंग्रजांना लाथ मारून हाकलून देणे हेच जीवितकार्य मनांत धरून ठेवील किंवा ज्ञानप्रांतात तरी अलौकिक कामगिरी करा की जेणेकरून भारतवर्ष इतर प्रगमनशील राष्ट्रांच्या जोडीने आपली जागा घेईल; परंतु या दोन्ही गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट ज्या स्वार्थत्यागी लोकांकडून, शिक्षण संस्थांकडून होत नाही त्यांनी उगीच मोठेपणाची हौस कशास मिरवावी ?'' राजवाडे अशा स्वार्थत्यागाची टर उडवीत. खरे ज्ञानाचे उपासक आपल्याकडे नाहीत म्हणून त्यांना विषण्णता येई. यामुळेच आपल्या मुंबई युनिव्हर्सिटीसारख्या क्रियाशून्य अगडबंब मढ्याला ते 'न्हवगंड युनिव्हर्सिटी' म्हणत. याच विषण्णतेमुळे काशीच्या भारतधर्म महामंडळाने 'पुरातत्त्वभूषण' ही पदवी राजवाडे यांना मोठ्या प्रेमाने दिली असता, राजवाडे यांनी ते प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) ज्या नळकांड्यात होते, ते नळकांडे घेण्याची उत्सुकता दर्शविली नाही. श्रमाची योग्यता व विद्वत्तेची खरी किंमत समजणाऱ्या पुरुषांकडून गौरव केला गेला, तर तो गौरव स्पृहणीय असतो; परंतु ज्यास विद्वत्तेबद्दल श्रम करावयास नकोत, विद्वत्तेबद्दल, ज्ञानाबद्दल खरी उत्कंठा नाही, विद्वत्तेच्या वा ज्ञानाच्या दृष्टीने ज्यांच्याजवळ भोपळ्याएवढे पूज्य अशानें केलेला मान व गौरव जास्तच उद्वेगकार वाटतो. गुणवंत गुणांचे गौरव हास्यास्पद होते. आपली योग्यता जाणणारे विद्वान नाहीत म्हणून राजवाडे खिन्न होत. आपले ग्रंथ समजण्याची पात्रता नाही म्हणून विद्वानांची त्यांना कीव येई. आजपासून २० वर्षांनी माझे ग्रंथ समजू लागतील असे ते म्हणत. त्यांच्या व्याकरणाचा उपयोग फ्रेंच पंडित करतात; परंतु आपल्याकडील लोकांना ते समजण्याची पात्रता नाही. या उद्वेगजनक प्रकाराने कोणा ज्ञानाभिमान्यांस विरक्तता व संतप्तता प्राप्त होणार नाही ? यासाठी राजवाडे या नव सुशिक्षितांस शाळा, कॉलेजमधून शिकविणाऱ्यांना तुच्छतेने कारकून म्हणत व त्यांच्या स्वार्थत्यागाची पै किंमत ठरवीत. ज्ञानप्रांतात कै. भांडारकर, टिळक वगैरे काही गाढ्या पंडितांबद्दल राजवाडे आदराने बोलत; परंतु टिळकांनीही आपले ग्रंथ इंग्रजीत लिहिले म्हणून त्यांनाही नावे ठेवण्यास या बहाद्दराने कमी केले नाही.

मराठी भाषेबद्दल त्यांचा अभिमान पराकोटीस पोहोचलेला होता. इंग्रजी भाषेत व्यवहार करणाऱ्यांवर ते खवळायचे. फक्त १८९१ मध्ये एकदा ते इंग्रजीत बोलले होते कारण पीळाने, ऐटीने. 'साहेब काय इंग्रजीत बोलतो, मी सुद्धा फर्डे बोलून दाखवितो.' अशा इरेने ते बोलले. पत्रव्यवहार त्यांनी बहुतेक इंग्रजीतून केला नाही. पत्रे ते मोडीत व कधी कधी संस्कृतमध्ये लिहीत. भाषेचा जसा अभिमान, त्याचप्रमाणे आचाराचाही त्यांना अभिमान होता. पंचा नेसून प्रयोगशाळेत काम केले तर ऑक्सिजन निर्माण होत नाही की काय असे त्वेषाने ते विचारीत. स्व-भूमी, स्व-भाषा, स्व-जन व स्व-धर्म यांना वाहिलेले त्यांचे आयुष्य होते व त्यांच्या सर्व बारीक गोष्टींतही ही गोष्ट सूर्यप्रकाशाप्रमाणे स्वच्छ दिसते.

राजवाडे रागीट होते. महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचे अध्वर्यू विजापूरकर त्यांना प्रेमाने दुर्वास म्हणत व कोल्हापूरला ते जे घर बांधणार होते, तेथे या दुर्वासांसाठी ते एक स्वतंत्र खोली ठेवणार होते. राजवाडे कधी कोणाकडे उतरले तर त्यांच्या पोथ्या पुस्तकांची पोती, रुमाल त्यांच्याबरोबर असायचा. 'माझ्या पुस्तकांना पोराबिरांनी हात लावला तर मी थोबाडीत देईन' असे प्रथमच सांगून मग ते तेथे राहावयाचे. म्हणजे मागाहून भांडण व्हावयास नको. आधीच हडसून खडसून असलेले बरे. कधी-कधी त्यांचा राग अनावर होई व त्या रागाच्या भरात ते वाटेल ते बोलत. एकदा ग्वाल्हेरला एका भिक्षुकाजवळ ते एक महत्त्वाची जुनी पोथी मागत होते. त्या भिक्षुकाने ती पोथी दिली नाही, तेव्हा संतापाने राजवाडे म्हणाले, ''तुझ्या विधवा बायकोपासून मी सर्व पोथ्या घेऊन जाईन.'' हेतू बोलण्यातील हा की या पुस्तकांची व पोथ्यांची तुझ्या मरणानंतर तुझी बायको रद्दी म्हणून विक्री करील. वाण्याच्या दुकानात माल देण्यासाठी मग त्या रद्दीचा उपयोग होतो. राजवाडे यांनी वाण्याच्या दुकानातून कित्येक महत्त्वाचे कागद विकत घेतले होते. वऱ्हाडात एकदा हिंडताना एका वाण्याच्या दुकानात एक-दोन दौलताबादी जुने कागद त्यांनी पाहिले. त्या वाण्याजवळ आणखी चार-पाच कागद होते. राजवाडे यांना ते कागद महत्त्वाचे वाटले म्हणून ते कागद त्यांनी वाण्याजवळ मागितले; परंतु तो वाणी देईना. राजवाडे सांगतात, ''मी ढळाढळा रडलो तरी तो वाणी कागद देईना. शेवटी कनवटीचा रुपया फेकला, तेव्हा त्या वाण्यास दया आली व ते कागद मला मिळाले.'' असे महत्त्वाचे कागद ज्यांच्या घरात असतात, त्यांना त्यांचे महत्त्व समजत नसते; रुमाल बांधलेले, धूळ खात असतात. फार तर दसऱ्याच्या वेळेस त्यांची झाडपूस होऊन त्यांच्यावर गंधअक्षता पडावयाच्या

आणि घरात कर्ता, मिळवता कोणी राहिला नाही तर या पोथ्या रद्दी म्हणून वाण्यास विकावयाच्या असे नेहमी होत आले आहे. राजवाडे यांनी या गोष्टी पाहिल्या होत्या व म्हणून त्यांनी त्या ब्राह्मणाजवळ पोथी मागितली असता त्याने दिली नाही म्हणून ते भरमसाट अशुभ बोलून गेले; परंतु त्यांचा हा राग त्यांना आलेल्या कटू अनुभवाचा परिणाम होता. अनेक अनुभवांचा तो उद्रेक होता. त्यांच्या विक्षिप्तपणातही व्यवस्थिशीरपणा होता, तसेच त्यांच्या रागासही काहीतरी सबळ कारणे असत. निष्ठेने कार्य करीत असावे. त्याच्यासाठी अनंत कष्ट करावे आणि स्वजनांकडून अल्पस्वल्प अंश मदतही होऊ नये अशा वेळी अशी जळजळीत वाणी तोंडातून बाहेर न पडली तरच आश्चर्य. ज्याचे जळते त्यालाच कळते. इतर कार्याविषयी उदासीन असणाऱ्यांना या रागाचे, या क्रोधाचे आश्चर्य वाटेल व काय विक्षिप्त व आततायी हा राजवाडे असे ते म्हणतील; परंतु राजवाडे यांना असे उद्‌गार काढावयास लावणारी माणसे आमच्या देशात आहेत म्हणून मात्र आम्हाला वाईट वाटते. राजवाडे यांच्या कार्यनिष्ठेबद्दल आदर दुणावतो आणि या महापुरुषाचे अंतःकरण कसे कार्यासाठी तिळतिळ तुटत असेल ते मनास समजून येते.

ईश्वरावर त्यांची आयुष्याच्या पूर्वार्धात श्रद्धा होती; परंतु पन्नाशी उलटल्यावर या मतांमध्येही उलटापालट झाली. त्यांनी वयाला सेहेचाळीसावे वर्ष लागले असताना जे उद्‌बोधक टिपण लिहिले आहे, त्यात ते म्हणतात, ''ईश्वराची कृपा भरपूर पाहिजे म्हणजे सर्व होईल.'' हा विश्वास पुढे राहिला नाही. ईश्वर ही एक मानवी भ्रांत कल्पना आहे असे ते म्हणू लागले. नास्तिकपणाकडे ते झुकू लागले; परंतु समाजदेवाचे अमरत्व व अस्तित्व त्यांना मान्य होते व त्यासाठी ते रात्रंदिवस खटपट करीत होते. ईश्वरावर श्रद्धा ठेवून ईश्वरास संतुष्ट करण्यासाठी, परलोकी परमेश्वर प्रसन्न व्हावा यासाठी कार्ये करणारे लोक थोर खरे; परंतु अशा लोकांना कार्य करण्यास उत्साह देणारा परमेश्वर हा आधार तरी असतो; परंतु ज्यांना ईश्वरी आधाराचेही सौख्य नाही, असे राजवाड्यांसारखे लोक पारलौकिक सुख वगैरे काही न मानताही मरणानंतर काही आहे असे न मानताही केवळ निरपेक्ष दृष्टीने कामे करतात, याचे कौतुक वाटते व त्यांच्याबद्दल मनात जास्तच आदर व पूज्यभाव वाटतो.

महाराष्ट्राच्या पूर्ववैभवासंबंधी ते आदराने बोलत; परंतु सध्याच्या महाराष्ट्राच्या औदासिन्याबद्दल ते खिन्न होते. स्वार्थत्यागवृत्तीला महाराष्ट्रात मान नाही, खरा स्वार्थत्याग, खरी कार्यवृत्ती, खरा कार्यकर्ता यांची किंमत महाराष्ट्रीयनांना होत नाही,

असे त्यांना वाटे. काव्हूर या इटालीतील मुत्सद्याच्या चरित्राच्या प्रस्तावनेत ते लिहितात, ''स्वार्थत्यागाची किंमत समजणारी अक्कल समाजात नसेल तर स्वार्थत्याग गाभटतो.'' लो. टिळक यांच्या केसरी पत्रासंबंधी ते म्हणत, ''या पत्रासाठी बळवंतराव एवढी झीज सोसतात; त्यातील अग्रलेखांनी व स्फुटांनी सबंध दक्षिण व वऱ्हाड नागपूरचा भाग त्यांनी हलवून सोडला आहे, तरी या पत्राच्या प्रती लाखांनी का खपू नयेत ! महाराष्ट्र एक दरिद्री तरी असला पाहिजे, नाहीतर कंजूष तरी असला पाहिजे. प्रत्येक गावातील मारुतीच्या देवळातून केसरी मोठ्याने वाचला जाऊन तो लोकांनी ऐकावा असे झाले पाहिजे. राजकीय विचारांचे लोण सर्वत्र नेऊन पोहचविले पाहिजे.'' महाराष्ट्राच्या औदासिन्याबद्दल जरी ते असे उद्गार काढीत असले तरी कधी कधी जनतेवर असलेला आपला विश्वास ते प्रकट करीत इतिहास साधनांच्या एका खंडातील प्रस्तावनेत ते लिहितात, ''कार्य करविता स्वदेशातील अभिमानी समाज आहे.'' खऱ्या स्वार्थत्यागाची बूज जनता केल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणत. 'हे राज्य व्हावे असे श्रींच्या मनात फार आहे.' या शब्दांनी श्रीशिवछत्रपतींनी आपली श्रद्धा बोलून दाखविली आहे. 'कार्यकर्त्या मनुष्यास महाराष्ट्र, सर्व भारतवर्ष उपाशी मरू देणार नाही.' असा विश्वास ते प्रगट करीत असत. त्यांचा राग जनतेवर नसून अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या अर्धवट सुशिक्षितांवर असे, असे विचार केला म्हणजे वाटते.

राजवाडे हे निर्व्यसनी होते हे सांगण्याची जरूरी नाही. ते विरक्त व संन्यस्त वृत्तीने राहिले हे सर्वांना मशहूर आहे. फक्त विडीचे व तंबाखूचे त्यांना व्यसन होते; परंतु या व्यसनाचेही राजवाडे गुलाम झाले नव्हते. कित्येक दिवस ते विडीशिवाय खुशाल राहू शकत व विडी ओढावयास न मिळाल्यामुळे कपाळ वगैरे दुखले असेही त्यांना होत नसे. एकदा त्यांच्या एका स्नेह्याने हजार-पंधराशे विड्यांचा एक गठ्ठा दिला, त्या वेळी ते रोज़-रोज ४०/५० विड्या ओढीत; परंतु त्यांना विचारले असता ते म्हणाले, ''सध्या आहेत म्हणून मी ओढतो, मी विकत घेऊन काही ओढीत नाही;'' परंतु ते कधी विकतही आणीत असत; तथापि व्यसनाचे ताब्यात न जाता व्यसन त्यांनी आपल्या ताब्यात ठेवले होते. लिहिताना कधी तोंडात तंबाखू टाकून ते चघळायचे.

त्यांना स्वतःच्या राहत्या जागेभोवती गुरेढोरे आलेली खपत नसत. गुरांमुळे घाण होते व मग डास वगैरे होतात, असे त्यांचे मत असे.

राजवाडे यांचा स्वभाव जरा भिन्ना होता. ते फिरावयास गेले तरी काळोख पडण्यापूर्वी परत यायचे. सहा वाजल्यानंतर ते फिरावयास जात नसत. माघारी यायचे. त्यांना सापाबिपांची फार भीती वाटे. पावसाळ्यात ते फिरायला जात नसत. तसेच हिरवळीच्या जागेवरून, कुंपणावरून वगैरे फिरण्यास त्यांना भीती वाटे कारण अशा ठिकाणी सर्प वगैरे फार असतात. त्यांच्याबरोबर त्यांचा सोटा नेहमी असायचाच.

परंतु ही भीती केवळ आपल्या चुकीमुळे जीवितास वगैरे मुकू नये अशा स्वरूपाची असावी. नाहीतर ते व्यक्तींना किंवा समाजाला भीत नसत. सरकारवरही त्यांचा विश्वास नसे व सरकारसंबंधी सडेतोड उद्गार त्यांनी काढले आहेत. म्हणजे ही भीती केवळ भ्याडपणाची नव्हती. ती त्यांच्या स्वभावाशी विसंगतच असली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती तडफदार, तेजस्वी व निःस्पृह बनावी अशी तर त्यांची जन्मशिकवणूक आहे. विद्यार्थी व तरुण लोक यांनी नामर्द व लुसलुशीत वृत्तीचे न होता रणमर्द जवानमर्द व्हावे असे त्यांना खरोखर वाटे. गाणे-बजावणे, नाच, कोमल-नाजूक वाद्ये यांचा त्यांना तिटकारा होता. त्यामुळे वृत्ती बायकी होतात असे त्यांना वाटे. विश्ववृत्ताच्या १९०७ सालच्या सप्टेंबरच्या अंकात ते लिहितात, 'क्इं क्इं, किणकिण, गुइंगुइं वगैरे नरम आवाज उत्पन्न करणारी सतार, दंतवाद्य, गिटार वगैरे भिकार वाद्ये खुद्द भीमसेनालाही बृहन्नडा बनवतील; मग सामान्य पोलीस, शिपाई व खर्डेघाशे यांना त्यांनी साक्षात स्त्रैणपणा आणला तर त्यात नवल नाही. बायकी आवाज काढणारे जे जनानखां व फुटक्या मडक्यासारख्या थालिपिठ्या व रेक्या आवाज काढणारे लंवकंठा शास्त्री त्या दोघांनाही प्रजा बिघडविण्याची सक्त मनाई असावी. नाकातून गाणाऱ्या पारशी नाटक कंपन्या व तानांवर ताना घेणाऱ्या मराठी नाटक कंपन्या संस्थानात बिलकुल शिरू देऊ नयेत. यांच्याऐवजी पोवाडे म्हणणारे शाहीर, एकतारीवर भजन करणारे महार, गंभीर वीण्यावर व मर्दानी डफावर आलापणारे लावणीकार, यांचा परामर्ष कदाचित प्रजेला जास्त हितकारक होईल. सगळ्यात रणभेरी, रणतंबोर, रणझांज वगैरे हत्यारे प्रजेकडून ऐकविल्यास व योजविल्यास तिच्यात मर्दानी बाणा उसळेल. रडकी गाणी व किरटी वाद्ये वाजविण्यास किंवा भिकार नाटक पाहण्यास जेथील प्रजेला मुबलक वेळ आहे, तेथील प्रजा खुळी, परतंत्र, जनानी व झिंगलेली आहे असे खुशाल समजावे.'' अशा प्रकारची तेजस्वी वृत्ती तरुणांत निर्माण व्हावी म्हणून गीतवाद्येही बंद करू म्हणणारा पुरुष स्वतः भ्याड वृत्तीचा कसा असेल ? भीतीपेक्षा संशय त्यांच्या मनात होता असे

वाटते. काही असो. ही भ्याड वृत्ती दुसऱ्याच काहीतरी प्रकारची म्हणजे उगीचच्या उगीच आततायीपणाने जीव धोक्यात येऊ नये अशा तऱ्हेची असावी कारण जगले तर सर्व कामगिरी होणार आहे. महाभारतात विश्वामित्र चांडालास म्हणतात, 'जीवन्धर्मपापनयात् !' आधी जिवंत राहू दे आणि मग परोपकार धर्म करू दे. व्यर्थ आततायीपणाने जिवावर बेतू नये म्हणून राजवाडे खबरदारी घेत असावेत. तो नामर्दी भित्रेपणा होता असे वाटत नाही.

राजवाडे हे वृत्तीने साशंक असत. मनुष्याच्या बोलण्या-चालण्याचा त्यांना विश्वास वाटत नसे. मनुष्याच्या हेतूंबद्दल पुष्कळ वेळा ते विपर्यस्त बोलत. मोर्ले साहेबांनी जे म्हटले आहे, 'It is not always safe to suppose the lowest motives to be the truest.' दुसऱ्यांचे हेतू नेहमीच अशुद्ध समजणे हे चांगले नाही. परंतु राजवाडे हे जगाकडे चांगल्या दृष्टीने पाहात नसत. कदाचित जगाचा कटू अनुभव आला त्याचा हा परिणाम असेल. त्यांचा हा स्वभावविशेष दर्शविणाऱ्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. परंतु त्या गोष्टींचा मी उल्लेख करीत नाही. त्यांच्या स्वभावात जनतेविषयी साशंकता होती खरी. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर पुढे-पुढे कोणत्याही चळवळीत भाग घेत नसत व म्हणत, 'माझा या देशातील लोकांच्या शब्दांवर विश्वास नाही.' तसेच राजवाडे यांचे झाले असेल.

(वरील एकंदर लिहिण्यावरून राजवाडे यांच्या स्वभावाची अल्पस्वल्प शतांशाने तरी कल्पना वाचकांना येईल, असे वाटते.)

✦✦✦

अंत व उपसंहार

काळाचा अजब तडाखा कोणाला सुटला आहे ? मी मी म्हणणारा आशावादी काळाने केव्हाच गिळंकृत केला जातो. तसेच शेवटी या महापुरुषाचे झाले. आपण शंभर वर्षे जगू व शतायुवै पुरुषः हे श्रुतिवचन सार्थ करू अशी राजवाडे यांना बालंबाल खात्री होती. परंतु परमेश्वरी नेमानेम निराळचे होते. कार्य करणारा पुरुष आशेच्या व इच्छाशक्तीच्या जोरावर मृत्यूलाही दूर ढकलू पाहात असतो, परंतु वास्तविक कोणासही मृत्यू दूर करता येत नाही. त्याची वेळ झाली म्हणजे तो येणारच.

मरणाचे आधी वर्ष दीड-वर्ष आपल्याला काहीतरी विकार जडला आहे, असे राजवाडे यांना वाटू लागले. म्हणून तर पुण्यात राहण्याचे सोडून ते धुळ्याला आले. त्यावेळी ते जरा खिन्न व चिंताक्रांत दिसले. आपले मित्र धुळ्याचे रा. भट यांना ते म्हणाले, ''तुम्ही सुग्रास अन्न जेवता; परंतु आम्हास असे सुग्रास अन्न कोठे मिळणार?'' कदाचित् याच उद्‌गारावरून बंगालचे जदुनाथ सरकार यांनी राजवाडे हे पुनः लग्न करू इच्छित होते असे लिहिण्याचे धाडस केले असेल. सुताने स्वर्गास जाता येते म्हणतात ते असे. जन्मभर ज्याने स्वयंपाक केला त्याने एखादे वेळी आपल्या मित्राजवळ असे उद्‌गार काढले म्हणजे त्याचे वैराग्य एकदम नष्ट झाले व तो सुखलोलुप बनला असे कोणी विचारी मानील का ? परंतु कर्णोपकर्णी वार्ता ऐकून पराचा कावळा होतो व राईचा पर्वत होतो त्यातलेच हे.

धुळ्यास आल्यावरही एकदम भयंकर वेदना मस्तकात सुरू झाल्यामुळे ते नाशिक येथे गेले. तेथे डॉक्टरांकडून तपासणी झाली व त्यांना बरे वाटू लागले व पुन्हा

धुळ्याला ते आपले आवडते काम जोराने सुरू करणार होते. परंतु मरण जवळच येत होते. हे दुखणे वगैरे शेवटचीच चिन्हे होती.

मरावयाचे वेळेस राजवाडे धुळे येथे आले होते. धुळ्यावर राजवाड्यांचा फार लोभ होता. रामदासी संशोधनासाठी त्यांनी ज्यांना स्फूर्ती दिली ते समर्थ लिहिणारे श्री. भट याच धुळ्याचे अलंकार होते. राजवाडे यांचे महत्त्व जाणणारे व त्यांना मानणारे येथे बरेच विद्वान लोक होते. राजवाडे यांच्या संग्रहाचा बराच भाग धुळ्यास आहे. अशा या शहरीच आपला देह ठेवण्यास नकळत राजवाडे आले. त्यांची प्रकृती चांगली धडधाकट होती. धातुकोशाचे काम ते जोराने सुरू करणार होते. रोज पाच-सहा मैल फिरावयास जाण्याची त्यांची ताकद होती. परंतु नकळत मृत्यू जवळ-जवळ येत होता. २७ डिसेंबर १९२६ रोजी सोमवार होता. सोमवारी राजवाडे यांची प्रकृती उत्तम होती. शंकरराव देव वगैरे मंडळ त्यांच्याजवळ बोलणे-चालणे करून गेली. मंगळवार उजाडला. सकाळी साडेअकरा वाजता ते जेवणास बसले; परंतु जेवण राहिलेच. त्यांना उलटी झाली; शौचासही लागली म्हणून ते जाऊ लागले; परंतु शक्ती नव्हती. क्षीणता एकाएकी आली व ते चौकात पडले. नोकर बंगल्यात झाडीत होता; तो आला. इतक्यात हस्तलिखिते जी मिळविली होती, त्यांची यादी करण्यास येणारे नित्सुरे मास्तर तेथे आले. त्यांनी राजवाडे यांना उचलून आणले व अंथरुणावर निजविले. त्यांची नाडी मंद चालू लागली होती ; नाडीत क्षीणता आली होती. लसूण वगैरे चोळण्यात आल्यावर ते शुद्धीवर आले व त्यांनी विचारले, ''काय चोळता ?'' डॉक्टरांना बोलवयास त्यांनी सांगितले. डॉक्टर आले व औषध देण्यात आले. मंगळवारचा दिवस गेला व अमंगल टळले. बुधवारी एनिमा देण्यात आला. झोपही चांगली लागली. यामुळे गुरुवारी त्यांना जास्त हुशारी व तरतरी वाटली. परंतु ही हुशारी मालवणाऱ्या दिव्याच्या वाढत्या ज्योतीप्रमाणे आहे, तुटणाऱ्या ताऱ्यांच्या वृद्धिंगत तेजाप्रमाणे आहे हे आशातंतूवर जगणाऱ्या मनास समजले नाही. आपण हा लोक सोडून जाणार ही राजवाडे यांना कल्पनाही नव्हती. इतर कोणासही राजवाडे लवकर आपणास अंतरणार असे वाटले नाही. शुक्रवार उजाडला. सकाळी शौचास झाले. दोनदा दूध त्यांनी मागून घेतले. परंतु वेळ आली. साडेआठ वाजता कळ आली. तीच शेवटची. कळ आल्यावर ते खोलीतून कचेरीत येऊ लागले तो पडले. पुनरपि डॉक्टरांना बोलावले गेले. परंतु डॉक्टर येण्यापूर्वीच सर्व आटोपले. श्री. शंकरराव देव याचा पुतण्या दाजीबा याने मरताना मांडी दिली व त्या मांडीवर या देशार्थ

तळमळणाऱ्या जिवाने १९२६ डिसेंबरच्या ३१ तारखेला शांतपणे प्राण सोडला. आशेचा मेरू उन्मळला. कर्तव्यनिष्ठेचा सागर आटला. उत्साहाचा सूर्य अस्तंगत झाला. महाराष्ट्र सरस्वती अनाथ झाली; महाराष्ट्र इतिहास पोरका झाला.

राजवाडे हे महापुरुष होते. विद्यारण्यांसारखे ते विद्येचे निस्सीम उपासक होते. परंतु त्यांचे सर्वांत मोठे कार्य म्हणजे महाराष्ट्रास ज्ञानप्रांतात पुढे घुसण्यास त्यांनी जागृती दिली. स्वदेशाचा इतिहास सांगून स्वदेशाची दिव्य व स्तव्य स्मृती प्रचलित केली. प्रख्यात महाराष्ट्रीय इतिहासकार सरदेसाई आपल्या पाटणा युनिव्हर्सिटीतर्फे दिलेल्या व्याख्यानात राजवाडे यांचेसंबंधी जे गौरवाने बोलले, त्याचा मी अनुवाद करतो. 'जनतेच्या मनात ऐतिहासिक कादपत्रांच्या संशोधनासंबंधीची तीव्र जागृती करण्याचे सर्व श्रेय या महापुरुषाला आहे. त्यांच्याजवळ साधनसामग्रीही नव्हती. संपत्तीचा त्यांना पाठिंबा नव्हता. परंतु कॉलेजातून बाहेर पडल्यावर या कार्योन्मुख पुरुषाने घरोघर भटकून, दारोदार हिंडून कागदपत्र संग्रह करण्याचे काम चालविले. पुणे, सातारा, नाशिक, वाई या मोठ्या शहरांतच नव्हे तर लहानसहान खेड्यापाड्यांतूनही जुने सरदार, जुने उपाध्ये, जुने कारकून, जुने कुळकर्णी, देशपांडे यांच्या घरी ते खेटे घालीत. कागदपत्रे जमा केल्यावर नितांत निष्ठेने व एकाग्रतेने त्या पत्रांची ते चिकित्सा करीत. असे करीत असता त्यांची तहानभूकही हरपून जायची. अल्प साधनसामग्रीच्या जोरावर सर्व बृहन्महाराष्ट्रभर ते वणवण हिंडले व उरापोटावरून, खांद्या-डोक्यावरून कागदपत्रांची पोती त्यांनी वाहून आणिली. हा अफाट साधनसंग्रह महाराष्ट्रात ठिकठिकाणी आपल्या मित्रांकडे ठेवला आहे. राजवाडे यांची निरपेक्ष कार्यशक्ती पाहून इतरही तरुणांना स्फूर्ती मिळाली व खंद्या वीराच्या सभोवती संशोधनाच्या समरांगणात कार्य करण्यासाठी तरुणांची मांदी मिळाली. राजवाडे हे संन्यस्तवृत्तीचे, त्यागाचे उत्कृष्ट आदर्श आहेत. मनुष्य एका कार्यास जिवेभावे करून जर वाहून घेईल, तर तो किती आश्चर्यकारक कार्य करू शकतो हे संकटे, दारिद्र्य व सहानुभूतीचा अभाव वगैरे निरुत्साहकारी गोष्टींचे धुके कार्यनिष्ठेच्या प्रज्वलित सूर्यप्रभेसमोर टिकत नाही.

राजवाडे हे केवळ संग्राहकच नाहीत तर या संग्रहित साधनांपासून किती महत्त्वाची माहिती मिळते व त्यापासून कसे महत्त्वाचे सिद्धांत स्थापन करता येतात हे ते दाखवून देत. राजवाडे अर्थशोधनाच्या शास्त्रात प्रवीण झाले होते. समुद्रात बुड्या मारून मोती आणणाऱ्या पाणबुड्यांप्रमाणे ते कागदपत्रांच्या सागरातून तत्त्वमौक्तिक काढण्यात तरबेज झाले होते. जे पत्र इतरांना क्षुल्लक वाटे, त्याच पत्रातून नाना

प्रकारची अभिनव माहिती राजवाड्यांची बुद्धी उकलून दाखवी. त्यांच्या बुद्धीजवळ मुकी पत्रे हृद्गते बोलू लागत. साडेतीनशे पानांचे बावीस खंड कागदपत्रांनी भरलेले त्यांनी छापले व त्या खंडाला मार्मिक व अभ्यासनीय अशा उद्बोधक प्रस्तावना लिहिल्या. जी पत्रे त्या-त्या खंडांतून छापली असत त्या पत्रांशीच त्या प्रस्तावनांचा संबंध असे असे नाही; तर कधी कधी इतिहास शास्त्रासंबंधी नाना प्रकारचे विवेचन या प्रस्तावनांमधून येई. इतिहासशास्त्राची व्याप्ती, या शास्त्राचे महत्त्व, या शास्त्राचा उद्भव वगैरेसंबंधी उद्बोधक विवेचन त्यांच्या तत्त्वप्रचुर लेखणीतून येई.

राजवाडे यांनी केवळ जुने कागद उजेडात आणले आहेत, एवढेच त्यांचे कार्य नाही तर त्या पत्रांतून निरनिराळ्या काळाचा व निरनिराळ्या अंगांचा महाराष्ट्रीय इतिहास त्यांनी बनविला आहे. मानवी विचार व प्रगती, भाषाशास्त्र व मराठी भाषेची उत्पत्ती, सामाजिक व राजकीय भारतीय जीवनाचे स्वरूप, महाराष्ट्राच्या वसाहत कालाचे विवेचन - वगैरे विविध गोष्टींवर त्यांनी आपल्या लेखांनी अद्भुत प्रकाश टाकला आहे. नवीन अभ्यासाने त्यांच्या सिद्धांतांपैकी काही असत्य व भ्रामक ठरतील तरी पण त्यांच्या लेखांच्या अभ्यासाने अभ्यासूंना निःसंशय महत्त्वाची मदत होईल.

राजवाडे यांची व्यापक दृष्टी वेदकाळापासून तो पेशवाईच्या अंतापर्यंत सारखीच स्वैर विहार करी. त्यांच्या लेखातील त्यांची सर्वतोगामी विद्वत्ता व व्यापक गाढी बुद्धी पाहिली म्हणजे आपण चकित होतो, भांबावून जातो. कागदपत्र, ताम्रपट, शिलालेख वगैरे सर्व साधनांच्या साहाय्याने ते इतिहास-संशोधनास चालना देत. त्यांची बुद्धी कुशाग्र होती. पायाळू माणसांना भूमिगत द्रव्य कोठे आहे हे जसे समजते, त्याचप्रमाणे त्यांच्या बुद्धीस अचूक तत्त्वसंग्रह सापडे. त्यांची तीक्ष्ण बुद्धी, निरतिशय कार्यश्रध्दा, निरुपम स्वार्थत्याग यांना महाराष्ट्रात तोड नाही. सुखनिरपेक्षता व विलासविन्मुखता, मानापमानाची बेफिकिरी या सर्व गुणसमुच्चयांमुळे राजवाड्यांची कृतज्ञताबुद्धीने महाराष्ट्राने सदैव पूजा केली पाहिजे. ते ज्ञानसेवक होते; विद्येचे एकनिष्ठ उपासक होते. आयुष्यात ज्ञानप्रसार व विचार-प्रसार याशिवाय दुसरे कार्यच त्यांना नव्हते. 'जोरदारपणा' या एका शब्दात त्यांचे वर्णन करणे शक्य आहे. त्यांचे मन जोरदार होते; शरीर जोरदार होते; त्यांची मते जोरदार होती; त्यांचे सिद्धांत जोरदार होते; कागदपत्रांचे अर्थ उत्कृष्ट तऱ्हेने ते जसे फोड करून दाखवित, त्याप्रमाणेच जर ते अचूक मार्गदर्शक झाले असते तर हिंदुस्थानातील ऐतिहासिक ज्ञानक्षेत्रात ते अद्वितीय मानले गेले असते.'

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

एका समव्यवसायी थोर विद्वानाने राजवाडे यांची केलेली ही स्तुती यथार्थ आहे. स्तुती करणाऱ्या पुरुषाच्याही मनाचा निर्मळपणा पाहून समाधान वाटते. नाहीतर समव्यवसायी लोक पुष्कळ वेळा मत्सरग्रस्त असतात; प्रांजलपणाचा त्यांच्या ठायी अभाव दृष्टीस पडतो. तसे यांच्या बाबतीत झाले नाही ही आनंदाची गोष्ट आहे.

राजवाडे यांनी इतिहासाची साधने दिली; परंतु त्यामधून सुसंबद्ध असा थोर महाराष्ट्राचा इतिहास निर्माण केला नाही. परंतु असा इतिहास लिहिण्याचे त्यांच्या मनात कधी कधी येत असावे. एकदा ते म्हणाले, ''पेशवाईचा इतिहास लिहिण्याची साधने सध्या उपलब्ध आहेत; कोणीतरी हुशार पदवीधराने हे कार्य अंगावर घ्यावे.'' शिवाजीचे चरित्र लिहा असे त्यांना कोणी सांगितले म्हणज ते म्हणत, ''अद्याप भरपूर माहिती हे चरित्र लिहिण्यास उपलब्ध नाही.'' राजवाडे हे इतिहासाची साधने निर्माण करीत व ते अन्य मार्गाकडे वळत. नवीन नवीन ज्ञानक्षेत्रे लोकांच्या दृष्टीस दाखवायची, नवीन नवीन ज्ञानप्रांतात स्वत: शिरून लोकांना 'इकडे या, इकडे पाहा केवढे कार्यक्षेत्र आहे' असे सांगायचे - अशा प्रकारची त्यांची वृत्ती असे. साधने निर्माण करून देणे हे मुख्य काम आहे. मग त्यातून सुंदर इमारत निर्माण करणे तादृश्य कठीण नाही. साधन-सामग्रीच्या जोरावर राजवाडे यांना इतिहास लिहिताच आला नसता हे म्हणणे अ-यथार्थ आहे असे आम्हाला वाटते. राममाधवविलासचंपूच्या भव्य प्रस्तावनेत १००-१२५ पानांमध्ये शहाजीराजांचा असा सुंदर व स्फूर्तिप्रद इतिहास त्यांनी लिहिला आहे. चिंतामणराव वैद्य यांनी राधामाधवविलासचंपूच्या या प्रस्तावनेच्या परीक्षणात लिहिले होते, ''राजवाडे यांच्या हातून मराठ्यांचा उत्कृष्ट इतिहास लिहिला जावा.'' यावरून राजवाडे इतिहास लिहिण्यास लायक होते, असेच त्यांना वाटले असावे. ,गिबनसारख्या इतिहासकारांप्रमाणे त्रिखंडविख्यात इतिहासलेखक त्यांनाही होता आले असते. परंतु पात्रता होती एवढ्यावरून ते झाले असे मात्र कोणी म्हणू नये; तसे होणे त्यांना शक्य होते हे मात्र खरे. इतिहासलेखकास मन शांत व निर्विकार पाहिजे (philosophic clam) व ते राजवाडे यांच्याजवळ नव्हते म्हणून त्यांना गिबनसारखे होता आलेच नसते असे, बंगालमधील सुप्रसिद्ध इतिहासलेखक जदुनाथ सरकार यांनी लिहिले राजवाडे हे जरा पूर्वग्रहदूषित असत हे खरे. त्यांची दृष्टी केवळ सरळच नव्हती. कधी सरळही असे; परंतु जदुनाथ यांना आदर्शभूत वाटणारा गिबन तो तरी पूर्वग्रहांपासून संपूर्णत: अलिप्त होता का? गिबनच्या रोमन साम्राज्याच्या इतिहासातही पूर्वग्रहदूषित दृष्टी अनेक विद्वानांनी दाखविली आहे. सारांश पूर्वग्रहांपासून अलिप्त कोणीच नसतो.

राजवाडे यांचे कार्यक्षेत्र एकच नसे, म्हणून त्यांनी इतिहास लिहिला नाही. जगते तर कदाचित लिहितेही. निरनिराळी कार्यक्षेत्रे उघडी करणे व समाजाच्या बुद्धिमत्तेला निरनिराळ्या अंगांनी कामे करण्यास लावणे, त्यांचा व्याप व पसारा वाढविण्यास वाव देणे हे त्यांचे कार्य होते. भाषा, व्याकरण, इतिहास, समाजशास्त्र सर्वत्र ते अनिरुध्द संचार करीत. यातील तात्पर्य हेच होय. म्हणूनच डॉ. केतकर म्हणतात, 'एका क्षेत्राचा अभ्यास करून ते टाकून दुसरे क्षेत्र घ्यावे ही राजवाडे यांची वृत्ती होती पण ती 'Jack of all tracks and master of nones' 'एक ना धड भाराभर चिंध्या' यासारखी नव्हती. तर त्या वृत्तीची कारणे फार खोल होती. त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्यात एका गोष्टीची जाणीव दिसे व ती जाणीव म्हटली म्हणजे आपणच राष्ट्रविकासाच्या भावनेने कामात पडलेले पहिले संशोधक आहोत, ही होय. महाराष्ट्राच्या बुद्धीस सर्व प्रकारे चालना देण्यासाठी, त्यांनी अनेक क्षेत्रात संशोधन स्वतः आपल्या अंगावर घेतले असावे; आणि ज्या प्रकारच्या क्षेत्रातच कार्य न करता त्या क्षेत्राचाही त्याग करावयास त्यांचे मन तयार झाले असावे. राजवाडे हे आपल्या आयुष्याकडे 'इतिहाससंशोधक' या नात्याने पाहात नसून संस्कृती विकासप्रवर्तक (संस्कृतीच्या निरनिराळ्या अंगांचा विकास करण्याच्या मार्गात स्वतः जाणारे व लोकांना नेणारे) या नात्याने पाहात आणि त्यांची खरी किंमत ओळखणाऱ्याने त्यांच्या आयुष्याचे याच दृष्टीने अवगमन केले पाहिजे. डॉ. केतकर यांचे हे राजवाड्यांच्या कार्यासंबंधीचे विवेचन फार महत्वाचे आहे व ही दृष्टी घेऊन आपण राजवाड्यांकडे पाहिले म्हणजे त्यांनी गिबनप्रमाणे इतिहास का लिहिले नाहीत वगैरे प्रश्नांचे मार्मिक उत्तर मिळते.

असा हा धगधगीत ज्ञानवैराग्याचा तेज:पुंज पुतळा महाराष्ट्रास मोठ्या भाग्याने मिळाला. प्रो. भानू म्हणतात, "राजवाडे यांनी समर्थ ही पदवी पुन्हा नव्याने भूषविली." प्रो. पोतदार म्हणतात,

"पुरते कोणाकडे पाहेना । पुर्ते कोणाशी बोलेना
पुरते एके स्थळी राहीन । उठोनि जातो ।।
नाते स्थळ सांगेना । सांगितले तरी तेथे जायेना
आपुली स्थिती अनुमाना । येवोच नेदी ।।"

ही नि:स्पृहाची समर्थांनी सांगितलेली शिकवणूक राजवाडे यांच्या चरित्रात पदोपदी प्रत्ययास येई; परंतु 'सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूच नये' हा उत्तरार्ध

समर्थांनी नि:स्पृह राहूनही जसा गिरविला, तसा राजवाडे यांना गिरवता न आल्यामुळे 'बहुतांचे मनोगत' त्यांस हाती घेता आले नाही. 'महंतीची कला पूर्णपणे त्यांना साधली नाही.' देशकार्य करावयास, इतके परकीय सत्तेने गांजले आहेत; तरी लोक तयार होत नाहीत म्हणून हा महापुरुष सारखा धुमसत असे. त्यांच्या सर्व कार्यात देशाभिमानाचे सोनेरी सूत्र कसे ओतप्रोत भरलेले आहे, हे मागील एका प्रकरणात दाखविले आहे. त्यांचा देशाभिमान पराकाष्ठेचा होता. देशाभिमानास कमीपणा आणणारे एकही कृत्य त्यांनी केले नाही. आचार, विचार, उच्चार तीहींनी ते देशभक्त होते, आमरण स्वदेशीचे व्रत त्यांनी पाळले. कधीही या व्रताचा त्यांनी परित्याग केला नाही. पंचवीस-सव्वीस वर्षांचे असताना त्यांची पत्नी वारली, तेव्हा 'पुरुष अगर स्त्री यांना दुसऱ्यांदा लग्न करण्याचा हक्क नाही. शेषभागीदाराने संन्यस्त वृत्तीने देशसेवा वा देवसेवा शक्यतेनुसार करून शेष आयुष्य घालवावे' हे धीरोदात्त उद्‌गार त्यांनी काढले व प्रपंचाच्या भानगडीत कदापि पडले नाहीत; सर्व जन्म देशाची निरनिराळ्या मार्गांनी सेवा करण्यात घालविला. देशासाठी सर्वस्वाचा त्यांनी होम केला होता. देशहितास विघातक अशा सर्व वस्तूंशी त्यांनी असहकार केला होता. महात्मा गांधींच्या संबंधाने राजवाडे आदरयुक्त बोलत व म्हणत, ''असहकार हाच उपाय राष्ट्राच्या तरणोपायास आहे.'' हा असहकार त्यांनी जन्मभर चालविला. चिंतामण गणेश कर्वे विद्यासेवकांत लिहितात, ''राजवाड्यांच्याइतकी कडकडीत देशसेवा दुसऱ्या कोणी केल्याचे माहीत नाही. देशाकरिता फकिरी जर कोणी घेतली असेल तर ती राजवाड्यांनीच. गत महाराष्ट्रवीरांचा त्यांना किती अभिमान होता हे ते रोज स्नानसंध्येनंतर पितृतर्पणप्रसंगी शिवाजी व थोरले माधवराव यांना उदक देत यावरून सिद्ध होईल. खरा नि:स्वार्थ व नि:स्पृहपणा पाहावयाचा असेल तर तो राजवाड्यांच्याच ठिकाणी दिसेल. इतर देशभक्त नि:स्वार्थीपणाच्या निरनिराळ्या पायरीवर सोईने उभे राहिलेले आढळतील. या निर्भेळ नि:स्वार्थामुळेच त्यांच्यात विक्षिप्तपणा दिसून येई व तो क्षम्यही होई. एकंदरीत आजपर्यंतच्या इंग्रजी अमदानीत राजवाड्यांसारखा पुरुष झाला नाही हे खास.''

गेल्या दोन-तीन वर्षांत महाराष्ट्रातील नामांकित इतिहाससेवक सर्व जात चालले. वासुदेवशास्त्री खरे, पारसनीस, महाराष्ट्र सारस्वतकार भावे, राजवाडे व साने सर्व दिवंगत झाले. न्या. रानडे यांनी मराठी इतिहासाचे आध्यात्मिक स्वरूप दाखवून दिले व महाराष्ट्रीय इतिहासाचा मोठेपणा प्रतिष्ठापिला. त्याच्यावर व पंच पांडवांनी

महाराष्ट्रीय इतिहासाची बहुमोल कामगिरी केली व या सर्वांच्या कामगिरीमध्ये राजवाडे यांची कामगिरी शिरोधार्य आहे. या पाचही जणांत अर्जुनाप्रमाणे पराक्रम राजवाड्यांनीच गाजविला; वासुदेवशास्त्री खरे यांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते म्हणून त्यांची कामगिरी व्यवस्थित आहे व खुलून दिसते; भावे व पारसनीस यांना द्रव्याची ददात नव्हती व थोरा-मोठ्यांशी त्यांच्या दोस्ती होत्या. साने यांचे कार्यही मर्यादित स्वरूपाचे होते. परंतु ठाकठिकीचे होते. राजवाडे यांचेच कार्य अफाट होते. शतमुखी गंगेप्रमाणे त्यांची कामगिरी शतमुख होती. हे सर्व राजेरजवाडे, सरकार व जनता यांची हांजी-हांजी न करता, त्यांचा आश्रय नसताना, स्वतःच्या हिमतीने केले म्हणून हे कार्य थोर आहे.

परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट ही की राजवाडे हयात असता या पुण्यभूमीत, आनंदवनभुवनी त्यांची ती धिप्पाड व तेजस्वी मूर्ती भ्रमण करीत असता, तिचे महत्त्व लोकांना समजले नाही. त्यांची महती फारच थोड्यांना आकलन झाली; परंतु त्यांच्या मरणानंतर एकदम केवढा खळगा पडला हे दिसून आल्यामुळे महाराष्ट्र जनता दुःखात बुडाली. स्विफ्टच्या मरणानंतर एकाने म्हटले, 'Oh ! what a fall it was; it was like the fall of the Roman Empire.' त्याचप्रमाणे राजवाड्यांच्या मरणासंबंधीने महाराष्ट्रास वाटले. त्यांच्या मरणाने सर्वांनाच धक्का बसला. पुष्कळ वेळा असेच होते. मनुष्याच्या अंगचा मोठेपणा व त्याची थोरवी त्याच्या मरणानंतरच समजून येते. फूल कुस्करल्यावरच त्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो. जिवंत असता राजवाड्यांचे महत्त्व सर्वांना कळले नाही; परंतु मेल्यावर त्यांचे महत्त्व, त्यांचे मोल सर्वांना कळून आले. आता तरी महाराष्ट्राने या पुण्यपुरुषास, या लोकोत्तर ईश्वरी देण्याच्या पुरुषास आपल्या हृदयकमलातून दूर करू नये. त्यांची संपूज्य स्मृती सदैव प्रज्वलित ठेवून त्यांच्याप्रमाणे निःस्वार्थतेने, कार्यनिष्ठने कार्य करण्यास पुढे यावे. निरनिराळ्या शास्त्रांत पारंगतता मिळवून पाश्चात्त्यांचा वरचढपणा दूर करावा व भारतवर्ष ज्ञानाचे पुनरपि माहेरघर करावे म्हणजेच राजवाडे यांच्या तळमळणाऱ्या आत्म्यास शांती मिळेल, एरवी नाही.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

रवींद्रनाथ टागोर

प्रस्तावना

कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांचे हे लहान चरित्र आहे. चरित्र व कार्य दोन्ही या छोट्या पुस्तकात मांडली आहेत. रवींद्रनाथांची आत्मचरित्रपर पुस्तकाची 'जीवनस्मृती' मराठीत आहे. त्याप्रमाणेच श्री. कानडे यांचेही मराठीत रवींद्रनाथांच्या चरित्रावर मोठे पुस्तक आहे. मराठीत गीतांजलीची हरिभाऊ आपटेकृत, गोविंदराव कानिटकरकृत गद्य भाषांतरे आहेत; तर माधवानुज यांनी काही गीतांची आणि व्यास यांनी सर्वच गीतांची मराठी पद्यमय भाषांतरे केली आहेत. रवींद्रनाथांच्या काही कादंबऱ्या मधुराणी, गौरमोहन, पति-पत्नी प्रेम वगैरे मराठीत आहेत. तर त्यांच्या लघुकथाही काही भाषांतर केलेल्या आहेत. असो. अशा साहित्यसम्राटाची साहित्यदर्शक व शिक्षणप्रांतीय कामगिरी या छोट्या पुस्तकात दिली आहे. रवींद्रनाथ हे कवी आहेत. तितकेच प्रत्यक्ष कार्यकर्ते व एक शिक्षणशास्त्रात अपूर्व काम करणारेही आहेत.

पौष वद्य /९/१८५१

पां. स. माने

कविवर्य रवींद्रनाथ टागोर

कवी सृष्टीचा अलंकार । कवी लक्ष्मीचा शृंगार ।।
सकळ सिद्धींचा निर्धार । ते हे कवी ।।
कीं हे अमृताचे मेघ वोळले । की हे नवरसाचे ओघ लोटले ।।
नाना सुखांचे उचंबळले । सरोवर हें ।।
की ही सुखाची तारुवे लोटली । अक्षयै आनंदे उतटली ।।
विश्वजनास उपेगा आली । नाना प्रयोगांकारणे ।।

समर्थ – दासबोध

कविवर्य रवींद्रनाथ टागोर चरित्र

मुलांनो, कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांचे नाव आज त्रिखंडात दुमदुमत आहे. आशियाचे कविसम्राट असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांचा केला जातो. त्यांचे नाव माहीत नाही असा सुशिक्षित या भारतवर्षातच नाही तर सर्व भूतलावरही विरळा. आपल्या या हिंदुस्थानची कीर्ती जगात वाढवणारे, आपल्या या देशास जगात मान मिळवून देणारे ते काही थोर पुरुष या शतकात आपणात झाले, त्यामध्ये रवींद्रनाथ यांस फार वरचे स्थान द्यावे लागेल. बंगालमधील सुप्रसिद्ध ठाकुर घराणे आहे. ठाकुर या शब्दाचाच इंग्रजांनी टागोर असा अपभ्रंश केला आणि आपण सर्वांनी हा इंग्रजाळलेला टागोर स्वीकारला. म्हणून आपणास टागोर हाच शब्द परिचित आहे. हे टागोर घराणे धार्मिकता, परोपकारिता, विद्वत्ता, कलासंपन्नता वगैरे बुद्धीच्या व हृदयाच्या गुणांसाठी फार प्रसिद्ध आहे. या घराण्यात जितक्या कर्तबगार व अनेक कला पारंगत व्यक्ती निपजल्या आहेत, तितक्या अन्यत्र क्वचित आढळतील अनेक पवित्र पुरुषांच्या जन्माने पवित्र व विख्यात झालेल्या या वंशातच रवींद्रांसारखा लोकोत्तर पुरुष जन्मास यायचा. 'शुद्ध बीजापोटी फळें रसाळ गोमटी' हा तुकोबारायांचा चरण सुप्रसिद्धच आहे.

रवींद्रनाथांचे आजोबा द्वारकानाथ या नावाने विख्यात होते. द्वारकानाथ हे फार धनाढ्य व्यापारी होते. त्यांनी कंपनी सरकारचे राज्य वृद्धिंगत होत असता, स्वत: मोठी व्यापारी कंपनी काढून अलोट पैसा मिळविला. धाडस व चातुर्य एकवटली म्हणजे तेथे भाग्य येणारच यात काय संशय ? द्वारकानाथांनी कुबेराप्रमाणे संपत्ती मिळविली व ती कर्णाप्रमाणे देऊन टाकली. द्वारकानाथ हे इंग्लंडमध्ये गेले होते, त्यावेळेस एखाद्या राजास साजेल अशा थाटाने त्यांचे तिकडे स्वागत झाले. त्यांना 'राजा द्वारकानाथ' असे म्हणत. विलायतची अशीच एक सफर करीत असता द्वारकानाथ हे तिकडेच दिवंगत झाले.

द्वारकानाथांचे पुत्र देवेंद्रनाथ हेच आपल्या चरित्रनायकाचे वडील. देवेंद्रांचा जन्म सन १८१७ मध्ये झाला. देवेंद्रनाथ हे अति थोर सत्पुरुष होऊन गेले. त्यांना महर्षी या पदाने संबोधले जाते. धर्म व सदाचार हा त्यांचा जीविताधार होता. देवेंद्रांचा आचार, विचार, उच्चार हा धर्ममय होता. देवेंद्रनाथ हे सुंदर लेखकही होते. भगवंतास भक्तिभावाने आळवणारी गोड गाणी त्यांनी रचलेली आहेत. देवेंद्रांचे विचार निर्मळ व राहणी निर्मळ. धुतल्या तांदळाप्रमाणे त्यांचे जीवन होते. सदैव भगवद्विचारात त्यांचे मन मग्न असे. हिमालयाच्या भव्य व सुंदरतम प्रदेशात वरचेवर जाऊन देवेंद्रनाथ विश्वव्यापक परमेश्वराच्या सौंदर्यसागरात पोहत राहत. अशा दैवी संपत्तीने संपन्न असणाऱ्याच्या पोटी ईश्वरी प्रेमाचा व विश्वैक्याचा मंगल संदेश सांगणारा कविराजा अवतीर्ण झाला यात आश्चर्य ते काय ?

रवींद्रनाथ यांचा जन्म ता. ६ मे.स. १८६१ रोजी झाला. रवींद्रनाथ हे सर्व भावंडात लहान होते. त्यांना मोठे भाऊ व बहिणीही होत्या. रवींद्रनाथांस मातृसुख फार दिवस लाभले नाही. बाळपणीच त्यांची आई निवर्तली, परंतु त्यांच्या वडील भावजयीने त्यांना प्रेमाने वाढवून आईची आठवण येऊ दिली नाही.

रवींद्रनाथांनी आपली स्वतःची 'जीवनस्मृती' म्हणून आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले आहे. त्यात आपल्या बाळपणीच्या आयुष्याचे त्यांनी सुंदर वर्णन केले आहे. रवींद्रनाथांचे घर माणसांनी गजबजलेले असे. वीस-पंचवीस मंडळी या कुटुंबात होती. देवेंद्र पुष्कळ वेळा घरी नसायचे, परंतु घरात काही धुसफूस, भांडणतंडण काही नसे. घरी कामे करायला नोकर-चाकर पुष्कळ असत. लहान मुलांना एका नोकराच्या स्वाधीन केलेले असे. हा भय्या मुलांना गुलामांप्रमाणे वागवी. एके ठिकाणी या मुलांना बसवून, एक रेघ काढून लक्ष्मणाने सीतेस त्या रेघेबाहेर न जाण्यास सांगितले होते, तसे तो भैय्या त्या मुलांना सांगे. यामुळे हा सृष्टीचा लाडका बाळ, हा भावी कविराजा, सृष्टिमातेपासून दूर ठेवण्यात येई. फुलपाखरांपाठीमागून जाणे, धावणे, फुले तोडणे, झाडांवर चढणे, पाण्यात डुंबणे या सर्व बालक्रीडांना हा श्रीमंत घराण्यातील बाळ मुकला. सर्वांचे डोळे चुकवून रवींद्रनाथ एखादे वेळेस पित्याच्या खोलीत जात व तेथील नळ सोडून यथेच्छ स्नान करीत व पाण्यात डुंबण्याच्या सुखाचा अल्प आस्वाद घेत ! याप्रमाणे लहानपणी स्वतंत्र असूनही रवींद्रनाथ परतंत्र होते. भैय्यास वाटे, आपण आपले कर्तव्या बजावतो, परंतु मुलांचे पंचप्राण कासावीस होत याकडे त्याचे लक्ष नसे. उडू पाहणाऱ्या पाखराला दोरीने बांधावे तसे रवींद्रनाथांचे झाले.

अगदी लहानपणापासून त्यांचे कविहृद्रय प्रगट होऊ पाहात होते. जातीचा तेजस्वी अंकुर बाल्यापासून दिसून येत होता. कृत्तिवास म्हणून बंगाली कवी आहे. याचे रामायण बंगालमध्ये फार प्रिय आहे. या रामायणातील भाग रवींद्रनाथ आपणाशीच गुणगुणत. नादमधुर शब्द त्यांच्या बालहृदयास आनंद देत. अरविंद, मकरंद, भृंग, कुरंग असे शब्द त्यांच्या कानावर पडले. म्हणजे तरी अर्थ समजला नाही, तरीही त्यांच्या मनास अपूर्व आनंद वाटे. पावसाच्या सडसड येण्याने, जोराच्या झंझावाताने, मेघमालांच्या जमावाने, त्यांचे चिमुकले हृदय भावनांनी भरून जाई. पाऊस सडसड येणे, पानांचे सळसळणे, वाऱ्याचे घोंगावणे हे शब्दसंप्रदाय त्यांना आवडत असत.

मोठे भाऊ शाळेत जात. लहान रवींद्रनाथांस असे होई की, आपण केव्हा एकदा शाळेत जाऊ. त्यांना घरी शिकवण्यासाठी पंतोजी होता. परंतु हा पंतोजी त्यांना पसंत नसे. हे घरचे पंतोजी एकदा रवींद्रनाथांना म्हणाले, 'रवी, आज तू शाळेत जाण्यासाठी हट्ट धरतो आहेस, परंतु एकदा शाळेत गेलास म्हणजे पुन्हा या शाळेतून केव्हा एकदा सुटू असे तुला होईल.' रवींद्रनाथ आपल्या जीवनस्मृतीत म्हणतात, 'या पंतोजीच्या भविष्याप्रमाणे दुसरे कोणतेही भविष्य माझ्या उभ्या जन्मात इतके खरे ठरले नाही.'

बाल रवींद्र शाळेत जाऊ लागला. कमळवनात ज्याने खेळावे असा हा बाल राजहंस किडे असणाऱ्या डबक्यात जाऊन पडला; हिरवा चारा खाणारा हरिणबाल दावानळात-वणव्यात सापडावा तसे हे झाले. शाळेतील ती तरवारीची धारेवरील शिस्त, ते राक्षसी शिक्षाप्रकार, यांनी या बालकाचे मन घाबरले. त्या घरच्या नोकराच्या कचाट्यातून सुटलो तर या दुसऱ्या संकटात येऊन पडलो ! आगीतून उठून फुफाट्यात पडावे, तसे माझे झाले असे त्यांना वाटले. ते वर्गात कोणाशी मिसळत नसत, बोलत नसत. वर्गातील मुले गलिच्छ व दुराचारी असत. एखादे वेळेस शाळेचे तास चुकवून ते वरच्या मजल्यावर जाऊन समोरच्या सृष्टिसौंदर्याकडे पाहात असत किंवा बाहेर जाऊन फुलपाखरांच्या संगतीत समरस होत. वर्गामध्ये ते नेहमी शेवटी बसत. परंतु एकदा एका बाहेरच्या परीक्षकाने बंगाली भाषेत परीक्षा घेतली, तेव्हा या शेवटी बसणाऱ्या मुलास सर्वांत जास्त मार्क मिळाले, हे पाहून पंतोजी दिङ्मूढ झाले. पुन्हा परीक्षा घेतली तरी तेच!

कशीबशी दोन-तीन वर्षे त्यांनी शाळेत काढली. परंतु रोज शाळेत जाताना त्यांचे चित्त भरून येई व डोळे रडवेले होत. पंतोजीची पंचाननी मुद्रा समोर उभी राहून त्यांच्या हृदयातील सुखसमुद्र समूळ आटे. वडील भाऊ व बहीण रवींद्रनाथांना म्हणत,

'रवी, तू मोठा माणूस होशील असे आम्हास वाटे, ती आशा व्यर्थ जाणार तर एकूण !' परंतु रवी काही बोलत नसे.

सर्वांची बोलणी बसत होती, तरी एक दिवस मनाचा धडा करून रवींद्रनाथांनी शाळेला रामराम ठोकला व ते घरीच अध्ययन करू लागले. त्यांना कविता करण्याचा नाद लागला आणि घरातील मंडळींस ही गोष्ट कळून आली. ज्या थोरल्या वहिनीने रवींद्रनाथांस लहानाचे मोठे केले, ती चांगली कवयित्री होती. तिने या बालकवीला चांगली गाणी वाचून दाखवावी, काव्यमय, सहृदय प्रसंग वाचून दाखवावे आणि या प्रकारे त्यांच्या काव्यांकुरास वाढवावे. मुलाची आवड काय आहे, त्याच्या बुद्धीचा कल कोठे आहे, हे पाहून त्याप्रमाणे मुलाचे शिक्षण असणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आपल्याकडे घरी व शाळेत एकाच प्रकारचे ठरीव शिक्षण सर्वांना देण्यात येते व एकाच पद्धतीचे कारकून तयार होतात ! प्रत्येकाचे व्यक्तित्व निराळे असते, व्यक्ती तितक्या प्रकृती असतात, हे महत्वाचे तत्त्व आपल्याकडे पालक व शिक्षक विसरतात. कोणी चित्रकार तर कोणी गवई, कोणी लेखक तर कोणी वक्ता, कोणी पुढारी तर कुणी अनुयायी अशा निरनिराळ्या अंकुरांचे मुलगे असतात. त्यांच्या त्या त्या वृत्तीस योग्यपणे वर्धमान करणे हे खरे शिक्षण. परंतु एखाद्या लहान मुलास गणित येत नसले तर तो अडला, संस्कृत येत नसले, राहिला मागे – ही आमची आत्मघातकी शिक्षणपद्धती आहे. माझा एक मित्र होता, त्याला तालमीचा फार शोक: आपण तालीमबाज व्हावे ही त्यांची इच्छा. तो इंग्रजी पाचवीपर्यंत जेमतेम गेला. परंतु पाचव्या यत्तेत तर त्याचे पुढे पाऊल पडेना. तो पुष्कळ वाची, तरी त्यास इंग्रजीत दोन मार्क, इतिहासात तीन, गणितात पूज्य, असे होई. तो आपल्या वडिलांस म्हणे, 'मला शाळेतून काढा; मी तालीम, कवाईत वगैरे शिकून, चांगला तालीममास्तर होईन.' बाप म्हणे, 'छे, तुला आधी मॅट्रिक झालेच पाहिजे.' शेवटी पाचव्या यत्तेत या मुलाने अफू खाऊन आत्महत्या केली ! हरहर, गुणाचा बाळ जगास सोडून गेला. या आत्महत्यांची जबाबदारी पालकांवर, शिक्षकांवर, शिक्षणपद्धतीवर आणि शेवटी ही सर्रास एकच मेलेली व मारणारी शिक्षणपद्धती पुरस्कारणाऱ्या सरकारवर आहे. हे खरे नाही का ? अशा प्रकारे किती तालीमबाज, किती गणिती, किती गायक, किती वादक, किती लेखक, किती शिल्पी या शिक्षणपद्धतीने मारले असतील ते परमेश्वरास माहीत !

आमचे सौभाग्य, विश्वाची जबर पुण्याई की रवींद्रांचा काव्यांकुर मारला गेला नाही. त्यांच्या नातलगांनी, आप्तांनी त्यांना सहानुभूतीचे पाणी घातले, प्रेमाचे खत

दिले. रवींद्रनाथांचे मोठे बंधू द्विजेंद्रनाथ हे उत्तम कवी व तत्त्वज्ञ होते. बंगाली भाषेत त्यांनी काही उत्कृष्ट कविता लिहिल्या आहेत. रवींद्रनाथच एके ठिकाणी म्हणतात, 'माझ्या मोठ्या दादांनी लिहिलेल्या काव्यासारखे अर्थगंभीर व नादमधुर खंडकाव्य मी लिहिण्याचा प्रयत्न केला, परंतु मला ते कधी साधले नाही.' हे द्विजेंद्रनाथ रवींद्रनाथास फार उत्तेजन देत. बालबंधूच्या कविता येणाऱ्या मित्रांस, पाहुण्यांस वाचून दाखवून द्विजेंद्र म्हणत, 'हा रवी किती लहान वयात सुंदर कविता करतो, पाहा तरी.' या उत्तेजनाचा योग्य तोच परिणाम होत गेला. या वाङ्मयप्रेमी व काव्यमर्मज्ञ प्रेमळ मंडळीत रवींद्राचा हा काव्यांकुर पोसला जाऊ लागला.

एकदा वडील देवेंद्रनाथ हिमालयातून घरी आले होते. एक देवाचा मोठा उत्सव करायचा होता म्हणून ते आले होते. या उत्सवात म्हणण्यासाठी सुंदर पद्ये करण्याचे काम पित्याने लहान पुत्रावर–रवींद्रनाथावर सोपविले. रवींद्रनाथांनी सुंदर, गोड व भक्तिभावाने ओथंबलेली पद्ये तयार केली व पित्याच्या हातात नम्रपणाने नेऊन दिली. देवेंद्र म्हणाले, 'तूच म्हणून दाखव बरे.' रवींद्रनाथ हे संगीत शिकत होते. त्यांचा आवाज गोड व फार मोठा होता. त्यांनी आपणच केलेली ती पदे गोड रागदारीने पित्यास गाऊन दाखविली. पिता सुप्रसन्न झाला व त्या संतुष्ट ओठातून 'तुजवर ईश्वराची कृपा आहे, तू फार थोर कवी होशील' अशी भविष्यवाणी बाहेर पडली. हे भविष्य किती यथार्थपणे खरे ठरले बरे !

वडील बंधूंच्या मनात आले की, रवींद्रनाथांना विलायतेत पाठवून आय. सी. एस. करून आणावे. त्यांचे एक बंधू सत्येंद्रनाथ टागोर हे आय. सी. एस. होऊन आलेच होते. हे सत्येंद्रनाथ पुष्कळ वर्षे महाराष्ट्रात नोकरीस होते. शेवटी विचार तर ठरला व रवींद्रनाथ हे विलायतेस निघाले.

हा भावी कवी विलायतेस गेला खरा, परंतु ज्या उद्देशाने ते तेथे गेले तो उद्देश बाजूलाच राहिला. परीक्षेचा अभ्यासक्रम संपविण्याऐवजी ते इंग्रजी वाङ्मयात रंगू लागले. शेक्सपिअर, त्याच्याच तोडीचा आयुष्य असते तर झाला असता तो कीट्स, शेली, वर्डस्वर्थ व बायरन व कवीश्वरांच्या काव्यात ते तल्लीन झाले, वेडे झाले. इंग्लंडमधील ही कवींची काव्ये वाचण्यात आणि इंग्लंडमधील सुंदर सुंदर सृष्टिसौंदर्याची–मूर्तिमंत मूक काव्येच, अशी स्थळे पाहण्यात त्यांचे दिवस जाऊ लागले. पाश्चात्त्य संगीत पण त्यांस आवडले व त्याचाही त्यांनी अभ्यास केला. पाश्चात्य संगीतात सामुदायिकत्व आहे. आपल्या संगीतात ते कमी, असे ते म्हणत.

रवींद्रनाथांचे विकासोन्मुख मन व विकासोन्मुख बुद्धी यांचे येथे नीट संगोपन होत होते. भावना व विचार यांस येथे हितकर हवा व मुबलक पाणी मिळून त्यांचा अभिनव विकास होत होता. परंतु आय. सी. एस. च्या परीक्षेचे मात्र फसले. विचार व भावना यांच्याच सागरात हा काव्यप्रेमी तरुण पोहत राही व परीक्षा विसरून जाई. शेवटी विलायतेहून आपले परीक्षेचे कार्य न करता ते माघारे आले. संगीत व काव्य यांचा त्यांना ध्यास लागला व कलकत्त्यास येऊन दोन कलादेवतांची उपासना त्यांनी मनापासून आरंभिली.

रवींद्रनाथ कलकत्त्यास आले व आता वाङ्‌मय हेच त्यांचे जीवितकार्य ठरले. त्यांची मोठी बहीण सरलादेवी ही थोर विदुषी आहे. हिने 'भारती' या नावाचे एक मनोहर वंगमासिक सुरू केले होते. या घरच्याच मासिकात रवींद्रनाथ लिहू लागले. त्यांचे लेख व कविता यांस प्रकाश मिळू लागला. रवींद्रनाथ वंगसाहित्यावर टीकात्मक लेख लिहू लागले. बंगालमधील अत्यंत विख्यात कवी–मिल्टनच्या तोलाचा–मधुसूदनाच्या काव्यावर आपली कुशाग्र लेखणी आमच्या नवकवीने चालविली, परंतु या टीकेने रवींद्रांचेच हसे झाले. सूर्यावर थुंकणाऱ्यांची थुंकी त्याच्याच तोंडावर पडते! रवींद्रनाथ हे अद्याप लहान होते. ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, 'त्या तारुण्याच्या ऐन भरात दुसऱ्यावर टीका करणे हेच मला आवडे; स्वतःच्या घमेंडीत मला दुसरे दोषी वाटत, मला दुसऱ्याचे दोष पाहण्याची आवड फार व यामुळे या कविश्रेष्ठावर मी टीका केली. परंतु लोक माझ्याच टीकेला हसले आणि मग मात्र मला पराकष्ठेचे वाईट वाटले.'

रवींद्रनाथांचा काव्य करण्याचा नाद सुरू झाला. कलकत्त्यास ते एक मोठे कवी म्हणून मानले जाऊ लागले. घरची संपत्ती होतीच. सरस्वती व संपत्ती उभयतांचा वरदहस्त रवींद्रांवर होता. याच वेळेस त्यांचा विवाह पण झाला. कलकत्त्यास रवींद्रनाथ ही तरुण व्यक्ती सर्वांच्या डोळ्यात भरून राहू लागली. रवींद्रनाथांची शरीरयष्टी व उंच व भव्य आहे. ते अतीव सुंदर आहेत. त्यांचे डोळे कमळाप्रमाणे विशाल व नासिक सरळ सुंदर आहे. मिल्टनला लहानपणी त्यांचे सहाध्यायी 'मुलगी' म्हणून चिडवीत, तसेच बालपणी रवींद्रांचे होई. ते लहानपणी फार सुंदर व सुकुमार दिसत. एकदा लहानपणी पोषाख घातलेली बाल रवींद्रांची मूर्ती पाहून आलेला पाहुणा म्हणाला, 'खात्रीने ही मुलगी असली पाहिजे; एरवी इतके सौंदर्य व असे सुकुमारत्व संभवतच नाही.' हे पाहुण्यांचे उद्‌गार रवींद्रांचा पोषाख उतरल्यावर अर्थात फोल ठरले ! असो, तर अशी सुंदर व सुललित वधू, घरी गजान्त लक्ष्मी, सरस्वतीच्या मंदिरात शिरून

काव्यवीणेचा तारा तरलपणे व मधुरपणे छेडण्यास केलेली सुरुवात, नवीन प्राप्त झालेली सुंदर वधू - आणखी काय पाहिजे होते? रवींद्रनाथ भूतलावरील गंधर्वलोकात वावरत होते.

रवींद्रनाथांच्या काव्येतिहासातील हा उष:काल आहे, प्रात:काल आहे. ता तारुण्याच्या नवाळीतील त्यांचे काव्य प्रेमविषयक, स्त्रीप्रेमविषयक आहे. छंदाचे विविधत्व व नावीन्य, भाषेचा विलास व उत्कृष्ट कल्पना यामुळे लोक हे काव्य वाचून वेडे झाले, कलकत्त्यास आता सर्वत्र रवींद्रनाथ दिसू लागले. कोठे महत्त्वाच्या प्रसंगी रवींद्रनाथ नाहीत असे व्हायचे नाही. ते गाणारे पण उत्कृष्ट होते. बंकीमचंद्र या जगविख्यात बंगाली कादंबरीकाराचे 'वंदे मातरम्' हे पद रवींद्रनाथांनीच प्रथम नीट गाऊन दाखविले. बंकीमचंद्र हे कवी नव्हते. बंकीमचंद्रांच्या मुलीने एकदा त्यांना विचारले, 'बाबा, तुम्ही कादंबऱ्या लिहिल्यात, परंतु कविता का केल्या नाहीत?' तेव्हा बंकीमबाबू म्हणाले, 'बाळ, मी एकच कविता लिहिली आहे, परंतु ती माझे नाव अमर करील.' बंकीमचंद्रांच्या नवरसपरिलुप्त 'आनंदमठ' या कादंबरीतील 'वंदे मातरम्' हीच ती एकमेव कविता अनंत तारकांपेक्षा एक चंद्र चांगला, अनंत सुंदर दगडांपेक्षा एक हिरा मोलाचा ! त्याप्रमाणे अनंत काव्यांहूनही 'वंदे मातरम्' कविता थोर आहे. ती अश्रूंच्या अक्षरांनी, हृदयाच्या कंपांनी लिहिलेली आहे. हे 'वंदे मातरम्' गाणे नीट रागदारीत लिहिलेले नाही. कलकत्त्यास बंकीमबाबू आले होते. ते म्हणाले, 'माझे हे गाणे फक्त रवी गाऊ शकेल.' कलकत्त्याच्या एका सभेत हे राष्ट्रीय गान या चंडोलाने गाऊन दाखवले व सभा आनंदाने बेहोष झाली. संगीत व काव्य यांच्या दैवी देणगीने संपन्न अशा या तरुणाचे कलकत्त्यातील सर्व तरुण अनुकरण करू लागले. थोर लोकांचे गुण अनुकरता येत नाहीत म्हणून सामान्य लोक त्यांचे बाह्यांग अनुकरतात. रवींद्रनाथ तसा पोषाख करीत. तसा पोषाख कलकत्त्यातील तरुण करूलागले. काल रवींद्रनाथांचे पायात पांढरा बूट होता, तर लगेच भावनावश बंगाली विद्यार्थी पांढरे बूट विकत घेत ! जसे रवींद्र करीत, तसेच त्यांच्यावर मुग्ध होणारे छात्र करू लागले. रवींद्रनाथ हे नादी होते, विलासी होते. ते कधी दाढी ठेवून मुसलमान बनत, तर कधी मिशा वगैरे काढून दुसरा वेष स्वीकारीत; कधी पारशी बनत, तर कधी 'अपटुडेट' युरोपियन पोषाखात दिसत ! या श्रीमंत व छंदी कवीचे इतर किती अनुकरण करणार!

असा हा तारुण्याचा पहिला भावनोन्मत्त काळ चालला होता. त्यांना एक सुंदर पुत्ररत्नही लाभले. आनंदरसाला तूट नव्हती, सर्व लूट चालली होती. याप्रमाणे सन

१९०२–३ पर्यंत जी काव्यरचना त्यांनी केली ती स्फुट व प्रेमविषयक आहे. काही लहान लहान नाटके व काही उत्कृष्ट कादंबऱ्याहीं यावेळेपर्यंत त्यांनी लिहिल्या.

सन १९०३ नंतर बंगालमध्ये वंगभंगाची चळवळ सुरू झाली. बंगाली लोकांची जूट मोडण्यासाठी बंगालचे पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल असे दोन निरनिराळे तुकडे करण्याचे करारी कर्झन या व्हाइसरायने ठरविले. याच योजनेस 'वंगदेशाचा भंग' असे म्हणतात. आपली जूट फोडली जाऊ नये म्हणून वंगभंगाविरुद्ध बंगाली जनतेने जोराने चळवळ सुरू केली. हजारो सभा झाल्या, अनंत अर्ज गेले, परंतु हट्टास पेटलेले सरकार माघार घेईना. सन १९०६ मध्ये राष्ट्रीय सभेची बैठक कलकत्त्या भरली. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतु:सूत्रीची घोषणा दादाभाईंच्या अध्यक्षत्वाखाली येथे झाली. राष्ट्रातील या चैतन्याचा रवींद्राच्या भावनावश कविहृदयावर विलक्षण परिणाम झाला. प्रेमविषयक प्रांतांतून ते पलीकडे आले. देशभक्तीच्या भावनेने ते वेडे झाले. त्यांची काव्यशक्ती अपूर्व देशभक्तीपर पद्ये प्रसवू लागली. या काळात अत्यंत सुंदर अशी देशाभिमानी गाणी त्यांनी लिहिली. वैषयिक प्रेमाच्या बाजारातून ते देशभक्तीच्या उद्यानात उतरले. त्यांनी आपली काव्यभेरी वाजविली व तरुणांची मने देशभक्तीच्या पुराने उचंबळून सोडली. सन १९०८ पर्यंत राष्ट्रीय वृत्तीने व राष्ट्रीय भक्तीने रवींद्रनाथ भारलेले होते. त्यांची काव्यवीणा राष्ट्रप्रेमाचेच सूर नाना तऱ्हांनी वाजवून दाखवित होती.

परंतु ही राष्ट्रीय चळवळ पुढे त्यांना अंध वाटू लागली. 'पाश्चात्त्यांचा तिरस्कार एकजात करण्याऐवजी त्यांच्यातील काही सद्‌गुण, त्यांच्यातील धडाडी, त्यांची उद्योगप्रियता, त्यांची शिस्त, त्यांची जूट, त्यांची ज्ञानलालसा, त्यांच्या कला, त्यांची शास्त्रे ही त्याज्य मानून आपणांस चालायचे नाही' असे त्यांनी सांगितले. 'हिंदुस्थानने जगापासून विभक्त होऊ नये. इंग्रज सरकारजवळ झगडा, भांडा, झोडा, परंतु जे जे पाश्चात्त्य आहे त्याचा तिरस्कार करू नका. प्रकाश कोठूनही घरात यावा. तो पश्चिमेचा व पूर्वेच्या दोहोंकडच्या निर्मळ बाजूने यावा. आपल्या लोकांनी आपली हृदयाची दारे सताड उघडी ठेवावी व त्यात ज्ञानप्रकाश भरपूर घ्यावा. ज्ञान हे पवित्र आहे. ते पाश्चात्त्य असो वा पौर्वात्य असो. सत्यं, शिवं, सुंदर या वस्तूस देशकालाची बंधने नसतात. ती सर्वत्र प्रिय व पूज्यच मानली गेली पाहिजेत. ज्या गुणांच्या जोरावर आज पाश्चात्त्य राष्ट्रे जीवन आनंदमय, निरोगी करून घेत आहेत, त्या गुणांची कास भारतवर्षानं पण धरल्याशिवाय भारतवर्षाचा उद्धार कसा होईल ? देशोद्धार म्हणजे जादूचा खेळ नाही, चमत्कार नाही, गुणवान माणसे राष्ट्रात निपजणे, म्हणजेच तो उद्धार शक्य होईल.

रवींद्रनाथांची अशी गुणग्राही व सत्यनिष्ठ दृष्टी होती. त्यांनी आपल्या एका राष्ट्रीय गानात पुढील अर्थ ध्वनित केला आहे.

आज सर्व राष्ट्र पुढे जात आहेत. ईश्वराच्या दरबारात सर्व राष्ट्रे आपापली कार्यभाराची पुंजी घेऊन जात आहेत. परंतु आता भारतवर्ष कोठे आहे ? हा भारतवर्ष सर्वांच्या मागून हळूहळू रेंगाळत जात आहे. दैन्य, दुःख, विपत्ती यांच्या गराड्यात जो सापडला आहे. तो निश्चल आहे, निर्वीर्य आहे; कर्महीन, धनहीन आहे. हे देवा, आम्हास स्थान नाही, आश्रय नाही. तू आपली भीषण भेरी वाजव व आम्हास जागृत कर. आम्हास स्थान दाखव. हे भगवंता, आज तुझ्या कृपेने आमचे अज्ञानाचे पाश खळकन् तुटून पडोत. भाग्य व दैवत यांनी आमची मुखमंडले पुन्हा खुलोत. विश्वाचा कार्यभार खांद्यावर घेण्यासाठी आम्हासही अहमहमिकेने पुढे येऊ दे. भगवंता, आम्हास जागे कर, बलवान कर.' अशा सुंदर व्यापक विचारांची पद्ये त्यांनी त्यावेळेस रचली आहेत.

याच राष्ट्रीय चळवळीच्या काळात राष्ट्रीय शिक्षण हाही एक महत्त्वाचा प्रश्न पुढे आलेला होता. रवींद्रनाथांची दृष्टी एकांगी नव्हती. ते केवळ कल्पनेच्या काव्यमय वातावरणात वावरणारे नव्हते. त्यांनी भावनांच्या अफाट आकाशात स्वैर संचारी जरी केला, कल्पनापंखांवर बसून त्रिभुवनात जरी ते उड्डाणे घेत असले तरी प्रत्यक्ष सृष्टीचा त्यांना विसर पडत नाही. कवी व कार्यकर्ते असे उभयविध ते आहेत. ते आकाशात उडतात, पण पृथ्वीवर पाहतात; महात्मा गांधी पृथ्वीवर आहेत, पण आकाशाकडे पाहतात. एक आधी कवी आहे व मग कार्यकर्ता आहे, दुसरा आधी कार्यकर्ता आहे आणि मागून तत्त्वज्ञ आहे.

रवींद्रनाथांच्या ठिकाणी ध्येय व कृती ही एके ठिकाणी न दिसून येणारी जोडी दिसून येते. Ideal and practical दोन्ही त्यांच्या जवळ आहेत.काल्पनिक व प्रात्यक्षिक दोहोंचा संगम त्यांच्या ठिकाणी आहे. रवींद्रनाथ राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करू लागले. शिक्षण कशा प्रकारचे असावे, मुलांची साधी सहजमधुर मने कशा रीतीने कार्यक्षम करता येतील, याचा ते विचार करू लागले. लहानपणी तात्या पंतोजी पद्धती म्हणजे काय याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतलेला होता. शाळेचा मुलांना आनंद वाटण्याऐवजी शाळा म्हणजे तुरुंग व कोंडवाडा वाटतो, हे सत्य त्यांनी अनुभवले होते. ध्येयहीन व अनुदार शिक्षक कोमल मुलांना काय शिकवणार ? ज्यांचे विचार प्रगल्भ नाहीत, ज्यांची दृष्टी प्रेमळ नाही, ते शिक्षण कोमल मनांना कसे विकासवणार ? नाना प्रकारच्या दानवी शिक्षा–तुरुंगातील शिक्षा, शिक्षक मुलांना आपणांकडे देत व

अजूनही थोड्याफार प्रमाणात देतात. इंग्लंडमध्येसुद्धा पाऊणशे वर्षापूर्वी अशीच पद्धत होती. प्रसिद्ध शिक्षक अर्नोल्ड हा जेव्हा एका विख्यात पाठशाळेचा शिक्षक व्हायला गेला तेव्हा त्याला त्या शाळेत त्या खांबास बांधून मुलांना फटके मारीत ते खांब दिसले, खोडे दिसले, त्याला अंधारकोठड्या दिसल्या ! परंतु मानसशास्त्रज्ञ शिक्षकाग्रणींनी क्रांती घडवून आणली व त्यांच्याकडील पद्धती पार बदलली.

परंतु आपल्याकडे अजूनही मारकुटी पद्धतीच चालू आहे. गुडघे वाकवून त्यात हात घालून मग कान धरायला लावणे, ओणवे करून पाठीवर दगड ठेवणे, हाताच्या पाठीवर रूळाने, छत्रीच्या लोखंडी ताडीने मारणे, उलटे टांगणे, एका अपराधी मुलास उभे करून त्याला हात लांब करायला सांगून त्याच्या हातावर वर्गातील मुलांच्या पाट्या ठेवणे व हात वाकला तर छड्या मारणे, असे शिक्षेचे प्रकार सर्व हिंदुस्थानभर चालू होते; अद्याप असतीलही. या शिक्षासत्रांमुळे शाळेत येणाऱ्या मुलांची कळ्यांप्रमाणे विकासोन्मुख असणारी सुंदर मने, फुलण्याऐवजी, ती गुदमरून खुरटली, त्यास कीड लागली, तर त्यात नवल ते काय ? लहान मुले म्हणजे वेलीवरची फुले, मंद सूर्यप्रकाशात व मोकळ्या हवेत, पाण्याच्या ओलाव्याशेजारी ज्याप्रमाणे फुले फुलतात, डुलतात, खुलतात, त्यांचे रंग, त्यांचा सुगंध ही प्रगट होतात - त्याप्रमाणे मुलांचे मृदू, मुग्ध मन फुलवायचे असेल, तर सहानुभूती, स्नेह, प्रेम, कळकळ या झऱ्यांचे पाणी शिक्षकाच्या वाग्गोत्रीतून वाहिले पाहिजे. शिक्षकाचे दृष्टीत आगीचा लोळ दिसण्याऐवजी तेथे वात्सल्याचे व स्नेहाचे सुंदर, सुखकर तरंग दिसायला पाहिजेत. लहान मुलांना शिकवण्याचे काम जबाबदारीचे आहे. परंतु तेच काम बेजबाबदार, अननुभवी मारकुट्या मास्तरांच्या स्वाधीन केलेले असते !

प्रेमळ मातेजवळ मूल आपले मन उघडे करते, कठोर पित्याजवळ ते बोलू शकत नाहीत: मुलाच्या हृदयाचे दरवाजे उघडायचे असतील तर सहानुभूती व वात्सल्य यांची गुरुकिल्ली हाती घेऊनच त्या कार्यास प्रवृत्त झाले पाहिजे. परंतु 'छडी वाजे छम् छम्' हे वाक्य सदैव डोळ्यांसमोर ठेवून तदनुसार छडीचा उपयोग करणारा शिक्षक मुलांच्या हृदयाचा राजा, त्यांच्या मनाच्या सोनकळ्या फुलविणारा कुशल व प्रेमळ माळी होऊ शकेल तरी कसा ? दगडाची फुले व्हावी कशी, विषातून अमृत इच्छावे कसे, मुसळाला अंकुर फुटण्याची आशा धरावी कशाला ? लहान मुलांना जे शिक्षक पाहिजेत ते प्रेमळ, ध्येयवादी, उदार असे पाहिजेत. स्त्रियांमध्ये हे गुण जास्त असतात, म्हणून अमेरिकेत बालशाळांत स्त्रियाच बहुधा शिक्षकांचे काम करतात !

ही झाली शिक्षकांसंबंधीची गोष्ट. आता जेथे शिक्षण देण्यात येते ती स्थळे कशी असतात हे पाहू. लहान मुलांना पाखरांप्रमाणे बाल हरिणपाडसांप्रमाणे सृष्टीच्या सहजसुंदर सान्निध्यात वाढवले पाहिजे. परंतु चार भिंतीच्या संकुचित वातावरणात, त्यांची जिज्ञासू दृष्टी अडवली जाते. त्यांच्या प्रेमळ व प्रसन्न दृष्टीसमोर शाळेभोवती व शाळेत गलिच्छता व घाण यांचे नरक असतात. काही काही गावातील मुलींच्या व मुलांच्या शाळा मी पाहिल्या आहेत. त्या इतक्या गलिच्छ आहेत की, तेथे जायला किळस वाटते, खंत येते. लहान मुलांच्या मनावर हितकर व रमणीय संस्कार निर्मायचे असतील तर ज्या ठिकाणी त्यांना शिकवायचे ती स्थाने निसर्गरमणीय अशी असावी. Cleanliness is next to goodliness - शुचिर्भूतपणा देवत्वाच्या मोलाचा गुण आहे. प्रसन्न वातावरणात मन प्रसन्न व निर्मळ राहते. गंधधूपाचा वास सुटला असता मन शांत होऊन सद्विचारांचे गाणे मनुष्य मनात गुणगुणू लागतो. ही स्वच्छपणची, निर्मलत्वाची भावना मुलांमध्ये आपण निर्माण केली पाहिजे. त्यांच्या मनावर कसलाही मळ साचू देता कामा नये. या हेतूच्या सिद्धीस्तव मुलांना शिक्षण देणाऱ्या शाळा स्वच्छ व निसर्गसुंदर अशा स्थळी असाव्या. हे यथार्थ नव्हे काय ? रानातील गुबगुबीत हरणे, सुंदर जलप्रवाह, विशाल वनराजी, मनोरम पक्ष्यांचे कुंजन यांचा प्राचीन आश्रमातील मुलांच्या मनावर पावन संस्कार होत नसेल का ?

रवींद्रनाथांनी या दोन गोष्टींचा खोल विचार केला. उत्कृष्ट व प्रेमळ शिक्षक आणि निसर्गरमणीय शाळा या दोन गोष्टींची मुलांना उत्तम शिक्षण द्यायचे असेल ती जरुरी आहे. हे त्यांनी ओळखले व त्यादृष्टीने त्यांनी प्रयोग करण्याचे निश्चित केले. कलकत्त्यापासून सुमारे १०० मैलावर बेलापूर म्हणून एक खेडे आहे. रवींद्रनाथांचे वडील देवेंद्रनाथ यांनी एक लहानसा आश्रम बांधलेला होता. महर्षी देवेंद्रनाथ या आश्रमात कित्येक महिने येऊन राहात असत व ईश्वरी प्रेमात डुंबत बसत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची समाधी, वृंदावन येथे बांधली होती. पित्याच्या पवित्र वासाने पुनीत झालेल्या या आश्रमस्थानातच आपण लहानशी बालबालिकांची शाळा काढावी असे रवींद्रांनी ठरवले व सन १९०८ मध्ये 'शांतिनिकेतन' ही संस्था स्थापन झाली.

एका कवीची 'कविकल्पना' म्हणून रवींद्रनाथांच्या या संस्थाप्रयोगाची पुष्कळांनी टर उडवली. पण थोर कार्यकर्ता कोल्हेकुईस भीत नाही व कार्यपराङ्मुख होत नाही. या शांतिनिकेतनमध्ये मुले येऊ लागली; रवींद्रनाथ येथेच येऊन राहिले. परंतु रवींद्रनाथांच्या आयुष्यात क्रांतीचा वेळ आता येणार होती. पूर्वीच्या वैषयिक

प्रेमांतून ते देशभक्तीच्या उद्यानात उतरले, आता देशभक्तीच्याही पलीकडे - देवभक्तीकडे, विश्वप्रेमाकडे ते वळायचे होते. ईश्वराने आता तसे प्रसंग त्यांच्यावर आणले, जे प्रसंग मनुष्यास ईश्वराकडे नेतात्त. त्यांची प्रिय पत्नी मरण पावली; कुटुंबातील इतर प्रिय अशाही काही व्यक्ती याच वेळेस इहलोक सोडून गेल्या. रवींद्रनाथ आता विरक्त झाले. त्यांचे लक्ष ईश्वराकडे गेले आणि ईश्वराला अनेक सुंदर संगीतांनी त्यांनी आळविले. नैवेद्य, रवेया वगैरे कविता याच वेळच्या. याच निरनिराळ्या गीतांना एकत्र करून पुढे गीतांजली झाली. या सर्व गीतांत भगवंत हाच एक विषय आहे. हृदयास विलीन करणारे नादमधुर रमणीय शब्द, सुंदर कविकल्पना, उत्कट भावना व भक्तीचा जिवंत झरा यांमुळे ही गीते अतीव मनोहर झाली यात नवल ते काय ? त्यांच्या मनाच्या अस्वास्थ्यामुळे, ते विलायतेस जाण्यास निघाले. त्यांचा दुसराही एक हेतू विलायतेस जाण्यात होता, तो म्हणजे तिकडील शाळांचे नीट परीक्षण-निरीक्षण करायचे हा होय.

रवींद्रनाथ बोटीत बसून विलायतेस निघाले. स्वतःच्या कवितांची पुस्तके त्यांनी बरोबर घेतली होती. बोटीवर असताना मनास विरंगुळा, करमणूक म्हणून त्यांनी आपल्या काही सुंदर कवितांची स्वतःच इंगजीत भाषांतरे केली. त्यांनी हे स्व-कवितांचे भाषांतर बोटीवरील एका इंग्रजी मित्रास दाखविले. त्याला ते फारच आवडले. तो मित्र त्यांना म्हणाला, 'जर हे भाषांतर आपण इंग्लंडला जाताच छापून प्रसिद्ध कराल, तर हे भाषांतर जगास वेडे करील.' 'पाहू' रवींद्रनाथ म्हणाले.

रवींद्रनाथ इंग्लंडच्या तीरावर उतरले. त्यांचे हृदय आशा-निराशांच्या तरंगावर हेलकावे खात होते. आपले हे भाषांतर जगास आवडेल का त्याचा तिरस्कार होईल हे त्यांना समजेना. तरी शेवटी 'गीतांजली' या नावाने हे भाषांतर प्रसिद्ध झाले.

दुसऱ्याच दिवशी वर्तमानपत्रातून अभिप्राय पाहतात तो त्यांच्या या लोकात्तर पुस्तकाची ओतप्रोत स्तुती सर्वत्र आढळली. बायरन या कवीने स्वतःबद्दल लिहिलें आहे: ' I woke up one morning and found myself famous - एक दिवस उठून पाहतो तो मी कीर्तिमंत झालेला !' विवेकानंदांची सर्वधर्मपरिषदेतील एकाच व्याख्यानाने सर्व जगात कीर्ती दुमदुमली - त्यांचाच दुसरा देशबंधू रवींद्रनाथ, त्यांचे तसेच झाले.

इंग्लंडमधील सर्व मासिकांमधून त्या 'गीतांजली' वर मोठमोठे स्तुतिपर लेख आहे. युरोपीय भाषांतून या कवितांची भाषांतरे झाली आणि नोबेल प्राइझ हे एक लक्ष दहा हजार रुपयांचे बक्षीस रवींद्रनाथांना मिळाले, रवींद्रनाथांनी मग आपल्या इतर प्रेमविषयक

कवितांचीही भाषांतरे केली. Gardner, Fruit gathering, Crescent Moon, वगैरे पुस्तके त्यांनी इंग्रजीत केली. रवींद्रनाथांनी स्वत:च इंग्रजीत भाषांतरे केली आहेत. यांचे इंग्रजी अत्यंत शुद्ध व सुंदर असते. रवींद्रनाथांची कीर्ती सर्वत्र पसरू लागली. 'आशियातील अपूर्व तारा' म्हणून ते संबोधले जाऊ लागले. हजारो ठिकाणी त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. व्याख्यानास त्यांना आमंत्रणे येऊ लागली. अशा रीतीने हा भारतभूमीचा सत्पुत्र – हा सत्कवी कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन बसला.

रवींद्रनाथांची कीर्ती अद्याप स्वदेशात पसरली नव्हती. हिंदुस्थानातील सत्पुत्रांनी परदेशात जेव्हा कीर्तिवंत व्हावे, तेव्हा त्यांची किंमत या देशातील स्वदेशबांधवांना कळते. रवींद्रनाथ विलायतेस गेले, तेव्हा त्यांचे नाव बंगालबाहेर फारसे ऐकू येत नसे. बंगालमध्येही त्यांच्या काव्यास नाके मुरडणारे थोडेथोडके नव्हते. परंतु आपल्या देशाची अशी पद्धतच आहे की, 'युरोपीय ज्याचा उदोउदो करतात, त्याची स्तुती मग आपणही करू लागायचे !' रवींद्रनाथांची गुणग्राही युरोपने केलेली पूजा ऐकून, तुकवलेला माथा पाहून, सर्व बंगालप्रांत त्यांच्या आगमनाप्रसंगी स्वागतार्थ तयारी करण्यास तयार झाला.

आले, कीर्तिदिवतेला वरून रवींद्रनाथ कलकत्त्यास आले. लाखो लोकांनी त्यांचा जयजयकार केला. अनेक ठिकाणी त्यांना मानपत्रे मिळाली. त्या वेळेचे उदारबुद्धी व गुणज्ञ व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी 'सर' ही पदवी रवींद्रनाथांना दिली आणि आपल्या व्याख्यानात 'आशियाचा कविसम्राट' अशा विशेषणाने त्यांचा गौरव केला. कलकत्ता युनिव्हर्सिटी आता रवींद्रांची पूजा करण्यास पुढे आली. आशुतोष मुखर्जी हे खरे गुणग्राही होते. त्यांनी रवींद्रनाथांना 'डॉक्टर' ही बहुमानाची पदवी अर्पण केली. युनिव्हर्सिटीची कोणतीही परीक्षा न देता ज्याला युनिव्हर्सिटीने 'डॉक्टर' पदवी दिली असे हे हिंदुस्थानातील पहिले उदाहरण ! अशा रीतीने रवींद्रनाथांचा स्वदेशी व परदेशी यश:परिमल पसरला. दिवसेंदिवस त्यांचा हा परिमल जास्तच पसरत आहे, अधिक मधुर होत आहे.

सन १९१६–१७ मध्ये हिंदुस्थानात 'होमरूल' ची चळवळ सुरू झाली होती. त्यावेळेस कलकत्त्यात अल्बर्ट हॉलमध्ये स्वराज्यावर रवींद्रनाथांचे व्याख्यान झाले होते. डॉ. ॲनी बेझंट यांना त्या वेळेस सरकारने अटक केली होती. रवींद्रनाथांनी या कृत्याचा इन्कार केला. त्यावेळेस इंग्लंडमधील एका मित्राने त्यांना लिहिले, 'सरकारविरुद्ध असंतोष पसरवणाऱ्या बाईची आपण बाजू कशी घेता?' त्यावेळेस

रवींद्रनाथांनी लिहिले, 'मी व्यक्तीची पूजा करीत नाही. ही व्यक्ती परकीय वा स्वदेशीय हे मी समजत नाही. जे न्याय्य व रास्त आहे त्याची मी बाजू घेतो. ती तत्त्वांचा वंदक आहे.' सन १९१७ मधील कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेस रवींद्रनाथ हे स्वागताध्यक्ष असावे, असा देशबंधू दास वगैरेंनी आग्रह धरला. परंतु सुरेंद्रपक्षास ते नको होते. शेवटी रवींद्रनाथांनी आपण होऊन आग्रह सोडून दिला. राजकारणातील ही त्यांची शेवटची वेळ होती. पुनश्च या राजकारणाच्या पक्षोपपक्षात ते पडले नाहीत.

ते आपण स्थापन केलेल्या 'शांतिनिकेतन' या संस्थेच्या समुन्नतीसाठी आता अविश्रांत खटपट करू लागले. स्वत:ला मिळालेली नोबेल प्राइजची सर्व रक्कम या संस्थेस त्यांनी दिली. वडिलोपार्जित इस्टेटीचे उत्पन्न पाऊण लाखाचे, तेही संस्थेस दिले. रवींद्रनाथांची कीर्ती जसजशी पसरत चालली तसतशी या संस्थेत अधिकाधिक मुले येऊ लागली. शिवाय या संस्थेस कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक परीक्षेस बसण्याची परवानगी असल्यामुळे तशा प्रकारचा अडथळा मुलांच्या मार्गात येण्यास जागा नव्हती. प्रथम प्राथमिक मुलांची शाळा, मग हायस्कूल, मग कॉलेज आणि आता विश्वभारती अशा क्रमाने ही सन १९०८ मधील लहान संस्था आज विश्वव्यापी होऊ पाहात आहे.

या संस्ति लहान मुलांना फुलांप्रमाणे वागवण्यात येते. ज्या वेळेस पाऊस वगैरे नसेल, त्यावेळेस मुलांचे वर्ग बाहेर वृक्षाखाली हरिततृणाच्छादित भूमीवर घेण्यात येतात. वर नील नभाचा चांदवा व बसायला धरणीमातेची मांडी–अशा वातावरणात मुलांचे शिक्षण चालते. परीक्षेच्या प्रश्नांची उत्तरे मुले झाडांवर बसून, सरोवराच्या तीरावर बसून कोठेही लिहितात. मुलांवर येथे पूर्णपणे विश्वास ठेवण्यात येतो. 'कोणत्याही प्रकारच्या बंधनाशिवाय कळी ज्याप्र े उमलते, त्याप्रमाणे कृत्रिम दडपणे मुलांवर न लादता, केवळ उत्कृष्ट जागेत, निसर्गरमणीय स्थळी त्यांना ठेवल्याने त्यांच्यासमोर सुंदर आदर्श राखून, त्यांना सदाचारी, पवित्र व आनंदी बनवता येईल' असे रवींद्रनाथांचे म्हणणे आहे. या शांतिनिकेतनात सर्व प्रकारची मोकळीक आहे. मुले येथे राजे आहेत. येथले वातावरणच असे राखण्याची खबरदारी घेण्यात येते की, ज्यामुळे मुलांच्या मनातील किल्मिष–किडे मरून जाऊन मनाचे रमणीय कमळ आपोआप फुलावे व सद्विचारांचा मकरंद, सद्भावनांचा सुवास त्यातून सर्वांनाच लुटण्यास मिळावा.

शांतिनिकेतन या संस्थेस विस्तृत व व्यापक स्वरूप देण्यासाठी रवींद्रनाथ सन १९१८ पासून प्रयत्न करू लागले. शांतिनिकेतनचे विश्वभारती युनिव्हर्सिटीत रूपांतर सन १९२३ मध्ये झाले. सर्व कला, अनेक शास्त्रे यांचे उच्च शिक्षण येथे मिळवण्याची

सोय होऊ लागली. विश्वभारतीची अभिनव कल्पना सर्व जगास कळविण्यासाठी त्यांनी जगभर दौरा काढण्यापूर्वी चीन, जपान वगैरे ठिकाणी ते व्याख्यानमाला देण्यास गेले होते. ही सुंदर विचारपूर्ण व्याख्याने पुस्तक रूपाने प्रसिद्ध आहेत.

शांतिनिकेतनचे 'विश्वभारती' या विश्वविद्यालयात परिणमन झाले. विश्वभारती विद्यापीठाचे पाश्चात्त्य व पौर्वात्य संस्कृतीचे तुलनात्मक पद्धतीने परिशीलन करणे करविणे हे ध्येय आहे. विश्वभारती ही आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटी आहे. इतर देशांतील विद्वानांनी व विद्यार्थ्यांनी येथे भारतीय संस्कृतीचे स्वरूप समजून घेण्यासाठी यावे, त्याप्रमाणेच निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत असे पाश्चात्त्य पंडित येथे आणवून त्यांच्या व्याख्यानमाला करवून येथील भारतीय विद्यार्थ्यांना पाश्चिमात्य संस्कृतीचा रस पाजावा, असे रवींद्रनाथांच्या मनात होते व या विद्यापीठद्वारा ते मूर्तिमंत होणार आहे. East is East and West is West - पूर्व ती पूर्व, पश्चिम ती पश्चिम – असे समजणारे रवींद्र नहीत. पूर्व आणि पश्चिम या दोहोंचा मनोज्ञ व रमणीय रवींद्रनाथांना कल्पनेस दिसे व तो प्रत्यक्ष सृष्टीत या विश्वभारती रूपाने ते आणीत आहेत, आणू पाहात आहेत. जे जे सुंदर व उदात्त आहे ते विश्वभारती विद्यापीठात पूजिले जाते. जेथे दिक्कालाचे बंध नाहीत. जे चांगले आहे, मग ते जुने असो, नवे असो, पूर्वेकडे असो, पश्चिमेकडे असो, घ्यायचे असे या विद्यापीठाचे ब्रीद आहे.

आपली ही उच्च कल्पना, विश्वसंस्कृतीच्या संमिश्रणाची कल्पना, जगातील विद्वानांसमोर मांडण्यासाठी ते रवींद्रनाथ युरोप-अमेरिकेच्या प्रवासास निघाले. अनेक देशांत या कविराजांचे राजासही निभावणार नाही अशा थाटामाटाने स्वागत झाले. फ्रान्सच्या मुख्य प्रधानाबरोबर त्यांना खाना देण्यात आला व विमानातून त्यांना मिरवण्यात आले. जर्मनीत तर त्यांच्या दर्शनास स्त्री-पुरुषांची, वृद्ध-तरुणांची, बालबालांची इतकी गर्दी झाली की, काही लोक चेंगरले गेले. जर्मनीत तेथील सर्व मोठमोठ्या पुस्तक प्रकाशन करणाऱ्या संस्थांनी त्यांच्या वाढदिवशी उत्कृष्ट जर्मन ग्रंथांचा एक संग्रह विश्वभारतीस अर्पण केला. ऑस्ट्रिया व इटली येथेही त्यांचे चांगले स्वागत झाले. इटलीचा पुढारी मुसोलिनी याने रवींद्रनाथांचा गौरव केला. इटालियन लोकांनी विश्वभारतीस उत्कृष्ट इटालियन ग्रंथ भेट म्हणून दिले. अशा प्रकारे ठिकठिकाणी आपला पवित्र प्रेमाचा संदेश, ज्ञानप्रांतात सर्वांनी एकत्र यावे, देवाण-घेवाण करावी, एकमेकांना साह्य करून सर्वांनी सुपंथ धरावा वगैरे गोष्टी त्यांनी आपल्या ओजस्वी व काव्यमय वाणीने सांगितल्या. युरोपातून ते अमेरिकेत गेले व तिकडेही या कल्पनांचा त्यांनी पुरस्कार केला.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

परदेशातून आल्यावर ते हिंदुस्थानात ठिकठिकाणी हिंडले, मोठमोठ्या शहरी ते गेले व श्रीमंत लोकांनी, संस्थानिकांनी त्यांना मोठमोठ्या देणग्या दिल्या. निजाम सरकारनेसुद्धा इस्लामी संस्कृती व अरबी भाषा यांना उत्तेजन देण्यात यावे म्हणून एक लाखाची देणगी विश्वभारतीस दिली आहे. याप्रमाणे सर्व देशांचा, सर्व जातींचा, सर्व पंथांचा, सर्व धर्मांचा पाठिंबा रवींद्रनाथांच्या विश्वभारतीस मिळाला आहे. समस्तांची सहानुभूती व साहाय्य त्यांनी संपादिली आहेत.

विश्वभारती ही एक अपूर्व संस्था भरतखंडात आज उभारली आहे. प्रत्येक देशाचे अन्य देशांशी असणारे विरोध नाहीसे करून जगात सहानुभूती व स्नेह यांचे संबंध निर्माण करून, ज्ञान व कला यांच्या विकासात विश्वाने रममाण व्हावे, ही विश्वभारतीची शिकवणूक आहे. विश्वभारती विद्यापीठात वाङ्मय, इतिहास, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, संगीत, चित्रकला, शेतकी वगैरे विषयांचे संपूर्ण ज्ञान देण्यात येते. येथील ग्रंथालय तर उत्कृष्ट आहे व निरनिराळ्या भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांनी ते सजलेले आहे, भरलेले आहे, निरनिराळ्या शास्त्रांतील निष्णात धुरीण येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून आहेत. जगातील विद्वान लोक येथे वरचेवर बोलावण्यात येतात. विंटरनिटझ् सिल्वा लेव्ही यांसारखे अखिल जगास ललामभूत होणारे विद्वन्मुकुटमणी येथे गंभीर व गहन व्याख्याने देऊन गेले. अशी ही अपूर्व संस्था–पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचे संमिश्रण करून मधुरतर अशी उच्च संस्कृती निर्माण करणारी ही संस्था रवींद्रनाथांनी उभी केली आहे व अशक्य वाटणारी ध्येये ते मूर्तिमंत करू पाहात आहेत. रवींद्रनाथांच्या या आश्चर्यकारक प्रयोगाला फळे कशी येतात हे कालांतराने दिसेल आणि फळ न मिळाले समजा, तर ज्या उदात्त भावनेने प्रेरित होऊन ही संस्था त्यांनी स्थापन केली, त्या भावनेचे रमणीय, पावन व विशाल स्वरूप कधी नाहीसे होणार नाही. त्या भावनेच्या महात्म्यासाठी तरी, त्या विचारांच्या उच्चत्वासाठी तरी रवींद्रनाथांचे स्तुतिस्त्रोत्र सदैव गाण्यात येईल.

रवींद्रनाथ हे विश्वप्रेमी आहेत. भारताच्या भाग्याचा जरी त्यांना अभिमान असला, ध्यास असला, 'साधना' या पुस्तकात भारतातील प्राचीन ऋषिश्वरांच्या उज्ज्वल गंभीर विचारांचा जरी त्यांनी पुरस्कार केला असला, याच विचारात जरी ते दंग असले, तरी त्यांना संकुचितत्व माहीत नाही. जगातील सर्व राष्ट्रे फेर धरून, हातांत हात धरून ज्ञानप्रेमस्वरूप सच्चिदानंदस्वरूप भगवंताच्या राऊळासभोती एकसाथ नाचावे हे त्यांचे ध्येय आहे. जगातील विषमता, कलह, विरोध, दुःख, दैन्य ही कमी–कमी कशी होत

जातील याचा विचार करण्यात ते मग्न असतात, यासाठी ते तळमळत असतात. महात्माजींनी पंजाबमध्ये अत्याचार झाले म्हणून असहकारिता सुरू केली, सत्याग्रहाचा समरशंख फुंकला, त्या वेळेस रवींद्रनाथांनी प्रथम महात्माजींचा गौरवपूर्ण शब्दांनी गौरव केला आणि आपणांस सरकारने दिलेली 'सर' ही पदवी त्यांनी परत केली. परंतु असहकारितेच्या चळवळीत पुढे विलायती मालाची होळी, पाश्चिमात्य शिक्षणावर बहिष्कार, 'केवळ चरखाच फिरवा म्हणजे स्वराज्य मिळेल' वगैरे गोष्टी जेव्हा शिरल्या, तेव्हा रवींद्रनाथांच्या चित्तास वाईट वाटले. हा पश्चिमेचा द्वेष आहे, हा पाश्चात्त्यांबद्दल द्रोहबुद्धी आहे, असे त्यांना वाटले. ते एका लेखात लिहितात, 'महात्माजींना आनंद व्हावा म्हणून त्यांच्यासाठी तरी चरखा आपण फिरवावा असे माझ्या मनात अनेकदा येई. पण माझी सदसद्विवेकबुद्धी मला तसे करू देईना.' जगात जे शास्त्रीय ज्ञान वाढत आहे, त्याचा उपायोग केल्याशिवाय कसे चालेल? त्या ज्ञानाचा उपयोग करून त्यातून जर काही वाईट निर्माण होत असेल, तर त्याचा परिहार करावा म्हणजे झाले. आपण दिवा लावतो, त्याची काजळी धरत नाही का? काजळी धरते एवढ्याचसाठी आपण दीपाचा त्याग करत नाही. जर्मनीत एकदा रवींद्रनाथ गेले होते तेव्हा तेथील पंडित त्यांना म्हणाले, 'आम्हा पाश्चात्त्यांस अंधारातून धडपडत जाऊन प्रकाश मिळविण्यात आनंद वाटतो. ठेचा, ठोकरा, खाऊन शहाणे व्हावे असे आम्हाला वाटते. तुम्हा पौर्वात्यांचे तसे नाही. एकदम प्रकाश मिळावा असे तुमचे मन असते.' याचा अर्थ असा की, आम्हांस गिरण्या वगैरे नकोत ! कारण त्यापासून भांडवलशाहीचे भूत निर्माण होईल. परंतु पाश्चिमात्य म्हणतात – या भुतास फार वर उठता येऊ नये म्हणून मजूरसंघ निर्माण करून मजुरांचा दाबही भांडवलवाल्यांवर राहील असे आम्ही करू. परंतु गांधी म्हणतील, 'एवढे करायला कोणी सांगितले?' ते कारखाने पण नकोत, ती भांडवलशाही पण नको. पूर्वीप्रमाणे लहान-सहान धंदे खेडोपाडी असू देत, म्हणजे एकाच्या हातीच सर्व सत्ता व पैसा जमणार नाही आणि सर्वांना पोटभर अन्न घाणेरड्या हवेत वगैरे न जाता मिळले.' फारशी दगदग व यातायात, खटाटोप न करता असे सुंदर रामराज्य आम्हा भारतीयांना पाहिजे असते, असे वरील जर्मन पंडितांचे म्हणणे आहे.

रवींद्रनाथांना पाश्चात्त्यांप्रमाणे सुखासाठी कशाचीही पर्वा न करणारे, सत्तेसाठी सर्वांना ठेचणारे, केवळ भोगमय जीवनात आनंद मानणारे आपले लोक व्हावे असे वाटत नाही. तर पण पाश्चात्त्यांतील जे काही चांगले आहे ते सर्व घ्या, असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून असहकारितेचे अंतिम स्वरूप त्यांना स्वीकारणीय वाटले नाही व त्यांनी आपली

स्पष्ट नापसंती एका लेखात दर्शविली होती. ते म्हणाले, सन १९०६ मधील राष्ट्रीय चळवळीने माझी मानसमुरली गीते गाऊ लागली, माझ्या हृदशवीणेच्या तारा कंप पावल्या. परंतु अहसहाकरितेने माझे मन कंप पावले नाही, हृदय हलले नाही; काव्यवेणू वाजली नाही. असहकारितेचा एकंदर प्रकार अमान्य असला तरी सरकारची त्यांनी तरफदारी केली नाही; तर सत्तामदांध सरकारचा स्पष्ट शब्दात निषेध केला.

रवींद्रनाथांना महात्माजींची असहकारिता पटली नाही, तरी रवींद्रनाथांचे वडील बंधू द्विजेद्रनाथ यांना पटली होती. ते म्हणत, 'रवी चांगला आहे, मोठा माणूस आहे, बुद्धिमान आहे, परंतु महात्माजींचे स्वरूप त्यास समजत नाही.' रवींद्रनाथ द्विजेंद्रनाथांना फार मान देत. द्विजेंद्रनाथासमोर ते एखाद्या मुलाप्रमाणे वागत. द्विजेंद्रनाथ यांना सर्व जण 'बडा दादा' असे म्हणत. महात्माजी व द्विजेंद्रनाथ यांचा परस्पर फार स्नेह आहे. द्विजेंद्रनाथ हे कवी, तत्त्वज्ञ व टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. तत्त्वज्ञानावरचे त्यांचे निबंध फार सुंदर व खोल आहेत. ईश्वरी प्रेमात व आनंदात ते इतके तल्लीन होत की, पशुपक्षी खुशाल त्यांच्या मांडीवर बसत. भर्तृहरीने म्हटले आहे.

'धन्यानां गिरिकंदरेषु वसंता ज्योतिः परं ध्यायताम् !
आनंदाश्रुकणात् पिबन्ति शकुना निःशंकमंकेशया :!!

'गिरीकंदरात राहणारे, परमेश्वरी ध्यानात रममाण असणारे, असे जे धन्य पुरुष, यांच्या मांडीवर बसून पक्षी त्यांच्या डोळ्यांतून गळणारे आनंदाश्रू पितात !' याच धन्यतम कोटीतील द्विजेद्रनाथ होते. द्विजेंद्रनाथ एका पद्यात म्हणतात, 'गेला, आयुष्याचा एक दिवस गेला ;! कपट करण्यात, खोट्या आशा धरण्यात, स्वार्थाच्या कोलाहलात हा क्षण चालला, सर्व दिवस, आयुष्य चालले ! उगीच-व्यर्थ अशाप्रमाणे एकेक दिवस काटला जात आहे !' जगाची ही अशी फुलपाखरे ध्येयहीन जीवितवृत्ती त्यांना खिन्न करी. हे थोर पुरुष दोन वर्षांपूर्वी दिवंगत झाले.

अशा द्विजेंद्रनाथांस जरी आपले असहकारितेसंबंधी वगैरे मत पटले नाही तरी रवीबाबू स्वतःच्याच विचारांना धरून राहिले. स्वतःच्या मनोदेवतेच्या विरुद्ध ते कसे जातील? स्वतःच्याच अंतःकरणातील सदसद्विवेकबुद्धीचा सूर ते निरंतर ऐकतात व त्याप्रमाणे वागतात. त्यानी आपल्या एका कवितेत स्वतःच्या मनोबुद्धीचे मोठे सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात :

'अरे, तुला तुझे लोक सोडून देतील, तरी त्यामुळे रडत बसू नकोस; अरे, तुझी आशावेली छिन्नभिन्न होऊन पडले व तिला फळ-फूल काही लागणार नाही तरी खिन्न

होऊ नकोस; अरे, तुझ्या मार्गात अंधार पडू लागेल व रात्र होईल, तुफान वारे सुटतील व तुझ्या हातातील दीप पुन्हा पुन्हा विझेल; तुझ्या हाका कोणी ऐकणार नाही; तुजबरोबर कोणी येणार नाही, तरी हे मना, तू एकटाच चल.'

रवींद्रनाथांची दृष्टी विश्वप्रेमी आहे, म्हणून त्यांना असहकारिता संकुचित वाटली. रवींद्रनाथांच्या मतांची पुष्कळजण थ ट्टाही करतात. परंतु स्वत:च्या विचारांची त्यांना पूज्यबुद्धी आहे. भवभूतीप्रमाणे ते पण म्हणत असतील,

'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा !

कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी !!'

'माझ्या विचारांशी ज्यांचे विचार जुळतील, असा समानधर्मा बंधू भूतलावर कोठे तरी असेल, नसेल तर निर्माण होईल, कारण काळ अनंत आहे, पृथ्वी अपार आहे!' रवींद्रनाथांसारखे ज्यांचे विचार आहेत असे ॲण्ड्रूज, रोमारोलांसारखे महात्मे आजही आहेत.

या हिंदुस्थानचे पवित्र कर्तव्य हे आहे की, सर्व धर्मांचे, जातींचे लोक गुण्यागोविंदाने राहू शकतात हे दाखविणे. ऐक्याचा धडा भारताने जगास घालून द्या यासाठी तर तो देवाने जिवंत ठेवला आहे. आजपर्यंत या भरतखंडावर शेकडो परकीयांनी हल्ले केले, पाश्चात्त्य येत आहेत, परंतु सर्वांत काहीतरी हेतू आहे. रवींद्रनाथ आपल्या एका गाण्यात म्हणतात :

'हा भारतवर्ष हा एक महासागर आहे. या सागराच्या तीरावर किती लोक खेळायला आले आहेत ! हे माझ्या हृदया, तू या पुण्यमय यात्रेच्या वेळी, या स्थानी जागा होऊन हजर राहा.

या अफाट किनाऱ्यावर, या अनंत लोकांना वंदन करण्याकरिता मी हस्तांजली जोडून उभा आहे. मी या सर्वांना आनंदाने गाणी गाऊन स्तुती करतो आहे. या हिंदुस्थानातील टेकड्या जणू ध्यानस्थ बसलेल्या आहेत असे वाटते. ही सर्व सपाट मैदाने गुलाबाचे बगीचे हातात धरून बसली आहेत असे वाटते.

या हिंदुस्थानात मानवजातीच्या या किनाऱ्यावर, नेहमी पवित्र भूमीच तुम्हाला आढळेल. कोणाच्या बरे बोलावण्यावरून, कोठून बरे एवढी मोठी मानवसंख्या, मोठ्या वेगाने येथील मानवसमुद्रात विलीन होण्यासाठी आली आहे हे समजत नाही, आर्य, अनार्य, द्रविड, चिनी, सिथियन, हूण, पठाण, मोंगल आणि इतर सर्व लोक या हिंदुस्थानातील मानवसागरात एक होऊन गेले आहेत.

आणि हल्ली तर पश्चिमेकडील पण दरवाजे उघडले आहेत, आणि तिकडून निरनिराळ्या देणग्या घेऊन ते लोक येत आहेत. ते लोक आपणांस देणग्या देतील आणि आपण दिलेल्या घेतील. ते आपल्या लोकांबरोबर एकी करतील आणि ऐक्य घडून येईल. ते या मानवजातीच्या किनाऱ्यावरून परत जाणार नाहीत.

आर्य लोकांनो, या. आनुर्यांनो, तुम्ही देखील या पवित्र भूमीत या, हिंदू मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन, सर्वांना, तुम्ही या देशात या.

ब्राह्मणांना, तुम्हीदेखील या पवित्र भूमीत, या आणि सर्व लोकांना आपल्या हृदयाशी हातांनी घट्ट धरा आणि स्वत:ची हृदये पवित्र करा.

जे लोक दुसऱ्याकडून तिरस्कारले जातात, ज्यांची जगात दुष्कीर्ती आहे, ज्यांना अपवित्र मानतात, त्यांनीदेखील या पवित्र समुद्रतीरी यावे. त्यांची दुष्कीर्ती येथे नाहीशी होईल. या, सर्वजण आपल्या मातेला राजमुगुट घालण्याकरता एकत्र या.

सर्वांच्या स्पर्शाच्या योगाने पवित्र झालेल्या पाण्याने हे पवित्र पात्र भरून ठेवा. हिंदुस्थानात, मानवजातीच्या या सर्व संमेलनाच्या तीरावर येऊन सर्वजण विशुद्ध व्हा.'

किती सुंदर हे विचार आहेत ! पाश्चिमात्य लोकसुद्धा हिंदुस्थानात आले. पण काही देतील व मिळून मिसळून राहतील अशी आशा रवींद्रनाथांनी या गीतात प्रगट केली आहे.

रवींद्रनथांचे हृदय सृष्टीशी समरस झालेले आहे. सृष्टी हा त्यांचा परमेश्वर आहे; सृष्टी हा त्यांचा परात्पर गुरू आहे. Nature is the greatest teacher. निसर्गाचे नानाविध विलास त्यांना सुखावतात, भुलवतात, शिकवतात. गंगेच्या प्रशांत प्रवाहावर, आपली पत्नी वगैरे वारली तेव्हा, एका नौकेत राहूनच त्यांनी दोन–तीन वर्षे काढली. पद्मा नदीचा अफाट विस्तार, येणारे गार वारे, दिसणारे सहस्त्रावधी तरंग आणि त्यात प्रतिबिंबित झालेली आकाशातील शोभा या सर्वांचा ठसा त्यांच्या मनावर खोल उठे. हे सृष्टीत नटलेले परमेश्वररूप ते पूजीत. गीतांजलीतील अनेक विश्वमोहनगीते या पद्मेच्या प्रवाहावर राहात असताना रवींद्रनाथांनी लिहिली आहेत. सर्व जेवणखाण, राहणे, बसणे, उठणे, निजणे या नावेत बसून चालले होते आणि आपले संतप्त मन विश्वस्वरूप परमेश्वराच्या संदर्शनानें ते प्रसन्न व प्रशांत करीत होते. सृष्टीचे शांत स्वरूप पाहिले म्हणजे त्यांच्या हृदयात शांत रस उचंबळून येई; सृष्टीचे भीषण स्वरूप पाहिले म्हणजे अननुभूत खळबळ त्यांच्या हृदयात उठे. त्यांचे हृदय म्हणजे सृष्टिदेवतेची वीणा आहे.

एकदा शांतिनिकेतनमध्ये सायंकाळच्या वेळी ते आपल्या आश्रमातून बाहेर पडले. इतक्यात सोसाट्याचे वारे वाहू लागले. मेघमाला आकाशात गोळा होऊ लागल्या. विजा चमकू लागल्या, कडकडू लागल्या. सृष्टीचे हे तांडवनृत्य रवींद्रनाथांना पुढे पाऊल टाकू देईना. ते तेथेच भावनोन्मत्त होऊन खाली बसले व सृष्टिमातेशी समरस झाले. त्यांच्या शिष्यांनी त्यांच्याजवळ दिवा वगैरे आणून ठेवला. बाहेर अंधार पडू लागला. परंतु वादळ मावळले. रवींद्रनाथ – गुरुदेव – (त्यांना शांतीनिकेतमध्ये 'गुरुदेव' म्हणतात) उठले, आश्रमात गेले आणि एक सुंदर गीत त्यांनी लिहून काढले. वर्डस्वर्थबद्दल जसे म्हटले आहे की, कधी–कधी निसर्गदेवताच वर्डस्वर्थची लेखणी स्वतःच्या हातात घेऊन काव्य लिहिते आहे, असे वाटते. तेच शब्द रवींद्रनाथांना लावले तरी काय हरकत ? सृष्टीशी तादात्म्य पावून सृष्टीचे गूढ व मूक संदेश विश्वास सांगणारा असा हा थोर कविराजा आज भारतवर्षात नांदत आहे आणि व्यास–वाल्मिकींचा देखावा पुन्हा आपणास दिसत आहे.

रवींद्रनाथ हे कवी, नाटककार, कादंबरीकार, लुघकथालेखक, टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची नाटके लहान लहान आहेत. ती रंगभूमीवर तितकी यशस्वी होणार नाहीत, कारण त्यात थोडा गूढवाद असतो. कधीकधी रवींद्रनाथ, त्यांचे शिष्य व कुटुंबातील काही मंडळी उत्सवप्रसंगी ही रवींद्रनाथांचीच नाटके रंगभूमीवर करून दाखवतात. यात रवींद्रनाथही उत्कृष्ट भूमिका करून दाखवतात. निरनिराळ्या ऋतूंत करण्यासाठी निरनिराळ्या नाटिका त्यांनी लिहिल्या आहेत. रवींद्रनाथांच्या कादंबऱ्या फार उच्च दर्जाच्या आहेत. गोरा, घरेबहिरे, नौकाडुबि वगैरे त्यांच्या कादंबऱ्या जगन्मान्य झाल्या आहेत. सुंदर भाषा, काव्यमय कल्पना व विचार, मानवी मनावरील पापुद्रे हलक्या हाताने काढून त्या मनाचे दाखवलेले नानाविध स्वरूप, या गुणसमुच्चयामुळे या कादंबऱ्या विश्वजनांस वेधून टाकणाऱ्या झाल्या आहेत. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची मराठी भाषांतरे झालेली आहेत. उत्कृष्ट लघुकथालेखक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यामधून बंगाली नारीजनांची दाखवलेली चित्रे फार सुंदर आहेत. भारतीय स्त्रियांची संस्कृती व त्यांची मने, या गोष्टींत आपणास चांगली पाहावयास सापडतात. 'काबुलीवाला' ही त्यांची एक उत्कृष्ट लहानशी कथा आहे. धटिंगण दिसणाऱ्या एखाद्या पठाणाच्या अंतःकरणात वात्सल्य, प्रेम यांच्या भावना कशा असतात, हे या गोष्टीत मोठे सुरेख दाखविले आहे.

बंगाली व्याकरण व शुद्धलेखन यांवरही त्यांनी निबंध लिहिलेले आहेत. वाङ्मयाच्या सर्व शाखांत त्यांचा अनिरुद्ध संचार सुरू आहे. अजूनही त्यांची प्रतिभा क्षीण झाली नाही. नुकतेच जावा, समात्रा, वगैरे जुन्या आर्यसंस्कृतीच्या प्रदेशात जाऊन आल्यावर त्यांची दृष्टी आणखी व्यापक व खोल होत चालली आहे. जगास देण्याची व जगातून घेण्याची शक्ती अजून त्यांच्या बुद्धीची आहे. त्यांची एकंदर ग्रंथसंख्या जवळजवळ शंभरापर्यंत जाईल. तीस खंडीत त्यांची आतापर्यंतची लेखनसामग्री छापून झालेली आहे. बंगालमध्येच काय पण सर्व जगातील ते थोर वाङ्मयसेवक खद्योतप्राय दिसतात. बंगालमध्ये आज पंचवीस वर्षे रवींद्रनाथांचे युग आहे.

रवींद्रनाथांच्या काव्यातून उतारे वगैरे देण्याचे हे स्थळ नाही. त्या अफाट काव्यसागरातून कोणते निवडायचे ? माणिकमोत्यांच्या राशीतून मूठभर माणिकमोती निवडून कशी देता येतील ?

रवींद्रनाथ हे भारताचे भूषण आहेत, अमोल अलंकार आहेत. त्यांची हल्लीची ती प्रशांत मूर्ती, ती वक्षस्थळावर रुळणारी लांब दाढी, ते प्रेमसरोवर डोळे, ते वस्तुमात्रात प्रवेश करू पाहणारे सरळ नाक, ते आकाशाप्रमाणे भव्य कपाळ, ती रेशमी सुंदर कफनी हे सर्व पाहिले म्हणजे पुरातन ऋषिवरांची कोणास आठवण होणार नाही ? त्यांच्या निर्मळ मनास व शरीरास यत्किंचित घाण, मळ सहन होत नाही. त्यांच्या सर्व जीवनात सौंदर्य व कला यांचा रस भरलेला आहे. विचार सुंदर, आचार सुंदर, बोलणे सुंदर, लिहिणे सुंदर, पेहराव सुंदर, शरीर सुंदर – सौंदर्याचा सागरच जणू, असा हा महापुरुष आहे. निसर्ग व कला यांचा मोहक मिलाफ त्यांच्या ठिकाणी आहे. अशा थोर पुरुषास भरपूर आयुष्य लाभो व भारताचे वैभव भूतलावर वाढत राहो. रवींद्रनाथ हे भारतीय असले, तरी विश्वगुरू आहेत. थोर कवी हे एका राष्ट्राचे नसतात; सर्व विश्वाची मालकी त्यांच्यावर असते. शेक्सपिअर सर्वांचा आहे; व्यासवाल्मिकी सर्वांचे आहेत. तसेच रवींद्रनाथही. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे सर्व विश्वाला 'आनंदाचे आवारू' घालण्यासाठी त्यांचा जन्म आहे. ते सर्व विश्वास ललामभूत आहेत. त्यांच्या यशाचे लेणे सर्व विश्व धारण करील. रवींद्रनाथांना शांतिनिकेतनमध्ये 'गुरुदेव' म्हणतात. खरोखरच ते गुरूंचे गुरू आहेत. हल्लीच्या या स्वार्थाच्या बजबजपुरीत, तोफाबंदुकांच्या धूमधडाक्यात, सैतानी साम्राज्याच्या या काळात या थोर पुरुषाने प्रेमाची व ऐक्याची मधुर मुरली वाजविली आहे. त्या मुरलीचा नाद व्यर्थ जाणार नाही, अशी आपण आशा का करू नये ?

✦✦✦

पं. ईश्वरचंद्र विद्यासागर

प्रस्तावना

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात बंगालमध्ये 'ईश्वरचंद्र विद्यासागर' ह्या नावाचे एक फार थोर गृहस्थ होऊन गेले. त्यांचे नाव बंगाली लोकांना अत्यंत प्रिय झालेले आहे. ईश्वरचंद्र हे अत्यंत बुद्धिमान, बाणेदार, आई-बापांस देवासमान मानणारे, दीर्घोद्योगी व दयाशील गृहस्थ होते. त्यांची कामगिरीही विविध प्रकारची आहे. त्यांनी बंगालमध्ये संस्कृत-महाविद्यालय, स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, एकपत्नीत्व इत्यादी विविध चळवळींचा पुरस्कार करून व त्या प्रीत्यर्थ सर्व प्रकारची झीज सोसून आपल्या बांधवांची सेवा केली आहे. ह्यामुळे वंदनीय विभूतींमध्ये त्यांनी गणना केली पाहिजे.

पण्डित ईश्वरचंद्र विद्यासागर ह्यांचे चरित्र विद्यार्थी वर्गाला अनेक दृष्टींनी मार्गदर्शक होण्यासारखे आहे. विद्यासागरांची बुद्धिमत्ता जरी प्रयत्नसाध्य असली तरी पितृभक्ती, दीर्घोद्योग व स्वबांधवांचे दुःख हलके करण्यासाठी कोणतेही कष्ट करण्याची तयारी हे त्यांचे गुण प्रत्येकाला थोड्या तरी प्रमाणात प्राप्त करून घेता येण्यासारखे आहेत. ईश्वरचंद्रांप्रमाणे जरी विद्यासागर होता आले नाही, तरी दयासागर होण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या जीविताचे सार्थक होईल, असा माझा दृढ विश्वास आहे. स्व-जनांची सेवा करीत असतानासुद्धा त्यांच्यातील काही लोकांच्या गैरसमजुतीमुळे किंवा रूढीप्रियत्वामुळे आपणास हालअपेष्टा सोसाव्या लागतात, त्यांचे बोल सहन करावे लागतात. त्यांच्याकडून प्रसंगी आपला छळही होतो. इतके झाले तरी कार्यावर नजर ठाम ठेवून, त्यांच्यातच राहून, चिडून न जाता, वैतागून न जाता, थोर पुरुष आपले ध्येय गाठण्याचा कसा प्रयत्न करतात, ह्याचे ईश्वरचंद्र विद्यासागर हे एक उत्कृष्ट उदाहरण होय. कार्यकर्त्या स्त्री-पुरुषांनी हा बोध नेहमी मनात वागविला पाहिजे, तरच मोठमोठी कामे तडीस नेणे शक्य होईल.

बुद्धिमत्ता ही ईश्वरी देणगी आहे. परंतु सद्गुण प्रयत्न केल्यास संपादिता येतात. सद्गुणांची वाढ करणे हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. या दृष्टीने विचार केला असता अशी चरित्रे ही उत्तम शिक्षक होत. रा. साने हे शालगृहांतच मुलांना पढवून समाधान मानणारे शिक्षक नसून मुलांच्या मनावर सद्वर्तनाचा ठसा कायमचा उमटावा म्हणून हा त्यांचा प्रयत्न आहे. रा. साने हे चांगले लेखक आहेत; त्यांनी

ह्यापूर्वी लिहिलेले कै. गोपाळराव गोखले ह्यांचे चरित्र विद्वानांना पसंत पडले आहे. तेव्हा प्रस्तुत चरित्राविषयी विस्ताराने लिहिण्याचे कारण नाही. हे चरित्र रा. साने ह्यांनी मुद्दाम विद्यार्थिवर्गाकरिता लिहिले आहे. आणि विद्यार्थ्यांनी ते वाचून त्याचे मनन करावे, इतके ते उदात्त आहे. तरी विद्यार्थ्यांनी ह्याचे चीज केल्यास आणखी अशीच चरित्रे लिहिण्यास रा. साने ह्यांना उत्साह वाटेल, आई-बापांनी हे चरित्र आपल्या मुलांकडून अवश्य वाचून घ्यावे अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

– धों. के. कर्वे

प्रस्तावना

बंगालमध्ये ईश्वरचंद्र यांचे नाव लहान मुलांच्यासुद्धा परिचयाचे आहे. आपल्या घरासमोर आईबाप ईश्वरचंद्रांचा आदर्श ठेवतात. जुन्या बाळबोध घराण्यात, राजनिष्ठ कुटुंबात, राष्ट्रीय वृत्ती बाळगणाऱ्या गृहस्थांच्या घरात, सर्वत्र ईश्वरचंद्रांचा कित्ता ठेवलेला असतो. मनुष्याचे चरित्र ईश्वरचंद्रांप्रमाणे असावे, त्यांचा जीवनक्रम डोळ्यांसमोर ठेवून मुलांनी पावले टाकावी व जगाच्या भ्रमभोवऱ्यात शिरावे आणि उत्तम नावलौकिक संपादावा, अशी आई-बापांची बंगाली बाळांना बालपणापासून शिकवण असते. विद्यासागरांचे नाव तेथे फार घरोब्याचे आहे. आपल्याकडे 'ज्ञानोबा, तुकाराम' ज्याप्रमाणे प्रत्येक लहान-थोरांना माहीत आहेत, त्याचप्रमाणे बंगालमध्ये ईश्वरचंद्रांसंबंधी आहे.

ईश्वरचंद्र म्हणजे अत्यंत आज्ञाधारक, आई-बापास देवाप्रमाणे मानणारा एक सत्पुरुष, अत्यंत उद्योगी, विपन्नावस्थेतून, स्वपराक्रमाने यशोवैभवसंपन्न होणारा, अशा स्वरूपात त्यांची पुष्कळांना ओळख असते. ईश्वरचंद्र म्हणजे दयेचा सागर ही पण जाणीव सर्वांना असते. परंतु या गुणसमुच्चयाबरोबर ईश्वरचंद्र हे सिंहासारखे शूर, अनंत संकटांशी टकरा देणारे वीर, सतत चिकाटीने, ध्येयार्थ सज्ज असणारे नरसिंह, सुखांना न लालचावलेले, स्वाभिमान-सूर्य सदैव तळपत ठेवणारे, सत्त्वासाठी सर्वस्वावर तिलांजली वाहण्यास यत्किंचितही मागे-पुढे न पाहणारे, एक निर्भय पुरुषव्याघ्र होते, हे मात्र पुष्कळांना माहीत नाही. पुष्कळ आईबाप ईश्वरचंद्रांच्या जीवनातील ही गोष्ट आपल्या मुलांच्या मनावर बिंबवीत नाहीत. दुसऱ्याचे दुःख पाहून ढसाढसा रडणारे विद्यासागर, जर कोणी त्यांचा व इतरांचा स्वाभिमान, स्वत्व हिरावून घेण्याचा प्रयत्न केला, तर हेच विद्यासागर मेरुपर्वताप्रमाणे धीरवृत्तीने लढण्यास सिद्ध असत; राज असो राजराजेश्वर असो, त्यांना त्याची तमा नसे. स्वाभिमानशून्य नरांचे जीवित म्हणजे आंधळे, निःसत्त्व पशूंचे जीवन होय. पशूसुद्धा स्वत्वासाठी धडपडतात. सर्पाच्या फणेवर दर्पाने कोणी लगुडप्रहार तर तो सरपटणारा सर्प फूत्कार करतो; अंगावर धावून येतो. विद्यासागरांना अपमान सहन होत नसे. ते

स्वाभिमानी होते. या मृदू-कठोरत्वामुळे त्यांच्या जीवनाला विशेष शोभा आली आहे. ते फुलासारखे कोमल आहेत; तर वज्राप्रमाणे कठोरही आहेत. विद्यासागर हे खरोखर विद्येचे, ज्ञानाचे सागर होते. ते मोठे समाजसुधारक होते. समाजामध्ये महत्पद प्राप्त करून त्यांनी घेतले होते. त्यांच्या साह्याची प्रत्येक सामाजिक चळवळीत विशेष जरूर असे. बंगालच्या मुख्य सत्ताधीशापासून तो रस्त्यात रखडणाऱ्या भिकाऱ्यांपर्यंत त्यांची सर्वांना सारखीच जरूर भासत असे. प्रत्येक जण त्यांची स्तुती करी, त्यांची पूजा करी. त्यांचे शारीरिक सामर्थ्यही फार मोठे होते. तिघा-चौघां गलेलठ्ठ धटिंगणांबरोबर ते एकटे झगडू शकत. मनुष्याने जसे असावे तसे ते होते. ते निर्मळ होते, ते सत्यनिष्ठ होते. एका विनोदी बंगाली माणसाने एकदा सहज उद्‌गार काढले, 'परमेश्वर पुष्कळ बंगाली निर्माण करीत होता. इतक्याच मध्येच त्याने ईश्वरचंद्र हा पुरुष चुकून निर्माण केला.' याचा अर्थ म्हणजे भित्रा, भ्याड, बंगाली बंधूत पुरुष पदवीस पात्र ईश्वरचंद्र होते. ते पुरुष होते हेच त्यांचे यथार्थ वर्णन. त्यांच्या पौरुष होते. पौरुषाशिवाय पुरुष कसला ? ते पुरुष होते. ते मर्द होते. हे पौरुष, हा मर्दानीपणा, हा स्वाभिमान वाचकांनी विद्यासागरांच्या चरित्रापासून घ्यावा एतदर्थ हे खालील छोटे चरित्र आम्ही लिहिण्याचे योजिले आहे.

+++

पूर्वजांची व वडिलांची हकिकत – जन्म व बालपण

विद्यासागरांचा जन्म बंगालमध्ये हुगळी जिल्ह्यातील वीरसिंह या गावी झाला. विद्यासागरांच्या आजोबांचा स्वभाव काहीसा तऱ्हेवाईक होता. ते शरीराने प्रति भीम होते. फार शूर व हट्टी. त्यांना अपमान अल्पही सहन व्हायचा नाही; अगदी क्षुल्लक गोष्टींनीही ते संतापायचे; रागाने लाल व्हायचे. प्रति जमदग्नीच ते ! मस्तकाच्या शिरा ताडताड उडू लागायच्या; डोळे खदिरांगारासारखे लाल व्हायचे; सर्व शरीर क्रोधाने कंपायमान व्हावे परंतु शरीराचे ठिकाणी आविर्भूत होणारा क्रोध प्रत्यक्ष कृतीत रूपांतर पावत नसे. ज्या व्यक्तीवर ते संतापत, त्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारे ते उपसर्ग देत नसत, हेही खरे. म्हणजे त्यांचे मन खरे पाहिले, तर नवनीतसमच होते हे निःसंशय होय. एकदा फार विरक्त होऊन ते घरातून बाहेर पडले. नाना तीर्थे त्यांनी केली, सर्व यात्रा केल्या; परंतु आयुष्याचा सायंसमयीचा पडदा पडण्याच्या वेळी, विद्यासागरांचे आजोबा आपल्या मुला-बाळांच्या गोकुळात आले आणि ते घरीच देह ठेवते झाले.

विद्यासागरांची आई एका पंडिताची कन्या होती. विद्यासागरांच्या आईचे वडील त्या वेळी सर्व बंगालमध्ये नावाजलेले वैय्याकरणी होते. विद्यासागरांची आई ही हिंदू आर्य स्त्रीचा केवळ आदर्श होती. आपल्या मुलाच्या जीवनक्रमावर तिच्या वर्तनाची विलक्षण छाप पडली, हे खरे. दयासागर ही पदवी विद्यासागरांना मिळावयास त्यांच्या मातेचे परोपकारित्वच कारण आहे. तिची भूतदया अभूतपूर्व होती. ती केवळ माउली होती. ईश्वरचंद्रांची आपल्या आईवर किती श्रद्धा, भक्ती, निष्ठा होती हे सांगितले तर सध्याच्या दिवसांत त्यावर कोणाचा विश्वाससुद्धा बसणार नाही.

ईश्वरचंद्रांच्या वडिलांचे नाव ठाकुरदास बंद्योपाध्याय. दारिद्र्याच्या गारठ्यात ते कसे तरी कुडकुडत वाढले. त्यांचे शिक्षण अर्थातच बेताचे झाले. आपल्या

कुटुंबातील विपन्नावस्था पाहून त्यांचे करुण मन वितळले. त्या वेळेस ते १५ वर्षाचे सरासरी झाले असतील. परंतु ठाकुरदास केवढ्या धीराचे ! आपले सोन्यासारखे धाकटे भाऊ, आपली कृश माता यांना सुख देता येईल तर पाहावे या विचाराने ठाकुरदास आपल्या घरादारास सोडून कलकत्त्यास आले. या वेळी त्यांचे लहरी वडील दूर यात्रा करीत कोठे तरी भटकत होते.

ठाकुरदास हे उद्योगाचे भगीरथ; स्वभाव प्रामाणिक. या दोन अमोलिक गुणांच्या जोरावर अनेक अडचणींतूनही त्यांनी महिना दोन रुपये वेतनाची नोकरी मिळवली. परंतु ही दोन रुपयांची भलीमोठी नोकरी मिळण्यापूर्वी त्यांना किती कष्टाचे दिवस कंठावे लागले! पुष्कळ दिवस त्यांना एकदाच खाऊन राहावे लागे. एका दयाळू सद्गृहस्थाने एकदा त्यांना आचारी म्हणून ठेवले. परंतु ठाकुरदासांचा हा दयाळू यजमानच काही कारणांमुळे अत्यंत गरिबीत आला; तेव्हा ते उभयता मोठ्या मिनतवारीने दिवस लोटीत होते.

एक दिवस ठाकुरदासांच्या पोटात अन्नाचे एक शितसुद्धा गेले नाही. भुकेने पंचप्राण कंठात गोळा झाले. क्षुधेचे भीषण दुःख विसरावे या हेतूने ठाकुरदास घराच्या बाहेर पडले. लाह्या विकणाऱ्या एका बाईच्या दुकानासमोर दमून गेलेला, निर्जीव झालेला, गलितगात्र झालेला ठाकुरदास उभा राहिला. बाईने ओळखले की हा ब्राह्मण भुकेला आहे. "ठाकूर, आपणांस काही पाहिजे का ?" असे तिने गोड व सहानुभूतिपूर्वक स्वराने विचारले. "एक पेलाभर पाणी द्या" असे ठाकुरदास म्हणाले. ब्राह्मणास नुसते पाणी कसे द्यावे असा बाईस विचार पडला; म्हणून तिने काही लाह्या ब्राह्मणास दिल्या व वर एक पेलाभर पाणी दिले. त्या लाह्या ठाकुरदासने एखाद्या दुष्काळात सापडलेल्या बुभुक्षिताप्रमाणे तेव्हाच मटकावल्या. तेव्हा बाईने ब्राह्मणास विचारले, 'ठाकूर, तुम्ही जेवला नाही वाटतं ?' न बोलता संमतिपूर्वक उत्तर ठाकुरदासाने दिले. ती बाई पुत्रवत्सल होती. तिचे अंतःकरण द्रवले. ती कळवळली. ती एका गवळ्याच्या घरी गेली आणि काही दही घेऊन परत आली. नंतर लाह्या आणि दही तिने त्यास पोटभर खायला दिले. नंतर ती त्यांना म्हणाली, "कधी तुला जेवणखाण मिळाले नाही, ज्या दिवशी तुला उपाशी राहण्याची वेळ येईल, त्या दिवशी तू तत्काळ मजकडे येत जा आणि क्षुधाशांती करीत जा." त्या मुलापासून तिने होकारार्थी वचन घेतले.

विद्यासागर आपल्या वडिलांच्या आयुष्यातील ही मोठी करुणापूर्ण कहाणी ज्या ज्या वेळेस आपल्या मित्रांना सांगत, त्या वेळेस त्यांच्या डोळ्यांत अश्रुबिंदू

चमकल्याशिवाय राहात नसत. अशा प्रकारच्या बारीकसारकी गोष्टी पाहून एकंदर स्त्रीजातीसंबंधी त्यांचे हृदय कृतज्ञतेने व प्रेमाने भरून येई. आणि या प्रेमामुळेच या स्त्रीजातीच्या समुन्नतीसाठी त्यांनी अनेक संकटे सुखाने सहन केली.

ठाकुरदास यांना महिना दोन रुपये मिळत. परंतु निरनिराळ्या उपायांनी तो आपले पैसे साठवी व ते पाच पुत्रांसह गुजराण करणाऱ्या आपल्या आईकडे, पाठवून देई. मुलाकडून ही प्रेमाची व कष्टाची मदत अल्प का होईना, जर आली तर त्या माउलीच्या पोटात भडभडून येई व तिचे अंतःकरण कितीतरी गहिवरे.

पुढे काही दिवसांनी ठाकुरदास यांची भगवच्चरणदास नावाच्या श्रीमंत गृहस्थांजवळ गाठ पडली. भगवच्चरण यांची व ठाकुरदासचे वडील यांची पूर्वीची ओळख होती. ठाकुरदास यांची सचोटी, सततोद्योग, चिकाटी पाहून भगवच्चरण संतुष्ट झालें व त्यांनी ठाकुरदास यांना आपल्या घरी येऊन राहण्यास व आपल्याबरोबर भोजन करीत जाण्यास सांगितले. या वेळेपासून विद्यासागरांच्या घरात सुख आणि समाधान नांदू लागली. गृहसौख्य मिळू लागले. काळजीकथा दूर होऊ लागली.

ठाकुरदास यांचा पगार आता पाच रुपये झाला होता. त्या वेळेस देशात सर्वत्र स्वस्ताई असे. दोन-चार रुपयांत मोठ्या कुटुंबाचे पोषण करता येत असे. माझ्या गावचे एक गृहस्थ खानदेशात मराठी शाळेत मास्तर होते. त्यांचा जास्तीत-जास्त पगार वाढता तो ६ ।। रुपये होता. आमचे लहानपणी ते गावात पेन्शनर म्हणून असत व त्यांना ३। रुपये पेन्शन मिळे. त्यांना सहा मुलगे होते व या मोठ्या कुटुंबाचे पोषण ते या पगारात करू शकत. त्या वेळेस धान्यादी माल परदेशी जात नसे. देशात माल राहात असे. दुष्काळ पडला तरीसुद्धा गावात राखीव कोठारे, केणी असत. त्यामुळे कठीण काळ फारसा येत नसे. तेव्हा पाच रुपयांत ठाकुरदास हे आनंदाने घरसंसार करीत याचे आपणास आश्चर्य वाटायला नको.

जन्म व बालपण

आता ठाकुरदास यांनी विवाह केला. त्यांनी बायको एका नाणावलेल्या विद्वानाची सुशील कन्या होती. या सुशील दांपत्यापासून ईश्वरचंद्रांचा इ.स. १८२० साली जन्म झाला. मातृपक्षाकडून ईश्वरचंद्र यांना विद्या, शील यांची जोड मिळाली, तर पितृपक्षाकडून निरपेक्ष स्वाधीनता, संकटांना तोंड देण्याची हिम्मत या गोष्टी लाभल्या. कितीही संकटे आली तरी दुसऱ्यासमोर मान वाकवायची नाही हा पितामहाचा गुण,

कष्ट करण्याचा पित्याचा गुण, विद्वत्ता व बुद्धिमत्ता हा मातामहांचा गुण, तर शीलाची व सौजन्याची आईची जोड या सर्व गुणांची ईश्वरचंद्रांना प्राप्ती झाली होती.

लहान असताना विद्यासागर खोडकर होते. देवासारखे शांत मुनी ते नव्हते. एखाद्या बाईने आपली वस्त्रे स्वच्छ धुऊन उन्हात वाळत घालून ठेवावीत आणि विद्यासागराने येऊन त्यांच्यावर शेणमातीचा सडा करावा. असल्या खोड्या जरी ते करीत, तरी अभ्यासाच्या बाबतीत मात्र ते सदैव तत्पर व सावधान असायचे. विद्यासागर ५ वर्षांचे झाले तेव्हा त्यांना त्यांना त्यांच्या गावातील पाठशाळेत घालण्यात आले. त्यांच्या पाठशाळेतील ते 'उत्कृष्ट विद्यार्थी' म्हणून नावाजले. विद्यासागर यांची ग्रहणशक्ती, धारणाशक्ती, अलौकिक स्मरणसामर्थ्य, विलक्षण उद्योग ही पाहून विद्यासागरांचे गुरुजन प्रसन्न व्हायचे. 'हा बालक पुढे खात्रीने कीर्तिमान होणार' असे आशीर्वचन व भविष्यवचन त्यांच्या मुखावाटे सहज बाहेर पडायचे. विद्यासागरांचे भटकणारे आजोबा आता घरी आलेले होते. त्यांनीसुद्धा अशाच प्रकारचे भविष्य केले होते

अडीच वर्षांमध्ये त्या पाठशाळेतील अभ्यासक्रम, शिक्षणक्रम विद्यासागर यांनी समाप्त केला. शिक्षकांनी विद्यासागरांच्या वडिलांना भेटून सांगितले, 'तुमचा मुलगा फार अलौकिक बुद्धीचा आहे. देवाने त्याला बुद्धीचे व उद्योगाचे देणे दिले आहे. तर याला तुम्ही पुढील विद्याभ्यासासाठी कलकत्त्यास घेऊन जा. त्याच्या शिक्षणाची आबाळ करू नका.' अत्यंत दारिद्र्यामुळे ठाकुरदास यांना विद्याभ्यास करावयास संधी मिळाली नाही. जी संधी आपणास मिळाली नाही ती आपल्या मुला-बाळांना सदैव द्यायची हा मात्र त्यांनी आपल्या मनाशी निश्चय केला. मी शिकलो नाही तर नाही; परंतु माझ्या मुलांना मी शिकविणार अशी आणभाक आपल्या मनाशी ठाकुरदास यांनी केली.

+++

कलकत्त्यास विद्याभ्यासार्थ प्रयाण

याच सुमारास ठाकुरदास यांचे वृद्ध वडील ७६ व्या वर्षी दिवंगत झाले. और्ध्वदेहिक कर्मे करण्यासाठी ठाकुरदास कलकत्त्याहून घरी आले होते. सर्व क्रिया संपल्यावर ते कलकत्त्यास जावयास निघाले. या वेळेस ठाकुरदास यांनी आ ठ वर्षांच्या विद्यासागरासही बरोबर घेतले. कलकत्त्यास नेऊन मुलाच्या शिक्षणाची काही सोय लावता येते का, हे ते पाहणार होते. त्यावेळेस आगगाड्या वगैरे नव्हत्या. गाडीरस्त्याने कलकत्त्यास जावे लागे. ''बाबा, तो रस्त्याच्या बाजूला कसला मोठा दगड आहे हो?' असे विद्यासागरांनी विचारले, ''अरे, तो मैलाचा दगड आहे. मोठ्या सडकांवर अंतर दाखविणारे असे दगड बसविलेले असतात. त्या दगडावर येथून कलकत्त्याचे अंतर दर्शविले आहे. प्रत्येक मैलामैलावर असे दगड असतात; आणि त्यांच्यावर हे अंतर जसजसे कमीजास्त होईल ते लिहिलेले असते.'' असे ठाकुरदासांनी उत्तर दिले. हे आकडे इंग्रजी होते. त्यामुळे विद्यासागरांना ते समजेनात. ''तो आकडा किती आहे हो बाबा ?'' विद्यासागर यांनी कुतूहलाने प्रश्न विचारला. ''19'' असे बाबांनी उत्तर दिले. 19 म्हणजे एकावर नऊ हे विद्यासागराने ओळखले आणि पहिला आकडा एकाचा व दुसरा नवाचा असला पाहिजे असा त्यांनी ''आपल्या मनाशी विचार केला ! ''बाबा, पहिला आकडा म्हणजे इंग्रजी एकाचा आकडा व दुसर नवाचा, असे असावे नाही ?'' असे विद्यासागर म्हणजे. ''होय'' एवढेच मोजके बोलणारे त्याचे वडील म्हणाले. अशा प्रकारची प्रश्नोत्तरे झाल्यावर ते निमूटपणे रस्त्याने चालले होते. रस्त्यातील सर्व मैलांचे दगड विद्यासागर नीट न्याहाळून पाहात व त्यात असलेला नवीन आकडा शिकत. कारण पाठीमागच्या आकड्यावरून हा आकडा कोणता हे त्यांना कळे; व असे कळून आल्यावर त्यातील इंग्रजी आकडे कसे आहेत, कोणती आकृती कोणता अंक दाखविले हे सर्व लक्षपूर्वक ते शिकले. एक-एक मैल कमी होत आला;

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

कारण अंतर कमी होऊ लागले. 19, 18, 17 असे मैलांचे दगड गेले. आता मैलाचा 10 वा दगड आला. विद्यासागर वडिलांना म्हणजे, ''बाबा, मी सर्व इंग्रजी आकडे शिकलो; कोणताही आकडा मला इंग्रजीत मांडायला सांगा. मी मांडून दाखवितो.'' विद्यासागराचे शब्द ऐकून त्याचे वडील आश्चर्यचकित झाले. आपल्या मुलाला खरोखर हे आकडे मांडण्याचे समजले आहे का, याची त्यांनी परीक्षा घेतली; तो ते विद्यासागर यांनी बिनचूक लिहून दाखविले. थोड्या वेळाने आपल्या मुलगा हे विसरेल असे मनात धरून ठाकुरदास यांनी ईश्वरचंद्र याचे चित्त अन्य गोष्टींकडे वेधले व बराच वेळ गेल्यावर जेव्हा एक मैलाचा दगड आला, तेव्हा त्याच्यावरील आकडा मुलास विचारला. विद्यासागर यांनी बरोबर उत्तर दिले. बापास आनंदाचे भरते आले. ते मुलास थोपटून म्हणाले, ''शाबास बाळ, तू पूर्णपणे इंग्रजी आकडे शिकलास, अशी माझी खात्री झाली आहे.'' अशा प्रकारच्या गोष्टी जरी फार अलौकिक व अपूर्व नसल्या, तरी खेडेगावातील एका मुलाने, जो शहरातील मुलांप्रमाणे जरा चौकस व अनेक गोष्टी पाहणारा नसतो, त्याने लक्षपूर्वक ही गोष्ट केली याचे आम्हास तरी फार कौतुक वाटते.

पितापुत्र आता कलकत्त्यास आले. दुसऱ्या दिवशी ठाकुरदास आपल्या कामात दंग झाले. ते निरनिराळी 'बिले' नंबरवार लावीत होते. जवळ विद्यासागर बसले होते. आपले वडील काम करीत आहेत हे तो लक्षपूर्वक पाहात होता. ठाकुरदास यांचे हल्लीचे नवीन मालकही (त्यांचे नाव जगद्दुर्लभ असे होते) तेथे त्यांना मदत करीत होते. या बिलांचे वडील काय करतात; हे सर्व आता ईश्वरचंद्रांच्या ध्यानात आले; व 'हे काम मलाही करता येईल' असे तो आपल्या वडिलांना म्हणाला. जगद्दुर्लभांना मुलाची इच्छा पाहून विस्मय वाटला. 'तुला इंग्रजी आकडे समजतात का?' असा प्रश्न विचारला. 'होय' असे विद्यासागराने उत्तर दिले. रस्त्यावर येताना घडलेली सर्व हकिकत ठाकुरदास यांनी आपल्या धन्याला निवेदन केली. आपल्या मुलाचा मोठेपणा दुसऱ्यांना सांगताना आई-बापास किती धन्य वाटत असते! 'तर मग ही बिले लाव पाहू बाळ' असे जगद्दुर्लभांनी विद्यासागर यास सांगितले. विद्यासागर यांनी आपले काम चोख बजाविले हे पाहून 'हिंदुमहाविद्यालयात तुम्ही तुमच्या मुलास इंग्रजी शिक्षण, काही करा; पण द्याच.' असे त्रयस्थ मंडळींनी ठाकुरदास यांना परोपरीने सांगितले. ''ठाकुरदाससारख्या गरीब गृहस्थास या उच्च शिक्षणाचा खर्च झेपेल कसा ?'' अशी शंका एकाने प्रदर्शित केली. ''तुम्ही मला ओळखीत नाही, मला जे १० रुपये हल्ली मिळतात, त्यातील ५ रुपये माझ्या मुलाच्या शिक्षणार्थ मी खर्च करीन; आणि उरलेल्या

पाच रुपयांत कुटुंबाचे कसे तरी मला भागविले पाहिजे.'' असे ठाकुरदास म्हणाले. विद्यासागरांच्या वडिलांचे हे धीरोदात्त उद्गार ऐकून प्रत्येकांना सानंद विस्मय वाटला.

जरी प्रत्येक जण विद्यासागर यांना इंग्रजी शिकविण्यास सांगत होता, तरी ठाकुरदास यांच्या मनात निराळीच गोष्ट चालली होती. आपल्या मातामहांप्रमाणे व इतर काही संबंधी लोकांप्रमाणे विद्यासागराने संस्कृत पण्डित व्हावे, आपल्या खेड्यात एक संस्कृत पाठशाळा चालवावी आणि तेथे लायक व योग्य विद्यार्थ्यास मोफत शिक्षण द्यावे अशी ठाकुरदास यांची इच्छा होती.

परंतु तात्पुरते ईश्वरचंद्र यांना जवळ असलेल्या एका प्राथमिक शाळेत त्यांनी पाठविले. तीन महिन्यांतच ईश्वरचंद्र याने त्या शाळेतील शिक्षण संपविले. परंतु याच सुमारास विद्यासागर फार आजारी पडला. कलकत्त्याचे अनेक उपचार त्याला खडखडीत बरा करू शकले नाहीत. त्यांची आजी खेड्यातून कलकत्त्यास आली व आपला नातू बरोबर घेऊन ती खेड्यात गेली.

स्थानत्यागाने विद्यासागर यास लवकरच बरे वाटू लागले. हवापाणी, घरचे खाणे, खेळगडी यामुळे लवकरच विद्यासागर नीट खणखणीत झाले. एका पंधरवड्यानेच ठाकुरदास हे पुनरपि आपल्या पुत्रास घेऊन कलकत्त्यास गेले. आता त्यास संस्कृत महाविद्यालयात घालण्यात आले. मुलाला बरोबर घेऊन त्यास ठाकुरदास विद्यालयाच्या द्वारापाशी नेऊन पोहोचवायचे. असा कित्येक दिवस क्रम चालला होता. मुलास दुसऱ्या मुलांची वाईट संगत न लागावी म्हणून ठाकुरदास ही अशी खबरदारी घेत असत. पुष्कळ मुले कु-मार्गास लागून आपल्या आयुष्याचे मातेरे करून घेतात. उत्कट बुद्धी, कणखर शरीर, पैसा या तिन्ही गोष्टी सन्निध असूनही व्यसनशताने घेरले जाऊन निराशेच्या अंधःकारात त्यांना खितपत पडावे लागते. आपल्या मुलासंबंधीच्या आई-बापांच्या महत्त्वाकांक्षा, त्यांच्या मनातील सुखाचे सोन्याचे दिवस पाहण्याची स्वप्ने, या सर्वांवर पाणी पडते. उज्ज्वल भविष्यकाळ दुःखमय होतो. असे होऊ नये म्हणून ठाकुरदास फार जपत. आपला मुलगा निष्कलंक, निर्मळ, धुतल्या तांदळाप्रमाणे राहावा यास ठाकुरदास फार जपत. विद्यावैभवापेक्षा शीलास प्राधान्य आहे हे ते जाणून होते. 'It is true that knowledge is power but character is power truer still' हे त्यांच्या डोळ्यासमोर असे. म्हणून ते मुलाच्या बाबतीत फार काळजी घेत.

खेडेगावातील शाळेप्रमाणे येथही विद्यासागर सर्व वर्गबंधूत पहिले येण्याचा सदैव प्रयत्न करीत. त्यास त्यांच्या प्रयत्नामुळे व बुद्धिसामर्थ्यामुळे यश पण मिळत

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

असे. आपल्यापेक्षा आपल्या बरोबरीचा, ज्ञानाने, विद्वत्तेने, उद्योगशीलतेने वरचढ आहे, असे त्यांनी जर पाहिले, तर त्यांस चैन पडायचें नाही. आपण कमी का? त्याच्यासारखे आपणही प्रयत्न केल्यास होऊ असे त्यास वाटे व ते जास्त प्रयत्न करावयाचे. यात द्वेष किंवा असूया नव्हती तर आपल्या प्रयत्नातील शैथिल्याचा त्यास तिटकारा येई. आपला उणेपणा नाहीसा करण्यासाठी, दुसऱ्याच्या मांडीशी मांडी लावून बसता यावे यासाठी ते दिवस-रात्र मग पाहावयाचे नाहीत; सारखा उद्योग अखंड चालायचा. अशा दीर्घ व सतत प्रयत्नांनी काय प्राप्त होणार नाही ? उद्योगरतास पृथ्वी ही कामधेनू आहे. तरुणपणातच नव्हे; तर वयातीत झाल्यावरसुद्धा ईश्वरचंद्रांची ही ज्ञानलालसा अशीच तरतरीत होती. जो-जो विषय आपणास माहीत आहे, त्या-त्या विषयात नवीन ज्ञान नेहमी संपादन करण्यासाठी ते समुत्सुक असायंचे. वृद्धावस्थेतही तरुणांना लाजविणारी त्यांची ही ज्ञानपिपासा पाहिली म्हणजे आम्ही लज्जेने माना खाली घालाव्या असेच प्रांजळपणे बुद्धीस वाटते. मोठेपणाची विद्यासागर यांची एक गोष्ट सांगतात की, एकदा एक सुशिक्षित गृहस्थ विद्यासागरांजवळ फ्रेंच तत्त्वज्ञ कॉम्टे याच्या तत्त्वज्ञानासंबंधी चर्चा करीत होते. चर्चा संपल्यावर विद्यासागर उठून गेले. तेव्हा तो गृहस्थ जवळ बसलेल्या आपल्या मित्रास म्हणाला, ''केवढ्या गाढ्या पंडिताजवळ आज माझी गाठ पडली.'' ''My Lord what a giant did I meet today''आणि सर्वात आश्चर्य म्हणजे हे की कॉम्टे यांचे तत्त्वज्ञान नुकतेच कोठे इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली होती. आणि इंग्रजी भाषेची मुळाक्षरे शिकण्यास तर विद्यासागरांनी जवळजवळ पंचविशीनंतर आरंभ केला; परंतु कठीण परकीय भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, त्यांचे प्रावीण्य म्हणजे पुष्कळ इंग्रज लोकांना एक कोडे असे. हे सर्व कोडे, उद्योग, श्रमसातत्य, दृढ ज्ञानलालसा, दमनीय हेतू यांच्या योगे स्पष्ट होते.

+++

संस्कृत महाविद्यालयात प्रवेश व तेथील अभ्यास

संस्कृत महाविद्यालयात वयाच्या ९ व्या वर्षी ईश्वरचंद्र यांचे नाव दाखल करण्यात आले. या संस्कृत महाविद्यालयातील सर्व प्रकारचा शिक्षणक्रम त्यांनी ११ व्या वर्षी पुरा केला. प्रत्येक शास्त्रात त्यांनी पांडित्य संपादन केले. प्रत्येक शास्त्रात ते 'पारंगत' म्हणून समजले गेले. 'आपण कधीही असा बुद्धिमान विद्यार्थी पाहिला नाही' असे उद्‌गार त्यांच्या सर्व शिक्षकांनी काढले. संस्कृत व्याकरण म्हणजे किती कष्टाचे व घोटाळ्याचे ! परंतु ११ व्या वर्षी हे शास्त्र त्यांनी संपविले. नंतर त्यांनी साहित्याकडे नजर फेकली. 'इतका लहान वयाचा मुलगा माझ्या वर्गात नको असे साहित्याचार्यांनी सांगितले. सुंदर व दुर्बोध असे संस्कृत साहित्य यास काय समजणार? मर्कटासमोर मोती दाखविल्याप्रमाणे ते आहे' वगैरे ते म्हणाले. परंतु ईश्वरचंद्र थोडेच गप्प बसणार! 'मी संस्कृत महाविद्यालयच सोडून चाललो; नाही तर मला त्या वर्गात बसण्यास परवानगी द्या' असा विद्यासागरने हट्ट धरला. 'माझी वाटेल तर परीक्षा घ्या. त्या परीक्षेत उत्तीर्ण झालो तरच मला तुमच्या वर्गात बसण्यास परवानगी द्या; नाही तर देऊ नका.' असे स्वाभिमानपूर्वक त्यांनी गुरूंना सांगितले. विद्यासागरांची ही सूचना मान्य करण्यात आली. कुमारसंभव व भट्टिकाव्य यातील गहन व दुर्बोध श्लोकांचा अन्वयार्थ त्यांना विचारण्यात आला. विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी अत्यंत समाधानकारक अशी उत्तरे दिली. परवानगी न देणारे आचार्य आश्चर्यमूढ झाले व त्यांनी मोठ्या आनंदाने विद्यासागरला आपल्या वर्गात दाखल करून घेतले. १४ वर्षांचे होतात न होतात, तोच त्यांनी साहित्यभाग संपविला. प्रत्येक वेळी ते पहिले आले. प्रत्येक प्रश्नपत्रिकेतही ते पहिले. रघुवंश, कुमारसंभव, राघवपांडवीय, भारवी व माघ यांची महाकाव्ये, मेघदूत, शाकुंतल, विक्रमार्वशीयम्, उत्तररामचरित्र वगैरे सर्व प्रमुख साहित्यग्रंथ त्यांनी आत्मसात केले. संस्कृतमध्ये ते आता उत्कृष्ट कविताही लिहीत व त्या वाचून सर्वांना आनंद वाटत असे. मायभाषेप्रमाणे ते आता संस्कृत भाषेतही

अस्खलित भाषण करीत व कोणाही पंडिताबरोबर या गीर्वाण भाषेत वाग्युद्ध करण्यास ते बद्धपरिकर असत. हे वाग्वैभव त्यांच्या वर्गबंधूंना थक्क करी. एवढेच नव्हे, तर त्यांचे गुरूजनही विस्मयाने तोंडात बोटे घालीत. सतत परिश्रमाने व अभ्यासाने त्यांनी आपली स्मरणशक्ती इतकी वृद्धिंगत केली, की एकदा एखादी गोष्ट वाचली किंवा त्यांनी श्रवण केली की ताबडतोब ती विद्यासागर आपलीशी करीत आणि तोंडपाठ म्हणून दाखवीत.

विद्यासागर यांना शिष्यवृत्ती मिळत असे. आपल्या मनातील आकांक्षा पूर्ण करण्यास आपला पुत्र योग्य आहे दिसून येताच, ठाकुरदास यांनी ईश्वरचंद्राच्या त्या शिष्यवृत्तीतून आपल्या मूळ ग्रामी काही जमीन खरेदी करण्याचे ठरविले; कारण तेथे आपल्या मुलाने पाठशाळा उघडून ज्ञानसत्र घालावे अशी त्यांची महनीय इच्छा होती. त्या पाठशाळेत योग्य विद्यार्थ्यांना मोफत राहावयास व जेवावयाचा मिळावे अशी सोय व्हावी अशी ठाकुरदास यांची इच्छा होती. बंगालमध्ये अशा पुष्कळ पाठशाळा होत्या की, ज्या पाठशाळांत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, मोफत निवासस्थान दिले जाई. माझे एक मित्र आहेत ते सांगतात की, त्यांच्या आजोबांच्या वेळी त्यांच्याकडे जवळजवळ १५ विद्यार्थी शिक्षण घेण्यास होते व ते त्यांच्याबरोबरच जेवणखाण सर्व काही करीत. घरातील मुलांप्रमाणे या विद्यार्थ्यांची काळजी घेण्यात येत असे व गृहपती त्यांना शिक्षण देत असे. अशीच पाठशाळा आपल्या पुत्राने चालवावी ही या ठाकुरदासमहाशयांची इच्छा होती. ईश्वरचंद्राने पित्याच्या म्हणण्यास आनंदाने रुकार दिला. खरोखरच वीरसिंह येथे कांही जमीन खरेदी करण्यात आली. परंतु ही भावी योजना शेवटी सफल झाली नाही. कारण खेडेगावात फक्त पाठशाळा चालविण्याचे या पंडितप्रवराच्या भालप्रदेशी लिहिलेले नव्हते. त्यांच्या ललाटरेषेत यापेक्षा मोठ्या गोष्टी लिहिलेल्या होत्या. मोठ्या वातावरणात त्यास वावरायचे होते. बंगालच्या जीवनात हालचाल त्यास निर्माण करावयाची होती. समाजसुधारणा, शिक्षणसुधारणा, वाङ्मयसुधारणा त्यास करावयाच्या होत्या. यामुळे पित्याची ही साधी इच्छा पुढे बाजूला राहिली. व्याकरण व संस्कृतवाङ्मय संपविल्यावर वयाच्या पंधराव्या वर्षी ईश्वर अलंकार-वर्गात दाखल झाला. एका वर्षातच साहित्यदर्पण, काव्यप्रकाश, रसगंगाधर व इतर साहित्यशास्त्रावरील ग्रंथ त्यांनी आलोचिले. वार्षिक परीक्षेत नेहमीप्रमाणे ते पहिले आले.

त्या काळी युरोपियन न्यायाधीशांस मदत करण्यासाठी म्हणून इतर पंडित व काजी सरकारकडून निवडले जात. हिंदुधर्मशास्त्रातील सर्व गोष्टींचा ज्याने सूक्ष्म अभ्यास केला असेल असा गृहस्थ हिंदु-कायद्यासंबंधी वरील युरोपियन न्यायाधीशांना साहाय्य

करण्यासाठी, सर्व मुद्दे विशद करण्यासाठी नेमला जाईल. बहुतकरून संस्कृत महाविद्यालयातूनच सदरहू गृहस्थाची योजना होत असे. यासाठी धर्मशास्त्राची मुद्दाम परीक्षा घेण्यात येई. व्याकरण, वाङ्मय, साहित्यशास्त्र, न्याय, वेदांत या शास्त्रात जो उत्तीर्ण झाला असेल त्यालाच या धर्मशास्त्रातील परीक्षेस बसण्याचा परवाना मिळे. अन्यत्रांस तेथे मज्जाव होता. परंतु ईश्वरचंद्रांना मुद्दाम परवानगी मिळाली. ते अद्याप न्याय व वेदांत या परीक्षेत उत्तीर्ण झाले नव्हते. तरीही अलौकिक बुद्धिमत्ता असल्यामुळे त्यांना या परीक्षेस बसण्यास परवानगी मिळाली. या परीक्षेत ईश्वरचंद्रांना नेहमीप्रमाणे पहिल्या दर्जाचे यश लाभणार नाही, अशी पुष्कळांची अटकळ होती. ही परीक्षा फार कठीण असे आणि अगदी थोडे विद्यार्थी त्यात यशस्वी होत. परंतु ईश्वरचंद्र परीक्षेच्या काठिण्याने डगमगणारे नव्हते. कठीण गोष्टही साध्य करून घेण्यात खरे पौरुष व कसोटी आहे, हे ते जाणून होते. मनुसंहिता, मिताक्षरी, दायभाग वगैरे सर्व धर्मशास्त्रातील अधियुक्त ग्रंथांचे त्यांनी मार्मिक परिशीलन केले आणि त्यांच्या प्रयत्नाचे फळ परमेश्वराने त्यांना दिले. या दिव्यातून दिव्य यशाने ईश्वरचंद्र उत्तीर्ण झाले. परीक्षकांनी त्यांचा गौरव केला. ही दुःसाध्य परीक्षा या १७ वर्षांच्या मुलाने कशी दिली, याचे पुष्कळांना राहून राहून आश्चर्य वाटले. या वेळेसच त्याला सरकार न्यायाधीशपंडित ही जागा देत होते, परंतु ठाकुरदास यांनी ईश्वरचंद्रास संमती दिली नाही. अद्याप लहान असल्यामुळे आपल्या मुलाने आपल्यापासून दूर जाऊ नये, असे पित्यास वाटे. यासाठी विद्यासागर यांनी सरकारी निमंत्रण स्वीकारले नाही.

१९ वे वर्षी वेदांताचा अभ्यास करण्यासाठी विद्यासागर यांनी आरंभ केला. नेहमीची वार्षिक परीक्षेची वेळ आली. इतर प्रश्नपत्रिका लिहून झाल्या. आज निबंधलेखनाची परीक्षा होती. परंतु परीक्षामंडपात ईश्वरचंद्र दिसत नव्हते. 'आजच्या परीक्षेस ईश्वर का बरं हजर नाही ? तो आजारी आहे का ?' वगैरे पृच्छा गुरुजन करू लागले. चौकशी करता-करता महाविद्यालयाच्या ओट्यावर ईश्वरचंद्र काही तरी लिहीत असलेला त्याच्या शिक्षकांना दिसला. परीक्षेच्या ठिकाणी त्याला बळेच ओढून नेण्यात आले. 'मला उत्तम संस्कृत लिहिता यावयाचे नाही; मग उगीच मी कशाला येऊ ?' असे ईश्वरचंद्र म्हणत होते. 'वेडा कुठला ! चल लवकर, आणि प्रश्नपत्रिका लिहावयास लाग. तुझ्यापेक्षा मला तुझी जास्त परीक्षा आहे.' असे गुरुजींनी जरा रागाने व प्रेमाने सांगितल्यावर विद्यासागर लिहावयास बसले. विद्यासागर विनयाचे आगर होते. त्यांना आत्मविश्वास नव्हता. त्यांचा निबंध सर्वोत्कृष्ट ठरला. त्यांच्या निबंधाची भाषा प्रौढ व सुंदर होती. तर्कपद्धती निर्दोष व समर्पक होती. त्यांना या निबंधाबद्दल शंभर रुपयांचे

पारितोषिक देण्यात आले. यानंतर काव्यरचनेची चढाओढ लावण्यात आली. त्यातही ईश्वरचंद्र यांचे काव्य उत्तम ठरले व त्यांना शंभर रुपयांचे दुसरे पारितोषिक मिळाले. वेदांताचा अभ्यास झाल्यावर त्यांनी सर्व षट्शास्त्रांचा-षड्दर्शनांचा अभ्यास करण्यास आरंभ केला. वार्षिक परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांत ते पहिले आले व यावर्षीही कवितेबद्दल त्यांनी १०० रुपयांचे बक्षीस मिळाले. यावर्षी त्यांना तात्पुरते व्याकरण विषयाचे अध्यापन दोन महिन्यांपर्यंत देण्यात आले. हा मिळालेला पगार त्यांनी आपल्या वडिलांना यात्रा करण्यासाठी दिला. ज्या वडिलांनी पोटास चिमटा घेऊन, स्वतः उपासमार करून आपणांस शिकवले, विद्यादान दिले, सुसंस्कृत होण्यास संधी दिली त्या परमपूज्य पित्यास कृतज्ञतेने हे ८० रुपये देताना विद्यासागर यांना किती धन्यता वाटली असेल! आणि दोन रुपये वेतनावरही संतुष्ट राहणाऱ्या ठाकुरदासांना हे आपल्या मुलाने यात्रेसाठी दिलेले ८० रुपये पाहून किती कृतार्थता वाटली असेल हे आम्ही शब्दांत कसे सांगणार ? आपल्या हाताने झाड लावले; सर्व किड्या-मुंग्यांपासून त्याचे रक्षण केले. गुरांनी खाऊ नये म्हणून त्याला कसे जपले आणि त्या झाडाने रसाळ फळे आज दिली, हे मनात आणून त्या माळ्यास किती आनंद होता. तद्वतच आपल्या मुलाचे वृद्धिंगत होणारे यश पाहून ठाकुरदास यांना वाटले असेल. धन्य तो पिता आणि धन्य तो सुपुत्र, की जे आपापली कतृव्ये अशा उत्तम रीतीने पार पाडून जगास कित्ता घालून देतात. कर्तव्यविन्मुख होणाऱ्या लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारे असे पुरुष 'पूज्य' होत, यात संशय नाही. पित्याने हे पैसे घेऊन मोठ्या आनंदाने यात्रा केल्या व ते घरी परत आले.

ईश्वरचंद्र यांनी आता संस्कृत विद्यालयातील शेवटची परीक्षा दिली. आजपर्यंतच्या सर्व परीक्षांच्या निकालांप्रमाणे या वेळेचाही निकाल होता. संस्कृत महाविद्यालयाचे प्रमुख आचार्य जयनारायण तर्कपंचानन हे म्हणाले, 'अशा अलौकिक बुद्धीचा विद्यार्थी या महाविद्यालयात कधीही आला नव्हता. ईश्वरचंद्र हे या संस्थेस भूषण आहेत.' ईश्वरचंद्र यांना २५० रुपयांचे पारितोषिक मिळाले व 'विद्यासागर' ही यथार्थ 'पदवी' त्यांना मिळाली. ही पदवी खरोखर किती अनुरूप होती! व्याकरण, अलंकार, साहित्य, तर्क, षड्दर्शने, ज्योतिष, सामुद्रिक, धर्मशास्त्र या सर्व विषयांच्या अध्यापकांनी सही केलेले प्रशस्तिपत्र ईश्वरचंद्र यास देण्यात आले. संस्कृत महाविद्यालयातील ईश्वरचंद्रांचा अभ्यासक्रम समाप्त झाला.

✦✦✦

सरकारी नोकरी

अभ्यासक्रम समाप्त झाल्यावर ईश्वरचंद्र यांना फोर्ट वुल्यम महाविद्यालयात नोकरी मिळाली. या महाविद्यालयाचे प्रमुख मार्शल नावाचे सद्गृहस्थ होते. हे पूर्वी संस्कृत महाविद्यालयाचेही प्रमुख होते. विद्यासागर अभ्यासक्रम संपल्यावर आपल्या मूळ गावी वीरसिंह येथे राहावयास गेले होते. या रिकाम्या असलेल्या जागेबद्दल त्यांच्या वडिलांनी त्यांना कळविले त्या वेळेस जे सिव्हिलियन सनदी नोकर कंपनीकडून नेमले जात त्यांची परीक्षा या फोर्ट वुल्यम महाविद्यालयातील शिक्षकांकडून घेतली जाई. ईश्वरचंद्र यांची नेमणूक केल्यावर प्रमुख मार्शल हे विद्यासागर यांना म्हणाले, 'या सिव्हिलियन लोकांची परीक्षा फार कडक घेऊ नका. जरा बेतानेच घ्या.' विद्यासागरांना अशा गोष्टी माहीत नव्हत्या. वशिल्याचे तट्टे त्यांना माहीत नव्हते. अशा प्रकारे वागणे त्यांचे ब्रीदच नव्हते. त्यांनी मार्शल यांना सडेतोड उत्तर दिले. 'महाशय, माझ्या हातून असे कर्म घडणे कठीण आहे. अगदी अल्पही अन्याय करण्यापेक्षा, मी येथून निघून जाण्यासही तयार आहे.' परंतु हे प्रकरण फार विकोपास गेले नाही. विद्यासागर आता इंग्रजी व हिंदी शिकवावयास लागले. त्यांनी दोन शिक्षक ठेवले. एका शिक्षकास दरमहा १५ रुपये व दुसऱ्यास १० रुपये ते देत. त्यांना महिना ५० रुपये मिळत. त्यातील २५ रुपये वरप्रमाणे जात. उरलेल्या २५ पैकी २० रुपये ते घरी आईस पाठवीत. त्यांनी वडिलांना 'नोकरी सोडून द्या व आता आपण घरी सुखाने राहा' असे सांगितले. कलकत्त्यास उरलेल्या पाच रुपयांत ते आपला निर्वाह करीत. ते स्वयंपाक करीत व सर्व काम स्वहस्तानेच करायचे.

या वेळेस लॉर्ड हार्डिज गव्हर्नर जनरल होते. ते फोर्ट वुल्यम कॉलेज पाहण्यासाठी आपल्या अमदनीत एकदा आले होते. ईश्वरचंद्रांचे व हार्डिज यांचे बराच वेळ बोलणे वगैरे झाले. शिक्षणासंबधी काही थोडी फार चर्चाही झाली.

न्यायाधीश पंडितांची जागा आता रद्द करण्यात आली होती. १८४६ मध्ये बंगाल प्रांतात १४० प्राथमिक शिक्षणाच्या नवीन शाळा स्थापन करण्यात आल्या. या सर्व शाळांची देखरेख विद्यासागर यांच्याकडे होती. नवीन नेमणुका वगैरे करणे त्यांच्याकडेच होते. या वेळेस संस्कृत महाविद्यालयात आचार्यांची जागा रिकामी होती. या जागेवर ईश्वरचंद्र यांना अशी डॉ. मॉयट यांची प्रबल इच्छा होती. या जागेचा पगार ९० रुपये होता. विद्यासागर यांनी या बढतीच्या जागेवर स्वतः जाण्याचे नाकारले; परंतु 'या जागेसाठी मी एक लायक माणूस निवडून देतो.' असे मात्र त्यांनी आश्वासन दिले. कलकत्त्यापासून फार दूर राहणाऱ्या तारानाथ तर्कवाचस्पती नावाच्या पंडितांस विद्यासागर यांनी ही जागा देववली. ६० मैल अंतरावर असलेल्या वाचस्पतींच्या घरी ते स्वतः पायी गेले व त्यांस आग्रह करून घेऊन आले!

संस्कृत महाविद्यालयात दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांस शिकविण्यासाठी काही शिक्षक नेमावयाचे होते. उमेदवार तर पुष्कळ होते. ईश्वरचंद्र यांनी सुचविले की, या सर्व उमेदवारांची चढाओढीची परीक्षा घ्यावी. या परीक्षेत ईश्वरचंद्र यांचे दोन मित्र वर आले व त्यांस दोन जागा मिळाल्या.

या वेळेस विद्यासागर यांची अलौकिक मातृभक्ती दर्शविणारी एक गोष्ट घडून आली. विद्यासागर यांच्या तिसऱ्या भावाच्या घरी विवाहकार्य व्हायचे होते. 'तू कसेही करून लग्नाला येच.' असे आईचे आमंत्रण आले होते. विद्यासागर हे मार्शल यांना रजा विचारण्यास गेले. मार्शल रजा देईनात. काय करावे हे विद्यासागर यांना सुचेना. आईने तर उद्या बोलाविले आहे; साहेब तर हट्ट धरून बसले आहेत. परंतु शेवटी मातृप्रेमाचा आणि मातृनिष्ठेचा विजय झाला. ईश्वरचंद्र यांनी नोकरीवर लाथ मारली. राजीनामा लिहून साहेब मजकुराकडे त्यांनी पाठवून दिला आणि ईश्वरचंद्र निघाले. वाटेत अपरंपार मुसळधार पाऊस कोसळू लागला. मेघ गडगडत होते; विजा लखलखत होत्या, दिशा धुंद झाल्या होत्या; परंतु हा मातृनिष्ठ वीर मोठ्या ढोपर ढोपर पाण्यातून रस्त्यातून जात होता. येता येता ते दामोदर नदीजवळ येऊन थडकले. तो ती नदी केवळ बेफाम होऊन दुथडी भरून चाललेली होती. दामोदर नदी आधीच जरा भयंकर, त्यात मोठा पूर आलेला. सायंकाळची वेळ होऊन काळोख पडायला लागलेला. नदीत फेरीवाले होडी लोटण्यास तयार होत नव्हते. आपले पंचप्राण कोण संकटात घालणार ? पुष्कळ पैसे देण्याचे विद्यासागर यांनी कबूल केले; परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी ईश्वरचंद्र यांनी मनाशी धडा केला. आईने घरी बोलाविले आहे आणि आज रात्री घरी

तर पोहोचलेच पाहिजे, अशी आईची आज्ञा आहे. आईची आज्ञा पालन करण्यात प्राण संकटात पडले तरी फिकीर नाही, असे मनात आणून त्यांनी नीट कंबर कसली. विद्यासागर हे सामर्थ्याने दांडगे होते. त्यांची शरीरयष्टी पीळदार, लोखंडासारखी कणखर होती. ते पोहणारे तर पहिल्या प्रतीचे पटाईत होते. 'माताजी की जय' अशी आरोळी ठाकून दामोदर नदीच्या बेफाम प्रवाहात बेदरकारपणे त्यांनी उडी ठोकली. पाण्याच्या प्रवाहाशी दोन हात करीत मातृभक्त विद्यासागर परतीरास सुखरूप पोहोचले. आता घर थोड्याच अंतरावर राहिले होते. नदीपलीकडे त्यांचे गाव होते. ईश्वरचंद्र आता पळत सुटले, ते घरी येऊन आईसमोर दाखल झाले. दारावर त्यांनी टिचकी मारली. 'कोण आहे ?' असा प्रश्न आला. 'मी ईश्वर' असे उत्तर दिले गेले. आईने एकदम दरवाजा उघडला व ईश्वरचंद्र आत गेले. ईश्वरचंद्र यांचे ओले कपडे पाहून सर्वांनी चौकशी केली. त्यांची हकिकत ऐकून सर्वांनी परमेश्वराचे आभार मानले. 'माझा मुलगा आल्याशिवाय राहणार नाही, हे तर सारखे म्हणत होते. यांचाच माझ्यावर विश्वास नव्हता व ते सर्वजण माझी थट्टा करीत होते. परंतु माझा ईश्वर मला माहीत आहे. इतरांना तो तसा माहीत असणे शक्यच नाही.' वगैरे त्यांच्या आईने स्वतःची व आपल्या मुलाची स्तुती करून घेतली.

ईश्वरचंद्र परत कलकत्त्यास आले. एका सिव्हिलियन गृहस्थाने 'माझे नाव संस्कृत काव्यात गोवून जो उत्कृष्ट काव्य करील, त्यास २०० रुपये बक्षीस देण्यात येईल' असे जाहीर केले. ईश्वरचंद्र यांनी हे बक्षीस मिळविले. ईश्वरचंद्र यांनी ही रक्कम स्वतःसाठी घेतली नाही. हे २०० रुपये संस्कृत महाविद्यालयास त्यांनी दिले; व चार वर्षांपर्यंत उत्तम संस्कृत कविता करणाऱ्या विद्यार्थ्यास त्यातून ५० रुपयांचे बक्षीस द्यावे असे ठरविण्यात आले. १८४६ मध्ये ईश्वरचंद्र यांनी संस्कृत महाविद्यालयाच्या असिस्टंट सेक्रेटरीची जागा स्वीकारली. फोर्ट विल्यम कॉलेजमधील त्यांची पंडितांची जागा दीनबंधू यांनी घेतली. या संस्कृत महाविद्यालयात त्यांना पुष्कळ सुधारणा करावयाच्या होत्या. डॉ. मोयेट त्यांच्यावर खुष झाले. वाङ्मय घेणाऱ्या विद्यार्थ्यास गणित त्यांनी आवश्यक केले.

या सुमारास साहित्याचार्याची महाविद्यालयात जागा रिकामी होती. जरी या जागेचा पगार जास्त होता तरी ती विद्यासागर यांनी स्वीकारली नाही; कारण पैशापेक्षा अंतर्गत सुधारणा करण्याकडे त्यांचे लक्ष वेधून राहिले होते. ही जागा स्वीकारून त्यांना सुधारणा करता येणे शक्य नव्हते. विद्यासागर यांनी पसंत केलेल्या एका गृहस्थांकडे ही

जागा गेली. विद्यासागर यांचा धाकटा भाऊ हरचंद्र या वेळी मरण पावला. त्यामुळे पुष्कळ दिवस विद्यासागर यांना काही सुचत नव्हते. एकटे बसले म्हणजे मोठमोठ्याने ते ओक्साबोक्शी रडत.

हळूहळू विद्यासागर यांचे मन दुःखावेग विसरू लागले. परंतु आता मुख्य सेक्रेटरी व दुय्यम सेक्रेटरी यांच्यामध्ये अंतर्गत सुधारणासंबंधी वरचेवर मतविरोध दिसून येऊ लागले. शेवटी विद्यासागर यांनी राजीनामा दिला. कॉलेजचे प्रमुख व सेक्रेटरी उभयतांनी विद्यासागर यांना सोडून जाऊ नका असे परोपरीने सांगून पाहिले. परंतु आपणास ज्या गोष्टी न्याय्य, रास्त, आयोग्य वाटतात, त्याप्रमाणे वागता येत नाही, तेथे राहणे म्हणजे माणुसकीचे मरण होय असे ईश्वरचंद्रांना वाटे. स्वाभिमान व स्वतंत्र वृत्ती ही तर त्यांची जीविततत्त्वे; ती अनेक पिढ्यांपासून त्यांच्या रोमारोमात आलेली. पाळण्यात त्यांच्याबरोबर वाढलेली. अर्थातच विद्यासागर यांनी राजीनामा दिला; परंतु त्याचा परिणाम काय होईल याचा त्यांनी विचार केला नाही. स्वाभिमानी गृहस्थांस मरण पत्करते पण अपमान पत्करत नाही. मग पुढे–मागे परिस्थिती भेडसावीत असली, तरी त्याची तादृश फिकीर त्यांस वाटत नाही. विद्यासागर यांच्या कुटुंबात जवळजवळ लहान–थोर मिळून ३० मंडळी होती. एवढ्या मोठ्या कुटुंबाचे पालन–पोषण करणे म्हणजे काय नको ? सारे ब्रह्मांड पाहिजे. पाठच्या भावास जो पगार मिळत होता, तेवढ्यावरच त्यांना कसेबसे सर्वांचे संगोपन करणे प्राप्त होते. शिवाय घरी वडिलांकडे त्यांस तेथील खर्चासाठी दरमहा ५० रुपये कर्ज काढून पाठवावे लागत ते निराळेच. विद्यासागर हे मोयेट यांनी विनंती केल्यावरून श्री. बँक नावाच्या एका गृहस्थांना संस्कृत, हिंदी, बंगाली शि ीत असत हा अभ्यासक्रम संपल्यावर त्या गृहस्थाने ३०० रुपये विद्यासागरांपुढे केले. परंतु पैशामुळे जिकिरीस आलेल्या विद्यासागरांनी या पैशास स्पर्श केला का ? छे, ते म्हणाले, 'डॉ. मोयेट माझे मित्र आहेत; त्यांच्यासाठी मी जी गोष्ट केली तिचा मोबदला कसा घेऊ ?' धीरोदात्त पुरुष, सत्त्वशील पुरुष, संकटपर्वत कोसळला तरी स्वपथापासून परावृत्त होत नाही हेच खरे; दुसरे आम्ही काय म्हणणार ?

१८४९ पर्यंत विद्यासागर यांना कोठे अन्य नोकरी मिळाली नाही. आता फोर्ट वुल्यम महाविद्यालयात 'लेखकाची जागा' रिकामी झाली होती. ही मुख्य लेखकाची जागा घेण्याबद्दल प्रिन्सिपॉल मार्शल यांनी विद्यासागर यांना कितीतरी आग्रह केला. शेवटी मोठ्या मिनतवारीने ईश्वरचंद्रांनी ही ८० रुपयांची जागा पत्करली. ही जागा

पत्करून फार दिवस झाले नाहीत, तोच संस्कृत विद्यालयात पुन्हा साहित्याचार्यांची जागा रिकामी झाली. विद्यासागर यांनी आपल्याकडे नोकरीस यावे म्हणून संस्कृत महाविद्यालयाच्या चालकांनी जंग-जंग पछाडले. शेवटी १८५० मध्ये विद्यासागर यांनी एकदाची ही जागा स्वीकारली. परंतु ही जागा स्वीकारताना त्यांनी एक अट घातली होती ती अशी की, 'पुढे-मागे लवकरच आपल्यास संस्कृत विद्यालयाचे प्रमुखांची जागा मिळावी.' त्या वेळेस 'महाविद्यालयाची सद्यःस्थिती व ती सुधारण्याचे उपाय' यासंबंधी विद्यासागर यांना एक अहवाल लिहिण्यास सांगण्यात आले. श्रमाचे सागर ईश्वरचंद्र अहवाल लिहावयास लागले व लवकरच तो पूर्ण करून शिक्षणचालकांकडे तो पाठवून देण्यात आला. या अहवालातील साद्यंत, साधार व सोपपत्तिक विवेचनाने शिक्षण-चालक खूष झाले; त्यांनी प्रिन्सिपॉलची जागा विद्यासागर यांना मोठ्या सन्मानपुरस्सर दिली. त्यांना आता २५० रुपये पगार झाला होता.

संस्कृत महाविद्यालयातील प्रत्येक खात्यांत त्यास काही ना काही सुधारणा करायच्या होत्या. जुन्या हस्तलिखित संस्कृत ग्रंथाचे त्यांनी प्रकाशन केले; आणि तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचे पुनर्मुद्रण केले. महाविद्यालयात त्यांनी शिस्त लावली. वेळच्या वेळेवर सर्व शिक्षकांनी अभ्यासक्रम सुरू करावे, यातही त्यांनी जरा कडक धोरण स्वीकारले. जयनारायण तर्कपंचानन यांनासुद्धा मोठ्या युक्तीने त्यांनी नियमबद्ध केले. हे जयनारायण रोज शाळेत उशिरा यायचे. विद्यासागरांचे हे गुरू, म्हणून विद्यासागरांना त्यांना स्पष्टपणे 'लवकर या' असे सांगता येईना. तेव्हा जयनारायण यायची वेळ झाली म्हणजे विद्यासागर दरवाज्यात उभे राहात व त्यांना नमस्कार करून विचारीत, 'आताच का आलेत ?' ते काही उत्तर देत नसत. असे काही दिवस चालले. एक दिवस जयनारायण फार चिडले; ते म्हणाले, 'मला रोज आताच का आलेत म्हणून काय विचारतोस ? आताच का आलेत म्हणून का नाही विचारीत, म्हणजे मला उत्तर तरी देता येईल किंवा दुसरे काही करता येईल.' विद्यासागर म्हणाले, 'मी असे आपणास कसे विचारणार ?' दुसऱ्या दिवसापासून जयनारायण नियमितपणे येऊ लागले !

संस्कृत विद्यादेवीच्या मंदिराचे दरवाजे त्यांनी सर्व जातींच्या सर्व वर्णांच्या लोकांना खुले केले. यामुळे बंगालमधील सर्व पंडितवर्ग खवळला. अब्रह्मण्यं, अब्रह्मण्यं असे हे पंडित बोलू लागले. परंतु कितीही जोराचा विरोध रूढीचे गुलामांकडून आला, तरी डगमगणारे विद्यासागर नव्हते; जे योग्य व युक्त दिसेल, जे

न्याय्य व रास्त वाटेल ते करावयाचे हा तर विद्यासागरांचा बाणा. विद्यासागर यांनी या पंडितप्रवरांना त्यांच्याच डोळ्यात अंजन घालून गप्प बसविले. युरोपियनांस संस्कृत शिकवून, त्यांच्यापासून मात्र पैसे घेण्यास तुम्हाला काही दिक्कत वाटत नाही ना ? युरोपीय हे ब्राह्मणच असतील ! का प्रभुसत्ता व मत्ता त्यांच्याजवळ आहे म्हणून ते जास्त पवित्र झाले ! संस्कृतीने भिन्न, धर्माने भिन्न, आचाराने तर फारच भिन्न, अशा पाश्चात्त्यांना संस्कृत शिकविण्यात काही गैर व अशुची नाही; तर मग संस्कृती, धर्म, आचारविचार, परंपरा यांनी तुमच्याशी संलग्न असे जे तुमच्या भूमीतील, हजारो वर्षे तुमच्या शेजारी राहणारे, त्यांना तेच ज्ञान देताना तुम्ही आरडाओरड, अकांडतांडव करावे हे ठीक आहे का ?' विद्यासागरांच्या या मार्मिक प्रश्नाने सर्व ब्रह्मवृंद थंड झाला. त्यांचा राग मनीच्या मनी जिरला.

या वेळेस इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांना संस्कृत शिकण्यास सोपे व्हावे म्हणून 'उपक्रमणिका' हा ग्रंथ लिहिला. हा व्याकरणाचा ग्रंथ आहे. नंतर तीन प्राथमिक संस्कृत पुस्तके त्यांनी तयार केली. अशा रीतीने संस्कृताच्या अध्ययनास नवीन सुशिक्षित लोकांना त्यांनी प्रोत्साहन दिले.

उन्हाळ्यात फार त्रास होता म्हणून दीड-दोन महिने सुटी असावी, असा विद्यासागर यांनी विचार केला. शिक्षण-चालकांना विनंती करून ही सुट्टी त्यांनी मंजूर करून घेतली. हल्ली जी उन्हाळ्याची सुट्टी मिळते, ती ईश्वरचंद्रांच्या प्रयत्नांचे व योजनेचे फळ आहे.

विद्यासागर यांचा कीर्तिपरिमल दशदिशांमध्ये दरवळू लागला. ते थोरा-मोठ्यांचे, जमीनदारांचे, अधिकाऱ्यांचे दोस्त झाले. लॉर्ड हार्डिज, डलहौसी, कॅनिंग वगैरे सर्वाधिकारी त्यांच्याजवळ स्नेहाच्या व सन्मानाच्या नात्याने वागत.

सरकारी नोकरी

शिक्षणचालकांनी संस्कृत महाविद्यालयात आमूलाग्र सुधारणा काय कराव्यात वगैरेंबद्दल विद्यासागर यांना दुसरा एक अहवाल लिहावयास विनंती केली. त्यांचा अहवाल फार सुंदर होता व मुद्देसूद होता. विद्यासागरांचे विचार वाचून अधिकारी संतुष्ट झाले व विद्यासागर यांना बढती मिळाली. त्यांस आता दरमहा ३०० रुपये मिळू लागले. विद्यासागर यांनी ज्या काही शिक्षणार्थ सूचना केल्या होत्या, त्यात सर्वांत महत्त्वाच्या दोन होत्या. बंगालभर ठिकठिकाणी शाळा उघडाव्या; आणि शिक्षकांना शिक्षण देण्यासाठी शिक्षणमहाविद्यालये स्थापावी.

ईश्वरचंद्र यांना जादा २०० रुपये पगारावर काही जिल्ह्यातील शाळांची देखरेख व तपासणी करण्याचा अधिकार १८८५ मध्ये देण्यात आला. कलकत्त्यात एक शिक्षकांस शिक्षण देणारे विद्यालय स्थापन झाले. या महाविद्यालयाचे पहिले मुख्य शिक्षक अक्षयदत्त हे होते. अक्षयदत्त हे त्या वेळचे नामांकित गद्यलेखक होते. त्यांनी अनेक विषयांवर उपयुक्त निबंध लिहिले होते. वाङ्मय, काव्य, इतिहासशास्त्र कशातही त्यांची बुद्धी अप्रतिहत चाले. ही चळवळ चालू असताना विद्यासागरांचे अत्यंत मोठे स्नेही 'बेथूनसाहेब' हे मरण पावले. विद्यासागर यांना परमावधीचे दुःख झाले. परंतु दुःखातच चूर होणारे ते नव्हते. पुन्हा काही काळाने ते रीतसर कार्यात मग्न होऊन गेले.

या वेळेस डॉ. मोयेट हे मोठ्या रजेवर इंग्लंडला गेले. त्या वेळेस बंगालचे जे सूत्राधिकारी होते त्यांचे नाव हॅल्डे असे होते. हॅल्डे यांनी शिक्षणाच्या बाबतीत काही फार मोठे फरक केले. 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' ही एक नवीनच जागा त्यांनी निर्माण केली. या जागेवर यंग नावाचा एक अगदी अननुभवी तरुण मनुष्य हॅल्डे यांनी नेमला. विद्यासागर यांना ही गोष्ट रुचली नाही. ते लेफ्टनंट गव्हर्नर यांना म्हणाले, 'या जागेवर कोणीतरी अनुभवी शिक्षणाग्रणी नेमावा. कारण ही जागा फार जबाबदारीची आहे.' लेफ्टनंट गव्हर्नर म्हणाले, 'यंग हे काही सर्वसत्ताधीश नाहीत. प्रत्यक्ष मी त्यांच्या कामावर देखरेख ठेवणार आहे आणि तुम्ही पण सर्व सुचनांनी सल्ला वगैरे देऊन त्यांना मदत करावी.'

१८५४ मध्ये एतद्देशीयांच्या शिक्षणासाठी म्हणून विलायतेत असणाऱ्या डायरेक्टरांनी काही लाख रुपये मंजूर केले. या पैशांचा विनियोग करण्याचे काम त्या वर्षी विद्यासागर यांना देण्यात आले होते. विद्यासागर यांनी अनेक जिल्ह्यांत काही शाळा स्थापन केल्या. परंतु १८५५ मध्ये अननुभवी व तरुण यंग हे अधिकारी झाले होते. त्यांनी विद्यासागर यांच्या धोरणास हरकत घेतली. यंग यांना दुसऱ्या दोन दुय्यम युरोपियन इन्स्पेक्टरांचे साहाय्य व सल्ला होताच. १८५४ मध्ये जो ठराव झाला व ज्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी हे पैसे विद्यासागरांच्या स्वाधीन करण्यात आले, त्या ठरावाच्या मथितार्थाबद्दलच या दोघांमध्ये भांडण सुरू झाले. विद्यासागर यांना स्वतःचे करणे योग्य वाटले व यंग यांचा हुकूम न जुमानता त्यांनी जास्त प्राथमिक शाळा उघडण्याचा सपाटा चालू केला. यंग रागावले व त्यांनी सर्व प्रकरण लेफ्टनंट गव्हर्नरांकडे नेले. 'इंग्लंडमधील डायरेक्टरांच्या मनात काय अर्थ होता हे मी

विलायतेहून मागवून घेतो, तोपर्यंत तुम्ही आपले धोरण बंद ठेवा' असे गव्हर्नर यांनी विद्यासागर यांना दोघांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर सांगितले. शेवटी युरोपातून उत्तर आले व विद्यासागर यांनी ठरावाचा जो अर्थ केला तोच योग्य असे डायरेक्टर यांनी मत दिले. अधिकारलोलुप व सत्तामत्त यंगसाहेब यामुळे हतदर्प झाले; परंतु या प्रकरणामुळे त्यांनी विद्यासागर यांच्यावर दात ठेवला. ज्या-ज्या वेळेस विद्यासागरांचे वाकडे करण्याची वेळ आली, ती त्यांनी वाया दवडली नाही. हा द्वेष व मत्सर यंग यांनी मनात नेहमी जागृत व प्रज्वलित ठेवला. खुनशीपणा त्यांनी पोटात बाळगला.

विद्यासागर यांनी आता मुलींच्या शाळा स्थापन करण्यास सुरुवात केली. लेफ्टनंट गव्हर्नर यांनी तोंडी परवानगी विद्यासागरांना दिली होती. परंतु आता इंग्लंडमधील प्रधानमंडळात फरक झाला. यामुळे हिंदुस्थानातील शिक्षणाचे धोरण बदलणे प्राप्त झाले. विद्यासागर यांनी ज्या कन्याशाळा ठिकठिकाणी स्थापिल्या होत्या, त्या शाळांच्या खर्चास लागणाऱ्या पैशास यंग यांनी आता मंजुरी देण्याचे नाकारले. विद्यासागर यांना अडचणीत आणून त्यांचा उपमर्द व अपमान करण्यास ही संधी योग्य सापडली असे जाणून ते मनात भेसूर व सैतानी संतोष मानिते झाले. विद्यासागर यांना स्वतःच्या पदरच्या पैशाने सर्व खर्च भागवावा लागला.

१८५७ साली ते प्रचंड बंड झाले. शाळेत जावयासही मुलांना व विद्यार्थ्यांना भीती वाटू लागली. शिवाय संस्कृत महाविद्यालयाच्या आवारातील काही जागा शिपायांना देण्यासाठी जादा फर्मान सोडण्यात आले. ज्या महाविद्यालयाच्या आवारात व आडमुठे शिपाई राहणार, त्या ठिकाणी शांतता कशी राहणार ? सुरळीत व्यवहार कसा चालणार ? अध्ययन व अध्यापन कसे पार पडणार? या विचाराने विद्यासागर यांनी महाविद्यालय काही दिवस बंद ठेवले. परंतु हे करताना त्यांनी यंग साहेबांची तोंडी देखील किंवा उपचारस्वरूपाचीही परवानगी काढली नव्हती. आपल्याच अधिकारमर्यादेत हे काम ईश्वरचंद्रांनी केले.

विद्यासागरांच्या या करणीने यंगबहादुर रागाने लाल झाले. 'माझ्या अधिकाराचे अतिक्रमण झाले. हा माझा उपमर्द झाला. वरिष्ठांशी ही अरेरावी झाली; याचा काय तो खुलासा करा, आपल्या कृत्याचे समर्थन करा' असे त्यांनी विद्यासागरांना कळविले. विद्यासागर हे कच्च्या दिलाचे नव्हते. त्यांनीही सणसणीत व सडेतोड उत्तर दिले, 'ज्या परिस्थितीमुळे मला ही गोष्ट करावी लागली ती परिस्थिती फार निकडीची होती. त्या वेळेस ताबडतोब व्यवस्था करणे मला प्राप्त होते व

पत्रव्यवहार करून परवानगी मागण्यास अवसर नव्हता. मी जे केले त्यात यत्किंचितही चूक व अन्याय मला तरी दिसत नाही'. विद्यासागर यांनी जे उत्तर दिले तेच बरोबर होते. त्यांनी प्रसंगी जे केले तेच युक्त असे होते असे सर्व विचारी लोक मानतील व पुनरपि आपलीस फजिती होईल म्हणून यंग यांनी हे प्रकरण फार लांबविले नाही. ते मनात मूग गिळून स्वस्थ बसले; परंतु यामुळे पूर्वद्वेषाग्नी जास्तच भडकला.

या वेळेस संस्कृत महाविद्यालय अजिबात बंद करावे असे घाटत होते. परंतु विद्यासागर एखाद्या भगिरथाप्रमाणे ते चालू ठेवण्यासाठी झगडले. हे महाविद्यालय का चालू ठेवावे ? त्याने काय फायदे होतील ? बंद केल्याने किती नुकसान होईल हे सरकारला समजून सांगण्यासाठी त्यांनी पराकाष्ठा केली. आज संस्कृत महाविद्यालय अजूनही उभे आहे व ते आपले काम करीत आहे याचे श्रेय सर्वस्वी विद्यासागरांना आहे.

विद्यासागर यांच्या अधिकारकक्षेत ज्या गोष्टी येत, त्यातही यंग आता ढवळाढवळ करू लागले. अगदी क्षुल्लक बाबतीत हे साहेब दोष दाखवू लागले. विरोध हा आता रोजचा होऊन बसला. पुष्कळशा मुद्द्यांवर रणे माजू लागली. यंगसाहेबांनी विद्यासागर यांना इतके सतावले की, आपण राजीनामा द्यावा असे त्यांना वाटू लागले. असल्या उर्मट, उन्मत्त व दुसऱ्याच्या योग्यतेची, कामाची व गुणांची पर्वा न बाळगणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली राहणे म्हणजे एक प्रकारे पदोपदी मानहानी व मानभंग आहे हे त्यांस कळून आले. मान हा त्यांस जिवापेक्षा प्रिय. मानभंग होत असेल तर ते स्वर्गसुखाला लाथ मारतील व नरकातही स्वतंत्रपणे राहण्यास राजी होतील. 'Better to regin in hell than serve in heaven'. पारतंत्र्यापेक्षा निरयगति बरी असे मोरोपंतही म्हणतात. तेव्हा हे रूपेरी बंधन तोडून टाकण्याचा त्यांनी निश्चय केला. सुरळीतपणे कारभार करता येणार नाही. लोकहिताचे काम करण्यासाठी मी हल्ली ५०० रुपये तनखा घेतो. या पैशाचे चीज मला करता येणे अशक्य असेल व काही न करता उदरभरण म्हणून जर राहावे लागत असेल, तर याहून जास्त लज्जास्पद गोष्ट कोणती ? असे विद्यासागर यांची सदसद्‌विवेकबुद्धी सांगू लागली. ज्यावेळेस ही मानाची टोचणी सुरू झाली, त्या वेळेस विद्यासागर यांस काही सुचेना. सरकारी कृपेचा त्यांना तिटकारा; हांजी हांजी करून गोंडा घोळणे हे तर त्यांस मरण. एखाद्या जागेवर केवळ राहावयाचे म्हणून राहावयाचे अशा वृत्तीचे ते नव्हते. त्यांचा स्वाभिमान जाज्वल्य होता. ते खरे मानधन होते. ते सत्यास व सदसद्‌विवेकबुद्धीस

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

हृदयसिंहासनावर सतत स्थापून त्यांची पूजा करणारे होते. एका निमसरकारी पत्राने यंग यांना त्यांनी आपला हेतू कळवला. ते पत्र असे होते.

डब्ल्यू गार्डन यंग, डिरेक्टर पब्लिक इन्स्ट्रक्शन यांस -

कलकत्ता, संस्कृत महाविद्यालय

२९ ऑगस्ट, १८५७

मेहरबानांस विनंती की -

आपण तीन महिने कलकत्ता सोडून बाहेर दौऱ्यावर जाणार असे ऐकतो. यासाठी तुम्हास काही गोष्टी कळविणे युक्त आहे असे समजून हे पत्र लिहित आहे. लवकरच मी नोकरी सोडण्याच्या विचारात आहे. राजीनामा देण्यास जी काही कारणे आहेत, ती थोडी फार खाजगी स्वरूपाची असल्यामुळे त्यांची परिस्फुटता न करणे हेच मला बरे वाटते.

संस्कृत महाविद्यालयात जी नवीन व्यवस्था करावयाची आहे त्यास दोन-तीन महिने तरी लागतील. ते काम संपविण्यापूर्वी काम सोडून जाणे मला योग्य वाटत नाही; तेव्हा ते काम संपेपर्यंत म्हणजे येत्या डिसेंबर अखेरपर्यंत माझ्या जागेवर मी राहणार आहे. त्या वेळेस मी माझा अर्ज रीतसर मेहेरबानांस पाठवीनच.

तुम्हास आगाऊ ही गोष्ट माहीत असावी आणि तुम्हास माझ्या जागेवर कोण नेमावा याचा विचार करण्यास भरपूर अवसर मिळावा या हेतूने मी हे लिहीत आहे; कळावे,

आपला

ईश्वरचंद्र विद्यासागर

विद्यासागर यांनी बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरांनाही एक पत्र पाठविले. व त्या पत्रासोबत वरील पत्राची एक नक्कल पाठविली. ते पत्र असे.

कलकत्ता संस्कृत कॉलेज

३१ ऑगस्ट १८५७

लेफ्टनंट गव्हर्नर एफ. जे. हॅल्डे यांस -

प्रिय महाशय

काही दिवसांपूर्वी शिक्षणासंबंधी तुमचे व माझे बोलणे झाले होते. त्यावेळेस बंगालमधील प्राथमिक शिक्षणासंबंधी एक योजना करावयास तुम्ही मला मोठ्या संतोषाने सांगितले होते. मी प्रथम जरा नाखूष होतो; परंतु पुढे मी जसजसा विचार करू

... शा. B. श्री ...

लागलो, तो-तो हे काम मला फार नाजूक आहे असे दिसून आले. कारण सद्य:स्थितीतील प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेचा विचार करायचा व तत्संबंधी लिहावयाचे म्हणजे माझे जे सहकारी अधिकारी आहेत, त्यांच्याच कृत्यांचा परामर्ष घेण्यासारखे आहे. तेव्हा हा अहवाल न पाठविल्याबद्दल आपण उदार मनाने क्षमा कराल, अशी आशा आहे. मी कबूल केले खरे; परंतु मला सध्या अन्य उपाय दिसत नाही.

डिसेंबरअखेर मी एकंदर माझ्या नोकरीपासून मुक्त होऊ इच्छितो. यंग यांसही निमसरकारी पत्राने मी ही गोष्ट कळवून ठेविली आहे. त्याच पत्राची एक प्रत मी सोबत जोडण्याचे धाष्टर्य करीत आहे. असो.

आपल्याबद्दल आदर व पूज्य-बुद्धी बाळगणारा -

ईश्वरचंद्र शर्मा.

या ईश्वरचंद्रांच्या पत्रास गव्हर्नरांनी एक अगदी छोटे उत्तर पाठविले.

प्रिय पंडित महाशय,

तुमचा विचार ऐकून खरोखरच फार मनापासून वाईट वाटले. गुरुवारी येऊन मला भेटा; आणि हा विचार करण्याची कारणे खुलासेवार मला सांगा.

आपला

एफ्. जे. हॅल्डे

या मुलाखतीचा परिणाम एवढाच झाला की, राजीनामा पाठविण्याचे जरा कालगतीवर पडले. परंतु गॉर्डन यंग व विद्यासागर यांचे संबंध जास्त विरोधाचे होऊ लागले. एकंदर प्रकरण चिघळत चालले. सामोपचाराने या गोष्टी सुधारता येणे शक्य नाही असे आता स्पष्ट दिसत होते. गव्हर्नरांच्या जरा भिडेखातर म्हणून विद्यासागर त्या जागेवर राहिले. जो जो यंगसाहेबाने त्यांना अशिष्टाचाराने वागवावे तो तो राजीनामा देण्याचा त्यांचा निश्चय बळावे. हॅल्डे हे त्यांचे मित्र, तेव्हा त्यांचेही मन मोडवेना, अशी विद्यासागरांना मोठी पंचाईत पडली होती. शेवटी विद्यासागर यांस यंगसाहेबांच्या अरेरावीसंबंधात राहणे अशक्य झाले. गव्हर्नर यांनी परोपरीने सांगून पाहिले. परंतु विद्यासागर यांचा निश्चय बदलला नाही. 'आता नोकरी सोडणे हेच माझे कर्तव्य आहे; माझा स्वाभिमान मला राहू देत नाही. लोकसेवा पण मला करता येत नाही. तरी मी मोठा दिलगीर आहे.' असे विद्यासागर यांनी गव्हर्नरांना कळविले. पैशांची भीती दाखवून, मला गव्हर्नर ठेवू पाहतात, परावृत्त करू पाहतात, याचे वाईट वाटले. ही अडचण

असली तरीसुद्धा नोकरी सोडून देण्याचा विचार जास्तच बळावला. जे आपण करणार त्याने आपल्या कुटुंबातील मंडळींचे व आपले स्वतःचे काय होईल याचा या दरिद्री ब्राह्मणाने यत्किंचितही विचार केला नाही; केला असला तरी त्यास प्रबळ होऊ दिला नाही. खऱ्या विप्राला शोभेसे त्यांनी वर्तन केले. द्रव्य माझ्यासाठी, मनुष्यासाठी आहे; मनुष्य द्रव्यासाठी नाही हे त्यांनी गव्हर्नरांना आपल्या देशबांधवास दाखवून दिले. त्यांनी यंग यांना एक लांबलचक पत्र लिहिले व आपण एकंदर या नोकरीमुळे फार त्रासलो आहोत आणि प्रकृती पण नादुरुस्त. सबब आपण राजीनामा देतो. असे त्यांनी त्यात लिहिले. यंग व गव्हर्नर यांची आपसात पुष्कळ बोलणी झाली. गव्हर्नर यांच्या सांगण्यावरून यंग यांनी तडजोड होते का असे दाखविण्याचा वरपांगी प्रयत्न केला. परंतु यंगचे अंतरंग कसे आहे, हे त्यांना माहीत होतेच. विषाची आणखी परीक्षा कशाला पाहिजे असा मनात विचार करून ते अढळ राहिले. गव्हर्नरांचे जेव्हा जास्त सलगीचे पत्र आले, तेव्हा मग जे उत्तर ईश्वरचंद्रांनी पाठविले, त्यात त्यांनी सर्व साद्यंत हकिकत निवेदन केली. आपणास कशा परिस्थितीत काम करावे लागले, आपला कसा उपमर्द होत असे, यंग आपणावर कशी कुरघोडी करू पाहतो, हे सर्व त्यांनी मोठ्या हृदयद्रावक तऱ्हेने लिहिले. परिस्थिती अशी असल्यामुळे एक मी तरी जाणे इष्ट किंवा यंग तरी दूर होणे जरूर आहे; परंतु मीच राजीनामा देतो; कारण माझी प्रकृती पण ठीक नाही; असे सांगून गव्हर्नरांची समजूत घालण्याचा ईश्वरचंद्रांनी प्रयत्न केला. ईश्वरचंद्र राजीनामा मागे घेत नाहीत असे पाहून शेवटी गव्हर्नर यांनी राजीनामा स्वीकारल्याचे पत्र डायरेक्टर यंग यांना पाठविले. त्यात पत्रात गव्हर्नर म्हणतात, 'ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा राजीनामा आम्ही स्वीकारतो. विद्यासागर यांनी अशा तऱ्हेने विशेष असंतोष कारण नसताना सोडून जाणे हे खेदजनक आहे. परंतु आपण विद्यासागर यांना कळवावे की, त्यांनी केलेल्या शिक्षणविषयक कामगिरीबद्दल सरकार कृतज्ञ आहे; सरकारास या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे.' ६ ऑक्टोबर रोजी गव्हर्नरांनी लिहिल्याबद्दलचे त्यांना कळविण्यात आले. परंतु स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत विद्यासागर यांनी जो खर्च केला, त्याबद्दलचे सरकारी बिल मंजू होईपर्यंत शेवटचा रामराम ठोकायचा नाही असे विद्यासागर यांच्या मनात होते. परंतु यंग यांना दम निघेना. तुमचे खर्चाचे बिल पास होईल निश्चिंत असा, असे पोकळ वचन ईश्वरचंद्र यांना देण्यात आले. शेवटी यंगच्या शब्दावर विश्वास ठेवून ईश्वरचंद्र या नोकरीच्या जाचातून मुक्त झाले.

ही मोठ्या पगाराची नोकरी सोडून दिली, त्यावेळेस ईश्वरचंद्र यांना एका मित्राने हटकले, 'आपण राजीनामा देण्यात उतावीळपणा व अविवेक दाखविला नाही का?' त्या वेळेस मोठ्या आवेशाने विद्यासागर त्यास बोलले, 'पैसा व पदवी यापेक्षा मला स्वाभिमान प्रिय आहे. ज्या ठिकाणी माझा स्वाभिमान संपुष्टात येईल तेथे मी कधीही नोकरी करणे शक्य नाही.'

वरील राजीनामा प्रकरणावरून आपणास एक बोध घेता येईल. सरकारी बडे अंमलदार कितीही जिगरीदोस्त झाले, त्यांना आपली विद्वत्ता, योग्यता, यथार्थपणे पटली, तरी ते आपल्या जातिबांधवांचेच हित आधी पाहणार. यंग या तरुण अधिकाऱ्यास अनुभव नाही. तादृश्य विद्वत्ता नाही. परंतु जात गोऱ्याची व जेत्याची; यामुळे ते अधिकारसंपन्न राहून विद्यासागर यांना तेथून निघावे लागले. विद्यासागरांसारखे विद्यादेवीच्या गळ्यातील ताईत, अनुभवी, सुधारणा करण्यात दक्ष, शिक्षणैकरत अशा पुरुषास कोणत्याही स्वतंत्र व सुधारलेल्या देशात शिक्षणाची सूत्रे देण्यात त्या राष्ट्रास मोठेपणा वाटला असता. असला पुरुष आपल्या शिक्षणमंत्र्यांच्या पदी असावा असे त्या राष्ट्रास वाटले असते. परंतु ईश्वरचंद्र या पारतंत्र्यपतित राष्ट्रात जन्मास आले. त्यांच्या गुणाचे चीज येथे कोण करणार ? जनता जुन्यास चिकटणारी, काही सुशिक्षित मत्सराने ग्रासलेले, सरकारला गुणांचे गौरव करणे जसे माहीतच नाही; अशी आमची सर्वत्र केविलवाणी दशा; आणि म्हणूनच अशा रत्नांना योग्य कर्तव्यक्षेत्र, कार्यक्षेत्रे मिळणे दुरापास्त असते.

ईश्वरचंद्र यांचा कलकत्ता विश्वविद्यालयाशी पण संबंध होता. कॅनिंगच्या कारकिर्दीत मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विश्वविद्यालये स्थापन झाली. विश्वविद्यालयात ३९ सभासद होते त्यापैकी फक्त सहा एतद्देशीय होते. सहापैकी पुन्हा दोन मुसलमान होते. उरलेल्या चारांपैकी विद्यासागर हे एक होते. विश्वविद्यालयीन पदवीदान समारंभ पहिल्यानेच झाला त्या वेळेस व्हाइसरॉय अध्यक्षपदी होते. त्यांच्या एका बाजूला कलकत्त्याचे लॉर्ड बिशप बसले होते तर दुसऱ्या बाजूला विद्यासागर विराजमान झाले होते. विद्यासागर यांनी विश्वविद्यालयाच्या घटनेत काही सल्ला दिला; तो मोठ्या संतोषाने स्वीकारण्यात आला. हिंदी, बंगाली, ओरिया आणि संस्कृत या चार भाषांसाठी ते विश्वविद्यालयात परीक्षक नेमले गेले होते. परंतु हे काम करणाऱ्यास फार दगदग व त्रास पडे म्हणून हे काम करणाऱ्यास काही जादा रक्कम मंजूर करून देण्यात येत असे. परीक्षकमंडळाची पुनर्रचना करावयाची होती. परंतु विद्यासागर या

मंडळात येण्यास तयार होत नव्हते. कदाचित या कामासाठी तो तनखा देण्यात येई, त्या संबंधीच काही भानगड उपस्थित झाली असेल; परंतु १८६५ मध्ये मात्र एम.ए. च्या परीक्षेसाठी ते परीक्षक होण्यास कबूल होते. विश्वविद्यालय निर्माण केल्यावर पुनरपि संस्कृत महाविद्यालय रद्द करण्याची कल्पना निघाली. युरोपीय व एतद्देशीय लोकांनी ही कल्पना उचलून धरली; विद्यासागर हे महाविद्यालयाचे मुख्य असताना त्यांनी ज्या सुधारणा केल्या होत्या, त्यात सर्व विद्यार्थ्यांपासून 'फी' घेण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला होता. तत्पूर्वी शिक्षण सर्वांना मोफत असे. यामुळे महाविद्यालयास उत्पन्न झाले व रद्द करण्याचे कालावधीवर गेले नाही तर पूर्वीच रद्द झाले असते. या वेळेस पुन्हा प्रश्न निघाल्यावर विद्यासागर एकाकी झगडले. त्यांची माहिती बिनचूक, दर्जा मोठा; एकंदरीत त्यांनी महाविद्यालय ठेवावे, याबद्दल आपली बाजू नीटपणे पुढे मांडली. विद्यासागरांच्या प्रयत्नामुळेच हे संस्कृत महाविद्यालय आज उभे आहे. नाही तर ते मोडून टाकावे यासाठी सर्वजण टपून होते. विद्यासागर यांची प्रत्यक्ष सरकारी नोकरीत असता जी शिक्षणविषयक कामगिरी झाली, ती अशा स्वरूपाची होती.

+++

वाङ्मयविषयक कामगिरी

हिंदुस्थानातील इतर भाषांमधील वाङ्मयाप्रमाणे बंगाली गद्य वाङ्मय हे अर्वाचीन आहे. पूर्वकाळी विचार पुष्कळ वेळा काव्यरूपाने लिहिले जात; मग पुस्तक संस्कृत असो किंवा प्राकृत असो. बंगाली भाषेत पहिली अभिजात गद्यरचना करणारा पुरुष म्हटला जातो. जगद्विख्यात राजा राममोहन रॉय याबद्दल पुष्कळ वादविवाद व मतवैचित्र्य असले तरी, आता सर्वसामान्य मत असेच आहे की, बंगाली गद्यातही अभिनव विचार मांडता येतात. गंभीर विषयांवरील गहन विचार बंगाली भाषेत दाखविता येतात, हे प्रथम राजांनीच बंगाली जनतेस शिकविले. राममोहन रॉय यांची पुष्कळ स्तोत्रे, परमेश्वर प्रार्थना गद्यात असल्या तरी त्या रसाळ, मनोवेधक व आनंदकारी आहेत; त्या प्रेमळ व सहज आहेत. हृदयाची निर्मळता त्यात स्पष्टपणे दृग्गोचर होते.

राजांची भाषा साधी व सुंदर असली तरी ते सौंदर्य अगदी सरळ होते; त्यात प्रौढता नव्हती. तेथे लालित्य नव्हते. तेथे सागराचे गांभीर्य व गगनाचे गौरव नव्हते. बंगाली वाङ्मयास लालित्यपूर्ण बंकिमने बनविले. बंकिमचंद्र यांनी बंगाली भाषा भूषविली; तिला अलंकार चढविले. असा एकही लेखनप्रकार नव्हता की जे बंकिमने आपल्या ओजस्वी भाषेत ओतला नाही. स्वभावचित्रे कशी रेखाटावी, टीका कशी करावी, निबंध, प्रबंध कसे लिहावे हे सर्व त्यांनी दाखविले. परंतु बंकिमची यक्षिणीची कांडी फिरण्यापूर्वी आणखी एका पुरुषाने बंगालीस जीवनामृत दिले होते. राममोहनरायांनंतर बंगाली पंडितांच्या हाती गेली. तेथे ती अनेक संस्कृतप्रचुर शब्दरचनेने दुर्बोध होऊ लागली. तिचा जीव घाबरा होऊ लागला. उडू पाहणारा पक्षी पुन्हा ओढला जाऊ लागला. मुक्त होणाऱ्यावर पुन्हा दडपण पडू लागले. संस्कृत भाषा बंगालीस फारच जाचू लागली. अशा वेळी विद्यासागर पुढे आले आणि त्यांनी बंगाली

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

भाषेस या वरील पंडितप्रवरांच्या करपंजरातून मुक्त केले. पहिले पुस्तक जे बंगालीत विद्यासागर यांनी लिहिले, ते 'वेताळपंचविशी' हे होय. हा ग्रंथ गंभीर विषयावर नसला तरी त्यातील सुंदर भाषा व भाषासरणी पाहून वाङ्मयाकाशात नवीन तारा विहार करावयास आला व आपले तेज दाखवू लागला, असे लोक बोलू लागले. हे पुस्तक क्रमिक पुस्तक म्हणून लावले जावे, असे विद्यासागर यांनी शिक्षणाधिकाऱ्यास विनविले. रेव्ह. के. सी. बॅनर्जी या गृहस्थास सरकारने या पुस्तकाबद्दल मत विचारले. आश्चर्याची गोष्ट ही की या बॅनर्जींनी हे पुस्तक चांगले आहे अशी शिफारस केली नाही. परंतु आजसुद्धा या पुस्तकाच्या कित्येक प्रती दरसाल खपतात, यावरून हे पुस्तक किती लोकप्रिय आहे, हे दिसून येईल.

विद्यासागर निराश न होता श्रीरामपूर येथील मिशनरी लोकांकडे गेले. या मिशनरीचे मार्शमन नावाचे एक गृहस्थ पुढारी होते. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व पुस्तकांत हे वेताळपंचविशी पुस्तक उत्कृष्ट आहे, असे मत या मार्शमनसाहेबांनी दिले आणि या साहेबांनी पुरस्कार केल्याने ईश्वरचंद्र यांचे पहिले पुस्तक जगात जन्म पावले. हे पुस्तक या मिशनरीच्या छापखान्यातच छापले. मिशनरींनी पुरस्कार केल्यामुळे हे पुस्तक क्रमिक पुस्तक म्हणून लागले. या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीत पुष्कळ मोठेमोठे संस्कृत शब्द, सामाजिक शब्द होते. अशा समासप्रचुर रचनेने भाषा सुंदर न दिसता बोजड व दुर्बोध होते असे विद्यासागर यांच्या चटकन ध्यानात आले. अशा ओझ्याने भाषा फोफावत नाही, हे त्यांना दिसले. या कारणाने चतुर व व्यवहारपटू माणसाप्रमाणे विद्यासागर यांनी या सर्व अवजड गोष्टी आपल्या ग्रंथातून दूर केल्या.

यानंतर विद्यासागर यांनी अनेक विद्यालये व महाविद्यालये यास उपयुक्त होतील अशी अनेक क्रमिक पुस्तके लिहिली. त्या वेळेस नवीनच शाळा, महाशाळा, स्थापन होत होत्या. अर्थातच, उपयुक्त पुस्तकांची फार जरुरी होती. ही जरूर पुरविण्यास विद्यासागर हे योग्य व विद्वान पुरुष आले. ही क्रमिक शालोपयोगी पुस्तके आजही अनेक शाळांमध्ये बालगोपालांना शिक्षण देत आहेत; त्यांची मने रिझवीत आहेत आणि पुष्कळ प्रकाशकांना पैसाही पुरवीत आहेत.

१८५५ मध्ये कालिदासाच्या जगप्रसिद्ध सुंदरतम अशा शाकुंतल नाटकाच्या आधारे त्यांनी गद्यात 'शकुंतला' हा ग्रंथ लिहिला. आधीच विषय मधुर व चित्तापहारी; करुणशृंगारादी रसांनी भरलेला. विद्यासागर यांनी हा ग्रंथ इतका सुंदर लिहिला की, बंगाली लोक नागाप्रमाणे डोलू लागले. या ग्रंथाने ते वेडावले व लोभावले आणि

विद्यासागर यांची ख्याती सर्वत्र प्रसार पावली. त्यावेळचे अभिजात गद्यलेखक, गद्यलेखकमुकुटमणी असे त्यांना संबोधण्यात येऊ लागले. याच वर्षी विद्यासागर यांनी पुनर्विवाहावर विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिले. विद्यासागर हे जातिवंत विचारांचे प्रवर्तक आहे हे या प्रबंधांवरून दिसते. दुसऱ्यांचे विचार घेऊन त्यातच पुनर्विलास करणारे ते भाषांतरकर्ते नव्हते. हे निबंध पुनरपि अशा टीकाकारांनी वाचावे व मग आपले शेवटचे मत देण्यास धजावे. या बाबतीत मतभेदास अल्पस्वल्प जागा असली, तरी एक गोष्ट मात्र सर्वसंमत आहे ती ही की सुशिक्षित जनमनाचे आकर्षण करील, त्यांचेही मनोरंजन व हृदयाकर्षण करील अशी भाषा प्रथम विद्यासागर यांनीच उपयोगात आणली. हा विद्यासागर यांच्याच विलासी लेखणीचा पराक्रम होता. तिचेच हे वैभव होते. विद्यासागर यांच्या लेखणीने लोकमनास लोल बनविले. ही गोष्ट लहानसहान नव्हे. अशी सुंदर बंगाली भाषा वृद्धिंगत करण्यास, तिचे स्वागत करण्यास आपण पुढे यावे असे होतकरू नवविद्वानांना वाटू लागले. ही या तरुणांना स्फूर्ती कोणी दिली ? ही शक्ती कोणी निर्मिली ? विद्यासागरांच्या लेखणीचा हा महिमा होता. तिला हे श्रेय आहे. बंगाली कादंबरीलेखकांचे गुरू बंकिमचंद्र लिहितात, 'विद्यासागर आणि अक्षयकुमार दत्त यांनीच प्रथम संस्कृतप्रचुर बंगाली सुधारली. विद्यासागर यांनी जी बंगाली भाषा सजविली, तीच घेऊन आम्ही पुढे जात आहोत. ईश्वरचंद्रांनी साहित्य गोळा केले व आम्ही ते घेऊन मोठ्या डौलाने मिरवीत आहोत. त्यांनी वस्तू जमविल्या, आम्ही बाजार करीत आहोत. बंकिमचंद्रांचे हे मत वाचून आपणांस विद्यासागर यांच्या कामगिरीचे महत्त्व कळून येईल. याचा अर्थ असा नव्हे की, त्या काळी संस्कृतमय बंगाली अजिबात थांबली. जरी संस्कृतमय घटना दिसून येत होती, तरी बंगाली आता दुर्बोध राहिली नव्हती. विशेषतः विद्यासागर हे फार मधुर व मनोवेधक लिहीत. त्यांच्या पूर्वी कोणी असे सुंदर बंगाली गद्य लिहिले नाही व त्यांच्यानंतरही त्यांची धाटणी व भाषासरणी कोणास तशी साधली नाही असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही.

अरविंद घोष यांचे नाव सर्वांना माहीत असेलच. या राजकीय संन्याशाच्या मातामहांनी राज नारायण बोस यांनी विद्यासागर यांना 'बंगाली भाषेचे जॉन्सन' असे म्हटले आहे. जॉन्सन हे केवढे विख्यात पंडित होते हे इंग्रजी जाणणाऱ्यांना व विष्णुशास्त्री यांची निबंधमाला वाचणाऱ्यांना तरी सांगण्याची जरूर नाही.

१८६२ मध्ये विद्यासागर यांनी आपले सर्वोत्कृष्ट व सर्वसुंदर असे 'सीतारवनवास' – 'सीतेचा वनवास' हे पुस्तक लिहिले. भवभूतीच्या

उत्तररामचरित्राच्या धर्तीवर यातील पहिला अध्याय लिहिला आहे. परंतु बाकी सर्व पुस्तक विद्यासागरांच्या स्वतःच्या कल्पनेचे, विचारांचे परिणत फळ आहे. सीतेसारखी स्त्री-देवता जगाच्या वाङ्मयात कोठेच आढळणार नाही. सीतेची थोरवी कोण सांगणार ? तिची पतिनिष्ठा, तिने सोसलेले कष्ट, दुःखानंतर थोडे-फार सुख येते आहे तोच पुनरपि पतीने केलेली वनातील पाठवणी, नंतर पृथ्वीमातेने तिला पोटात घेऊन केलेले दिव्य, सर्वच काही एकंदर वृत्त हृदय हेलावून सोडणारे आहे. सीतेचा स्पृहणीय दिव्य जीवनक्रम, करुणरसपूर्ण प्रसंग आणि विद्यासागरांची रसाळ व सहजमनोहर भाषाशैली, अनुरूप विषय व तदनुरूप भाषा. विद्यासागरांचे हे पुस्तक वाचून पाषाणहृदयांस पाझर फुटेल; कठोर करुणवृत्ती होतील. कधीही डोळ्यांतून अश्रू न आणणारे विचारवंत, संयमी व गंभीरवृत्ती लोकसुद्धा रडल्याशिवाय राहणार नाहीत. वाचता-वाचता हृदय गहिवरते, गळा दाटतो व डबडबतात. आणखी अन्य पुस्तके विद्यासागर यांनी लिहिली नसती आणि हे एकच पुस्तक त्यांनी लिहिले असते, तरीसुद्धा वंगवाङ्मयात त्यांचे नाव अजरामर होऊन राहिले असते यात शंका नाही.

ज्या वेळेस ग्रंथामध्ये ग्रंथकाराचे हृदय ओतले जाते, वर्ण्य विषयाशी ग्रंथकाराची वृत्ती तदाकार होते, त्या वेळेसच उत्कृष्ट ग्रंथ निर्माण होतो. कोणत्याही उत्कृष्ट गोष्टीचे असेच आहे. उत्कृष्ट चित्र, उत्कृष्ट अभिनय, उत्कृष्ट गान, तेव्हाच विनिर्मिले जाते की, ज्या वेळेस त्या-त्या कलाविदांचे त्या-त्या कलांगाशी एकरूपत्व होते. ईश्वरचंद्रांच्या अंतरंगाचे प्रतिबिंब या पुस्तकादर्शात पडले आहे. ईश्वरचंद्रांचे अंतर्मन येथे मूर्तिमंत बनले आहे; निराकार हृदय येथे साकार झाले आहे. सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवी मायकेल मधुसूदन दत्त यांनी ईश्वरचंद्रांना 'कारुण्यसागर' ही पदवी दिली होती. ते कारुण्यरसाचे सागर विद्यासागर या ग्रंथात पाहावयास सापडतात. असे सहृदय ग्रंथकारच अशी ग्रंथरत्ने निर्माण करतील, ते अन्यांचे काम नव्हे. ज्यांच्या मनोवृत्ती कृत्रिम आहेत, ज्यांच्यामध्ये जिवंत दयेचा झरा नाही, ज्यांचे हृदय उदारवृत्तीला थारा देत नाही, ज्यांचे मन संकुचित, संकीर्ण व कृत्रिम आहे अशांना असे ग्रंथ कसे जगास देता येतील ? सज्जनांचा छळ होतो आहे हे पाहून वाचकांस सज्जनांशी प्रेमसंबंध करणे हे विद्यासागरच करू जाणोत; येरा वाङ्मयसेवकांचे ते काम नाही.

बंगाली वाङ्मयात विरामचिन्हे प्रथम विद्यासागर यांनी आणिली. नाही तर संस्कृतप्रमाणे एक उभी रेषा एवढेच काय ते विरामचिन्ह बंगाली लोकांना माहीत होते. इतर भाषांमध्येही हीच अवस्था होती. याच्या पूर्वी सर्वच गोंधळ असे. मोरोपंतांच्या

पोथ्यात असे विराम नसल्यामुळे पुष्कळ वेळा कवितांचे अर्थ समजावयास कसा त्रास होत असे, हे आपणास कल्पनेने जाणता येईल.

बंगाली भाषेचा वृत्तपत्र नीट पद्धतशीरपणे चालविण्याचे श्रेयसुद्धा विद्यासागर यांनाच देणे समुचित होय. या त्यांच्या वृत्तपत्रांचे नाव 'सोमप्रकाश' (इंदुप्रकाश) असे होते. ते या वृत्तपत्राचे संपादक नव्हते, परंतु त्यांच्याच स्फूर्तीने व तंत्राने या पत्राचा सर्व कारभार चाले. हे पत्र पुढे द्वारकानाथ विद्याभूषण हे चालवू लागले. सदरहू विद्याभूषण विद्वान व समर्थ असे लेखक होते; व हे संपादक होते त्यावेळेस हे सोमप्रकाश बंगालमध्ये फारच प्रिय झाले होते. त्याचा प्रसार पुष्कळ झाला होता. जरी संपादक द्वारकानाथ होते तरी विद्यासागर याचा मोठाच आधार त्यांना असे. नेहमी विद्यासागरांची सहानुभूती व सल्ला या संपादकांना मिळत असे. सोमप्रकाशात विद्यासागर पुष्कळ वेळा लिहीत व त्यांचे लिहिणे अर्थातच पहिल्या प्रतीचे असे.

रवींद्रनाथ हे आज सर्वश्रुत आहेत-त्यांचे परमपूज्य वडील देवेंद्रनाथ यांना लोक 'महर्षी' असे म्हणत. देवेंद्रनाथ 'तत्त्वबोधिनी' नावाचे एक मासिक चालवीत असत. या मासिकात आश्रय देणारे, सल्ला देणारे व नेहमी लेख वगैरे लिहून देणारे ईश्वरचंद्र होते.

विद्यासागर यांनी लहान-मोठी ५२ पुस्तके लिहिली. यापैकी १७ पुस्तकांचा संस्कृत भाषेत प्रवेश करून देणारी क्रमिक पुस्तके, काही संस्कृत उताऱ्यांची पुस्तके, व्याकरणादी पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना, यांच्यात समावेश होतो. 'व्याकरणकौमुदी' हा त्यांचा मोठा सुंदर व अगदी नवीन तऱ्हेने लिहिलेला ग्रंथ आहे. भांडारकर यांची पुस्तके याच नमुन्याची आहेत. विद्यासागर यांनी इंग्रजीतून लिहिले नाही एवढाच फरक. परंतु हा महत्त्वाचा फरक होय. त्याशिवाय सोपी, सरळ अशी मूळ संस्कृत पत्रे आणि कधी स्वयंरचित सूत्रेही ते विद्यार्थ्यांना स्मरणसाहाय्य व्हावे म्हणून योजीत. या पुस्तकाच्या अद्यापही कित्येक आवृत्त्या बंगाली भाषेत निघतात. हे पुस्तक लिहिण्यापूर्वी फारच थोडे लोक संस्कृत शिकण्यास धजत. संस्कृत व्याकरण म्हणजे एक बाऊ वाटे. विद्यासागर यांनी प्रथमच जेव्हा नोकरी धरली, तेव्हा 'उपक्रमणिका' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. हा ग्रंथ शिकणाऱ्यांसाठी होता. याची हकिकत जरा मजेची आहे. एकदा ईश्वरचंद्रांचे मित्र रामकृष्ण बॅनर्जी हे त्यांच्या घरी आले होते. त्या वेळेस ईश्वरचंद्रांचे लहान भाऊ मोठ्या गोड आवाजात संस्कृत श्लोक म्हणत होते. रामकृष्णांना ते मुलांचे श्लोक म्हणणे फारच आवडले. असे श्लोक म्हणता आले तर काय गंमत होईल असे ते सहज बोलले. 'मला संस्कृत शिकण्यासाठी

एखादे सोपे साधन द्याल तर मी संस्कृत शिकेन'. असे रामकृष्ण यांनी विद्यासागर यांना सांगितले. त्याच दिवशी रातोरात बसून मी 'उपक्रमणिका' विद्यासागर यांनी लिहून काढली व इंग्रजी शिकलेल्या बंगाली लोकांनाही सोप्या पद्धतीने संस्कृत शिकण्याचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिला.

रघुवंश, किरातार्जुनीय, शिशुपालवध, मेघदूत वगैरे संस्कृत महाकाव्ये व खंडकाव्ये त्यांनी प्रकाशित केली. शाकुंतलाची प्रत जर त्यांनी फार कष्टाने तयार केली. सर्व हिंदुस्थानातील हस्तलिखिते गोळा करून त्यांची तुलना करून निरनिराळे पाठभेद लक्षात घेऊन त्यांनी सुंदर अशी प्रत प्रसिद्ध केली. यासाठी त्यांनी संस्कृतात टीपा पण स्वतः लिहिल्या आहेत. त्यांनी इंग्रजी पाच पुस्तके लिहिली. त्यातील 'विधवा-पुनर्विवाह' हे स्वतः त्यांचे व बाकीची ४ पुस्तके केवळ 'संग्रह' आहेत. (Collection of extracts) उरलेल्या ३० पुस्तकांपैकी १४ महाविद्यालय व विद्यालय यातील अभ्यासपुस्तके आहेत व बाकीची अनेक विषयांवर आहेत. यातील काही इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद आहेत; काहींमधील साहित्य दुसऱ्यापासून घेतलेले असून मांडणी मात्र विद्यासागर यांची आहे.

या पुस्तकांशिवाय भारतवर्षाचा एक प्रचंड इतिहास बंगाली भाषेत लिहिण्यासाठी ते साहित्य जमा करीत होते. परंतु हे पुस्तक पूर्ण झाले नाही. आयुष्याच्या अंतापर्यंत ते या पुस्तकासाठी, या ग्रंथासाठी श्रम करण्यास उत्सुक होते; परंतु ग्रंथ लिहून झाला नाही याचे वाईट वाटते. पुष्कळ पुस्तके त्यांनी अर्धवट लिहिली. ती आपल्या अनेक मित्रांना पूर्ण करावयास सांगितली. त्या मित्रांनी ती पूर्ण करून ते स्वतः श्रीमंत झाले. ईश्वरचंद्रांचा उदार स्वभाव अमर्याद होता. ईश्वरचंद्रांची लेखक या नात्याने ख्याती सर्व बंगालमध्ये आता स्थिर झाली होती. त्यांनी लिहिल्या पुस्तकांवर वाचकांच्या उड्या पडत. असे असता, अशा स्पृहणीय वाङ्मयस्थानी विराजत असता एका होतकरू ग्रंथकारासंबंधी अनुपम औदार्य विद्यासागर यांनी दाखविले ते अभूतपूर्व होय. केवढे हे औदार्य व केवढा हा मनाचा मोठेपणा !

+++

स्त्री-शिक्षणासंबंधीची कामगिरी

बंगालमध्ये स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणारे मूळ गृहस्थ बेथून नावाचे युरोपियन होते. हे गृहस्थ फार दयाळू हृदयाचे होते. बंगाल सरकारच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद होते. त्यांचा दर्जा फार मोठा होता; त्यांना युरोपियन लोकांत मोठा मान होता. बेथून यांच्या पूर्वीही कलकत्त्याच्या काही भागात मुलींच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन झाल्या होत्या. परंतु या सर्व अस्तित्वात आल्या आणि लवकरच नामशेष झाल्या होत्या. ज्याने स्त्रीशिक्षण भक्कम पायावर उभारले, तो पुरुष बेथून हा होय. बेथूनप्रमाणे ज्यांचे हृदय परस्थांसाठी तळमळते असे लोक केव्हाही विरळेच असणार. धर्माने निराळे, भाषेने निराळे, आचाराने निराळे, सर्वतोपरी निराळे अशा पददलित लोकांसाठी जेत्यांमधील कोण माणूस करुणा दाखवील? बेथून, डेव्हिड हेअर, ॲण्ड्र्यूज, निवेदिता यांसारखी दुःखित लोकांना आपली समजणारी माणसे पृथ्वीस भूषणे होत, यात शंका नाही. निरपेक्षपणे निराश्रितांना आश्रय देणारे, त्यांचे डोळे पुसणारे असे उदारधी भूतलावर किती सापडणार? अशा थोर कोटीतील बेथून हे एक गृहस्थ होते. गव्हर्नरच्या खालोखाल त्यांची प्रतिष्ठा होती; परंतु पूर्णपणे निरहंकार व बालकाप्रमाणे सरळ त्यांची मनोवृत्ती होती. परंतु जे कार्य ते हाती घेऊ पाहात होते त्यात आचार-विचारांची पूर्ण ओळख नसल्याकारणाने बंगाली जनतेस बरोबर घेऊन, यश मिळविणे कठीण होते. वजनदार व विद्वान बंगाली गृहस्थांचा पाठिंबा व साहाय्य मिळाल्याशिवाय बेथून यांना आपला उद्देश सिद्धीस नेता आला नसता. परंतु असा गृहस्थ त्यांना मिळाला. निरलसवृत्तीचा, उदार मनाचा महात्मा बेथून यांना भेटला. हे विद्यासागर होते.

बेथून व विद्यासागर यांची पहिली मुलाखत खालीलप्रमाणे घडून आली. संस्कृत महाविद्यालयाचे प्रमुख मायेट हे व फोर्ट वुइल्यमचे प्रमुख मार्शल हे दोघे

विद्यासागर यांना प्रत्येक शिक्षणविषयक बाबतीत सल्ला विचारीत. सरकारनें प्रांतात कोणतीही शिक्षणविषयक चळवळ केली, तर विद्यासागरांचे मत तेथे विचारात घेण्यात येई. एकदा हिंदू कॉलेजमधील वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांची परीक्षा होती. त्यांना निबंध लिहावयास सांगायचे होते. या निबंधाचे परीक्षक विद्यासागर होते. विद्यासागर यांनी 'स्त्री-शिक्षण' या विषयावर निबंध लिहावयास सांगितले. ज्या विद्यार्थ्याचा निबंध उत्कृष्ट ठरेल, त्याला पारितोषिक द्यायचे होते. बक्षीस समारंभास बेथून हजर होते. बेथून यांनी एक लहानच पण सुंदर भाषण केले. त्यात 'हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातही स्त्रीशिक्षणाचा हा कैवारी व स्त्रियांबद्दल निरतिशय सहानुभूती बाळगणारे ईश्वरचंद्र यांची भेट झाली व पुढे वरचेवर विद्यासागर या उदारधीकडे जाऊ-येऊ लागले. बेथून यांच्याकडे शिक्षणखाते होते व त्यामुळेही विद्यासागर यांना वरचेवर त्यांच्याकडे जावे लागे. दोघांमध्ये मोठी मैत्री जमून आली. दोन थोर महात्म्यांची मैत्री म्हणजे एक आनंदाचे व विश्रांतीचे स्थान होय.

काही सुशिक्षित एतद्देशियांच्या मदतीने व साहाय्याने बेथून यांनी मुलींसाठी विद्यालय काढले. विद्यासागर हे या शाळेचे पहिले सूत्रचालक सेक्रेटरी होते. जोपर्यंत बेथून जिवंत होते, तोपर्यंत या दोघां एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी अहर्निश परिश्रम करून या शाळेची जोपासना केली. परंतु पुढे बेथून इहलोक सोडून गेल्यावर या शाळेची संपूर्ण जबाबदारी विद्यासागर यांच्या अंगावर पडली. स्त्रीशिक्षणास विरोध करणाऱ्यांनी ही वेळ साधली व या संस्थेस मूठमाती देण्यासाठी ते तयार झाले. शाळा सुरक्षित राहावी म्हणून कोणी तरी मोठा वजनदार पुरस्कर्ता पाहिजे होता. सुदैवाने विद्यासागर यांना लेडी कॅनिंग यांची जोड मिळाली. दयाळू कॅनिंग म्हणून जो गव्हर्नर प्रसिद्ध आहे, त्याची ही पत्नी. लागेल ती मदत आपण या संस्थेस करू असे श्रीमती कॅनिंग यांनी अभिवचन दिले. बेथून व लेडी कॅनिंग या दोघांच्या नावाचा पुरस्कार करून या मोडणाऱ्या शाळेला त्यांनी उचलून धरले. कोसळणाऱ्या डोलाऱ्याला सांभाळले. पुढे-पुढे इतर अधिकाऱ्यांजवळ फार मतभेद होऊ लागला म्हणून या संस्थेचा अधिकारसंबंध त्यांनी सोडून दिला. प्रत्यक्ष संबंध सोडला तरी अप्रत्यक्षपणे संस्थेच्या समुन्नतीसाठी जेवढे करता येणे शक्य होते तेवढे विद्यासागर करीत असत. या विद्यालयाचे पुढे महाविद्यालयही सुरू करण्यात आले.

बेथूनची प्रेमळ स्मृती, या संस्थेवरील प्रेम या गोष्टी विद्यासागर यांच्या हृदयातून केव्हाही दूर झाल्या नाहीत. विद्यासागर इहलोक सोडून जाण्यापूर्वी एकच वर्ष पुढील

गोष्ट घडून आली. बेथून कॉलेजमध्ये आपल्या एका मित्राच्या सुनेला प्रवेश मिळावा म्हणून विद्यासागर या कॉलेजमध्ये गेले होते. शाळेतील विद्यार्थिनी, शिक्षकिणी वगैरे पाहून ईश्वरचंद्र प्रेमाचे भरते आले. आपला आनंद शब्दांनी कसा व्यक्त करावा, हे त्यांना समजेना. महाविद्यालयातील सर्व गुरुजनांना व छात्रगणांना त्यांनी एक चमचमीत मेजवानी दिली; मेजवानी चालू असताना कॉलेजच्या आवाराकडे विद्यासागर यांचे लक्ष होते. एकदम घळघळ अश्रुधारा त्यांच्या डोळ्यांतून बाहेर आल्या. संबंध दिवस ते गंभीर व विचारमग्न होते. त्यांच्याजवळ काय आणि कसे बोलावे, हे कोणासही समजेना. ईश्वरचंद्रांस का दुःख होते आहे, हे कसे विचारायचे याचाच सर्वास विचार पडला. शेवटी ईश्वरचंद्रांचे ज्यांनी बंगालीत चरित्र लिहिले आहे, ते चंडीदास विद्यासागर यांच्याकडे त्या दिवशी आले होते. आज विद्यासागर यांचा मुखचंद्रमा का काळवंडलेला दिसतो, हे त्यांना समजेना. बरे, हा प्रश्न तरी कसा विचारावा हे एक कोडेच होते. शेवटी सर्व धैर्य एकवटून त्या गृहस्थांनी विद्यासागर यांना त्यांच्या दुःखाचे, चिंतेचे, खिन्नतेचे कारण विचारले. 'आपणास आजपर्यंत खिन्न मी कधीच पाहिले नाही. कोणती चिंता आपणांस त्रास देते? कोणते दडपण आपल्या मनावर पडले आहे? कोणता विचार आपल्या चित्तास व्यग्र करीत आहे?' असे चंडीदास यांनी विचारले. जो जो विद्यासागरांकडे आज पाहात होता, त्या सर्वांना विद्यासागरांच्या दृष्टीत एक प्रकारचे अभिनव गांभीर्य दिसत होते. त्या दृष्टीत असे काही होते की जे दुसऱ्यांना मुके व शांत बसवीत होते. विचारलेल्या प्रश्नांना विद्यासागर यांनी अगदी अल्प उत्तर दिले, 'आज मी बेथून कॉलेजमध्ये गेलो होतो; तेथील सर्व व्यवस्था पाहून मला अत्यानंद झाला.' तरीसुद्धा आज विद्यासागर असे गंभीर व खिन्न का हे चंडीदासांना समजेना. तेव्हा ते पुन्हा म्हणाले, 'आनंद झाला, तर मग आज खिन्न का?' 'आपण रोजच्यासारखे का नाही? मनात व्यग्रता का आहे?' कंपितस्वराने, भावनांनी भरून येऊन विद्यासागर म्हणाले, 'आज किती विद्याथिनी शिक्षण घेत आहेत. कित्येक माजी विद्यार्थिनी आता शिक्षकिणी आहेत. परंतु ज्या थोर पुरुषाने आपले सर्वस्व या संस्थेच्या उभारणीसाठी दिले तो आज कोठे आहे? हे वैभव पाहायला, आपल्या संस्थेची ही भरभराट पाहायला तो या जगात नाही. बेथूनचे वर्णन मी काय व कसे करू? किती सरळ वृत्ती, अंगी गर्वाचा लेश नाही; पूर्ण निरहंकार झालेले. समाजातील आपला दर्जा व मोठेपणा पार विसरून त्यांनी लहान मुलींना आपल्या पाठीवर घेऊन नाचावे! लहान मुलींनी त्यांना घोडा करावे व त्यांच्यावर स्वार व्हावे.

लहान मुलींशी खेळतांना त्यांच्याबरोबर ज्याने क्षणाक्षणा उंच असल्यामुळे वाकावे! लहान मुलींस पालकांकडून शाळेत घेऊन यावे व पुन्हा त्यांना घरी पोहोचते करावे असे उदार महात्मे बेथून. ते आज हे सर्व पाहायला कोठ आहेत? ज्याच्या पाठीवर बसणाऱ्या मुली आज शिकवीत आहेत, त्यांस पाहण्यास बेथून जगले नाहीत – त्यांचे ते भाग्य नव्हते.' एवढेच बोलल्यावर त्यांना शोकावेग आवरेना. मूल हरवलेल्या आईप्रमाणे ते रडले. एकीकडे आपल्या धोतराने ते अश्रू पुसत होते. बेथून यांच्या संस्मरणाने ते खिन्न झाले होते. हा वृक्ष लावणारा फळ पाहायला राहिला नाही म्हणून त्यांना गहिवरून आले होते; पुष्कळ वेळ स्फुंदन झाल्यावर मोठ्या जड अंतःकरणाने एक सुस्कारा सोडून ते म्हणाले, 'केवढा मोठा थोर 'माणूस आपल्या देशात आला!'

बेथून कॉलेजच्याजवळ असलेल्या संबंधाशिवाय अन्य कित्येक मुलींच्या शाळांचे विद्यासागर हे संस्थापक होते. बरद्वान, मिदनापूर, हुगळी, नडिया या जिल्ह्यांत त्यांनी अनेक शाळा स्थापल्या. बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरांच्या तोंडी आश्वासनावर व आधारावर ईश्वरचंद्र विसंबून राहिले होते. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणे जे खर्चाचे बिल मंजूर होईल म्हणून यंग यांनी विद्यासागर यांना वचन दिले होते, ते बिल यंग यांनी मंजूर केले नाही. यंग आणि विद्यासागर यांच्यामध्ये आता कायमचा विरोध उत्पन्न झाला. लेफ्टनंट गव्हर्नर यांनी विद्यासागर यांना यंगवर फिर्याद करण्याचा सल्ला दिला; कारण लेफ्टनंटच्या शब्दावर विसंबून इतक्या शाळा विद्यासागर यांनी काढल्या होत्या. हा सर्व पैसा विद्यासागर यांनी कोठून मिळवावा? परंतु ईश्वरचंद्र कोर्ट-कचेऱ्या पाहणारे गृहस्थ नव्हते. या गोष्टीत गव्हर्नरांचा संबंध येतो; आणि गव्हर्नर हे विद्यासागरांचे मित्र, तेव्हा हा दिवाणी प्रसंग विद्यासागर यांनी टाळला.

ईश्वरचंद्र हे निराश होणारे नव्हते. हाती घेतलेले काम सोडून देणारे ते नव्हते. त्यांनी जवळजवळ ५० शाळा मुलींच्यासाठी स्थापन केल्या होत्या. या सर्व शाळांचा खर्च एकट्या विद्यासागरांवर आता पडला. ५०० रुपये पगाराच्या जागेचा त्यांनी राजीनामा दिला होता. विद्यासागर यांचे काही इंग्लिश मित्र त्यांना मदत करीत असत. सर सेसिल बेडन या गृहस्थांचे नाव तर विशेषकरून लक्षात ठेवणे जरूर आहे. दर महिन्याला ५५ रुपये विद्यासागरांच्या फंडास ते देत असत. १८६६ मध्ये प्रख्यात विदुषी व शिक्षणशास्त्रज्ञ मिस मेरी कार्पेटर कलकत्त्यास आली. राजा राममोहन राय यांनी या विदुषीस भारतातील स्त्रीवर्ग सुशिक्षित करण्यासाठी स्फूर्ती दिली होती. कलकत्त्याचे नागरिकांनी तिचे टोलेजंग स्वागत केले. बेथूनचे स्नेही जे विद्यासागर,

त्यांची गाठ घेण्यास कार्पेंटरबाई उत्सुक होत्या. बंगालमधील नारीसमाज त्यांना परिचयाचा करून घ्यायचा होता. बेथूनशाळेमध्ये विद्यासागर व कार्पेंटरबाई यांची भेट झाली. पुढे या दोघांमधील मैत्री अत्यंत उदात्त स्वरूपाची व दृढतम अशी झाली. ईश्वरचंद्र यांची प्रकृती नीट नसली, तरीसुद्धा कार्पेंटरबाईंनी 'कोठे एखादी नवीन-शाळा-उघडावयाची आहे, चला' असे सांगितले की ते जायला तयार व्हायचे. एकदा असे उत्तरपारा कन्याशाळेस भेट देण्यास विद्यासागर चालले होते. ज्या गाडीतून विद्यासागर जात होते ती गाडी एका कोपऱ्यावर उलटली. विद्यासागर खाली पडले व त्यांस जबर जखम झाली. त्यांस उजव्या बाजूस बरगड्यांच्या खाली बरेच लागले. रस्त्याच्या एका कोपऱ्यात बेसावध स्थितीत विद्यासागर पडले होते. त्यांच्या सभोवार पुष्कळ गर्दीसुद्धा जमली होती. परंतु त्यांच्यापैकी एकासही विद्यासागरांवर उपचार करण्याची बुद्धी झाली नाही. आपल्या देशात हल्ली ही स्थिती सर्वत्र दिसून येते. दुसऱ्याच्या मदतीस धावायला आपण नेहमी मागे असतो. आगगाडीत एकदा गलेलठ्ठ दुसऱ्याला मारू लागला तर इतर टकमक पाहतात किंवा हसतात. अंगचोरपणा, कर्तव्यविन्मुखता, स्वतःची कातडी सांभाळणे एवढेच आम्हाला हल्ली दिसते. संकटात जरा जीव घालणे आमच्या जिवावर येते. आमच्या अशा या राष्ट्रीय प्रवृत्तीचा धिक्कार असो! कार्पेंटरबाईंची गाडी विद्यासागर यांच्या गाडीमागून आली. ती खाली उतरली; तिने विद्यासागरांना रस्त्यातून बाजूला नेले. त्यांचे मस्तक मांडीवर घेऊन ती त्यांना वारा घालून सावध करू लागली. आईच्या मांडीवर असलेल्या मुलाप्रमाणे ईश्वरचंद्र होते. वात्सल्यरसास पूर आला होता. ईश्वरचंद्र हे सावध झाल्यावर त्यांस काय वाटले असेल? आपल्या आईजवळ आहोत असे आपणांस वाटले, असे त्यांनी सांगितले. ही गोष्ट मोठ्या प्रेमाने व आदर बुद्धीने विद्यासागर नेहमी सांगायचे, 'ज्या राष्ट्रात कार्पेंटरबाई जन्मली ते राष्ट्र धन्य होय; तो स्त्रीवर्गही धन्य होय' असे ते उद्‌गार काढीत.

ईश्वरचंद्र हे व्यवहारज्ञ होते. केवळ ध्येयानंदात निमग्न होऊन राहणारे कल्पनापंडित नव्हते. ध्येये मूर्त पाहण्यास ते प्रयत्न करीत. अवास्तव व अव्यवहार्य ते उराशी धरून बसत नसत. हिंदू समाजाची पुराणप्रियता त्यांस पूर्ण माहीत होती. कशा परिस्थितीत कोणत्या प्रकारे किती शिक्षण, स्त्री शिक्षण प्रसार पावेल हे त्यांना जाणता येत असे. त्यांची दृष्टी दूरवरचा विचार करणारी होती; त्यांची बुद्धी व्यवहारास धरून वागणारी असे. बंगालच्या वरिष्ठ व मध्यम वर्गातील काही स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांना सुशिक्षिणी करण्यासाठी एक 'नॉर्मल स्कूल' काढावे असे कार्पेंटरबाईंनी

सुचविले. विद्यासागर यांनी या गोष्टीस विरोध केला. विद्यासागरांचे या बाबतीत खालीलप्रमाणे मत होते व त्यांनी सर वुइल्यम ग्रे यांस कळविल होते.

'नॉर्मल स्कूलचा उद्देश हा आहे की, गरीब घराण्यातील विधवांना या शाळेत शिकवून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यास त्यांना खेड्यातून पाठविणे. परंतु खेड्यामध्ये शिक्षणप्रसार करण्याचे धैर्य या गरीब विधवांना होणार नाही. स्वतंत्रपणे शिक्षणाचा धंदा करण्याइतकी स्वतंत्रता स्त्रियांमध्ये नाही व लोक ती देणार नाहीत! श्रीमंत घराण्यातील व जास्त शिकलेल्या स्त्रियांना तुम्ही या नॉर्मल स्कूलमध्ये घेऊन थोडेसे शिक्षणशास्त्र शिकवून पाठवू म्हणाल तर ते अशक्य आहे. कारण या बड्या घराण्यातील जास्त शिकलेल्या स्त्रिया दूर खेड्यात प्राथमिक शिक्षणार्थ आयुष्य वाहण्यास तयार होणार नाहीत. त्यांना शहरातील आयुष्यक्रमाची चटक लागलेली असते. खेडेगावतील एकविध व नीरस वातावरण त्यांच्या मनास मोह पाडणार नाही; मनास रुचणार नाही. एकंदरीत ही नॉर्मलस्कूल सद्यःस्थितीत कुचकामी ठरतील असे मला वाटते.'

परंतु शेवटी हे नॉर्मल स्कूल स्थापन करण्यात आलेच. यात ५/६ लोक प्रथम आले. परंतु दीड वर्षाने हे नॉर्मल स्कूल बंद करावे लागले. परंतु ट्रेंड अशा स्त्रीशिक्षिकांची आजही फार आवश्यकता आहे. तो प्रश्न सुटला नाही.

अन्य पुष्कळ स्त्री शिक्षणप्रसार करणाऱ्या मंडळींबरोबरही विद्यासागर यांचा संबंध असे. विद्यासागरांचा संबंध म्हणजे केवळ शाब्दिक सहानुभूतीच नसे. तेथे खरा मनोभावेपूर्वक संबंध असे. प्रत्यक्ष चांगली मदत केल्याशिवाय ते स्वस्थ बसावयाचे नाहीत. जी विद्यार्थिनी प्रथम एम.ए. झाली त्या विद्यार्थिनीस त्यांनी शेक्सपिअर यांचे समग्र सुंदर ग्रंथ अर्पण केले.

या पुस्तकातील पहिल्या खंडावर खालील अर्पणपत्रिका होती.

श्रीमती-कुमारी चंद्रमुखी बसू, पहिली एम.ए. परीक्षा उत्तीर्ण झालेली बंगाली-कुमारी-यांस अर्पण

कल्याण व शुभेच्छु हितचिंतक
ईश्वरचंद्र शर्मा यांजकडून

अशा प्रकारे स्त्री-शिक्षणास जेवढी शारीरिक, मानसिक व आर्थिक मदत करता आली, तितकी या महाभागाने आमरण केली.

✦✦✦

'स्त्री-शिक्षणाव्यतिरिक्त अन्य शिक्षणविषयक कामगिरी'

विद्यासागर यांचे वडील ठाकुरदास बंद्योपाध्याय यांची एक मोठी इच्छा होती की, त्यांच्या स्वतःच्या गावी विद्यासागर यांनी पाठशाळा, संस्कृत पाठशाळा उघडावी. या शाळेत गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे. जमल्यास त्यांच्या पोटा-पाण्याचीही सोय करावी, असा त्यांचा मानस होता. विद्यासागर विद्यार्थीदशेत असतानाच त्यांस मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या पैशातून काही जमीन खरेदी करण्याचा विचार ठाकुरदास यांच्या मनात आला होता व थोडी जमीन त्यांनी खरेदी पण केली होती; काही जुने ग्रंथही विकत घेण्यात आले होते. परंतु पैशाच्या अभावी सर्व बेत जागच्या जागी राहतात 'उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथा।'

बापाची अपूर्ण इच्छा विद्यासागर पुरी करण्यास पुढे आले. ते संस्कृत महाविद्यालयाचे मुख्य असताना त्यांस बराच मोठा पगार मिळे. परंतु वडिलांची इच्छा त्याच स्वरूपात पूर्ण करणे त्यांना हितावह - तितके हितावह वाटले नाही. इंग्रजी शिक्षणाचे फायदे, त्यांनी पाहिले होते. नवीन विचारप्रवर्तक् हें शिक्षण आहे. रूढीचे गुलामांस, परंपरागत रूळलेल्या मार्गाने जाणाऱ्यांना, आंधळ्यांना हे शिक्षण लाभले तरी बरे होईल, निदान कोठे, कसे, का असे प्रश्न तरी हे लोक विचारू लागतील असे विद्यासागरांना वाटले. लोक विचारवातावरणात खेळू लागले हे सर्वात मुख्य काम. विचारांचे साम्राज्य सर्वात श्रेष्ठ होय. तलवारीपेक्षा विचारशक्तीस सरकार भिते. मनात असा विचार करून संस्कृत पाठशाळा उघडण्याऐवजी विद्यासागरांनी आपल्या मूळ गावी एक इंग्रजी शाळा उघडली. या शाळेसाठी महिना ३०० रुपये त्यांना खर्चावे लागत. ही शाळा अद्याप आहे. हल्ली तिचे नाव 'भगवती विद्यालय' असे आहे. विद्यागर यांच्या मातेचे नाव भगवती होते.

विद्यासागर जेथे-जेथे जात, तेथे-तेथे तंत्रस्थ, वजनदार व मातब्बर लोकांना ते शिक्षणप्रसार करण्यास सांगत. शिक्षण सवंग व स्वस्त व्हावे, शिक्षण घेण्यास गरीब-गरिबांना सोईचे व्हावे, यासाठी खेडोपाडी शाळांचे जाळे पसरणे कसे आवश्यक आहे, हे ते सर्वांना पटवून देत.

काही जमीनदार व श्रीमंत लोकांनी कलकत्त्यांत एक शाळा चालविली होती. आपल्या देशातील लोकांच्या नेहमीच्या मनोधैर्याप्रमाणे या शाळेतील चालकांत फाटाफूट होऊन निरनिराळ्या शाळा या एका शाळेच्या झाल्या. या दोन शाळांपैकी एका शाळेच्या चालकांनी ईश्वरचंद्रांना आपल्या गोटात आणले. ईश्वरचंद्र तदर्थ झटू लागले, खटपटी करू लागले. ज्या वस्तूस एकदा आपले म्हटले त्या वस्तूस थोर मनुष्य प्राणापेक्षाही जपत असतो.

ईश्वरचंद्र या संस्थेचे फार आस्थेने संगोपन करीत आहेत, हे पाहून त्या शाळेच्या चालक-मंडळींतील पुष्कळ बड्या लोकांना सर्वच जबाबदारी ईश्वरचंद्रांवर सोपविली. या शाळेचे ईश्वरचंद्र जीव झाले. ईश्वरचंद्र आणि विद्यालय यांचा जीव एक झाला. शाळा भरभराटत चालली. नामांकित शिक्षक शाळेस मिळाले. तेव्हा विद्यालयाचे महाविद्यायात ईश्वरचंद्रांनी रूपांतर केले. या महाविद्यालयात ईश्वरचंद्र हयात होते तोपर्यंत 'मेट्रापॉलिटन महाविद्यालय' असे नाव होते. त्यांच्या निधनानंतर त्याला 'विद्यासागर महाविद्यालय' हे नाव मिळाले. महाविद्यालयासाठी विद्यासागर अविश्रांत झगडले. मोठमोठे प्रोफेसर त्यांनी मिळविले. त्यांना गुणांची पारख होती. हंस जसा पाण्यातून दूध ग्रहण करतो, त्याप्रमाणे वेचक माणसे ते घेत. अंबिकाचरण मुजुमदार 'The grand old man of Faridabad' 'फरीदपूर येथील वृद्ध मुनी' जे लखनौच्या कॉंग्रेसला १९१६ मध्ये अध्यक्ष होते. ते या मेट्रापॉलिटन महाविद्यालयात आचार्य होते. सर रुद्रनाथ बॅनर्जी हेसुद्धा या महाविद्यालयास मिळाले. आय.सी.एस. होऊन आल्यावर सुरेंद्रनाथांना सरकारने मॅजिस्ट्रेटची जागा दिली होती. त्या जागेवर असता काही क्षुल्लक कारणांवरून सरकारने सुरेंद्रनाथांना काढून टाकले. सनदी नोकरीत सुरेंद्रांचा प्रवेश गोऱ्यांना सहन झाला नाही. ह्यूमसाहेबांनी एका युरोपियनाचा असाच किंबहुना जरा मोठ्या स्वरूपाचा गुन्हा सरकारने कसा सारवासारवीने नाहीसा केला व काळ्या आदमीस तो विद्वान व निरपराधी असता कस कस्पटासमान लेखले हे त्या वेळच्या 'हिंदू' पत्राच्या अंकात दाखविले होते.

सुरेंद्रनाथांना त्या वेळी नोकरी नव्हती. वकिली किंवा बॅरिस्टरी करण्याची कलकत्त्यास सोय नव्हती. परंतु अंधारातून प्रकाश येतो, मरणातून जीवन येते, अभिनव

व उदात्त जीवन लाभते, तसेच सुरेंद्रनाथांचे झाले. अन्यत्र सांगितले आहे की मद्यपानप्रतिबंधक चळवळ चालली असता एक प्रचंड जाहीर सभा कलकत्ता शहरात भरली होती. त्या सभेत सुरेंद्रनाथ यांना 'भाषण करा' असा आग्रह करण्यात आला. सुरेंद्रनाथांचे हे पहिलेच भाषण; अद्याप सार्वजनिक सभांमध्ये ते बोलले नव्हते; परंतु आता ते उभे राहिले; बोलले. सभा चित्राप्रमाणे तटस्थ झाली. दुसरे दिवशी त्यांचे मित्र सुरेंद्रनाथांना म्हणाले, 'आपण कलकत्त्यातील एक उत्कृष्ट व्याख्याते असे सर्व जण बोलू लागले आहेत.' सुरेंद्रनाथांना समाधान झाले.

विद्यासागर या सभेत हजर होते. त्यांनी सुरेंद्रनाथांना आपल्या महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापक होण्याबद्दल विनंती केली. पगार फार नव्हता. २०० रुपये होता. परंतु तरुण विद्यार्थी-गणांत मिसळण्याची सोन्याची संधी आली. तरुणांची मने काबीज करण्याची वेळ आली. ही संधी गमावू नये असा सुरेंद्रनाथांनी विचार केला. त्यांनी ती जागा घेतली. तरुणांच्या मनात त्यांनी देशभक्ती उत्पन्न केली. विद्यार्थीसंघ स्थापन करून त्या संघासमोर मॅझिनीसारख्या राष्ट्रभक्तांची चरित्रे त्यांनी वर्णिली; नवीन संदेश त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांस ते प्रिय झाले.

असे चालले असता ब्राह्मो समाजाच्या चालकांमध्ये काही फाटाफूट झाली. शिवनाथशास्त्री वगैरे लोक केशवचंद्रांपासून फुटून निघाले. त्यांनी सद्धर्मब्राह्मोसमाज स्थापन केला. त्यांनी नवीन 'सिटी कॉलेज' काढले. या सिटी कॉलेजमध्ये आम्हाला येऊन मिळा असे सुरेंद्रांना त्या महाविद्यालयाच्या चालकांनी विनविले. ते जास्त पगार देणार होते. आपल्याला शिक्षण द्यायचे मग जर कौटुंबिक स्थिती सुधारत असेल तर तिकडे का जाऊ नये, असा विचार करून सुरेंद्र तिकडे जाण्यास कबूल झाले. त्यांनी विद्यासागर यांना सर्व मजकूर विदित केला. विद्यासागर म्हणाले, 'पैशाचाच प्रश्न असेल तर आपणास येथे तशी ददात मी भासू देणार नाही. मी आपल्याला तिकडे देणार तेवढा पगार देतो.' सुरेंद्रनाथ 'येतो' असे सांगून चुकले होते. कारण विद्यासागर परवानगी देतील असे त्यांना वाटले. परंतु हा सगळा अनपेक्षित प्रकार घडून आला. शेवटी ते विद्यासागरांना म्हणाले, 'हे पाहा, मी तुमच्या महाविद्यालयात रोज एक तास शिकविण्यास येत जाईन; परंतु आता तिकडे जाण्यास मला उदार मनाने परवानगी द्या.' विद्यासागर हे दुसऱ्याच्या अडचणी जाणणारे, ते स्वतःच्या अडचणीसाठी दुसऱ्याला दुःखात किंवा संकटात लोटणारे नव्हते. त्यांनी सुरेंद्रनाथांना मोठ्या आनंदाने जायला परवानगी दिली.

विद्यासागर यांनी आपला अलोट पुस्तकसंग्रह आपल्या विद्यालयास महाविद्यालयास अर्पण केला. त्यांचा ग्रंथसंग्रह किती बिनमोल असेल याची आपणास कल्पना येणार नाही. विद्यासागर हे विद्येचे भोक्ते, ग्रंथाचे त्यांना वेड, उत्तम प्रकारची बांधलेली पुस्तके त्यांना फार आवडत. ज्यांची सोनेरी बांधणी आहे, अशा ग्रंथराजांनी त्यांचा ग्रंथसंग्रह नटला होता. ते स्वतःची काळजी घेत नसत, परंतु पुस्तकांची घेत. कोणतेही एखादे सुंदर व विद्वत्तापूर्ण, शोधपूर्ण पुस्तक परदेशात प्रसिद्ध झाले ते विद्यासागर यांनी आणलेच. एकदा त्यांच्या एका मित्राने त्यांना विचारले, 'विद्यासागर, आपल्या अंगावरील कपडे अगरी भिकार, परंतु या पुस्तकांना मात्र कसे सोनेरी पोशाखाने तुम्ही नटविले आहे.' विद्यासागर म्हणाले, 'ही तुमच्या अंगावर शालजोडी मोठी भरजरी आहे. स्वतःचे शरीर भूषवावे असे जसे तुम्हाला वाटते, तसे या पुस्तकांना सजवावे असे मला वाटते.' हरि नारायण आपटे आपले प्रख्यात कादंबरीकार यांची अशीच गोष्ट सांगतात. ते एक दिवस पुस्तकांना सुंदर कव्हरे घालीत बसले होते. 'काय हो हरिभाऊ, किती त्या पुस्तकांना जपता? पुस्तके ती काय, त्यास कव्हरे काय घालीत बसलात?' असे कोणी तरी सहज म्हटले. हरिभाऊ म्हणाले, 'अहो, ही पुस्तके मला मुलांप्रमाणे वाटतात. आई जशी मुलीस निरनिराळे परकर आपणहून नेसवते, तसेच मला करावेसे वाटते.' विद्यासागर यांनी जर एकच पुस्तक निरनिराळ्या बांधणीचे, छपाईचे पाहिले की त्यांच्या तीन प्रती घरी झाल्या असल्या, तरी ते विकत घ्यायचे.

त्यांच्या घरी असलेल्या या अमोल ग्रंथसंग्रहाचा पुष्कळांना फायदा होई. परंतु पुढे पुढे ते पुस्तके कोणास घरी देत नसत. कारण एकदा काय झाले, एका बड्या महाविद्यालयातील एक प्रोफेसर एक पुस्तक दुसरीकडे नव्हते म्हणून विद्यासागर यांच्याकडे आले. विद्यासागर यांच्याकडे ते पुस्तक होते. साहेबमजकूर हे पुस्तक घेऊन गेले. पुस्तकांचे संदर्भकार्य संपले; परंतु प्रोफेसरसाहेब पुस्तक परत करण्यास विसरले. त्यांना पुस्तकांची थोडीच आस्था होती! थोडे काम झाले, झाले. पुढे काही दिवसांनी विद्यासागर यांना त्या पुस्तकाची जरूर लागली. त्यांनी प्रोफेसरसाहेबांना ग्रंथ पाठवून देण्यास चिठ्ठी पाठविली. परंतु 'पुस्तक हरवले, दिलगीर आहे; क्षमा असावी.' असे या प्रोफेसरांनी उत्तर दिले. ईश्वरचंद्रांना या हयगयीचा संताप आला. त्यांनी ते पुस्तक मिळते का म्हणून जर्मनीत चौकशी केली: कारण ते पुस्तक तेथे छापलेले होते. परंतु ते पुस्तक केव्हाच खपून गेले होते. त्याची प्रत उपलब्ध नव्हती. झाले,

विद्यासागरांना याची कायमची ठेच लागली. पुढे काही दिवसांनी एक गंमत झालीर. 'आपणास जे पुस्तक पाहिजे, ते मजकडे आहे' असे एका जुन्या पुस्तकवाल्याने विद्यासागरांना कळविले. विद्यासागर ताबडतोब त्या गृहस्थाकडे गेले व 'आपल्याला हे पुस्तक कोणाकडून मिळाले' असा त्यांनी प्रश्न केला. पुस्तकविक्रेत्याने त्या गृहस्थाचे सर्व नाव-गाव सांगितले. ज्या गृहस्थाने हे पुस्तक विद्यासागरांकडून नेले होते, त्याच गृहस्थाने आपल्या इतर ग्रंथांबरोबर हेही पुस्तक विकून टाकले होते. 'किं मिष्टमन्नं खरसूकराणां' असे म्हणणे जरी कठोर असले तरी वरील प्रसंगी योग्य नाही का? अशा प्रकारचे विद्येचे भोक्ते, आचार्य असावे हे परम दुर्भाग्य होय! आणि अशा आचार्य पदवीची प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये विद्यासागरांना जागा मिळत नाही !!

असो. तर अशा विद्याभक्त ईश्वरचंद्रांनी आपला सुंदर ग्रंथसंग्रह आपल्या आवडत्या महाविद्यालयास देऊन टाकला. सर्वतोपरी महाविद्यालय वाढवून पुढे ईश्वरचंद्रांनी ते इतरांच्या हवाली केले. त्याचे ते जिवंत स्मारक अद्यापही कलकत्त्यास उभे आहे.

ईश्वरचंद्र यांनी इतर ठिकाणीही शाळा स्थापन केल्या. पश्चिम बंगालमध्य चकधिया येथे एक हायस्कूल त्यांनीच चालविले. तेथे एक मोफत दवाखानाही सुरू केला. सर्व श्रीमंत जमीनदारांना वगैरे नेहमी ते शिक्षणाचा प्रसार करावयास सांगत. शिक्षणप्रसारासारखे पवित्र कार्य नाही; शिक्षणाने संकुचित मने विशाल होतात. हृदय मोठे होते. मती विवेकशालिनी होते. वृथाभिमान, खोटी स्पर्धा, असूया, परतिरस्कार यांना हद्दपारी मिळते. दुसऱ्यांच्या विचारांबद्दल, आचाराबद्दल आपण सहानुभूती दाखवू लागतो; यामुळे समाजातील निरनिराळ्या अंगांत सलोखा व प्रेम उत्पन्न होते. अज्ञानासारखा शत्रू नाही व ज्ञानासारखा मित्र नाही. हा ज्ञानप्रकाश अंधारातील लोकांकडे आणण्याठी विद्यासागर स्वतः आमरण झगडले व दुसऱ्यांना झगडण्यास त्यांनी स्फूर्ती दिली.

✦✦✦

विधवा-विवाहाची सुधारणा

१९व्या शतकातील बहुतेक सर्व चळवळींशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या विद्यासागर यांचा संबंध आला होता. अशी एकही चळवळ नव्हती, जेथे विद्यासागर हे नाहीत. असे जरी असले, तथापि विद्यासागर यांचे नाव एका विविक्षित सुधारणेशी कायमचे संलग्न झाले आहे. विधवापुनर्विवाह आणि एकपत्नी या दोन सुधारणांशी विद्यासागर यांच नाव चिरंतन जोडले जाईल. त्यांनी आपले प्रयत्न या बाबतीत पराकाष्ठेस नेले. त्यांचा दृढ निश्चय, त्यांचे धैर्य, त्यांची लोकोत्तर विद्वत्ता सर्व गोष्टी या चळवळीत दिसून आल्या.

हिंदू समाजात, त्यातल्या त्यात ब्राह्मण वर्णात अनेक विधवांचे करुणास्पद जीवन पाहून, ईश्वरचंद्र लहान होते त्या वेळेपासूनच दुःखीकष्टी होत असत. त्यांचे करुणहृदय दयेने भरून येई. हे कौर्य, हा अन्याय पाहून त्यांच्या सरल बालहृदयास चीड व संताप येई. विषयविन्मुखता, भोगपराङ्मुखता, ब्रह्मचर्य या गोष्टी केव्हाही वंद्य व सेव्यच होत यात तिलप्राय संशय नाही. परंतु व्यक्तीने स्वतःच्या मनाने ज्या वेळेस स्वतःवर या लादलेल्या असतात, त्या वेळेस त्या हितपरिणामी होतात. बायकांच्या बाबतीत ही विषयविरक्ती उत्पन्न करणे आणि पुरुषांना मात्र अनेक स्त्रिया करू देणे हा एकंदरीत अन्याय होय, असे कोणीही प्रांजलवृत्तीचा माणूस कबूल करील. विद्यासागर लहान असताना त्यांचे एक 'वाचस्पती' नावाचे गुरुजी होते. हे गुरुजी ८० वर्षांचे वृद्ध झाले होते. विद्यासागर हे सर्व गुरुजनांचे प्रिय शिष्य होते. या वाचस्पतींना पुन्हा लग्न करण्याची वासना झाली. या गुरुजींनी आपला विचार कसा काय आहे याविषयी विद्यासागर यांचे मत विचारले. त्या वेळेस ईश्वरचंद्र यांचे वय फक्त १३ वर्षांचे होते. या हास्यास्पद विचाराने ईश्वरचंद्रांना अनावर संताप आला. 'आपण जर अशा वृद्धापकाळी विवाह करून एका अनाथ, गरीब मुलीवर लवकरच वैधव्याचा

महाअनर्थ आणणार असाल तर आपल्या जवळचा माझा सर्व संबंध मी सोडून देईन' असे बाणेदार उत्तर ईश्वरंचद्रांनी दिले. परंतु आमचा समाज पाहा कसा विचित्र ! ऐंशी वर्षांचा जख्खड म्हातारा लग्नास उभा राहावयास समजा तयार झाला, तर त्याला मुलगी तरी कोण देणार? असा मांगहृदयी, कसाबकरणीचा पिता असेल का? हो, असे अगतिक पिते असतात. या वाचस्पतीला एक सुंदर तरुण बायको मिळाली. विद्यासागर यांनी या वाचस्पतीकडे जाण्याचे बंद केले. परंतु वाचस्पती यांना तर विद्यासागर फार आवडे. नेहमी ईश्वरचंद्रांना स्वतःबरोबर आपल्या घरी आणता येईल तर पाहावे म्हणून वाचस्पती जंग-जंग पछाडीत. परंतु छे:! पुढे काही दिवसांनी एकदा या वाचस्पतींना ईश्वरचद्रांचे मन वळविण्यात यश आले. घरी आल्यावर ईश्वरचंद्र या वाचस्पती यांचे बराच वेळ बोलणे चालणे झाले. शेवटी ईश्वरचंद्र जायला निघाले. परंतु स्वतःची बायको ईश्वरचंद्राने एकदा तरी पाहावी अशी त्या वाचस्पतींची इच्छा दिसली. त्याचबरोबर ईश्वरचंद्र अंतःपुरात गेला. दूर अंतरावर उभे राहून त्याने तिला प्रणिपात केला व पुन्हा तो माघारी जायला निघाला. वाचस्पती यांनी त्याचा हात पकडला आणि आपल्या एका मोलकरणीला आपल्या बायकोच्या मुखावरील पडदा दूर करण्यास सांगितले. विद्यासागर याने त्या मुखमंडलाकडे पहिले मात्र आणि त्यास रडू कोसळले. या मुलीच्या भावी आयुष्यातील दुःखद प्रसंगाचे चित्र ईश्वरचंद्रांच्या समोर उभे राहिले. हे भूसर चित्र त्यास स्वस्थ बसून देईना. ते रडले-मुलासारखे रडले. रागाने लाल झालेले हे ईश्वरचंद्र त्या घराबाहेर पडले व म्हणाले, 'मी या घरात पाण्याचा एक थेंबही कधी पिणार नाही.'

लहानपणी विधवांच्या स्थितीबद्दल अशी अनुकंपा दाखविणारा बाल ईश्वर, पुढे तीच वृत्ती बाळगून होता. विद्यासागर यांच्या पूर्वीही विधवाविवाहाबद्दल खटपटी झाल्या होत्या. परंतु विद्यासागर यांनी जे धैर्य, जो उत्साह, जी कळकळ दाखविली, ती मात्र आजपर्यंत अभूतपूर्व अशी होती. ते पिच्छा पुरवायचे, सारखे ध्येयाच्या मागे असायचे. अर्धवट कार्य सोडणे हा दाक्षिणात्यांचा स्वभाव त्यांना परिचित नव्हता.

ब्राह्मणपंथीय लोक अनेक कारणांनी हिंदुसमाजापासून निराळे मानले गेले. विद्यासागर हे ब्राह्मो नव्हते. हिंदुसमाजातच राहून त्यांना जे काम करायचे होते, ते त्यांनी केले. यामुळे इतर सुधारणा करू पाहणाऱ्यांना जे एक प्रकारचे संकुचितत्व प्राप्त होई ते यांना नव्हते. हे आपल्यामधीलच आहेत, असे समाजाला वाटे.

हिंदू जातीवर जुन्या शास्त्रीमंडळींचा विलक्षण ताबा आहे, हे ईश्वरचंद्र यांना माहीत होते. तेव्हा या शास्त्रीमंडळींस आधी आपण कुंठित केले पाहिजे असा विद्यासागर यांनी विचार केला. जुने हिंदुधर्मशास्त्रज्ञ विधवाविवाह मानतात की नाही? विधवाविवाह सशास्त्र आहे का अशास्त्र आहे, हे त्यांना एकदा नीट शोधून काढावयाचे होते.

त्या वेळेस ईश्वचंद्र संस्कृत महाविद्यालयाचे सर्व कामकाज करून नंतर आपला उरलेला वेळ स्मृतीचे अध्ययन करण्यात दवडीत. असे सांगतात की, तिसरे प्रहरापासून तो सर्व रात्रभर, दुसरा दिवस उजाडेपर्यंत ते संस्कृत महाविद्यालयातील जुन्या ग्रंथांच्या राशीत वाचीत बसलेले असायचे. सायंकाळ झाली की त्यांचा एक मित्र त्यांना अल्पाहार करण्यास काहीतरी आणून देत असे; किंवा कधीकधी ते स्वतः त्या मित्राच्या घरी जाऊन तेथे भोजन करून पुनः आपल्या ग्रंथालयात - महाविद्यालयात येत असत. महाविद्यालयातील ग्रंथालय हेच त्यांचे घर झाले होते. त्यांना जुन्या धर्मशास्त्राचे आलोकन करून त्यात कोठे पुनर्विवाहास संमती आहे की नाही हे पाहावयाचे होते, तेच एक वेड त्यांना लागले होते. त्यांना अन्य काही सुचेना. जसजसे जास्त दिवस जात चालले तसतसे ते अधीर होऊ लागले.

एक दिवस मोठ्या कष्टी अंतःकरणाने, जड मनाने मंद-मंद पावले टाकीत ते आपल्या घराकडे येत होते; पुनर्विवाहासंबंधी असलेल्या काही श्लोकांचा त्यांना स्पष्ट अर्थ लागत नव्हता; त्या वचनांची नीट संगती त्यांना लावता येत नव्हती. परंतु एकाएकी त्या श्लोकाची त्या वचनांची सगती कशी लावता येईल याबद्दल त्यांच्या मनात प्रकाश पडला. ते घरी जात होते; परंतु पुन्हा परतले, महाविद्यालयात आले. ते श्लोक घेऊन त्यांच्यावर टीका लिहिली.

ही टीका लिहून संपली त्या वेळेस सूर्याचे सोनेरी किरण ग्रंथालयाच्या वातायनातून आता डोकावू लागले होते. विद्यासागराचे हृदय आनंदाने भरून आले. आपणास जे पाहिजे होते ते मिळाले, जे शोधीत होतो ते लाभले असे पाहून त्यांचा सर्व श्रमांचा परिहार झाल्यासारखे वाटले. त्यांचे विचार सूर्यकिरणांप्रमाणे सुंदर होते; त्याप्रमाणे त्यांच्या हृदयात आनंद होता; आशा खेळू लागली, दुःख दूर झाले, कष्ट कोठेच निघून गेले. आनंदाच्या भरात 'शेवटी मला मिळाले, शेवटी मला सापडले' असे ते कितीदा म्हणाले व टाळ्या पिटून नाचले. सत्त्वासाठी एखाद्या ध्येयासाठी कष्ट करणाऱ्यास त्या ध्येयप्राप्तीनंतर जो आनंद होतो, त्याची खरी गोडी तेच जाणोत.

इतरांना त्या आनंदाची कल्पना येणे शक्य नाही. ईश्वरचंद्रांचे मित्र या सुमारास त्यांच्या खोलीत जमा झाले होते. एवढा आनंद ईश्वरचंद्रांना का झाला, ईश्वरचंद्रांना काय मिळाले हे त्यांच्या लक्षात येईना. 'काय, सापडले तरी काय आपणाला' असे सकौतुक त्या मित्रमंडळींनी त्यांना विचारले, सर्व हकिकत विद्यासागरांनी मित्रांना सांगितली. विद्यासागरांच्या श्रमांचे सार्थक झाले, असे त्यांना वाटले.

या टीकेच्या समर्थनार्थ, परंपरागत मार्गाने चालणारे, रूढीचे गुलाम अशा लोकांजवळ त्यांना कसेकसे वादविवाद करावे लागले हे येथे सांगत बसण्यात अर्थ नाही. एवढे सांगितले म्हणजे पुरे की त्यांचे मुद्दे पूर्णपणे खात्री करून देणारे होते. त्यांनी केलेले पुनर्विवाहसमर्थन सशास्त्र होते. नीट शांतपणे पाहणाऱ्यास त्यांनी तसे पटवूनही दिले, पुनर्विवाहास सशास्त्र संमती मिळावी म्हणून त्यांनी दोन पुस्तके लिहिली आणि त्यात जेवढा म्हणून पुरावा आणावयास पाहिजे, तेवढा त्यांनी आणला व प्रतिपक्षाची पुरेपूर खात्री करून दिली. जुन्या पंडितांनी या श्लोकांचा निराळ्या तऱ्हेने अर्थ लावण्याची खटपट केली. परंतु ती वायफळ, टाकाऊ व परित्याज्य होती, हे विद्यासागर यांनी पूर्वापार संबंधदर्शनाने सर्वांस निर्मल मतीस पटवून दिले, ते श्लोक असे–

नष्टे मृते प्रव्रजिते, क्लीबेच पतिते पतौ
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ।।

'पती नाहीसा झाला असता, मरण पावला असता, व्राजक (संन्यासी) झाला असता, नपुंसक असता, किंवा समाजापासून भ्रष्ट झाला असता या पाचही आपत्तीत स्त्रियांनी दुसरा भ्रतार करावा अशी शास्त्राची सांगी आहे.'

तिस्त्रः कोट्यार्धमकोटीच यानि लोमानि मानवे
तावत्कालं वसेत्सर्ग भर्तारं यानुगछति ।।

'पतिमरणानंतरही जी साध्वी ब्रह्मचारीव्रताने राहते, तिला इतर ब्रह्मचारी पुरुषांप्रमाणे स्वर्गप्राप्ती होईल. जी साध्वी पतीबरोबर सहगमन करते, ती शरीरावर असणाऱ्या सर्व केसांगणिक वर्षे स्वर्गसुख अनुभवील.'

'कलौ पराशरस्मृतिः' असे वचन आहे. कलियुगात पराशराची स्मृती प्रमुख मानिली जावी असा या वचनाचा स्वच्छ अर्थ आहे. या पराशर स्मृतीतच वरील दोन श्लोक आहेत. हे श्लोक ज्या मुलीचे लग्न जमले आहे, त्या मुलीस उद्देशून आहेत; एखाद्या मुलीचे लग्न जमले आणि मग ज्याच्याबरोबर लग्न व्हायचे ते तो परिणेय वर जर लग्न होण्यापूर्वी नष्ट झाला, मृत झाला वगैरे तर त्या मुलीचे लग्न अन्याबरोबर

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

करावयास हरकत नाही असा या श्लोकांचा अर्थ आहे, असे जुने पंडित म्हणू लागले. प्रत्यक्ष लग्न झालेल्या स्त्रीस हे श्लोक सांगितलेले नाहीत, असा त्यांनी बुद्धिवाद केला. परंतु या बुद्धिवादाचे तेव्हाच तुकडे उडविणारी विद्यासागर यांची बुद्धी होती. त्यांनी या सर्व गोष्टींचा पूर्वीच विचार केला होता.

विद्यासागर म्हणाले की पहिला श्लोक अशा अर्थाने जर घेतला तर खालील श्लोक नीट सुसंबद्ध दिसत नाही. खालील श्लोकांत पतिनिधनोत्तर ब्रह्मचारीव्रताने राहणारी स्त्री आणि सहगमन करणारी स्त्री यांची प्रशंसा केलेली आहे. अर्थात तो श्लोक अद्याप अविवाहित अशा मुलींना उद्देशून खास नाही. मग हा श्लोक जर पतिमरणानंतर स्त्रियांनी काय करावे एतद्विषयी स्वच्छ दिसतो, तर त्याच्या वरील श्लोक मात्र अद्याप लग्न न झालेल्या मुलीस उद्देशून आहे, असे म्हणजे अप्रयोजक दिसते. ज्या अर्थी दोन्ही श्लोक एके ठिकाणी आहेत, त्या अर्थी पतिमरणानंतर उत्तरोत्तर 'उत्तम' असे मार्गच येथे सांगितलेले असले पाहिजेत. कनिष्ठ मार्ग पुनर्विवाह करावा; त्याच्याहून श्रेष्ठतर मार्ग म्हणजे ब्रह्मचारीव्रतस्थिती आणि त्याहून उत्कृष्ट मार्ग म्हटला म्हणजे सहगमन करणे. या श्रेष्ठ–कनिष्ठपणाबद्दल मुळीच भेद नाही. सहगमन करण्यास पतिनिष्ठा फारच सोज्ज्वळ असावी लागेल. ती नारी खरोखर त्रिभुवनवंद्य. आहे. ब्रह्मचारीव्रताने राहून व्रते–वैकल्ये–उपोषणे करून मन निर्मळ व पवित्र करू पाहणारी नारी ही धन्य होय. विषयातून, वासनांच्या गर्तेतून मन काढून घेऊन, बाळकृष्णचरणी लावणाऱ्या ललना कोणास वंदनीय वाटणार नाहीत! ज्या स्त्रीस अशा प्रकारचे खडतर वैराग्य नाही, तिने पुनर्विवाहही करावा, असाच एकंदर पूर्वापार संबंध असला पाहिजे म्हणजे आपल्याला या श्लोकद्वयाचा अर्थ लावावा लागेल, याबद्दल विद्यासागरांनी सर्वांची खात्री पटविली. निदान त्यांचे स्वतःचे समाधान तरी झाले.

विद्वान व थोर टीकाकार माधवाचार्य यांनी अशाच प्रकारची उपपत्ती दिली आहे. हेच श्लोक यत्किंचितही फरक न होता नारदसंहितेतही आढळतात. तेथे तर पुनर्विवाह युक्त आहे असे सांगून नंतर वर सांगितलेल्या पाच आपत्तींसंबंधी काही नियमही दिले आहेत. उदाहरणार्थ, जर पती हरवला असला, तर ब्राह्मण स्त्रीने ८ वर्षे वाट पाहावी, पतिमार्गप्रतीक्षा करावी; त्या स्त्रीस मूलबाळ नसेल तर तिने ४ वर्षेच वाट पाहावी. अशा प्रकारच्या नारदसंहितेतील श्लोकांवरून तर सर्वच असंदिग्धता मावळते. पंच आपत्तीत सापडलेल्या स्त्रीला पुनर्विवाह आहे आणि तो पुन्हा पूर्वी लग्न झालेल्या स्त्रीसच आहे कारण लग्न झाल्याशिवाय मुलेबाळे कशी व्हावी? वरील

नारदसंहितेत तर 'नष्ट' या पदाचा स्पष्टार्थ करताना ८ वर्षे, मूल नसेल तर ४ वर्षे स्त्रीने पतीच्या येण्याची वाट पाहावी असे स्वच्छ सांगितले आहे. एकंदरीत काय तर जुनी शास्त्रीमंडळी सांगतात त्याप्रमाणे या वचनांचा अर्थ लागत नाही. बृहन्नारदीय व आदित्यपुराण यात पुनर्विवाह स्पष्ट निषेधिला आहे, यात शंका नाही. परंतु अशा मतभेदप्रकरणी 'पुराणविरोधे स्मृतिप्रामाण्यं, स्मृतिविरोधे श्रुतिप्रामाण्यं' असा न्याय आहे. पराशरसंहिता हा स्मृतिग्रंथ आहे, बृहन्नारदीय आणि आदित्यपुराण हे ग्रंथ पुराणात मोडतात. यास्तव पराशरसंहितेत प्राधान्य प्राप्त होते.

न्यायतः, तर्कतः, सर्व जुन्या शास्त्रीमंडळींची तोंडे तर विद्यासागर यांनी बंद पाडली. परंतु ज्यांचा भर बुद्धियुक्त विवेचनावर नाही, तर्कप्राप्त व न्यायप्राप्त सिद्धांतावर नाही, 'तर शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायाने जे वैयक्तिक निंदा, क्रोधयुक्त मर्म-वचनप्रहार हीच ज्यांची शस्त्रे आहेत, हाच ज्यांचा आधार त्या लोकांची मने संतुष्ट करावयाची कशी? त्या ज्ञानलवदुर्विदग्धांस किंवा ज्ञानभरगर्वितांस शांत कसे करावयाचे हा प्रश्न आहेच. भल्याने होता होईतो त्यांच्या मार्गात न जाणे हेच श्रेयस्कर.

विधवापुनर्विवाहावर विद्यासागर यांनी जे दोन ग्रंथ लिहिले, त्यामुळे सर्व बंगाली समाजात फार खळबळ उडाली. हळूहळू सुधारणा होत असते; हळूहळू अंधकारपटल दूर होऊन दिशा उजळू लागतात. विद्यासागर यांना कलकत्त्यातील काही वजनदार पुरुषांचा आधार मिळू लागला ते विद्यासागरांच्या विचारसरणीस उचलून धरू लागले.

आपल्या बालविधवा कन्यकांचे पुनर्विवाह करण्यास पुष्कळ आई-बाप तयार होऊ लागले. पुनर्विवाहास उचलून धरणाऱ्यांनी, पुनर्विवाहाच्या कैवाऱ्यांनी या कन्यकांना योग्य पती मिळवून देण्याची खटपट करणे आवश्यक होते. या गोष्टीच्या आधी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट करावयास पाहिजे होती ती म्हणजे अशा पुनर्विवाहित स्त्रीपासून जी संतती होईल ती कायदेशीर व सशास्त्र मानली जावी. असा कायदा करणे म्हणजे जुन्या कायद्यात फरक करणे. २५००० लोकांच्या सहीचा अर्ज विद्यासागर यांनी सरकारकडे पाठविला. 'विधवाविवाह कायदेशीर समजला जावा व एतदर्थ सरकारने कायदा करावा' असे यात मागणे केले होते. या सह्या मिळविण्यास विद्यासागर यांना किती कष्ट व दगदग पडली असेल याची आपल्याला कल्पना येणार नाही. कारण जुन्या परंपरेने रूढीस अनुसरून वागणारे जेथे शेकडो ९९ टक्के लोक तेथे २५००० सह्या मिळविणे फार सुदुर्घट काम होते; परंतु प्रयत्नांस काय अलभ्य आहे?

प्रयत्नांती परमेश्वर मिळतो, प्रयत्नाने नराचा नारायण होतो, प्रयत्नांने सर्व साध्य होते. श्रद्धा व निष्ठा ठेवून प्रयत्न करा की यशसिद्धी झालीच समजा. बरद्वानचे महाराज यांनी जेव्हा या पुनर्विवाहास संमती दिली आणि विद्यासागर यांचे प्रयत्न प्रशंसिले, तेव्हा तर विद्यासागर यांना पराकाष्ठेचा आनंद झाला. आनंदास आकाश ठेंगणे झाले. विद्यासागर यांनी ऑनरेबल जे.पी.ग्रँट यांना एक पत्र लिहिले व त्या पत्रात त्यांनी आपला आनंद व्यक्त केला आहे.

शेवटी विधवापुनर्विवाह कलम मंजूर झाले. सरकारने त्यासाठी नवीन कायदा केला. ज्या वेळेस हे बील पास झाले, त्या वेळेस जी भाषणे झाली ती फार मनोरंजक आहेत. ती माहिती मोठी मौजेची आहे. जे.पी.ग्रँट यांनी हे बील सर्व सभासदांपुढे मांडले. त्यांचे भाषण फार सुंदर व समर्पक होते. विद्यासागरांच्या श्रमांचे त्यांनी गोडवे गायिले व असे श्रम फुकट जाऊ देणे म्हणजे एक प्रकारचे पातकच असे ते म्हणाले.

रघुनंदन जो बंगाली लोकांना धर्मशास्त्र सांगणारा, त्याच्या पूर्वीच्या व्यवस्थेचे स्वरूप सांगून हा कायदा पास होणे किती जरूर आहे याचे ग्रँटसाहेबांनी विवेचन केले. ते म्हणतात, 'If he knew certainly that but one little girl would be saved from the horrors of Brahmacharya by the passing of this Act, he would pass it for her sake, if he belived, as firmly as he belived the contrary, that the Act would pass it for the sake of the English name.'

'एकाही मुलीस ब्रह्मचर्याच्या अघोरपणापासून व तीव्र यातनांपासून मला मुक्त करण्याचे श्रेय मिळेल, तरी मी हा कायदा पास करण्यास तयार आहे. जरी हा कायदा निरुपयोगी राहील, तरी इंग्लिश लोकांनी मनाचा उदारपणा दाखविला हे दर्शविण्यासाठी तरी हा मंजूर करणे इष्ट व आवश्यक आहे.'

विद्यासागरांच्या धुरीणत्वाखाली, त्यांच्या नेतृत्वाखाली आता विधवापुनर्विवाह होऊ लागले. पहिला विवाह, एका कुलीन व बाळबोध घराण्यातील ब्राह्मण युवा व एक १० वर्षांची बालविधवा यांचा झाला. विद्यासागर आता तनमनधनेकरून या चळवळीत पडले. लोकांत ही चळवळ दृढमूल जेणेकरून होईल; त्या गोष्टीचा त्यांना ध्यास लागला. त्यांचे जीवनसत्त्व एकच होऊन राहिले; एकमेव ध्येय डोळ्यांस दिसू लागले. त्यांच्या मनास रिझवू लागले. ते म्हणजे विधवांची विपन्नावस्था दूर करणे. ज्यांनी पुनर्विवाह केले

त्या कुटुंबास जर बहिष्कृत करण्यात आले तर त्यांना त्रास व क्लेश होऊ नयेत 'एतदर्थ विद्यासागर पैसे वगैरे पुरवीत; व या नूतन परिणीत जोडप्यास सर्व सोयरेधाऱ्यांस, स्नेहीसंबंधी लोकांना मिष्टान्नाचे भोजन देण्यास सांगत. या योगे स्नेही वगैरे संतुष्ट होऊन त्यांची मने थोडी फार कमी कलुषित होत. कधीकधी अशा प्रकारे नवीन विवाहबद्ध झालेल्या दांपत्यास घरादारास मुकावे लागे; त्यांस घरी थारासुद्धा मिळत नसे. अशांचा तर भार सर्वस्वी विद्यासागर यांच्यावर पडे.'

या सर्व गोष्टींसाठी पुष्कळ पैशाची जरूर होती. विद्यासागर यांनी 'विधवा पुनर्विवाहनिधी' स्थापन केला. सुरुवातीला या निधीस पुष्कळ श्रीमंत लोक मासिक वर्गणी पाठवीत; परंतु कालांतराने हा इतर जनांचा उत्साह ओसरला; दिलेली वर्गणीची वचने अपुरी राहू लागली; शब्द सुके व कोरडे राहिले. 'वचने किं दरिद्रता' या म्हणण्याप्रमाणे शाब्दिक व तोंडदेखील सहानुभूती भरपूर; परंतु खरे साहाय्य मिळेनासे झाले. या श्रीमंतांच्या व इतर लोकांच्या वचनांवर विसंबून विद्यासागर यांनी कितीतरी कर्ज काढले होते. हे कर्ज आता फेडावयाचे कसे ? वचन देणारे विसरले, ज्याप्रमाणे पूर्वी यंगसाहेबांनी फसविले, त्याचप्रमाणे आता ईश्वरचंद्रांना त्यांच्याच देशबांधवांनी फशी पाडले.

सावकारांचा ससेमिरा लागलेला, वर्गणी तर मिळत नाही. संकटे दुर्लंघ्य व दुस्तर दिसू लागली. आपल्या देशबांधवांचा विश्वासघातकीपणा पाहून विद्यासागर दुःखीकष्टी झाले. त्यांना पराकाष्ठेचे वाईट वाटले, मन व्यग्र झाले, हृदय जळू लागले. विधवाविवाहाच्या खर्चाची रक्कम तर सारखी फुगत चालली होती. तिला आळा घालता येत नव्हता. कारण असे विवाह जितके होतील, तितके विद्यासागर यांना पाहिजे होते. एक विधवाविवाह म्हणजे त्यांना मोक्षप्राप्तीचा आनंद होई. त्यांची ही पुनर्विवाहाची तळमळ इतकी तीव्र होती की ते म्हणत, 'मी मरून जावे व माझ्या पत्नीने पुनर्विवाह करून लोकांना उदाहरण घालून द्यावे.' आपल्या ध्येयसिध्यर्थ स्वतःच्या जीवितावरही तिलांजली वाहू पाहणारा थोर पुरुष व धन्य नाही का ? ग्रीस देशातील प्रख्यात कायदे करणारा लायकर्गस यानेसुद्धा आपले प्राण, कायदे सुरक्षित राहावेत, पाहिले जावेत व देशसमृद्धी व्हावी, म्हणून दिले होते. त्याची आठवण आम्हास या प्रसंगी होणे अपरिहार्य आहे. असो. विद्यासागरांनी अनेक मित्रांकडून कर्जाऊ रकमा घेतल्या होत्या. कर्ज वाढत चालले याची त्यांना फिकीर नव्हती. मनुष्य एखाद्या उदात्त तत्त्वाने वेडा झाला म्हणजे त्याला मग इतर गोष्टींचे भान राहत नाही. इतर गोष्टी त्याला

ग्रासू शकत नाहीत. सर्व संकटे, कष्ट, दुःख, निराशा यांना बाजूला सारून त्यास तो ध्येयार्थ धडधडत असतो. ईश्वरचंद्र अशाच वेड्या पिरांपैकी होते. सर्व थोर लोक असेच वेडे असतात. All great men are mad with some idea.

कर्ज कसे वारावे याचा मार्ग दिसेना. उपाय सुचेना; अन्न-पाणी रुचेना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे वडील ईश्वरचंद्रांचे मोठे मित्र. यांनीही ईश्वरचंद्रांना काही द्रव्यसाहाय्य केले होते; पण त्यांना पैशाची फार निकड होती आणि म्हणून त्यांनी ईश्वरचंद्रांजवळ आपले पैसे तातडीने परत मागितले. विद्यासागर यांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जींच्या वडिलांना जे पत्र लिहिले, त्यातील काही भागाचा मथितार्थ खाली देतो.

'गेले काही दिवस कर्जमुक्त होण्यासाठी मी सतत धडपड करतो आहे. पण काय- कोणतेही उपाय दिसत नाहीत. सर्व प्रयत्न हरले; सर्व उपाय थकले. आपले पैसे परत करण्यासाठी मी जिवाचे रान केले; परंतु सर्व व्यर्थ.'

आपल्याकडून मी पैसे घेतले, ते माझे स्वतःचे पोट जाळण्यासाठी किंवा काही वैयक्तिक स्वार्थासाठी खास घेतले नव्हते. विधवापुनर्विवाहाचा जो निधी असतो त्यांसाठी जो खर्च होतो, त्यासाठी मी पैसे आपल्याकडून कर्जाऊ घेतले, तसेच अन्यत्रांकडूनही घेतले आहेत. जे पैसे मी उसनवार घेतले, ते पैसे मला ज्या वर्गण्या देण्याचे कित्येकांनी वचन दिले, त्या वर्गण्या मिळाल्यावर मी फेडून टाकणार होतो; परंतु देऊ केलेल्या या वर्गण्या अद्याप हाती आल्या नाहीत. खर्च तर रोज वाढत आहे आणि उत्पन्न मात्र शून्य आहे.

आता माझा सर्वस्वी नाश झाला आहे. आपणसुद्धा इतरांप्रमाणे मासिक वर्गणी देण्याचे व भलीमोठी देणगी देण्याची कबूल केले होते, ते आपल्याला स्मरत असेलच; परंतु आपण वर्गणी देण्याचे तर बंदच केले आणि जी देणगी देणार होता, त्यातील निम्मी मात्र दिलीत. आपल्या ऋणांतून मुक्त होण्यासाठी मी रात्रंदिवस काबाडकष्ट करीन; कोणताही प्रयत्न बाकी ठेवणार नाही; ज्या वेळेस पैशाची आपल्याला अत्यंत निकड आहे अशा प्रसंगी आपल्याला पैसे मला देता येत नाहीत याबद्दल मी असाहाय्य आहे. मी दिलगीर आहे, दुःखीकष्टी आहे. माझे देशबांधव असे क्षुद्र मनाचे व विश्वासघातकी आहेत हे मला आधीच कळून येते तर असल्या खटाटोपात मी पडलोच नसतो. नसती जबाबदारी शिरावर घेतली नसती. पैशाची मदत तर दूरच राहिली; परंतु फुकाचे शब्दानेही कोणी या चळवळीची हालहवाल विचारीत नाहीत, वास्तपुस्त घेत नाही. अशा प्रकारचे करुणरसपूर्ण पत्र विद्यासागर यांना

लिहावयास लागावे, अशा तत्त्वनिष्ठ, स्वार्थत्यागी, मानधन पुरुषावर असा प्रसंग यावा याहून खडतर दैवदुर्विलास दुसरा कोणता ?

दुसऱ्या एका गृहस्थान 'मी वर्गणी देण्याचे कबूल केले होते; त्याचप्रमाणे देणगीही देण्याचे कबूल केले होते; परंतु माझ्या भावाचा या गोष्टीस फार विरोध आहे. तो म्हणतो, 'पुनर्विवाहनिधीस दिलेले पैसे कधीही मिळणार नाहीत आणि ही चळवळ लवकरच मरणार.' माझी पैसे देण्याची अत्यंत इच्छा आहे परंतु काय करणार ? भावाचे मन मोडवत नाही.' असे विद्यासागर यांना लिहिले. विद्यासागरांनी या पत्रलेखकास लिहिले, 'आपले पत्र फार उशिरा आले. यापूर्वीच जर आपण आपला नकार दिला असता तर जे काम मी माझ्या शिरावर आज घेतले आहे ते घेतले नसते; परंतु आता तरी कळवून मला सावध केलेत याबद्दल मी आपला ऋणी आहे.'

किती संकटे आली तरी त्यांचाही केव्हा तरी अंत होतो. अमावास्येची रात्रसुद्धा जावयाची असते. काळ्याकुट्ट ढगांतूनही वीज चमकते किंवा त्यांच्या कडा सोनेरी रंगाने भूषित दिसतात. ईश्वरचंद्रांनाही धीर देणारे थोडे-फार खऱ्या भावाचे स्नेही होते. जिवश्चकंठश्च मित्र केव्हाही थोडेच असणार. या आपत्काली विद्यासागर यांना राजनारायण बोस (अरविंदांचे मातामह) हे नेहमी मदत करीत. राजनारायण बोस हे अत्यंत निर्मळ व पवित्र आचरणाचे होते. त्यांचे हृदय सात्त्विक व प्रेमळ होते. जरी ते ब्राह्म होते तरी ब्राह्ममंडळींत हिंदू संस्कृतीचा पूर्ण अभिमान बाळगणारे राजनारायणच फक्त होते. सुरेंद्रनाथांनी आपल्या जीवनस्मृतीत राजनारायण यांना 'Saintly' संत असे विशेषण जोडले आहे. हिंदुसंस्कृतीचे वैशिष्ट्य प्रतिपादण्यासाठी राजनारायण यांनी अनेक निबंध लिहिले. अशा साधुतुल्य राजनारायणांनी परोपकारात विद्यासागरांना साहाय्य करायचे नाही, तर कोणी करायचे ?

परंतु राजनारायण यांनी मदत दिली, तरी ती खिंडीत रेतीप्रमाणे होती, सिंधुत बिंदुसदृश्य होती. डोंगरास दुखणे आणि शिंपीत औषध तद्वत् हे होते. आकाश फाटले तेथे त्या ठिगळांनी काय होणार ? हतबुद्ध होऊन ईश्वरचंद्र बसले होते. या सुमारास बंगालमध्ये नवीन लेफ्टनंट गव्हर्नर सर सेसिल बीडन हे आले होते. विद्यासागरांबद्दल साहेबमजकुरांनी ऐकले होते. त्यांची व विद्यासागरांची मुलाखत झाली. विद्यासागरांची विपन्नावस्था पाहून बीडन बोलले, 'आपण सरकारी नोकरी करावयास तयार आहात काय ?' निजदेशबांधवांवरचा विश्वास समूळ मावळला नसल्यामुळे, मानधन विद्यासागर यांनी त्या पहिल्या मुलाखतीत नकार दिला; परंतु आता प्रसंग

बिकट आला. सरकारी नोकरी नीट मिळाली तर पाहावी असा विद्यासागर यांनी विचार केला. त्यांनी बीडनसाहेबांना तदर्थी लिहिले, 'सध्या नोकरी शिल्लक नाही म्हणून दिलगीर आहे; परंतु आपले नाव स्मरणात ठेविले आहे. आपल्यास योग्य अशी जागा रिकामी होताच कळवीन.' अशा मजकुराचे विद्यासागर यांचे पत्राचे उत्तर गव्हर्नरसाहेबांनी धाडले. पुढे तीन वर्षांनी प्रेसिडेन्सी महाविद्यालयात संस्कृताध्यापकाची एक जागा रिकामी झाली होती. विद्यासागर यांनी ही जागा आपणास मिळावी म्हणून अर्ज केला; परंतु त्या अर्जात नोकरी मिळण्याबाबत त्यांनी काही अटी घातल्या होत्या. त्यातील मुख्य व मुद्याची अट म्हणजे, 'युरोपीय प्रोफेसरांना जितका तनखा मिळतो, तितका मलाही मिळावा. त्यांच्या जोडीचा, तोलाचा मी समजला गेलो पाहिजे.' अशी अट विद्यासागरांनी घातली. लेफ्टनंट गव्हर्नर यांनी 'एवढ्या मोठ्या पगाराची जागा, संस्कृत महाविद्यालय निराळे असतानाही, प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये संस्कृताध्यापकांना देण्यात येईल की काय, याची मी प्रेसिडेन्सी कॉलेजच्या प्रिन्सिपॉलजवळ चौकशी करून काय ते कळवितो.' असे उत्तर विद्यासागर यांना पाठविले. अर्थातच युरोपीय लोकांप्रमाणे मोठा पगार देऊन विद्यासागरांसारख्या पंडित-रत्नाला घेण्यास ही प्रेसिडेन्सी कॉलेजमधील मर्कटे तयार झाली नाहीत. विद्यासागर हे विद्येचे सागर होते तरी ते रंगाने काळे होते ना ? हृदय निर्मळ व शुद्ध असले तरी आमचे सरकार बाह्यरंग पाहून भुलते व खुलते, त्याला काय उपाय?'

मित्र, स्नेही-संबंधी, सरकार, सर्वांच्या बाबतीत आता निराशा झाली होती. या सुमारास ईश्वरचंद्रांचा एकुलता एक मुलगा 'नारायण विद्यारत्न' हा पुनर्विवाह करण्यास तयार झाला. निराशेतही विद्यासागर यांना आशा आली. दुःखातही त्यांच्या सुकून गेलेल्या मनोवृत्ती-वल्लीस सुखाचे पल्लव फुटले. त्यांनी आपल्या मुलाला उत्तेजन दिले; परंतु आता सख्खे भाऊ विरोध करावयास व दुःख द्यावयास आले. ईश्वरचंद्रांचा पाठचा भाऊ हा न्यायाधीश पंडित होता. त्याला चांगला पगार होता. दुसरा एक धाकटा भाऊ होता. त्यांचे नाव शंभुचंद्र न्यायरत्न. या सर्व भावांना विद्यासागरांनी शिकविले; लहानाचे मोठे केले; जगात अन्नास लाविले. विद्यासागरांच्या हातांनी वाढलेली ही झाडे शीतल छाया देण्याऐवजी, मार्गात काटे पसरणारी निपजली. विद्यासागरांचे दुर्दैव. दुसरे काय ? प्रथम या शंभुचंद्रांनी या पुनर्विवाहास जोराचा पाठिंबा दिला. प्रथम उत्तेजन देणारा भाऊ, प्रत्यक्ष विवाह आता

उद्या होणार असे पाहताच उलटला. 'आपणांस आपले इतर गणगोत, आप्त बहिष्कृत करू पाहात आहेत, तर आपण हा नियोजित विवाह घडवून आणू नये. मोठ्या भावाचे असेच मत आहे.' वगैरे ईश्वरचंद्रांना त्याने लिहिले. हा शुभचंद्र दुतोंड्या होता. ईश्वरचंद्रांना तोंडावर वानील, तर तिकडे न्यायाधीश भावाजवळ ईश्वरचंद्रांना निंदील. असले दुधारी बाण फार वाईट. आत एक वर एक. असे करणारे दुष्ट लोक फार भयंकर. शंभुचंद्राने अशा प्रकार भीती घातली आणि आयत्या वेळेस समारंभावर विरजण घालण्याचा प्रयत्न केला. तरी अशाने निश्चित कर्मापासून परावृत्त होणार विद्यासागर नव्हते. त्यांनी धीर सोडला नाहीं; पुत्राचा पुनर्विवाह तर केला. मेजवानी वगैरे दिली. त्या वेळेस मग शंभुचंद्र म्हणतात, 'आपण कसोटीस उतरला. आपल्या धैर्याची परीक्षा पाहण्यासाठी मी पत्र लिहिले, नाही तर मला तसे करावयाची तादृश जरूर नव्हती. मोठा भाऊ विरोधी असला तरी माझे मन पहिल्यापासून या विवाहास अनुकूल होते.' वाहवारे भल्या गृहस्था ! विद्यासागरांच्या धैर्यमेरूची परीक्षा पाहणारा कोण तर तू घुंगुरडे, क्षुद्र जंतू, दुर्बल जीव ! सूर्याची तेजःपरीक्षा स्वद्योताने पाहण्यापरी हे हास्यास्पद होते. विद्यासागरांनी आपल्या भावास लिहिलेल्या उत्तरात त्यांचा धीर आपणास दिसतो. 'या चळवळीमुळे मी सारखा खड्ड्यात येतो आहे, संकटात पडतो आहे; परंतु या ध्येयार्थ प्राणांवर पाणी सोडण्यासही मी तयार आहे हे लक्षात धरा.' खरा वीर पुरुष ! अशाच थोर पुरुषांकडून ईश्वराचे वैभव जगास आर्विभूत झालेले दिसून येते.

विद्यासागर यांची चळवळ यशस्वी झाली नाही. एकदा बंगाली वृत्तपत्रात सुरेंद्रपाथांनी विधवेशी विवाह करण्यास तयार अशा तरुणांची नावे मागितली होती. त्यावरून १७० तरुणांनी नावे कळवली यात शास्त्री-पंडितही होते; परंतु यावरून ही चळवळ फार दृढमूल झाली असे समजता येत नाही. आयत्या वेळी पुष्कळ लोक हातपाय गाळतात. पुन्हा एक विद्यासागरांचा अवतार झाला पाहिजे. एकेक सुधारणा नावारूपाला येण्यास त्या त्या सुधारणेसाठी सर्वस्व वाहणाऱ्या लोकांचे शतशः अवतार होतील तेव्हा हा सुस्त हिंदुस्थान हलू लागेल, एरवी नाही. कोणत्याही सुधारणा हळूहळू होतात. निसर्गाचे काम आतून चालले असते, ते अदृश्य असते, हे सर्व खरे; तरीही कार्यकर्ता या गोगलगायीगतीने उदासीन होतो यात संशय नाही. ईश्वरचंद्र यांना प्रथम विश्वास वाटे की, या शास्त्रीमंडळींना शास्त्राधारे पुनर्विवाह पटवून दिला म्हणजे काम होईल. शास्त्रांवर हिंदुमात्रांची भक्ती आहे, शास्त्रात सांगितलेली कोणतीही गोष्ट हिंदू मात्र करावयास तयार होईल असा त्यांचा प्रथम समज होता. म्हणून त्यांना शास्त्रसागर

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

धुंडाळला व मोती जनतेस सादर केली; परंतु समज चुकीचा ठरला. शास्त्राचे अनुयायी नसून हिंदू हे रूढीचे अनुयायी आहेत हे कठोर व भीषण सत्य विद्यासागरांना कळून आले. उद्वेगाच्या भरात विद्यासागर म्हणाले, 'हे भारतवर्षातील स्त्रियांनो, असे काय पूर्वजन्मी तुम्ही पातक केले होते की, तुम्हाला या भारतभूमीत जन्म घ्यावा लागला ? मला तर काही समजत नाही.' पुन्हा एकदा ते अशाच खिन्नकारक प्रसंगी म्हणाले, 'हे रूढिदेवते, तू धन्य आहेस. तू आपल्या भक्तांना पूर्णपणे वश करून ठेवले आहेस. या लोकांची जीवने सर्वस्वी तुझ्या हाती आहेत. दास्याच्या जड शृंखलांनी तू त्यांना आपले कायमचे गुलाम केले आहेस. तू धन्य आहेस.'

विधवांचे अश्रू पुसावयास विद्यासागर यांनी जन्म घालविला. हे करीत असताना खडतर कष्ट, कटू अनुभव, मित्रांचे वियोग, भावांचे शिव्याशाप त्यांना सोसावे लागले. आजही विधवांच्या हालअपेष्टा संपल्या नाहीत. तीच परिस्थिती आजही आहे. भारतवर्ष इतके उदासीन कसे, एवढेच फार तर आपण म्हणू; परंतु सज्जनांनी सोसलेले कष्ट, आपदा या व्यर्थ ठरत नसतात. येशू ख्रिस्ताने जीव दिला आणि नंतर काही शतकांनी सर्व युरोप त्यास 'देव' मानू लागले. सृष्टीचे व्यवहार चुटकीसरशी होत नाहीत. अनेक थोर पुरुषांना कष्टावे लागते, तेव्हा सृष्टिदेवता सुंदर फळ अर्पण करते. म्हणून विद्यासागर यांचे प्रयत्न फुकटच गेले असे संकुचित-दृष्टी मानवांनी तरी म्हणू नये.

विधवा-विवाहाशिवाय अन्य सुधारणांशीही विद्यासागर यांचा संबंध होता. बहुविवाहास आळा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एका पुरुषाने अनेक बायका कराव्या हे तत्त्व त्यांना फार किळसवाणे व अन्याय्य वाटे. बंगालमधील फार उच्चवर्णीय ब्राह्मणांमध्ये ही चाल विशेष प्रचारात होती. या ब्राह्मणांना कुलीन असे म्हणत. एकेक ब्राह्मण १२ ते ३० बायकाही करी. कधीकधी ही संख्या याच्या दुप्पटही होत असे. स्त्रियांना पुष्कळ वेळा स्वपतिमुखावलोकन आयुष्यात एखाद्या वेळीच घडावे असा प्रसंग येई. एका १२ वर्षांच्या मुलाला दोन बायका करून दिल्या; आणखी किती देतील याला सीमाच नसे. हे सर्व पाहून विद्यासागर यांचे पित्त खवळे. 'बहुविवाह' या आपल्या पुस्तकात त्यांनी या पद्धतीची नुसती रेवडी उडविली आहे. त्यांनी अत्यंत कठोर व सणसणीत टीका या चालीवर केली. ही चाल पडण्याचे कारण असे की, कुलीन ब्राह्मणांत जे पुन्हा 'मेल' असत, म्हणजे संघ असत, त्यांच्यातही एकमेकांत लग्न होत नसे. एका 'मेलातील' ब्राह्मणांनी त्याच मेलातील स्त्रियांशी विवाह केले पाहिजेत. या कुलीन ब्राह्मणांत त्या काळी मुलांपेक्षा मुलींची संख्या फार असे आणि त्यातच हे 'मेल'

असत. त्यामुळे एकेका मुलास १०-१२ बायका वराव्या लागत. ईश्वरचंद्रांनी अगदी कमीतकमी उपाय सुचविला तो हा की, निदान सर्व कुलिनांनी तरी एक व्हावे. ही मेलबंधने नाहीशी करावीत; परंतु ईश्वरचंद्रांचे सर्व प्रयत्न अनाठायी गेले. त्यांचा उपदेश उपड्या घड्यावर पाणी ओतण्याप्रमाणे व्यर्थ गेला. लोक ऐकत नाहीत तर कायद्याची कास करून त्यांना वठणीवर आणावे असा विद्यासागर यांनी विचार केला. २१००० लोकांच्या सह्या घेऊन हा बहुविवाह कायद्याने रद्द करावा अशी मागणी करणारा अर्ज त्यांनी सरकारास सादर केला. बंगालचे जे गव्हर्नर त्यांना सहानुभूती वाटत होती; परंतु त्यांस या प्रकरणात काही करता येत नव्हते. यापूर्वी विधवाविवाह 'कायदेशीर' मानावा म्हणून एक कायदा झालाच होता.

१८५७ सालच्या बंडास जी अनेक कारणे होती, त्यात हा विधवाविवाह कायदासुद्धा कोणी अंतर्भूत करतात. १८५७ पासून सरकारने कानाला खडा लावला की, अतःपर लोकांच्या धार्मिक आचार-विचारांत आपण मुळीच हात घालायचा नाही. नुकतेच बंड होऊन गेले होते. यासाठी गव्हर्नर म्हणाले, 'तुमच्या चळवळीबद्दल मला सहानुभूती वाटते; परंतु माफ करा, या बाबतीत सरकार हात घालू इच्छित नाही.' बंगाल सरकारने असा कानावर हात ठेवलेला पाहून ईश्वरचंद्र हतबुद्ध झाले. विलायतेस जावे आणि पार्लमेंटच्या सभासदांची सहानुभूती संपादून हा बहुविवाह रद्द करण्याचा कायदा पार्लमेंटमधून पास करावा असेही त्यांनी मनात योजिले होते; परंतु अशक्त होणारी प्रकृती, पैशाची टंचाई व आणखी पुष्कळशा इतर गोष्टींमुळे जाणे लांबणीवर पडत चालले व ते कायमचेच लांबले. एकंदरीत या बाबतीतही ईश्वरचंद्र यांना यश आले नाही.

वरील चळवळीप्रमाणे दुसरी मोठी चळवळ विद्यासागर यांनी करण्यास मदत केली, ती मद्यपान-प्रतिबंधाची चळवळ. ही चळवळ प्यारीचरण सरकार यांनी खरोखर प्रथम सुरू केली. प्यारीचरण सरकार हे कोलूटोला ब्रँच शाळेचे हेडमास्तर होते. हे फार थोर गृहस्थ होते. सुरेंद्रनाथ आपल्या जीवनस्मृतीत लिहितात, 'I never had the honour of sitting at the feet of Peary Churan Sircar, but he was one of the greatest teachers of youth that Bengal had produced.' 'प्यारीचरण सरकार यांच्या पदसरोजाजवळ बसण्याचे माझे भाग्य नव्हते; परंतु त्यांच्यासारखा तरुणांचा शिक्षक व मार्गदर्शक बंगालमध्ये आजपर्यंत कोणी झाला नाही.' अशा प्यारीचरणांनी ही मद्यपानचळवळ हाणून पाडण्याचे करी कंकण बांधले. इंग्रजी शिक्षणाबरोबर जे काही दोष आपणात शिरले, जी व्यसने आपणास खाली चिखलात

ओढू लागली, त्यात हे मद्यपान एक होते. आपल्या महाराष्ट्रातही नवसुशिक्षित लोकांमध्ये हे मद्यपान फार बोकाळले होते. पुण्यातील एक प्रख्यात इंग्रजी शिक्षक गटारात दारू पिऊन धुंद झालेले असायचे. त्यांना कोठून तरी हुडकून शाळेत आणावे लागे, एकदा शाळेत आले, म्हणजे मग मात्र हे उत्कृष्ट शिकवायचे.

बंगालमध्ये तर यापेक्षा मोठे प्रकार होते. मद्य-मांस, गोमांससुद्धा हे नवसुशिक्षित सेवन करीत. बंगालचे प्रख्यात राष्ट्रीय कवी, 'मेघनादध' हे अप्रतिम महाकाव्य लिहिणारे मायकेल मधुसूदन दत्त हे दारू पिऊन कसे झिंगलेले असत व इह-लौकिक-विचार-विस्मृती कशी करून घेत ते सुप्रसिद्ध आहे. इंग्रजी शिकले म्हणजे तदनुषंगिक या सर्व गोष्टी आपल्याला प्राप्त करून घेतल्याच पाहिजेत, असे त्या वेळेस सर्वांना वाटे. जो मद्याचे सेवन करणार नाही, जो धूम्रपान करणार नाही तो खरा शिकलाच नाही, त्याच्या संस्कृती नाही, असे तत्कालीन विद्वान खुशाल बिनदिक्कत समजत. मोठे-मोठे लोक या व्यसनास बळी पडले होते. "Some of our best men had fallen victims to the curse of drink" असे सुरेंद्रनाथ लिहितात. या व्यसनाच्या मगरमिठीतून बंगालला मुक्त करावे, तरुणांना ताळ्यावर आणावे, म्हणून प्यारीचरण बद्धपरिकार झाले.

प्यारीचरण यांची कृश व छोटी मूर्ती, प्यारीचरण यांचा गोड स्वभाव, त्यांची शांतता, गडबडगुंड्यापासून दूर असण्याची वृत्ती ही सर्व पाहून प्रथम तर पुष्कळांना असे वाटले की, या शांत मूर्तीच्या हातून हे धडाडीचे धकाधकीच्या मामल्याचे काम कसे होईल ? पाठशाळेत शांतपणे विचारामृत पाजणारा, आपल्या खोलीत गहन गोष्टींचे चिंतन करणारा हा साधा पुरुष, समाजातील व्यसनास आळा घालण्याचे काम कसे करणार ? परंतु लवकरच लोकांचे वरील समज हे गैरसमज ठरले. या वामनमूर्तीचा पराक्रम मोठा आहे, मृदू व शांत अशा अंतरंगात निश्चयाची तीव्रता, ध्येयार्थ प्रयत्न करण्याची व तदर्थ कष्ट सोसण्याची अपूर्व तयारी, ही आहेत हे लोकांना दिसून आले. आधीच प्यारीमोहन तरुणाचे प्राण. तरुणांची भक्ती व प्रेम प्यारीमोहन यांवर निस्सीम होती. असा सर्व तरुणांनी पूजलेला पुरुष या चळवळीस आरंभ करता झाला. सुरेंद्रनाथ लिहितात, "No man was better qualified to lead the movement than a teacher of youth so universally respected as peary Churan Sircar. The outward look and demeanour of the man would, however, produce the impression that he was far more fit to follow than to lead. One so gentle, So quite so amiable seemed

to be hopelessly wanting in the sterner qualities of the leader of great public movement. The result, however, showed that there was the mailed fist concealed under the velvet glove and that the gentle head master of the Calootota Branch School had been gifted by nature with what are believed to be incompatible qualities, a child-like simplicity and fascinating amiability, combined with the firmness and strength of a leader of men.'

प्यारीचरण यांनी सुरू केलेल्या चळवळीस चांगले यश आले. ईश्वरचंद्र या चळवळीत मोठ्या उत्साहाने मिसळले. जेथे म्हणून दुःख व कष्ट आहेत, तेथे विद्यासागर जायचे. जेथे अन्याय आणि पाप होते आहे, तेथे ते नाहीसे करावयास ते पुढे यायचे. केशवचंद्रसेन हा प्रख्यात धर्मोपदेशक व अप्रतिम वक्ता या चळवळीत सामील झाला. या चळवळीसाठी कलकत्त्यास जी प्रचंड जाहीर सभा भरली होती, त्याच सभेत पहिले सार्वजनिक भाषण करून सरकारने हुसकून लावलेले सुरेंद्रनाथ बॅनर्जी जनमनाचे राजे झाले. अशा थोर पुरुषांनी, कार्यतत्परांनी जी चळवळ केली तिला यश कसे येणार नाही ? त्या चळवळीस यश आले. तरुण पिढीवर या चळवळीचा चांगला परिणाम घडला. मद्यपानाच्या लाटेस आळा बसला. तिचे भेसूर व प्रचंड स्वरूप कमी झाले. सुशिक्षितांमध्ये तरी हे व्यसन कमी झाले यात शंका नाही.

वरील हकिकतीवरून ईश्वरचंद्र सामाजिक गाऱ्हाणी, सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी कसे झगडले ते समजेल. ज्ञानाचे दरवाजे सर्व जातींना खुले करण्यासाठी संस्कृत महाविद्यालयात त्यांनी कशी खटपट केली व बृह्मवृंदाला गप्प बसविले हे मागे सांगितलेच आहे. त्यांची तळमळ फार; प्रयत्न जोराचे आणि या सर्व गोष्टी हिंदुसमाजातील लोकांप्रमाणे जनतेशी फटकून राहून सुधारणा करू पाहणारे ते नव्हते. सुधारणा करणाऱ्याने लोकांमध्येच राहून, त्यांचे शिव्याशाप वगैरे गोष्टींना न घाबरता काम केले पाहिजे, हळूहळू पुढे सरकले पाहिजे, हे ईश्वरचंद्रांनी भारतास शिकविले. सुधारणा करणाऱ्यास पुन्हा पुन्हा निराश व्हावे लागेल; परंतु स्वतःचे अश्रू आपण पुसून लोकांचे अश्रू पुसावयास सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे हे विद्यासागर यांनी दाखविले.

प्रसिद्ध बंगाली पंडित, अर्थशास्त्रज्ञ व कादंबरीकार रमेशचंद्र यांनी ईश्वरचंद्रांची सुधारणा करणारे या नात्याने फारच स्तुती केली. कोण करणार नाही ? सर्व विश्व माना तुकवील अशीच त्यांची अभिनव कामगिरी आहे.

✦✦✦

विद्यासागर यांचे गृहजीवन व सार्वजनिक जीवन

विद्यासागर यांना एकंदर आणखी सहा भाऊ होते. त्यांची नावे अनुक्रमे १. दीनबंधू, २. शंभुचंद्र, ३. हरचंद्र, ४. हरिश्चंद्र, ५. ईशानचंद्र, ६. भूतनाथ एकंदर हे सात भाऊ. या भावांच्या नावांवरून घराण्यात शंकराची भक्ती असावी, असे दिसते आणि ईश्वरचंद्र जन्मण्याच्या पूर्वी त्यांचे जे सर्वत्र हिंडणारे वनवासी आजोबा होते, त्यांनी काशीस विश्वेश्वराची आराधना केली होती.

या भावांपैकी हरचंद्र, हरिश्चंद्र व भूतनाथ हे विद्यासागर हयात असतानाच वारले; त्यांच्यानंतर वारले. हरचंद्र हा फार हुशार होता व तो विद्यासागरांना फार आवडायचा. तो ज्या वेळेस वारला त्या वेळेस ईश्वरचंद्र वेड्यासारखे झाले. कित्येक दिवस ते खिन्न व उदास असत. भूतनाथ हा अगदी लहानपणीच वारला.

या भावांचा विद्याभ्यास ईश्वरचंद्रांनीच केला. दीनबंधू हे न्यायरत्न होऊन त्यांना जज्ज-पंडित ही जागा मिळाली. शंभुचंद्र हे विद्यारत्न होते. ते खेड्यात गावीच राहात असत. ईशानचंद्र हा आपला जरा सुस्त व ऐदी असा होता. त्याला विद्या वगैरे नसे. तोही खेड्यातच राहात असे.

विद्यासागर यांचे लग्न १४ वर्षे संपून पंधरावे लागले तेव्हा झाले. त्यांच्या पत्नीचे नाव दीनमयी. त्याच्या लग्नातील गमतीची गोष्ट आहे. नवरा-नवरी ज्या वेळेस लहान असतात, त्या वेळेस बायका नाना प्रकारच्या चेष्टा करतात. त्यांना 'एकी का बेकी' खेळ खेळावयास लावतात. आणखी कित्येक गोष्टी करतात. बंगालमध्येसुद्धा अशीच चाल आहे. विद्यासागर लहान म्हणजे पंधरा वर्षांचे होते. लग्न झाल्यावर बायकांनी काय केले. पुष्कळ मुली जमविल्या. त्यात काही फारच खट्याळ व व्रात्य होत्या. 'जमलेल्या मुलीतून आपली बायको शोधून काढ' असे स्त्रियांनी ईश्वरचंद्रांना फर्माविले. विद्यासागरांना आपली पत्नी ओळखता येईना कारण

नुकतेच थोडच्या वेळापूर्वी लग्न झालेले आणि त्या वेळेस त्यांनी बायकोच्या तोंडाकडेही पाहिले नव्हते. कारण आताप्रमाणे त्या वेळेस परिस्थिती नव्हती. त्या जन्मलेल्या मुलींपैकी एक जरा फार बोलत होती व 'सांगा ना लवकर, काढा ना हुडकून' वगैरे बोलून चिडवीत होती. ती दिसायलाही सुंदर, गोरीगोमटी होती. विद्यासागरांनी तिचा हात जाऊन घट्ट धरला व म्हटले, 'हीच माझी बायको' आता काय करायचे ? इतर मुली म्हणाल्या, 'अहो, ही तुमची बायको नव्हे; तिला सोडा.' तरी विद्यासागर हात सोडेनात. विद्यासागर शरीराने धष्टपुष्ट होते, झाले. त्या मुलीच्या डोळ्यातून गंगायमुना घळाघळा वाहू लागल्या तरी विद्यासागर हात सोडेनात. ते म्हणाले, 'तर मग माझी बायको मला दाखवा म्हणजे माझी खात्री पटेल की ही माझी बायको नाही.' शेवटी त्यांची बायको जेव्हा त्यांना आणून दाखविण्यात आली, तेव्हा त्या मुलीचा हात त्यांनी सोडला. असे ते हट्टी व करारी होते.

विद्यासागर मोठे पगारदार झाले, तरी आपली पत्नी ते कलकत्त्यास नेहमी ठेवीत नसत. मधूनमधून तिला ते कलकत्त्यास आणीत. नाही तर आईची शुश्रूषा करावयास ते पत्नी तिकडेच ठेवीत. विद्यासागरांची आई म्हणजे एक रत्न होते. ती जरी शिकलीसवरलेली नसली तरी फार बहुश्रुत, चाणाक्ष व विचारी होती. तिची बुद्धी तीव्र व ती गंभीर विषयांतही चाले.

विद्यासागर यांचे एक हॅरिसनसाहेब म्हणून युरोपियन मित्र होते. हे इन्कमटॅक्स ऑफिसर होते. ते आपल्या दौऱ्यावर असताना विद्यासागरांच्या गावी आले. विद्यासागरांच्या आईच्या मनातून हॅरिसन साहेबांना जेवायला बोलवायचे होते. तिने आपल्या मुलाकडून हॅरिसन साहेबांना पत्र लिहविले की, 'महाशय, आपला मुक्काम येथून लवकरच हालणार आहे. तरी आपण एकदा आमच्याकडे भोजनास येऊन आम्हाला आनंदित कराल अशी आशा आहे.' विद्यासागरसुद्धा कलकत्त्याहून या समारंभास आले. हॅरिसनसाहेब विजार नेसून खुरमांडी घालून जेवायला बसले. भगवतीचे चारही मुलगे बाजूला उभे होते. माता भगवती वाढीत होती, गप्पागोष्टी चालल्या होत्या. साहेब इंग्रजीत बोलत व ते भगवतीस बंगालीत विद्यासागर सांगत व आईचे म्हणणे साहेबांना इंग्रजी करून सांगत. मध्येच साहेबांनी भगवतीस विचारले, 'आपण इतक्या उदार आहात तर आपल्याजवळ संपत्ती तरी किती आहे' भगवती म्हणाली, 'आहेत चार रांजण द्रव्याने भरलेले.' 'मला ते आपण दाखवाल का ?' असे हॅरिसन यांनी विचारले. 'हो, न दाखवायला काय झाले.' असे म्हणून भगवतीने

आपल्या सोन्यासारख्या चार मुलांकडे बोट केले व म्हणाली, 'हा माझा जामदारखाना, ही माझी जिवंत संपत्ती.' भगवतीच्या भाषणाने हॅरिसन संतुष्ट झाले. जाताना ते भगवतीस म्हणाले, 'आपण जरा चार उपदेशाच्या गोष्टी मला सांगाल तर त्याप्रमाणे वागण्याचा मी निश्चय करीन.' भगवती म्हणाली, 'मी जास्त काय सांगणार ? मी बाईमाणूस. परंतु आज तुमच्या हातात सत्ता आहे; अधिकार आहे. अधिकाराबरोबर त्याचा सदुपयोग करण्याची जबाबदारी आपणावर येते हे विसरून चालणार नाही. कोणाचेही नुकसान करू नका; कोणाचा तळतळाट माथी घेऊ नका. आपल्या मागे प्रजेने आपले नाव काढावे, आपल्याला दुवा द्यावा अशा तऱ्हेचे वर्तन ठेवणे तुमचे कर्तव्य आहे. अशा प्रकारचा मोलाचा उपदेश या साध्वीने हॅरिसनसाहेबांना केला आणि या हॅरिसनसाहेबाने पण कोणाचे कधी नुकसान केले नाही. ज्यांना हॅरिसन माहीत आहे असे त्या गावातील लोक त्यांची अद्याप मोठ्या प्रेमाने आठवण काढतात.

एकदा या खेडेगावात हडसन नावाचा एक युरोपियन फोटोग्राफर आला होता. हा फार उत्कृष्ट फोटो काढी. विद्यासागर यांना आपल्या माता-पित्यांचा फोटो काढून घ्यायचा होता. ते त्या वेळेस तिथेच होते. त्यांनी आईस पुष्कळ आग्रह केला की फोटो काढण्यास चल म्हणून. परंतु ती माउली या गोष्टीस तयार होईना, विद्यासागर म्हणाले, 'आई, तू किती निष्ठुर आहेस, मला दर्शन देण्याची तुझी इच्छा नाही ?' मी तिकडे कलकत्त्याला असतो; तुझे हरघडी दर्शन मला तेथे कसे बरे घेता येईल? मला तुझी आठवण येते परंतु प्रत्यक्ष मूर्ती समोर नसतेच. तुझा फोटो काढून घेतला. म्हणजे मी तो माझ्या खोलीत ठेवीन. म्हणजे तुझे पवित्र व स्फूर्तिदायी दर्शन सदोदित घडेल.' मुलाच्या या बोलण्याचा योग्य परिणाम झाला. परंतु हडसनसाहेबांच्या फोटो काढण्याच्या ठिकाणी ती गेली नाही, हडसन इकडे आले व त्यांनी उभयता विद्यासागरांच्या आईबापांचा फोटो काढला. विद्यासागर या फोटोस प्राणापलीकडे जपत. ते रोज सकाळी या फोटोस वंदन केल्याशिवाय थेंबभर पाणीसुद्धा प्राशन करत नसत. आई-बापच त्यांचे दैवत होते. त्या दैवताी त्यांनी आजन्म, आमरण आराधना केली. ते प्रतिपुंडलीक होते.

संतोषाने संसार चालला होता. विद्यासागर यांनी आपल्या खेडेगावात एक सुंदर बंगला बांधला होता. या बंगल्याच्या भिंती बांबूच्या होत्या. या भिंती करण्यास फार खर्च पडतो. बंगला सुंदर व खरोखर नमुनेदार होता. येथे विद्यासागरांचे आई-

बाप, त्यांची पत्नी, इतर भाऊ, त्यांच्या बायका राहात असत. विद्यासागर यांचा मुलगा नारायण येथेच शंभुचंद्रांच्या तालमीत तयार होत होता. असे सुरळीत चालू असताना विद्यासागर यांचे वडील ठाकुरदास यांनी एकदम काशीस जाण्याचे ठरविले. विद्यासागरांनी त्यांस पुष्कळ कलकत्त्याहून लिहिले, 'आपणांस फार त्रास होईल' वगैरे त्यांनी लिहून पाहिले, परंतु ठाकुरदास निश्चय बदलेनात. कारण त्यांनी एक भयंकर स्वप्न पाहिले. त्या स्वप्नात त्यांनी असे पाहिले की, 'आपले सुंदर घर भस्म झाले आहे.' जळून खाक झाले आहे; विद्यासागर त्यांचे स्नेही, मित्र, आप्त त्रास देत आहेत वगैरे. असे स्वप्न पडल्यामुळे जर खरोखरच असे झाले तर ते आपल्या डोळ्यांआड होवो असे ठाकुरदास यांना वाटले. 'डोळ्याआड आणि मरणाआड' अशी म्हण आहे. मागे काही झाले तरी पुरविते; परंतु समक्ष नको. विद्यासागर कलकत्त्याहून घरी आले, रडले, परंतु वडिलांचा निश्चय तो निश्चय. ठाकुरदास जायला निघाले. त्यांची पत्नी पण त्यांच्या बरोबर काशीस गेली. आई-बाप काशीस गेले. परंतु आई लवकरच वीरसिंह गावास परत आली. कारण काशीची हवा तिला सोसवेना. ती पतीस आपल्या बरोबर परत आणण्याचा प्रयत्न करीत होती. ठाकुरदास यांचा काशीत देह ठेवण्याचा विचार होता. म्हणून ते पुनरपि घरी येण्यास कबूल होत नव्हते. भगवती म्हणाली, 'तुम्ही इतक्यात खात्रीने मरणार नाही. तुम्ही येथेच राहिलात तरी मी सांगून ठेवते तुमच्या आधी मीच काशीत येऊन मरेन. परंतु तुम्ही मात्र जिवंत राहाल.' शेवटी भगवती एकटीच घरी परत आली, घरी परत आल्यावर थोडक्याच दिवसांत ठाकुरदास यांना पडलेले स्वप्न खरे ठरले. विद्यासागर यांनी लहान मुलांसाठी 'बोधोदय' म्हणून एक पुस्तक लिहिले आहे. त्यात ते एके ठिकाणी लिहितात, 'स्वप्न सकल सत्य नही, अमूलक चिंता मात्र' स्वप्ने ही खरी नसतात; उगीच नसती काळजी मात्र उत्पन्न करतात. विद्यासागरांचे हे लिहिणे त्यांच्या वडिलांच्या स्वप्नांच्या बाबतीत तरी खोटे ठरले. विद्यासागर यांचे सुंदर घर जळून गेले. विद्यासागर कलकत्त्याहून धावत आले. कोणास अपाय, इजा मात्र झाली नव्हती याबद्दल त्यांनी देवाची प्रार्थना केली. नंतर त्यांनी नवीन घर बांधण्यास आरंभ केला. त्या वेळेस त्यांना पुष्कळांनी सांगितले की आता चांगली दगडाची टोलजंग इमारत बांधा. विद्यासागर म्हणाले, 'मी गरीब ब्राह्मणाचा मुलगा. आमच्या कुळाला टोलेजंग इमारती शोभणार नाहीत.' विद्यासागरांनी सर्व भावांची राहावयाची वगैरे व्यवस्था केली. पत्नीस जाताना त्यांनी कलकत्त्यास नेले. ते आईसही आग्रह करीत होते. परंतु आई

म्हणाली, 'मी जर कलकत्त्यास आले तर हे गरीब लोक गावात कोणाच्या जिवावर राहतील? त्यांच्यासाठी मला येथेच राहिले पाहिजे.' विद्यासागर कलकत्त्यास निघून गेले.

यानंतर लवकरच कुटुंबात भांडणे सुरू झाली. विद्यासागरांचे भाऊ होते, त्यांना विद्यासागरच मदत करीत. दीनबंधू जे होते, ते मोठ्या स्वतंत्र वृत्तीचे व स्वाभिमानी बाण्याचे होते. त्यांना पगार थोडा असे तरी ते आता विद्यासागरांकडे पैसे मागत नसत. परंतु विद्यासागर दीनबंधूंच्या बायकोजवळ पैसे देत व अशा प्रकारे त्यांचे उणे पडू देत नसत. शंभुचंद्र यांनी एका पुनर्विवाहाच्या बाबतीत काही वाईट गोष्ट केली म्हणून विद्यासागर यांना वाईट वाटत होते. शिवाय या भावाच्या बायका आपापसांत फार भांडत. विद्यासागर यांची पत्नी पण जरा उतावळ्या स्वभावाची होती; कलागती होती; दिनमयी ही भांडणे विद्यासागरांना सांगावयाची. विद्यासागरांना हे ऐकून वाईट वाटे व ते आपल्या पत्नीस शांतपणे वागण्यास सांगत. शेवटी आपले भाऊ त्यांना वाढविले, शिकविले, तेच आपणाबद्दल साशंक आहेत, असे विद्यासागरांनी पाहिले. त्या वेळेस त्यांचे मन विरक्त झाले. एवढा खटाटोप करून सर्व आपल्याच नावाने खडे फोडतात हे पाहून त्यांचे मन वैतागले. सर्व जगाचा संबंध सोडावा व वनात जाऊन वानप्रस्थाश्रम किंवा संन्यासच घ्यावा, असे विचार मनात येऊन त्यांस निश्चयाचे स्वरूप मिळू लागले. शेवटी एक दिवस त्यांनी ठरविलेच की आता संन्यास घ्यावयाचा. त्यांनी निरवानिरवीची पत्रे सर्वांना लिहिली. प्रथम आईस पत्र लिहिले, 'आजपर्यंत जे काही तुला त्रास दिले असतील, ज्या काही चुका झाल्या असतील, त्याची उदार मनाने मला क्षमा कर. आई, आता मी जगास कंटाळलो आहे. ती तुला अखेरचा प्रणाम करतो. तुझी जर काही इच्छा असेल तर मला ताबडतोब कळव म्हणजे मी ती पूर्ण करीन मग जगाचा संबंध सोडीन.' याप्रमाणे मजकूर लिहून आपल्या पत्नीस दुसरे पत्र लिहिले, 'मी जगाचा कायमचा निरोप घेत आहे. आता आपले संबंध संपले. मी पोटा-पाण्याची ददात तुम्हास ठेविली नाही. नीट काटकसरीने वागलात म्हणजे तुम्हाला जन्मभर पुरून उरेल. दीनमयी, एकच गोष्ट तुला सांगाविशी वाटते ती ही की, जगाशी जरा सहनशीलपणाने वागावे; मिळते घ्यावे. उतावीळपणे, अधीरपणाने स्वतःस व दुसऱ्यास त्रास होतो.' यानंतर तिसरे पत्र शंभुचंद्र यांस लिहिले, 'मी आतापर्यंत तुला मदत केली. पुढेही तुला मदत मिळत जाईल, अशी व्यवस्था होईल. शंभू, शेजाऱ्यापाजाऱ्यांजवळ जरा सलोख्याने

राहात जा. नेहमी हमरीतुमरीवर येणे यात कल्याण नाही व हे शोभत नाही.' चवथे पत्र ईशानचंद्रांना होते. 'तुला दर महिना ३० रुपये येत जातील. सध्या तुला जास्त पैसे देण्यात येणार नाही. नीट शहाणपणाने वागावे.' शेवटचे पत्र काशीस वडिलांना लिहिले. हे पत्र पुष्कळ लांबलचक होते. 'बाबा, मी आपणास शेवटचा प्रणिपात करतो. आजपर्यंतच्या माझ्या अनुभवाने मला हेच शिकविले की, 'संसारात, या जगात तुझ्यासारखा हतभागी अन्य कोणी नाही.' बाबा, मी सर्वांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला. कोणासही दुखवू नये म्हणून स्वत:स अनेक वेळा संकटात व दु:खात घालून घेतले; परंतु मला या गोष्टीत यश आले नाही. जो सर्वांना संतोष देऊ पाहातो त्यास कोणालाच संतोष देता येत नाही, हेच कटू सत्य शेवटी माझ्याही अनुभवास आले. घरीसुद्धा कुटुंबात एकंदर अशांतता व असमाधान आहे. त्यांची कारणे मी आपल्याला निवेदन करू इच्छित नाही, पुनर्विवाहासारख्या चळवळी हातात घेऊन मी कर्जबाजारी झालो आहे. अनेकांनी वचने दिली परंतु ती वायफळ व कवडीमोल ठरली. जोपर्यंत मी कर्जाच्या बजबजपुरीत आहे, ऋणाने बद्ध आहे, तोपर्यंत मला समाजाचा सर्व संबंध नैतिकदृष्टया सोडता येत नाही व मी सोडणारही नाही. कर्ज फेडून टाकण्यासाठी प्रयत्न करतो आहे. अनृणी झाला म्हणजे संन्यास घेण्यास काही बंधन राहणार नाही.

आपण माझ्या हातून ज्या चुका, जे अपराध झाले असतील ते पोटात घाला. आपणांस दर महिना जो पैसा पाठविण्यात येई, तो अत:परही पाठविण्यात येईल. कृपाकरून अनुज्ञा द्याल, अशी आशा आहे.

वरील आशयाचे पत्र वडिलांना गेले. वडिलांनी जरा रागाने पत्र लिहिले की, 'हा कार्य मूर्खपणा चालविला आहेस? चोर ताट चोरून नेतील म्हणून का भुईवर, जमिनीवर आपण भात खावा? हे अगदी अनुचित आहे. दुष्ट त्रास देणारच. त्यामुळे कपाळात, डोक्यात राख घालून घेणे हे धीराचे काम नव्हे.' मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना सांगितले, 'तरीच संत व्हावे! जग बोलणे सोसावे!' जगाची बोलणी, भाऊबंदांचे त्रास हे सर्व सहन करून आपण आपला मार्ग चोखाळीत राहावयाचे, हे मोठ्या माणसाचे काम. विद्यासागरांच्या इतर भावांची पण पत्रे आली. त्यांनीही हात जोडून विनंती केली, 'आपण असे करू नये. आमचे अपराध पोटात घाला.' आईने पण गळ घातली. शेवटी विद्यासागर समाज सोडून गेले नाहीत; परंतु ते आपल्या मातृभूमीस परत गेले नाहीत. तेथे गेल्यावर कौटुंबिक भांडणे पाहावयास लागतील तर जाणेच नको.

विद्यासागर यांचे वडील काशीस आजारी पडले. त्यांचे पत्र आले. त्याबरोबर विद्यासागर, दीननाथ, शंभुचंद्र व भगवती ही सर्व काशीस ताबडतोब निघून आली. ठाकुरदास यांना उतार पडला; यामुळे विद्यासागर पुन्हा कलकत्त्यास निघून आले. परंतु इकडे विद्यासागरांची आई भगवती ही एकाएकी फार आजारी झाली. तिला रक्ती अतिसार झाला व ती लवकरच आसन्नमरण झाली. शेवटपर्यंत भगवती नीट शुद्धीत होती. ती आपल्या पतीस म्हणाली, 'असे माझ्याजवळ बसा; मला आशीर्वाद द्या' ठाकुरदास म्हणाले, 'मी काय आणंखी आशीर्वाद देणार? तू पुण्यवान साध्वी स्त्री आहेस, तू आपल्या पुण्याईने अहेवपणी स्वर्गारोहण करीत आहेस. तुला मी काय देणार ?' पतीच्या मांडीवर तिने काशीत, पूर्वी म्हटल्याप्रमाणे पतीच्या आधी प्राण सोडला. विद्यासागर मरताना आईजवळ नव्हते. जेव्हा कलकत्त्यास त्यांना ही वार्ता कळली, तेव्हा केवढा आकांत केला ! एवढे मोठे विद्यासागर परंतु दु:खाने अगदी वेडे झाले. ज्या ज्या वेळी त्यांना आईची आठवण येई, त्या त्या वेळेस ते रडू लागायचे. त्यांच्या भावना फार कोमल होत्या. पूर्वीचे सर्व प्रसंग त्यांच्या डोळ्यांसमोर ताबडतोब उभे राहावयाचे. कल्पना व स्मरण ही फार. एकदा एका मित्राजवळ सहज गप्पागोष्टी चालल्या होत्या. बोलता-बोलता विद्यासागरांच्या आईसंबंधी गोष्टी निघाल्या. आईचा संबंध आल्याबरोबर गतकाळच्या सर्व आठवणी एकदम विद्यासागरांच्यासमोर उभ्या राहिल्या व ते आपले रडू लागले. त्यांच्या मित्रास आईचा उल्लेख केल्याबद्दल वाईट वाटले व तो मित्र म्हणाला, 'आपल्या दु:खास मी नकळते कारणीभूत झालो याची मला क्षमा करा.' डोळे पुसून विद्यासागर म्हणाले, 'यात क्षमा कसली करावयाची ? अहो, उलट मी तुमचा आभारी आहे कारण या निमित्ताने तरी मातेची पूज्य स्मृती होऊन कृतज्ञतेचे चार अश्रू आले.'

आई मरण पावल्यावर विद्यासागर आपल्या वडिलांना पुन:पुन्हा कलकत्त्यास येण्यास लिहीत. कारण काशीस जाणे विद्यासागरांच्या जिवावर येई. काशीची आठवण झाली म्हणजे आईची आठवण व्हावी व मग डोळे डबडबून यावे. ज्या काशीस कल्पनेने इतका शोकपूर यावा; त्या प्रत्यक्ष काशीत जाऊन, जेथे आई गतप्राण झाली, जेथे आपण नव्हतो, असे ते स्थान, ती खोली पाहून विद्यासागरांना किती वाईट वाटले असते, याची कल्पना तुम्हीच करा. ठाकुरदास यांनी विद्यासागरांना असा हुकूम केला की, 'तूच मला येऊन भेट, आता पुष्कळ दिवस झाले. मी काही तिकडे येणार नाही; तू ये तुला पाहण्याची इच्छा आहे.' शेवटी विद्यासागर काशीस आले.

आईच्या आठवणीने शोकगंगा लोटली. पित्याची भेट झाली. परंतु पित्याचा पूर्वीचा आजार वाढला व विद्यासागर तेथे असता ठाकुरदासही १८७६ मध्ये निजधामास गेले. आईबाप दोघेही आता कैलासवासी झाली. ईश्वरचंद्रांची दैवते शरीररूपाने, पार्थिवरूपाने त्यांस अंतरली. आता मनोमय मूर्ती राहिल्या. फोटोतील मूर्ती राहिल्या.

विद्यासागर व त्यांचा मुलगा नारायण यांच्यामध्ये काही तरी बेबनाव झाला. विद्यासागर हे मुलाकडे जात नसत. त्याचे दर्शनही घेत नसत. विद्यासागरांची पत्नी दीनमयी ही मुलाजवळ राहात असे. आईबाप मेल्यावर विद्यासागर एकटे, हाताने स्वयंपाक करून राहात. कधीकधी दीनमयी त्यांच्याकडे येई. परंतु मुलास येण्यास परवानगी नव्हती. शेवटी दीनमयी पण इहलोक सोडून गेली. विद्यासागरांवर एकेक संकटे येऊ लागली. त्यांना चार मुली होत्या. त्यापैकी एकीवर वैधव्याचा प्रसंग ओढवला. दुःखाचे ढग जमू लागले. आयुष्याच्या सायंसमयी समाधान लाभावयाचे ऐवजी दुःखाघातच होऊ लागले. ईश्वरचंद्र हे आता आजारी दिसू लागले. एकदा तर ते चांगलेच आजारी पडले. त्यांच्या घरात कोणी नसे. कारण मुलाला येण्यास परवानगी नाही. मुली असत किंवा कोणी मित्र शुश्रूषा करीत. वडील आजारी असून आपण त्यांना पाहू शकत नाही, त्यांची चाकरी करण्याचे भाग्य आपल्या नशिबी नाही, या विचाराने नारायणाच्या हृदयाचे पाणी होई. क्षुल्लक अपराध झाला. त्याच्यासाठी बाबांनी एवढे घोर शासन करावे का ? शेवटी निर्वाणीचे पत्र वडिलांना पाठविण्याचे नारायणाने ठरविले व हृदयास पाझर फोडणारे, दगडास रडविणारे पत्र त्यांनी लिहिले, 'बाबा, क्षमा करा. आपण मजला घराचे निदान दर्शन देण्याची तरी परवानगी द्याल का ? माझा मानसविहंग आपल्या भोवती घिरटया घालीत आहे. तुम्ही बिछान्यावर विव्हळत असता तुमची सेवा करण्याचे पुण्य या पाप्याच्या नशिबी का असू नये ? बाबा, लोक तुम्हाला देव मानतात, दयेचा सागर समजतात. आपण 'अभूतपूर्व पुरुष' असे सर्व म्हणतात. माझ्याच बाबतीत आपण इतके निष्ठुर कसे झालात ? मला आई सोडून गेली. आपल्या कृपेची छाया मजवर असावयाची ती पण नाही. म्यां हतभाग्याने कोणाकडे पाहावे ? आई मेलेली, बाप असूनही मी त्यास आचवलेला, आपण अनाथाचे नाथ व गरिबांचे कैवारी. परंतु आपला प्रत्यक्ष मुलगा मात्र अनाथ व दीन झाला आहे. त्याची कीव तुम्ही का करून नये ? बाबा, माझ्या पापांची, अपराधांची मोठ्या मनाने आपण क्षमा नाही का करणार ? पुत्रवात्सल्याने मला जवळ नाही का बोलवणार ? मी आपल्याकडे येतो. आपण माझ्याकडे

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

कृपादृष्टीने पाहू नका. माझे काळे तोंड प्रसन्नतेने पाहू नका. परंतु आपली मला सेवाचाकरी करू द्या.' हे हृदयद्रावक पत्र वाचल्यावर कठोर झालेला ईश्वरचंद्र पाझरला. ईश्वरचंद्रांच्या डोळ्यांतून गंगा वाहिली. मुलास त्यांनी बोलावले व यापुढे नारायण, त्याची बायको, त्याची मुले ही विद्यासागरांजवळ राहिली. विद्यासागर दुखण्यातून उठले. परंतु त्यांच्या मुलाची सुंदर कन्या प्रभावती हीं देवाने उचलून नेली. विद्यासागरांना प्रभावतीचा फार लळा. प्रभावती नसली म्हणजे त्यांना सर्व अंधार दिसायचा. विद्यासागरांनी 'प्रभावती संभाषण' म्हणून एक लहानसे पुस्तक नातीच्या निधनानंतर लिहिले. ते फार करुणरसपूर्ण आहे. 'बाळ, तू कोठे आहेस गं; तू कसे बोलायचीस; तुझे चालणे किती मनोहर; नाचणे किती सुंदर व डौलदार. तुझ्या त्या मनोरम क्रीडा. ते सर्व आता कोठे आहे ? आम्हांस क्षणभर आनंदसागरात सोडून पुन्हा अशा दुःखदावाग्नीत का बरे टाकतेस ? येथेच थोडाच वेळ थांबायचे होते, तर तू आलीस तरी का ? क्षणभर येऊन आमच्या मनास हाय हाय करून चटका लावून निघून जाणे ही क्रूरपणाची परमावधी नाही का ? असला दुष्टपणा लहान मुलास शोभत नाही.' वगैरे प्रकारचे या पुस्तकात वर्णन आहे.

कुटुंबात अशा प्रकारे दुःखादिकांनी पोळलेले ईश्वरचंद्र समाजात सर्व तऱ्हांनी पुढाकार घेत. मोठमोठे लोक त्यांचे मित्र होते व सर्व चळवळीत ईश्वरचंद्रांना प्राधान्य असे. कवी, नाटककर, सुधारणाकार, सरकारी अधिकारी, नट, विद्यार्थी सर्वांनाच विद्यासागरांनी मोहिनी घातली होती. विद्यासागरांचा विनोदी स्वभाव व मार्मिक बोलणे या समाजातील व्यवहारात पुष्कळ वेळा दिसून येई. ते हजरजबाबी व दुसऱ्यांना निरुत्तर करणरे असे होते. एकदा विद्यासागर आपल्या खेडेगावात असता त्यांच्या घरावर ४०/५० दरोडेखोरांचा डाका आला. घरातील सर्व मंडळी व विद्यासागर मागच्या दरवाज्याने पसार झाले. चोरांनी सर्व मिळेल ते लांबविले. परंतु सर्व मंडळींचे प्राण तर वाचले. 'शीर सलामत तो पगडी पचास' अशी म्हण आहे. पुढे विद्यासागर कलकत्त्यास आले. तेथे गव्हर्नरसाहेबांनी विद्यासागरांना म्हटले, 'काय शेवटी भागुबाईसारखे पळून गेलात ना? भित्रे तुम्ही. तुमच्या बाता ऐकाव्या मात्र.' विद्यासागर म्हणाले, 'जगात मनुष्यांस संतुष्ट करणे फार कठीण आहे. समजा, मी चोरांजवळ लढाई केली असता व त्यात जिवानिशी मारला जातो तर, काय अविचारी; एवढ्या चोरांजवळ का हुज्जत घालावयाची व झुंज खेळायची.' असे तुम्ही म्हटले असते; आणि आता निघून आलो तर कसे पळून आले म्हणून म्हणावयास तयार. एकंदरीत

(faded library stamp)

लोक हे दुराराध्य आहेत. 'गव्हर्नर हसले. विद्यासागरांमध्ये हा विनोदाचा गुण लहानपणापासूनच होता. एकदा त्यांचे एक शिक्षण जयगोपाळ तर्कालंकार यांनी मुलांना समस्यापूरणार्थ काही श्लोकचरण दिले. त्यातील एक चरण असा होता. 'गोपालाय नमोस्तुते.' विद्यासागर म्हणाले, 'गुरुजी हा गोपाल कोणता? तो तीन-चार हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेला जुनापुराणा तो की आमच्या समोर उभे आहेत ते?' गुरुजींना कौतुक वाटले व विद्यार्थ्यांमध्ये हशा पिकला.

एकदा रामकृष्ण बॅनर्जी (ज्यांना संस्कृत शिकता यावे म्हणून उपक्रमणिका विद्यासागरांनी लिहिली होती.) यांच्याकडे प्रख्यात न्यायाधीश द्वारकानाथ मित्र, कृष्णदास पाल, विद्यासागर हे सर्व जमले होते. यांच्या गप्पागोष्टी चालू होत्या, त्यावेळेस खिडकीतून एक खेडवळ मनुष्य सारखा डोकावून पाहात होता. विद्यासागरांनी त्याला आत बोलावून घेतले. 'काय रे सारखे खिडकीतून काय डोकावतो आहेस?' असे विद्यासागरांनी त्याला विचारले. तो घाबरला व उत्तर देईना. 'सांग ना, घाबरावयास काय झाले?' असे विद्यासागरांनी म्हटताच तो खेडवळ म्हणाला, 'द्वारकानाथ मित्र न्यायाधीश मला पाहावयाचे होते. येथे आले आहेत असे ऐकले म्हणून येथे आलो.' विद्यासागर म्हणाले, 'हे जे सुंदर गृहस्थ आहेत त्यांचे नाव कृष्णदाल पाल व पलीकडे जे यांच्यापेक्षा सुंदर गृहस्थ आहेत ते द्वारकानाथ मित्र. आता ओळख बरे कोणते ते.' गंमत अशी होती की, कृष्णदास पाल हे अगदी कुरूप होते; त्यांच्यापेक्षाही द्वारकानाथ हे कुरूप होते. विद्यासागरांनी केलेल्या थट्टेमुळे तो खेडवळ चपापला व हे सर्व खो खो हसू लागले.

या कलकत्त्यातील बड्या लोकांनी एक खाना-क्लब-अल्पाहारमंडळ काढले होते. एकदा या खाबू मंडळींची खाण्याच्या कार्यासाठी सभा भरली होती. विद्यासागर या सभांना हजर राहात; परंतु त्या सभेत प्रत्यक्ष कार्यात हात न घालता ते स्वस्थ गंमत करीत व गप्पा मारीत. आज जी सभा भरली होती त्या सभेत खाण्यची अगदी चंगळ होती. एक खाबूनंदन इतके पोटात कोंबता झाला की तो शेवटी अस्वस्थ झाला. त्याच्या पोटात कळा उठल्याने तो गडाबडा लोळू लागला. झाले. डॉक्टरांना निमंत्रणे गेली. नळ्या लावल्या, ठाकठोक झाले. वांतीचे औषध देण्यात आले व स्वारी नीट शुद्धीवर आली. नंतर सभेचा जीव जेव्हा खाली पडला, तेव्हा सभेत एका गृहस्थाने असा ठराव मांडला की, 'सदरहू इसम यास खाबूमंडळाचा सभासद करून घेऊ नये. त्याचे नाव कमी करावे. या मंडळाची जबाबदारी त्यास नीट पार पाडता येत नाही. तो

कार्य व्यवस्थित करीत नाही.' या ठरावास विद्यासागर यांनी जोराचा विरोध केला. ते म्हणाले, 'हा अकृतज्ञपणा आहे. जो सभासद मंडळासाठी प्राण देण्यास तयार झाला, प्राण गेले तरी बेहत्तर परंतु या मंडळाचे काम कसोशीने करीन असे ज्याने प्रत्यक्ष कृतीने दाखविले, त्याचे तुम्ही नाव कमी करता? याहून अनुदारपणाचे दुसरे कोणते कृत्य असू शकेल ? या सद्‌गृहस्थांचे नाव कमी तरी करू नयेच; उलट त्याच्या गुणगौरवपर ठराव आपण सर्वांनी एकमताने उभे राहून मंजूर करू या.' या एकंदर भाषणाने फारच गंमत झाली.

कलकत्त्यामध्ये जे-जे काही महत्वाचे व्हायचे, त्यात विद्यासागर नाहीत असे कधीच व्हायचे नाही. ज्या वेळेस सुरेंद्रनाथ बॅनर्जी वगैरे लोक इंग्लंडहून परत आले, त्यावेळेस त्यांच्या स्वागतार्थ सातनळ्यांजवळ जाहीर सभा भरली. ती सभा बोलविण्यात विद्यासागरही प्रमुख होते आणि पुढे वय मोजण्यासंबंधी जेव्हा प्रश्न निघाला तेव्हा विद्यासागर, राजेंद्रनाथ मित्र वगैरेंनी हिंदू-वयोगणनापद्धती व पाश्चात्त्य आंग्लगणनापद्धती भिन्न आहेत असे दर्शवून दिले; व या इंग्लंडमधून आलेल्या तरुणांना वयाची अट आड यथार्थपणे येऊ नये म्हणून त्यांनी प्रयत्न केला. कलकत्त्यात एक 'हिंदूपारिवारिक वृत्तिभांडार' काढण्यात आले, त्यामध्ये विद्यासागरही होते. Hindu family relifef fund हा याचा अर्थ. हिंदूंच्या कुटुंबातील लोकांना आधार मिळावा म्हणून काढलेला हा निधी होता. यात रमेशचंद्र दत्त वगैर लोक होते.

महेंद्रलाल सरकार हे कलकत्त्यातील एक नामांकित श्रीमंत गृहस्थ. हे मोठ्या स्वतंत्र बाण्याचे होते. त्यांनी लग्न केले नव्हते. कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजमधील एक उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ते समजले जात. ते पहिले एम. डी. होते. विद्यासागर व महेंद्रलाल एकमेकांचे मोठे मित्र. महेंद्रलाल सरकारांचे ज़रा काही दुखले-खुपले की विद्यासागर त्यांच्या बिछान्याजवळ बसून राहावयाचे, त्यांची नीट काळजी घ्यायचे. 'तुम्ही लग्न केले नाही तर तुमची काळजी कोण घेणार?' असे ते म्हणावयाचे. नेहमी त्यांच्या औषधपाण्याची वगैरे सर्व सोय लावून द्यायचे. विद्यासागर सर्वसामान्य जनांचेसुद्धा मित्र; मग ज्यास ते मित्र म्हणत त्याच्यासाठी ते किती झटतील, याची कल्पना करा. त्या मित्रासाठीच ते खटपट करीत, त्रास घेत असे नव्हे; तर मित्राच्या घरातील इतर कोणी मंडळी वगैरे आजारी पडली तर त्यांचीही वास्तपुस्त विद्यासागरच करायचे. मित्राचे घर म्हणजे स्वतःचेच घर. मंहेंद्रलाल सरकार यांनी रसायनशास्त्राला चालना द्यावी म्हणून एक मंडळ स्थापले. मोठी प्रयोगशाळा त्यांनी स्थापली. या

संस्थेच्या निधीस विद्यासागर यांनी १००० रू. दिले, याच रसायन शाळेत प्रसिद्ध मद्रासी रामन हा प्रथम जात असे. 'नीलदर्पण' या बंगालमधील प्रसिद्ध नाटकाचा कर्ता दीनबंधू मित्र हे विद्यासागर यांचे दोस्त होते. बंगालमध्ये निळीची लागवड करणाऱ्यांवर युरोपीय मळेवाले, जमीनदार जो जुलूम करीत, त्याचे या नाटकात उद्‌घाटन केले आहे. हे नाटक फार लोकप्रिय झाले होते. प्रत्यक्ष विद्यासागरसुद्धा हे नाटक पाहावयास गेले होते. गिरीशबाबूंची नाटकमंडळी कलकत्त्यास होती. गिरीशबाबू हे स्वत: नामांकित नट व नाटककार होते. नाटक कंपनी त्यांच्या मालकीची होती. गिरीशबाबू यांनी जवळजवळ ४० नाटके लिहिली आहेत. विद्यासागर नीलदर्पण पाहावयास गेले. नाटकगृह गच्च भरून गेले होते. विद्यासागर अगदी पुढे खुर्चीवर बसले होते. गिरीशबाबूंनी एका युरोपीय जमीनदाराचे काम केले. त्यांनी आपले काम फारच उत्कृष्ट केले. एका लागवड करणाऱ्या मजुरावर ते अत्याचार करीत होते. त्याचा छळ करीत होते. ते सर्व प्रत्यक्ष तेथे चालले असता विद्यासागर यांचा राग राहीना. त्यांस संताप आला. आपण नाटकगृहात आहोत आणि हे समोर दिसते आहे ते नाट्य आहे, दृश्य काव्य आहे; हे त्यांच्या लक्षात राहिले नाही. यथार्थ व खरोखरच्या गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर होताहेत असे त्यांना वाटले. विद्यासागर संतापले व असला नराधम काय कामाचा असा त्यांनी विचार करून पायातील जोडा त्यांनी नाटकातील जमीनदारावर फेकला. झाले, लगेच पडदा पडला व गिरीशबाबू साधेपणाने पुढे आले व म्हणाले, 'आज माझ्या जन्माचे सार्थक झाले, ज्या धंद्यात पडलो, त्या धंद्यात उत्कृष्ट प्रावीण्य मिळविले असे विद्यासागरांनी मला प्रशंसापत्र दिले आहे; आणखी अन्य कोणाच्या प्रशंसापत्राची इच्छा मला असणार?' गिरीशाबाबू हे विद्यासागर यांना गुरू मानीत. विद्यासागरांच्या वेताळपंचविशीने गिरीशांना बंगाली भाषा शिकविली. गिरीश यांनी आपले एक नाटक विद्यासागर यांना अर्पण केले. त्या अर्पणपत्रिकेत गिरीशबाबू लिहितात, 'गुरुदेव, दीनानाथ, मातृभाषा मी नीट पूर्वी न जाणावी असे नाही. परंतु आपल्या वेताळपंचविशीने मला बंगाली भाषा शिकविली. आपण माझे गुरू आहात; जे आपण शिकविलेत, त्याची आज परीक्षा या पुस्तकरूपाने देत आहे. माझी परीक्षा घ्या. मी नेहमी आपल्याला मनात वंदन करीत असतो.'

ज्या दीनबंधू मित्रांचे हे नीलदर्पण नाटक, त्यांनीसुद्धा आपले, 'द्वादश कविता' हे पुस्तक विद्यासागरांना अर्पण केले आहे. त्या अर्पणपत्रिकेत दीनबंधू लिहितात,

‘आपण बंगाली वाङ्मयाचे जन्म आहात, बंगाली भाषा आपली कन्या आहे.’ (आपणास तनया) दीनबंधू हे पोस्टमास्तर होते. त्यांचा पगार अगदी थोडा असे. त्यांना इतर स्थावर मिळकत, जमीनजुमला काही एक नव्हते. दीनबंधू अकस्मात एके दिवशी निवर्तले. त्यांचे कुटुंब मोठे होते. या कुटुंबाचा पोशिंदा नाहीसा झाला; कुटुंबास दुसरा आधार नाही. परंतु विद्यासागर होते. ना. विद्यासागर यांनी आपल्या मित्राच्या कुटुंबास कित्येक दिवस सर्वतोपरी सांभाळले. नवीनचंद्रसेन हे प्रख्यात बंगाली कवी. यांनासुद्धा ईश्वरचंद्रांनी वाढविले. नवीनचंद्र अगदी गरीब होते. दारिद्र्याने गारठून जाणारे हे सुंदर कमळ होते. विद्यासागरांनी हे कमळ हे सुंदर फुल टवटवीत व सुंदर ठेवले. नवीनचंद्रांना शिकविण्यास सर्वतोपरी मदत विद्यासागरांची कृतज्ञताबुद्धीने नवीनचंद्रांनी आपले अभिनव ‘पलाशिर युद्ध’ ‘प्लासीची लढाई’ हे महाकाव्य ईश्वरचंद्रांच्या चरणी वाहिले. त्या अर्पणपत्रिकेत ते लिहितात, ‘देवा, मी अफाट सागरात गटांगळ्या खात होतो. परंतु आज परतीरास येऊन लागलो आहे. आपले वात्सल्य व प्रेम यांचे हे कार्य आहे. मी पूर्वी आपले चरण माझ्या कढत अश्रूंनी भिजविण्यासाठी आपल्याकडे आलो होतो. आपण सहृदय झालात, दयेच्या एका बिंदूने माझी सिंधूप्रमाणे अफाट आपदा आपण हरण केलीत. आज मी पुन्हा आपल्या चरणाजवळ आलो आहे. चिंतादावानलाने दग्ध झालेली माझी मनोवल्लरी आज पुन्हा टवटवीत झाली आहे. आज माझे तोंड अश्रूंनी डवरलेले नाही; चिंतेने काळवंडलेले नाही; हृदय आनंदाने पूर्ण आहे; मुखमंडल प्रफुल्ल आहे. देवा, माझ्या मनोवल्लरींचे एक कुसुम आपल्या चरणांवर वाहण्यास मी आलो आहे. त्याचा प्रेमाने स्वीकार करा.’ मायकेल मधुसुदन दत्त यांनी एका सुंदर चतुर्दश पद्यावलीत विद्यासागारांचा गौरव केला आहे. नाटककार, कवी हे जसे विद्यासागरांचे मित्र व त्यांना देवाप्रमाणे मानणारे, त्याप्रमाणे इतरही मोठमोठे गृहस्थ होते. गुरुदास बॅनर्जी हे कलकत्ता विद्यापीठाचे पहिले हिंदी व्हाइस चॅन्सलर होते. कर्झनने नेमलेल्या शिक्षणचौकशी मंडळात ते नेमले गेले होते. हे फार विद्वान, साधे, सरळ होते. यांची आई निर्वतल्यावर, आईच्या सर्व प्रेतसंस्कारांनंतर त्यांना काहीतरी आईच्या नावे धर्मादाय करावयाचा होता. त्यांनी एक सुंदर सोन्याचे जडावाचे पानपत्र तयार केले; आणि मग ते विद्यासागरांना अर्पण करावयाचे असे ठरविले. विद्यासागरांपेक्षा जास्त पवित्र ब्राह्मण कोण मिळणार ? परंतु विद्यासगार या गोष्टीस कबूल होईनात. शेवटी गुरुदास मोठ्या प्रेमाने म्हणाले, ‘माझ्या आईसाठी हे मी देतो आहे ना ?’ झाले. ‘आई’ या दोन अक्षरी मंत्राचा नेहमीप्रमाणे परिणाम

झाला. आई या शब्दाने ईश्वरचंद्र वश व्हावयाचेच. मला आई नाही असे कोणी म्हटले की विद्यासागर त्याच्यासाठी रडायचे. आई हे त्यांचे जीवन होते. त्रिभुवनातील सौंदर्य 'आई' या दोन स्वरांत साठविले होते. सर्व पावित्र्या, सर्व चांगुलपणा सर्व प्रेम यांचे ठिकाण, एकमेव निवासस्थान म्हणजे हे दोन स्वर.

विद्यासगार यांनी ते मानपत्र घेतले. गुरुदासांसारखा मातृभक्त दाता व विद्यासागरांसारखा परम मातृभक्त या दानाचा परिग्रह करणारा याहून मोठा योगायोग कोठे जुळून येणार? या करंडकावर खालील अनुष्टुप् वृत्तातील श्लोक गुरुदासांनी कोरविला होता.

'पानपात्रामिदं दत्तं विद्यासागरशर्मणे ।।
स्वर्गभावतया मातुर्गुरुदासेन श्रद्धया ।।१।।'

कैलासचंद्र बसू म्हणून दुसरे एक बडे गृहस्थ विद्यासागरांचे मित्र होते. यांनी विद्यासागरांचा एक मोठा फोटो त्यांच्याकडून स्वत:साठी मागून घेतला. आपल्या घरी आणून त्याच्याखाली खालील श्लोक त्यांनी मोठ्या प्रेमाने लिहिला;

'श्रीमानीश्वरचंद्रोयं विद्यासागरसंज्ञकं:
भूदेवकुलसंभूतो मूतिमद्दैवतं भुवि ।।'

विद्यासागरांचे अनेक फोटो, ज्यांच्या खाली ही कविता लिहिली आहे, असे बाजारात विकण्यात येऊ लागले. शेवटी एक दिवस हा फोटो विद्यासागरांच्या दृष्टीस पडला. त्यांना ही कविता फार आवडली. ते विनोदाने म्हणाले, 'मी श्रीमान् म्हणजे सुंदर आहेच कारण माझे तोंड कुरूप झाले आहे ! मी तर त्या ओरिसा ब्राह्मणांप्रमाणे दिसतो. (हे ओरिसा ब्राह्मण स्वयंपाकी म्हणून ठेवण्यात येत. त्यांच्या डोक्यावर शेंडीचा एक घेरा असे. विद्यासागर यांच्या डोक्यावर अशा प्रकारची शेंडी होती म्हणून हे साम्य.) ब्राह्मण कुळात जन्मलेला आहे ! आणि मूर्तिमान् दैवत म्हणजे मूर्तिमान पूर्व जन्मांतील कर्मे – कर्मांसारखे अन्य मोठे दैवत नाही. यामुळे तर हे सगळे माझे धिंडवडे चालले आहेत. नानाप्रकारचे दु:खोपभोग घेतो आहे.' अशा प्रकारे कवितेचा अर्थ करून ते हसले. परंतु गंभीरपणे म्हणाले, 'तुम्ही माझ्यावर प्रेम करता हे पुष्कळ आहे. याने मला आनंद आहे, कृतार्थता आहे, परंतु मला देवबीव करू नका. मी साधा तुमच्यासारखाच एक माणूस आहे झाले.'

शहरातील मोठ–मोठे प्रतिष्ठित लोक ज्याप्रमाणे विद्यासागरांना देव मानू लागले, तसे खेड्यातील जनतेचेही होते. विद्यासागरांची कीर्ती या लोकांच्या कानांवर

केव्हाच गेली होती. 'सुरतेस कीरंत बडी, बिनपंख उड जाय' या तुळसीदासांच्या उक्तीप्रमाणे कुरूप विद्यासागरांची कीर्ती केव्हाच दशदिशांमध्ये पसरली होती. एकदा ते एका खेड्यात गेले. त्यांना पाहावयासाठी लोकांच्या झुंडी लोटल्या. वृद्ध-लहान, नर-नारी सर्वांचे घोळके जमले. त्या समूहात एक मोठी पोक्त बाई होती; ती फार उतावीळ झाली व म्हणू लागली, 'आहेत तरी कोठे ते विद्यासागर? मला मेलीला अजून दिसतही नाहीत.' तेव्हा तिच्या जवळच्या एका इसमाने तिला विद्यासागर दाखविले. 'इश्श, हेच का ते मोठे गाजलेले विद्यासगार; ढोपरपंचा नेसलेला आहे आणि दिसतो तर भुतासारखा; मुळीच पाहावेसे वाटत नाही त्यांना.' असे म्हणून ती बाई मोठ्या फणकाऱ्याने निघून गेली. विद्यासागर यांचा पोषाख साधा असे. एक पंचा व अंगावर एक उपरणे म्हणजे झाले.

योग्य माणसास ईश्वरचंद्र नेहमी समाजात पुढे आणावयाचे. नाही तर समाजात ज्यांच्यात मोठी कर्तबगारी नाही, असे लोकही मोठ्या जागेवर आढळतात. कालीप्रसादसिंह हे एक श्रीमंत गृहस्थ होते. महाभारताचे सुंदर बंगाली भाषांतर यांनी करविले. हिंदू पेट्रियट हे वृत्तपत्र यांच्याच मालकीचे होते. याची व्यवस्था ठेवण्यास, कोण संपादक नेमावे वगैरे काम ते विद्यासागर यांना सांगत. हरिश्चंद्र मुखर्जी हे प्रथम या वृत्तपत्राचे संपादक होते. हे फार तरतरीत व हुशार होते. कर्तबगार असून लवकरच हे लोकांच्या शिरी शोभतील असे वाटत होते. परंतु दैववशात ते लवकरच आपले कार्य सोडून देवाच्या घरी गेले. आता दुसरा संपादक कोण नेमावयाचा? विद्यासागर यांनी कृष्णदास पाल यांना ती जागा दिली. कृष्णदास हे मोठे मनुष्य होते. त्यांनी आपली जबाबदारी नीट पार पाडली.

एकदा कर्जमुक्त व्हावे म्हणून विद्यासागर ह्यांनी आपल्या छापखान्यातील १/३ भाग विकला. त्यांच्याजवळ दोन छापखाने होते. एक स्वतःच्या मालकीचे संस्कृत यंत्र (ग्रेस) नी दुसरे त्यांच्याकडे गहाण पडलेले यंत्र. स्वतःच्य छापखान्यातील १/३ भाग त्यांनी विकला. पुढे त्यांना असे दिसून आले की, हा जो गहाण छापखाना आहे त्याची व्यवस्था नाही. त्यांना स्वत: आता देखरेख करता येत नव्हती. यामुळे हा छापखाना पण विकून टाकावा, असा विद्यासागर विचार करीत होते. व्रजेंद्रनाथ मुखर्जी म्हणून एक तरुण गृहस्थ होते. ते विद्यासागरांकडे आले आणि म्हणाले, 'माझ्या ताब्यात जर हा 'प्रेस' छापखाना दिलात तर जेणेकरून आपणास संतोष व समाधान होईल अशा प्रकारची व्यवस्था मी राखण्याची शक्य ती खटपट करीन.' विद्यासागरांनी

मोठ्या आनंदाने ही गोष्ट मान्य केली. आता तो छापखाना व्रजेंद्रनाथांच्या देखरेखीखाली आला. परंतु ईश्वरचंद्रांनी मनाने तो त्यांनाच कायमचा देऊन टाकला. व्रजेंद्रनाथ मुखर्जी खर्चवेच जाता उरलेले पैसे विद्यासागरांकडे घेऊन आले. विद्यासागर म्हणाले, 'नको; मला त्यातील एक पैही नको; मी तो छापखाना तुला दिला आहे. त्याची जरी २०,००० रु. किंमत असली तरीसुद्धा मी पै घेणार नाही. सर्व छापखाना मी तुला दिला आहे. विद्यासागरांच्या उदारपणाला सीमाच नव्हती.

याच सुमारास त्यांनी सरकारचे काही पैसे कर्जाऊ म्हणून देऊन टाकले. ४९११-५-१इतकी रक्कम त्यांनी सरकारात भरली. ही रक्कम कशासाठी विद्यासागरांना देण्यात आली होती, याचा सरकारजवळ जमाखर्च नव्हता, परंतु विद्यासागर म्हणाले, 'हे सरकारचे मला देणे आहे. कदाचित शाळा वगैरे स्थापण्यास सरकारने ही मदत पूर्वी दिली असेल. यंगसाहेबांनी शाळांच्या खर्चाचा हिशोब झिडकारला व नामंजूर केला. तर पूर्वी दिलेली तरी सरकारी मदत कशासाठी पाहिजे, हे एक प्रकारचे कर्जच झाले ! कदाचित अशा भावनेने सव्याज रक्कम विद्यासागरांनी परत केली असेल. सरकारजवळ हिशेब नव्हते तरी सरकारने ही रक्कम स्वीकारली. देणाऱ्याने मोठेपणा दाखविला तर घेणाऱ्याने नको का दाखवायला? परंतु आमच्या सध्याच्या सरकारला इतका मनाचा मोठेपणा आहे कोठे ?

अशा प्रकाराचा विद्यासागरांचा आयुष्यक्रम चालला होता. लोककल्याण हा त्यांचा एकमेव व्यवसाय होता. परंतु त्यांची प्रकृती त्यांचे वडील निवर्तल्यापासून चांगली नव्हती. ती दिवसेंदिवस जास्त बिघडत चालली. विद्यासागरांना फार पूज्य मानणारे चंडीदास हे एकदा त्यांना म्हणाले, 'आपण कलकत्ता सोडून दुसरीकडे का जाऊन राहात नाही? येथे आपली प्रकृती नीट राहात नाही.' विद्यासागर हा प्रश्न ऐकून एकदम रडू लागले व म्हणू लागले, 'अहो मी गेल्यावर या माझ्या लोकांना मदत कोण करील? शेकडो लोकांना माझी नियमाने मदत मिळते, कोणास चार आणे, कोणास आठ आणे, कोणास रुपया, कोणास पाच रुपये याप्रमाणे महिना माझे ८०० रुपये केवळ यासाठी खर्च होतात. आता कदाचित मला दुसऱ्याच्या स्वाधीन पैसे करून जाता येईल. एखाद्या गृहस्थास या सर्व लोकांची व्यवस्था लावावी असे पैसे देऊन सांगितले म्हणजे झाले असे तुम्ही म्हणाल, परंतु हा प्रयत्न अगदी फुकट व व्यर्थ आहे असे मला अनुभवांती कळले आहे. मागे मी एकदा परागावी गेलो होतो. एका गृहस्थाजवळ २५०० रु. या दानधर्मासाठी देऊन ठेविली. परंतु मी तेथे

गेलो होतो तेथे येथील माझ्या लोकांची पत्रांवर पत्रे मदतीसाठी येऊ लागली. माझ्याने तिकडे राहवेना. मी आल्यावर त्या गृहस्थास विचारले, 'आपणाजवळ मी पैसे देऊन गेलो होतो, तरी आपण ते त्या लोकांना का दिले नाहीत?' 'माझ्या कामासाठी मी खर्च केले; माझा नाइलाज झाला. मी मोठ्या आपत्तीत पडलो होतो.' असे उत्तर त्या गृहस्थाने मला दिले. मी २५०० रुपये कर्जाऊ काढले व माझ्या लोकांना मदत करू लागलो. परंतु त्या गृहस्थाने माझे पैसे अद्याप परत केले नाहीत. अशा प्रकारची आपल्या लोकांची स्थिती. मग मी परगावी कसा जाऊ? यांची दु:खे कोण निवारण करील ?' विद्यासागराचे हे शब्द ऐकून चंडीदास यांना गहिवरून आले व 'केवढा थोर पुरुष' असे शब्द त्यांच्या तोंडावाटे बाहेर पडले.

विद्यासागर कधी-कधी खर्माटाड नावाच्या प्रांती आपल्या बंगल्यात राहावयास जात. खर्माटाड हा प्रांत किंवा परगणा बिहारमध्ये आहे. तेथे संताळ लोक राहतात. या संताळांना नाना प्रकारची मदत विद्यासागर करावयाचे. आपल्या बंगल्याभोवतालच्या बागेची काळजी घ्यावयास त्यांनी एक नोकर ठेविला होता. हा फार प्रामाणिक होता. विद्यासागर यांचा त्याच्यावर लोभ जडला. विद्यासागरांचा मुलगा नारायण हा त्याला लिहा-वाचायला शिकवी. विद्यासागरांनी पुढे त्याचे लग्नसुद्धा लावून दिले. या संताळ लोकांना जेऊ-खाऊ घालावे, त्यांना कपडेलत्ते द्यावे असा विद्यासागरांचा येथील क्रम होता. यामुळे त्या सर्व संताळ लोकांचे विद्यासागरांवर फार प्रेम व भक्ती जडली. विद्यासागर आले की हे सर्व संताळ लोक काही ना काही चीज घेऊन त्यांना भेटायला येत. कोणी सुंदर व सुगंधी रानफुले आणीत. एकदा एका संताळाने एक कोंबडी विद्यासागरांना भेट म्हणून आणली. विद्यासागर कोंबडी कशी घेणार ? बंगाली ब्राह्मण मासे सेवन करतात; परंतु मांस ते सेवन करीत नाहीत. जेव्हा विद्यासागर कोंबडी घेईनात, तेव्हा तो संताळ रडू लागला. 'महाराज, आपण आलात व माझ्याजवळ दुसरे तिसरे काही नव्हते; म्हणून ही एक कोंबडी मात्र होती तेवढी आणली; तिचाही आपण स्वीकार करीत नाही. तेव्हा दुर्दैव माझे. माझे भाग्य नाही आपणास काही अर्पण करण्याचे, दुसरे काय ?' हे संताळाचे शब्द ऐकून दयासागर हेलावला व विद्यासागरांनी ती कोंबडी ठेवून घेतली व मग त्या संताळास न कळत ती दुसऱ्यास देऊन टाकली.

राजेरजवाडे यांचासुद्धा विद्यासागरांवर विश्वास. टिळक हे ज्याप्रमाणे जगन्नाथमहाराजांच्या इस्टेटीसाठी जपले व अलौकिक मित्रप्रेम दाखविते झाले,

त्याप्रमाणे कांदी संस्थानच्या राणीचा कारभार ईश्वरचंद्रांनी पाहिला. राणीचा मुलगा लहान होता. कोर्ट ऑफ वार्डच्या ताब्यात हे संस्थान देऊन सरकार काही युरोपीय व्यवस्थापक तेथे ठेवणार होते. परंतु विद्यासागर यांनी खटपट करून राणीचा कारभार आपल्या हाती घेतला व अत्यंत काळजीपूर्वक सर्व कारभार त्यांनी पाहिला.

विद्यार्थ्यांच्या चळवळीत ते विशेष भाग घेत नसत. विद्यार्थ्यांबद्दल प्रेम त्यांच्या मनात फार असे. ते मेट्रोपॉलिटन संस्थेचे तर जीव होते. परंतु एकदा एक विशेष प्रसंग घडून आला. कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांनी बंगाली विद्यार्थ्यांना उद्देशून काही अपशब्द उच्चारले. 'खोटे बोलणारे, लफंगे, फसवे, अप्रामाणिक, आतल्या गाठीचे' वगैरे मेकॉलसाहेबांनी जी पूजा बंगालीबाबूंची केली, त्याच वाक्पूजेचा पुनरुद्धार या प्रिन्सिपॉलसाहेबांनी केला. मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी संतापून संप केला. विजय गोस्वामी यांनी या विद्यार्थ्यांचे पुढारीपण स्वीकारले होते. गोल-गोल दिघी घाटावर विद्यार्थ्यांची प्रचंड सभा भरली. या घाटावर विद्यासागर यांचा अर्धपुतळा सध्या शोभत आहे. या सभेस आपण अध्यक्ष व्हा अशी विद्यासागरांना विद्यार्थ्यांनी विनंती केली. विद्यासागर अध्यक्ष झाले. 'तुम्ही पुन्हा कॉलेजमध्ये जा; कशाला प्रकरण उगीच चिघळविता?' असे विद्यासागर मुलांना म्हणाले. परंतु विजय गोस्वामी याने विद्यासागरांचे मन वळविले. सर्व राष्ट्राची बदनामी ज्याने केली, त्याने क्षमा मागितली तरच आम्ही कॉलेजमध्ये जाणे योग्य होईल. असे सांगून त्याने विद्यासागरांची समजूत घातली. विद्यासागर यांनी लेफ्टनंट गव्हर्नरांची भेट घेऊन प्रकरण तडीस न्यावे असे ठरले. विद्यासागर हे गर्व्हनरांकडे गेले; त्यांनी प्रिन्सिपॉल यांना बोलावले. नंतर उभयतांत बोलणी होऊन विद्यासागर यांनी विद्यार्थी व प्रिन्सिपॉल यांचा समेट कॉलेजमध्ये करून घ्यावा, असे ठरले. मेडिकल हॉलमध्ये सभा भरली. तेथे क्षमा मागणेवजा भाषण प्रिन्सिपॉलनी केले, त्यांनी दिलगिरी प्रदर्शित केली. ही क्षमा जाहीररित्या मागावयास ते तयार नव्हते एवढेच. विद्यासागरांनी लहानसे भाषण करून सर्वांचा सलोखा घडवून आणला, हा विजय गोस्वामी विद्यार्थी पाच वर्षे शिकला, परंतु शेवटच्या वर्षी त्याने कॉलेज सोडले व तो विरक्त झाला. पुढे विजय गोस्वामी हे साधू झाले. चित्तरंजन दासांचे हे गुरू होते. (अध्यात्मिक गुरू) विजय गोस्वामीबद्दल विद्यासागर यांचा फार अनुकूल ग्रह झाला व ते त्याला मनात मोठा मानीत.

विद्यासागरांना स्वत: दु:ख झाले तरी ते दु:ख इतरांना कदापि दाखवीत नसत. त्यांची सहनशक्ती फार लोकोत्तर होती; इच्छाशक्ती दांडगी होती. जनकाप्रमाणे जे

स्थितप्रज्ञ होते. जनकराजाची अशी गोष्ट सांगतात की, एक हात अग्नीमध्ये ठेवून दुसऱ्या हाताने ते भोजन करीत. देह ही लाकडाची मोळी आहे हे तो जिवंतपणी दाखवी. विद्यासागर यांच्या अंगावर मोठमोठी वाळके येत. एकदा त्यांच्या पाठीवर एक मोठे थोरले वाळूक आले होते. ते कापून टाकावयाचे होते म्हणून एकदा एक डॉक्टर विद्यासागरांकडे आला होता. त्यास वेळेस विद्यासागरांकडे कोणी दोन भाऊ आपली मालमत्ता कशी वाटावी हे ठरविण्यासाठी आले होते. विद्यासागर हे मध्यस्थ किंवा पंच होते. विद्यासागर या आलेल्या बंधुद्वयाजवळ बोलत होते व डॉक्टर पाठीवर शस्त्रक्रिया करीत होते. शस्त्रक्रिया संपली, परंतु विद्यासागरांचे तिकडे लक्षही नव्हते. किती सहनशीलता!' 'सुखदुःखे समेकृत्वा' असे जीवन चालविणारे विद्यासागर स्थितप्रज्ञच नव्हेत तर काय म्हणायचे ?

आता विद्यासागर वृद्ध झाले. मनाचा उत्साह पूर्ववत् असला तरी शरीरात त्राण राहिले नव्हते. १८८८ मध्ये त्यांची पत्नी निघून गेली. संसाररथाचे एक चाक मोडून पडले. 'आता एकच चाक राहिले. आता आणखी किती दिवस जगायचे?' असे विद्यासागर म्हणून लागले. त्यांस एक वर्षभर अतिसारापासून त्रास होत असे. हाच रोग पुढे बळावला. या रोगास विप्रूचिका असे म्हणतात. एक प्रकारचा अतिसारच तो. शेवटी खंगत खंगत विद्यासागर इसवी १८९१ मध्ये इहलोक सोडून निघून गेले. गरिबांचा कैवारी, दुःखितांचा आधार, सरकारचा सल्लागार, विद्वानांचा अग्रणी, विद्यार्थ्यांची कामधेनू, विश्वाचा सखा हा लोक सोडून निघून गेला. मरणापूर्वी थोडेच दिवस सरकारने सी. आय. ई. ही पदवी देऊन स्वतःची गुणज्ञता शेवटी तरी व्यक्त केली व स्वतःचा गौरव करून घेतला. त्या दिवशी सर्व कलकत्ता शहरातील बाजार बंद होता. शाळा, महाशाळा, सरकारी कामे सर्व बंद होती. मोठी मिरवणूक निघाली. श्रीमंत, गरीब लोक तर धायीधायी रडले. अशा सर्व जनतेच्या अश्रुपुरात विद्यासागरांच्या देहास अग्नी देण्यात आला. विद्यासागरांचा पार्थिव भाग गेला, परंतु त्यांची सत्कृत्ये, त्यांचे सद्गुण ही जगातून कधीही जाणार नाहीत. ती सदैव लोकांना उन्नत करतील, उदार करतील यात शंका नाही. सगळीकडून दुखवट्याचे संदेश आले. स्मारके झाली. कोणी शिष्यवृत्त्या ठेवल्या. कोठे अर्धपुतळे उभारण्यात आले. बेथून संस्थेतील विद्यार्थिनींनी फंड जमवून विद्यासागरांच्या नावे शिष्यवृत्ती ठेवली. अशी स्मारके लोक करू लागले. या बाह्य स्मृतींपेक्षा खरी स्मृती ही आंतरिक असते; आणि बंगाली जनतेत राममोहनराय यांच्या खालोखाल विद्यासागरच पूज्य मानले

जातात, हे साहजिकच आहे. विद्यासागर यांचे राहाते घर, जेथे ते बसत-उठत, जेथे अनेकांना त्यांनी साहाय्य केले, ते त्यांचे कलकत्त्यातील भव्य घर, जेथे त्यांचे वाचनालय व ग्रंथालय होते ते घर पुढे लिलावात् विकले जाणार होते. परंतु एका हिंदी व्यापारी कंपनीने ते घर विकत घेऊन आपला 'स्टोअर' तेथे उघडला आहे. हे घर अद्याप कलकत्त्यात उभे आहे.

विद्यासागरांच्या खेड्यातील जळलेल्या घराचे अवशेष अद्याप दिसतात व लोक प्रेमाने व दुःखाने ते दाखवितात.

विद्यासागर यांनी आपले मृत्युपत्र मरणापूर्वी काही वर्षे लिहून ठेवले होते. त्यातील काही ठळक गोष्टी येथे सांगतो. त्यांनी आपल्या इस्टेटीची व्यवस्था ट्रस्टींकडे सोपविली होती.

दरमहाच्या देणग्या

१०० – खेडेगावची मातृभूमीतील शाळा.
 ५० – तेथील दवाखान्यास
१०० – विधवा पुनर्विवाह फंड
३११ – इतर शैक्षणिक संस्था वगैरे.
-----
५६१ रुपये महिना इस्टेटीमधून घ्यावेत.

माझे नोकर मी मरेपर्यंत माझ्या घरात राहिले, तर त्यांना प्रत्येकी ३०० रुपये एकदम द्यावेत. यातील नोकरांची नावे –

१) जगन्नाथ चतर्जी, २) गोविंदचंद्र गूड, ३) उपेंद्रनाथ पलित अशी होती.

दुसरे ६ इसम आहेत. त्यांना सर्वांना मिळून मी १०५ रुपये देतो. त्यांना ही रक्कम चालू ठेवावी असे ट्रस्टींना वाटले तर त्यांनी चालू ठेवावेत, नाहीतर बंद करावेत. माझ्या इस्टेटीचा कोणताही भाग विकण्यास ट्रस्टींना परवानगी आहे.' आपल्या मुलींना, मुलाला व भावांना काही पुस्तकांचे हक्क त्यांनी दिले. ईशान हा धाकटा भाऊ – त्याला त्यांनी बरेच दिले होते.

+++

ईश्वरचंद्रांचा गुणगौरव

ईश्वरचंद्रांचा गुणगौरव किती करावा ? त्यांचे गुण मी पामराने वर्णावे तरी किती ? परंतु पवित्रांचे गुणवर्णन करून मलिन मन निर्मळ होते. पावित्र्याच्या संगतीत मनोदुर्बलत्व दुरावून मन प्रबळ व मोहादिकांना मारण्यास तयार होते म्हणून त्यांच्या गुणांचा अल्पमतीप्रमाणे येथे विस्तार करण्याचे योजिले आहे. ईश्वरचंद्रांच्या अनेक गुणांत जर पटकन लक्षात येण्यासारखा, डोळ्यांत भरण्यासारखा कोणता गुण असेल, तर तो परोपकार-बुद्धी हा होय. किती परोपकाररत बुद्धी; ईश्वरचंद्रांची ही भूतदया, ही निरपेक्ष प्राणिमात्रांवरील प्रेमवृत्ती पाहिली म्हणजे मला एकनाथांची आठवण होते. त्यांच्यासारखे लोक जगात किती असतील हा प्रश्न डोळ्यांसमोर उभा राहातो. स्वार्थात लडबडून राहाणाऱ्या असंख्य जिवात असा थोर पुरुष मोठ्या भाग्याने निर्माण होत असतो. ईश्वरचंद्रांची परोपकारता निस्सीम होती. वाचकांच्या मनावर बिंबविण्यासाठी मी आयुष्यातील काही कथा देतो. या कथा दंतकथा नाहीत ; प्रत्यक्ष घडलेल्या या गोष्टी आहेत. प्राचीन का तील शिबी-श्रियाळा-वर आपला विश्वास नसेल ; या व्यक्ती कल्पनासृष्टीत निर्माण झाल्या असे कोणी म्हणेल, परंतु ईश्वरचंद्रांचे तसे नाही. ईश्वरचंद्र खरोखरचे गेल्या शतकात होऊन गेलेले थोर पुरुष. त्यासंबंधी संशय घेण्यास कोणास जागा नाही. त्यांच्या उदारपणाची मागील प्रकरणात काही उदाहरणे आलीच आहेत. परंतु आणखी काही येथे देतो.

एकदा कलकत्ता शहरात कॉलऱ्याची साथ आली होती. हजारो लोक मरत होते. पुष्कळ लोकांना औषधोपचार वगैरे पोचण्याची मारामार. एक दिवस काय झाले. पहाटेच्या सुमारास विद्यासागर कोठे तरी बाहेर जात होते, तो रस्त्यात एका कंदिलाजवळ त्यांना काय आढळले? एक मेहतर एका दिव्याच्या खांबाजवळ पडलेला होता. त्याची दशा फार कष्टमय झाली होती. त्याच्याजवळ कोणी

चिटपाखरूसुद्धा नव्हते. ईश्वरचंद्र त्यांच्याजवळ गेले. त्यांनी त्यांच्या अंगाला हात हात लावला तर सडकून ताप भरलेला. त्यांनी एक क्षणाचाही मनात विचार न करता मेहतरास खांद्यावर घेतले व ते आपल्या घरी आणल्यावर त्यास बिछान्यावर त्यांनी निजविले. त्याच्या अंगात स्वच्छ व उबदार कपडे घातले आणि डॉक्टरांना बोलावणे धाडले. डॉक्टर आला. त्याने प्रकृती वगैरे पाहून औषधोपचार केले. पुढे काही दिवसांनी मेहतर बरा झाला. ईश्वरचंद्रांच्या प्रयत्नाला यश आले. पंधरा दिवसांनी मेहतर आपल्या घरी गेला. जाताना ईश्वरचंद्रांनी त्याला कपडे वगैरे देऊन सांगितले की, 'जर तुला काही उणे पडले तर मला ताबडतोब कळवीत जा. मनात संकोच मानू नकोस.' विद्यासागरांचे हे भूतप्रेम एकनाथांनी महाराचे वाळवंटातील पोर उचलून घेतले, त्याच्या बरोबरची नाही काय ?

दुसऱ्या एकास मेहतराची अशीच गोष्ट आहे. तो विद्यासागरांकडे आला व म्हणाला, 'महाराज माझी बायको आजारी आहे, आपण याल तर बरे होईल.' रात्रीची वेळ होती तरी ताबडतोब ईश्वरचंद्र गेले. ईश्वरचंद्रांना होमिओपॅथीचे ज्ञान होते. त्या ज्ञानाचा ते पुष्कळ वेळा उपयोग करीत व रोग्यांना गुणही येत असे. परोपकार करणाऱ्यांना वैद्यकीचे ज्ञान असणे फार आवश्यक आहे. मेहतराच्या बायकोसही जेव्हा बरे वाटू लागले तेव्हा ईश्वरचंद्र घरी आले व तिच्या औषधपाण्याची त्यांनी व्यवस्था केली.

बंगालमध्ये अनावृष्टीने नव्हे तर अतिवृष्टीने पुष्कळ वेळा दुष्काळ पडतात. मोठमोठ्या नद्यांना पूर येतात व शेकडो गावे जलमय होऊन हजारो लोक भिकेस लागतात. असाच एकदा एक मोठा दुष्काळ पडला होता. विद्यासागर यांनी या दुःखितांच्या अन्न-वस्त्रासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. एका खेड्यात जाऊन ते स्वतः राहिले व सर्व दुष्काळग्रस्तांना अन्न मिळावे यासाठी त्यांनी तेथे अन्नसत्र घातले. दुष्काळात सापडलेले सर्व लोक तेथे यायचे. या लोकांना रोज खिचडी खायला मिळे. एक दिवस काही दुष्काळग्रस्त लोक विद्यासागरांकडे आले व म्हणाले, 'महाराज, या खिचडीचा आता अगदी वीट आला ; काही तरी खाण्यात पालट करा. उद्या आम्हाला भात, भाजी असे अन्न द्याल का ?' विद्यासागर कळवळले व म्हणाले, 'होय, उद्या तुम्हाला तुमच्या इच्छेप्रमाणे भोजन मिळेल.' दुसऱ्या दिवशी भात, भाजी वगैरेचा बेत होता. स्वयंपाक झाला, पंक्ती मांडल्या गेल्या. पोटाची दामटी वळलेले, पाठपोट एक झालेले असे बुभुक्षित लोक आपापल्या पात्रांवर बसून

राहिले. अन्न वाढण्यात आले. भात वाढून झाला, अद्याप भाजी वाढायची होती परंतु ती येण्यास जरा अवकाश होता. एका मनुष्यास धीर धरवेना. त्याने कोरडाच भात भराभरा तोंडात कोंबला व घशास घास लागून तो गुदमरून तेथेच मरण पावला. विद्यासागर धावत आले, परंतु करणार काय? विद्यासागर सारखे रडत राहिले. 'आपण कालवण वाढायला उशीर लावला ; परंतु आता बोलून काय फायदा' असा विलाप विद्यासागर यांनी चालविला. पुष्कळांनी त्यांस समजाविले. परंतु त्यांचे सांत्वन होईना. या गोष्टीचे जेव्हा-जेव्हा त्यांना स्मरण होई, तेव्हा-तेव्हा ते सद्गदित होत.

विद्यासागर हे अनाथांचे नाथ, दुर्बलांचे वाली. ज्यांना दुसरीकडे आधार नाही त्यांना त्यांच्याजवळ तरी आधार मिळायचा. ते गरिबांची कल्पवल्ली होते. कामधेनू होते. कलकत्त्यास एक पोलीस-सब-इन्स्पेक्टर होता. त्याच्यावर काही आरोप आला होता. तो पोलीस-सब-इन्स्पेक्टर सच्चा होता. त्याच्यावर आरोप आला खरा ; परंतु त्यातून मुक्त होण्यासाठी बॅरिस्टर देणे जरूर होते. पोलीस-सब-इन्स्पेक्टरने एक बॅरिस्टर मिळविला. त्यास रोज ७०० रुपये द्यायचे त्याने कबूल केले. घराकडून पैसे येतील, अशी पोलीस-सब-इन्स्पेक्टरने व्यवस्था केली होती. परंतु दैववशात पैसे वेळेवर आले नाहीत. उद्याची कोर्टातील तारीख. बॅरिस्टरांना पैसे तर उद्या दिले पाहिजेत. पैसे तर घराहून आले नव्हते. बॅरिस्टर मिळाला नाही तर खटला बुडणार. मग आपणावर कदाचित आरोप शाबीत होणार व सर्वत्र नाचक्की होऊन पोटावर पाय येणार असे त्याच्या मनात आले. काय करावे हे पोलीस-सब-इन्स्पेक्टरला सुचेना. संकटात साधारण मनुष्य त्रस्त होतो; त्याची बुद्धी मंद होते ; विचार अस्तंगत होतो. सब-इन्स्पेक्टरचा एक मित्र वि द्यासागरांचा मित्र होता. हा सब-इन्स्पेक्टरला घेऊन विद्यासागरांकडे आला. सब-इन्स्पेक्टर विद्यासागरांना म्हणाला, 'महाराज, आपली व त्या बॅरिस्टरांची पूर्वीची चांगली ओळख आहे. तर आपण जर त्यांना चिठ्ठी दिलीत तर ते माझ्याजवळून ताबडतोब पैसे मागणार नाहीत. मी सात दिवसांत पैसे परत करतो. तर आपण त्यांना धीर धरण्यास सांगा. आपल्या शब्दास लोक वेदवाक्याप्रमाणे मानतात.' विद्यासागरांना काय करावे हे समजेना. बॅरिस्टर पूर्वीच्या काळी त्यांच्या ओळखीचा होता. परंतु इंग्लंडहून आल्यापासून विद्यासागर त्यांच्याकडे एकदाही गेले नव्हते. असे असल्यामुळे त्यांना असे पत्र लिहिणे म्हणजे सभ्याचाराचा भंग होतो, असे वाटले. विद्यासागर म्हणाले. 'छे: माझ्याच्याने हे काम होणार नाही. माझा व त्या गृहस्थाचा नीट परिचय नसल्यामुळे ही गोष्ट मी कशी बरे करू?' ईश्वरचंद्रांचे

हे शब्द ऐकून सब-इन्स्पेक्टर फार खिन्न झाला. तो रडवेला झाला. सद्गदित होऊन तो म्हणाला, 'मी आजपर्यंत ऐकत होतो की ज्याला जगात कोठे आधार नाही त्याने आपल्याकडे यावे, की तो सनाथ झालाच. आपली कीर्ती ऐकून अशरण असा मी आपल्या पायांकडे धावत आलो. आपणही आश्रय देत नाही तर माझे दुर्दैव पुरेच ओढवेल. आईने मुलास दूर लोटावे, वासरास गाईने लाथ मारावी, पाडसास कुरंगीने पिटाळून लावावे, तसेच नाही का? असो. आपली मर्जी. माझेच नशीब; नाहीतर आपणांसारखेही आज पाठमोरे का व्हावे ?' सब-इन्स्पेक्टरचे हे केविलवाणे शब्द ऐकून विद्यासागर विरघळले. त्यांचे लोण्याप्रमाणे मऊ मन वितळले. पत्र लिहावयास त्यांनी हाती कागद तर धरला आणि पत्रात 'प्रिय बॅरिस्टरसाहेब' एवढेच शब्द त्यांनी लिहिले; परंतु पुढे त्यांच्याने काही एक जास्त लिहवेना. 'मी कसे त्यांना लिहू.' हा प्रश्न पुन्हा डोळ्यांसमोर उभा राहून ते म्हणाले, 'नाही; मला लिहिता येत नाही. मला या बाबतीत काहीच करतास येत नाही.' सब-इन्स्पेक्टरच्या मनात फोफावणाऱ्या आशावल्लीवर वीज कोसळली. हताश होऊन खिन्नवदन होऊन तो जायला निघाला. दरवाज्याकडे इन्स्पेक्टर जाणार तोच त्याला पुन्हा विद्यासागरांनी हाक मारली. विद्यासागर घरात गेले. एक ७०० रुपयांचा चेक त्यांनी त्या सब-इन्स्पेक्टरच्या हवाली केला व म्हणाले, 'हा चेक त्या बॅरिस्टरांना द्या आणि दुपारी ३।। वाजल्यानंतर बँकेत जाऊन हा वटवण्यास सांगा. तोपर्यंत ७०० रुपये तेथे भरून ठेवण्याी मी व्यवस्था करतो. कारण माझ्या नावावर सध्या मुळीच पैसे नाहीत.' इन्स्पेक्टर पुन्हा आनंदी दिसू लागला. आपले पैसे मी तुरुंगात गेलो नाही तर ७ दिवसांच्या आत आणून देईन असे ईश्वरचंद्रांना सांगितले. सब-इन्स्पेक्टर निघून गेले. ईश्वरचंद्रांनी ७०० रुपये दुसऱ्याकडून घेऊन बँकेत नेऊन भरले व बॅरिस्टरसाहेबांना ती रक्कम मिळाली. बॅरिस्टरांनी खटला चालविला व हे सबइन्स्पेक्टर निर्दोषी होऊन सुटले.

खटला होऊन गेल्याला आज ४ था दिवस होता. ईश्वरचंद्र आपल्या दिवाणखान्यात बसले होते. इतक्यात सबइन्स्पेक्टर व त्याचा मित्र दोघे विद्यासागरांकडे आले. 'का आलात? सर्व ठीक आहे ना?' असे विद्यासागरांनी विचारले. 'हो सर्व कुशल आहे. आपल्या कृपेने दोषमुक्त झालो; आणि आज आपले पैसे घेऊन आलो आहे.' असे सबइन्स्पेक्टर म्हणाला. 'पैसे, कसले पैसे?' 'दोन दिवसांपूर्वी आपणाकडून नेले नव्हते का?' 'तर मग तुम्ही मला फसविलेत; माझ्यासारख्या माणसास तुम्ही फसवावे?' विद्यासागर नंतर आपल्या मित्राकडे पाहून म्हणाले, 'आणि

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तुमच्यासारख्यांनी माझी फसवणूक करावी?' विद्यासागर काय बोलतात याची या उभयतांना कल्पनाच होईना. शेवटी विद्यासागर पुन्हा म्हणाले, 'तुम्ही खरोखर पोलीस-सब-इन्स्पेक्टर आहात का ? छे: माझा त्याच्यावर मुळीच विश्वास नाही.' 'आपण जर येथून चार पावले येण्याची कृपा कराल ; तर आपली खात्री पटवून देता येईल.' असे विद्यासागरांचे मित्र म्हणाले. विद्यासागर म्हणाले, 'आजपर्यंत अनेक लोकांनी मजजवळून पैसे नेले, ते सर्व सभ्य लोक होते. परंतु मुदत संपल्यावरही माझे पैसे परत आणून देण्याचे कोणास स्मरण राहिले नाही. आपण तर पोलीस खात्यातले. तेव्हा आपपण पैसे परत आणून द्याल आणि ते पुन्हा सात दिवसांचा करार असता चवथ्या दिवशीच आणून द्याल, हे मला मुळीच विश्वसनीय वाटत नाही. आपण पोलीस खात्यातील खात्रीने नाही. शेवटी विद्यासागरांची त्यांनी खात्री केली व तिघेही मोठमोठ्याने हसले. विद्यासागर विनोदाने म्हणाले, 'पोलीस खात्यात असून असे सचोटीने वागता म्हणूनच तुमच्यावर किटाळ आले. पोलीसखात्यात सच्चा माणूस चोर ठरतो व चोर मान वर करून मिरवतो. आपणासारख्यांवर दोषारोप येणार नाही तर मग कोणावर येणार?' विद्यासागरांच्या बोलण्याची यथार्थता उभयतांना अर्थातच पटली. त्या दोघांना विद्यासागरांनी भोजनासाठी राहावयास आग्रह केला. नंतर दुपारी भोजन वगैरे होऊन मग हे उभयता निघून गेले. असे विद्यासागर होते बरे! किती असे हरीचे लाल जगत असतील?

या सर्व गोष्टींपेक्षा अत्यंत हृदयास हलवून सोडणारी, मनास चटका लावणारी गोष्ट म्हणजे बंगालचे प्रसिद्ध कवी मायकेल मधुसूदन व विद्यासागर यांच्या परस्पर संबंधांची होय. मायकेल हे प्रख्यात नाटककार व कवी. हे आपल्या वडिलांचे एकुलते एक मुलगे. जात्याच फार हुशार व तरतरीत. शाळेत असतांना भूदेव व मधुसूदन हे एका वर्गात असायचे. परंतु संबंध विषयांच्या गुणांनी मायकेल पुढे यावयाचे. मिशनरी लोकांचा त्या वेळेस फार सुळसुळाट असे. त्यांच्या जाळ्यात अनेक लोक सापडत. एका मिशनरी गृहस्थांच्या मुलीवर मायकेलचे प्रेम जडले. तू ख्रिश्चन झालास तर तुला ती मुलगी मिळेल असे त्याला स्पष्ट बजावण्यात आले. झाले. मनाचा विकार बलवत्तर असतो. मायकेल हिंदूचे ख्रिश्चन झाले. बापाने त्यांना घरातून घालवून दिले. 'एक पैही देणार नाही' असे बापाने निक्षून सांगितले. एकुलता एक हुशार व सुंदर मुलगा. आईबापाचे हृदय कसे तीळतीळ तुटत असेल याची कल्पना आपल्याला कशी येईल ? मायकेलने पुष्कळ अभ्यास केला. ते उत्कृष्ट इंग्रजी लिहीत. मद्रासमध्ये

जाऊन त्यांनी काही दिवस वर्तमानपत्रही चालविले. पुढे ते सपत्नीक फ्रान्समध्ये गेले. फ्रान्समध्ये असताना एकदा त्यांची फार विलक्षण स्थिती झाली. परक्या देशात पडलेले. ना स्नेही, ना सोबती. जवळचे द्रव्य सर्व संपलेले. मुलेबाळे भुकेने काहूर करताहेत, अशा वेळी परक्या देशात कोणाजवळ पैशाची याचना करावी? हिंदुस्थानात तरी कोणास पत्र लिहावे? बापाजवळ कुबेरासारखी संपत्ती आहे, परंतु त्यांच्याजवळ कोणत्या तोंडाने मागू असे विचार मनात येऊन मधुसूदन रडले. शेवटी मायकेलनी विद्यासागरांना पत्र लिहिण्याचे ठरविले. विद्यासागर हे कनवाळू आहेत, दुःखितांची दुःखे व अश्रू नाहीसे करणारे आहेत, असे त्यांनी ऐकले होते. मायकेल मधुसुदन यांनी जे पत्र त्यांना लिहिले त्याचा सारांश असा.

‘दोन वर्षांपूर्वी मी तुम्हास सोडून इकडे आलो ; त्या वेळेस माझे हृदय आशेने भरलेले होते ; माझे मन खंबीर होते. मी धीराचा माणूस होतो. परंतु मी अगदी आज हतबल व निराश असा झालेला, दुःखी प्राणी आहे, हे ऐकून तुम्हास जबर धक्का बसेल. येथे पुष्कळ लोकांशी माझे संबंध आले. त्यांच्या निष्ठुर वागणुकीमुळे आज मी मोठ्या संकटात सापडलो आहे. त्यांच्या वर्तणुकीचे कोडे हे मला तर उलगडत नाही आणि ज्या लोकांच्या असल्या वर्तणुकीने मी संकटात आलो, त्यातील एक तर माझा मित्र होता व माझ्यासाठी झटेल असे मला वाटत होते.

मला आज फ्रेंच लोकांच्या कारागृहात जाणे प्राप्त आहे. माझी पत्नी आणि मुलेबाळे यांना उद्या एखाद्या अनाथालयात जाऊन आश्रयार्थ राहिले पाहिजे, हिंदुस्थानात ४००० रुपये माझे येणे आहेत ; परंतु आज माझ्या हातात तर कवडी नाही.

ज्या या कष्टप्रद स्थितीत मी येऊन पडलो आहे, त्यातून सोडविणारा तुमच्याशिवाय अन्य मित्र मला दिसत नाही. तुमचा अनंत उत्साह, तुमचे धीरोदात्त अंतःकरण यांना जागे करा व माझ्या बाबतीत आवश्यक ते ताबडतोब करा. एक दिवसही गमावू नका. एक क्षण गमावणे म्हणजे माझे मरण आहे.

तुम्हांस जी तसदी देणार आहे. त्याबद्दल मी क्षमा मागू का? परंतु असे करावेसे मला वाटत नाही. तुमच्या स्वभावाची मला नीट ओळख आहे. परकीय देशात तुमचा मित्र व देशबंधू अनाथापरी संकटात खितपत पडलेला तुमच्या हृदयास कसा सहन होईल?

मी फ्रान्स सोडून तर कोठे जाणेसुद्धा शक्य नाही; म्हणून मला वरील पत्त्यावरच पत्र लिहा. देव वर आहे; तर मला साहाय्य करा.’

अशा अर्थाचे पत्र विद्यासागरांच्या हातात पडले. विद्यासागर फार विव्हळले. परक्या देशात पोराबाळांनिशी हा मातब्बर घराण्यातील तरुण अशा परिस्थितीत सापडावा. या विचाराने त्यांना चैन पडेना. त्यांनी एक क्षणही फुकट दवडला नाही. ताबडतोब पत्र व १५०० रुपये विद्यासागर यांनी मायकेल यास त्याच्या फ्रान्समधील पत्त्यावर पाठविले. मेघाची चातकाने वाट पाहावी, सूर्याची चक्रवाकाने, चंद्राची चकोराने, हरवलेल्या मातेची बालकाने, परमेश्वराची भक्ताने, त्याप्रमाणे येणाऱ्या टपालाकडे दत्तांची दृष्टी लागून राहिली होती. शेवटी आगबोट आली; टपाल आले. पैसे व पत्र, सर्व मिळाले. काळोखात रविकिरण मिळाला; तुषार्तास सुधासिंधू लाभला, क्षुधार्तास अन्न मिळाले. मायकेल दत्ताचा, आनंद गगनात मावेना. त्यांचे हृदय आनंदाने भरून आले व त्यांनी खालील अर्थाचे सुंदर पत्र विद्यासागरांना लिहिले.

'गेल्या रविवारी २८ ऑगस्ट (१८६४) रोजी सकाळी मी माझ्या लहान्या अभ्यासाच्या खोलीत बसलो होतो. माझी पत्नी रडवेले तोंड करून मजकडे आली व डोळ्यात आसवे आणून म्हणाली, 'मुलांना जत्रेस जाण्याची इच्छा आहे. परंतु मजजवळ फक्त ३ फ्रँक आहेत. तुमचे हिंदुस्थानातील लोक इतके कठोर व निष्ठुर कसे !' मी तिला म्हटले, 'आज टपाल येईल आणि ज्या माणसास मी पत्र लिहिले आहे, तो प्राचीन ऋषीसारखा ज्ञानाचा व धैर्याचा, सद्‌गुणांचा सागर आहे; इंग्लिश माणसाप्रमाणे उत्साहमूर्ती आहे. बंगाली मातेचे त्याचे हृदय आहे. तो खात्रीने उत्तर देईल व ते आज आपणांस मिळेल.' माझे म्हणणे खरे ठरले. एकाच तासाने तुमचे पत्र व पैसे मला मिळाले. हे थोर पुरुषा, हे यशस्विता, हे उदार मित्रा, मी शब्दांनी कसे तुमचे आभार मानू? तुम्ही मला आज तारले आहे.'

अशा प्रकारे विद्यासागर यांनी एका शब्दाने १५०० रुपये पाठवून दिले. पुढे आणखीही जवळजवळ तितकीच रक्कम विद्यासागर यांनी पाठविली. एकंदर ३००० रुपये विद्यासागरांनी मायकेल यांना दिले.

मायकेल बॅरिस्टर होऊन इंग्लंडहून आता परत येणार होते. त्यांना उतरण्यास चांगली जागा पाहिजे म्हणून विद्यासागर यांनी व्यवस्था करून ठेवली होती. एक मोठा बंगला भाड्याने घेऊन तेथे सर्व इंग्रजी थाटमाट, टेबले, खुर्च्या सर्व काही विद्यासागर यांनी आणून ठेवले. परंतु काय? मायकेल हे विद्यासागरांनी ठरविलेल्या बंगल्यात न उतरता दुसरीकडेच कोठे जाऊन उतरले. विद्यासागर यांनी एवढा पैसा खर्च केला व श्रम घेतले, व्यवस्था केली, ती सर्व वाया गेली. मायकेल आता

बॅरिस्टर होऊन आले तरी त्यांच्याने बॅरिस्टरी थोडीच चालणार होती! ते पडले वृत्तीने कवी. इंग्रजी भाषेत काव्य करून मिल्टन व्हावे अशी मायकेलची महत्त्वाकांक्षा. बंगालीत लिहिलेल्या कविता ते फाडून टाकीत व म्हणत 'बंगाली कोणी लिहावे?' शेवटी बेथून यांनी मायकेल यांना सांगितले, 'मित्रा, परकी भाषा कितीही करतलामलवत् झाली तरी त्यात महाकाव्य लिहिणे हे फार अशक्य आहे. या भानगडीत तू पडू नये. आपल्या मायभाषेत तू आपले मन खुले करू शकशील. बेथून यांनी मायकेल यांस मार्गावर आणले. मायकेल बंगाली भाषेमधील एक उत्कृष्ट कवी आहेत. त्यांनी सुंदर नाटके लिहिली आहेत. वाङ्मयात त्यांचे तेज तळपू लागले. परंतु त्यांचे विकार बळावत चालले. वासनांचा पूर मायकेल यांना अडवता येत नसे. ते वासनांना बळी पडत. मद्यपानाचा सुमार त्यांना राहत नसे. ऐषारामात, व्यसनात सर्व पैसे संपू लागले. वडिलांनी पूर्वी पैसे दिले नव्हते तरी मरावयाचे वेळी सर्व इस्टेट पुत्रासच ठेवून दिली होती. कुबेरासारखी संपत्ती, परंतु सर्व गहाण पडली. विद्यासागरांचेच जवळजवळ ८००० रुपये कर्ज त्यांना झाले होते. विद्यासागरांनी दुसऱ्यांचे पैसे घेऊन मायकेलला दिलेले शेवटी त्या सावकारांनी जेव्हा विद्यासागरांना तगादा लावला, तेव्हा विद्यासागर यांनी मायकेलला आपले पैसे परत द्यावयास सांगितले. परंतु ते काही एक जमले नाही. मायकेलची मालमत्ता पुढे गहाण पडली. सावकारांचे तगादे येऊ लागले. सावकारांच्या शब्दांचा मनावर काही परिणाम होऊ नये म्हणून मायकेल सुरापानात वाहू लागले. दुरून सावकार पाहिला की मायकेल बाटली तोंडास लावीत व तर्र होऊन पडत.

अशा प्रकारे मायेकलांची स्थिती फार दुःखद झाली. कर्ज चारी बाजूंनी फोफावले. सागर फुटल्यावर सिकातासेतूचे त्यापुढे काय चालणारे ? शेवटी काय झाले, ते आजारी पडले व एका दवाखान्यात जाऊन राहिले. तेथे अनाथापरी त्यांना मरण आले. असा या थोर पुरुषाचा दुःखद अंत झाला. मायकेलंचे मन फार मोठे होते. बुद्धी थोर होती; कल्पना लोकोत्तर होती; हृदय उदार व कोमल होते; परंतु एका दुर्व्यसनानेही मनुष्याचा कसा अधःपात होतो हे आपणास त्यांच्या चरित्रावरून दिसून येते. पंचपक्वान्नात एक विषबिंदू पडला. दुधामध्ये एक मिठाचा खडा पडला तरी सर्वनाश होतो, तसेच येथे झाले.

मायकेल मेल्यावर सावकार कर्जासाठी विद्यासागर यांच्याकडे येत. विद्यासागर त्यांना म्हणत, 'आता मी एक पैसाही मायकेलांसाठी खर्च करणार नाही. मायकेल

जिवंत होता त्या वेळेस जर मला त्यास मुक्त करता आले नाही, तर आता मेलेल्या मायकेलला मुक्त करून मला काय समाधान मिळणार ? तो जिवंत असता त्याला सावकारांच्या ससेमिऱ्यातून मला सोडविता आले नाही, आता तो गेल्यावर अन्य काही करून काय उपयोग? असे विद्यासागरांचे हृदय विशाल व कृपाळू होते.

एकदा विद्यासागर एका खेडेगावात गेले होते. तेथे एका गृहस्थाच्या घरी त्यांनी एक मुलगा पाहिला. त्या मुलाच्या पायास एक प्रकारचा विशिष्ट रोग जडला होता. तो रोग अशा प्रकारचा होता की, त्याने असे व्हायचे की पाय आखडत-आखडत जावयाचा. विद्यासागर त्या गृहस्थांस म्हणाले, 'आपण आपल्या मुलाला डॉक्टरांकडे का नेत नाही?' 'ह्या गावात डॉक्टर आहेत कोठे? आणि दुसऱ्या मोठ्या शहरात न्यायचे तर फार लांब; तेथे ओळख ना पाळख शिवाय तेथे राहण्याचा खर्च व डॉक्टरांची फी वगैरे फार खर्च येईल.' असे त्या मुलाचा बाप म्हणाला. विद्यासागर म्हणाले, 'समजा, दुसऱ्या कोणी तुमच्या मुलाला बरे करण्यासाठी पैसे दिले, जाण्यायेण्याचा खर्च दिला, कलकत्त्यात सर्व सोय केली तर आपण आपला मुलगा तेथे घेऊन जाल का?' 'आपण थट्टा तर करीत नाही? असा पुरुष या कलियुगात दृष्टीस पडला तर काय होणार नाही.' बाप बोलला. 'पण समजा, असा एक गृहस्थ आहे. तर तुम्ही मुलगा पाठवाल का ?' 'हो, न पाठवायला काय झाले? खुशाल मुलाला घेऊन येईन. परंतु सर्व प्रकरण मज गरिबाच्या गळ्यात न येवो म्हणजे झाले.' 'त्याविषयी तुम्ही निश्चिंत असा.' असे म्हणून विद्यासागरांनी आपल्या स्वतःच्या घरचा कलकत्त्यातील पत्ता त्या गृहस्थांना दिला व सांगितले, ' याठिकाणी जा म्हणजे आपले कार्य होईल.' विद्यासागर निघून गेले. हा गृहस्थ जावे की न जावे याविषयी जरा साशंक होता. त्या गावातील एका गृहस्थास विद्यासागरांचा कलकत्त्यातील पत्ता माहीत होता. त्या माणसाकडे हा वरील गृहस्थ गेला व म्हणाला, 'काय हो, कलकत्त्यात वरील पत्त्यावर कोण गृहस्थ राहात तुम्हास माहीत आहेत का?' त्या मनुष्याने तो पत्ता पाहून म्हटले, 'अहो, हा पत्ता तर विद्यासागर यांच्या घराचा. खुशाल जा. तेथे तुम्हाला घरातल्याप्रमाणे वागविण्यात येईल.' तो गृहस्थ विद्यासागरांकडे मुलास घेऊन आला. त्या मुलाचा पाय नीट औषधोपचारांनी बरा झाला. ईश्वरचंद्रांनी त्याचा सर्व खर्च केला.

ईश्वरचंद्रांच्या अशा कितीतरी गोष्टी सांगाव्या! परंतु आणखी दोन तीन गोष्टींचा उल्लेख करून हे परोपकारकथन पुरे करू.

एकदा एक गरीब मुलगा रस्त्यात विद्यासागर यांच्याजवळ आला. 'महाराज, मला दोन पैसे द्या; मी उपाशी.' असे तो केविलवाणे तोंड करून म्हणाला, 'बाळ, तुला दोन पैशांऐवजी ४ पैसे दिले तर तू काय करशील?' या प्रश्नाला मुलाने उत्तर दिले, 'दोन पैसे आज खाईन आणि दोन पैसे उद्यासाठी ठेवीन.' 'बरे तुला दोन आणे दिले तर तू काय करशील?' 'आज दोन आण्यांची भाजी विकत घेईन व तिचे चार आणे करीन; एका आठवड्यात रुपयासुद्धा करीन.' मुलाचे हे उत्तर ऐकून विद्यासागर प्रसन्न झाले व त्या मुलाला म्हणाले, 'हे पाहा, मी तुला आज दोन आणे देतो; त्याचा रुपया करून मला एक आठवड्याचे दाखव.' 'बरं.' असे मुलगा म्हणाला. ते दोन आणे घेऊन मुलगा गेला. खरोखरच १ रुपया मिळवून आठवे दिवशी विद्यासागरांच्या घरी आला. 'काय, आणलेस पैसे?' 'होय महाराज.' विनयाने व आनंदाने मुलगा म्हणाला. मुलाची कर्तबगारी पाहून ईश्वरचंद्रांनी त्याला लहानसे दुकान घालून दिले व ते चालवायला दिले. दुकानात चांगली किफायत होऊ लागली. पुढे मुलगा मोठा झाला. दुकानाचा व्याप वाढला. या मुलावर विद्यासागर यांचे फार प्रेम बसले. पुढे त्या मुलाचे लग्न करून देऊन त्याचा संसार सुरळीत व सुखाचा विद्यासागरांनी थाटून दिला. विद्यासागर यांना जग कुटुंबाप्रमाणे होते, नव्हे का? विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन संस्थेत कितीतरी विद्यार्थी नादार असायचे. मी गरीब आहे असे सांगितले म्हणजे मिळालीच नादारी. विद्यासागर यांना एखाद्या मुलाला आईबाप नाहीत असे कळले की त्या मुलाची सर्व सोय ते लावीत. 'महाराज, माझी आई नाही.' एवढे म्हटले तरी पुरे, की विद्यासागर रडावयास लागायचे आणि त्या मुलाला नादारी मिळायची. 'आई नाही' एवढे प्रशंसापत्र असले म्हणजे पुरे. असे पुष्कळ विद्यार्थी विद्यासागरांच्या या उदारतेमुळे पुढे कर्ते झाले व आज कलकत्त्यात प्रतिष्ठित व श्रीमंत म्हणून मिरवत आहेत.

एकदा विद्यासागर आईने अगत्याने बोलावल्यामुळे दामोदर नदी पाहून कसे रातोरात घरी आले, ते मागे सांगितलेच आहे. त्या रात्री विद्यासागर यांना जेवावयास बारा वाजले. दमून भागून आलेला मुलगा. आईने ताजा स्वयंपाक केला व मुलास वाढले. त्या वेळेस मध्यरात्रीचा समय झाला होता. विद्यासागरांचे जेवण चालले असता शेजारच्या घरात नवरा-बायको बोलत होती. 'उद्या आता मुलास खावयास काय द्यायचे बरे? आज थोडे पीठ होते ते संपले. आपण तर अन्नाशिवाय रहिलात कसे करावे?' असे बायको नवऱ्यास बोलत होती. हा संवाद, ही कहाणी विद्यासागर

व त्यांची आई यांच्या कानावर पडली. मग काय, विद्यासागरांना ते अन्न कसे गोड लागेल? विद्यासागरांच्या आईने त्या नवरा-बायकोस बोलावून त्यांना पोटभर जेऊ खाऊ घातले. परंतु विद्यासागरांचे समाधान एवढ्यानेच झाले नाही. दुसऱ्या दिवशी विद्यासागरांनी या कुटुंबास कायमचे मासिक पेन्शन ठरवून टाकले. विद्यासागर राजे व लोक प्रजा!

अन्नदान व वस्त्रदान यासमान दुसरे पवित्र दान नाही. दर वर्षी दुर्गापूजेचा सण आला की विद्यासागर आपल्या आईकडे खेड्यातील गोरगरिबांना देण्यासाठी कपडे पाठवायचे. त्यांची आई अशीच परम उदार. एकदा विद्यासागर यांनी पाठवलेले सर्व कपडे खलास झाले. तेव्हा आईने आणखी कपडे पाठवून देण्याबद्दल विद्यासागरांना लिहिले. विद्यासागर यांना फार आनंद झाला. त्यांनी दुप्पट कपडा पाठवून दिला. दुर्गापूजेच्या दिवशी विद्यासागरांच्या आईकडे सर्वांना अन्नदान व वस्त्रदान व्हायचेच.

विद्यासागर मनुष्यप्राण्यांवर प्रेम करीत एवढेच नव्हे तर त्यांच्या प्रेमसिंधूत सर्व प्राणिमात्र होते. एकदा त्यांच्याकडे एक मित्र आले होते. त्यांच्यापुढे विद्यासागरांनी संत्री ठेवली. हा गृहस्थ काय करी, अर्धवट संत्रे खाई व उरलेल्या फोंडी टाकून देई. विद्यासागर म्हणाले, 'असे निष्कारण टाकून देऊ नकोस.' 'आहे कोण तुमच्याकडे दुसरे खायला?' असे त्या मित्राने विचारले. विद्यासागर म्हणाले, 'त्या खिडकीच्या बाजूला ठेवून देत जा, म्हणजे माझी माणसे येऊन घेऊन जातील.' तो गृहस्थ तसे करू लागला. परंतु त्यास कोणी माणूस खिडकीजवळ दिसेना. 'कोठे आहेत हो तुमची माणसे ? मला तर कोणीच दिसत नाहीत. गप्पा मारता.' असे स्नेही म्हणाले. 'असे माझ्या जागेवर तुम्ही बसा व मी तुमच्या जागेवर बसतो; म्हणजे तुम्हाला दिसतील माझी माणसे.' असे विद्यासागर हसून म्हणाले. आपल्या जागांची त्यांनी आलटापालट केली व तो खिडकीत पाखरे येऊन ती फळे खात आहेत असे स्नेह्यास दिसले. या पाखरांमध्ये विद्यासागर फळे, धान्य देत; ती विद्यासागरांना मुळीच भीत नसत. विद्यासागरांची ही स्थितप्रज्ञ व प्रेमवृत्ती पाहून **'धन्यानां गिरिकंदरेषु वसंता ज्योतिः परं ध्यायताम्। आनंदाश्रुकणान् पिबन्ति शकुना निःशंकमंकेशयाः'** या भर्तृहरीच्या योग्यांच्या वर्णनाची आठवण होते. द्विजेंद्रनाथ टागोर (रवींद्रनाथांचे वडील बंधू) यांची अशीच वृत्ती होती असे सांगतात.

विद्यासागरांच्या अशा या निस्सिम उदारपणाचा फायदा पुष्कळ लबाड लोकही घेत. याबद्दलची एक गमतीची गोष्ट सांगतो. एकदा एका मुलाने

विद्यासागरांना पत्र पाठविले, 'मी तिसऱ्या इयत्तेत आहे. माइयाजवळ खालील पुस्तके नाहीत; तरी आपण कृपा करून पाठवाल तर गरिबावर फार उपकार होतील.' विद्येसाठी गरीब मुलास मदत करावयाची नाही तर कोणास करावयाची? विद्यासगर यांनी या मुलास ती पुस्तके पाठवून दिली. एक वर्षाने मुलाने चवथ्या इयत्तेची पुस्तके मागितली; असा त्याचा क्रम सातवीपर्यंत चालला. एकदा काय झाले, ज्या गावी हा मुलगा पुस्तके मागवून घेई, त्या गावातील शाळेचे मुख्य गुरुजी विद्यासागरांना भेटले. विद्यासागरांनी त्या इयत्तेतील विद्यार्थ्यांची चौकशी केली. 'या नावाचा मुलगा मला माहीत नाही.' असे गुरुजी म्हणाले. 'वा:, शाळेचे मुख्य गुरुजी तुम्ही आणि चार वर्षे सतत उत्तीर्ण होणारा मुलगा होणारा मुलगा तुम्हास माहीत नाही? झालात कशाला मुख्य गुरुजी?' असे विद्यासागर जरा रागाने त्या गुरुजींना म्हणाले, ' मी गेल्यावर चौकशी करून काय ते कळवीन.' असे त्या शिक्षकांनी कबूल केले. ते शिक्षक आपल्या गावी परत गेले. त्यांनी सर्व वर्गात फिरून चौकशी केली, परंतु त्या नावाचा मुलगा त्यांना आढळेना. शेवटी चौकशी करता असे आढळले की, त्याच नावाचा मुलगा शाळेजवळच एक दुकान घालून राहतो. त्या मुलाचे पुस्तके विकण्याचें दुकान होते आणि तो दर वर्षी विद्यासागरांकडून अशी मोफत पुस्तके मिळवी. तेवढाच जास्त फायदा. विद्यासागरांना ही गोष्ट कळविण्यात आली व त्यांना जगाचे आश्चर्य वाटले. इतका अप्रामाणिकपणा लोकांमध्ये का असावा याचे त्यांना कोडे पडे. बहुत करून जेवढ्या लोकांना ईश्वरचंद्रांनी साहाय्य केले, त्यांनी त्या साहाय्यासाठी कृतज्ञता तर नाहीच दर्शविली; पैसे वगैरे परत नाहीच केले; तर उलट त्यांचे नुकसान करावयास, त्यांची निंदा करावयास मात्र ते तयार असत. एकदा एका मित्राने विद्यासागरांना सांगितले की, 'अमका तमका फलाणा माणूस तुमची निंदा करतो.' लगेच विद्यासागर विनोदाने व यथार्थतेने म्हणाले, 'का बरे? त्याने माझ्याविषयी मनात वाकडे का धरावे? मी त्याचे चांगले तर काहीच केले नाही! त्याच्या उपयोगी मी अद्याप पडलो नाही; मग माझ्याविषयी तो दुष्टावा करतो याचे कारण काय?' ज्याचे आपण चांगले करावे, तो हटकून आपले वाईट करणार असा खरोखर विद्यासागरांना पूर्ण अनुभव आला होता.

दुसऱ्यावर निरपेक्ष उपकार करणारे विद्यासागर पूर्णपणे निरहंकारी होते. अहंकार त्यांच्या ठिकाणी नसे. याच्याही पुष्कळ कथा आहेत. एकदा एका स्टेशनवर एक श्रीमंत तरुण मुलगा गाडीतून उतरला. तो मोठा ऐटबाज होता. खिशात घड्याळ,

डोळ्यांना चष्मा असा त्याचा थाट होता. त्याला स्टेशनवरून घरी सामान नेण्यास हमाल मिळेना. कर्मधर्मसंयोगाने विद्यासागर हे स्टेशनवर आले होते. विद्यासागरांचा वर्ण काळा, अंगाने चांगले धष्टपुष्ट, मजबूत आणि कपडे अगदी जाडेभरडे. या श्रीमंताने विद्यासागरांना विचारले, 'काय रे ए हमाल, ही ट्रंक घेऊन चलतो का?' 'होय साब' विद्यासागर म्हणाले. विद्यासागर यांनी ती ट्रंक आपल्या डोक्यावर घेतली. पुढे तो मुलगा आणि पाठीमागून विद्यासागर चालले होते. रात्रीची वेळ होती म्हणून बरे. शेवटी त्या मुलाचे घर आले. विद्यासागर यांनी ट्रंक खाली उतरवली. तो श्रीमंत मुलगा त्यांना ४ आणे देऊ लागला. हमाल पैसे घेईना. 'आठ आणे घे' तरी हमाल हात पसरेना. शेवटी विद्यासागरांनी सांगितले, 'मला पैसे वगैरे काही नकोत. परंतु आपण स्वत:चे काम करण्यास कधी लाजू नका. एवढेच लक्षात ठेवा. 'इतक्यात त्या मुलाचा बाप आला. त्याने विद्यासागरांना ओळखले व तो मुलाला रागावला. विद्यासागर म्हणाले, 'त्याला रागविण्याची जरुरी नाही. त्याला मी काय माहीत? अत:पर कोणी हमाल वगैरे नसला म्हणजे त्याने लाज धरू नये म्हणजे झाले.'

घरातील बाजाराचे वगैरे सर्व सामान विद्यासागर खांद्यावर झोळी टाकून घेऊन यायचे. एकदा विद्यासागर बाजारातून रताळी वगैरे पुष्कळ सामान भरून घेतलेली झोळी खांद्यावर टाकून येत होते. समोरून येणाऱ्या एका श्रीमंत गृहस्थाने पाहिले की, विद्यासागर सामान हमालाप्रमाणे वाहून नेत आहेत. श्रीमंत मनुष्य व विद्यासागर हे मोठे मित्र. विद्यासागर वाटेत भेटले तर या हमालसदृश्य गृहस्थास मला नमस्कार चमत्कार करावे लागणार तर ती आपणास भररस्त्यात लाजच. म्हणून विद्यासागरांना टाळावे असा या लक्ष्मीपुत्राने विचार केला आणि शिरले एका बोळात व पलीकडच्या रस्त्यावर आले. विद्यासागर यांचे या गोष्टीकडे लक्ष होते, त्यांनी पण गल्ली ओलांडून पुन्हा त्याच श्रीमंताचा रस्ता धरला व दोघांची शेवटी गाठ पडली. नमस्कार झाल्यावर विद्यासागर म्हणाले, 'आपण का आलात या रस्त्याने हे मी सांगू का ?' तो गृहस्थ ओशाळला व त्याने सर्व कबूल केले.

एकदा विद्यासागर एका दुकानदाराच्या ओट्यावर बसून गप्पा मारीत होते. एक श्रीमंत मनुष्य मोटारीत बसून येत होता. या भिकारड्या दुकानदाराशी विद्यासागर गप्पा मारीत असलेले त्यांनी पाहिले. ईश्वरचंद्र व ते श्रीमंत गृहस्थ स्नेही होते. विद्यासागरांना मी नमस्कार नाही केला, तरी ते करणारच आणि आपला दोघांचा समसंबंध या भिकारड्यास कळणारच; तर मग आपणच मोटार थांबवून विद्यासागरांशी

बोलून मनाचा मोठेपणा दाखवावा, असे त्या गृहस्थाने मनात आणून, त्याप्रमाणे केले. परंतु ईश्वरचंद्रांना ते हळूच काय म्हणाले, 'हे पाहा विद्यासागर, असे आपण हलक्या लोकांशी बोलत बसणे योग्य नव्हे. ज्याने त्याने आपला बोज सांभाळून वागले पाहिजे, नाही तर हास्यास्पद होते.' विद्यासागर जरा हसले. ते अर्थातच काही बोलले नाहीत.

विद्यासागर यांना जरी महाविद्यालयात मुख्य पंडिताची जागा मिळाली होती, तरी ते पुष्कळ दिवस घरी हाताने स्वयंपाक करीत. लोकांमध्ये ते विद्वान म्हणून गाजले, परंतु हातची चूल मात्र त्यांची सुटली नाही. त्यांना एकट्याचाच स्वयंपाक करावयाचा नसे. तर धाकटे भाऊ वगैरे कलकत्त्यातच शिकण्यासाठी राहत, त्या सर्वांचा स्वयंपाक त्यांनाच करावा लागे. विद्यासागर १०/१२ वर्षांचे असल्यापासून स्वत: स्वयंपाक करीत. त्यांचे वडील ठाकुरदास हे काही करावयाचे नाहीत. या लहान मुलालाच तिघाचौघांचा स्वयंपाक करणे भाग पडे. स्वयंपाक करावयाचा, सर्व अभ्यास करावयाचा, पुन्हा विद्यालयात पहिला नंबर मिळवून शिष्यवृत्ती वगैरे कायम ठेवायची. विद्यासागरांचे बाप एरवी दयाळू असले, तरी ते मुलाच्या बाबतीत फार कठोर असत. ईश्वरचंद्रांचा अभ्यास झाला आहे की नाही हे ते स्वत: पाहायचे. जरी त्यांना संस्कृतची विशेष माहिती नसे, तरी त्यांना वाचता येत असे. त्यामुळे विद्यासागरांना धडा असे, तो धडा ते तोंडपाठ करून घ्यायचे. विद्यासागर जर एक अक्षरही चुकले, तर त्यांची कंबक्तीच भरायची. मुलास घरी फार काम असते याचा विचार ठाकुरदास करायचे नाहीत. कधीकधी ते विद्यासागरांना इतके मारीत की त्याच्या घराची मालकीण ठाकुरदासांना सांगे, 'अहो, तुम्ही ही जागा सोडून का जात नाही ?' ही बाई जरा सदय अंत:करणाची होती. विद्यासागरांना ठाकुरदास मारून रक्तबंबाळ करायचे. आजूबाजूचे लोक मग या गरीब मुलाची या दुष्ट बापाच्या हातून सुटका करीत. एक दिवस तर विद्यासागर घरातून पळून गेले; परंतु सायंकाळ झाल्यावर पुन्हा घरी आले. जाणार कोठे ? किती मारले तरी ते बापाकडेच येणार. त्या दिवशी अर्थात पळून जाण्याबद्दल विद्यासागरांना वडील रागावले नाहीत.

जेथे विद्यासागरांना स्वयंपाक करायचा असे, ते स्वयंपाकघर अत्यंत गलिच्छ असे. त्या काळी कलकत्त्यात मोऱ्या वगैरे नीट सुधारल्या नव्हत्या. संडास, घाणेरडे पाणी, मोऱ्या गलिच्छ असा कारभार. या विद्यासागरांच्या स्वयंपाकघरात किडे यायचे. जिवंतपणीच नरकच तेथे होता. रात्रीच्या वेळी काय होई, विद्यासागरांचे

भाऊ, वडील वगैरे बाहेरच्या खोलीत जेवायला बसत. अर्थात वाढणारे विद्यासागरच असायचे. जेवणे झाल्याबरोबर बाहेरची मंडळी तेथेच उष्टी काढून लगेच आपल्या पथारी पसरून देत व झोपी जात. विद्यासागर कोठे जेवायला बसणार याची त्यांना फिकीर नसे. त्या किड्यांच्या राज्यात विद्यासागर जेवायला बसत. दोन–तीन पाण्याचे तांबे भरून घेत, किडा जवळ आला, की त्यांच्या अंगावर जोराने पाणी उडवून त्यास दूर करीत. अशा तऱ्हेने आजूबाजूला सर्व पाणी व्हायचे. या ओलट जमिनीवर त्यांचा व्यवहार चालायचा; परंतु विद्यासागर यांची प्रकृती जात्याच हूड व बळकट म्हणून या सर्व दिव्यातून ते सहीसलामत बाहेर पडले. नाही तर क्षय, मलेरिया, सांधे धरणे वगैरे नाना रोग त्यांना जडले असते.

अशा प्रकारची खडतर तपश्चर्या बालपणी करावी लागल्यामुळे विद्यासागर हे निरहंकारी राहिले, साधे राहिले यात विशेष आश्चर्य नसेल, असे तुम्ही मानू नका. जे असे लहानपणी कष्ट सोसतात त्यांना वैभव मिळाले म्हणजे लहानपणीच्या दुःखाचा केव्हा सूड घेऊ असे त्यांना होते. मग ते इतका भोगविलास करतात की जसे काय स्वर्गातील राजे. विद्यासागरांचे तसे काही नाही. पंडित झाले तरी बल्लवाचे काम ते आनंदाने करत आहेत; महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल, ५०० रुपये पगार झाला, तरी बाजार स्वतः करून खांद्यावर सामानाची जड झोळी घेऊन येत आहेत. शेवटपर्यंत ते असे निरहंकारी राहिले. चैन हा शब्द त्यांना माहीत नव्हता. त्यांना एक चैन करावीशी वाटे, ती म्हणजे पुस्तकांच्या बाबतीत. नवीन पुस्तक दिसले की ते घ्यायचे. एवढी चैन त्यांना असे; परंतु त्यांना दुसरी कसली हौस नसे. त्यांचे कपडे अगदी साधे, जाडेभरडे असत. ते दुसऱ्यांना सुंदर गिरणीचे कापड घेऊन देत; परंतु स्वतः हातमागावरील जाडे कापड वापरीत. विद्यासागर लहानपणी संस्कृत महाविद्यालयात शिकत असताना त्यांना जी शिष्यवृत्ती मिळे, त्यातून ते आपल्या गरीब सहाध्यायांना सुंदर कपडे करून देत; परंतु त्यांचा स्वतःचा कपडा अगदी साधा जाडाभरडा असे. मुलाने या बाबतीत दुसऱ्या मुलांस देण्याच्या बाबतीत किती पैसा खर्च केला, तरी त्याचे वडील ठाकूरदास त्याला बोलत नसत. उलट, मुलामधील ही उजपत दानबुद्धी, परोपकारबुद्धी कशी वृद्धिंगत होईल हेच ठाकूरदास पाहत. अभ्यासात जरा चुकले तर पाठीचे धिरडे करणारे ठाकुरदास अशा समयी मुलाची पाठ थोपटीत व 'चांगले केले बेटा, असेच करावे बरे.' असे उत्तेजन देत. मोठ्या मोठ्या अधिकाऱ्यांजवळ विद्यासागर यांची दोस्ती; परंतु राजाची भेट घेणे असो वा रंकाच्या चंद्रमौळी झोपडीत जायचे असो, विद्यासागरांच्या

वेषरचनेत काही फरक म्हणून कधी होत नसे. मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या, लेफ्टनंट गव्हर्नरांच्या मोटारीतही ते त्यांच्याबरोबर बसून जात; परंतु विद्यासागर यांना आपल्या साध्या पोषाखाने जाण्यास कधी लाज वाटली नाही.

विद्यासागर हे विनयाची मूर्ती होते. गर्वाची बाधा, वृथाभिमान ही त्यांना शिवली नाहीत. डामडौल त्यांना माहीतच नव्हता. नम्रता हा त्यांचा अभिजात गुण. एकदा एक पूर्वबंगालमधील गृहस्थ पश्चिम-बंगालमधील मोठे लोक कसे असतात, हे पाहण्यासाठी निघाला. त्याला या मोठ्या लोकांची परीक्षा घ्यायची होती. तो प्रथम एका मोठ्या गृहस्थाकडे गेला. आपण ऐकले त्याप्रमाणे हा पुरुष खरोखरच मोठा आहे का, हे त्याला पाहावयाचे होते. झाले, ते या घरात गेले; परंतु काय ? तेथे त्यांची दादच लागेना. 'आता वेळ नाही. पुन्हा केव्हा तरी या, सध्या फार काम आहे.' असा वरून त्या मोठ्या पुरुषाचा निरोप आला. तो गृहस्थ आल्या पावली माघारी गेला. नंतर दुसऱ्या एका अशाच थोर समजल्या जाणाऱ्या गृहस्थाच्या घरी हा मनुष्य गेला; तेथे पाहिल्यासारखीच किंबहुना जास्तच कटुतर अशी त्याची संभावना झाली. तेथे अर्धचंद्र मिळाला व हे गृहस्थ निमूटपणे माघारी परतले. हा पूर्वबंगाली गृहस्थ आता संतापला. तो म्हणाला, 'दोन श्यालक (या शब्दाचा अपभ्रंश त्याने वापरला) पाहिले; आता तिसरा पाहावयाचा राहिला आहे.' हा गृहस्थ आता विद्यासागरांकडे आला. 'विद्यासागर घरात आहेत का? आम्ही त्यांना भेटावयाच्या हेतूने आलो आहोत. आहेत का? भेटतील का? सांगा लवकर, नाही तर आपला चालता होतो.' विद्यासागर तेथेच ओटीवर होते. ते म्हणाले, 'या बसा. पाय वगैरे धुवा. कपडे वगैरे काढा. तोंड वगैरे धुऊन जरा अल्पाहार करा; दूध वगैरे घ्या तो विद्यासागर येतीलच.' 'छे: छे: मला बसायला वेळ नाही. आधी ते असले तर पुढचा प्रश्न. वरती कोठे असतील नाही का? त्यांना खाली भेटावयास वेळ नसेल नाही? फार बडी बडी कामे असतील त्यांना?' असे का परका गृहस्थ आवेशाने म्हणाला. 'असे काय करता? आल्यासारखे आता येथेच राहा. आंघोळ वगैरे सर्व घ्या करून. मी तुमची सर्व व्यवस्था करतो. येथे तुम्हाला काडीइतके न्यून पडणार नाही. आपलेच घर समजा. विद्यासागर मग भेटतीलच तुम्हाला. विद्यासागर म्हणजे का कोणी राजे आहेतच का देव आहेत? तुम्हास न भेटायला?' विद्यासागरांचे हे शब्द ऐकून तो मनुष्य तो मनुष्य जरा शांत झाला. येथे काहीतरी निराळा आतिथ्य प्रकार दिसतो आहे असे त्याने पाहिले. शेवटी त्यांनी पोषाख काढला. स्नान वगैरे केले. आत भोजनाची तयारी झाली. पाने मांडली.

पाहुण्यास पहिल्या पानावर नेऊन विद्यासागरांनी बसविले. जेवणाचा थाट चांगलाच होता. आलेले सद्गृहस्थ म्हणाले, 'विद्यासागर नाही वाटते आमच्या पंक्तीबरोबर जेवायचे ? त्यांची मागाहून खाशांची पंगत व्हायची असेल ?' विद्यासागर म्हणाले, 'तसे नाही परंतु आपण फार दुरून आलात, आपण भुकेले असाल, दमले असाल. तेव्हा आपण भोजन वगैरे करून विश्रांती घेतलीत म्हणजे आपणास आराम वाटेल. या हेतूने आपल्यासाठी लवकर जेवणाचा बेत केला आहे. निराळी पंगत वगैरे असले प्रकार येथे नाहीत.' भोजन झाले. विडेतांबूल झाले तरी विद्यासागर ही व्यक्ती त्या गृहस्थांना पाहावयास मिळेना. विद्यासागर त्यांना म्हणाले, 'आता आपण जरा वामकुक्षी करा. जरा आरामशीर पडा. तो विद्यासागर येतीलच.' शेवटी तो गृहस्थ जरासा लवंडलाच. दमल्यामुळे त्याला झोपही लागली. वामकुक्षी झाली. निद्रा झाल्यावर पाण्याने मुखप्रक्षालन व नेत्रप्रक्षालन झाले. आता मात्र हा गृहस्थ संतापला. तो म्हणाला, 'मी येथे विद्यासागरांना पाहावे म्हणून आलो, ती गोष्ट बाजूलाच राहिली आणि हे खाणे-पिणे-झोपणे कशासाठी ? मी काही अन्नार्थी, पोटार्थी आलो नाही; अन्नासाठी मी सुजलो नाही.' गोष्ट निकरावरच आली तेव्हा विद्यासागर म्हणाले, 'अहो, मला तर तुम्ही सकाळपासूनच पाहात आहात. मीच तो विद्यासागर. असे रागावू नका. मनात म्हटलं तुम्हाला जरा विश्रांती वगैरे मिळाली म्हणजे मग सांगू एकमेकांना.' विद्यासागरांचे हे शब्द ऐकून तो गृहस्थ ओशाळला, जो पुरुष आपली एवढी बडदास्त स्वतः अंगे ठेवीत होता, तो पुरुष म्हणजेच विद्यासागर ! खरे असेल का? अशी क्षणभर शंका त्या गृहस्थाला आली; परंतु क्षणभरच. नंतर त्या गृहस्थाने आपला पूर्वाअनुभव विद्य गरांना सांगितला व म्हणाला, 'मला आज एक थोर पुरुष सापडला. आपण मात्र खरोखर 'थोर' म्हणवून घेण्यास पात्र आहात. आपली महती खरी व यथार्थ आहे. मोठेपणा खऱ्या विनयाने शोभतो.' विद्यासागरांना आत्मश्लाघा आवडत नसे. ते केवळ गप्प बसले होते. ते गृहस्थ दोन दिवस पाहुणचार घेऊन आपल्या घरी निघून गेले.

कोणीही परका गृहस्थ भेटला तर त्याला आधी 'आपले जेवण झाले का ?' असे विद्यासागर विचारायचे. खर्माटाड येथील बंगल्यावर विद्यासागर राहात असताना एक गृहस्थ काही कामासाठी त्यांच्याकडे आला. त्याला विद्यासागरांनी विचारले, 'आपले जेवण झाले आहे का ?' हा प्रश्न ऐकून तो गृहस्थ रडू लागला. त्याचे डोळे पाण्याने भरून आले. 'अहो रडता का ? काय पाहिजे ते सांगा ?' असे आश्वासनपर

विद्यासागर त्यास म्हणाले. 'आजपर्यंत मी अनेक ठिकाणी गेलो; मी मुशाफिर आहे; परंतु असला प्रश्न तुम्हीच केलात म्हणून आपले मन पाहून मी आनंदित झालो. तुमच्यावर या संताळ्यांचे प्रेम का आहे ते मला आता उमजले म्हणून माझे डोळे आनंदाश्रू ढाळीत आहेत. मी आपल्याकडे अन्य कामासाठी आलो आहे. देवकृपेने जेवणाचीवगैरे मला ददात नाही.' असे त्या गृहस्थाने त्यांना सांगितले.

विद्यासागर जरी इतके साधे व विनम्र होते तरी ते स्वाभिमानीही होते. अपमान त्यांना सहन होत नसे. जेथे आपली मानखंडना होते तेथे ते क्षणभरही राहावयाचे नाहीत. स्वाभिमान राखता येईना म्हणून त्यांनी बड्या पगाराच्या नोकरीवर कशी लाथ मारली, घरी पंचाईत होती तरी तिळभर विचार कसा केला नाही, हे मागे सांगितलेच आहे. घरी दारिद्र्य, समोर मोठ्या पगाराची नोकरी अशा वेळी असा स्वाभिमान किती लोक दाखवू शकतील ?

जे स्वत:स मोठे प्रतिष्ठित समजून दुसऱ्यांना तुच्छतेने लेखतात, त्यांना धडा घालून द्यावयाचा हे विद्यासागरांचे ब्रीद होते. एकदा हिंदू कॉलेजचे प्रिन्सिपॉल कारसाहेब यांना विद्यासागर भेटावयास गेले होते. परंतु कारसाहेबांनी 'या बसा' वगैरे एक शब्दही उच्चारला नाही. विद्यासागरांकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. विद्यासागर मनात सर्व एमजले. ही गोऱ्या गृहस्थांची गुर्मी आहे; हे मदोद्धत आहेत. आपण पडलो काळे एतद्देशीय. बरे आहे. पाहून घेऊ. वगैरे मनात विचार करीत विद्यासागर घरी निघून गेले.

पुढे एक दिवस असे झाले की, कारसाहेबांना विद्यासागरांकडे काही कामानिमित्त यावे लागले. विद्यासागरांजवळ सर्व शिक्षणाधिकाऱ्याना काम पडे. विद्यासागरांनी दुरून पाहिले की, कारसाहेब येत आहेत. लगेच त्यांनी नोकराला सांगितले, 'वरच्या दिवाणखान्यातील सर्व खुर्च्या वगैरे दुसरीकडे नेऊन ठेवा. टेबलसुद्धा तेथे नको. खाली एक जाजम व लोड मात्र असू द्या.' नोकराने सांगितल्याप्रमाणे सर्व केले. विद्यासागर त्या लोडाशी जाऊन बसले व वाचण्यात गर्क झाले. कारसाहेब आले. नोकर त्याना वर घेऊन आला. विद्यासागरांनी वर ढुंकूनही पाहिले नाही. आदरातिथ्य वगैरे सर्व बाबतींत नकार. साहेब सर्व मनी समजले. विजेप्रमाणे सर्व प्रकार चटकन त्यांच्या ध्यानात आला. परंतु एका नेटिव्हाने एका गोऱ्याचा असा अपमान करावा हे त्यांना सहन झाले नाही. कारसाहेबांनी ही गोष्ट डायरेक्टरांना कळविली. डायरेक्टर म्हणाले, 'काय हो, आपण तर विद्यासागरांना

विद्वान, विनयशील, थोर समजता. परंतु आज तर कारसाहेबाच्या दृष्टोत्पत्तीस असे आले की, ते हलक्या वृत्तीचे मनुष्य आहेत. त्यांना सभ्याचाराचा गंधसुद्धा नाही. ले. गव्हर्नरसाहेब म्हणाले,'काहीतरी घोटाळा झाला असेल. विद्यासागर असे कधी करायचे नाहीत.अशी माझी पक्की खात्री आहे.' 'आहे,पण प्रत्यक्ष अनुभव घेऊन कारसाहेबांनी मला ही गोष्ट सांगितली.' 'बरं, ठीक आहे. मी विद्यासागरांना उद्या बोलावून घेतो व त्यांना सर्व हकिकत विचारतो म्हणजे गैरसमज असेल तर दूर होईल.' असे गव्हर्नर म्हणाले. दुसऱ्या दिवशी गव्हर्नरांच्या आमंत्रणावरून विद्यासागर त्यांचेकडे आले. सर्व नमस्कारचमत्कार झाल्यावर विद्यासागर म्हणाले,'अशा प्रकारे स्वागत करावयाची तऱ्हा मी त्यांच्यापासूनच शिकलो. मी त्यांच्याकडे गेलो असता मला त्यांनी असे वागविले तेव्हा मला वाटले की, युरोपियन लोकांत आपल्याकडे आलेल्या गृहस्थांचे अशा प्रकारेच स्वागत करतात. अर्थात कारसाहेब माझ्याकडे आल्यावर युरोपियनांच्या चालीप्रमाणे, कारसाहेबांना जसे आवडते तसे स्वागत मी त्यांना दिले. माझी गैरसमजूत झाली असेल तर क्षमा करा. परंतु माझा अपराध मला दिसत नाही.' गव्हर्नर यांनी ही हकिकत डायरेक्टरांना कळविली. डायरेक्टर कारसाहेबांकडे जाऊन म्हणाले,'तुम्हीच कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे (विद्यासागरांकडे) जा व प्रकरण मिटवा.' हे सर्व ऐकून कार जरी गोरे होते तरी काळवंडले. त्यांचे तोंड उतरले. रुबाब कमी झाला. त्यांनी आपली चूक विद्यासागरांकडे जाऊन कबूल केली. शेवटी परस्पर मने साफ होऊन काही एक मनात किंतु न राहता विद्यासागर व कारसाहेब हे मित्र झाले.

एकदा विद्यासागरांकडे एक परप्रांतीय महाराष्ट्रीय आला होता. तो मुंबईचा होता. कलकत्ता शहर फार प्रेक्षणीय व सुंदर आहे. तेथे जे म्युझियम आहेत ते तर फारच भव्य व विस्तृत आहे. खुद्द हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीत हे म्युझियम, हे पदार्थसंग्रहालय असे. विद्यासागर हे त्या नवख्या गृहस्थांना बरोबर घेऊन म्युझियम दाखविण्यास गेले. विद्यासागरांच्या पायात जोडा होता. आता त्या म्युझियममध्ये असा नियम होता की, जोडे, वहाणा सर्व बाहेर काढून मग आत जायचे. विद्यासागरांच्या हे लक्षात नव्हते. ते आत जाऊ लागले, तोच द्वाररक्षकाने त्यांना हटकले व जोडे बाहेर काडण्यास सांगितले. जोडे काढून आत जाण्यापेक्षा बाहेरच राहणे बरे असा मनात विचार करून विद्यासागर त्या गृहस्थांना म्हणाले,'जा, आपण पाहून या; मी येथे बसून राहतो.' शेवटी ही बातमी म्युझियमचे जे मुख्य व्यवस्थापक

होते, त्यांच्या कानावर गेली. ते लगेच खाली आले. विद्यासागरांना अदबीने नमस्कार केला व म्हणाले, 'आपण कोण आहात हे नोकराला माहीत नाही, म्हणून हा अक्षम्य अपराध घडला, तरी त्याचा राग न मानता आपण आता जोडे वगैरे न काढता आत चला. आपण काही एक मनात किंतु आणू नये.' विद्यासागर म्हणाले, 'माझ्यासाठी म्हणून ही विशिष्ट कृपा मला नको. जर सर्वसाधारण लोकांना जोडे घालून जाता येत नसेल, तर मी पण जाणार नाही. माझ्या मोठेपणामुळे मला ही परवागनी मिळावयास नको आहे. नैसर्गिक स्वातंत्र्याने जाता येत असेल तर मी जातो. माझे इतर गरीब देशबांधव, त्यातीलच मी. त्यांना जसा अपमान येथे सोसावा लागत असेल, तसा मलाही सोसू द्या. लाखो जणांचा अपमान होत असता, मी प्रतिष्ठितपणाने मिरवावे असे मला बिलकूल वाटत नाही. उलट त्या योगे मला बरे वाटले.' व्यवस्थापकांनी मष्कळ विनविले, परंतु विद्यासागर आत गेले नाहीत. युरोपियनांच्या पायात बूट असला तरी तो चालतो. तोच युरोपीय बूट एतद्देशीय घालून गेला, तरी त्याला मज्जाव होत नाही. पातक जे केलेले आहे, ते फक्त देशी जोड्यांनी, देशी वाहणांनी. युरोपीय बूट हा जेत्यांचा बूट आहे. तो विजयी लोकांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला आहे. तो युरोपात जन्मला आहे. युरोपात जे जन्मते, जे पिकते, युरोपात जो आचार आहे, जो विचार आहे, तो अपवित्र कसा असू शकेल? त्यांची विटंबना, मानहानी, अप्रतिष्ठा कोण करणार? शेवटी हे प्रकरण व्यवस्थापकांनी नंतर गव्हर्नर जनरलकडे पाठविले. हा नियम बदलावयाचा का असा प्रश्न हिंदुस्थान सरकारपुढे उपस्थित झाला. परंतु गव्हर्नर जनरलांनी कायदा बदलण्यास परवानगी दिली नाही. विद्यासागरांसारखे थोर गृहस्थ म्युझियम पाहण्यास गेले नाहीत तर चालेल; परंतु युरोपीय बुटाची इभ्रत कमी करण्यात येणार नाही, असे सरकारने कळविले. ज्याप्रमाणे युरोपीयांसाठी राखून ठेवलेल्या जागेत एतद्देशीय आदमी शिरू शकत नाही. त्याप्रमाणे जेथे बुटास जाण्यास अनुज्ञा आहे तेथेच जोडे-वहाणा, या एतद्देशीय पादत्रणांना कसा परवाना मिळणार? जेत्यांचा कुत्राही जितांच्या ऐरावतापेक्षा ऐपतवान असतो हे जगाने विसरून कसे चालेल? पूर्वी यंग साहेब आपल्या असानावर स्थिर राहून ज्याप्रमाणे विद्यासागरांना चंबूगबाळे आटोपावे लागले, तसेच या वेळेसही हिंदी जोड्यांना युरोपीय बुटापुढे माघार घ्यावी लागलीव तो पहिला कायदा तसाच राहिला.

पुढे एकदा या म्युझियमच्या पलीकडील दिवाणखान्यात एक सभा भरावयाची होती. या सभेस जावयाचे म्हणजे मार्ग म्युझियमच्यामधूनच असे. या सभेस

विद्यासागर यांनी हजर राहावे अशी चालकांची इच्छा होती, परंतु 'जोड काढून ठेवा' असा जेथे नियम आहे, त्या जागेतून मी केवळ विद्यासागर म्हणून जोडे घालून जाणे व मग या सभेस हजर राहाणे हे त्यांना रुचले नाही. जोडा काढून जावे तरीही अपमानच. म्हणून ते या सभेला गेले नाहीत.

मोठमोठ्या गव्हर्नरांसमोरसुद्धा विद्यासागर निःस्पृहपणे वागत. एकदा गव्हर्नर साहेबांच्या कायदेमंडळात हिंदुधर्मासंबंधी काही प्रश्न निघाला व त्यावर बरीच चर्चा झाली. शेवटी वादाचा निकाल लागेना. विद्यासागरांना बोलावून आणून त्यांना सर्व उलगडा करावयास सांगावे असे ठरून विद्यासागरांकडे गव्हर्नरसाहेबांनी गाडी पाठविली. विद्यासागर यांची आई नुकतीच निजधामास गेली होती त्यामुळे ते अशौच पाळत होते. अंगात कपडे घालायचे नाहीत. फक्त पंचा नेसायचा असे त्यांचे व्रत होते. जर कोठ जायचे असेल, तर कुशासन बरोबर घेऊन जावे व त्याच्यावर बसावे, असा पूर्वापार अशौचासंबंधीचा तिकडे आचार होता. 'मी हा आहे असा येईन. मी अंगात कपडा वगैरे घालणार नाही. असा उघडाबोडका आलो तर चालेल का? तुमचा सभ्याचार नाहीतर मोडला जाईल. म्हणून काय ते कळवावे. ' असे विद्यासागरांनी गव्हर्नरांना कळविले. 'कसेही या. आम्हास तुम्ही वंद्य व पूज्य आहा' असे गव्हर्नरांचे उत्तर आले. विद्यासागर यांनी आपले कुशासन बरोबर घेतले व पादचारच गव्हर्नरांच्या बंगल्यावर गेले. कुशासनावर बसून त्यांनी त्या धार्मिक प्रश्नांचा नीट समाधानपूर्वक ऊहापोह केला व सर्वांचे संशय फेडून टाकले; नंतर लगेच आपल्या घरी ते परत आले. 'निःस्पृहस्य तृणं जगत्' अशा प्रकारे विद्यासागरांच्या ठिकाणी भूतदया, साधेपणा, निरहंकारवृत्ती आणि स्वाभिमान यांचे सुंदर मिश्रण झाले होते. निरहंकारता म्हणजे दीनपणा व मवाळपणा नव्हे. स्वाभिमान म्हणजे सदैव तुच्छ लेखणे हे पण नव्हे, असे विद्यासागरांनी आपल्या वागणुकीने दर्शविले आहे.

विद्यासागरांना पापाची घाण अगदी सहन होत नसे. सर्वांत जास्त जर कशाचा तिटकारा त्यांना येत असेल, तर तो पापाचा. या बाबतीत त्यांचे मन फार हळुवार असे. जरा झालेला अत्याचार ऐकून ते कावरे-बावरे व्हायचे. भाऊ शंभुचंद्र हा ईश्वरचंद्रांच्या मुलाचे फार लाड करी. शंभुचंद्र व ईश्वरचंद्रांचा मुलगा नारायण हे नेहमी एकमेकांबरोबर असायचे. शंभुचंद्रांने नारायणाला कोठे तरी अशा ठिकाणी नेले की जेथे घाण होती,काही तरी अपवित्र होते. ही गोष्ट विद्यासागरांच्या कानावर गेली. खरी हकिकत

काय ती सध्या उपलब्ध नाही, परंतु विद्यासागर यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाचे पुनश्च मुखावलोकन न करण्याचे ठरविले. विद्यासागरांची पत्नी मात्र मुलाजवळ राहिली. बायकोचे व मुलाचे दर्शन विद्यासागर यांनी घेतले नाही. परंतु पुढे पत्नी आजारी असता नारायण याने विद्यासागरांना अत्यंत करुण पत्र लिहिले. विद्यासागर आपला निश्चय पराकाष्ठेस नेणारे नव्हते. ते आसन्नमरण पत्नीस भेटायला गेले. सुखदु:खाच्या गोष्टी त्यांनी केल्या. परंतु पुढे पत्नी मेल्यावर पुनश्च पुत्राकडे ते विशेष कधी गेले नाहीत.

त्यांच्या एका मित्राने असेच काही तरी अनैतिक वर्तन केले होते. मद्यपान मंडळीत किंवा कोठे तरी त्या मित्राचा पाय घसरला व नैतिकदृष्ट्या वाईट असे त्याच्या हातून घडले. विद्यासागर व हे दोघे जण मोठे स्नेही, परंतु असे अल्पही वाईट आचरण घडले तरी विद्यासागरांना खपणार नाही हे त्या गृहस्थांना माहीत होते. विद्यासागर त्याच्याकडे गेले नाहीत. कारण आपल्या मित्राने शेण खाल्ले हे त्यांना कळले होते. त्याला वाईट वाटले व मनात तें रडत राहिले. शेवटी चार-पाच दिवस झाल्यावर पश्चात्तापाने पोळलेला तो गृहस्थ विद्यासागरांकडे आला. काय बोलावे हे त्याला कळेना. शेवटी त्याने विद्यासागरांकडे याची मोठ्या नम्रपणे व कळकळीने क्षमा मागितली. 'मनुष्य स्खलनशील आहे. क्षमा मागणारा परमेश्वर आहे. परंतु तुम्ही पुनरपि च्युत होऊ नका; रोज परमेश्वरास आळवा.' असे विद्यासागर म्हणाले.

विद्यासागर यांच्या मातृग्रामी एक पुनर्विवाह व्हायचा होता. या विवाहास हजर राहावे म्हणून विद्यासागर आपल्या गावी गेले होते. परंतु ग्रामाचा मुख्य जो ग्रामणी त्याने व इतर सभ्य गृहस्थांनी, विद्यासागरांबद्दल व पुनर्विवाहाबद्दल जरी त्या सर्वांना सहानुभूती होती तरी, त्यांनी विद्यासागरांना पुन: पुन्हा विनविले की,'आपण या पुनर्विवाहास हजर राहू नये. त्या पुनर्विवाहात काही तरी घाण, किळसवाणा प्रकार असावा असे विद्यासागरांनी ताडले व ते पुन्हा कलकत्त्यास निघून आले. एक पुनर्विवाह म्हणजे फार मोठे कार्य असे ज्यांना वाटे, ते विद्यासागर या पुनर्विवाहात काही वाईट, घाण आहे असे कळताच ताबडतोब निघून येतात हे पाहून तुम्हास आश्चर्य वाटेल. परंतु विद्यासागरांना सर्वात शील प्यारे होते. त्यांना प्रथम चारित्र्य पाहिजे होते. स्त्रियांचे चारित्र्य शुद्ध राहावे म्हणून तर पुनर्विवाहाचा जन्म होता. यासाठी तर पुनर्विवाहाच्या चळवळीस त्यांनी जन्म वाहिला होता. घाणेरड्या संबंधावर पांघरूण घालण्यासाठी ते पुनर्विवाह प्रचारात आणू पाहात नव्हते.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

यानंतर या प्रकरणास निराळेच स्वरूप प्राप्त झाले. ईश्वरचंद्रांचे भाऊ शंभुचंद्र, दिनानाथ हे सुद्धा त्या वेळेस मातृग्रामी आले होते. या पुनर्विवाहात जे भटजी काम करणार होते. त्यांना तर पुनर्विवाह अवश्यमेव झाला पाहिजे, असे वाटत होते. त्यांनी शंभुचंद्रांची मनधरणी केली व ईश्वरचंद्र नाहीत तर आपण तरी पुनर्विवाहास मदत करा अशी त्यांना विनंती केली. शेवटी विद्यासागरांच्या घराशेजारच्या घरी हा पुनर्विवाह समारंभ झाला. जो समारंभ होऊ नये म्हणून मी कलकत्त्यास पुन्हा परतलो; तो समारंभ माझ्या घराशेजारी व्हावा याचे विद्यासागरांना वाईट वाटले. आता या गावास तोंड कसे दाखवावे असे त्यांना झाले. त्यांनी आपल्या प्रिय मातृभूमीस पुनरपि न जाण्याचे ठरविले. एक मोठे करुण असे पत्र त्यांनी ग्रामणीस लिहिले व आपला निश्चय त्यांना कळविला. आईबापांना भेटावयासही ते या गावी जात नसत. या लग्नास शंभुचंद्रानीच मदत कली. ज्या गृहस्थाने या गावी विधवेजवळ विवाह केला. त्या गृहस्थांचे एक पत्र उपलब्ध आहे. त्या पत्रात त्याने स्वच्छ लिहिले आहे की, 'शंभुचंद्रांची मदत न होतीतर हे लग्नकार्य सिद्धीस गेले नसते. आपल्या भावाने अशा प्रकारे गोष्ट करावी याचे विद्यासागरांना राहून राहून फार वाईट वाटे. मातृभूमीची आठवण होऊन ते खिन्न होऊन बसत. परंतु केलेला निश्चय त्यांनी मोडला नाही.'

वरीलप्रमाणे पापापासून दूर-दूर राहावे, अलिप्त असावे याविषयी विद्यासागरांचा मोठा कटाक्ष असे. पुण्याजवळ परमेश्वर असतो; पावित्र्याजवळ परमेश्वर असतो; ते जेथे असेल तेथे ते जात. जेथे दुःख, दारिद्र्य आहे तेथे ते जात; परंतु जेथे घाण तेथे त्यांचा प्राण कासावीस होई. पापांशी संपर्क येऊ नये म्हणून आई-बाप, आपली जन्मभूमी, आपले भाऊ, आपली पत्नी, एकुलता एक मुलगा,आपले जिवलग स्नेही सर्वांचे संबंध सोडण्यास, तोडण्यास ते कष्टाने तयार झाले. 'सर्वांचा वियोग मी सहन करीन; परंतु पुण्यवृत्तीचा वियोग मी सहन करणार नाही.' असे ते मनात म्हणायचे. त्यांच्या मनाची थोरवी मी क्षुद्रमती किती सांगणार?

विद्यासागरांची मातृपितृभक्ती अलौकिक, अवर्णनीय होती. त्यासंबंधी पुष्कळ उल्लेख मागे आले आहेत. पुंडलिकाने आईबापांची सेवा करीत असताना भेटीस आलेल्या पांडुरंगाला उभे राहावयास वीट दिली व आपण स्वत: आईबापांचे चरण चुरीतच राहिला; तसेच विद्यासागरांचे. आईबापांपेक्षा थोर अशी अन्य दैवते जगात कोठे आहेत? आईच्या शब्दाप्रमाणे वागता यावे म्हणून विद्यासागरांनी नोकरीवर पाणी सोडले; नावाडी पाण्यात नौका लोटण्यास धजावत नसता

भरदुथडी भरलेल्या दामोदर नदीत त्यांनी स्वतःचे शरीर आईचे नाव घेऊन नि:शंकपणे फेकले; तेव्हा त्यांची मातृभक्ती व पितृभक्ती कोणत्या प्रतीची होती, हे वाचकांनी ठरवावे.

विद्यासागर यांनी पुनर्विवाहाची चळवळ केली, तिला त्यांच्या आई-बापांचे पाठबळ होते. ज्या वेळेस विधवाविवाहावरील आला ग्रंथ विद्यासागरांना प्रसिद्ध करावयाचा होता, तेव्हा ते आपल्या वडिलांकडे गेले व म्हणाले, 'मी हा ग्रंथ प्रसिद्ध करू का? आपण त्यामळे खिन्न व नाराज होणार नाही ना?' 'समज, मी परवानगी दिली नाही, तर तू आपला ग्रंथ प्रकाशित करशील का?' असे ठाकुरदासांनी विचारले. 'छे: कालत्रयीही अशी गोष्ट माझ्या हातून होणार नाही, मी माझा ग्रंथ तसाच ठेवीन व मग केव्हातरी प्रसिद्ध करीन.' विद्यासागरांचे हे विनयशील बोलणे ऐकून, भक्तिपूर्ण उत्तर ऐकून ठाकुरदास प्रसन्न झाले व त्यांनी ते पुस्तक प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली. नंतर विद्यासागर आईकडे गेले व म्हणाले, 'आई, हे मी पुस्तक प्रसिद्ध केले, तर मी अधर्मी आहे असे तर नाही तुला वाटणार? तुला त्यायोगे दुःख तर नाही ना होणार? तुला आनंद होत असेल तर तू अनुज्ञा दिलीस तर मी हे पुस्तक प्रसिद्ध करीन.' मुलाचे म्हणणे ऐकून आईचेच हृदय ते भरून आले. विद्यासागरांची आई प्रेमाची मूर्ती होती. भूतदयेची सिंधू होती. ती फार विचारी होती. विवेकास पटेल तेच ती करी. मूर्तिपूजा वगैरे तिला आवडत नसे. ती ब्राह्मो नव्हती; परंतु तिच्या माहेरी मोठमोठे पंडित झालेले यामुळे तिची बुद्धी सूक्ष्म व कुशाग्र होती. अर्थात तिने मोठ्या प्रेमाने मुलाला परवानगी दिली व म्हणाली, 'तुझ्या करण्याला माझे मनापासून अनुमोदन आहे. ज्यांचे जीवित केवळ कष्टमय आहे, एकेक दिवस ज्यांना युगाप्रमाणे वाटतो, ज्यांची सर्वांनी विटंबना करावी, हेटाळणी करावी, ज्यांचे मुखावलोकन करणे म्हणजे अपशकुन समजण्यात येतो. गरेपर्यंत ज्यांना अश्रू ढाळावे लागतात. जे कधी खळत नाहीत, जे पुसून टाकण्यास कोणी सदय मनुष्य नाही, सुखाचा गोड शब्द ज्याला ऐकावयास मिळत नाही, सुखाचा गोड घास ज्यांना खावयास मिळत नाही, कामाचे डोंगर ज्यांनी उचलावे; परंतु फुकाचे 'दमलात हो' असं ज्यांना कोणी म्हणावयाचे नाही, ज्यांना भविष्यकाळ व वर्तमानकाळ म्हणजे निराशा व दैन्य यांनीच भरलेला दिसतो, नेहमी दुसऱ्याचे गुलाम व्हावे आणि यांचे मात्र सर्वजण धनी व हुकूम फर्मावणारे, अशा हताश दुर्बल दीन बायांची आपत्ती तू दूर करू पाहात आहेस. केवढे सत्कृत्य आहे हे, बाळ. तुझ्या कार्यात परमेश्वर यश देवो.' आईचे हे उत्तेजनपर भाषण ऐकून विद्यासागरांना

फार सुख झाले. आपल्या कार्याने आपल्या आईस एवढा आनंद होतो आहे, हे पाहून विद्यासागरांच्या अंगावर मूठभर मांस चढले, पुढे त्यांनी तो ग्रंथ प्रसिद्ध केला.

आईबापांची पूजा हा त्यांचा धर्म होता. विद्यासागरांचे धार्मिक विचार धर्मसंबंध मते कोणास माहीत नाहीत. या बाबतीत ते अगदी मुग्ध राहात असत. ते हिंदुधर्मातच होते; परंतु ते कधी देवदर्शनाला वगैरे जायचे नाहीत. परमेश्वराची पूजा ते मानसिकरित्या कदाचित करीत असतील. त्यास मूर्तिपूजा फारशी मान्य नसावी. त्यांच्या आईसही ती आवडत नसे. हे आताच वर सांगितले आहे. कधी-कधी ते म्हणत, 'मला अन्य देव माहीत नाही. मी आपली आई-बापांची पूजा करावी. त्यांची सेवा करावी. त्यांना संतुष्ट करावे, त्यांच्या इच्छा पूर्ण कराव्यात हा धर्म सोपा व सरळ आहे. निदान माझा तरी तोच धर्म आहे.' विद्यासागर त्या वेळेस प्रसिद्ध असलेल्या व जे हल्ली देवाप्रमाणे मानले जातात, त्या रामकृष्ण परमहंसांकडेसुद्धा कधी गेले नाहीत. रामकृष्णच मग आपणहून एकदा विद्यासागरांकडे गेले होते, त्या दोघांचा मोठा मार्मिक संवाद झाला. 'आज मी सागराकडे आलो आहे, मला आता समाधान झाले.' असे रामकृष्ण म्हणाले. 'परंतु सागर असला तरी तो तृषा शांत करू शकत नाही, पाण्याने भरलेला; परंतु तोंडात चूळ घेण्याची सोय नाही.' असे विद्यासागर हसत हसत म्हणाले; 'परंतु हा विद्येचा सागर आहे.' असे रामकृष्ण म्हणाले. 'त्याच्या काठावर जाऊन काय मिळणार ? वाळू, रेती, माशांची हाडे, शिंपा, दुसरे काय मिळणार आहे ?' असे विद्यासागर म्हणाले. अशा प्रकारे दोघांचा सुखसंवाद चालला. एकमेकांना पाहून दोघेही समाधान पावले, तृप्त झाले.

विद्यासागरांचा धर्म आंतरिक होता; हृदयाचा होता. त्यांचा धर्म मनोमय होता. आपले मन पवित्र ठेवा म्हणजे तुम्ही अत्यंत धार्मिक आहात असे ते म्हणत.

ईश्वरचंद्रांचा गुणगौरव

अशा प्रकारे ईश्वरचंद्रांनी आपले मन पवित्र ठेवले. त्याला कसलीही घाण लागू दिली नाही. त्यांची स्वतःच्या कर्तव्यावर श्रद्धा असे. या श्रद्धेच्या जोरावर त्यांचा निश्चय अढळ असे. निरनिराळ्या वेळी अनेक संकटे त्यांच्यावर आली; परंतु त्यांनी हाती घेतलेले प्रारब्ध कार्य कधी सोडले नाही. त्यांनी ध्येय समोर ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, संकटांना तोंड द्यावे असे चाले. प्रयत्नात शैथिल्य कधी आले नाही. या अखंड प्रयत्नांना पुरवठा कोण करी ? तर श्रद्धा व निश्चयात्मिका बुद्धी. लहानपणापासून विद्यासागर निश्चयी असत. ज्या वेळेस त्यांचे वडील त्यांना

कलकत्त्याला आणीत होते, त्या वेळेस ठाकुरदास विद्यासागरांना विचारते झाले, 'ईश, तू वाटेत चालशील का ? का बरोबर गडी घेऊ ?' 'नको. मी चालेन.' असे विद्यासागरांनी उत्साहात बालपणीच्या धैर्याने उत्तर दिले; परंतु वाटेत विद्यासागर दमले. त्यांच्याने पाऊल पुढे टाकवेना. 'चालेन' असे तर बापास सांगितलेले. शेवटी निरुपाय होऊन विद्यासागर म्हणाले, 'बाबा, आता माझ्याने चालवत नाही.' 'मग येताना कबूल का केलेस ?' असे म्हणून ठाकुरदास त्यांना ओढू लागले. त्यांनी त्याला खूप मारलेसुद्धा; पण ईश्वरचंद्र म्हणाले, 'मारा; पण पाऊल टाकणार नाही. कारण माझ्याने टाकवतच नाही.' शेवटी बापास खांद्यावरून त्यांना घेऊन जाणे भाग पडले. अशा करारी व निश्चयी स्वरूपाचे ते होते. या दोन अभिजात गुणांच्या जोरावरच ते मोठे झाले. सुधारणा करणारे झाले.

सर्व कामे करीत असले, तरी नवीन ज्ञान मिळविण्याबद्दल ते उत्सुक असत. २५ व्या वर्षी ते इंग्रजी शिकले आणि त्यात त्यांनी प्रावीण्य अप्रतिम मिळविले. मोठमोठी पुस्तके इंग्रजीत त्यांनी लिहिली. तत्त्वज्ञानावरचे अगदी अर्वाचीन ग्रंथही ते वाचायचे. त्यांच्या हृदयाच्या खिडक्या उघड्या असून मनाचे दरवाजे नूतन प्रकाश घेण्यास सदैव उघडे असत. ज्या फ्रेंच तत्त्वज्ञाचे तत्त्वज्ञान नुकतेच इंग्रजीत प्रसिद्ध होऊ लागले होते त्या कॉम्टेच्या तत्त्वज्ञानाची त्यांची माहिती पाहून एक बडे विद्वान कसे स्तंभित झाले हे पूर्वी एके ठिकाणी सांगितलेच आहे. ते ज्ञानाचे अधाशी होते. कणकण विद्या मिळवून ते खरे विद्यासागर झाले. गटेप्रमाणे 'More light' 'आणखी प्रकाश' हेच त्यांचे जीवन-सूत्र होते. मरेपर्यंत त्यांचा अभ्यास, वाचन चालले होते. ते विद्यादेवीचे एकनिष्ठ उपासक होते. हिंदुस्थानचा इतिहास ते मरताना लिहीत होते. हे पुस्तक आपण पुरे करू शकणार नाही हे पाहून त्यांनी ते दुसऱ्याच्या हवाली केले; परंतु ते तसेच कोठे तरी काळाच्या पोटात आज गडप झाले आहे. सारांश, नेहमी त्यांचे मन ज्ञानोत्सुक असे.

विद्यासागरांकडे काही दोषही असतील; परंतु ते आम्हास माहीत नाहीत. एकच त्यांचा दोष कोणी दाखवितात की, त्यास आपल्या बरोबरीच्या लोकांत काम करता येत नसे. दोन सिंह एकत्र राहू शकत नाहीत, दोन तलवारी एका म्यानात राहणार नाहीत. टिळकांच्यावरही असाच आरोप आहे; परंतु विद्यासागरांवर हा आरोप का येतो हे समजत नाही. यंगसाहेबांबरोबर त्यांचे पटले नाही. बेथून मेल्यावरही त्या इन्स्टिट्यूटचे मालकांबरोबर न पटल्यामुळेच विद्यासागरांना संस्थेशी संबंध सोडावा

लागला; परंतु विद्यासागरांचे बिनसण्याचे कारण अहंकार नसून, स्वतःच्या कर्तबगारीची फाजील घमेंड हे नसून, त्यांच्या नीतिबद्दलच्या तीव्र कल्पना हे आहे. दुसरा मनुष्य जरा अन्याय करतो आहे असे जर त्यांना दिसून आले, तर ते तेथून निघून जात. बेथून व विद्यासागर यांचे नाही का आजन्म प्रेम व स्नेहसंबंध राहिले. बेथून हाही एक मोठा कर्तबगार व थोर पुरुष होता; परंतु बेथून यांच्या ठिकाणी घाण विद्यासागरांना दिसली नाही. तेथे सर्व सोने दिसले म्हणून ते त्यांना चिकटून राहिले.

तेव्हा वरील आरोपसुद्धा खरा असेल, असे वाटत नाही. त्यांच्या गुणांचा अतिरेक हा दुर्गुण फार तर त्यांच्या अंगी चिकटविता येईल आणि समजा, काही किरकोळ दोष असले, तरी या गुणरत्नाकराकडे पाहता ते कोठल्या कोठे लपून जातात, अदृश्य होतात. **'एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः'** हेच खरं. डागांमुळे चंद्रास शोभा आहे. देदीप्यमान सहस्रकरावरही म्हणे डाग आहेत. जे मर्त्य आहे, जे भौम आहे, त्यात थोडाफार भूमीचा अंश, लघुत्वाचा अंश असणारच; परंतु दैवी अंश किती थोर आहे हे पाहून आपण त्यास वंदावे. ईश्वरचंद्रांमध्ये हे दैवी गुण पराकाष्ठेस पोहोचले होते. ते भव्य व सुंदर आहेत; पवित्र व निष्कलंक आहेत. विद्येचे सागर व प्रेमाचे आगर आहेत. ते भूतदयेचे सिंधू आहेत; कर्तव्याचे मेरू आहेत. त्यांच्याकडे पाहून सर्वांनी थोर होण्याचा प्रयत्न करावा; पाषाणापासून परावृत्त होऊन सच्छील, कर्तव्यरत आणि परोपकारपरायण होण्याचा, शक्त्यनुसार दुःखितांचे अश्रू पुसण्याचा आपण सर्वांनी निश्चय करावा म्हणजे झाले.

✦✦✦

शिशिरकुमार घोष

प्रस्तावना

स्वर्गीय बाबू मोतीलाल घोष (मतिलाल हे खरे नाव; परंतु बंगाली भाषेत 'अ'चा उच्चार ओसारखा होतो, म्हणून 'मतिलाल' यास 'मोतीलाल' असेच नाव बंगालबाहेर पडले) यांचे नाव कोणा सुशिक्षितास माहीत नाही ? 'अमृतबझार' पत्रिकेचे थोर संपादक व मोठे देशभक्त म्हणून त्यांची ख्याती आहे. याच मोतीलाल घोषांचे वडील बंधू शिशिरकुमार हे होत. 'अमृतबझार' ही पत्रिका ही शिशिरकुमारांनी सुरू केली व ती पुढे मोतीलालांनी चालविली. शिशिरकुमारांची असावी तितकी माहिती लोकांस नाही, महाराष्ट्रात तर मुळीच नाही म्हटले तरी चालेल.

चार-पाच वर्षांपूर्वी एका जुन्या मासिकात मी शिशिरकुमारांवर एक लेख वाचला. त्या वेळेपासून या थोर पुरुषाबद्दल मला जिज्ञासा उत्पन्न झाली व बंगाली भाषेतील त्यांच्यासंबंधी वाङ्मय मी वाचू लागलो. शिशिरकुमारांचे मी छोटे चरित्र लिहिले व ते माझ्या मित्रांना वाचून दाखविले. ते त्यांना फार आवडले. शिशिरकुमारांचे मी मग मोठे चरित्र लिहिण्यास घेतले व तेही लिहून ठेवले आहे.

चरित्रे लिहून ठेवली; परंतु द्रव्याअभावी पेटीत पडून राहिली. सुदैवाने शिशिरकुमारांच्या छोट्या चरित्रास प्रकाशित करण्यास श्री. अनंतराव बापट हे पुढे आले व म्हणून हे लहानसे चरित्र आज जन्मास येत आहे. मोठ्या चरित्राची छापण्याची वेळ येईल, तेव्हा खरी.

शिशिरकुमारांचे चरित्र फार लोकोत्तर आहे. ते देशभक्त आहेत; महान् वाङ्मयसेवक आहेत, परमेश्वरी साक्षात्काराचे थोर देवभक्त आहेत. स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश या तीहींतही ते मुरलेले आहेत. वाचकांस या थोर पुरुषाचा अल्प परिचय या अल्प चरित्राने होऊन त्यांची क्षुधा जास्तच वाढली तर मोठे चरित्रही प्रसिद्ध करण्यास कोणी अनंतराव पुढे येतील अशी आशा आहे.

पुस्तक प्रकाशित करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानून मी ही छोटी प्रस्तावना आटोपती घेतो.

पां. स. साने, छात्रालय,
मार्गशीर्ष शु ।। ११
शके १८५०, अंमळनेर.

महात्मा शिशिरकुमार घोष

हिंदुस्थानला कुंभकर्णी झोपेतून खडबडून जागे करण्यात ज्या काही अलौकिक सामर्थ्याच्या व्यक्ती गेल्या शतकात जन्मास आल्या, त्यात बाबू शिशिरकुमार घोष यांना फारच वरचे स्थान द्यावे लागेल. बंगालमध्ये लोककल्याणाचा मार्ग त्यांनी चोखाळला. लोकांसाठी, रयतेसाठी झगडण्यासाठी १८-१९ वयाच्या सुमारास यांनी सरकारजवळ दोन हात करण्यास सुरुवात केली. आपल्या खेड्याची, जन्मग्रामाची सुधारणा करण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. राजकीय शिक्षण देण्यासाठी वर्तमानपत्र काढले. विद्वान लोक एकत्र विचार करायला जमावेत म्हणून संस्था सुरू केली. धर्मावरील श्रद्धा नवीन शिक्षणामुळे जी ढासळली होती, ती त्यांनी पुन्हा दृढ केली. प्रभुगौरांगाच्या चरित्रावर सहा भागांत विस्तृत व मनोरम चरित्रग्रंथ लिहून बंगाली साहित्याची व वैष्णवधर्माची अमोल सेवा केली. पारलौकिक विद्येचा प्रसार व्हावा एतदर्थ त्या विद्येचे मासिक काढले. अशा प्रकारे लौकिक, सामाजिक, धार्मिक सर्व प्रकारांनी लोकांची सेवा करणारा, अहर्निश कर्तव्यतत्पर आणि कर्तव्य करीत असता शांतपणे देह सोडणारा असा हा महात्मा डोळ्यांसमोर, अंतश्चक्षूंसमोर आला म्हणजे दृष्टी त्याच्याकडे खिळून जाते, हृदय भरून येते, आपण कर्तव्यपराङ्मुख आहोत याबद्दल शरम वाटून काहीतरी उद्योग, श्रमसातत्य आपापल्या बुद्धीनुसार मजदुराप्रमाणे करीत राहिले पाहिजे, असा ध्वनी अंतःकरणात घुमू लागतो. सज्जनांच्या सहवासात अंतःकरणातील सुप्त संदेश जागृत होतो. सज्जनांच्या संगतीत सत्य व सुंदर अशा वस्तूंवर आपली दृष्टी खिळू लागते. असद्विचारांचा अस्त होतो. कर्तव्याचा रस्ता दिसू लागतो. अज्ञानाची, आलस्याची राती संपून कर्तव्यजागृतीची उषा उजळू लागते. हा काही थोडाथोडका फायदा नाही.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

ज्यांच्या चरित्राने मन पावन व विशाल होईल अशांपैकीच शिशिरबाबू एक आहेत. त्यांचे अल्पसे चरित्र मी येथे देण्याचे मनात आणले आहे.

शिशिरबाबूंचा जन्म १८४० साली जशोहर जिल्ह्यातील एका गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हरी नारायण व आईचे अमृतमयी. वडील हे त्या गावचे एक प्रमुख मुखत्यार होते. त्यांचा स्वभाव धर्मशील व प्रेमळ होता. आई तर नावाप्रमाणेच खरोखर गोड स्वभावाची होती. या आईचे मुलांवर अत्यंत प्रेम असे. आपली मुले ईश्वराची भक्त व धर्मशील निपजावी ही तिची इच्छा. परमेश्वराने या माउलीची इच्छा खरोखर पूर्ण केली.

या धर्मशील जोडप्याला आठ मुले झाली. हे आठ मुलगे होते. या सर्व भावंडांत वडील जो होता त्याचे नाव वसंतकुमार. शिशिरबाबू हा तिसऱ्या क्रमांकाचा होता. या दोन भावांत सहा वर्षांचे अंतर होते. वसंतकुमार हा खरोखरच ईश्वराचा लाडका पुत्र होता. तो इंग्रजी व संस्कृत यात नाणावलेला पंडित होता. त्याचे वाचन दांडगे होते; परंतु ज्या एका गोष्टीमुळे त्याच्यावर सर्व भावांचा जीव की प्राण असे ती गोष्ट म्हणजे त्याची ईश्वरावरील अढळ निष्ठा. त्याचे शील अप्रतिम होते; त्याचे आचरण धुतल्या तांदळासारखे निष्कलंक होते. त्याचे भावांवर अलोट प्रेम होते. शिशिरकुमारने मनुष्याच्या आत्यंतिक निःश्रेयसाच्या प्रश्नांचा विचार वसंतकुमारांच्या चरणसरोजांजवळ बसून केला. आपल्या उतारत्रयामध्ये सद्विचारांची मौक्तिके जी या सत्पुरुषाने उधळली, त्यासाठी आपल्या दैवी तेजाच्या वडील-बंधूंचे शब्दबिंदू आपल्या हृदयशुक्तिकेत साठवून ठेवले. भक्तिभावाची अश्रद्धेच्या आणि संशयाच्या बाजारात लुटालूट केल भक्तिभावाचे कोठार लुटवले. त्यासाठी बीज वसंतकुमारांनी शिशिराच्या हृदयभूमीत पेरून ठेवले होते. वसंतकुमारांनी खरोखरच या रखरखीत प्रदेशात वसंत ऋतू आणला असता; परंतु देशाचे दुर्दैव, आमचे कमनशीब. या महात्म्याला परमेश्वराने ३२ व्या वर्षीच निजधामास नेले. माझ्या लाडक्याला जगाची दृष्ट लागेल म्हणून परमेश्वरासही भीती वाटली काय ?

१८५८ हे वर्ष. १८५७ चे बंड नुकतेच शमले होते. बंगाल्यांमध्ये नीळ उत्पन्न करणारे जे परकीय जमीनदार होते, त्यांचे व मजुरांचे युद्ध जुंपले होते. निळीची लागवड करणारे लोक या मजुरांवर जबरदस्त जुलूम करीत असत. त्यांना आपल्या सत्तेने चेंगरून टाकत असत. पन्नास लाख लोकांनी संप पुकारला आणि निळीची लागवड न करण्याच्या शपथा घेतल्या. या अशिक्षित मजुरांना आपण जाऊन मिळावे आणि

त्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावता आल्यास पाहावी ही सदिच्छा तरुण शिशिरच्या मनात उत्पन्न झाली. आपले लाखो बांधव जुलमाचा निषेध करण्याकरता हातात कंकण बांधून तयार असता, त्यांच्यासाठी धावून जाणे हे माझे-सुशिक्षिताचे, सुखी माणसाचे आद्य कर्तव्य नाही काय ? तू सुखात लोळत असताना, दारिद्र्यात दडपलेल्या, जुलमाने जिकिरीस आलेल्या, विकल झालेल्या तुझ्या बांधवांची तुला काहीच पर्वा वाटू नये ? त्यांची तुम्हाला कीव वाटता कामा नये, तर त्यांचे दुःख ते स्वतःचे दुःख वाटले पाहिजे.

तरुणपणात सद्वृत्ती उचंबळत असतात, मन उदार असते, स्वार्थत्यागास उन्मुख असते. संसारातील गोष्टींनी ते निर्ढावलेले व कोडगे बनलेले नसते. अद्याप मिसरुडही ओठावर आली नसेल, ओठांवरचा जार वाळला नसेल, अशा १७-१८ वर्षांच्या वयाच्या वेळी शिशिरबाबू काय करत होता ? निळीच्या मजुरांच्या साहाय्यासाठी जाण्यासाठी आपल्या वडील भावाजवळ परवानगी मागत होता.

आपल्या भावावर काय संकटे येतील हे वसंतकुमार जाणून होते; परंतु सद्वृत्तीला भीती नसते. ती दडपू नये. सद्वृत्तींना संकटातच फोफावण्यास व दृढ होण्यास सापडते. सद्वृत्तीच्या अंकुरांना बळकटी यावी असे असेल तर त्यांना या संकटांच्या फत्तरातून वाढीस लावले पाहिजे. या उदार विचाराने वसंतकुमारांनी आपल्या या छोट्या भावाला-या बालवीराला-आपल्या कर्तव्याकडे धाव घेण्यास परवानगी मोठ्या आनंदाने दिली. 'तुला तुझ्या सत्कार्यात यश येवो' असा आशीर्वाद दिला.

स्थानिक सरकार मजुरांवर - या शेतकऱ्यांवर उठले होते. निळीचे जमीनदार व लागवडवाले यांच्या झटापटी होत; कधी कधी तर रक्तपातही होई. या मजुरांनी या मुलाचे स्वागत केले. त्यांचा तो एक नायक झाला व त्याने त्यांची अमोल कामगिरी बजावली.

वय लहान होते; परंतु या शिशिरची कृती वामनी होती. या वामनाने मजुरांविषयी विश्वाची सहानुभूती संपादन केली. कालिदासाने म्हटले आहे, की 'तेजसं हि न वयः समीक्षते' ते येथे यथार्थ लागू पडते. हरिश्चंद्र मुकर्जी या वेळेस 'हिंदू पेट्रिअट' हे वर्तमानपत्र चालवीत असत. एम.एल.एल. या नावाने या पत्रात या रयतेची सर्व करुण कहाणी शिशिरबाबूने पत्ररूपाने प्रसिद्ध केली. शिशिरबाबूचे दुसरे नाव 'मन्मथलाल घोष' असे होते. त्यांनी 'एम.एल.जी.' असे लिहिले होते; परंतु चुकीने

वर सांगितलेल्या नावावरच सर्व पत्रे प्रसिद्ध झाली. स्थानिक सरकारात या पत्रांनी फारच गडबड उडवून दिली. ही कोण व्यक्ती असावी याविषयी चौकशी सुरू झाली. आपल्या मार्गातील हा काटा कोठे आहे याचा शेवटी सुगावा लागला. जशोहरचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मोलोनी व त्यांचे सहकारी स्किरन या दुक्कलीने संशोधन करून या सर्व गोष्टींचा सूत्रचालक शिशिर आहे हे पक्के समजून घेतले. नंतर त्यांनी शिशिरला धमकी दिली की, जर या प्रकारे रयतेची मने तुम्ही प्रक्षुब्ध कराल, तर तुमच्यावर खटला भरण्यात येईल; परंतु शिशिर शेळपट नव्हता. ताज्या दमाचा, तरुण रक्ताचा, उदार व धीर विचारांनी भरलेला वीर होता. तो या फुसक्या धमकावण्यांना थोडीच भीक घालणार ! त्याने आपले पत्रसत्र सुरू ठेवले. हिकमतबाज सरकारने दुसरीच एक युक्ती योजली. शहाजीला शिक्षा करण्याने जसे शिवाजीस स्वस्थ बसवता आले, तद्वत शिशिरच्या बापास धमकी द्यावी की, या अल्लड पोराला गप्प बसवा, नाहीतर परिणाम चांगला होणार नाही; परंतु बाप काही कच्च्या दिलाचा नव्हता. ज्या वेळेस ही पिता-पुत्रांची अलौकिक जोडी सरकारास यत्किंचितही बधेना, तेव्हा मॅजिस्ट्रेटसाहेब रागाने लाल झाले आणि या रागाच्या भरात एक प्रकारचा सूड म्हणून शिशिरच्या बापाला ५० रुपये काही एका क्षुल्लक कारणासाठी दंड केला. निमित्तावर टेकलेल्या माणसास अल्पही कारण पुरेसे होते. म्युनसिपल कायदा पुढे करून आपल्या घराशेजारी यांनी जंगल वाढवले असा शिशिरबाबूंच्या वडिलांवर आरोप ठेवण्यात आला होता; परंतु या गोष्टीने हरिनारायणांचे हृदय खचून न जाता आपल्या पुत्राला त्यांनी धीर दिला व पत्रमाला लिहिण्यास जास्तच स्फूर्ती दिली. या एकंदर रयतेच्या दंग्याचा विचार करण्यासाठी जे कमिशन नेमण्यात आले त्या कमिशनच्या हकिकतीत मजुरांची स्थितिनिदर्शक म्हणून या पत्रांतून लांब लांब उतारे, टिप्पणी घेतली आहेत. या पत्रांत लहानपणीही इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, एकंदर दूरवर विचार, अक्कल ही स्पष्टपणे निदर्शनास येतात. हा कोणीतरी मोठा माणूस होणार, याविषयी सर्वांची बालंबाल खात्री होऊन चुकली.

शिशिरबाबूंनी रयतेची दाद लावून दिली. पत्रे लिहिली ही एकच गोष्ट या वेळेस महत्त्वाची आहे असे नाही. दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कायद्याचे कोणत्याही रीतीने तुम्ही उल्लंघन करता कामा नये असे त्याने रयतेस बजावले. अन्नास मोताद झालेले लोक शांतपणे संप किती दिवस चालवणार ? त्यांच्या वृत्ती प्रक्षुब्ध होतात. मुला-बाळांचे, बायका-माणसांचे डोळ्यांदेखत अन्नासाठी तडफडणारे पंचप्राण

पाहिले म्हणजे मनुष्य बेताल झाला, भावनांनी बेहोष झाला, हा घोर प्रसंग ज्याने आपणावर आणला, त्याच्यावर तो धावून गेला, तर ते मनुष्यस्वभावास धरूनच होईल. अशा वेळी शांत राहणे फार कठीण असते. शिशिरबाबूने या लोकांना आवरून धरले. शांततेच्या, सत्याच्या मार्गाने विजय मिळवा असा त्यांचा उपदेश असे. प्राण गेले तरी जावोत, तुरुंगात गेलो तरी बेहत्तर; परंतु निळीची लागवड म्हणून या हातांनी होणार नाही. या शपथेला देवाला साक्षी ठेवून चिकटून राहा. प्रतिज्ञेपासून ढळू नका. दुसऱ्यांच्या प्राणांस धक्का लागू देऊ नका. म्हणजे तुम्ही विजयी व्हाल यात शंका नाही, अशी शिशिरची खात्री असे. त्याच्या सांगण्याप्रमाणे बहुतेक लोकांनी वागण्याचे लोकोत्तर धैर्य दाखवले. सरकारने निळीची लागवड केलीच पाहिजे, याविषयी जेव्हा जोर जुलूम करायला प्रारंभ केला तेव्हा 'हे हात निळीस स्पर्श करणार नाहीत' अशी एकच गर्जना या वीरांनी केली. त्यांचे म्होरके तुरुंगात टाकण्यात आले, त्यांना शृंखलांचा सन्मान मिळाला; परंतु प्रतिज्ञाभंग या लोकांच्या हातून झाला नाही. जमीनदारांनी त्यांना बेड्या ठोकल्या, त्यांचे नाना हाल केले; घर-दारांची राखरांगोळी करून ती जमीनदोस्त करण्यात आली. बायकामुलांना अनाथापरी, दीनदुबळ्या भणंगभिकाऱ्यांप्रमाणे अन्नवस्त्रहीन देशोधडीस लावले; परंतु काय ? मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे की, या लोकांनी प्रतिज्ञेची पूजा केली.

सत्याला जुलूम जाळू शकत नाही. जेथे पूर्णपणे धर्म असतो तेथे यश व जय ठरलेलाच असतो. जेथे कुचराई असेल तेथे पराजय प्राप्त व्हायचा. ५० लाख लोकांनी एका कार्यासाठी तनमनधन वाहिले असता कोणती गोष्ट साध्य होणार नाही ? कोणता स्वर्ग गाठता येणार नाही ? सत्याचा हा थोर विजय होता. जगाच्या इतिहासातील हा संस्मरणीय प्रसंग होता. या प्रसंगात काहीतरी दैवी होते. काहीतरी हृदयास हलविणारे होते. याचा सुपरिणाम झाल्याविना कसा राहील ? टपोऱ्या दाण्याला तसेच फळीही टपोरे येते. या अद्वितीय स्वार्थत्यागाला, सहनशीलतेला फळही मिळाले. इंग्लंडमध्ये प्रधानांनी या गोष्टींची जेव्हा साग्र हकिगत ऐकली, जमीनदार लोकांचे जू झुगारून देण्याचा या सत्त्वशील; परंतु वज्रप्राय वीरांचा दृढनिश्चय जेव्हा त्यांनी स्पष्टपणे पाहिला तेव्हा या जमीनदारांना आपले चंबूगबाळे आटोपून बंगालला रामराम ठोकावा लागला. ज्या देशातील लोकांना या लोकांनी पिळवटून काढून भुके-कंगाल केले, त्यांना हा बंगाल देश प्रधानांनी सोडण्यास भाग पाडले. प्रयत्नांस फळ आले. सहनशीलता सफल झाली. कृतज्ञ रयतेला आनंदाचे भरते आले. प्रेमाचा गहिवर

आला. शिशिरबाबूस त्यांनी 'सिन्नीबाबू' असे नाव दिले. या प्रेमळ टोपण नावाचा अर्थ 'दैववान' असा आहे. जेथे जेथे शिशिर जाईल, तेथे तेथे सुदैव धावत यायचेच, अशी त्यांची श्रद्धा जडली.

या दिव्यातून यश मिळवून शिशिर घरी आला. त्याच्या भावाला आकाश आनंदास ठेंगणे झाले. खरोखरच त्याचे निंबलोण उतरायला पाहिजे होते. आफ्रिकेत २० व्या शतकाच्या आरंभी सत्याग्रहाने झगडणाऱ्या महात्मा गांधींच्या पूर्वी पन्नास वर्षे या तरुण बालाने हा सत्याग्रह यशस्वी करून दाखविला होता आणि या यशस्वितेचे बीज 'अन्यत्याचारित्वांत' आहे हे त्याने ओळखून ५० लाख लोकांस पटविले होते. आपण अद्याप अनत्याचारित्वास पारखे आहोत. मनाने, वाचेने व कृतीने आपण सर्व अत्याचारी आहोत. मग आपणास यश कसे यावे ?

या भावंडांच्या गावाचे नाव पोलुआ होय. जेसूर जिल्ह्यातील हे एक अत्यंत छोटे असे खेडे असल्यामुळे ते लोकांना माहीतही नव्हते. या तरुण भावांच्या मनात विचार उत्पन्न झाला की, आपले गाव नमुनेदार बनवले पाहिजे. आपल्या गावाची सर्वतोपरी भरभराट झाली पाहिजे. एका बाजूला पडलेल्या या वनफुलाचा वास सर्व दशदिशांत दरवळला पाहिजे. ही मुग्ध कलिका फुलून तिचे सौंदर्य सर्व विश्वात दिसावे, हा गाव धन्य असे आनंदोद्गार येथे येणाऱ्याच्या तोंडावाटे निघावे, अशी यांची महत्त्वाकांक्षा होती.

परंतु मुख्य गोष्ट लक्षात ठेवायची ही की, केवळ आशा, वासना बाळगून जगात कार्ये उठत नसतात. दगडांचे पक्के मनोरे उभारायला निढळाचा घाम सांडावा लागतो. रक्त आटवावे लागते. रात्रीचा दिवस करावा लागतो. श्रमाशिवाय ईश्वराचे प्रेम मिळत नाही. ईश्वराच्या प्रेमाशिवाय भाग्य व आनंदही लाभत नाहीत.

खरी उत्कंठा असली, तर मनुष्य कार्यप्रवीण होतो. मला अमुक शहर पाहायची फार उत्कंठा असेल तर मी हजारो प्रयत्न करून ती सफल करीन; परंतु जगात गंमत अशी आहे की, मुळी उत्कंठाच प्रखर व अमर नसते आणि कार्य हातून होत नाही म्हणून मनुष्य निराश होतो. कपाळास हात लावतो. माझे म्हणणे असे आहे की, जेथे उत्कंठा असते, तेथे तत्सिद्ध्यर्थ प्रयत्न असतोच. त्याच मनुष्याला बावनकशी उत्कंठा असेल की, जो पदार्थ अखंड झिजतो आहे.

आपला गाव नमुनेदार बनविणाऱ्या या बंधुवर्गाची इच्छा अशीच जोरदार होती. लगेच आपल्या विचारांस मूर्त स्वरूप देण्याचा त्यांनी आरंभ केला. विचाराला

मूर्त स्वरूपात पाहणे ही मनुष्याची वृत्ती आहे. ईश्वरालाच आपण मूर्तिमंत बनवितो, त्याप्रमाणे आपल्या ध्येयांना आपण मूर्तिमंत केले पाहिजे.

वडील हे पैसे मिळवते असल्यामुळे पोटापाण्याचा प्रश्न या बंधुवर्गास नव्हता. देवाधर्माचा भुंगा लावून घेण्याची त्यांना आज ईश्वरकृपेने जरूरी नव्हती. आपल्या मुलांना समाधान व सुख व्हावे, त्यांची मने प्रसन्न असावीत हीच आई-बापांची इच्छा होती. आई तर एक माउली होती. घराची स्थिती अशी सर्वतोपरी अनुकूल असल्याकारणाने वसंतकुमार, हेमंतकुमार, शिशिरकुमार या त्रिवर्गांनी आपल्या जन्मग्रामाच्या उद्धारार्थ तयारी चालविली. या गावात बाजार नव्हता. तेव्हा त्यांनी नवीन बाजार वसविला आणि त्यास आपल्या पूज्य आईच्या नावावरून 'अमृतबझार' हे नाव दिले. त्या वेळेपासून आजतागायत हा गाव आता याच नावाने ओळखला जातो. आईचे नाव चिरस्मरणीय करून ठेवले.

परंतु याहून महत्त्वाच्या गोष्टी त्यांनी केल्या. जनतेला सुधारायचे असल्यास ती शिक्षित झाली पाहिजे. लहानापासून थोरापर्यंत सर्वांना लिहिता, वाचता, विचार करता आला पाहिजे, ही गोष्ट या त्रिवर्गांच्या मनावर बिंबली होती. सरकारच्या साहाय्याने एक इंग्रजी शाळा त्यांनी सुरू केली. एक मुलींची शाळाही उघडण्यात आली; परंतु विशेष तारीफ करण्यासारखी धैर्याची गोष्ट म्हणजे तरुण स्त्रियांसाठी त्यांनी काढलेली शाळा. ईश्वरचंद्र सुधारक अजून फार प्रसिद्ध झाले नव्हते. अशा वेळेस जुन्याला सोने मानणाऱ्या, जुन्या चालीरीतींना फाटा द्यायला तयार नसणाऱ्या लोकांत लग्न झालेल्या, वाढलेल्या तरुणींना शिक्षण देण्यासाठी शाळा काढणे ही गोष्ट धाडसाची व धैर्याची खरी यात तिळमात्र शंका नाही. जी गोष्ट हितप्रद वाटली, मनास व बुद्धीस पटली, ती लोकांच्या गळी उतरवलीच पाहिजे, असा जोरदार व कार्यकर्त्या पुरुषांचा निश्चय असतो. १८६० च्या सुमारास ब्राह्मण, कायस्थ अशांच्या समोर अशा गोष्टीस सुरुवात करणे म्हणजे १८५७ सालच्या बंडाप्रमाणे निशाणच उभारणे होते. त्यांची निंदा व उपहास करण्यात आला, त्यांना बहिष्कृत करण्यात आले; परंतु सत्याचा रोपा मेला नाही, शाळा भरभराटली व तिचे फायदे लोकांना समजून येऊ लागले. कळकळीने केलेल्या कामाला भगवंत यश देतोच. न दिले तर प्रयत्नात कसूर असते असे म्हणायला विशेषशी हरकत दिसत नाही.

घरंदाज व सुखवस्तू लोकांच्या मुलाबाळांसाठी ही सोय झाली; परंतु ज्यांना पोटासाठी दिवसाचे बारा तास काबाडकष्ट करावे लागतात व मगच गोळाभर अन्नाची

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

गोडी चाखावी लागते, त्यांनी या ज्ञानामृताची चव कशी घ्यावी ? होय. त्यांचाही प्रश्न सोडविला पाहिजे. रात्रीच्या शाळा त्यांनी सुरू केल्या आणि मजूर, गोरगरीब यांना ज्ञानदानाची सोय करून दिली.

मनाची अशा रीतीने जोपासना करण्याची काळजी घेत असताना जनतेच्या आरोग्याकडे पण या बंधूंनी लक्ष पुरविले. शरीर आजारी, दुर्बल व रोगग्रस्त असेल तर मन ज्ञानामृतासाठी तयार किती होईल ? लोकांची-आजाऱ्यांची शुश्रूषा व्हावी म्हणून सरकारच्या मदतीने एक दवाखाना त्यांनी उघडला. लोकांचा पत्रव्यवहार करण्यास सोय व्हावी म्हणून पोस्ट ऑफिस या गावात आणले आणि यामुळे आजूबाजूच्या ४-५ मैलांत राहणाऱ्या हजारो लोकांचे पत्रांसंबंधीचे हाल दूर केले.

असे रात्रंदिवस आपल्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ या मंडळींचे अव्याहत प्रयत्न चालले होते. लोक त्यांना दुवा देत होते. अमृतबझार गाव आता जिल्ह्यातील प्रमुख गाव समजला जाऊ लागला; परंतु भावांची महत्त्वाकांक्षा एवढ्याने थोडीच शांत होणार ? वसंतकुमारच्या मनात अलीकडे दुसरेच विचार खेळू लागले. आपल्या गावात आपण समक्ष काय ते बोलतो-चालतो. ते स्थानिक लोकांना समजते; परंतु आपले विचार सर्व समाजात पसरवायचे असतील, तर मुखपत्र पाहिजे. लोकहितवादींनी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'वृत्तपत्रे म्हणजे मनुष्यांची लांब जिव्हा होय.' या जिभेने आपल्याला कित्येक कोस दूर असलेल्यांजवळही बोलता येते. सर्व लोकांजवळ आपल्याला बोलता आले पाहिजे. यासाठी आपला संदेशवाहक दूत तयार केला पाहिजे. हा दूत म्हणजे वृत्तपत्र. वसंतकुमारांच्या मनात विचार आला. त्यांनी तो आपल्या भावांसमोर मांडला. शिशिरच्या मनाला हा विचार फारच पटला. ताबडतोब तो यशस्वी करण्यास तो उठला. उद्योग सुरू झाला. अन्य गोष्ट सुचेनाशी झाली. कोणतीही गोष्ट मनास पटली म्हणजे तिच्या सिद्ध्यर्थ आकाशपाताळ एक करणे हेच वीरांचे काम आहे.

अनंत अडचणी 'आ'पसरून उभ्या राहिल्या; परंतु राक्षसिणींच्या पसरलेल्या जबड्यातून धीराने आत शिरून त्यांचे पोट फाडणाऱ्या मारुतीची हिंमत शिशिरमध्ये होती. त्याने अडचणीत उडी घेतली आणि त्यांना दूर केले. तो कलकत्त्यास आला. टाइप कसे जुळवावे हे शिकला. यंत्रे-हस्तयंत्रे कशी चालवावी वगैरे सर्व शिकल्यानंतर तो घरी आला. त्याने छापण्याचे एक लाकडी यंत्र आणले होते. जुन्या बंगाली लिपीचे साचे त्याने आणले आणि या अल्प साधनसामग्रीच्या जोरावर वसंतकुमारने

'वाङ्मयीन व शास्त्रीय पाक्षिक' सुरू केले. या पाक्षिकाचे नाव 'अमृतप्रवाहिणी पत्रिका' असे ठेवण्यात आले. एका खेडेगावात एक सुंदर विचारांचे वृत्तपत्र सुरू झाल्याचा बंगालमधील हा पहिला सोन्याचा दिवस.

छापण्याची कला अद्याप सामान्य खेड्यांतील लोकांना माहीत नव्हती. शेजारच्या खेड्यापाड्यातून हजारो लोकांच्या झुंडी हे छापण्याचे यंत्र पाहण्यासाठी जमू लागल्या. हे यंत्र पाहून ते आश्चर्यचकित होत व दिङ्मूढ होऊन जात.

परंतु अशा धाडसाने व जोराने चालविलेले हे पाक्षिक लवकरच बंद करण्यात आले. त्या वेळेस वाहतुकीची साधने नव्हती. बंगालमध्ये रेल्वेचा व्यापार वाढला नव्हता. या बंधुवर्गाच्या गावापासून कलकत्त्यास जाण्यास तीन दिवस लागत. छापखान्यासंबंधीच्या सर्व गोष्टींचा संचय व पुरवठा करण्यास पंचाईत पडू लागली. तेव्हा मोठ्या कष्टाने हा उद्योग थांबविण्यात आला.

शिशिर मनाने व बुद्धीने अशा रीतीने वसंतच्या तालमीत तयार होत असता, त्याने आपल्या शरीराची अवहेलना केली नाही. 'सिर सलामत तो पगडी पचास' ही म्हण त्याच्या मनावर चांगली बिंबली होती. या भावाभावांमध्ये उत्कट बंधुप्रीती होती. एकमेकांसाठी प्राण देण्यास ते अहमहमिकेने पुढे आले असते. सर्वांचा नायक शिशिर असे. तो चपळ व उत्साही असे. त्याच्या रोमारोमात जीवनरस मुसमुसलेला होता. त्याची मूर्ती चैतन्यमय होती. आळस, उदासीनता यांना तेथे थारा नसे. उल्हास व उत्साह यांची ही अभिनव मूर्ती कोणास मोहविणार नाही ? आपल्या भावांसाठी नाना प्रकारचे नवनवीन खेळ शोधून काढण्यात त्याचा हातखंडा असायचा. वसंत व हेमंत हे दोन मोठे भाऊ, मोतीलाल व हिरालाल हे दोन धाकटे बंधू या शिशिरवर अगदी लुब्ध असत. तो कवायत शिकला व त्याने आपल्या भावास व गावातील तरुण मुलांना शिकवली. झाडांवर चढण्यात तो पटाईत असे. गावातील सर्वांत उंच झाड जे दिसेल, ज्याच्यावर इतर कोणीही चळाचळा कापतील, त्याच्यावर चढण्याची शिशिरची तयारी ठेवलेलीच. अर्थातच मग सर्वजण त्याची तारीफ करायचे. 'कपोतपक्षी' ही त्याची आवडती नदी. या नदीत तो तासच्या तास पोहत राही. पोहण्याच्या विद्येत त्याने फारच प्राविण्य मिळविले होते. जेसोरो शहरात 'भेलापुष्कर' म्हणून एक विस्तीर्ण तळे आहे. या तळ्यामध्ये विश्रांती न घेता ५० वेळा शिशिरने फेऱ्या केल्या. चार तास पाण्यात तो पोहू शके. यामुळे त्याची 'पोहणारा' म्हणून ख्याती झाली. तो व त्याचे सवंगडी होड्यांच्या शर्यती लावायचे. नौकाविहार हा शिशिरला फार आवडे.

घोड्यावर बसण्यातही तो तरबेज होता. घोडा जितका जातिवंत, तल्लख व पाणीदार, तितका शिशिरला जास्त जोर यायचा. बेफाम घोड्यासही त्याने नरम आणावा, अशी त्याची मांड अढळ असे. तो पळणारा फारच चपळ होता. त्याच्या जिल्ह्यात तो पळणाऱ्यांत पहिला होता आणि सर्व खेळांत, कुस्त्यांत त्याची चांगलीच प्रगती होती. तो जेथे जेथे जाई, तेथे तेथे त्याच्या राजबिंड्या शरीराकडे सर्वांची दृष्टी वेधे. त्याच्या तोंडावरचा मोहक तजेला, पाणीदारपणा सर्वांच्या नेत्रांचे पारणे फेडी. कोणतेही कार्य त्याने हाती घेतले की लोक उत्सुकतेने पाहायचेच. अशा प्रकारे शिशिरचे शरीर पीळदार, कसलेले व जोमदार होते. कणखरपणा, त्याबरोबरच खेळांमधील सुबकपणा त्याच्या अंगात आला होता. शरीराने व मनाने शिशिरने आपली उन्नती करून घेतली होती; परंतु त्याच्या आत्म्याची उन्नती या वेळी कशी झाली, तीही पाहण्यासारखी आहे.

गावातील लोकांची बौद्धिक, नैतिक, पारलौकिक उन्नती व्हावी एतदर्थ या त्रिवर्ग बंधूंनी एक संस्था स्थापन केली होती. या संस्थेस ते 'भ्रातृसब' असे म्हणत. दुसऱ्या दोन सभा होत्या. त्यांना अनुक्रमे 'ब्राह्मोसब' व 'हरिसब' अशी नावे होती. या सभांमधून वसंतकुमार व हेमंतकुमार हे व्याख्याने देत व विशेष पुढाकार घेत. प्रार्थना करायची किंवा व्याख्यान द्यायचे या गोष्टी जरी हे दोघे ज्येष्ठ बंधू विशेष करून करीत, तरी शिशिरशिवाय त्यांचे चालत नसे. कारण शिशिर आला की, आशा व उत्साह, चैतन्य आणि संगीत तो बरोबर आणायचाच.

बंगालमध्ये चैतन्यांच्या वैष्णवधर्माचा प्रसार आहे. त्या धर्मामध्ये कीर्तनभक्त ही एक भगवंताजवळ जाण्याची पायरी आहे. जरी हे नावाने ब्रह्मो होते, तरी ब्रह्मोंनासुद्धा वैष्णवधर्मातील कीर्तनाची पद्धत प्रिय होती. केशव चंद्रसेन कीर्तनात कसा दंग होत असे, हे प्रख्यातच आहे.

ही कीर्तने लोकप्रिय करण्यास काही साधने लागतात. तीही सुदैवाने या महाकुलात परमेश्वराने दिली होती. या भावंडांचा बाप वाद्यविशारद होता. या कलेतील तो पारंगत होता. हा गुण मुलांमध्येही पुष्कळ अंशी उतरला होता. शिशिरकुमार लहान शिशू असतानाच त्याच्यातील संगीताची देणगी दृग्गोचर होत असे. त्याचा पाठचा भाऊ मोतीलाल हा त्याचा या बाबतीत आवडता शिष्य. हे दोघे भाऊ कोणतेही लौकिक किंवा देवताविषयक गान गाऊ लागले की, वसंत व हेमंत हे संगीतसागरावर केवळ डोलत राहात. ते स्वतःला विसरून अनंताशी क्षणभर समरस होत असत.

कधी–कधी ते यात्राप्रसंग घडवून आणत. या यात्रांतून कृष्णलीला वगैरे नाटकांसारखे भाग तिकडे करून दाखवतात. त्यांचे शेजारी पाजारी लोकही उत्साहाने भाग घेण्यास येत आणि दिव्य संगीत व नृत्य यांच्या रमणीय संगमाने तो गाव म्हणजे श्यामसुंदराचे वृंदावनच आहे की काय, असा भास होई.

अशा प्रकारे त्यांचे दिवस सुखाने चालले होते. आनंदाची सरिता संथपणे वाहात होती. राय दीनबंधू मित्र बहादूर हा या भावंडांचा दोस्त असे. हा निळीवर केलेल्या प्रख्यात नाटकाचा कर्ता तो यांच्या कुटुंबाला 'सुखी कुटुंब' असे म्हणे. हे सहजमनोहर साधे राहणे, हा अकपट व सात्त्विक आनंद त्यास इतके मोहून टाकी की, अशा प्रकारचे चित्र आपल्या नाटकात रंगवावे असे त्यास वाटले आणि एका नाटकात हे दिव्य स्वर्गीय प्रेम व हा मनोरम साधेपणा त्यांचे त्याने चित्र रेखाटले आहे.

वर सांगितलेल्या त्या संस्थांतून कधी–कधी शिशिर हाही व्याख्याने द्यायला जात असे. शिशिरकुमार हे जरी अद्याप बाह्यत: ब्राह्मो दिसले तरी त्यांच्या अंतरंगात खरोखर वैष्णवधर्मच जागृत होता. ईश्वर स्वत: अवताररूपाने आपले स्वरूप मनुष्यास व्यक्त करतो आणि त्याचा अनुभव येणे म्हणजेच धर्म होय हे त्यांच्या मनात पूर्णपणे बाणले होते. ते अगदी लहान असतानाच वसंतकुमारांनी अवतारत्व त्यांच्या मनावर ठसविले होते. ते एकदा शिशिरला म्हणाले, 'ज्याची परमेश्वराच्या अवतारावर श्रद्धा असेल तो खरोखर भाग्यवान होय. मला जर सुदैवेकरून ही श्रद्धा लाभली तर मी नडियांचा गौरांग प्रभू जो आहे, त्याच्या पदकमलाचा आश्रय करून राहीन.' 'हा गौरांग कोण बरे' असे शिशिरबाबूंनी विचारले. वसंतकुमार म्हणाले, 'काय, तू गौरांगासंबंधी ऐकले नाहीस ? अरे, जसा ख्रिस्ती लोकांचा येशू, तसा आमचा हा नडियाचा चैतन्य गौरांगप्रभू होय. या दोन महात्म्यांमध्ये फारच साम्य आहे.' शिशिर म्हणाला, 'येशूने तर कित्येक चमत्कार केले, तसे गौरांगानेही केले होते काय ?' वसंत म्हणाला, 'होय केले होते; आणि याबरोबरच हेही लक्षात ठेव की, मनुष्याने चमत्कार, आश्चर्ये, अद्भुत करून दाखवल्याशिवाय जनतेची त्याच्यावर श्रद्धा बसत नाही आणि जर येशू आणि निमाई यांच्या चरित्राकडे पाहिले तर मला इतके साम्य दिसून येते की, मी थक्क होतो आणि मनात पक्का विचार बाणतो की, मध्यंतरी १४०० वर्षांचा काळ दोघांच्या जन्मात जाऊनही जर एवढे साम्य दिसते तर दोघेही परमेश्वराचे अवतारच असले पाहिजेत.'

शिशिरने विचारले, 'पण अवतार मानण्याची काय बरे जरूरी आहे ?'

वसंत म्हणाला, 'या जगाला, या संसाराला आपण दुःखाचे माहेरघर समजतो ना? या जगामध्ये अनाथाप्रमाणे, पोरक्या पोराप्रमाणे आहो असे आपणास वाटते ना ? आपणास मनाची खरीखुरी शांती का बरे मिळत नाही ? ईश्वर आपला माता-पिता, बंधू, त्राता, सर्व काही आहे हे आपण म्हणतो खरे परंतु तो आपले बोलणे, आपली हाक ऐकतो का याची आपणास माहिती नसते. आपल्या मनाचे विचार ईश्वराला समजतात का? आमचे केविलवाणे तोंड त्याला दिसते का ? याची आपल्याला जिज्ञासा असते. अशा संशयपतित मनुष्यप्राण्याला 'ईश्वर तुमची मने जाणतो, तुमचा धावा ऐकतो' असे सांगणे म्हणजे सुखाचा मूलमंत्र सांगितल्यासारखे नाही काय ? एवढेच नव्हेत तर या भूतलावरील आपल्या आई-बाबांपेक्षाही तो आपणांवर प्रेम करतो, वत्सलता दाखवतो, या ज्ञानाने, या विचाराने आपली अंतःकरणे हर्षाने नाचू लागणार नाहीत काय? अवतार याचा अर्थ एवढाच की, आपली दीनदुबळी स्थिती पाहून परमेश्वर स्वत; आपणामध्ये येतो; किंवा आपल्या जवळचे प्रिय दूतभक्त 'ईश्वराने तुमच्या हाका ऐकल्या आहेत. ईश्वर आहे, सत्य आहे, प्रेममय आहे,ही काही एक कल्पना नव्हे' ही उपदेशामृताची वल्ली आपणांस देण्यासाठी परमेश्वर इकडे पाठवितो. या गोष्टीवर ज्याचा विश्वास असेल तो त्रिवार धन्य होय. दुःखाने दडपलेला असताही तो माथा वर ठेवू शकेल; कारण ईश्वर आपल्या पाठीशी आहे ही त्याला खात्री असते.'

लहानपणाचे हे विचार जरी शिशिरच्या कोमल मनावर उमटले असले, तरी त्याची खोली; त्यातील रहस्य त्याला पुष्कळ वर्षे समजले नव्हते. त्याच्या मनात धार्मिक भावना उचंबळत नसत असे नव्हे; परंतु हा क्षणिक खेळ असे. दारूचा बाण आकाशात आपण उडवतो, तो सूं सूं करीत जातो, क्षणभरच प्रकाश पडतो, परंतु दुसऱ्या क्षणी काळोख याप्रमाणे शिशिरच्या हृदयाकाशात हे ईश्वरी प्रेमाचे बाण, या हवाय उडत असत, परंतु अखंड प्रकाश देणारे येथे काही नव्हते. वसंतकुमारांप्रमाणे तोही प्रार्थना करी; व्याख्याने स्वतः देई व ऐके; प्रवचने ऐकत असे; परंतु या सर्वांमध्ये अद्याप कृत्रिमता होती. परंतु ती कृत्रिमता खालील विलक्षण गोष्टीने नाहीशी झाली. ती गोष्ट अशी - वसंतकुमार एकांतात बसून एक सुंदर गाणे गात होते. ते तेथे एकटेच होते. हे गाणे त्यांनी स्वतः रचलेले होते. त्या गाण्यातील अर्थ असा होता. 'हे प्रभो, तुझे प्रेम किती अनंत असले पाहिजे. मी जागृतपणी तेच पाहतो. मी झोपलो असता स्वप्नातही तेच पाहतो - आपल्याशीच भक्तिपूर्ण भावाने घोळून-घोळून म्हटल्या जाणाऱ्या या गाण्याचा शब्द शिशिरच्या कानावर आला. त्या आवाजातील

हृदयस्पर्शी कंपामुळे शिशिरचे पाय चटकन त्या स्थानाकडे वळले आणि तेथे गेल्यावर त्याच्या काय दृष्टीस पडले ? घळघळ अश्रू नयनांवाटे बाहेर पडले होते, सर्व वस्त्र ओले होऊन गेले होते ! शिशिर तर थक्कच झाला, त्याची दृष्टी क्षणभर स्तिमित झाली. तो एकंदर देखावाच काही हृदयस्पर्शी विलक्षण होता. गदगदलेल्या शिशिरने विचारले, 'कुमार, आपण का बरे रडता?' सद्‌गदित होऊन वसंतकुमार म्हणाले, 'तू जरा मोठा झालास, म्हणजे या गोष्टी तुला समजू लागतील.'

शिशिरच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. ईश्वराच्या यशाची, त्याच्या प्रेमाची केवळ थोरवीच गाऊन होत नाही, त्या प्रेमाचा अनुभव घेता आला पाहिजे. ईश्वराच्या अमर्याद प्रेमाचे दर्शन होऊन, आनंदाचा पूर लोटून तो नेत्रांवाटे फुटला पाहिजे. आपल्या भावाची ही स्थिती आपणास केव्हा प्राप्त होईल, याविषयी त्याला आता तळमळ लागून राहिली.

अशा रीतीने एकमेकांस साहाय्य करून हे बंधू आपापली उन्नती करून घेत होते. सर्व लोकांना प्रिय वाटत. कोणासही साहाय्य करण्यास ते एका पायावर तयार असत. अनाथ, पंगू, हीन, दीन सर्वांची दाद त्यांच्याकडे लागायची. कोणी मनुष्य-स्त्री वा पुरुष-दुखणाईत असेल तर यांनी शुश्रूषेला धावून यावे. महात्मा गांधींनी एके ठिकाणी म्हटले आहे, "There is nothing higher than serving the sick.' कॉलऱ्याची साथ फैलावली की, हातात औषधाच्या बाटल्या घेऊन यांची धावपळ सुरू असायची. एकदा कॉलऱ्याने आजारी पडलेल्या माणसास शिशिरने खांद्यावरून सहा कोस नेले. त्याच्या अंगास विष्ठा, मूत्र यांचा संपर्क झाला. परंतु याने घाण मानली नाही. किती परोपकारी वृत्ती ! कोणी अनाथ अस्पृश्य मरण पावला तर त्याची व्यवस्था व मर्त्य संस्कार करायला तयारच. अस्पृश्य मरण पावला - स्त्री वा पुरुष तर त्यास कोणी हात लावायचा नाही; परंतु या बंधूंनी गावातील काही प्रगमनशील विचारांचे लोक जमवून एक संघ स्थापन केला. हा संघ सर्वांचे अंत्यसंस्कार करण्यास तयार असे.

सेवाधर्मात अशा प्रकारचे हे सुखी कुटुंब निमग्न झालेले होते. जिकडे-तिकडे आनंद होता, परंतु दीनबंधू मित्रांनी वर्णिलेल्या या सुखी कुटुंबावर आता आघात होऊ लागले. परंतु ते सहन करण्यास शिशिरच्या मनात ईश्वराच्या प्रेमाचा भाव उत्पन्न झाला होता. जे वसंतने सांगितले होते ते कसोटीस लागण्याची वेळ आली. सर्व दुःखे सहन करण्यास खरोखरच ईश्वराने त्यास सामर्थ्य दिले.

प्रथम त्यांचे वडील निवर्तले. वडील निवर्तल्यामुळे सर्व आधारच गेला. मोठ्या कुटुंबाचा पोशिंदा गेला. वडील पैसे मिळवीत. सर्वांचे सुरळीत चालले होते. परंतु एवढ्यानेच झाले नाही. दुःख गिळून हे बंधू आपापल्या कर्तव्याकडे वळले, तोच दुसरा कठोर प्रसंग आला.

वडील निवर्तल्यामुळे आता फाटाफूट झाली. शिशिर अजून घरीच धाकट्या भावांसह आईजवळ होता. हेमंत व मोतीलाल दुसरीकडे गेले होते. धाकटा भाऊ हिरालाल खरोखर हिरा होता. हरीचा लाल होता. त्रिभुवनमोलाचे ते माणिक होते.सद्‌गुणांचे निधान व पुण्याचे कालीमंदिर म्हणजेच हिरालाल होता. परंतु अवघ्या सोळाव्या वर्षी त्याने आत्महत्या करून घेतली. त्याच्या मनास कसली काचणी लागली होती ? तो लिहून ठेवतो, 'जगात दुःखाने दडपून गेलेल्या मनुष्यजातीसाठी मला काही करता येत नाही म्हणून हे जग सोडणे हेच मला जास्त श्रेयस्कर वाटते.' केवढा उदार हृदयाचा तरुण ! परहित साधता येत नाही मग कशाला जगा ! जगात जगायचे कशासाठी ? तर जगाला सुख देण्यासाठी. टॉलस्टॉयने एके ठिकाणी 'खरे जगणे म्हणजे काय?' याचे विवेचन केले आहे. तो म्हणतो, 'आपल्या सर्व गोष्टी वेळच्या वेळी करणे, सात वाजता उठणे, नंतर चहापान करणे, क्रीडामंदिरात किंवा वाचनालयात जावे. मग दहा वाजता चमचमीत जेवावे. कचेरीत जाणे, मधल्या सुट्टीत वामकुक्षी करावी. कसेबसे काम करून सायंकाळी फिरायला नाहीतर नाटक, चलत्‌चित्रपट, गायनाचा जलसा यास जायचे, रात्री भोजन करून चार शेजाऱ्यापाजाऱ्यांजवळ गप्पा मारणे ; एक वाजता गादीवर पसरणे ते सकाळी सात वाजता नेमके उठणे अशा प्रकारच्या जीवनक्रमाला सर्वसाधारण लोक सुखमय समजतात.' परंतु रानड्यांनी एकदा सांगितल्याप्रमाणे हे जगणे नव्हे, हे मरणे आहे. टॉलस्टॉय म्हणतो –

'To be good and bad a good life means to give to others more than one takes from them. The less there is of love for self with all the ensuing care about self and the selfish demands made upon the labour of others and the more there is of love for others, with the resultant care for and labour bestowed upon others, the better is the life. The more a man gives to others and the less he demands for himself, the better he is; the less

he gives to others and the more he demands for himself the worse he is.' अशा प्रकारे परासाठी जगणे म्हणजेच स्वत:चा अत्यंत स्वार्थ होय. हिरालाल या दृष्टीने अत्यंत उच्च असा जीवनक्रम संपवून गेला. आत्महत्या करणे हे पाप असो, हे गर्ह्यही असेल, परंतु त्यामध्ये स्वार्थाचा लवलेश नसून, परार्थ साधता येत नाही म्हणून स्वत: जीव धारणे हे त्यास अशक्य झाले.

हिरालालच्या या आकस्मिक मरणप्रसंगाने सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. एकामागून एक आलेले हे कठोर आघात सहन करण्यास परमेश्वरानेच सामर्थ्य द्यावे लागले. या बंधुवर्यांची आई आधीच पतिनिधनाने खिन्न व पोळलेली ; त्यात आपल्या गुणसंपन्न, सुशील व थोर वृत्तीच्या मुलाचा तारुण्यात अजून प्रवेश झालेला नाही तोच असा अकल्पित व दु:खकारक शेवट पाहून तिच्या अंत:करणाची काय स्थिती झाली असेल ती त्या स्थितीतील आयांनाच समजेल; इतरांना याची थोडी कल्पना येणेही अशक्य आहे. हिरालालच्या आईने त्याचा ध्यास घेतला. हे शिशिर यास सहन होईना. मुलांनी आपल्या मातेचे समाधान करण्याची पराकाष्ठा केली; परंतु तिचे सांत्वन होईना. शिशिरच्या शूर हृदयाची ही परीक्षा होती. दिलाची शहानिशा व्हायची होती. दु:खात चूर झालेल्या माझ्या मातेला मी कसे सुख द्यावे, याविषयी तो विचार करू लागला.

जेथे विलक्षण इच्छा असते, तेथे मार्गही लवकरच सापडतो. परदेशातून या सुमारास परलोकविद्येविषयीच्या नवीन शास्त्रीय कल्पना या परलोकविद्येच्या माहेरघर म्हणून मानल्या जाणाऱ्या भारतवर्षाच्या किनाऱ्यावर येऊन आदळत होत्या. परंतु फारच थोड्या सुशिक्षितांची दृष्टी या चित्ताकर्षक शास्त्राकडे वळली होती. बाबू पिअरी चंद्र मित्र आणि दोन-चार व्यक्ती सोडल्या, तर कलकत्त्यामध्ये या गोष्टीत कोणी मन घातले नव्हते. या परलोकविद्याविषयीची शहानिशा करावी, या जगातून दूर गेलेला आत्मा पुन्हा भेटू शकतो काय, कसा भेटेल वगैरे गोष्टींचे संपूर्ण व शास्त्रशुद्ध चिकित्सात्मक ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी हा वीर अमेरिकेत जाण्यास तयार झाला.

आईला समाधान व सुख व्हावे म्हणून कोण हा अट्टाहास ; कोण ही यातायात ! परंतु एकदा मनात विचार आला म्हणजे तदर्थ काहीही करण्यास माघार घेणारा हा मोहरा नव्हता. कचरणारा कच्च्या दिलाचा हा गडी नव्हता.

सर्वांचा निरोप घेऊन शिशिर कलकत्त्यास आला. समुद्रापलीकडे जाऊन मारुतीरायाने जशी सीमा शुद्धी आणली, त्याप्रमाणे ही परलोकविद्येची किल्ली

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

सातासमुद्रापलीकडून आणण्यासाठी ही निश्चयाचा बलभीम निघण्याची तयारी करू लागला. २५ वर्षांचे वय. आपले लहान खेडे सोडून कधी अन्य ठिकाणी न गेलेला असा हा पुरुष १८६० मध्ये अमेरिकेस जायला तयार झाला, याचे तुम्हाला आश्चर्य नाही का वाटणार ? ही कर्तबगारी, हा 'रणधीरपणा' असतो म्हणूनच ते थोर मानायचे ; आणि आम्ही त्यांची बदली पदधूली वंदायची ; परंतु परवाना तिकिट काढण्यापूर्वी त्यांनी बाबू पिअरी चंद्र मुजुमदार यांची गाठ घेण्याची इच्छा दर्शविली. ते मुजुमदार यांच्याकडे गेले. मुजुमदार म्हणाले, 'एकदम अमेरिकेस जाण्याची घाई करू नका. आपल्या स्वतःच्या घरीच राहून या परलोकाविषयीचा तुम्हाला अनुभव येतो का पाहा. जर तुम्हाला काही दृश्य फळ दिसले नाही तर हा प्रवास पत्करा. देवानेच जणू दैवी संदेश दिला. शिशिरला हे सांगणे पटले व अमेरिकेस जाण्याचा बेत रद्द करून पुन्हा स्वारी आपल्या गावी परत आली. हेमंतकुमार, मोतीलाल, त्यांची आई, एक बहीण व शिशिरबाबू असे या पाचजणांचे एक आध्यात्मिक प्रयोगशाळा बनविण्याचे मंडळ ठरले. वसंतकुमारांना यात भाग घेता येईना. कारण ते या वेळेस फार आजारी होते. दोन बैठकींनंतर हेमंतकुमार व मोतीलाल हे परगत आत्म्यांना माध्यम होऊ लागले. ही शक्ती यांच्यात उद्‌भूत झाली. मोतीलाल बाबूंची ही शक्ती लवकरच लयास गेली. परंतु हेमंतकुमार म्हणजे एक उत्कृष्ट लिहिणारे यंत्रच बनले. हिरालालने स्वतःचे अस्तित्व या माध्यमातून उत्कृष्ट तऱ्हेने दर्शविले. कोणालाही तो आला आहे याविषयी शंका राहिली नाही. 'मला माझ्या कृत्याचा पश्चाताप करण्याची वेळ आली आहे. तुम्हाला मी दुःखगर्तेत लोटले व तुमच्या सर्वांच्या साहाय्याने होणाऱ्या माझ्या प्रगतीस मी आचवलो खरा, परंतु तुमच्या प्रेमळ व मनःपूर्वक आशीर्वादाने मी लवकरच उन्नती करून घेईन. माझ्या आधी मृत झालेल्या सर्वांना मी येथे भेटलो आहे.' अशा प्रकारचा मजकूर त्याने लिहून दाखविला. पित्याच्या व भ्रात्याच्या वियोगाने विव्हल झालेल्या या कुटुंबाला फार आनंद झाला. मृत्यूनंतर आपणा सर्वांची भेट होईल, अशी त्यास खात्री वाटू लागली. परमेश्वर किती दयाळू आहे हे त्यांना पुरतेपणी समजले. आनंदसागरात सर्व मंडळी पोहत होती.

या मंडळींच्या या प्रयोगांची हकिकत इंडियन डेली न्यूजमध्ये जेव्हा प्रसिद्ध झाली, त्या वेळेस सर्व लोकांमध्ये हाच विषय बोलण्या-चालण्याचा होऊन राहिला. सुशिक्षित लोकांमध्ये खळबळ उडून गेली. देशाच्या निरनिराळ्या भागांत व खुद्द कलकत्ता येथे पारलौकिक विद्येच्या प्रसारार्थ संस्था स्थापन होऊ लागल्या, पुष्कळशा

या संस्थांशी खुद्द शिशिरबाबूंचा संबंध होता. हिंदुस्थानात या आधुनिक काळास अनुरूप अशी परलोकविद्या शिशिरबाबूंनी आणली. नुसती आणली एवढेच नव्हे ; तर तिच्यामध्ये केवढा अर्थ भरून राहिला आहे, तिची व्याप्ती किती आहे, तिच्यात यश कितपत येईल या सर्व गोष्टी त्यांनी प्रथम सिद्ध करून दिल्या. हिंदुस्थानातील आधुनिक परलोकविद्येचे ते जनक व प्रणेते आहेत असे समजायला फारशी हरकत नसावी असे वाटते.

या परलोकविद्येत शिशिरबाबू रंगले असता, आपल्या गतभावाची भेट होईल या आनंदात असता, त्यांच्यावर दुसरा जबरदस्त दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेमाची मूर्ती, पावित्र्याची प्रतिमा, विद्येचे माहेरघर, सद्‌गुणांचे निधान, सर्वांचा आवडता, भावाच्या गळ्यातील ताईत, दिव्य स्फूर्ती देणारा, कर्तव्यजागृती करणारा, परमप्रेमाचा संदेश सर्वांना सांगणारा महात्मा वसंतकुमार हा मर्त्यलोक सोडून निघून गेला. शिशिरकुमार व वसंतकुमार यांच्यातील भ्रातृप्रेम केवळ अवर्णनीय असे होते. दोघांच्या दोन कुडी निराळ्या, परंतु मने एकत्र भिनली होती. एकमेकांचे सामरस्य झाले होते.

परंतु हा आघात शांत व गंभीरपणे त्याने सहन केला. या परलोकविद्येवर पूर्ण विश्वास बसल्यामुळे आपल्या प्रिय भावाची भेट त्या शोकदुःखविरहित अशा परमेश्वराच्या राज्यात होईल अशी त्यांना खात्री वाटत होती. या परलोकविद्येच्या योगाने वसंतकुमाराचे प्राणोत्क्रमण होण्याच्या पूर्वीच्या दिवशीच देवदूताकडून ही वार्ता हेमंतकुमारांच्यामधून मिळाली होती आणि दुसऱ्याच दिवशी 'उद्या वसंतकुमारांची दुःखे व क्लेश संपतील' या संदेशाप्रमाणे खरोखरच वसंतकुमार वैकुंठवासी झाले.

थोड्या काळाने त्यांची पत्नीही त्यांना सोडून गेली. अशा प्रकारे पिता, भ्राता, पत्नी यांच्या वियोगाने विव्हळ झालेले शिशिरबाबू आता राजकीय रिंगणात उतरले.

पूर्वीचा जुना लाकडी छापखाना होताच. बंगाली भाषेचे टाइपही होते. आपण पुन्हा प्रयत्न करून वृत्तपत्र का काढू नये, असा प्रश्न मनी उभा राहिला. प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आले. त्या वेळचे जिल्हाधिकारी मॅजिस्ट्रेट मन्रो आणि त्यांचे सहकारी ओकिनील्ली यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी शिशिरबाबू गेले. या दोघांची व शिशिरबाबूंची चांगलीच मैत्री जमली होती. स्नेहाने युक्त असलेल्या या अधिकारीद्वयाने या कल्पनेस जोराचा दुजोरा दिला एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष मदत

करण्याचेही अभिवचन दिले. आपल्या पत्राच्या आम्ही प्रत्येकी १० प्रती घेऊ असे त्यांनी आश्वासन दिले.

हे साप्ताहिक मायबोलीत बोलणार होते. सर्वसामान्य जनतेसाठी ते होते. या पत्राचे नाव अमृतबझार पत्रिका असे ठेवण्यात आले. १८६८ मध्ये हे पत्र सुरू करण्यात आले. पत्र सुरू झाले. तीन-चार महिने झाले, तोच या तीन महिन्यांच्या अपत्यावर गदा आली. या बाळाचे बाळसेदार व पाणीदार स्वरूप सरकारकंसाला सहन होईना. पत्राचे धोरण, या लहान पोराची कडक भाषा सरकारच्या मर्मी झोंबू लागली. राष्ट्रियत्वाचा हृद्दीपक संदेश प्रथम शिशिरबाबूंनी दिला. सर्व भारताच्या ऐक्याची कल्पना त्यांच्याच विशाल लेखणीने लिहिली. राष्ट्रीयत्वाचा शिशिरबाबू हा जनक होय. त्यांनी या राष्ट्रीयत्वाची आपल्या लहानशा खेड्यात प्राणप्रतिष्ठा केली. हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे, ते होऊ शकेल. आपल्या राजकीय हक्कास त्याने जागरूक राहिले पाहिजे, यांविषयीचे रणशिंग शिशिरने फुंकले. स्वाभिमानाच्या वन्हीवर भस्म फुंकणाऱ्या व तो वन्ही प्रज्वलित करणाऱ्या या अभिनव तरुणाकडे सरकार दाव्याने व हेव्याने पाहू लागले. एका युरोपियन डेप्युटी मॅजिस्ट्रेटने अब्रूनुकसानीचा खटला भरला. या डेप्युटी कमिशनरांचे नाव राईट असे होते. अमृतबझार पत्रिकेची धीरवृत्ती, त्यातील जोर पाहून या अधिकारी वर्गाने ठरवले की, शिशिरबाबूंना वेळीच धडा शिकवला पाहिजे. यांना अशी अद्दल घडली पाहिजे की, आजन्म तिचा त्यांना विसर पडणार नाही. लोकमान्य टिळकांना देशात शांतता नांदावी, सरकारला रयतेचे कल्याण करीत असता डोक्यास त्रास होऊ नये, म्हणून ज्याप्रमाणे न्या. दावर यांनी हद्दपार केले, त्याप्रमाणे या शिशिरबाबूंनाही तेथील स्थानिक तुरुंगात लोककल्याणार्थ दोन वर्षे अडकवून ठेवावे अशी बंगाल सरकारची स्थानिक सरकारला आग्रहाची विनंती किंवा हुकूम होता. शिशिरबाबूंच्या कारागृहातील वस्तीसाठी एक मुद्दाम घर बांधण्यातही येत होते. परंतु इतक्यात जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट हे शिशिरबाबूंचे मित्र असल्यामुळे त्यांनी जरा रदबदली केली. जर या राजद्रोहात्मक लेखाच्या लेखकाचे नाव तुम्ही सांगाल तर तुमच्यावरील ही फिर्याद काढून टाकण्यात येईल, असे शिशिरबाबूंना कळविण्यात आले.

परंतु आपल्यावर जबाबदारी शिशिरबाबूंनी घेतली होती. त्यांनीही सरकारने दाखवलेली कृपा साभार परत केली. अर्थातच खटल्यास सुरुवात उद्या होणार होती.

खटला सुरू झाला. एक मोठा थोरला जामीन घेऊन शिशिरबाबूंना मोकळे ठेवले होते.

उद्याचा खटल्याचा शेवटचा दिवस होता. जवळजवळ एक आठवडाभर खटला चालला. उद्या ११ वाजता कोर्टात हजर राहिले पाहिजे, नाहीतर जामिनकीचे पैसे भरले पाहिजेत ; व कोर्टाची बेअब्रू करण्याचा दुसरा गुन्हा शाबित होईल.

दुसरा दिवस उजाडला. १० वाजले, तरी अद्याप शिशिरबाबूंनी स्नान केले नव्हते. त्यांनी आज काहीही खाल्ले नव्हते. इतक्यात एकाएकी त्यांना काव्यस्फूर्ती आली. हृदय उचंबळून आले. भावनांचा भोवरा फिरू लागला. जवळ कागद ना शाई ; दौत ना लेखणी. भावनावश कवी हे शोधायला थोडाच जाणार होता! एक कोळशाचा तुकडा घेऊन समोरील भिंतीवर त्यांनी पहिले दोन चरण लिहिले. नंतर माघारी वळले. परंतु पुन्हा भिंतीकडे जाऊन दुसऱ्या दोन ओळी त्यांनी लिहिल्या. अशा प्रकारे पुढेमागे करून एक स्वर्गीय सौंदर्याची दिव्य कविता त्यांनी लिहिली. ती त्यांनी तालासुरावर बसवली. आता प्रसन्न मुद्रेने स्नानाला गेले. थोडेसे खाऊन वेळेवर न्यायमंदिरात हजर झाले.

या गाण्यामध्ये काय बरे होते ? या गाण्यामध्ये ईश्वरावरील त्यांची अढळ श्रद्धा उत्कटत्वाने दिसत होती.

'परमेश्वरा, शेवटी मला तुझा अनुभव आला. तू माझा पिता आहेस व मी तुझे लेकरू आहे. या ज्ञानामुळे आज किती अननुभूत आनंद मला होत आहे! या जगातील सुखदुःखांना आता कोण भीक घालतो! तुझी पूजा करण्यात, तुझे यशोगान गाण्यात, माझे शेष आयुष्य जावो ही शेवटची इच्छा आहे.

देवा, मला तुम्ही फटके माराल ? तरी त्याची मला खंत नाही. कारण तुझ्या मारण्याने दुःख होत नसते. त्यातही एक प्रकारची गोडीच असते. तुझे वटारलेले डोळे मला भिववू शकत नाहीत. का बरे ? मी तुमचा मुलगा नाही ? खरोखरच त्या रागीट मुद्रेच्या आतल्या बाजूला प्रेमाचा सागर साठवलेला मला दिसतो आहे.

जेव्हा आई बाळाला मारते, तेव्हा आईच्याच पोटाशी मूल आश्रयासाठी चिकटते. हे परमेश्वरा, मला मारायचे असेल तितके मार; परंतु शेवटी माझे अगणित मुके तुला घ्यावे लागतील व तू मला गुदमरवून टाकशील.' असो. हा खटला आठ महिने चालला होता. सेशन्स जज्जने शिशिरबाबूंना शिक्षा ठोठावली नाही. खरे पाहिले तर शिशिरबाबूंविषयी या न्यायमूर्तींच्या मनात काळेबेरे होते, द्वेष होता. परंतु

शिशिरबाबूंची प्रकृती हिवतापाने फारच हल्लक झाली होती. त्यांच्या कृश शरीराकडे पाहून त्यांना जर कोणी शिक्षा दिली असती तर ती मरणांतिकच झाली असती. कारण ते जिवंत राहते ना.

आठ महिने खटला चालून शिशिरबाबू निर्दोषी ठरले हे खरे; परंतु एकंदर कुटुंबाची स्थिती फार चमत्कारिक झाली होती. जवळ पैसा मुळीच राहिला नव्हता. सर्व घराणे बसल्यासारखे झाले. थोडासा शिशिरबाबूंचा धीर खचला. आता या खेडेगावात राहून निर्वाह होणे कठीण दिसत होते. तीस माणसांचे कुटुंब. काही विठोबा रखुमाबाई जोडपे नव्हे. एवढ्यांचा गुजराण व्हावा कसा ?

इतक्यात, या खेडेगावात तापाची भयंकर साथ उसळली. मोठा कहर गुदरला. अर्धीअधिक लोकसंख्या मृत्युमुखी पडली. शिशिरबाबू, त्यांचे भाऊ, इतर कुटुंबातील मंडळी ही सर्व तापाने खंगून गेली. अर्थात या प्रिय जन्मभूमीस त्यांना सोडणे भाग होते.

आपल्या गावाला सोडून जाणे शिशिरबाबूंच्या खरोखर जिवावर आले, जेथे आपण सर्वांनी लोकांना सुधारण्यासाठी नाना प्रयत्न केले, जेथे नाचलो, खेळलो, उनाडलो, बागडलो, ते सर्व सोडून आज जायचे होते. ज्या झाडांवर वानरांपेक्षा सफाईने उड्या मारून चढलो, ज्या नदीमध्ये तासन्तास डुंबत राहिलो, अशी ती वन व अशी ती नदी यांना आज मुकायचे होते. ज्या लोकांबरोबर कीर्तने केली, ज्यांच्याशी मैत्री जोडली, त्या सर्वांना सोडून आज जायचे होते.

डोळ्यांना टचकन पाणी आले तरी गाव सोडून जाणे भाग होतेच आणि याप्रमाणे ही सर्व मंडळी दु:खाने दुखावलेली, तापाने त्रस्त झालेली, सुकलेली व जर्जर झालेली कलकत्त्यास थऊन दाखल झाली.

दूर प्रकाशात, अफाट शहरात येऊन मंडळी पडली. कोणी ओळखीचा नाही. सगासोयरा कोणी नाही. शिशिरबाबूंच्या खिशात फक्त १०० रुपये होते. ते सुद्धा त्याने भारी व्याजाने उसनवार काढले होते. मोतीलाल या वेळेस खुलना येथील पिल्जंग शाळेचे हेडमास्तर होते. त्यांनी मोठ्या मिनतवारीने साठवलेले २०० रुपये भावास पाठवून दिले. खरोखरच पाठचे भाऊ असावेत तर असे असावेत. नाहीतर 'भाऊ सख्खे आणि दायाद पक्के' ही म्हण प्रसिद्धच आहे.

सन १८७२ च्या अगदी आरंभी हे देवाचे लाडके कुटुंब कलकत्त्यास आले. पोटाचीच प्रथम पंचाईत असल्यामुळे दोन महिने पत्रिकाप्रकाशन बंद

ठेवावे लागले. परंतु १८७२ च्या फेब्रुवारी महिन्यापासून पत्रिका पुन्हा पूर्ववत निघू लागली. बाबू हेमंतकुमार व मोतीलाल हेही संपादकीय कामात मदत करण्यासाठी आले.

हे पत्र साप्ताहिक होते. त्याची दोन रूपे होती. काही भाग इंग्रजीमध्ये असे व काही बंगालीमध्ये असे. इंग्लिश भाग सर्व शिशिरबाबूंच्या ताब्यात होता. दोन आठवड्यांतच पत्रिकेने कलकत्त्यास चैतन्य आणले, मृत देहात चेतना चेतली. आपल्या गावातील होड्या, नद्या, बागा यांना शिशिरबाबू मुकले परंतु परमेश्वर करतो ते चांगल्यासाठीच करतो. आपण माणसे सर्व संकुचित दृष्टीची आहोत. काहीएक मर्यादेपर्यंत आपण पाहू शकतो आणि त्यावरून सर्व अनुमाने, बरेवाईट ठरवितो. शिशिरबाबूंना लहानशा रिंगणातून परमेश्वराने मोठ्या पटांगणात आणले. व्यापक दृष्टी त्याला यावी म्हणून त्याला कलकत्त्यास आणले. त्याच्या ईश्वरी देण्याचा असंख्य जनतेस उपयोग व्हावा असा परमेश्वरी संकेत होता. या आठ वर्षांत शिशिरबाबू राजकारणाच्या दंगलीत रंगले होते. परमार्थविषयक विचार जरा बाजूस राहिले; परंतु ही पण परमेश्वराचीच योजना असेल. भविष्यकाळातील जास्त चिरस्थायी काम सफल व्हावे म्हणून रक्षक देवदूतांनी आठ वर्षे राजकारणाच्या धुमश्चक्रीत शिशिरला लोटले. या राजकारणात शिशिरने पहिला दर्जा मिळवला म्हणून त्याचे अध्यात्मपर ग्रंथ, त्याचे वैष्णव धर्मावरचे लोकोत्तर ग्रंथ लोकांना मान्य झाले. नाहीतर पदवी न मिळवलेल्या, एका खेडेगावातून आलेल्या या माणसाचे ग्रंथ कोण वाचता व त्यांना कोण विचारता ?

या आठ वर्षांत जनतेला सुखी कसे करता येईल, त्यांची दुःखे वेशीवर कशी टांगली जातील, याचा त्यांना रात्रंदिवस ध्यास असे. आपली पत्रिका लोकप्रिय व्हावी म्हणून त्यांनी कोणताही प्रयत्न ठेवला नाही. विनोदी व हास्यरसोत्पादक चित्रे वृत्तपत्रात घालण्याचा त्यांनीच प्रथम पायंडा पाडला. ते मथळे फार मार्मिक देत असत. 'राजकीय भूमिती' हा त्यांच्या एका मथळ्यावरचा शब्द होता. कित्येक बड्या अंमलदारांनी हा अंक वाचण्यासाठी विकत घेतला. विनोदी, उपरोधिक लिहिणे, ताजे व स्वतःचे स्पष्ट विचार, नवीन धर्तीची मांडणी – असे सर्व और होते. शिशिरबाबूंच्या प्रत्येक गोष्टींवर त्यांची छाप पडलेली असायचीच. थोड्या काळात पत्रिका सरकारवर निर्भीड टीका करणारी म्हणून प्रसिद्ध झाली. सरकारची अंडीपिल्ली पत्रिकेनेच बाहेर काढावी. त्या वेळच्या 'इंडियन डेली न्यूज' या पत्राने म्हटले की,

'The Patrika has become a thorn in the Government.' पत्रिका सरकारच्या अस्तनीतील निखारा होय.

बंगालचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल आता नुकताच या अधिकारावर आरूढ झालेला होता. शिशिरकुमारच्या अंगच्या गुणांची त्याला फार योग्यता वाटे. तो गुणज्ञ होता. एकदा त्याने शिशिरबाबूंना गुप्त भेटीस बोलावले होते. शिशिरबाबूंची खरी योग्यता, त्यांची अलौकिक बुद्धी, त्यांची अंतरीची खरी तळमळ या गोष्टी पाहून टेंपलसाहेब चकित झाले. त्यांच्या मनावर वजन पडले. बंगाल प्रांतावर स्वामित्व चालविण्याच्या कामी त्यांनी शिशिरबाबूस आपला अत्यंत जवळचा विश्वासू सल्लागार असे मानले.

शिशिरबाबूंनी त्याच्याजवळ दोन गोष्टींची देशासाठी मागणी केली. स्थानिक स्वराज्याचे हक्क व एक धंदेशिक्षणाची संस्था. सर रिचर्ड टेंपलसाहेब म्हणाले, 'जर खरोखरच कलकत्त्याच्या लोकांना आपला स्थानिक कारभार आपल्या प्रतिनिधींकडून करवून घेण्याची उत्कंठा असेल आणि जर हे शिशिरबाबू सिद्ध करून दाखवतील तर हे हक्क देण्यास सरकार तयार आहे. शिशिरबाबूंनी कित्येक सभा बोलावल्या आणि अँग्लो इंडियन व नाकर्ते झालेले नामधारी जे. पी. यांची मते पार धुडकावून दिली. लोकमत तयार केले. लोकांना जबाबदारीची जाणीव करून दिली. अशा प्रकारे केवळ शिशिरबाबूंच्या अव्याहत व धडाडीच्या प्रयत्नांमुळे कलकत्त्याच्या नागरिकांस इतक्या लवकर स्थानिक स्वराज्याचे हक्क मिळाले. १९११ मध्ये जी म्युनिसिपालटीची व्यवस्था होती, त्यापेक्षा शिशिरबाबूंनी मिळवून दिलेली स्थानिक स्वतंत्रता जास्त योग्यतेची होती.

दुसरा प्रश्न धंदेशिक्षणाच्या संस्थेचा. पाच दिवसांत अनंत श्रम करून शिशिरबाबूंनी दोन लाख रुपये जमा केले. देशाचा एकांगी शिक्षणाने फायदा होणार नाही, हे या देशहितैकाग्र मनाला ५० वर्षांपूर्वी कळून चुकले होते. दोन लाख रुपये जमा केल्यावर मग टेंपलसाहेबांना सांगितले की, वार्षिक ८००० रुपयांची तुम्ही या संस्थेस मदत केली पाहिजे.

रिचर्डनंतर आलेला अधिकारी सर अॅश्ले एडन हाही काही वाईट अधिकारी नव्हता; परंतु लहरी होता. 'वळले तर सूत नाहीतर भूत' अशी ही स्वारी होती. शिशिरबाबूंचा व अॅश्ले साहेबांचा शेवटी खटका उडाला. १८७७ सालची अखेरी आली होती. अनियंत्रित अशा अॅश्ले साहेबांना बंगालवर बेदरकार बादशाही

गाजवायची होती. अमृतबझार पत्रिका त्याच्या धोतरातील विंचू होता. या विंचवाची नांगी ठेण्याची त्याने एक हिकमत लढविली. ही एक प्रकारची सब्‌सिडिअरी सिस्टिमच होती. शिशिरकुमारांना थोडेसे गोंजारून, थोडा धाकदपटशा दाखवून, चुचकारून आपल्या ताब्यात घेण्याचा त्याने घाट घातला. 'हिंदू पेट्रिअट' पत्राचे संपादक बाबू क्रिस्टो दारूपाल यांना तर अ‍ॅश्लेने खाकोटीस मारले होतेच. छोटा किल्ला सर करून अ‍ॅश्ले साहेबांची स्वारी आता कोंडाणा सर करण्यास निघाली; परंतु शिशिरकुमार यांचे पाणी निराळेच होते.

एकदम अ‍ॅश्लेसाहेबांनी शिशिरबाबूंना आमंत्रण पाठविले. ते आल्यावर त्यांचा आदर-सत्कार वगैरे आनंदाने झाला. नंतर अ‍ॅश्ले म्हणाले, 'हे पाहा, तुम्ही आमच्या बाजूचे व्हा, म्हणजे आम्ही तुम्हाला राज्यकारभारात थोडा भाग देतो. आपण तिघे, मी, तुम्ही व ख्रिस्तोदास मिळून या प्रांतावर राज्य चालविण्याचा कारभार हाकू. मी सांगेन त्याप्रमाणे वृत्तपत्रात लिहिण्याचे ख्रिस्तोदासांनी कबूल केलेच आहे. तुमच्या पत्रालाही करीन. ज्या-ज्या वेळेस सरकारवर टीका करण्याचे असेल त्या वेळेस तो लेख तुम्ही प्रथम मला दाखवला पाहिजे. मी संमती दिल्यावर मग छाटछूट करून तो लेख तुम्ही छापावा. तुमच्या वृत्तापत्राच्या पुष्कळ प्रती सरकारही विकत घेईल. अशा प्रकारे मी तुमची ख्रिस्तोदासांप्रमाणे राज्यकारभार हाकण्यात सल्ला-मसलत घेत जाईन.'

या वेळेस शिशिरकुमार अगदी डबघाईस आले होते. कलकत्त्यास त्यांचा अद्याप बोलबाला होण्यास सुरुवात झाली नव्हती. इलाखाधिपतीकडून आलेली मागणी. पुष्कळ लोक अशा परिस्थितीत या सोनेरी पिंजऱ्यात पकडले गेले असते. या मृगजळाला भुलले असते. परंतु भारवीने म्हटल्याप्रमाणे, 'विकारहेतोसति विक्रयंते येषां न चेतांसि त एक धीरा' जे मोहाचे माहेरघर समोर स्वागतार्थ उभे असताना तिकडे ढुंकूनही पाहात नाहीत व आपल्या कष्टप्रद व पुण्यप्रद मार्गाचेच अवलंबन करतात तेच खरे थोर होत. शिशिरकुमारांनी गव्हर्नर साहेबांचे आभार मानले आणि त्यांच्या विनंतीचा स्वीकार केला नाही. 'महाराज, या देशात एक तरी प्रामाणिक पत्र नको काय ?' असे बोलून शिशिरबाबू स्तब्ध बसले.

अ‍ॅश्लेसाहेबांच्या आशेची राखरांगोळी झाली. मद झडला. आपण सांगू ते हा मनुष्य मुकाट ऐकून घेऊन त्याला आपण आपल्या ताटाखालचे मांजर करू, ही मनाची कामना मनात जिरली. अ‍ॅश्ले रागाने लाल झाले. उद्धटपणाने व रागाने मदांध

होऊन ते चिडविण्याच्या आवाजाने म्हणाले, 'तुम्ही कोणाजवळ बोलता ? बंगालचा अधिकारी तुम्हाला सांगत आहे. कोणत्याही सबबीवर लहानशा लेखांसाठी मी तुम्हाला तुरुंगात टाकण्यास समर्थ आहे. ज्या ठिकाणाहून तुम्ही आला त्या बेसूर गावाला येथून चंबूगबाळे आटोपून जाण्यास मी तुम्हाला भाग पाडीन. विचार करा व मग उत्तर द्या.' अॅश्ले साहेबांनी दिलेली धमकी पोकळ नव्हती. या गोष्टींमुळेच व्हर्नाक्युलर प्रेस अॅक्ट पास करण्यात आला. देशी भाषेतील पत्रांची मुस्कटदाबी करण्यासंबंधी हा कायदा होता. शिशिरबाबूंच्या वर्तनामुळे अॅश्ले संतापले होते. ते बाबूंचे बाणेदार वर्तन बाबूंना बावळट समजणाऱ्या गोऱ्या बाळास सहन झाले नाही. त्याने लॉर्ड लिटनचे कान फुंकले आणि लिटनसाहेबांनी एका बैठकीतच हा कायदा पास करून टाकला.

या अस्त्राचा पहिला प्रयोग 'अमृतबझार' पत्रिकेवर करायचा होता. कारण हे पत्र दुहेरी होते. त्यात इंग्रजी व बंगाली दोन्ही मजकूर असत; परंतु शिशिरबाबू व त्यांचे बंधू यांनी अॅश्लेचे बारसे पाहिले होते. त्याच्या सटीच्या घुगऱ्या खाल्ल्या होत्या. ते अॅश्ले साहेबांना थोडीच दाद देणार ! अॅश्ले याला सपशेल पालथे पाडले व त्याच्या हातावर या जहांबाज भावांनी तुरी दिल्या. हा कायदा अंमलात यायला एक आठवडाच अवकाश होता. परंतु या भावांनी जंग-जंग पछाडले व आपल्या साऱ्या वृत्तपत्राचा नूर पालटून टाकला. ते सर्व आंग्लमय झाले. सर्व इंग्रजीतच पत्र प्रसिद्ध झाले. लोक तर आश्चर्यचकित झाले. सरकार स्तंभित झाले. आपला सर्व व्यूह ढासळला याची अॅश्लेला लाज वाटली. अॅश्लेसाहेब भाबड्या स्वभावाचे असल्यामुळे आपल्या काही बंगाली मित्रांजवळ म्हणाले, 'जर एका आठवड्याचा उशीर संपादकांनी लावला असता तर जबरदस्ती जामीन घेतल्याशिवाय मी त्यांना सोडले नसते.' कायदा देशी भाषेतील वर्तमानपत्राची गळचेपी करण्याकरता होता. इंग्रजी भाषेतील वृत्तापत्रांची यामुळे मुस्कटदाबी करता येईना. अशा रीतीने या खेडवळ बहादुराने बंगालच्या अधिकाऱ्यांना नामोहरम केले.

मागासलेल्या हिंदुस्थानात वृत्तपत्रांच्या इतिहासात या प्रसंगाला तोंड नाही. शिशिरकुमार घोषांची देशाच्या चारी कोपऱ्यांतून वाहवा होऊ लागली. सर्व देशात एक प्रकारची खळबळ उडून गेली. जो तो म्हणू लागला, 'शाबास' !

शिशिरबाबू हे स्वतंत्र बाण्याचे व तडफदार लेखक होते. वाटेल त्या लीला करू पाहणाऱ्या गोऱ्यांस त्यांच्या पत्राचा वचक असे. त्याप्रमाणेच युक्तमार्गच्युत

होणाऱ्या आपल्या बांधवांवरही कोरडे ओढण्यास ते कमी करत नसत. रस्त्यासंबंधी 'Road cess' काही कर बसवण्याच्या वेळेस त्यांनी कसून विरोध केला. जमीनदारांचा अभिमान बाळगणाऱ्यांनी या बिलाची तरफदारी केली होती. ज्या वेळेस प्राप्तीवरील कर बसवण्याची वेळ आली त्यावेळी पुष्कळ स्नेह्यांची मने न्यायासाठी त्यांना दुखवावी लागली. हा कर न्यायमुक्त आहे असे त्यांना वाटले व त्यांनी त्याला आपला टेकू दिला. त्यांनी केलेल्या गोष्टी युक्त होत्या हा प्रश्न जरी क्षणभर बाजूला ठेवला, तरी त्यांचा दृढविश्वास व निश्चय किती अचल राहात असत हे पाहिले म्हणजे त्यांची स्तुती करावी असे वाटते.

त्यांची देशहिताचा सर्व बाजूंनी विचार करण्याची पद्धती फार व्यापक होती. पत्रिका सुरू केल्यापासून जनहिताच्या संबंधी त्यांनी निरनिराळ्या विषयांवर इतके लिहिले आहे की, ते लेख एकत्र केले, तर कितीतरी ग्रंथ होतील. जो जो विषय हाती घेतील त्याचा सर्व बाजूंनी विचार करायचा, त्याची छाननी इतकी करायची की, बोलून सोय नाही. कोणाचीही गोष्ट ते अर्धवट लिहायचे नाहीत. ते सतत ठोठावीत राहतील; आणि शेवटी दार उघडलेच पाहिजे. प्रत्येक वस्तूचे संपूर्ण चित्र ते रेखाटीत, यामुळे सर्वांना त्या चित्राकडे पाहून विचार करता येई. पत्रिकेमधील त्यांचे लिखाण म्हणजे नाना प्रकारच्या माहितीचा सागर आहे. तत्कालिक इतिहासलेखकाला येथे भरपूर मालमसाला मिळेल.

त्यांची राजकीय मते व विचार ते लेखात प्रदर्शित करण्यात आलेले आहेत. ते केवळ विद्वत्तानिदर्शक नव्हते. ज्या वेळेस त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीस प्रारंभ केला त्यावेळेस ते खेड्यातील लोकांत वावरत असत, त्यांच्याबरोबर विचार करत, त्यांच्या भावना समजून घेत. त्यांच्या उणिवा, त्यांची सुख-दुःखे, त्यांची राहणी या सर्वांशी त्यांचा चिरपरिचय झाला होता. म्हणून त्यांचे राजकीय ज्ञान पुस्तकी नव्हते, ते अनुभवाच्या भक्कम पायावर उभारले होते. जनतेमध्ये जे खरे मत आहे तेच सरकारच्या डोक्यात उतरविण्यासाठी त्यांचे लिखाण असे. त्यांच्यापूर्वी राजकीय चळवळ अशी लोकांमध्ये नव्हती. शिशिरबाबूंनी काँग्रेसच्या पूर्वीच इंडियन लीग स्थापन करून लोकांना विचारविनिमय करण्यास शिकवले. आपल्याला काही राजकीय आकांक्षा आहेत, हक्क आहेत, एकंदर स्थिती कशी आहे, आपण कोठे वाहवत आहोत या गोष्टींचा विचार करण्यास शिशिरने शिकवले. राजकीय गुलामगिरीची जाणीव, या गुलामगिरीपासून मुक्तता करून घेण्याची महत्त्वाकांक्षा

खरोखर शिशिरनेच जागृत केली. आज ज्या काही चळवळी निरनिराळ्या ठिकाणी दिसताहेत, त्या स्थापण्यास कारणीभूत असलेले जे काही पुरुष होऊन गेले, त्यात शिशिरबाबूंची गणना आहे.

खरोखर ज्या वेळेस शिशिरबाबू कलकत्त्यास आले त्यावेळेस त्यांना अनंत संकटांशी झगडायचे होते. या संकटांच्या ठिकऱ्या उडवून आपल्या बुद्धीला व विचाराला मार्ग तयार करून घेणे हे त्यांच्यासारख्या माणसाचे काम. येथे गबाळांना ते काय होय! त्यांनी जो मार्ग चोखळला तो अशा स्वरूपाचा होता, की जेणेकरून देश सुशिक्षित व्हावा.

'वर्तमानपत्रकार' या नात्याने फार मोठी थोरवी आहे. त्यांचा दर्जा फार वरचा आहे. स्वतंत्र बाणा, निर्भीड वृत्ती, धाडस, हिकमत, प्रामणिकपणा या सर्व गुणांची त्यांनी परीक्षा दिली. ते व्यक्तीचे बंद गुलाम नव्हते. ते तत्त्वनिष्ठ व तत्त्वप्रिय होते. आपल्याला प्रिय वाटणाऱ्या व्यक्तींवरही ते कडक टीका करण्यास कसूर करत नसत. जेथे-जेथे अन्याय, जुलूम दृष्टोत्पतीस येईल तेथे तेथे त्या त्या अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढण्यास ते कमी करीत नसत. मग व्यक्ती केवढी का असेना, सार्वजनिक हिताचा प्रश्न आला की व्यक्तीला ते बाजूला ढकलून देत असत. त्यांच्या लिहिण्यातही विनोद व कोटी यांचे किरण इतस्तत: चमकत असत. ज्यांच्यावर टीका केलेली असावी, त्यांनी ती विनोदपूर्ण मांडणी पाहून पोट भरून हसावे. एकंदर वस्तुस्थितीची खडा न् खडा माहिती ते गोळा करीत व मग लिहायला घेत. साधे परंतु झणझणीत लिहिणे, त्यात मध्येच उपरोध व विनोदही मिसळून दिले आहेत, असे त्यांचे लेख केवळ निरुपम आहेत. त्यांच्या तोडीचे थोडेच असतील. वरचढ तर विरळा ! त्यांची देशभक्ती वरपांगी बोलघेवडी नसे. अगदी लहानपणीसुद्धा देशाच्या दीनदशेसंबंधीचे विचार त्यांच्या मनात गोंधळ उडवून देत व त्यात ते मग्न असत. त्यांची देशभक्ती इतकी सोज्ज्वळ होती, इतकी बावनकशी होती की लोकांची कष्टप्रद स्थिती पाहून व ऐकून त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिलेले पुष्कळांनी पाहिलेले आहे. हेच विचार परिपक्व झाले आणि स्वार्थाचा ससेमिरा कायमचा सुटला. देश व देशबंधू यांच्यासाठी आपला जन्म आपण वाहिला आहे असे त्यांनी मनात ठरवून टाकले. असा आयुष्याचा एकही दिवस गेला नाही की, ज्या दिवशी त्यांनी देशासंबंधी विचार केला नाही. असा एकही दिवस गेला नाही की ज्या दिवशी त्यांनी देशासाठी काही लिहिले नाही, लोकांची दु:खे हलकी होण्यासाठी काही काम केले नाही.

शिशिरबाबूंचे राजकीय जीवन इतक्या विविध प्रसंगांनी सजलेले आहे की, त्याच्यावर एक मोठा ग्रंथ लिहिता येईल. पार्लमेंटचे एक सभासद डब्ल्यू. एस. येन यांनी शिशिरबाबूंचे एक छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, 'Babu Shishir Kumar moulded that new India which has given birth to those patriotic aspirations finding their mouth piece and interpreter in the Indian National Congress.'

या देशात प्रचंड जाहीर सभा भरवून आपली सुख-दुःखे सरकारला कळविण्याची पद्धती त्यांनीच सुरू केली. कलकत्त्याच्या इंडियन लीगच्या विद्यमाने त्यांनी जिल्ह्या-जिल्ह्यातून संस्था स्थापन केल्या आणि जगातील प्रत्येक देशाचा केवळ जीव असा जो मध्यम वर्ग आहे त्याचे अस्तित्व भासवून दिले. झिंकरगच्छ येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली प्रचंड जाहीर सभा म्हणजे केवळ चिरस्मरणीय होय. अमेरिकेतील वृत्तपत्रांनीही या सभेविषयी लिहिले होते. लॉर्ड रिपन, लॉर्ड डफरिन यांच्यासारख्यांच्याजवळ त्यांचे वजन असे. त्यांना तेथे मान असे. ज्या वेळी लॉर्ड रिपन यांना स्थानिक स्वराज्याचे बिल आणायचे होते, त्यावेळी शिशिरबाबू त्यांचा उजवा हात असत. कलकत्त्यात आल्यापासून पाच वर्षांच्या आतच शिशिरबाबू एक प्रमुख राजकीय पुढारी समजण्यात येऊ लागले. या सर्वांना कारण काय, तर त्यांचे स्वतःचे लोकोत्तर गुण. फक्त प्रेमळ भावांच्या मदतीशिवाय दुसऱ्या कोणाचीही त्यांना मदत नसे.

१८८० च्या सुमारास शिशिरकुमार व त्यांच्या कुटुंबातील इतर मंडळी यांच्यावर पारलौकिक प्रश्नांचा अंमल जास्त बसू लागला. पार्थिव वस्तूंचा बाजार जरा बाजूला ढकलून परलोकासंबंधी विचार करावा असे त्यांना वाटू लागले. ज्या गोष्टींची सुखस्वप्ने आपल्या खेडेगावात ते अनुभवीत असत, त्या गोष्टीत उरलेले आयुष्य वाहावे असे त्यांना वाटू लागले. त्यांचा एक धाकटा भाऊ क्षयरोगाने हळूहळू झिजत चालला होता; त्याच्या जीविताची आता आशा राहिली नव्हती. गरीब-बिचारी वृद्ध आई मात्र अजूनही हयात होती. म्हातारपणी किती वियोग सहन करावे? हा मुलगा मेला तर तिची काय अवस्था होईल याविषयी शिशिरबाबूंना फार भीती वाटे! पारलौकिक गोष्टींवर असलेला त्यांचा विश्वास डळमळू लागला होता काय ? म्हणूनच त्यांना वाईट वाटे.

अशा या मानसिक चिंतेच्या समयी कर्नल आल्काट आणि मॅडम ब्लॅव्हटस्की मुंबापुरीस आली. त्यांनी शिशिरबाबूंजवळ पत्रव्यवहार सुरू केला. या मंडळींचे स्वागत

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

करणारा पहिला हिंदी माणूस म्हणजे आमचे शिशिरकुमारच होत. खासगी रीतीने व आपल्या वृत्तपत्राच्या द्वारे यांनी या दुक्कलीची दुनियेस ओळख करून दिली. वरील दोन्ही माणसे थिऑसॉफीचे भक्त व प्रचारक असले, तरी परलोक विद्येवर त्यांचा व्यासंग व श्रद्धा असे. यांची भेट घेऊन यांची एक प्रकारे चाचणी पाहावी म्हणून ते मुंबापुरीस आले. ते त्यांच्याकडे दोन आठवडे थांबले होते. शिशिरकुमार यांना परलोकविद्येचा फारच नाद लागला आणि या विषयावर ते सांगोपांग माहिति प्राप्त करून घेऊ लागले. हा परलोकविद्येचा नाद सुरू असतानाच, त्यांचा जन्मप्राप्त वैष्णवधर्म जोराने उचंबळू लागला. त्यांच्या भावाच्या प्रेममय वर्तनाचा त्यांच्या मनावर कसा परिणाम झाला होता हे मागे सांगितलेच आहे. परमेश्वराच्या नावाने टाहो फोडण्यास हशील नाही. परमेश्वराच्या प्रेमात आपण वाहून गेले पाहिजे. सर्वत्र आपल्याला त्याच्या प्रेमाची अनुभूती पटली पाहिजे. बंगाल प्रांतामध्ये चैतन्यप्रभूस राधाकृष्णांचा अवतार मानतात. असा एक काळ येऊन गेला की, ज्यावेळेस चैतन्याचा धर्म हा अधोगामी समजला जात असे. अशिक्षितांचा धर्म; खेडवळ व रानवटांचा धर्म असे त्यास हिणवण्यात येई. परंतु केशवचंद्र सेन, केदारनाथ दत्त वगैरेंच्या दीर्घ प्रयत्नांनी हा दृष्टिकोन बदलत चालला. सुशिक्षित नवतरुणांना प्रथम केशवचंद्रांच्या चैतन्याच्या गोड चरित्राने नूतन विचारांना प्रवृत्त केले. केदारनाथांनी चैतन्यासंबंधी जे संस्कृत ग्रंथ होते व जे प्राकृत होते ते लोकांसमोर आणले. परंतु या बाबतीत शिशिरबाबूंनी बजावलेल्या कामगिरीस तोड नाही. त्यांनी इंग्रजी भाषेत इंग्रजी विद्या निष्णात लोकांसाठी दोन भागांत चैतन्यांचे चरित्र लिहिले आहे. दुसरे एक लहान पुस्तक लिहून त्यात वैष्णवधर्माची साधना सांगितली आहे. त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून, मासिकांतून वेळोवेळी लेख लिहून सुशिक्षितांना जागृत केले आहे. नडियाच्या या महान अवताराविषयी शुद्ध व साग्र माहिती अनेक परिश्रम करून त्यांनी लोकांना दिली. चैतन्यांचे खरे रहस्य या पुस्तकात माहीत होते. त्यांच्याकडे आपल्याला पूर्णपणे पाहायला सापडते. परंतु केवळ इंग्रजीत पुस्तक लिहून या देशभक्ताचे समर्थन कसे होईल ? चैतन्य कसा होता, तो कसा वागे, त्याचे रहस्य काय, त्यातील गोडी कशी आणावी, हे त्यांना सर्व वंगवासीयांना समजावून सांगायचे होते. अमृतबझार पत्रिका व इतर लेख यांनी राजकीय वाङ्मयात त्यांचे नाव चिरस्थायी केले असेल तर राजकारणाव्यतिरिक्त शुद्ध वाङ्मयात त्यांनी आपल्या 'नरोत्तमचरित काल, चंद्रगीत, आमियनिमाइचरित्र' या तीन ग्रंथांनी कायम स्थान मिळविले आहे.

मनुष्याचे अंतरंग त्यांच्या ग्रंथात पाहायला सापडते. तो ज्या वेळेस लिहीत असतो, त्या वेळेस तो सर्व विसरून लिहितो. आपण आपणाशीच बोलतो आहोत असा मनात विचार येतो आणि मनुष्य सर्व ओकून टाकतो. मनुष्याला दुसऱ्याजवळ बोलताना, दुसऱ्याच्या आवडीनिवडी, त्याचा दर्जा या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. येथे तसे नसते. शिशिरकुमारांचे ग्रंथ पाहिले म्हणजे इतर परिस्थितीत लपलेल्या किंवा गुदमरलेल्या त्यांच्या वृत्ती येथे पूर्णपणे पसरल्या आहेत हे पाहून आनंद होतो. थोर हृदयाचे सुंदर प्रतिबिंब येथे दिसते. भक्ती, ज्ञान, वैराग्य, प्रेम यांचे मळेच्या मळे हारीने त्यांच्या ग्रंथात लागून राहिले आहेत असे आढळून येईल. यातील काही मतांविषयी, काही विचारांविषयी मतभेद दिसून येईल; कारण त्या त्या स्थितीतील मनुष्याच्या बुद्धीचे ते वैचित्र्य असतेच परंतु ही पुस्तके जो कोणी वाचेल, त्याला या कुशल ग्रंथकाराच्या अलौकिक बुद्धिमत्तेची व सहृदयतेची तारीफ केल्याविना राहवणार नाही हे मात्र खास. त्यांच्या ग्रंथात अशी अनेक स्थले आहेत की, जेथे त्रस्त मन विश्रांती पावते. सूर्यप्रकाशात तळपणाऱ्या हिऱ्याप्रमाणे ग्रंथातील उतारे चमकतात. त्यांची बरोबरी कोणी करू शकणार नाही. लेखनशैली इतकी विषयानुरूप व हृदयंगम आहे व या भाषेतील विचारमौक्तिके इतकी सोज्ज्वळ आहेत की, वाचणारा वेडावतो व डोके डुलवतो. जगातील उत्कृष्ट वाङ्मयाच्या तोडीचे हे वाङ्मय वाचले म्हणजे कोण सहृदय व रसिक वाचक मान तुकविणार नाही, गहिवरून जाणार नाही? वाचकांचे तादात्म्य करणे ही जर उत्कृष्ट वाङ्मयाची एकमेव कसोटी असेल तर ती तेथे सफल सुल होते. जोपर्यंत वंगभाषा जगात आहे तोपर्यंत हे गद्य काव्यात्मक ग्रंथ कायम राहणार. ज्यांनी हे ग्रंथ वाचले असतील त्यांना त्यातील मौज कशी और आहे, हे समजलेच असेल. त्यांची कितीही स्तुती केली तरी ती अपुरीच ठरणार. वंगभाषेतील हे ग्रंथ केवळ अमोलिक ठेव होत. वंगभाषेवर अनंत उपकार त्यांनी करून ठेवले आहेत.

चैतन्य संप्रदायाची मते वगैरे संस्कृतमध्ये होती ती शिशिरकुमारांनी वंगभाषेत आणली. जगातील नानाविध धर्मांचे सार या वैष्णवधर्मात आहे असे त्यांना वाटे. हे सारे सर्वसामान्य लोकांच्या समोर आणणे हे त्यांना कर्तव्य वाटले. त्यांचे हृदय प्रेमाने भरलेले होते. आपण मिळविलेले आपल्या हृदयातच कोंडून ठेवता येणे शक्य नव्हते. त्यांनी ज्ञानद्रव्य मिळवले ते हृदयभूमीत पुरून ठेवण्यासाठी नव्हे. राजाच्या घरात एकीकडे द्रव्य येते, तर दुसरीकडून त्याला पाट फोडलेला असतो, तद्वत जे शिशिरबाबू

वाचीत, मिळवीत ते आपल्या न वाचल्यासवरलेल्या लोकांना केव्हा देऊ याविषयी उत्सुक असत. ज्याला म्हणून हृदय आहे, ज्यात म्हणून थोडेसे तरी विचार करता येण्यासारखे आहे, त्या सर्वांना ही विचारमौक्तिके हृदयात साठविण्यास सापडावी ही त्यांची महनीय इच्छा. परंतु हे करताना त्यांना अहंकाराचा लवलेश नसे. परमेश्वर, श्रीगौरांग आपल्याकडून कार्य करवतो आहे ही त्यांची भावना जागृत असे. धर्म या शब्दातील खरा अर्थ त्यांना अनुभवता आला. वृंदावनातील – आपल्या खेड्यातील लोकांत भावासह कीर्तनरंगात दंग होण्याचे दिवस त्यांना आठवत व त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहात. वैष्णवधर्मातील गोडी, अनुपम सौंदर्य, त्यातील परमेश्वरी माहात्म्य हे सर्व काही त्यांना अवर्णनीय वाटे. नडियाच्या त्या अवतारी पुरुषाने जे सांगितले, जे आचरले, ते लोकांना समजावण्यासाठी त्यांनी ग्रंथापाठीमागून ग्रंथ लिहिले. वैष्णवधर्माची थोर महती गात असताना त्यांच्या तोंडातून दुसऱ्या पंथांविषयी एक तरी अनुदार उद्‌गार बाहेर पडायचा होता; पण छे ! राय सीतानाथराय हे शिशिरबाबूंविषयी म्हणाले, 'वैष्णवधर्म जवळजवळ मेल्याप्रमाणे झाला होता. त्यात शिशिरबाबूंनी नवचैतन्य ओतले; जगापुढे विचाराच्या पायावर सुंदर अशी इमारत त्यांनी उठवली. सर्व हिंदुस्थान तर त्यांच्या नानाविध चळवळींच्यामुळे ऋणी आहेच; परंतु त्यातल्या त्यात वैष्णवधर्माच्या लोकांवर तर त्यांचे न फिटणारे उपकार झाले आहेत.

वैष्णवधर्मासंबंधीचे हे ग्रंथ ते मरेपर्यंत लिहीत होतेच; परंतु मरण्याच्या आधी ४–५ वर्षे त्यांनी परलोकविद्येच्यासंबंधी एखादे मासिक काढण्याचे ठरवले. मासिक काढले म्हणजे व्याप वाढतो. आपले लोकही विचार प्रदर्शित करू लागतात. नाना प्रकारचे अनुभव प्रसिद्ध होऊन त्यांच्यावर शास्त्रीय चर्चा होऊ लागते.

शिशिरबाबूंचे महाराज सर ज्योतींद्र मोहन टागोर हे एक परम मित्र होते. ज्योतींद्र मोहन हे फार विद्वान व सुसंस्कृत, त्याचप्रमाणे अनुभवी होते. शिशिरबाबूंनी त्यांना सल्ला विचारला. शिशिरबाबूंना त्यांनी जे पत्र पाठवले त्याचा सारांश मी देतो.

'तुम्ही जे मासिक काढणार आहात, त्याचे सर्व लोक मोठ्या उत्साहाने व आनंदाने स्वागत करतील अशी मला आशा आहे. ज्याला म्हणून गूढवादाची गोडी आहे, परलोकीच्या गोष्टी जाणण्याची जबर जिज्ञासा आहे, तो तो आपल्याला धन्यवाद देईल अशी आम्हाला खात्री आहे. अशा प्रकारचे मासिक चालवण्यास लायक माणूस तुमच्याशिवाय अन्य मला खरोखर दिसत नाही. तुमची बुद्धिमत्ता असामान्य

आहे; तुमची योग्यता अलौकिक आहे; तुम्ही ज्ञानात मुरलेले आहात; ऋषीप्रमाणे आपले विचार जिवंत व अभिनव असतात. त्यात नाविन्य असते. पारलौकिक ज्ञानाचा प्रसार करण्यात व विचार करण्यात आपण दाखवलेला उत्साह, आपली दिसून आलेली कळकळ केवळ दुर्मिळ होत. तुमच्या कार्यात तुम्हाला यश येईल याबद्दल यत्किंचितही शंका नाही. राजकारणी पुरुष म्हणून जगाला तुमची ओळख आहे; कारण अमृतबझार पत्रिकेचा तुमच्याशी संबंध आहे. परंतु खरे पाहिले तर भक्तिपूर्ण भावाने आणि प्रेमाने लिहिलेले आपले धार्मिक ग्रंथ पाहिले म्हणजे शाश्वत गोष्टींवर विचार करणारे म्हणूनच तुमची जास्त प्रसिद्धी झाली पाहिजे.

अशा प्रकारच्या मासिकाचे महत्त्व कोठवर वर्णावे ! ग्लॅडस्टन या महान मुत्सद्याने यथार्थ उद्गार काढले की, 'मनुष्याच्या मनास वेड लावणारी ही पारलौकिक विद्या फार महत्त्वाची आहे.' कोणतेही काम एकदा हाती घेतले म्हणजे त्याच्यासाठी आपण जिवाचे रान असे करता, क्षणभरही फुरसत न घेता कसे अखंड एकतानतेने श्रम करता हे मला पूर्णपणे विदित आहे. शिवाय या मासिकाचे संगोपन म्हणजे तर तुमचे प्रेमाचे काम; तेथे तुम्ही तनमनधन अर्पण कराल, यात शंकाच नाही. तुम्हाला या गोष्टीत स्वत:चा अनुभव असल्यामुळे तर यश हे ठरलेलेच. अशा प्रकारचे मासिक आपल्या देशात एकच उत्पन्न होत आहे. जगातील सर्व शोधांची संकलित माहिती यात तुम्हाला देता येईल.' अशा प्रकारचे ज्योतींद्र मोहन यांचे उत्तेजनपर पत्र आल्यावर हे मासिक काढण्याचे मुक्रर झाले. याचा पहिला अंक मार्च १९०६ मध्ये निघाला. या मासिकाचा उद्देश असा होता की, जुन्या पारलौकिक कल्पनांचा फैलाव करणे, आणि मृत्यूची भीती नाहीशी करणे. मृत्यू ही फार दैवी देणगी आहे असे सिद्ध करणे. पाहिल्याच अंकात शिशिरबाबूंनी पारलौकिक विद्येचे महत्त्व यावर सुंदर लेख लिहिला आहे.

A man who is convinced of the existence of an after life, will consider death as merely a journey home.'

हे सिद्ध करून देऊन मनुष्याची खात्री करणे हे या मासिकाचे ध्येय होते. या मासिकांतून शिशिरबाबूंनी नाना लेख लिहिले आहेत. स्वत:चे अनुभव सांगितले आहेत. त्यांचा या परलोक व्याख्याविषयी भावाच्या बाबतीत अनुभव प्रसिद्धच होता. परंतु दुसरेही अनेक अनुभव त्यांना आले. एक दिवस शिशिरबाबूंना जरा बरे नव्हते. दोन-दोन जुलाब झाले होते. पोटही फार दुखू लागले. त्यांच्या शेजारी मोतीलाल

होते. एकाएकी मोतीलालच्या चर्येत फरक पडला; ते चेहरा कसासाच करू लागले. शेवटी ते शि।शिरबाबूंच्या जवळ येऊन त्यांच्या अंगावर हात फिरवू लागले आणि त्यांना झोप लागली. थोड्या वेळाने मोतीलाल शुद्धीवर आले. शिशिरबाबूंची वेदनाही थांबली. कोणीतरी अंतरिक्षातील देवदूताने आपली वेदना थांबविण्यासाठी भावाच्या शरीरात प्रवेश करून आपली दु:खे शमविली, असे शिशिरबाबू म्हणत.

परलोकविद्येच्या प्रसारार्थ अशा प्रकारे सदैव खटपटी चालू होत्या. त्यांच्या मासिकावर सर्वांनी उत्कृष्ट अभिप्राय दिले आहेत. ते येथे सांगण्याची जरूरी नाही.

हे काम चालले असता निमोई चरित्राचा शेवटचा भाग ते लिहीत होते. जरी आज ते दोन वर्षे हळूहळू आजारी होते तरी त्यांचे काम रोजच्याप्रमाणे चालले होते. ते खरे कर्मयोगी होते. 'कर्तव्य' हेच त्यांच्या जीवनाचे रहस्य होते. आलस्य त्यांच्या गावी नव्हते. शीरशहा म्हणत असे, 'नेहमी कार्यमग्न असणे हे मोठ्या माणसास शोभते.' शिशिरबाबू जर प्रचंड लेखक होते तर ते प्रचंड वाचणारेही होते. 'व्हॅरो' विषयी एका प्राचीन टीकाकाराने म्हटले आहे.

'So much has he written that it seems impossible he could have read anything, as much has he read that it seems incredible he could have written any-thing.'

मरणकाल समीप येत चालला, तरी मासिकाचे काम नमुनेदार चालले होते. निमाई चरित्राचा सहावा भाग छापला जात होता. शिशिरबाबूंचे एक आवडते वाक्य असे. 'Time is the best gift of God to man.' या वेळाचा त्यांनी सदुपयोग केला. एक क्षणही वाया दवडला नाही. निद्रानाश आणि अग्निमांद्य हे रोग त्यांना जडले होते, तरी ते आपला वेळ ईश्वरात लीन होण्यात किंवा इतर व्यवसायात दवडीत. लहानपणापासून त्यांचे जीवन मात्र दोन मार्गांनी चालले होते.

डॉक्टर पी. एन. नंदी यांच्या विद्युत उपचारांनी त्यांची प्रकृती सुधारत होती. मरण येण्यापूर्वी एक आठवडा त्यांना जबर पडसे झाले व थोडा तापही आला. त्या दिवशी ते बाहेर फिरायला गेले नाहीत. अंत जवळ येत चालला. ते आता फक्त पारलौकिक गोष्टींची चर्चा करत होते. अंथरुणास ते खिळल्यासारखे झाले. ते मित्रांस म्हणत 'आता ईश्वराशी मला जसे समरस होता येत आहे, तसे कधीच वाटले नाही.' ज्या दिवशी ते निजधामास गेले त्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी ते ईश्वराच्या प्रेमाची, त्याच्या निरतिशय सौंदर्याचीच फक्त स्तुतिस्तोत्रे गात होते. हे वर्णन करीत

असता त्यांना इतका आनंद झाला की ते समाधीत निमग्न झाले. अलीकडे अशी त्यांची पुष्कळ वेळा स्थिती होत असे.

मरणाचा दिवस उजाडला. आज वैद्यांना ताप मुळीच दिसून आला नाही. त्यांनी स्नान केले व अल्प आहार घेतला. ते आपल्या डॉक्टरांना म्हणाले, 'Doctor, we meet for the last time, we shall never meet again.' सर्व व्यवहार गंभीरपणे चालले होते. मृत्यूची चर्चा व्यावहारिक गोष्टींप्रमाणे चालली होती. डॉक्टरांचा या बोलण्यावर विश्वास बसला नाही. परंतु तीन तासांच्या आतच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. मरणाच्या आधी दोनच तास आपल्या शेवटच्या निमाईच्या चरित्राच्या भागाची प्रुफे त्यांनी तपासली व म्हणाले, 'Lord, this is my last work in this life.' शेवटचे क्षणसुद्धा मनुष्याच्या उन्नतीसाठी त्यांनी दवडले. न्या रानडे म्हणत असत, 'काम करत असताना मृत्यू येणे ही मोठी भाग्याची गोष्ट'. अशा भाग्याचे मरण शिशिरबाबूंना आले. त्यांच्या जीवनापेक्षा त्यांचे मरण सुंदर भासले. किती शांततेचे हे मरण ! दुपारी दीड वाजता ते एकदम आपल्या नोकराला म्हणाले, 'सर्व जणांनी भोजन केले का ?' 'होय' असे उत्तर आल्यावर ते म्हणाले, 'निमाई गौर, मला पदरात घ्या.' असे शब्द बोलून ते उशीवर पडले. घशाची घरघर नाही; अशांतता, चळवळ, हळूहळू गार पडणे – काही म्हटल्या काही नाही, मरणाच्या आधी येणाऱ्या या चिन्हाचे कुठेच दर्शन झाले नाही. दोनतीन आचके आणि हा महाभाग आपला देह सोडून 'अव्यंग अशा निजधामास निघून गेला.' या देहपंजरातून पळून जाताना, तोंडावर शांतता, गंभीरपणा, सुख यांचेच सात्त्विक तेज विलसत होते.

शिशिरकुमार घोष हे वृत्तपत्रकार, ग्रंथकार, सर्वात धर्मशील ईश्वरभक्त म्हणून अजरामर झाले आहेत. ज्या वेळेस देशी वर्तमानपत्रास मान नव्हता, अशा वेळी निर्भीडपणे व जोरदारपणे त्यांनी आपले पत्र चालवले. लोभास ते बळी पडले नाहीत. मोहात अडकले नाहीत. देशसेवेचे काम केले. त्यासाठी सरकारच्या इतराजीची यत्किंचितही दरकार दाखविली नाही. लोकमान्य टिळक १८९० च्या सुमारास कलकत्त्यास गेले होते. त्यांच्या मनावर शिशिरबाबूंच्या एकंदर चारित्र्याचा फारच परिणाम झाला. 'त्यांच्या पायांशी बसून आम्ही दोघांनी धडे घेतले.' असे मोतीलालांनी लिहिले आहे. टिळकांनी आपल्या केसरी पत्रावर झालेल्या खटल्याच्या वेळी जे लोकोत्तर धैर्य दाखवले ते दाखवण्यास त्यांना शिशिरबाबूंनी शिकवले.

देशसेवेस कसे लोक पाहिजेत याविषयी ते म्हणत. 'Select for your work only those who are willing to labour without any reward. Make one essential condition of membership-self-effacement. Allow no member to thrust forward; expel him who is vain and hankers after prominence. Impart vitality to your people by your own selfless activity. Stick to truths, God will bless your labours.'

या सांगीप्रमाणे ते वागले. ते सत्याला चिकटले म्हणून सत्यस्वरूपी परमेश्वराने त्यांना सर्वत्र रक्षिले. एकदा टिळकांनी काही विचारल्यावर ते म्हणाले,

'Always remember this great truth, God will never bless your work unless you can extinguish self, so far as that is possible; official and others may tempt you to swerve from your, path of duty. Resist and treat such attempts with scorn.'

लो. टिळक यांना शिशिरबाबूंविषयी खरोखरच आदर व भक्ती होती. १९१८ च्या जानेवारी महिन्यात त्यांची पुण्यतिथी होती. तेव्हा टिळक कलकत्त्यास आले होते. ते म्हणाले –

'I had the pleasure and honour of being personally acquainted with Shishirbabu. I have learnt many lessons sitting at his feet. I reversed him as my father and I venture again to say that he, in return loved me as his son. I can call to mind many an interview that is had with him at the patrika office some of which lasted for hours. I have distinct recollections of what he told me of his experiences as a journalist with tears in his eyes and sympathy in his words. I then requested him I remember now to put-down those incidents, at least to leave notes in writing so that they might serve the future historian of the country or even the writer of his life.'

परंतु स्वत्त्व विसरणारा मनुष्य स्वत:चे अनुभव असे लिहू शकत नाही. जो प्रेमाने बोलेल, त्याच्याजवळ ते आपले अनुभव प्रेमाने सांगतात. याप्रमाणे कशाचीही पर्वा न करता, मानापानाची, धनदौलतीची क्षिती न बाळगता या

महापुरुषाने देशाची सेवा केली. परंतु राजकारण हा खळाळीचा, धकाधकीचा मामला, चिरकालाचे प्रश्न दुसरेच असतात. त्यावरही शिशिरकुमारांनी जन्मभर व्यासंग केला. प्रथम देशाच्या हिताची जागृती दिली. नंतर परमेश्वराची जागृतीही करून दिली. ते खरोखर प्रेमळ भक्त होते. त्यांचे जीवन परमेश्वरी प्रेमाने परिपूर्ण होते. इतर विकासांना तेथे वाव नव्हता. प्रभू गौरांगाचे नाव उच्चारल्याबरोबर तनू पुलकित व्हावी, डोळ्यांतून आनंदाश्रू वाहावे व यांची समाधी लागावी असा अनेकदा अनुभव येई. सर्व ठिकाणी परमेश्वर आहे, या भावनेचा मनुष्याच्या मनावर किती परिणाम झालेला आहे, यावरूनच मनुष्याची खरी पारख करता येईल. अनेक कार्ये करीत असता 'तू माझा सांगाती' असे म्हणणारा पुरुषच भक्त होय. शिशिरबाबू भक्त होते – परंतु कर्मयोगी भक्त होते. कर्म म्हणजेच परमेश्वराची सेवा होय ही त्यांची खात्री होती. आपल्याला शिशिरबाबूंप्रमाणे लोकोत्तर बुद्धी नसेल, आपल्यामध्ये धडाडी, कार्यतत्परता, उद्योगीपणा हे गुण नसतील; परंतु प्रेमाने परमेश्वराला आळवणे हे आपल्याला शक्य आहे की नाही? जी काही लहानसहान गोष्ट आपण करू तिचे कर्तृत्व स्वत:कडे न घेता सर्व कर्ता करविता नारायण आहे, त्याची इच्छा आहे, असा मनात विचार बाळगण्यास बुद्धिमत्तेची जरूरी नाही. येथे शरणागती पाहिजे. परमेश्वरार्पण कर्म करण्यास शिका हेच शिशिरबाबू शिकवतात. लोकमान्यांनी हेच शिकवले. सर्व थोर लोक हेच शिकवतात. परंतु या त्यांच्या शिकवणीकडे पाहून आपण काय करू लागतो, हे आपण पाहिले पाहिजे. नाहीतर यांची चरित्रे वाचली, लिहिली तरी त्यांचा काय बरे फायदा? 'बोलणे फोल झाले, डोलणे वाया गेले' असेच म्हणावे लागेल.

शिशिरकुमारांनी आपल्या वैष्णवधर्माची जी अनेक तत्त्वे सांगितली आहेत, त्यातील प्रमुख तत्त्वे सांगून हे छोटेखानी चरित्र आपण संपवू.

१) ईश्वर या जगतीतलावर स्वत: अवतार घेतो किंवा मार्गदर्शक पाठवतो. (परित्राणाय साधूना.....)

२) ये यथा मां प्रपद्यन्ते । तां स्तथैव भजाम्यहम् – जर तुम्ही ईश्वरास प्रेममय मानाल तर तुम्हाला तो प्रेममय दिसेल. तुमच्या इच्छेप्रमाणे ईश्वर आहे.

३) There is one God & no equal परमेश्वर एक आहे.

४) ईश्वर फार मोठा असला, तरी तो मनुष्यासारखाच आहे.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
वाचनालय, सातारा.

वैष्णवांचा धर्म म्हणजे प्रेमाचा धर्म आहे. तो ईश्वराजवळ फक्त प्रेमाची भक्ती मागतो; किंवा भक्तियुक्त प्रेम मागतो.

ही वैष्णवधर्माची तत्त्वे विवरण करणे म्हणजे एक ग्रंथच होईल; परंतु यावर स्वत: या महापुरुषानेच मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत. त्याचा ज्याला घेता येईल, त्याने आस्वाद घ्यावा आणि या साधुतुल्य, कर्तव्यरत पुरुषाची मनात पूज्य स्मृती ठेवावी म्हणजे झाले.

✦✦✦